**Meeting No.** 30 **Meeting Date** 19/Jun/1

**Item No.** 30/1 **Resolution No.** 537

विषय : हुडकोच्या योजनांना मंजुरी

ठराव : प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेऊन
(१) हुडकोकडून विषय टिप्पणी सोबतच्या जोडपत्रात दाखविल्याप्रमाणे योजनांसाठी रुपये २५२.५० लक्ष कर्ज उभारण्यासाठी अनुमती दिली.
(२) श्री. महाजन, कार्यकारी अभियंता / प्राधिकरण यांना हुडकोशी होणाऱ्या करार पत्रावर सही करण्याचा अधिकार प्रदान केला व,
(३) प्राधिकरणाची नेहमीची मोहोर हुडकोशी करण्यात येणाऱ्या दस्तऐवजावर लावण्याकरिता श्री. महाजन यांना अनुमती दिली.

---

**Item No.** 30/2 **Resolution No.** 538

विषय : श्री. एम. बी. गुरनानी, कार्यकारी अभियंता यांची पुनर्नेमणूक पुढे चालू ठेवण्याबाबत

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. गुरनाणी, कार्यकारी अभियंता यांची ३० जून १९८२ रोजी मुदत संपल्यानंतर सहा महिन्यांकरिता त्याच अटीवर पुनर्नेमणूक करण्यात यावी.

---

**Item No.** 30/3 **Resolution No.** 539

विषय : मुंबई महानगर प्रदेशामधील नगरपालिका / परिषदा यांचे कर व इतर भार (चार्जेस) व अतिरिक्त अर्थसाधन जमा करण्याच्या शक्तीबाबत माहिती गोळा करणे — या कामासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन यांना फी म्हणून एकूण रु. १०,०००/- या तत्वावर सल्लागार म्हणून नेमण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
रुपये १०,००० या खर्चाची भरपाई करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्य केल्यास प्राधिकरणाने हा खर्च सुरुवातीस द्यावा व यासंबंधी त्या प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी बोलणी केल्यावर ती अध्यक्षांच्या नजरेस आणून नंतरच हा व्यवहार करण्यात यावा.

---

**Item No.** 30/4 **Resolution No.** 540

विषय : श्री. जी. डी. खापरे यांना घरभाडे परत करण्यासंबंधी

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. जी. डी. खापरे यांना त्यांच्याकडून वसूल करण्यात आलेले भाडे रु. १४७७.४५ परत करण्यात यावेत. तसेच अशा दुरुस्ती व पुनर्रचना विभागातील घर भाड्याच्या रकमा परत करण्याचा प्रश्न आल्यास त्यासंबंधीचे अधिकार उपसभापती तथा मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांना प्रदान करण्यात यावेत.

---

**Item No.** 30/5 **Resolution No.** 541

विषय : प्राधिकरणाच्या कामांसाठी 'नॉनलेव्ही' (ओपन मार्केट) सिमेंटचा वापर करण्याबाबत

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१५ दिवसांना लागणारे सिमेंट शिल्लक राहिल्यानंतरच तसेच लेव्ही सिमेंट उपलब्ध होण्याची शक्यता नाही असे पाहिल्यावरच, केवळ कामाची गती कायम ठेवण्याच्या दृष्टीने योग्यतेवढे नॉनलेव्ही सिमेंट विकत घेण्याचा विभागीय मंडळांना अधिकार देण्यात यावा. तसेच ज्या ज्या वेळी असे नॉनलेव्ही सिमेंट विकत घेण्यात येईल त्या त्या वेळी ही प्रकरणे प्राधिकरणापुढे माहितीसाठी ठेवण्यात यावीत.

---

**Item No.** 30/6 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमीन वितरण) विनियम १९८२ मध्ये सुधारणा करणे तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमीन वितरण) नियम १९८१ मध्ये सुधारणा सुचविणे.

ठराव :

---

**Item No.** 30/7 **Resolution No.**

विषय : कमल एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेने जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे शाळा बांधण्यासाठी जमीन मिळण्याबाबत केलेल्या अर्जाचा विचार करणे.

ठराव :

---

**Item No.** 30/8 **Resolution No.**

विषय : मध्यम उत्पन्न गटातील राजेंद्रनगर, बोरिवली येथील २७ गाळ्यांचे वाटप महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना करण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 30/9 **Resolution No.** 542

विषय : कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास शक्ती प्रदान करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे निविदा स्वीकारण्याबाबत शक्ती प्रत्यायोजित कराव्यात.

---

**Item No.** 30/9 **Resolution No.** 542

विषय : कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास शक्ती प्रदान करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे निविदा स्वीकारण्याबाबत शक्ती प्रत्यायोजित कराव्यात.

---

| **Item No.** | **30/10** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : भारती कला मनरम या संस्थेला शीव, मुंबई येथे सांस्कृतिक कार्यालयासाठी दिलेल्या जागेबाबत.

ठराव :

**Meeting No.** 31 **Meeting Date** 31/Jul/19

**Item No.** 31/1 **Resolution No.**

विषय : १९ जून १९८२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ३०व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 31/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणांतर्गत वेगवेगळ्या विषयांचा प्रगती अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 31/3 **Resolution No.**

विषय : अमेंडमेंट टू महाराष्ट्र हाऊसिंग ॲण्ड एरिया डेव्हलपमेंट ऑथॉरिटी (डिस्पोझल ऑफ लॅण्ड) रेग्युलेशन्स १९८२ एफ. ४ अलॉटमेंट ऑफ डेव्हलपड् प्लॉट्स.

ठराव :

---

**Item No.** 31/4 **Resolution No.** 543

विषय : कमल एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेने जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे शाळा बांधण्यासाठी जमीन मिळण्याबाबत केलेल्या अर्जाचा विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कमल एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेचा शाळा बांधण्यासाठी जमीन मिळण्याबाबत आलेला अर्ज नाकारण्यात यावा.
हा भूखंड योग्य त्या संस्थेला देण्यासंबंधी त्या भागात काम करीत असलेल्या संस्थांकडून अर्ज मागविण्यात यावेत व त्यांची पूर्णपणे छाननी करून नंतर ते प्राधिकरणापुढे ठेवण्यात यावेत.

---

**Item No.** 31/9 **Resolution No.** 544

विषय : लोणावळा येथील ४ योजनांचा हुडकोच्या कर्जाला मान्यता.

ठराव : एकमताने निर्णय घेऊन कार्यसूचीत दर्शविलेल्या ४ योजनांना हुडको, नवी दिल्ली या संस्थेकडून रुपये १८०.२० लक्ष कर्ज घेण्यास अनुमती दिली.

**Item No.** 31/10 **Resolution No.** 545

विषय : गाळ्यांची किंमत निश्चित करणे - मार्गदर्शक सूचना - इत्यादी

ठराव : प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

१) सिमेंट, पोलाद व खुल्या बाजारातील सिमेंट विकत घेणे आवश्यक असल्यास जादा खर्चासाठी अंदाजित खर्चाच्या १० टक्के तरतूद करण्यात यावी.

२) तपासणी व देखरेख याकरिता नगरपरिषदा ज्या खर्चाची मागणी करतात त्या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात यावी. मात्र अशा खर्चाची मागणी नगरपरिषदांनी प्राधिकरणाकडे करू नये यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात यावा.

३) आस्थापना खर्च १० टक्क्यांपेक्षा कोणत्याही परिस्थितीत जास्त लावण्यात येऊ नये. अधिकाधिक कामे वाढवून हा खर्च १० टक्क्यापेक्षा कमी कसा करता येईल याकडे प्रशासनाचे जास्त लक्ष पुरवावे.

४) भूसंपादनाच्या खर्चाच्या रकमेवर १०.५ टक्के दराने व्याज आकारण्यात यावे.

५) जादा रकमेच्या संभाव्य निविदेसाठी अंदाजपत्रकात १० टक्के तरतूद करण्यात यावी.

६) भाववाढीपोटी अंदाजित तरतूदीवर १० टक्के रक्कम आकारण्यात यावी.

७) गाळा बांधून झाल्यावर ज्या गटाला मोडत असेल त्या गटातील लागू होणारा व्याजाचा दर आकारण्यात यावा.

८) भूसंपादन व जमिनीचा विकास एवढ्या मर्यादेपर्यंतच क्रॉस सबसिडीची रक्कम गाळ्याच्या किंमतीत समाविष्ट करण्यात यावी अथवा वजा करण्यात यावी.

९) अकल्पित उद्‌भवणाऱ्या खर्चापोटी गाळ्याच्या किंमतीत ५ टक्के रक्कम अंतर्भूत करण्यात यावी. मात्र ह्या ५ टक्के रकमेत एक स्वतंत्र निधी उभारण्यात यावा व त्यातूनच ही रक्कम खर्च करण्यात यावी. ही रक्कम दुसऱ्या कोणत्याही कामाकरिता खर्च करण्यात येऊ नये.

१०) गाळ्यांच्या विक्रीकरिता अर्ज मागविताना ज्या गटाकरिता अर्ज मागविला असेल व त्यासाठी नफ्याचे जे प्रमाण निश्चित केले असेल त्या प्रमाणानुसारच शेवटपर्यंत नफा आकारण्यात यावा. एखाद्या योजनेत उत्पन्न गट व त्या गाळ्यांची किंमत मध्यम उत्पन्न गटाच्या मर्यादेत गेली तरीही नफा आकारला जाऊ नये.

११) जमिनीची किंमत धरताना बाजारभाव विचारात घेण्यात यावा व त्यानुसारच किंमत आकारण्यात यावी. कोणत्या उत्पन्न गटाकरिता बाजारभाव कसा आकारावा याबाबत महसूल व वन खात्याने ठरविलेली सूत्रे प्रमाणभूत मानावीत.

१२) गाळ्यांच्या विक्रीची किंमत निश्चित करताना तपशीलवार माहिती उपलब्ध नसल्यास योग्य तो वाजवी खर्च संबंधित बाबीवर गृहीत धरून तात्पुरती किंमत ठरवावी व नंतर अंतिम विक्रीची किंमत ठरविण्यात यावी.

१३) बाब टिप्पणीतील अंतिम परिच्छेदात सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**Item No. 31/12 Resolution No. 546**

विषय : श्री. एस. एम. शिंदे, विशेष कार्य अधिकारी यांची पुनर्नियुक्ती पुढे चालू ठेवण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब सूचीत दर्शविल्याप्रमाणे श्री. एस. एम. शिंदे, विशेष कार्य अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीचा काळ १३ जुलै १९८२ नंतर एक वर्षाने वाढविण्यात यावा.

**Item No. 31/13 Resolution No. 547**

विषय : औरंगाबाद येथे गृहनिर्माण योजनेअंतर्गत सुविधा दुकानांकरिता बांधलेल्या गाळ्यांच्या वाटपाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नियम १४ मध्ये योग्य ती सुधारणा करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा व अशी सुधारणा झाल्यावरच टेंडर पद्धतीने हे गाळे वितरण करण्यात यावेत.

**Item No. 31/14 Resolution No. 548**

विषय : मामटी, परसोडी नागपूर येथे मध्यम उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेअंतर्गत २८० गाळे बांधणे योजनेची ९५.९५ व ८८ गाळे अशा तीन गटात वितरण करून निविदा मागविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेऊन कार्यसूचीत दर्शविल्याप्रमाणे मामटी, परसोडी येथील २८० गाळ्यांच्या गृहनिर्माण योजनेची तीन गटात विभागणी करून निविदा मागविण्याचा मुख्य अधिकाऱ्यांचा प्रस्ताव मान्जूर केला.
२/- सभेपुढे विषय क्रमांक ३१/५, ३१/५, ३१/७, ३१/८, ३१/११ व आयत्या वेळच्या विषयांपैकी विषय क्रमांक ३१/१, ३१/२, ३१/३, ३१/४, ३१/५, ३१/७ चर्चा न करता तहकुब ठेवण्यात आले.
३/- प्राधिकरणाच्या सदस्यांपैकी श्री. कृष्णराव पांडव यांची विधानपरिषदेवर निवड झाल्याबद्दल व श्रीमती अमतुल लतीफा काझी यांची महाराष्ट्र राज्य, विधानपरिषदेच्या सदस्या म्हणून नियुक्ती झाल्यापासून अध्यक्षांनी त्यांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे प्राधिकरणाचे दुसरे एक सदस्य श्री. अतुल हुले यांची विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून महाराष्ट्र शासनाने नियुक्ती केल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात आले.
४/- शेवटी अध्यक्षांनी महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेतर्फे त्यांचेकडे देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबतचे निवेदन प्राधिकरणापुढे ठेवले. या मागण्यांबाबत कर्मचारी संघटना पाठपुरावा करीत आहे अशी माहिती त्यांनी दिली. त्यावर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी याबाबत संघटनेशी चर्चा करावी व त्यानंतर प्राधिकरणापुढे चर्चेसंबंधीची माहिती ठेवण्यात यावी असे आदेश दिले.
५/- सर्व उपस्थित सदस्यांनी अध्यक्षांचे व अध्यक्षांनी सदस्यांचे आभार मानल्यावर सभा समाप्त झाली.

**Meeting No.** 32 **Meeting Date** 20/Aug/1

**Item No.** 32/1 **Resolution No.**

विषय : ३१ जुलै १९८२ रोजी झालेल्या ३१व्या बैठकीचा कार्यवृत्तात स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 32/3 **Resolution No.** 549

विषय : प्राधिकरण आणि विभागीय मंडळांसाठी नवीन वाहनांची खरेदी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे सर्व विभागीय मंडळांकरिता पुढीलप्रमाणे वाहने खरेदी करण्यात यावीत. तसेच विभागीय मंडळांच्या नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे विभागीय मंडळांमध्ये वाहन चालकांची पदे निर्माण करण्यात यावीत.

| | | |
|---|---|---|
| (१) कोकण मंडळ | १ वाहन | वाहनचालकाचे १ पद |
| (२) पुणे मंडळ | २ वाहने | वाहनचालकाची २ पदे |
| (३) औरंगाबाद मंडळ | १ वाहन | - |
| (४) नागपूर मंडळ | १ वाहन | वाहनचालकाचे १ पद |
| (५) मुंबई मंडळ | २ जीप्स | - |
| एकूण | ७ वाहने | वाहनचालकाची ४ पदे |

---

**Item No.** 32/7 **Resolution No.** 550

विषय : मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील 'सी' ब्लॉकमधील जमीन मिळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाप्रमाणे बांधकामाचे क्षेत्रफळ ८८५९ चौ. मीटर इतक्या भूखंडाची विक्री करण्यासाठी शासनाने संमती द्यावी अशी प्राधिकरणाची शिफारस कळविण्यात यावी.

---

**Item No.** 32/11 **Resolution No.** 551

विषय : हुडको या वित्तिय संस्थेचा सुधारित वित्तिय आकृतीबंध.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडको व शासन या दोघांनाही १०.५ टक्के व्याजाच्या दरापर्यंत हमी देण्यासाठी विनंती करण्यात यावी.

**Item No. 32/12 Resolution No. 552**

विषय : छिद्रांक टंकक यांना विशेष भत्ता मिळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की.
'छिद्रांक टंकक' या पदावर काम करणाऱ्या लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना दरमहा रुपये १५/- विशेष भत्ता ठरावाच्या तारखेपासून मंजूर करण्यात यावा.

**Item No. 32/13 Resolution No. 553**

विषय : व्यापारी केंद्रातील तसेच निवासी इमारतीमधील दुकानांच्या गाळ्यांची विक्रीची पद्धत ठरविण्यासंबंधी विनियमात करावयाच्या तरतूदीतील प्रस्तावास मान्यता देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) बाब टिप्पणीत दर्शविलेले प्रारुप नियम व विनियम चर्चेत सुचविल्याप्रमाणे दुरुस्त करून शासनाच्या संमतीसाठी पाठविण्यात यावेत.
२) शासनाला अशी विनंती करण्यात यावी की, या नियम/विनियमांना प्रथमतः तात्पुरती (प्रोव्हिजन) संमती देण्यात येऊन हे नियम/विनियम वापरण्याकरिता उपलब्ध करून देण्यात यावेत.

**Item No. 32/14 Resolution No. 554**

विषय : कल्याण येथील भाग-२ योजनेकरिता हुडकोकडून कर्ज उभे करण्याकरिता अनुमती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीतील जोडपत्रात दर्शविल्याप्रमाणे कल्याण, चिकनघर येथील योजनेसाठी १३६.०९ लक्ष रुपये कर्ज घेण्याची अनुमती देण्यात येत आहे.

**Item No. 32/15 Resolution No. 555**

विषय : शक्तीचे प्रत्यायोजन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुख्य अभियंता/प्राधिकरण तसेच सचिव/प्राधिकरण यांना त्यांच्या विभागाकरिता लागणारी तांत्रिक/प्रशासन विषयक पुस्तके विकत घेण्याकरिता अधिकार प्रदान करण्यात यावेत. या अधिकार प्रदानानुसार एका वेळी रुपये २००/- पर्यंत व संपूर्ण वर्षात रुपये १०००/- पर्यंत पुस्तके विकत घेता येतील.

**Item No. 32/16 Resolution No. 556**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी संघाची मागणी
जप्तीदारांना सुधारित वेतन लागू करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जप्तीदारांना सध्या लागू असलेल्या रुपये २००-२८० वेतनश्रेणीऐवजी रुपये २०५-३५५ ही वेतनश्रेणी या ठरावाच्या दिनांकापासून शासनाकडून मिळावयाच्या मंजुरीच्या अपेक्षेवर लागू करण्यात यावी.

**Item No.** 32/17 **Resolution No.** 557

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्या (मागणी क्रमांक ८) रोनिओ ऑपरेटर्संना मोळे वेतनमानानुसार विहित वेतनमान देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
रोनिओ ऑपरेटर या पदाकरिता सध्या अस्तित्वात असलेल्या रुपये २००-२८० रुपये ५/- चक्रमुद्रण भत्त्यासह या वेतनश्रेणी ऐवजी रुपये २०५-३५५ ही वेतनश्रेणी या ठरावाच्या दिनांकापासून शासनाची मंजूरी येण्याच्या आशेवर लागू करण्यात यावी.

**Item No.** 32/18 **Resolution No.** 558

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण संघटनेच्या मागण्या मागणी क्रमांक : २
वैद्यकीय खर्चाची परतफेड प्रतिवर्षी रु. ६००/- प्रमाणे करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वैद्यकीय परतफेडीची रक्कम रुपये ६०/- वरून रुपये १५०/- पर्यंत वाढविण्यात यावी व या निर्णयाचा अंमल १९८२-८३ या आर्थिक वर्षापासून करण्यात यावा.

**Item No.** 32/18 **Resolution No.** 558

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण संघटनेच्या मागण्या मागणी क्रमांक : २
वैद्यकीय खर्चाची परतफेड प्रतिवर्षी रु. ६००/- प्रमाणे करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वैद्यकीय परतफेडीची रक्कम रुपये ६०/- वरून रुपये १५०/- पर्यंत वाढविण्यात यावी व या निर्णयाचा अंमल १९८२-८३ या आर्थिक वर्षापासून करण्यात यावा.

**Item No.** 32/19 **Resolution No.** 559

विषय : शक्तीचे प्रत्यायोजन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
या ठरावास जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे मुख्य अभियंता/प्राधिकरण तसेच कार्यकारी अभियंता/प्राधिकरण यांना वाहने सुव्यवस्थित ठेवण्यासंबंधीचे अधिकार प्रदान करण्यात यावेत. (जोडपत्र 'अ')
(वर्ड टेबल)

**Item No.** 32/20 **Resolution No.** 560

विषय : चिकनघर, कल्याण येथे अल्प उत्पन्न गटांतर्गत भाडेखरेदी पद्धतीने ८०० गाळे बांधणे.

ठराव : एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला.
(१) अल्प उत्पन्न गटातील गट क्र. १(४४८/गाळे) व गट क्रमांक २ (३५२ गाळे) या दोन्ही कामासाठी मे. मोतीराम बुधरमल यांच्या निविदाचा विचार करण्यात यावा व गट क्रमांक १ (४४८ गाळे) साठीची निम्नतम रकमेची मेसर्स एम. बी. दुदाणी यांची निविदा विचारात घेण्यात येऊ नये.
अल्प उत्पन्न गटातील या दोन्ही कामाच्या (४४८ गाळे व ३५२ गाळे) दराबाबत मुख्य अभियंता/प्राधिकरण यांच्या अभिप्रायानुसार दर कमी करवून घेण्यासाठी मे. मोतीराम बुधरमल, कंत्राटदार, यांचेशी वाटाघाटी करण्यासाठी व या दोन्ही गटातील निविदांबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना अधिकार देण्यात येतात. या वाटाघाटीचे वेळी त्यांनी मुख्य अभियंता/प्राधिकरण यांचे सहाय्य घ्यावे असेही ठरले.
(२) आर्थिकदृष्ट्या कमकुवत गट (२१८ गाळे) या कामासाठी मे. उपचंदाणी कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निम्नतम रकमेची निविदा स्वीकारण्यात यावी.

---

**Item No.** 32/21 **Resolution No.** 561

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्या - मागणी क्र. ७ फेरो प्रिंटर्सना विशेष आहार भत्ता दरमहा रु. ७५/- प्रमाणे देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
फेरो प्रिंटर्सना विशेष आहार भत्ता देण्याबाबत दुसऱ्या खात्यामध्ये/संस्थेमध्ये योग्य ती चौकशी करून निर्णय घेण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात यावा.

---

**Item No.** 32/22 **Resolution No.** 562

विषय : वाहन भत्त्याचे सुधारित दर
महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी संघटनेची मागणी - मागणी क्र. २१

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीला जोडलेल्या सहपत्रात दर्शविल्याप्रमाणे विशेष भत्ता देण्यासंबंधीचे आदेश प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावेत.
विषय क्रमांक ३२/२, ३२/४, ३२/५, ३२/६, ३२/८, ३२/९ आणि ३२/१० यावर वेळेअभावी विचार विनिमय झाला नाही.
अध्यक्षांनी सर्व उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

---

**Meeting No.** 33 **Meeting Date** 06/Oct/1

**Item No.** 33/1 **Resolution No.** 558---

विषय : २० ऑगस्ट १९८२ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव : वरील दोन्ही सुधारणांसह प्रतिवृत्तांत स्थायी करण्यात आला.

**Item No.** 33/2 **Resolution No.** 563

विषय : मध्यम उत्पन्न गट (उच्च) आणि उच्च उत्पन्न गट गाळ्यांच्या वितरणाची पद्धत - धोरणात्मक निर्णयात सुधारणा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे उच्च उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट गाळेवाटणी भाडेखरेदी पद्धतीने, ५० टक्के सुरुवातीस भरावयाचे अंशदान व ५ ते ७ वर्षांचा परतफेडीचा कालावधी धरून, करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच बाब टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे मध्यम उत्पन्न गट आणि उच्च उत्पन्न गट या गाळ्यांच्यासाठी आगाऊ अंशदान पद्धतीने (स्वियअर्थ सहाय्यित) योजना लागू करण्यासपण परवानगी देण्यात यावी. मात्र अशा योजना लागू केल्याने त्यांचा आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट किंवा अल्प उत्पन्न गट यांच्या कार्यक्रमावर कोणताही परिणाम होऊ नये याची दक्षता घेण्यात यावी.

**Item No.** 33/3 **Resolution No.** 564

विषय : मध्यम उत्पन्न गटातील राजेंद्रनगर, बोरिवली येथील २७ गाळ्यांचे वाटप महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना मिळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बोरिवली, राजेंद्रनगर येथील मध्यम उत्पन्न गटातील २७ गाळे कर्मचाऱ्यांना देण्याबाबत शासनाकडे पुन्हा शिफारस करण्यात यावी.

**Item No.** 33/4 **Resolution No.** 565

विषय : मजासवाडी, जोगेश्वरी येथील ३७० गाळ्यांतील काही गाळे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना वाटप करण्याबाबतची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मजासवाडी येथील ज्या (१६९ अथवा १६४) कर्मचाऱ्यांनी अनामत रक्कम भरलेली आहे, त्यांना या योजनेमध्ये गाळे देण्यासंबंधी शासनाकडे पुन्हा एकवार शिफारस करण्यात यावी.

**Item No.** 33/5 **Resolution No.** 566

विषय : चेंबूर येथे सुभाषनगर वसाहतीत मध्यम उत्पन्न गटासाठी बांधलेले १४ गाळे (एम.आय.जी.) मिळण्याबाबत प्राधिकरणाच्या अधिकारी संघटनेची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
चेंबूर येथील सुभाषनगर वसाहतीत मध्यम उत्पन्न गटासाठी बांधलेल्या १४ गाळ्यांबाबतची अधिकारी संघटनेची मागणी नाकारण्यात यावी.

---

**Item No.** 33/6 **Resolution No.** 567

विषय : सिद्धार्थनगर विभाग १ या गोरेगांव येथील वसाहतीतील भाडेकरूंना घर बांधण्यासाठी जमीन देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जादा ३ एकर निव्वळ जमिनीसाठी आलेली मागणी नाकारण्यात यावी तसेच भाडेकरूंच्या सहकारी संस्थेला ३ महिन्यांची मुदत देऊन ८ एकर जमिनीवर त्यांची योजना राबविण्यात सांगावे व तीन महिन्यात संस्थेने आपले काम सुरू न केल्यास ८ एकर देऊ करण्यात आलेल्या जमिनीबाबतचा प्रस्तावही मागे घेण्यात यावा.
याचबरोबर प्राधिकरणाने स्वतःच ही योजना राबविण्याच्या दृष्टीने योग्य ती पावले त्वरीत उचलावीत व त्यासंबंधीचे प्रारंभिक काम सुरू करावे असे आदेश दिले.

---

**Item No.** 33/7 **Resolution No.** 568

विषय : नागपूर येथील वसाहतीतील रिकामे भूखंड (निवासी तसेच सार्वजनिक उपयोगाचे) महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे मोकळे भूखंड नागपूर महानगरपालिकेला हस्तांतर करण्यास अपवादात्मक अशा परिस्थितीमध्ये परवानगी देण्यात येत आहे. नियमाप्रमाणे आवश्यक असल्यास त्यासंबंधी शासनाची अनुमती घेण्यात यावी. मात्र यासंबंधी योग्य तो लेखी करार महानगरपालिकेशी करण्यात यावा.

---

**Item No.** 33/8 **Resolution No.** 569

विषय : निरनिराळ्या नगरपरिषदांच्या गावी गृहनिर्माण व क्षेत्रविकास योजना घेणे.

ठराव : एकमताने बाब टिप्पणीत दर्शविलेला पृष्ठ ५ ते ७ वरील प्रस्ताव मंजूर केला. तसेच या योजनेमध्ये ज्यांनी आपली मागणी नोंदविली आहे अशा व्यक्तींना राखीव गाळ्यांच्या प्रमाणात बाधा न येता ( सब्जेक्ट टू रिझर्वेशन) गाळे मिळण्याच्या दृष्टीने विनियमात योग्य ती दुरुस्ती करण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यासही मान्यता दिली.
त्याचप्रमाणे संबंधित नगरपरिषदेला सहाय्यभूत अनुषंगिक कामांच्या खर्चापोटी लागणाऱ्या रकमेच्या ५० टक्के रक्कम प्राधिकरणाकडे जमा करण्यास किंवा तेवढ्या रकमेची तिच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यास सांगण्यात यावे व त्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात यावी. त्या कालावधीत संबंधित नगरपरिषदेने पूर्तता न केल्यास त्या ठिकाणी योजना हाती घेऊ नये व नगरपरिषदेस तसे कळवावे.

---

**Item No.** 33/9 **Resolution No.**

विषय : नगरपरिषदांच्या सहकार्याने कार्यान्वित करण्यात येत असलेल्या गृहनिर्माण योजनांखाली आलेल्या अर्जांचा पात्रतेच्या कसोटींच्या संदर्भात विचार करण्यासाठी कार्यपद्धती ठरविणे.

ठराव :

**Item No.** 33/10 **Resolution No.** 570

विषय : प्राधिकरणाचे अध्यक्ष व विभागीय मंडळांचे सभापती यांना वाहनाकरता येणारा पेट्रोल वगैरेचा खर्च.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या वाहनासाठी दरमहा रु. ३,०००/- व सभापती/विभागीय मंडळे यांच्या वाहनासाठी दरमहा रुपये १,५००/- पर्यंत पेट्रोल व ऑईल याकरता खर्च करण्याची परवानगी देण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यात येते. त्याचप्रमाणे ही मर्यादा आर्थिक मर्यादेऐवजी एकूण किती लीटर पेट्रोल व ऑईल वापरले जाईल त्यानुसार निश्चित करण्यात यावी.

**Item No.** 33/11 **Resolution No.** 571

विषय : भेटीस येणाऱ्या व्यक्तींच्या आतिथ्यासाठी अध्यक्ष/प्राधिकरण व सभापती/प्रादेशिक मंडळे यांचेकडून येणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्तता करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अध्यक्ष/प्राधिकरण तसेच सभापती, प्रादेशिक मंडळे यांना आतिथ्यासाठी दरमहा रुपये १५०/- खर्च करण्याची परवानगी देण्यात यावी.

**Item No.** 33/12 **Resolution No.** 572

विषय : सातपूर, नाशिक वसाहतीमधील आरक्षित करण्यात आलेले भूखंड नगरपरिषद, सातपूर तसेच इतर संस्थांना देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सातपूर नगरपरिषदेला बाब टिप्पणीत दर्शविलेले भूखंड प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणात अनुसरून देण्यात यावेत. तसेच डाक व तार कार्यालयासाठी आरक्षित करण्यात आलेला भूखंड जमिनीच्या किंमतीविषयक धोरणाला अनुसरून त्या खात्याला हस्तांतरित करण्यात जमिनीच्या किंमतीविषयक त्याचप्रमाणे भाडेपट्ट्याच्या मुदतीबद्दल वगैरे नेहमीच्याच अटी लावण्यात याव्यात.

**Item No.** 33/13 **Resolution No.** 573

विषय : गोसिया कंपाऊंड, वांद्रे येथील झोपडपट्टीतील काही राहिलेल्या झोपड्यांचे नूतनीकरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्वे नंबर ४२६ व १७० यांपैकी ३५ झोपड्यांचे नूतनीकरण करण्यासाठी आवश्यक तेवढी जागा त्या झोपडीधारकांच्या सोसायटीला ३० वर्षांचे भाडेपट्ट्याने देण्यात यावी. शासनाकडून जमिनीची किंमत ठरवून आल्यावर अशा झोपडीधारकांकडून जमिनीचे किती भाडे घ्यावयाचे हे ठरल्यावर त्यानुसार भाडे देण्याच्या अटीवर ही जमीन देण्यात यावी. यासंबंधीची पुढील सर्व कार्यवाही करण्यासंबंधी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्राधिकरणाने अधिकार दिले.

---

**Item No.** 33/14 **Resolution No.**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील शाळा बांधण्याकरिता जमीन मिळण्याबाबत निरनिराळ्या संस्थांनी केलेल्या अर्जाचा विचार करणे.

ठराव :

---

**Item No.** 33/15 **Resolution No.** 574

विषय : हुडको या वित्तीय संस्थेकडून फलटण जिल्हा, सातारा येथील गृहनिर्माण योजनेकरिता कर्ज उभारण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
फलटण जिल्हा, सातारा येथील गृहनिर्माण योजनेसाठी बाब टिप्पणीतील जोडपत्र 'अ' मधील कामांसाठी एकूण रु. ५१.६१ लक्ष कर्ज उभे करण्यासाठी अनुमती व अधिकृती देण्यात येते.

---

**Item No.** 33/16 **Resolution No.** 575

विषय : वर्तकनगर, ठाणे येथील कोकण मंडळाच्या अखत्यारीतील वसाहतीमध्ये प्रत्येक गाळ्यास स्वतंत्र मीटर देण्याच्या हेतूने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने पाठविलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) बाब टिप्पणीतील परिच्छेद ८ मधील प्रस्तावाच्या 'ब' व 'क' प्रमाणे कार्यवाही करावी व त्यानुसार सर्व भाडेकरूंना/उपभोक्त्यांना दोन महिन्याची नोटीस द्यावी. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून बल्क विद्युत पुरवठा घेण्याचे बंद करण्यात यावे व भाडेकरूंनी त्यांची स्वतःची व्यवस्था करावी असे त्यांना कळविण्यात यावे.
(ब) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने घातलेल्या अटींबाबत त्यांच्याशी पुढील वाटाघाटी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी कराव्यात.

**Item No.** 33/17 **Resolution No.** 576

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या बांधकामाकरिता महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ (मर्यादित) यांचेमार्फत आयात केलेले नॉनलेव्ही पोर्टलॅण्ड सिमेंट विकत घेण्याबाबत विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयसूचीत दर्शविल्याप्रमाणे ४५०० मेट्रिक टन आयात सिमेंटकरिता महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडे एक महिन्याच्या मागणीच्या सिमेंट राशीसाठी योग्य ती अग्रीम रक्कम भरण्यात यावी व त्यानुसार सिमेंट मिळवावे व बाकीचे लागणारे सिमेंट खुल्या बाजारातून खरेदी करावे. तसेच शासकीय विभागांना ज्याप्रमाणे रु. २००/- प्रति टन अग्रीम धन भरावे लागते त्याप्रमाणे सवलत मिळविण्याचा प्रयत्न व्हावा तसेच अग्रीम रकमेच्या राशीवर व्याज मिळविण्याचाही प्रयत्न केला जावा.

---

**Item No.** 33/18 **Resolution No.** 577

विषय : मुख्य अभियंता दर्जाचा मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांस वाढीव शक्ती प्रत्यायोजित करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे मुख्य अभियंता दर्जाच्या नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांना बाब टिप्पणीस दर्शविल्याप्रमाणे फक्त तांत्रिक बाबींचे बाबतीत अधिकार प्रदान करण्यात यावेत. जोपर्यंत नागपूर मंडळाचे मुख्य अधिकारी मुख्य अभियंता दर्जाचे आहेत तोपर्यंतच या तांत्रिक बाबींच्या वाढीव शक्ती प्रदान करण्यात येत आहेत. इतर बाबींच्या शक्ती प्रदानाबाबत वेगळा विषय आणण्यात यावा.

---

**Item No.** 33/19 **Resolution No.** 578

विषय : अनधिकृत भाडेकरूंकडून मिळालेल्या दंडाच्या रकमेतून अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण/अत्यल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजनांखाली इमारतींवर देखभाल व दुरुस्तीसाठी झालेला जादा खर्च भागविण्यासाठी मंजूरी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेतील अनधिकृत भाडेकरूंकडून घेतलेल्या दंडाच्या रकमेतून वसूल झालेल्या रकमेपैकी रुपये ५५ लक्ष मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाला संरचनात्मक दुरुस्तीसाठी देण्यात आले त्याला कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

---

**Item No. 33/20 Resolution No. 579**

विषय : सोलापूर येथील अधिसूचित क्षेत्रामधील जमीन संपादन करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे सोलापूर येथील विशेष नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रातील सक्षम प्राधिकाऱ्याकडून आलेल्या अशा प्रकरणांवर निर्णय घेण्याचा अधिकार मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना देण्यात यावा.

---

**Item No. 33/21 Resolution No. 580**

विषय : सासवड जिल्हा, पुणे येथील गृहनिर्माण योजनेसाठी बांधकामास लागणाऱ्या पाण्याच्या पुरवठ्याबाबत वॉटर-टँकर लावून पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणे व त्यासाठी होणारा जादा खर्च महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने सोसणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सासवड येथील योजनेसाठी टँकरने पाणी आणण्यासाठी वर नमूद केलेल्या अपवादात्मक परिस्थितीमुळे जो जादा खर्च येईल तो खर्च सध्या देण्यास प्राधिकरणाने विषय टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे संमती दिली. हा जादा झालेला खर्च मालाची किंमत याबद्दल वसूल करण्यासही प्राधिकरणाने मान्यता दिली. वॉटर टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी पुणे मंडळाने कोटेशन्स मागविण्याची जी कार्यवाही केली आहे तिलापण मान्यता देण्यात आली.

---

**Item No. 33/22 Resolution No. 581**

विषय : भारताच्या १९८१ च्या जनगणनेच्या तात्पुरत्या अहवालानुसार ज्या शहरांची लोकसंख्या ५०,००० ते १,००,००० पर्यंत आहे अशा ठिकाणी गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम अंमलात आणण्याविषयी विचारणा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१९८१ च्या जनगणनेच्या तात्पुरत्या लोकसंख्या अहवालानुसार ज्या गावांची लोकसंख्या ५०,००० ते १,००,००० आहे ती गावे गलिच्छ वस्ती सुधारणेच्या या कार्यक्रमात समाविष्ट करण्यात यावीत. मात्र या कार्यक्रमावर होणारा खर्च उपलब्ध अनुदानाइतकाच मर्यादित ठेवावा.

---

**Item No. 33/23 Resolution No.**

विषय : मेसर्स एम. बी. दुधाणी ॲण्ड सन्स या कंत्राटदारांनी निविदा भरतेवेळी गैरमार्गाचा अवलंब केल्याने त्याबाबत करावयाच्या कार्यवाहीचा विचार करणे.

ठराव :.

---

**Item No.** 33/24 **Resolution No.**

विषय : सिमेंट व बांधकामास लागणारे पाणी यांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे येरवडा, पुणे येथील गृहनिर्माणाच्या योजनेच्या कामास झालेला विलंब लक्षात घेऊन कंत्राटदारास देण्यात आलेल्या मोबीलायझेशन ॲडव्हान्सवर आकारण्यात आलेल्या व्याजाच्या दरात कपात करणेबाबत विचार करणे.

ठराव :

**Item No.** 33/25 **Resolution No.**

विषय : वैद्यकीय खर्चाची परतफेड - महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेची मागणी.

ठराव :

**Item No.** 33/26 **Resolution No.** 582

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन १९८१-८२ चे लेखे.

ठराव : एकमताने निर्णय घेऊन,
१९८१-८२ च्या लेख्यांना मान्यता दिली.

**Item No.** 33/27 **Resolution No.** 583

विषय : अंशकालिन कामे करणाऱ्या कामगारांच्या वेतनात वाढ करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अंशकालिन कामगारांच्या वेतनाच्याबाबत संघटनेशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष व उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात यावेत.

**Item No.** 33/28 **Resolution No.** 584

विषय : कार्यव्ययी आस्थापनेवरील ५ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कामगारांना हंगामी नियत आस्थापनेवर घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयसूचीत दर्शविल्याप्रमाणे आणखी ९० कामगारांना शासनाच्या दिनांक २३-६-१९८२ च्या आदेशांचा फायदा देण्यात यावा व त्यानंतर मंजुरीसाठी प्रकरण शासनाकडे पाठविण्यात यावे.
यानंतर अध्यक्षांनी सदस्यांचे व सदस्यांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर सभा समाप्त झाली.

**Meeting No.** 34 **Meeting Date** 30/Oct/1

**Item No.** 34/1 **Resolution No.**

विषय : दिनांक ६-१०-१९८२ रोजी झालेल्या ३३च्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 34/2 **Resolution No.**

विषय : मेसर्स एम. बी. दुधाणी ॲण्ड सन्स या कंत्राटदारांनी निविदा भरतेवेळी गैरमार्गाचा अवलंब केल्याने त्याबाबत करावयाच्या कार्यवाहीचा विचार करणे.

ठराव :

---

**Item No.** 34/3 **Resolution No.** 585

विषय : ड्रॉइंग ब्रँचमधील नव्याने निर्माण केलेली पदे - असलेल्या अनुभवी कर्मचाऱ्यांकडून भरणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) ड्रॉइंग ब्रँचमधील कर्मचाऱ्यांसाठी भरतीविषयक केलेले नियम शासनाकडून अंतिम होईपर्यंत त्यानुसार त्या कर्मचाऱ्यांना तात्पुरती बढती देण्यास हरकत नाही.
(ब) बढती दिलेल्या कर्मचाऱ्यांवर वास्तुशास्त्र विभागातील काही कामे सोपविण्यात यावीत.
(क) कामाचा दर्जा राखण्याची दक्षता घेतली जावी.
(ड) कोणती व किती पदे कोणत्या निकषावर भरण्यात यावीत हे ठरविण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण, मुख्य अभियंता/प्राधिकरण व वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांना देण्यात यावा.

---

**Item No.** 34/4 **Resolution No.** 586

विषय : लेखापाल या पदावरील नेमणुकीसाठी विभागीय परीक्षा अनिवार्य करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या परिशिष्ट-१ मध्ये दर्शविलेल्या विषयाशिवाय महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (वर्ग - ३)च्या परीक्षेत असलेल्या पेपर क्रमांक ३ सह परीक्षेचा अभ्यासक्रम मान्य केला जातो. परीक्षेसंबंधीचे नियम, वेळापत्रक वगैरे अंतिम करण्यासाठी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना अधिकार देण्यात येतात.

---

**Item No.** **34/5** **Resolution No.** **587**

विषय : प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी प्रत्यावर्तित करणे व प्रतिनियुक्तीवर व्यक्ती आणण्याचे बंद करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) चर्चेत व्यक्त झालेले विचार लक्षात घेता प्रतिनियुक्तीवर कर्मचारी/अधिकारी आणण्यात येऊ नयेत, ही कर्मचारी संघटनेची मागणी संपूर्णतः मान्य करणे शक्य नाही. शासनाच्या प्राधिकरणातील गुंतवणुकीमुळे प्रतिनियुक्तीवर कर्मचारी/अधिकारी पाठविण्याच्या शासनाच्या भूमिकेचा विचार करणेही प्राधिकरणाला आवश्यक वाटते.
(ब) तथापि नेमणूक करताना प्राधिकरणातील अनुभवी व अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा.

---

**Item No.** **34/6** **Resolution No.** **588**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी सहकारी उपहारगृहाच्या कर्मचाऱ्यांना गणवेष पुरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे उपहारगृहाच्या कर्मचाऱ्यांना गणवेष पुरविण्यासाठी कर्मचारी कल्याण निधीसाठी अर्थ संकल्पात असलेल्या तरतुदीतून रुपये ५,०००/- अनुदान देण्यात यावे.

---

**Item No.** **34/7** **Resolution No.** **589**

विषय : अर्धवेळ काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या एकत्रित वेतनात वाढ.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अध्यक्ष व उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी दिनांक ६-१०-१९८२ रोजी चर्चा करून मान्य केलेल्या प्रस्तावानुसार दिनांक ६-१०-१९८२ पासून अर्धवेळ काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या एकत्रित वेतनात (कन्सॉलीडेटेड वेजेस) वाढ करण्यात यावी.
कर्मचाऱ्यांच्या सेवेसंबंधीच्या सध्या असलेल्या इतर अटी तशाच पुढे चालू राहतील.

---

**Item No.** **34/8** **Resolution No.** **590**

विषय : प्राधिकरण स्थापनेपूर्वी (५-१२-७७) वितरीत झालेल्या वसाहतीतील (ज्या वसाहतीतील पहिला गाळा ५-१२-७७ पूर्वी वितरीत झालेला असेल) गाळे (कालांतराने मोकळे झालेले) राखीव गट समजून त्यांचे आर्थिक भाडे (इकॉनॉमिक रेंट) आकारणे व घरभाडे भत्ता देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
५-१२-७७ पूर्वी बांधण्यात आलेल्या व वितरण केलेल्या गाळ्यांना राखीव गट समजून त्यांना आर्थिक भाडे आकारणे व घरभाडे भत्ता देणे ही कर्मचारी संघटनेची मागणी नाकारण्यात यावी.
भाडे आकारताना मात्र वेतनाच्या १० टक्के रक्कम अथवा आर्थिक भाडे यापैकी जी रक्कम कमी असेल ती आकारण्यात यावी.

---

**Item No.** 34/9 **Resolution No.** 591

विषय : दादाभाई नौरोजी नगरमधील इमारत क्रमांक २, ३, ४ मधील १२० गाळे सेवाजेष्ठतेनुसार कर्मचाऱ्यांना मालकी तत्त्वावर देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
इमारत क्रमांक २, ३ व ४ दादाभाई नौरोजी नगर, अंधेरी या इमारतीमधील गाळे कर्मचाऱ्यांना मालकी तत्त्वावर द्यावेत ही संघटनेची मागणी नाकारण्यात यावी. प्राधिकरणाने असाही निर्णय दिला की, चर्चेच्या अनुरोधाने सेवानिवासस्थाने (४० गाळे) व संक्रमण शिबिर (८० गाळे) या दोन कामांसाठी या गाळ्यांचा उपयोग करण्यात यावा तसेच इमारत क्रमांक ३०, ३१ व ३२ मध्ये या इमारतीमधील जे मूळ मालक गेलेले आहेत त्यांना पुन्हा इमारत क्रमांक २, ३ व ४ मध्ये जाण्यासाठी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी.

**Item No.** 34/10 **Resolution No.** 592

विषय : श्री. एस. डब्ल्यू. धुरंधर, माजी विधी सल्लागार यांच्या वेतनमानाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे श्री. धुरंधर यांचे कंत्राटी वेतन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पुनर्नियुक्तीनंतर करण्यात येणाऱ्या वेतन निश्चितीप्रमाणे निश्चित करण्यात यावे व वर उल्लेख केल्याप्रमाणे फरक त्यांना देण्यात यावा. असे करताना उपविधी सल्लागार या कनिष्ठ पदाचा कार्यभार सांभाळल्याबद्दल देण्यात आलेले दरमहा रुपये ३००/- सानुग्रह अनुदान तसेच ११० दिवसांच्या रजेचा पगार जो सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात आला होता तो वळता करून घेण्यात यावा. कंत्राटाच्या इतर अटी कायम ठेवल्या जाव्यात.

**Item No.** 34/11 **Resolution No.**

विषय : किंमतीत होणारी वाढ रोखण्यासाठी उपाययोजना.

ठराव :

**Item No.** 34/12 **Resolution No.** 593

विषय : वांद्रे (पुनःप्रापित जमीन), मुंबई येथील उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज वगैरे उभे करण्यासाठी अनुमती व अधिकृती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वांद्रे (पुनःप्रापित जमीन), मुंबई येथील उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेसाठी हुडको या संस्थेकडून रुपये १२८.९५ लक्ष कर्ज घेण्यासाठी अनुमती व अधिकृती देण्यात येते. यासंबंधीची पुढील अंमलबजावणी त्वरित करावी असाही प्राधिकरणाने आदेश दिला.

**Item No.** 34/13 **Resolution No.** 594

विषय : मालेगाव वसाहतीतील डाक व तारखाते यासाठी आरक्षित करण्यात आलेल्या भूखंडाचे वितरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मालेगाव वसाहतीतील ६०६ चौ. मीटर क्षेत्रफळाचा भूखंड, डाक व तार कार्यालयाला देण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात येते.
पुढील कार्यवाही त्वरित पूर्ण करण्यात यावी असे प्राधिकरणाने आदेश दिले.

---

**Item No.** 34/14 **Resolution No.** 595

विषय : विशाल मुंबई शिक्षण प्रसारक मंडळ गोरेगांव, या संस्थेस सिद्धार्थनगर येथे शैक्षणिक कार्यालयासाठी दिलेल्या जागेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विशाल मुंबई शिक्षण प्रसारक मंडळ, गोरेगांव यांना ९९ वर्षाच्या कराराने देण्यात आलेला ३३३३ चौ. वार क्षेत्रफळाचा भूखंड दर चौ. यार्डाला रुपये ७.५० पैसे या दराने विक्री करण्यात यावा. या प्रस्तावाला शासनाची पूर्वसंमती असल्यामुळे शासनाच्या पुन्हा नवीन संमतीची गरज राहणार नाही.

---

**Item No.** 34/15 **Resolution No.** 596

विषय : सिमेंट व बांधकामात लागणारे पाणी यांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे येरवडा, पुणे येथील गृहनिर्माण योजनेच्या कामास झालेला विलंब लक्षात घेऊन कंत्राटदारांना देण्यात आलेल्या मोबेलायझेशन ॲडव्हान्सवर आकारण्यात यावयाच्या व्याजाच्या दरात कपात करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
येरवडा, पुणे येथील गृहनिर्माण योजनेसाठी ज्या कालावधीत सिमेंट व बांधकामास लागणारे पाणी यांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे कामांच्या गतीवर परिणाम झाला, त्या कालावधीकरिता कंत्राटदारांना देण्यात आलेल्या मोबीलायझेशन ॲडव्हान्सवर दरसाल १२ टक्के ऐवजी ८.५ टक्के दराने व्याज आकारण्यात यावे.

---

**Item No.** 34/16 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या निविदांमधील भाववाढीच्या बदलासंबंधीचे कलम वगळण्याविषयी विचार विनिमय करणे.

ठराव :

---

**Item No.** 34/17 **Resolution No.** 597

विषय : डेव्हलपमेंट ऑफ डिस्ट्रीक सेंटर ऑफ ओशिवरा -, ट्रान्सफर ऑफ लॅण्ड इन पझेशन ऑफ म्हाडा टू बी. एम. आर. डी. ए.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ओशिवरा येथील ५९ एकर २९ गुंठे जमीन शासनाच्या परवानगीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला खालील अटींवर हस्तांतरण करण्यात यावी.
१) मोकळ्या जमिनीची किंवा प्राधिकरणाच्या किंमत विषयक धोरणाप्रमाणे आकारण्यात यावी.
२) अतिक्रमण असलेल्या जागेची किंमत जमिनीच्या एकूण किंमतीएवढी आकारण्यात यावी. एकूण किंमतीमध्ये जमिनीची किंमत जमिनीच्या विकासावरील खर्च तसेच गुंतवणूकीवरील व्याज व इतर खर्च यांचा समावेश असावा.
३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अतिक्रमण असलेल्या भागाचा विकास केल्यानंतर त्यातून मिळणाऱ्या जादा उत्पन्नापैकी ५० टक्के उत्पन्न महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला देण्यात आले पाहिजे.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दरम्यानच्या काळात जमिनीला कुंपण घालून तिचे रक्षण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यास हरकत नाही, असाही निर्णय प्राधिकरणाने दिला.

**Item No.** 34/18 **Resolution No.** 598

विषय : मिस्त्री व कारकून यांना सुपरवायझरचे पद देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय सूचीत दर्शविल्याप्रमाणे परिच्छेद क्रमांक ५ मधील तरतुदीनुसार निवड श्रेणी मिस्त्रीच्या १२ जागा निर्माण करून भरण्यात याव्यात मात्र तेवढ्याच मिस्त्रींच्या जागा कमी करण्यात याव्यात. या जागांचे वेतनमान रुपये २९०-५४० ठेवण्यात यावे.
त्याचप्रमाणे प्रयोगाच्या यशस्वीतेबद्दल काळजी घेण्यासाठी प्राधिकरणाने दिलेल्या सूचनांचेही पालन करण्यात यावे.

**Item No.** 34/19 **Resolution No.** 599

विषय : अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली भंडारा येथे बांधण्यात येत असलेले १० गाळे अशोक ले लॅण्ड कंपनीस वाटप करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भंडारा येथे अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली बांधण्यात आलेल्या गाळ्यांपैकी १० गाळे अशोक ले लॅण्ड (मर्यादित) या कंपनीस सेवानिवासस्थाने म्हणून वाटप करण्यास शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**Item No.** **34/20** **Resolution No.** **600**

विषय : सहाय्यक वास्तुशिल्प शास्त्रज्ञ पदावर नेमणूक — जादा वेतनवाढी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

श्री. वेलिंग या उमेदवाराला रुपये ८३०/- अधिक या मूळ वेतनानुसार मिळणारा भत्ता एकत्र करून येणाऱ्या वेतनावर कंत्राटी पद्धतीने दोन वर्षांकरता नेमण्यात यावे व त्याप्रमाणे उमेदवाराकडून २ वर्षांचा करार घेण्यात यावा. किंवा त्यांचेकडून प्राधिकरणाच्या सेवेत किमान २ वर्षे राहण्याचे बंधपत्र (बॉण्ड) घेऊन त्यांना सुरुवातीचे वेतन दरमहा रुपये ८३०/- ठरवून नेमण्यात यावे.

प्राधिकरणासमोरील विषयांची चर्चा संपल्यानंतर प्राधिकरणातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. बी. डी. झुटे यांच्या हस्ते करण्यात आले. अशा माहिती पुस्तिकेची नितांत गरज असल्याचे मत प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांनी व्यक्त केले व अशा तऱ्हेची माहिती पुस्तिका प्रकाशित केल्याबद्दल प्राधिकरणाने प्रशासनाला धन्यवाद दिले.

यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे व अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.:** 35 **Meeting Date** 18/Dec/1

**Item No.** 35/1 **Resolution No.**

विषय : दिनांक ३०.१०.१९८२ रोजी झालेल्या ३४व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 35/2 **Resolution No.** 613

विषय : किंमतीत होणारी वाढ रोखण्यासाठी उपाययोजना.

ठराव : *एकमताने निर्णय घेतला की,*

बांधकामाच्या किंमतीत होणारी वाढ रोखण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करावी.

(१) कामाच्या प्रभारी कार्यकारी अभियंता यांनी पुढील २ दरांपैकी जो दर कमीत कमी असेल त्या दराने जागेवर आणलेल्या बांधकाम साहित्याच्या निर्धारित केलेल्या किंमतीच्या जास्तीत जास्त ९० टक्क्यांपर्यंत सुरक्षित अग्रीम रक्कम मंजूर करण्यास परवानगी देण्यात येत आहे. असे करताना महाराष्ट्र पब्लिक वर्क्स् अकौण्ट कोडच्या इतर तरतूदींचे परिपालन करण्यात यावे.

(अ) ज्या वर्षात बांधकाम साहित्य जागेवर आणले असेल त्या वर्षाचे अनुसूचित दर (शेड्युल्ड ऑफ रेट).

(ब) करारातील पूर्ण बाबीच्या दराचे पृथःकरण (ॲनॅलीसिस) करून काढण्यात आलेल्या बांधकाम साहित्याचा दर.

ज्या बांधकाम साहित्यावर अशी सुरक्षित अग्रीम रक्कम मंजूर करण्यात येईल त्या बांधकाम साहित्याच्या सुरक्षिततेची कंत्राटदाराने योग्य ती व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित उप-अभियंत्याने अशा बांधकाम साहित्याची नियतकालिक पडताळणी करावी व असे साहित्य जागेवरून इतरत्र हलविले जात नाही ना याची काळजी घ्यावी.

श्री. अतुल हुले, सदस्य/प्राधिकरण यांनी निदर्शनास आणलेल्या प्रकरणी खोलवर चौकशी करण्यात यावी व योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

(२) कामाच्या मसुदा निविदेमध्ये (ड्राफ्ट टेंडर पेपर्स) अग्रीम कर्जाऊ रक्कम (मोबीलायझेशन ॲडव्हान्स) बाबतचे कलम अंतर्भूत करण्यास तात्विक मान्यता देण्यात येत आहे. मात्र असे कलम मसुदा निविदेमध्ये अंतर्भूत करण्यापूर्वी त्यासाठी लागणारा निधी प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे का याची खात्री वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांचेकडून अगोदर करून घ्यावी. वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांनी दर आर्थिक वर्षाचे सुरुवातीस अशी अग्रीम कर्जाऊ रक्कम देण्यासाठी किती निधी उपलब्ध होईल हे निश्चित करावे व प्रादेशिक मंडळांना त्याप्रमाणे कळवावे. प्रादेशिक मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी त्यानंतर असे अग्रीम कर्जाऊ रक्कम देण्याचे कलम उपलब्ध निधीच्या मर्यादेत ठेऊन विशिष्ट कामाच्या निविदा मसुदेमध्ये अंतर्भूत करावे. अशी अग्रीम कर्जाऊ रक्कम सिडकोच्या धर्तीवर ठेकेदारांना त्यांच्या मालकीची यंत्रसामुग्री (जुनी अथवा नवीन) तारण म्हणून ठेवून बांधकामाच्या कंत्राटाच्या करारातील किंमतीच्या ६ टक्क्यांपर्यंत अग्रीम कर्ज म्हणून द्यावे व अशा अग्रीम कर्जाऊ रकमेवर द.सा.द.शे. १५ दराने व्याज आकारावे आणि कर्जाऊ दिलेली रक्कम योग्य त्या हप्त्यात काम पूर्ण होण्यापूर्वीच वसूल करण्यात यावी. याबाबतचे योग्य ते आदेश व सविस्तर सूचना उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी काढाव्यात. अशा प्रकारे कर्ज देताना पुरेशी प्रतिभूती (सिक्युरिटी) घेणे आवश्यक आहे.

(३) (अ) कंत्राटदारांना कंत्राटाच्या परिशिष्ट 'अ' नुसार ठराविक संमत दराने जास्तीत जास्त बांधकाम साहित्य पुरविण्याचा सर्व मंडळांनी प्रयत्न करावा. त्यासाठी निविदा मागवून पुरवठाकारांची नियुक्ती करावी व असे बांधकाम साहित्य सुरक्षितरित्या ठेवण्याची तसेच वेळोवेळी त्याची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची कारवाई प्रादेशिक मंडळांनी करावी. असे बांधकाम साहित्य उपलब्ध करून देण्याची व्यवस्था पूर्ण

झाल्यावर असे साहित्य मसूदा निविदेच्या परिशिष्ट 'अ' मध्ये समाविष्ट करण्यात यावे.
(३) (ब) सिडकोच्या धर्तीवर नेमून दिलेल्या पुरवठाकारांमार्फत (नॉमिनेटेड सप्लायर) देखील ठेकेदारांना मालाचा पुरवठा मसूदा निविदेत त्याप्रमाणे कलम समाविष्ट करून ठराविक संमत दरानुसार करण्यात यावा. त्यासाठी पुरवठाकार निविदा मागवून विशिष्ट कालावधीसाठी निश्चित करावेत. असे पुरवठाकार निश्चित केल्यानंतर निविदेच्या मसूदेमध्ये त्याप्रमाणे कलम समाविष्ट करण्यात यावे. जेथे मोठ्या प्रमाणावर काम आहे जसे की, मुंबई, पुणे, नागपूर अशा ठिकाणी विशिष्ट कामांसाठी ही पद्धती प्रायोगिक म्हणून अंमलात आणावी व त्यावरील अनुभवाचा अहवाल प्राधिकरणास द्यावा.
(४) निविदा बोलाविताना तिचा वैध कालावधी ८० दिवसांवरून कमी करून तो ६० दिवस ठेवण्यात यावा. सर्वसाधारणपणे निविदा उघडल्यापासून जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत त्यावर निर्णय घेण्यात यावा. यामध्ये जर विलंब झाला तर संबंधित प्राधिकाऱ्यांनी अशा विलंबाबाबत समर्थनीय कारणे नमूद करावीत.

---

**Item No. 35/3 Resolution No. 614**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या निविदामधील भाववाढीच्या बदलासंबंधीचे कलम वगळण्याविषयी विचार-विनिमय करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भाववाढीसंबंधी शासकीय आदेशानुसार ठरविलेले सूत्र आणि त्याबरोबरच्या अटी या तंतोतंत पाळण्यात याव्यात. यापुढे बोलाविण्यात येणाऱ्या नवीन निविदांना हा निर्णय लागू करण्यात यावा.

---

**Item No. 35/4 Resolution No.**

विषय : १) प्राधिकरण स्थापनेपूर्वी (५-१२-७७) वितरित झालेल्या वसाहतीतील (ज्या वसाहतीतील पहिला गाळा ५-१२-७७ पूर्वी वितरित झालेला असेल) गाळे (कालांतराने मोकळे झालेले) राखीव गट समजून त्यांचे आर्थिक भाडे (इकॉनॉमिक रेंट) आकारणे व घरभाडे भत्ता देणे.
२) दादाभाई नौरोजी नगर मधील इमारत क्र. २, ३ व ४ मधील १२० गाळे सेवाजेष्ठतेनुसार कर्मचाऱ्यांना भाडेखरेदी तत्त्वावर देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No. 35/5 Resolution No. 601**

विषय : सदस्यांचा बैठक भत्ता वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
लघु उद्योग महामंडळ, सिडको, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण वगैरे सारख्या संस्थांतून सदस्यांना किती बैठक भत्ता दिला जातो यासंबंधी माहिती घेऊन त्यानुसार प्राधिकरणाच्या व मंडळाच्या सदस्यांना बैठक भत्ता देण्यासंबंधी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. हा बैठक भत्ता किती ठरवावा यासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष/प्राधिकरण तसेच उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येतो.

---

| Item No. | 35/6 | Resolution No. | 602 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना पेंशन योजना लागू करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांकरिता पेंशन योजना अंमलात आणण्यात यावी. मात्र ही जबाबदारी संपूर्णपणे शासनाने उचलावी.

| Item No. | 35/7 | Resolution No. | 603 |
|---|---|---|---|

विषय : विभागीय मंडळाच्या आस्थापनेवर लघु-टंकलेखकांची पदे निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्व विभागीय मंडळांच्या आस्थापनेवर सभापतींना कामात मदत व्हावी यासाठी प्रत्येक एक लघुटंकलेखकाचे पद निर्माण करण्यात यावे. सभापतींचा बहुतेक पत्रव्यवहार मराठीत असल्यामुळे या पदावर मराठी लघुटंकलेखकांची नेमणूक करण्यात यावी.

| Item No. | 35/8 | Resolution No. | 604 |
|---|---|---|---|

विषय : हातमाग व खादी कापड खरेदीसाठी आगाऊ रक्कम देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हातमाग व खादी कापड खरेदीसाठी आगाऊ रक्कम देण्याची भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ तसेच विदर्भ गृहनिर्माण मंडळामध्ये चालू असलेली योजना शासनाच्या वित्त विभागाच्या आदेश क्रमांक एचसीए/१०८०/सआर/३२५/जीइएम-५ दिनांक ८ फेब्रुवारी १९८१ अन्वये मंजूर करण्यात आलेली योजना प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावी. तसेच ही अग्रीम रक्कम मंजूर करण्याचे अधिकार ज्या अधिकाऱ्यांना उत्सव अग्रीम रक्कम मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत त्या अधिकाऱ्यांना देण्यात यावे. रक्कम योग्य त्याच कारणासाठी खर्च केली जात आहे हे तपासण्यासाठी या अधिकाऱ्यांनी योग्य तो पुरावा/देयके वगैरे तपासावीत.

| Item No. | 35/9 | Resolution No. | 605 |
|---|---|---|---|

विषय : भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळात मुख्य कार्यकारी अधिकारी या स्वपदाव्यतिरिक्त गृहनिर्माण आयुक्त या पदाचे अतिरिक्त वेतन श्री. एम. ए. चव्हाण, मुख्य अधिकारी, नागपूर मंडळ यांना मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. एम. ए. चव्हाण यांना दिनांक ६-६-१९७७ ते १०-७-१९७७ या काळामध्ये गृहनिर्माण आयुक्त या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्दल नियमाप्रमाणे अतिरिक्त वेतन मंजूर करण्यात यावे.

**Item No.** 35/10 **Resolution No.** 606

विषय : सांखळी उपोषणामध्ये भाग घेतलेल्या प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांचे कार्यालयातील अनुपस्थितीचे स्वरूप ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
६-९-१९८२ ते ६-१०-१९८२ या कालावधीमध्ये साखळी उपोषणासाठी कर्मचाऱ्यांनी रजा मंजूर करण्यासाठी अर्ज पाठविले होते त्यांची त्या दिवसांची अनुपस्थिती किरकोळ रजा अथवा देय असलेली दुसरी कोणत्याही प्रकारची रजा याप्रकारे नियमित करण्यात यावी.

---

**Item No.** 35/11 **Resolution No.** 607

विषय : वैद्यकीय खर्चाची परतफेड - महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ कर्मचारी संघटनेची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) वैद्यकीय खर्चाच्या परतफेडीची रक्कम रुपये ६०/- फक्त वरून रुपये १५०/- पर्यंत प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५५८ अन्वये वाढविण्यात आली होती तिची मर्यादा आता रुपये ३००/- पर्यंत वाढविण्यात यावी, ही वाढ १९८२-८३ या आर्थिक वर्षापासून देण्यात यावी यासंबंधीच्या नियमात दुरुस्ती करण्यासंबंधीचा योग्य तो प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.
(ब) चर्चेच्या अनुरोधाने काटकसरीचे जे उपाय प्राधिकरणाने सुचविले आहेत त्यावर योग्य ती कार्यवाही त्वरित सुरु करण्यात यावी व त्यासंबंधीचा अहवाल प्राधिकरणासमोर ठेवण्यात यावा.
(क) उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्राधिकरणाने सुचविलेल्या उपायांची दखल घेऊन त्यासंबंधीही कार्यवाही करण्यात यावी.

---

**Item No.** 35/12 **Resolution No.** 608

विषय : ॲकेडमी ऑफ फाइन आर्टस् ॲण्ड क्राफ्टस् ट्रस्टला खेळाच्या मैदानासाठी सुभाष नगर, चेंबूर येथे जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ॲकेडमी ऑफ फाइन आर्टस् ॲण्ड क्राफ्टस् ट्रस्टला सर्वे क्रमांक ८२९ (भाग) या जमिनीपैकी १८६६.७० चौ. मीटर क्षेत्रफळाच्या भूखंड खेळाच्या मैदानासाठी देण्यात यावा. भाडेपट्ट्याची मुदत ३० वर्षांची असावी. त्याचप्रमाणे प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार जमिनीचे अधिमूल्य/भुईभाडे आकारण्यात यावे. अनधिकृतपणे १७० चौ. मीटरचा जो भूखंड संस्थेच्या ताब्यात आहे तोही संस्थेस वरील अटींवर परंतु दंड म्हणून वाढीव अधिमूल्यासह देण्यात यावा. वाढीव अधिमूल्याची किंमत ठरविण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात यावे.

---

**Item No.** 35/13 **Resolution No.** 609

विषय : वर्तकनगर, ठाणे येथील कोकण मंडळाच्या अखत्यारीतील वसाहतीमध्ये प्रत्येक गाळ्यास स्वतंत्र मीटर देण्याच्या हेतूने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने पाठविलेल्या प्रस्तावावर विचार करणे व निर्णय घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला परतीची ठेव म्हणून रुपये १८ लक्ष कर्ज देण्यात यावे. १-२-१९८३ पासून दरवर्षी ही रक्कम रुपये ३.६० लक्ष प्रमाणे समान पाच वार्षिक हप्त्यात विद्युत मंडळाने ती परत करावी. या रकमेवर दरसाल दरशेकडा ५.५० सरळ व्याजाच्या दराने व्यापारी पद्धतीनुसार दर सहा महिन्याने राज्य विद्युत मंडळाने व्याज द्यावे. व्याज देण्याची तारीख दरवर्षी ३० सप्टेंबर व ३१ मार्च अशी असावी. परतीची ठेव दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाचा विलंब अवधी मंजूर करण्यात यावा. सदरहू 'परतीची ठेव' कोणतीही पूर्व अट किंवा प्राधिकरणाने पूर्ण करावयाचे अन्य कोणतेही बंधन न स्वीकारता देण्यात यावी. यासंबंधीची सर्व कायदेशीर कागदपत्रे वित्त नियंत्रक/प्राधिकरण व विधी सल्लागार/प्राधिकरण यांनी तयार करावीत व त्यास उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी मान्यता द्यावी.
(२) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने घातलेल्या विविध अटींबाबत वाटाघाटी करण्याचे व निर्णय घेऊन त्यांना अंतिम स्वरुप देण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी याबाबत योग्य ती माहिती नंतर प्राधिकरणापुढे ठेवावी.

**Item No.** 35/14 **Resolution No.** 615

विषय : उच्च उत्पन्न गटातील गाळ्यांची कमाल किंमतीची मर्यादा - धोरणात्मक निर्णयामध्ये सुधारणा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
आगाऊ अंशदान पद्धतीने बांधण्यात येणाऱ्या उच्च उत्पन्न गटांतर्गत प्रत्येक गाळ्याच्या कमाल किंमतीची मर्यादा रुपये २,००,०००/- पर्यंत वाढविण्यात यावी.
यानंतर आयत्या वेळच्या विषयावर चर्चा सुरू करण्यापूर्वी सदस्यांनी या विषयांवर विचार करावा लागेल असे सांगून पुढील बैठकीत हे विषय विचारार्थ ठेवावे असे सांगितले. यावर अध्यक्षांनी सदस्यांची विनंती मान्य केली व हे विषय पुढील बैठकीस चर्चेस घ्यावेत असे आदेश दिले.
यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे व अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Item No.** 35/15 **Resolution No.** 610

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण सोलापूर नगररचना अधिकाऱ्याची नियुक्ती करणे - मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांना शक्ती प्रदान करणे व धोरण निर्देशक प्रस्तावास मान्यता देणे.

ठराव : प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,
(१) महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ नुसार तयार केलेल्या नियमानुसार नगररचना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यासाठी जी पात्रता लागते, ती पात्रता पुणे मंडळाच्या आस्थापनेनुसार नगररचनाकार म्हणून सध्या काम करत असलेले श्री. वाडकीकर यांच्याकडे असल्याचे प्राधिकरणाचे मत झाल्याने सोलापूर येथील अधिसूचित क्षेत्राच्याबाबतीत वैधानिक नियोजन प्रस्ताव तयार करण्याच्या कामासाठी श्री. वाडकीकर यांची 'नगररचना अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात यावी.
(२) सोलापूर येथील विशेष नियोजन प्राधिकरणासाठी अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील विकासाचे नियंत्रण करण्याच्या दृष्टीने सर्वसाधारणपणे 'बिल्डींग बायलॉज ॲण्ड डेव्हलपमेंट कंट्रोल रुल्स फॉर म्युनिसिपल कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र १९७७ यामध्ये नमूद केलेले स्टँडर्डडायझड् डेव्हलपमेंट कंट्रोल रुल्स ॲण्ड बिल्डींग बायलॉज वापरण्यात यावेत. त्यात काही फेरबदल आवश्यकतेनुसार करावयाचा असल्यास त्यासाठी प्राधिकरणाची अनुमती घ्यावी.
(३) 'धोरण निर्देशक प्रस्ताव' (ॲप्रोच पेपर) हा योग्य असून, त्यास मान्यता देण्यात येत आहे. सोलापूर येथील अधिसूचित क्षेत्रासाठी —— (जेथे प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे) —— या धोरणनिर्देशक प्रस्तावात दर्शविलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार नियोजन प्रस्ताव तयार करण्यात यावा.

---

**Item No.** 35/16 **Resolution No.** 611

विषय : भामटी, परसोडी नागपूर येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात येणाऱ्या २८० गाळ्यांच्या निविदा स्वीकारण्याचा विचार करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीच्या पृष्ठ ५ वर दिलेल्या प्रस्तावानुसार व त्यामध्ये दर्शविलेल्या अटींचे अधीन राहून मेसर्स एस. एल. बजाज आणि कंपनी यांची निम्नतम रकमेची निविदा स्वीकारण्यात यावी. विषय टिप्पणीच्या पृष्ठ पाच वरील प्रस्तावाच्या शर्त क्रमांक १ व २ मेसर्स एस. एल. बजाज आणि कंपनी यांना मान्य नसतील तर त्यांची निविदा स्वीकारण्यात येऊ नये. त्या परिस्थितीत श्री. के. के. खुबचंदानी म्हणजेच दुसऱ्या क्रमांकाचे निम्नतम कंत्राटदार यांची निविदा विषय टिप्पणीत पृष्ठ ५ वर शर्त क्रमांक ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिलेल्या शर्तीस अधीन राहून व त्यांचे पालन करून स्वीकारण्यात यावी.

---

**Item No.** 35/17 **Resolution No.** 612

विषय : अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेखाली व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीत व्यापारी उपयोगासाठी भाडेतत्त्वावर दिलेल्या गाळ्यांची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) दुकाने, दवाखाने इत्यादी व्यापारी उपयोगासाठी देण्यात आलेल्या गाळ्यांची विक्री सध्या असलेल्या गाळेधारकांना करण्यात यावी.

२) हे गाळे बांधकामाच्या मूळ किंमतीच्या तिप्पट रकमेस विकण्यात यावेत.

३) गाळेधारक हा अनधिकृत भाडेकरू असेल तर त्याचेकडून वरील किंमतीव्यतिरिक्त गाळ्याच्या मूळ किंमतीच्या दुप्पट इतकी रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात यावी.

४) वरील सर्व किंमत एकरकमी वसूल करण्यात यावी.

५) या व्यतिरिक्त भाड्यापोटी काही थकबाकी असल्यास प्राधिकरणास ती द्यावी लागेल व त्यानंतरच किंमत अथवा किंमत आणि दंड एकरकमी वसूल केला जावा.

६) निवासी गाळ्यांच्या गाळेधारकांना किंमतीत देण्यात आलेली सूट व्यापारी उपयोगासाठी दिलेल्या गाळ्यांकरिता दिली जाणार नाही.

| Meeting No. | 36 | Meeting Date | 28/Jan/1 |
| --- | --- | --- | --- |
| Item No. | 36/1 | Resolution No. | |

विषय : दिनांक : १८/१२/१९८२ रोजी झालेल्या ३५व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

| Item No. | 36/2 | Resolution No. | 616 |
| --- | --- | --- | --- |

विषय : मुंबई व ठाणे येथील भूखंड प्राथमिक शाळांसाठी देण्याबाबत (गोरेगांव, कांदिवली व वर्तकनगर)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील वसाहतींच्या आराखड्यात अथवा विकास आराखड्यात राखून ठेवण्यात आलेल्या भूखंडापैकी विशिष्ट उपयोगासाठी व विशिष्ट अशा शासकीय अथवा निमशासकीय संस्थांना द्यावयाच्या भूखंडांचे वितरण विभागीय मंडळांनी करावे. यासाठी त्यांना अधिकार प्रदान करण्यात यावेत.
(ब) विभागीय मंडळांनी या शिवाय इतर राखून ठेवलेल्या जागांबाबत विभागीय मंडळांनी मार्गदर्शक तत्वांचे अनुरोधाने प्राथमिक कार्यवाही पूर्ण करून आपल्या अभिप्रायासह अशी प्रकरणे अंतिम निर्णयासाठी प्राधिकरणाकडे कशा पद्धतीने पाठवावीत या संबंधीच्या मार्गदर्शक सूचना देण्यासंबंधीचा विषय प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत चर्चेसाठी आणण्यात यावा. या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे विभागीय मंडळांनी राखून ठेवलेल्या भूखंडाबाबत वितरणासंबंधीची प्राथमिक कार्यवाही पूर्ण करावी.

| Item No. | 36/3 | Resolution No. | 617 |
| --- | --- | --- | --- |

विषय : श्री. आर. पी. फडके, मुख्य अभियंता यांना वरिष्ठ श्रेणी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) श्री. फडके, मुख्य अभियंता हे प्राधिकरणाच्या सेवेत असेपर्यंत रुपये २२५०-२५०० ही वेतनश्रेणी त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १.१.१९८२ पासून लागू करण्यात यावी.
(ब) मुख्य अभियंता/प्राधिकरण व मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांच्या वेतनश्रेणीच्या पुनर्रचनेसंबंधी वेगळा प्रस्ताव प्राधिकरणासमोर ठेवण्यात यावा.

**Item No.** 36/4 **Resolution No.** 618

विषय : कोले-कल्याण येथील अंदाजे ६ एकर ११ गुंठे ही प्राधिकरणासाठी भूसंपादनाखाली असलेली जागा मे. डॅनी उलटेक्स कॉर्पोरेशन व एशियन पेंटस् यांच्या कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधण्यासाठी उपयोगात आणण्याकरिता वगळण्याविषयीच्या विनंतीचा विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) बाब टिप्पणीत दर्शविलेल्या कोले-कल्याण येथील विविध सर्व्हे नंबर मधील ६ एकर ११ गुंठे जमीन मे. डॅनी उलटेक्स कॉर्पोरेशन व एशियन पेंटस् कंपनी यांच्या कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधण्यासाठी भूसंपादनातून वगळण्याविषयीची विनंती अमान्य करण्यात यावी व त्याप्रमाणे शासनाला कळविण्यात यावे.
(ब) मे. डॅनी उलटेक्स कॉर्पोरेशन यांना कर्मचाऱ्यांकरिता घरे बांधण्यासाठी जागेची आवश्यकता असल्यास त्याबाबतच्या त्यांच्या मागणीसंबंधी अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी त्यांचेशी स्वतंत्र चर्चा करावी व वेगळा प्रस्ताव प्राधिकरणापुढे आणण्यात यावा.

**Item No.** 36/5 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण, गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये व्यापारी केंद्रातील गाळ्याचे वाटप करण्यासाठी सुधारणा करणे.

ठराव :

**Item No.** 36/6 **Resolution No.** 619

विषय : सासवड येथील 'ब' पद्धतीच्या अल्प उत्पन्न गट विभाग - २ च्या १२४ गाळ्यांच्या मेसर्स अशोक एंटरप्रायझेस कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कामाच्याबाबतीत कामाची व्याप्ती कमी झाल्याने अनामत रकमेपैकी कमी झालेल्या कामाच्या प्रमाणात अनामत रक्कम परत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे ६० गाळ्यांच्या कामाच्या व्याप्तीनुसार अनामत रक्कम निश्चित करण्यात येऊन त्याप्रमाणे नियमानुसार अनामत रक्कम घेण्यात यावी व जादा घेण्यात आलेली रक्कम कंत्राटदारांना परत करण्यात यावी.

**Item No.** 36/6 **Resolution No.** 619

विषय : सासवड येथील 'ब' पद्धतीच्या अल्प उत्पन्न गट विभाग - २ च्या १२४ गाळ्यांच्या मेसर्स अशोक एंटरप्रायझेस कंत्राटदार यांना देण्यात आलेल्या कामाच्याबाबतीत कामाची व्याप्ती कमी झाल्याने अनामत रकमेपैकी कमी झालेल्या कामाच्या प्रमाणात अनामत रक्कम परत करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे ६० गाळ्यांच्या कामाच्या व्याप्तीनुसार अनामत रक्कम निश्चित करण्यात येऊन त्याप्रमाणे नियमानुसार अनामत रक्कम घेण्यात यावी व जादा घेण्यात आलेली रक्कम कंत्राटदारांना परत करण्यात यावी.

**Item No. 36/7 Resolution No. 620**

विषय : महागाई भत्ता वाढीव दराने देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) शासनाच्या दिनांक ३ डिसेंबर १९८२ च्या आदेशाप्रमाणे १ जून १९८२ पासून महागाई भत्त्यात जी वाढ करण्यात आली आहे ती प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना देण्यात यावी.
(ब) यापुढे महागाई भत्त्यात वाढ झाल्यास अशा प्रकरणास उपाध्यक्षांनी निर्णय घेऊन प्रकरण माहितीसाठी ठेवण्यात यावे.

**Item No. 36/8 Resolution No. 621**

विषय : पुनर्नेमणूक
श्री. ए. बी. साळवी, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) श्री. साळवी यांना तीन महिने मुदत वाढ देण्यात यावी.
(ब) महसूल खात्याकडून योग्य त्या अनुभवाचे अधिकारी मिळत नाहीत हे लक्षात घेता रिकाम्या असलेल्या अशा जागांकरिता जाहिरात देऊन सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी तसेच कनिष्ठस्तर न्यायाधीश यासारख्या जागांवर काम केलेल्या योग्य त्या अनुभवाचे अधिकारी नेमण्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करावी.
(क) सरळ सेवा प्रवेशी उमेदवार नेमण्यासंबंधी उपाध्यक्षांनी जी कार्यवाही केली आहे त्याची प्राधिकरणाने नोंद घेतली व त्यानुसार योग्य ती पावले उचलावीत असे आदेश दिले.

**Item No. 36/9 Resolution No. 622**

विषय : श्री. एस. बी. गुरनानी, सेवा निवृत्त कार्यकारी अभियंता यांच्या सेवेचा कालावधी वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) ३१.१२.१९८२ नंतर श्री. गुरनानी यांची मुदत एक महिन्याने वाढविण्यासंबंधीच्या प्रशासनाने केलेल्या कारवाईस प्राधिकरण मान्यता देत आहे. त्याचप्रमाणे त्यांची मुदत ३१ जानेवारी १९८३ अखेर वाढविण्यात यावी.
(ब) श्री. गुरनानी यांना यानंतर आणखी मुदत वाढ मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव नाकारण्यात येतो.

**Item No. 36/10 Resolution No. 623**

विषय : अमरावती येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेल्या गाळ्यांपैकी ८ गाळे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने म्हणून राखून ठेवण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अमरावती येथे नागपूर मंडळाने बांधलेल्या दुर्बल घटकांसाठीच्या ३५ गाळ्यांपैकी ८ गाळे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने म्हणून राखून ठेवण्यात यावेत. हे गाळे कनिष्ठ अभियंता, लेखापाल, चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्ग वगैरेसारख्या कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत.

**Item No. 36/11 Resolution No. 624**

विषय : भाडेवसुलीकार व पर्यवेक्षी/प्रमुख भाडेवसुलीकार यांना बढतीच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पर्यवेक्षी भाडेवसुलीकारांच्या सध्याच्या एकूण पदांच्या संख्येपैकी २५ टक्के पदे 'निवड श्रेणी पर्यवेक्षी भाडेवसुलीकार' या संवर्गात निर्माण करण्यात यावीत व या नवीत पदांना रुपये ३९५-८०० ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. पर्यवेक्षी भाडेवसुलीकारांच्या सध्याच्या एकूण मंजूर संख्येतून ही पदे कमी करण्यात येतील.

**Item No. 36/12 Resolution No. 625**

विषय : मुंबई मंडळाच्या मिळकत व्यवस्थापन विभागाच्या 'स्टाफिंग पॅटर्न'बाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीमध्ये दर्शविल्याप्रमाणे दिनांक २५.९.१९८२ रोजी घेतलेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे प्रत्येक मिळकत व्यवस्थापन विभागाची रचना करण्यास प्राधिकरण तत्त्वतः मान्यता देत आहे. मात्र सध्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता योग्य तेवढ्याच नेमणूका करण्यात याव्यात.

**Item No. 36/13 Resolution No. 626**

विषय : श्री. व्ही. व्ही. वांगीकर, कार्यकारी अभियंता, पुणे मंडळ यांना प्रवासभत्ता देयकामध्ये पहिल्या वर्गाचे तिकीट क्रमांक देण्यापासून सूट मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) श्री. व्ही. व्ही. वांगीकर, कार्यकारी अभियंता, पुणे मंडळ यांना पहिल्या वर्गाचे तिकीट क्रमांक न लिहिता त्यांच्या पुणे ते नवी दिल्ली व नवी दिल्ली ते पुणे या एप्रिल १९८२ मध्ये केलेल्या प्रवासाचा भत्ता देण्यास संमती देण्यात येते.
(ब) यापुढे अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येतात.

**Item No.** **36/14(** **Resolution No.** **627**

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतींतील गाळ्यांच्या विक्रीच्या संबंधात भाडे खरेदी कालावधीसाठी भाडेपट्टा करारनामा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे सहकारी संस्थेच्या पोट नियमात दुरुस्ती करून घेण्यासंबंधीची कार्यवाही करण्यात यावी.
(१) भाडेखरेदी हप्त्याची वसुली
(२) सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पोट नियमातील,
(अ) भाग भांडवल दुसऱ्याच्या नावे करणे
(ब) काळजीवाहू व्यक्तींना नाममात्र सदस्य करून घेणे
(क) गाळ्यातून काढून घेणे
(३) गाळ्यांची तपासणी करणे
(४) इमारतीची दुरुस्ती
(५) चटई क्षेत्र निर्देशांक,
यासंबंधी बाब टिप्पणीत ठरविण्यात आलेल्या विचारांना प्राधिकरणाने मान्यता दिली.

**Item No.** **36/14(** **Resolution No.** **628**

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतींतील गाळ्यांच्या विक्रीच्या संबंधात काही धोरणविषयक बाबींवर निर्णय घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) गाळेविक्री योजनेत सामील होण्यासाठी कोणतीही अखेरची तारीख ठरविण्यात येऊ नये. मात्र शेष किंमत एकरकमी भरण्यासंबंधी जी ५ टक्के सूट देण्यात येणार आहे तिची मुदत मात्र सध्या ३०.४.१९८३ अखेर वाढविण्यात यावी.
(ब) विक्री योजनेसाठी आधारभूत तारीख म्हणून १.४.१९८० ही तारीख ठरविण्यात यावी व त्याप्रमाणे योजनेमध्ये सामील होण्याची प्रारंभिक रक्कम व भाडेखरेदीचे हप्ते ठरविण्यात यावेत.
(क) १४.९.१९८२ च्या शासकीय आदेशांची अंमलबजावणी करताना ज्या इमारतींमधील जे गाळेधारक पूर्वीच या योजनेमध्ये सामील झालेले आहेत व जे या योजनेचा फायदा १४.८.८२ च्या शासकीय आदेशाप्रमाणे घेऊ इच्छितात त्यांनी भाडेखरेदी हप्त्यापोटी भरलेली रक्कम ही एकूण रकमेपोटी भरलेली आहे असे समजण्यात यावे.
३१.१.१९८३ अखेर या योजनेमध्ये सामील होण्याची ठरविलेली अंतिम तारीख ३१.३.१९८३ अखेर वाढविण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

**Item No. 36/15 Resolution No. 629**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम, १९८१ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम, १९८१ च्या विनियम २५ मध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.
(ब) गाळ्यांचे हस्तांतरण करताना खालीलप्रमाणे अधिमूल्य आकारण्यात यावे.

(१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रात :

| उत्पन्न | कुटुंबाचे घटक | | इतर |
|---|---|---|---|
| | वारस हक्काद्वारे | इतर वेळी | |
| १) उच्च उत्पन्न गट | १००/- | रु. ५,०००/- | रु. १०,०००/- |
| २) मध्यम उत्पन्न गट | १००/- | रु. ३,०००/- | रु. ५,०००/- |
| ३) अल्प उत्पन्न गट | ५०/- | रु. २,०००/- | रु. ४,०००/- |
| ४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | ५०/- | रु. १,०००/- | रु. २,०००/- |

(२) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ सोडून इतर विभागीय मंडळांच्या क्षेत्रात

| उत्पन्न | कुटुंबाचे घटक | | इतर |
|---|---|---|---|
| | वारस हक्काद्वारे | इतर वेळी | |
| १) उच्च उत्पन्न गट | १००/- | रु. ३,०००/- | रु. ७,०००/- |
| २) मध्यम उत्पन्न गट | १००/- | रु. २,०००/- | रु. ४,०००/- |
| ३) अल्प उत्पन्न गट | ५०/- | रु. १,५००/- | रु. २,५००/- |
| ४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | ५०/- | रु. ५००/- | रु. १,०००/- |

(क) शासनाने अशा प्रकारे अधिमूल्य आकारण्यात मान्यता दिली असल्यामुळे विनियम २५ मध्ये सुधारणा होईपर्यंत वाट न पहाता अधिमूल्य आकारण्याबाबतचा निर्णय अंमलात आणण्यात यावा.

**Item No. 36/16 Resolution No. 633**

विषय : प्राधिकरण स्थापनेपूर्वी (५.१२.१९७७) वितरित झालेल्या वसाहतीतील (ज्या वसाहतीतील पहिला गाळा ५.१२.१९७७ पूर्वी वितरित झालेला असेल) गाळे (कालांतराने मोकळे झालेले) राखीव गट समजून त्यांचे आर्थिक भाडे (इकॉनॉमिक रेंट) आकारणे व घरभाडे भत्ता देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत जोडलेल्या सहपत्रात दर्शविलेल्या सेवानिवासस्थानांना वाजवी (इकॉनॉमिक रेंट) भाडे आकारण्यात यावे व त्याचा प्रभाव प्राधिकरणाच्या ठरावाच्या तारखेपासून देण्यात यावा. सहपत्रात दर्शविलेले गाळे सेवानिवासस्थान म्हणूनच राहतील व कर्मचारी प्राधिकरणाच्या सेवेत ज्या तारखेपासून नसेल त्या तारखेपासून त्याला ते निवासस्थान सोडावे लागेल.
सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात येऊन सभा समाप्त झाली.

**Item No. 36/24 Resolution No. 630**

विषय : मुंबई मंडळाच्या आस्थापनेवरील 'सचिव' या पदाच्या वेतनश्रेणीत तात्पुरती वाढ करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाच्या आस्थापनेवरील 'सचिव' या पदाच्या सध्याच्या रुपये ६८०-१५०० या वेतनश्रेणीमध्ये वाढ करण्यात येऊन ती श्रीमती जे. पी. तुंबळ प्राधिकरणाच्या सेवेत आहेत तोपर्यंत वाढवून रुपये ११००-१७०० करण्यात यावी.

**Item No. 36/25 Resolution No. 631**

विषय : शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदारांची नोंदणी करण्याबाबतचे केलेले सुधारीत नियम - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने त्यांच्या कामांसाठी अंमलात आणण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे प्राधिकरणाकडे भरावयाच्या सवलतीच्या दराची कायम स्वरुपाची इसारा रक्कम घेण्यास मान्यता देण्यात यावी.

**Item No. 36/26 Resolution No. 632**

विषय : शांतीनगर, नागपूर आणि ओशिवरा, मुंबई येथील योजनांसाठी 'हुडको' कडून कर्ज उभे करण्यासाठी अनुमती व अधिकृती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडको अर्थसहाय्यित, ओशिवरा मुंबई येथील अल्प उत्पन्न गटासाठी आरक्षित भूखंड योजना (१२०० भूखंड) व हुडको अर्थसहाय्यित, शांतीनगर, नागपूर येथील अल्प उत्पन्न गृहनिर्माण योजना (४१० गाळे) यांचेसाठी अनुक्रमे रुपये ६९.५५ लक्ष व रुपये ५७.११ लक्ष कर्ज उभे करण्यासाठी अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** 37 Spl **Meeting Date** 25/Feb/1

**Item No.** 37/1 **Resolution No.**

विषय : दिनांक २८ जानेवारी १९८३ रोजी झालेल्या ३५व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 37/2 **Resolution No.** 634

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९८३-८४चा अर्थ संकल्प व सन १९८२-८३चे सुधारलेले अंदाज.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे व सोबतच्या अर्थसंकल्पीय अंदाज भाग १, २ व ३ या पुस्तिकांमध्ये दर्शविल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या १९८२-८३च्या सुधारीत अंदाज पत्रकास तसेच १९८३-८४च्या अंदाजपत्रकास मान्यता दिली.

---

**Item No.** 37/3 **Resolution No.** 635

विषय : स्टाफिंग पॅटर्न
प्राधिकरण - विभागीय मंडळ यांच्याकरिता सन १९८३-८४ या वर्षाकरिता कर्मचारी वर्ग अनूसूची.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब सूचीत जोडलेल्या अनुसूचित दर्शविलेल्या पदांना १ मार्च १९८३ ते २९ फेब्रुवारी १९८४ या कालावधीकरिता मान्यता दिली.

---

**Item No.** 37/4 **Resolution No.**

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या कुर्ला विभाग नेहरूनगर वसाहतीत अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या इमारत क्रमांक ७३च्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

ठराव :

---

**Item No.** 37/5 **Resolution No.** 636

विषय : वर्तकनगर, ठाणे येथील कोकण मंडळाच्या अखत्यारीतील वसाहतीमध्ये प्रत्येक गाळ्यास स्वतंत्र मीटर देण्याच्या हेतूने केलेली कार्यवाही व त्यावर पुढील विचार.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर चर्चेत आल्याप्रमाणे उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी वर्तकनगर, ठाणे येथील वीज पुरवठा माडेकरांकडे सोपविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीला प्राधिकरणाने मान्यता दिली. १-२-१९८३ पासून हा वीज पुरवठा प्रत्यक्ष गाळेधारकांच्या नावे वीज मंडळाने करण्यासंबंधी तसेच गाळेधारकांच्या संघटनेशी रास्त मुद्द्यांवर चर्चा करून प्राधिकरणाचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासंबंधी योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

---

**Item No.** **37/6** **Resolution No.** **637**

विषय : श्री. एच. एन. पारवानी, निवृत्त उपसचिव, (कायदा व न्याय विभाग) यांची पुनर्नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) श्री. पारवानी यांची बाब टिप्पणीत दर्शविलेल्या अटींवर ५ महिन्यांकरिता कंत्राटी पद्धतीने प्राधिकरणाच्या सेवेत विधी उप-सल्लागार (जागतिक बँक योजना) हे नवीन पद निर्माण करून त्यावर नेमणूक करण्यात यावी.

२) या काळात विधी सल्लागारांनी श्री. पारवानी यांना ठराविक काम नेमून द्यावे. या कामासंबंधी श्री. पारवानी यांची काय प्रगती आहे हे वेळोवेळी तपासले जावे व त्याचा अहवाल प्राधिकरणासमोर ठेवण्यात यावा.

यानंतर अध्यक्षांनी सदस्यांचे व सदस्यांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सभा समाप्त झाली.

**Meeting No.** 38 **Meeting Date** 02/Apr/1

**Item No.** 38/2 **Resolution No.**

विषय : मेसर्स एम्.बी. दुधानी अ‍ॅण्ड सन्स या कंत्राटदाराने निविदा भरतेवेळी गैरमार्गाचा अवलंब केल्याने त्याबाबत करावयाच्या कार्यवाहीचा विचार करणे.

ठराव :

**Item No.** 38/3 **Resolution No.**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील उपयोगिता (युटीलिटी) करिता आरक्षित केलेल्या भूखंडातील काही भाग माध्यमिक शाळांना देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 38/4 **Resolution No.** 648

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे माध्यमिक शाळा बांधण्यासाठी भूखंड मिळण्याकरिता.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील लेडिज क्लबसाठी आरक्षित करण्यात आलेला भूखंड मुंबई महापालिकडेकडून त्यासंबंधीची योग्य ती कार्यवाही करवून शाळेकरिता आरक्षित केला गेल्यानंतर इंडियन एज्युकेशन सोसायटी या संस्थेला नेहमीच्या अटींवर देण्यात यावी. याशिवाय संस्थेच्या कार्यकारी समितीवर प्राधिकरणातर्फे दोन प्रतिनिधी घेण्यात यावेत अशी विशेष अट त्यामध्ये टाकण्यात यावी.

**Item No.** 38/5 **Resolution No.** 649

विषय : मच्यावाडी (गलिच्छ वस्ती) पुणे येथील जागा वीर नेताजी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित यांना देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वीर नेताजी सहकारी गृहनिर्माण रचना संस्था यांना मच्यावाडी, पुणे येथील जमिनीच्या अधिमूल्याच्या पोटी त्यांनी सुरुवातीस रुपये २५००० भरल्यानंतर १० वार्षिक हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात यावी. या उरलेल्या अधिमूल्याच्या रकमेवर व्याज आकारण्यात यावे. सुरुवातीची रक्कम भरल्यानंतर जमिनीचा ताबा देऊन योग्य ते कायदेशीर कागदपत्र पूर्ण करवून घ्यावे.
२) संस्थेला अधिमूल्याच्या ३ टक्के वार्षिक भाडे आकारण्यात यावे.
३) जमिनीच्या भाडेपट्ट्याचा काळ ९० वर्षांचा असावा व ३० वर्षांनी ह्या भाडेपट्ट्यात फेरबदल करण्याचा अधिकार मंडळाला राहील.

| **Item No.** | **38/6** | **Resolution No.** | **638** |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहतींमधील पोलीस चौक्यांकरिता द्यावयाच्या भूखंडाचा विचार करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेऊन खेरनगर, वांद्रे, गोराई रोड, बोरीवली तसेच मागठाणे, बोरीवली येथे पोलीस खात्याला द्यावयाच्या भूखंडाबाबतचा बाब टिप्पणीत दर्शविलेला प्रस्ताव मंजूर केला. त्याचप्रमाणे ताबा देण्यापूर्वी अधिमूल्याच्या रक्कम आगाऊ घेण्यासंबंधी विनियमात असलेली तरतूद गरज पडल्यास त्या प्रकरणापुरती शिथिल करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

| **Item No.** | **38/7** | **Resolution No.** | **650** |
|---|---|---|---|

विषय : बृहन्मुंबई येथील प्लॉट्स माध्यमिक श्शाळांसाठी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) गोरेगाव येथील माध्यमिक शाळांसाठी राखून ठेवण्यात आलेला भूखंड, प्रार्थना समाज, मुंबई या संस्थेला देण्यात यावा.
२) कांदिवली, पोईसर येथील माध्यमिक शाळांसाठी राखून ठेवण्यात आलेला भूखंड शिक्षण प्रसारक मंडळ, बोरिवली, मुंबइ यांना देण्यात यावा.
दोन्ही संस्थांवर प्राधिकरण्यामार्फत कार्यकारी समितीवर दोन प्रतिनिधी नेमण्याबाबतची अटही इतर नेहमीच्या अटी व शर्तीबरोबर ठेवण्यात यावी.

**Item No. 38/8 Resolution No. 651**

विषय : गलिच्छवस्ती सुधारणा कार्यक्रम - गलिच्छ वस्त्यांमध्ये परिसर सुधार करण्याच्या कामी येणाऱ्या अडचणींचा विचार करणे आणि मार्गदर्शक सूचना प्रसृत करणे.

ठराव : १) प्रशासकीय मान्यता (पृष्ठ क्रमांक ८/८)

चर्चा -

गलिच्छ वस्त्यांमध्ये प्राधान्य क्रमाने सार्वजनिक संडास, पाण्याचे नळ व गटारे या सुविधा पुरवाव्यात व तसे करीत असता मागणीमध्ये काही फेरफार करण्यास हरकत नसावी.

निर्णय -

सार्वजनिक संडास व पाण्याचे नळ पुरविण्यासाठी जादा खर्च करणे शक्य व्हावे या दृष्टीने वरीलप्रमाणे फेरफार प्रादेशिक मंडळाने विचारात घ्यावेत. असे करताना संडास, नळ व गटारे या मूलभूत सुविधा विहित मानकानुसार पुरविण्यात याव्यात. फेरफार करताना रस्ते, पायवाटा आणि रस्त्यावरील दिवे यावर करावा, लागणारा खर्च तेवढ्या रकमेने कमी करण्यात यावा. मात्र असे फेरफार मान्य करताना बाब टिप्पणीत नमूद केलेल्या प्रत्येक सुविधेसाठी ठरविलेल्या रकमेशी तुलना करता २५ टक्क्यांहून जास्त नाही. इतक्या रकमेपर्यंतच फेरफार करण्याची मुभा देण्यात यावी.

२) आर्थिक व्यवस्था (पृष्ठ ८/९ ते ८/११)

चर्चा -

बाब टिप्पणीत ठरविण्यात आलेल्या वेगवेगळ्या पर्यायानुसार नगरपालिकांना गलिच्छ वस्तीसाठी त्यांनी केलेल्या कामांबाबत किती रक्कम देय होते, हे उदाहरणासहित मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी दाखवून दिले. नगरपालिकेचा निधी मोठ्या प्रमाणात अडकून पडू नये अशी नगरपालिकेची मागणी असते त्याची प्राधिकरणाने नोंद घेतली. तथापि गलिच्छ वस्ती सुधारणेची कामे ही मुख्यतः नगरपालिकेच्याच सर्वसाधारण कामाचा एक भाग असल्यामुळे शासकीय अनुदान हे नगरपालिकेच्या या नेमून दिलेल्या कामासाठी मदत असल्याचे मत प्रदर्शित करण्यात आले.

निर्णय -

बाब टिप्पणीत नमूद केलेल्या पर्यायांपैकी पर्याय क्रमांक ३ प्राधिकरणाने मान्य केला. या पर्यायानुसार नगरपालिकेला जी अग्रीम रक्कम दिली असेल ती नगरपालिकेने केलेल्या कामाच्या किमतीच्या ९७.५ टक्के इतकी रक्कम भरपाई म्हणून देताना ही अग्रीम रक्कम पूर्णपणे वळती करून घेण्यात यावी. अशा तऱ्हेचे पहिल्या हप्त्यात ही पूर्ण अग्रीम रक्कम वसूल केल्यावर कामाच्या किमतीच्या ९७.५ टक्के इतकी रक्कम देण्यात यावी. मात्र एकूण द्यावयाची रक्कम ही संपूर्ण कामाच्या अंदाजित खर्चाच्या ८७.५ टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये. लेखे पूर्ण केल्यावर व काम पूर्ण झाल्याचा दाखला सादर केल्यानंतर १०.०० टक्के रक्कम नगरपालिकेला देण्यात यावी.

३) झोपडपट्ट्यांच्या रहिवाश्यांकडून वर्गणी म्हणून २.५ टक्के रक्कम कापून घेण्याबाबत (पृष्ठ क्रमांक ८/१२)

चर्चा -

गलिच्छ वस्तीची कामे ही नगरपालिकेच्या नित्याच्या कामांचाच एक भाग असल्याने या कामासाठी नगरपालिकेचा सहभाग अपेक्षित आहे असे मत प्राधिकरणाने व्यक्त केले.

निर्णय -

कामाच्या किंमतीच्या २.५ टक्के वर्गणी नगरपालिकेने केलेल्या सुधारणा कामाच्या

किमतीतून वजा करण्याची सध्याची पद्धत चालू ठेवण्यात यावी.
४) घोषित केलेली गलिच्छ वस्ती तिचे मूळ जागेवरून हलवून दुसऱ्या ठिकाणी पुनर्वसन करण्यात येणार असल्यास करावयाची कार्यवाही (पृष्ठ ८/१३)

चर्चा -

घोषित केलेली गलिच्छ वस्ती उठवून दुसऱ्या जागी अशा रहिवाश्यांचे पुनर्वसन यावयाचे असल्यास मूळ वस्तीला सुविधा पुरविण्यासाठी जो निधी उपलब्ध होतो तो या नवीन ठिकाणी करण्याची परवानगी असावी असा प्रस्ताव होता.

निर्णय -

बाब टिप्पणीत दर्शविलेल्या अटींवर असा खर्च करण्यासाठी उपलब्ध असणारा निधी नवीन ठिकाणी करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

५) संडासासाठी मोकळी जागा उपलब्ध नसल्यास (पृष्ठ क. ८/१५ व ८/१७)

चर्चा -

पुष्कळ ठिकाणी गलिच्छ वस्त्यांमध्ये संडासासाठी मोकळी जागा उपलब्ध होत नाही. गलिच्छ वस्तीत पुरविण्याच्या मूलभूत सुविधांपैकी ही एक महत्वाची व आवश्यक सुविधा असल्याचे प्राधिकरणाने म्हटले. बाब टिप्पणीतील प्रस्तावांपैकी ई या प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही केल्यास अडचणी येतील असे मत प्राधिकरणाने व्यक्त केले.

निर्णय -

बाब टिप्पणीत दर्शविलेल्या प्रस्तावाप्रमाणे अ, ब, क व ड यानुसार कार्यवाही करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

६) विकास आराखड्यातील आरक्षणावर वसलेल्या गलिच्छ वस्त्या (पृष्ठ क. ८/१७ ते ८/१८)

चर्चा -

याबाबतीत प्राधिकरणाच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, कोणत्याही गलिच्छ वस्तीच्या बाबतीत सुधारणा कामे हाती घेण्यापूर्वी संबंधित गलिच्छ वस्त्या पुढील कमीत कमी १० वर्षांत हलविल्या जाणार नाहीत असे प्रमाणपत्र संबंधित खात्याकडून घ्यावे लागते. प्राधिकरण्यास असेही सांगण्यात आले की, असे प्रमाणपत्र देण्यास कोणताही अधिकारी सहसा तयार होत नाही. हा प्रश्न दोन भागात विभागावा लागेल. १) विकास आराखड्यानुसार आरक्षण असलेल्या जागी वसलेल्या गलिच्छ वस्त्या आणि २) विकास आराखड्यात आरक्षण नसलेल्या जागी वसलेल्या गलिच्छ वस्त्या. ज्या ठिकाणी आरक्षण आहे अशा ठिकाणी गलिच्छ वस्त्यांना बहुतेक ठिकाणी सुविधा पुरविलेल्या नाहीत. मात्र अशा गलिच्छ वस्त्या हलविण्यातही आलेल्या नाहीत आणि विकास आराखड्यानुसार सदर जागेच्या विहित कारणासाठी विकास पण करण्यात आलेला नाही. त्यामुळे या बाबतीत १० वर्षांची मुदत कमी करता येईल का याचा विचार करावा असे सुचविण्यात आले.

निर्णय -

प्राधिकरण्याने यावर विचार करून, ज्या जमिनीवर विकास आराखड्यानुसार आरक्षण असेल आणि तेथील गलिच्छ वस्तीला सुविधा पुरवावयाच्या असतील तर संबंधित जागेचा पुढील ५ वर्षांत विकास अपेक्षित नाही व गलिच्छवस्ती हलविण्यात येणार नाही याची खातरजमा करून घ्यावी व मगच सुधारणा कामे हाती घेण्यात यावी, असे आदेश दिले. ज्या जागी विकास आराखड्यानुसार आरक्षण नाही अशा जागी वसलेल्या गलिच्छ वस्त्यांच्या बाबतीत संबंधित अधिकाऱ्याला विचारणा करण्यात यावी की त्या ठिकाणाच्या गलिच्छ वस्त्या हलविण्यात येणार आहेत काय व असल्यास तेथे

त्यांच्याच्या विकासाच्या कामासाठी मंजूरी व आर्थिक तरतूद आहे का? तशी मंजूरी व आर्थिक तरतूद नसल्यास अशा ठिकाणी गलिच्छ वस्ती सुधारणा कामे हाती घेण्यात यावीत असे प्राधिकरणाने ठरविले.

७) खाजगी जमिनीवरील गलिच्छ वस्त्यांमध्ये पाणी पुरवठा (पृष्ठ क्रमांक ८/१८)

चर्चा -

खाजगी जमिनीवरील झोपडपट्टीवासी पाण्याच्या जोडणीकरिता लागणारी अनामत रक्कम जमा करीत नाहीत. महापालिका अशा अनामत रकमेचा आग्रह धरते. परंतु अशी अनामत रक्कम भरली न गेल्यामुळे या गलिच्छ वस्त्यांना पाणीपुरवठा व संडास या सुविधा पुरविण्यात येत नाहीत.

निर्णय -

प्राधिकरणाने विचार करून अशा खाजगी जमिनीवरील झोपडपट्टीच्या बाबतीत झोपडपट्टी रहिवाशी पाण्याची जोडणी करण्यासाठी पूर्वी लागणारी अनामत रक्कम भरण्यास तयार नसल्यास अशा गलिच्छ वस्त्यांना पाणी पुरवठा व संडास या सुविधा पुरवू नयेत असा निर्णय घेतला.

८) टेकड्यांवर उंच जागी वसलेल्या गलिच्छ वस्त्यांबाबत (पृष्ठ क्र. ८/१९)

चर्चा -

टेकड्यांवर किंवा उंच जागी वसलेल्या गलिच्छवस्त्यांची गणना झालेली आहे. रहिवाश्यांना पाणीपुरवठा करण्यासंबंधी आग्रह असतो. काही गलिच्छ वस्त्यांच्या सम्पवेल व पंप या सुविधाही पुरविल्या आहेत. पाण्याच्या सुविधा दुरुस्ती व देखभालीसाठी ताब्यात घेण्यास महापालिकेने नकार दिला आहे व झोपडपट्टी रहिवाशी यासाठी पुढे येत नाहीत.

निर्णय -

प्राधिकरणाने, टेकड्यांवर किंवा उंच जागी गलिच्छ वस्त्यांच्या बाबतीत गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमातून सम्पवेल व पंप पुरवू नयेत असा निर्णय घेतला.

९) १९७५ च्या गणनेनंतर उभारलेल्या अतिरिक्त झोपड्या किंवा गलिच्छ वस्ती म्हणून घोषित झाल्यानंतर तेथे आलेल्या अतिरिक्त झोपड्या (पृष्ठ क्र. ८/१९ ते ८/२०)

चर्चा -

१९७५ च्या गणनेनंतर उभारलेल्या अतिरिक्त झोपडपट्ट्यांच्या बाबतीत बाब टिप्पणीत दिलेल्या प्रस्तावांचा विचार करताना प्राधिकरणाने असे मत व्यक्त केले की, प्रथम गणना झालेल्या झोपडपट्टी रहिवाश्यांना सुविधा पुरविल्या पाहिजेत व हे काम अद्याप बाकी आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेकडे असे जादा नळ व संडास पुरविण्यासाठी योग्य त्या प्रमाणात पाणी उपलब्ध होईल का याचा विचार सुद्धा करावा लागेल.

निर्णय -

या बाबी लक्षात घेता प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता दिली नाही आणि सध्याचीच पद्धत म्हणजेच १९७५ च्या गणनेनुसार असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात सुविधा पुरविणे चालू ठेवावे असा आदेश दिला.

१०) रस्त्यावरील दिवे (पृष्ठ क्रमांक ८/२१)

चर्चा -

याबाबतीत विचार करताना असे मत व्यक्त करण्यात आले की, संबंधित जमीन मालकास पाणी पुरवठ्यासाठी महानगरपालिका ज्याप्रमाणे नोटिसा देते व नंतर आपण जोडणी उपलब्ध करून देतो त्याचप्रमाणे वीज पुरवठ्याच्या बाबतीत पण अशा प्रकारची नोटिस देऊन वीज कंपनीला केबल टाकता येईल व रस्त्यावरील दिवे बसविता येतील

असा विचार व्यक्त करण्यात आला. दुसरी अडचण म्हणजे असा दिवा बसविल्यानंतर महानगरपालिकेने दरमहा वीज वापराबद्दल वीज कंपनीला जी रक्कम द्यावयाची त्याबाबतीत अडचण येण्याची शक्यता आहे.

निर्णय -

याबाबतीत आणखी तपासणी करण्यात यावी असा प्राधिकरणाने आदेश दिला.

११) खाजगी जमिनीवर वसलेल्या गलिच्छ वस्त्यांना पुरविलेल्या सुविधांची देखभाल व दुरुस्ती (पृष्ठ क्र. ८/२२ ते ८/२३)

चर्चा -

खाजगी जमिनीवर असलेल्या झोपडपट्टीचे बाबतीत सेवाशुल्क वसूल करण्यात येत नाही त्यामुळे अशा झोपडपट्टीमधील सुविधांची देखभाल व दुरुस्तीची व्यवस्था मुंबई महापालिका घेत नाही.

निर्णय -

शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागामार्फत नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभागास विनंती करण्यात यावी की, मुंबई महानगरपालिका आणि नगरपरिषदा यांना अशा गलिच्छ वस्त्यांचेबाबतीत सुविधांच्या देखभाली व दुरुस्तीसाठी योग्य ते आदेश देण्यात यावेत. या सुविधा त्यांच्या ताब्यात देण्यात याव्यात व त्या सुस्थितीत ठेवाव्यात असे आदेश शासकीय पातळीवरून काढण्यात यावेत. यासंबंधी पडणारा आर्थिक बोजा सहन करण्यासाठी गलिच्छ वस्त्यांचे सक्षम प्राधिकारी आणि गलिच्छ वस्ती नियंत्रक यांनी अशा खाजगी जमिनीवरील झोपडपट्टीचे बाबतीत योग्य ते सेवाशुल्क झोपडपट्टी रहिवाश्यांकडून वसूल करवून संबंधित महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांना द्यावे.

१२) गलिच्छ वस्ती सहाय्यक म्हणून कार्यव्ययी आस्थापनेवर नेमणूक (पृष्ठ क्रमांक ८/३३)

चर्चा -

गलिच्छ वस्ती सुधारणेच्या कामात तेथील रहिवाश्यांचा सहभाग असावा या विचाराशी प्राधिकरणाचे तत्वतः एकमत झाले.

निर्णय -

गलिच्छवस्ती सहाय्यक म्हणून नियुक्ती करण्यासाठी प्राधिकरणाने तत्वतः संमती दिली. मात्र यावर होणारा खर्च गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम अंतर्गत अनुदानातून होऊ नये असा विचार व्यक्त केला. या ठिकाणी असेही नमूद करण्यात आले की, जागतिक बँकेच्या सहाय्याने घेण्यात यावयाच्या कार्यक्रमासाठीही गलिच्छ वस्ती सहाय्यकाचा उपयोग होईल. त्या कार्यक्रमासाठी जो खर्च होणार आहे त्यातून या बाबतीत खर्च करता येईल.

१३) गलिच्छ वस्ती रहिवाश्यांनी वर्गणी रुपाने काही रक्कम दिल्यास (पृष्ठ क्र. ८/२४)

चर्चा -

(या विषयाची चर्चा चालू असताना श्री. जे. जी. केसकर, सदस्य अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीतून गेले) याबाबतीत असे मत व्यक्त करण्यात आले की, गलिच्छ वस्ती रहिवाशी सार्वजनिक संडास किंवा पाण्याचे नळ इत्यादी सुविधा जास्त प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी स्वतःची रक्कम खर्च करण्यास पुढे येणार नाहीत.

निर्णय -

एक प्रयोग म्हणून बाब टिप्पणीत नमूद केलेल्या प्रस्तावानुसार १-२ ठिकाणी कार्यवाही करण्यास प्राधिकरणाने अनुमती दर्शविली.

१४) वास्तव लक्ष्य अहवाल सादर करणे (पृष्ठ क्र. ८/२५)

चर्चा -

या बाबीवर विचार करता असे मत व्यक्त करण्यात आले की, विहित मानकानुसार सर्व सुविधा काही प्रमाणात पुरवून गलिच्छ वस्ती सुधारणा झाली असे म्हणता येणार नाही. तसेच झालेल्या खर्चास दरडोई खर्चाच्या रकमेने भागून येणाऱ्या लोकसंख्येस फायदा मिळाला असे म्हणणे पण बरोबर होणार नाही. तरी पण हा कार्यक्रम राबविताना येणाऱ्या अडचणींचा विचार करता बाब टिप्पणीत नमूद केलेल्या प्रस्तावाचा विचार करण्यास हरकत नाही, असे मत प्राधिकरणाने व्यक्त केले. मात्र एखाद्या गलिच्छ वस्तीत जेवढ्या प्रमाणात शक्य आहे तेवढ्या प्रमाणात सुविधा पुरविण्यात आल्यानंतरच संबंधित गलिच्छवस्ती सुधारणेवर किती खर्च झाला हे पाहून त्या खर्चास प्रचलित उच्चतम दरडोई खर्चाच्या रकमेने (सध्या रु. २००) भागून जी लोकसंख्येस अंशतः फायदा मिळाला असे समजण्यात यावे, असे मत व्यक्त करण्यात आले. त्याप्रमाणे शासनाकडे अहवाल पाठविताना अशा प्रकारचा खुलासा करावा असा विचार व्यक्त करण्यात आला.

निर्णय -

प्राधिकरणाने याबाबतीत विचार करून निर्णय घेतला की एखाद्या गलिच्छ वस्तीत जेवढ्या प्रमाणात शक्य आहे तेवढ्या प्रमाणात सुविधा पुरविण्यात आल्यानंतर संबंधित गलिच्छवस्ती सुधारणेवर किती खर्च झाला हे पाहून त्या खर्चास प्रचलित उच्चतम खर्चाच्या रकमेने (सध्या रु. २००) भागून जी लोकसंख्या येईल तेवढ्या लोकसंख्येस अंशतः फायदा मिळाला असे समजण्यात यावे. मात्र शासनाकडे अहवाल पाठविताना असा खुलासा करण्यात यावा की, संबंधित गलिच्छ वस्तीला विहीत मानकानुसार सर्व सुविधा पुरविणे प्रत्यक्षात शक्य झालेले नाही आणि तशा सुधारणा काही प्रमाणात पुरविण्यात आलेल्या आहेत व त्यामुळे संबंधित गलिच्छ वस्तीतील काही लोकसंख्येलाच फायदा झाल्याचे निर्देशित केले आहे.

१५) सक्षम प्राधिकाऱ्याने गलिच्छ वस्ती घोषित करेपर्यंत कामे सुरू करण्यासंबंधी

चर्चा -

प्राधिकरणास असेही सुचविण्यात आले की, सरकारी व निमसरकारी जमिनीवरील गलिच्छ वस्त्यांचे बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याने (ती घोषित करेपर्यंत सुधार कामे सुरू न करणे इष्ट होणार नाही. अशा ठिकाणी जर सक्षम प्राधिकाऱ्याने) (कॉम्पिटंट ऑथॉरिटी) गलिच्छ वस्ती सुधारणा कामे घ्यावीत असे कळविले तर जी सुरू करण्यास अनुमती द्यावी असे प्राधिकरणासमोर मांडण्यात आले.

निर्णय -

चर्चेनुसार कार्यवाही करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

| **Item No.** | **38/9** | **Resolution No.** | **652** |
|---|---|---|---|

विषय : वर्तकनगर ठाणे येथील भूखंड माध्यमिक शाळांसाठी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर्तकनगर, ठाणे येथील माध्यमिक शाळेकरिता, राखून ठेवण्यात आलेला भूखंड ब्राम्हण शिक्षण मंडळ ठाणे या संस्थेला नेहमीच्या अटींवर व शर्तीवर देण्यात यावा.
२) या शाळेच्या कार्यकारी समितीवर प्राधिकरणाचे दोन प्रतिनिधी घेण्यात यावेत अशीही अट घालण्यात यावी.

| **Item No.** | **38/10** | **Resolution No.** | **639** |
|---|---|---|---|

विषय : कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळासाठी प्रश्शासकीय अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापकाचे पद मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळासाठी प्रशासकीय अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक हे पद रुपये ५००-११५० या वेतनश्रेणीमध्ये निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येते.

| **Item No.** | **38/11** | **Resolution No.** | **640** |
|---|---|---|---|

विषय : अभियांत्रिकीमधील पदव्योत्तर किंवा डॉक्टरेट अर्हता प्राप्त करणाऱ्या अभियंत्यांना वैयक्तिक वेतन देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
२४-५-१९८२ च्या शासनाच्या पाटबंधारे खात्याच्या निर्णयानुसार पदव्योत्तर/डॉक्टरेट अर्हता मिळणाऱ्या अभियंत्यांना त्याचप्रमाणे वास्तुशास्त्र विभागात तशाच तऱ्हेची पदव्योत्तर अथवा डॉक्टरेट अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्या शासकीय निर्णयातील तरतूदी लागू करण्यात याव्यात. प्राधिकरणाचा हा निर्णय जे कर्मचारी/अधिकारी प्राधिकरणाच्या निर्णयाच्या दिवशी म्हणजेच २ एप्रिल १९८३ रोजी सेवेत असतील किंवा त्यानंतर सेवेत येतील त्यांनाच लागू राहील. २ एप्रिल १९८३ रोजी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हा निर्णय दिनांक ३०-१०-१९८२ पासून लागू करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

| **Item No.** | **38/12** | **Resolution No.** | **641** |
|---|---|---|---|

विषय : श्री. व्ही. एच्. डिंगणकर, सेवानिवृत्त जिल्हा भू-लेख-निरीक्षक यांची पुनर्नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेऊन श्री. डिंगणकर यांच्या नेमणूकीस मान्यता दिली.

| Item No. | 38/13 | Resolution No. | 642 |
|---|---|---|---|

विषय : १) येवला आणि मालेगाव येथील गृहनिर्माण योजनांसाठी हडकोकडून कर्ज उभे करण्यास अनुमती व अधिकृती देणे.
२) हडकोकडून कर्ज उभे करण्यासाठी तारण म्हणून येवला येथील योजनेखालील जमीन व त्या जमिनीवरील बांधकाम हडकोकडे गहाण ठेवण्यासाठी अधिकृती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) येवला येथील मध्यम उत्पन्न गट व नागरी गृहनिर्माण अ व ब त्याचप्रमाणे मालेगाव येथील नागरी गृहनिर्माण ब योजनेसाठी बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे हडको या संस्थेकडून कर्ज घेण्यासाठी अनुमती व अधिकृती दिली. तसेच येवला येथील जमीन व त्या जमिनीवरील बांधकाम हडको या संस्थेकडे कर्जासाठी तारण ठेवण्यासाठी अनुमती दिली.
ब) यापूर्वी कर्जाकरिता बँकेची हमी तारण म्हणून चालत असे. परंतु रिझर्व्ह बँकेने नुकत्याच काढलेल्या सूचनांमुळे बँकाना गृहनिर्माण मंडळांना हडकोच्या कर्जाकरिता दीर्घ मुदतीची हमी देणे शक्य होणार नाही. यास्तव शासनाने हमी देण्याची मर्यादा सध्याच्या ८.५ टक्क्यांवरून १०.५ टक्क्यांपर्यंत वाढवावी अशी विनंती शासनास करण्यात यावी व रिझर्व्ह बँकेने घातलेली बंधने शिथिल करण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करावा असे प्राधिकरणाने आदेश दिले.

| Item No. | 38/14 | Resolution No. | 643 |
|---|---|---|---|

विषय : चिकणघर, कल्याण येथे मध्यम उत्पन्न गट-२ खाली भाडे खरेदी पद्धतीने बांधण्यात यावयाच्या २१२ गाळ्यांच्या कामासाठी आलेल्या निविदेचा विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मेसर्स डी. डी. हजारे यांची २४.८० टक्के जादा दराची रु. ५४, ७५, ४५५-४० किंमतीची निम्नतम निविदा चिकणघर येथील कामांसाठी स्वीकारण्यात यावी.

| Item No. | 38/15 | Resolution No. | 653 |
|---|---|---|---|

विषय : सेवाप्रवेशासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता नसलेला कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाचा ठराव क्रमांक ४९९१ दिनांक २०-८-७४ रद्द करण्यात येतो.
व
२) ज्या संवर्गामध्ये कनिष्ठ पदावर सेवाप्रवेशासाठी आवश्यक अशी किमान शैक्षणिक अर्हतेची अट अहेल ती अट पूर्ण न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्या संवर्गामध्ये बढती देण्यात येऊ नये.
वर दोन दर्शविण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत शासनाकडून योग्य ते आदेश घ्यावेत.

| Item No. | 38/16 | Resolution No. | 644 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या गाडीची ठोकर बसून एका खाजगी मालकीच्या स्कूटरला झालेल्या मोडतोडीबद्दल नुकसानभरपाई देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
स्कूटर दुरुस्तीसाठी झालेल्या रु. ९०७/- च्या खर्चाची भरपाई श्री. वेणूगोपाळ, हिंदुस्थान एरोनॅटिक्स लिमिटेड यांना करण्याच्या उपाध्यक्ष, प्राधिकरण यांच्या दिनांक १५-८-१९८२ रोजीच्या निर्णयाला कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

| Item No. | 38/18 | Resolution No. | 655 |
|---|---|---|---|

विषय : कुर्ला येथील नेहरु-नगर वसाहतींतील अल्प उत्पन्न गट इमारत क्रमांक ७३ च्या दुरुस्तीसंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे तसेच ३७ व्या बैठकीतील बाब टिप्पणीच्या अनुरोधाने नेहरुनगर इमारत क्रमांक ७३ या इमारतीच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात यावे. वर उल्लेख केल्याप्रमाणे जी दुरुस्ती घेणे आवश्यक आहे ती घेतली जाईल याकडेही पूर्ण लक्ष द्यावे.
कार्यसूचीवरील विषयांवर चर्चा संपल्यानंतर नेहरुनगर व कन्नमवार नगर येथील वसाहतींमध्ये राखून ठेवलेल्या समाज मंदिराच्या जागेच्या वितरणाचा प्रश्न श्री. अतुल हुले यांनी काढला. या जागा रिकाम्या असल्यामुळे लवकरात लवकर वितरीत केल्या नाहीत तर त्यावर अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे येण्याची शक्यता लक्षात घेऊन हे भूखंड लवकरात लवकर वितरीत करण्यात यावेत व त्यासंबंधीचा निर्णय प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत घेण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.
हा विषय पुढील बैठकीपुढे ठेवावा असे आदेश अध्यक्ष/प्राधिकरण यांनी दिले.
यानंतर अध्यक्षांनी सदस्यांचे व सदस्यांनी अध्यक्षांचे आभार मानल्यानंतर सभा समाप्त झाली.

| Item No. | 38/19 | Resolution No. | 654 |
|---|---|---|---|

विषय : परभणी येथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी बांधलेल्या ५९५ गाळ्यांच्या वाटपाच्या बाबतीत उत्पन्न मर्यादा शिथिल करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
परभणी येथील उरलेल्या गाळ्यांच्या संदर्भात उत्पन्नाची मर्यादा रुपये ५००/- वरुन रुपये १०००/- पर्यंत नेण्यात यावी व त्यानुसार गाळे वितरीत करण्यासंबंधी योग्य ती पुढील कार्यवाही करावी. राज्य परिवहन महामंडळाकडून आलेल्या प्रस्तावानुसार त्यांचे कर्मचाऱ्यांनाही गाळे देण्याबाबत कारवाई करण्यात यावी.
त्याचप्रमाणे तुळजापूर येथेही अशीच परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचप्रमाणे उत्पन्न मर्यादा शिथिल केली जावी.

| **Item No.** | **38/20** | **Resolution No.** | **645** |
|---|---|---|---|

विषय : अखिल भारतीय गृहनिर्माण विकास संस्थेच्या (ऑल इंडिया हाऊसिंग डेव्हलपमेंट असोसिएशन) निगम समासदत्वासाठी (कॉर्पोरेट मेंबरशीप) म. ग. व. क्षे. वि. प्राधिकरणाच्या समासदत्वासाठी मंजूरी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ऑल इंडिया हाऊसिंग डेव्हलपमेंट असोसिएशनचे प्राधिकरणाने निगम समासद व्हावे. या असोसिएशनवर प्रतिनिधित्व करण्यासाठी प्राधिकरणातर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा त्यांचे गैरहजेरीत त्यांनी नियुक्त केलेल्या अन्य अधिकाऱ्याला प्रतिनिधित्व करण्यासाठी प्राधिकरणाने मान्यता दिली.

| **Item No.** | **38/21** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांचा रिक्त पदे भरणे
१) चौकशी अधिकारी
२) विशेष कार्य अधिकारी

ठराव :

| **Item No.** | **38/22** | **Resolution No.** | **646** |
|---|---|---|---|

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतींतील गाळ्यांच्या विक्रीच्या संबंधात अतिरिक्त १० टक्के सुटीचा लाभ घेण्याची मुदत वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१४-९-१९८२ च्या शासकीय आदेशानुसार अतिरिक्त १० टक्के सुटीचा लाभ काही विशिष्ट इमारतींना देण्याच्या बाबतीत प्राधिकरणाने पूर्वी ठरविलेली दिनांक ३१-३-१९८२ पर्यंतची मुदत आणखी तीन महिने म्हणजे दिनांक ३०-६-१९८३ पर्यंत वाढविण्यात यावी. मूळ शासकीय आदेशानुसार हा लाभ गाळ्याची किंमत एकरकमी भरणाऱ्यालाच उपलब्ध असावा.

**Item No.** **38/23** **Resolution No.** **647**

विषय : नागपूर मंडळासाठी स्थायी वकील (स्टँडींग काउन्सेल) नेमण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. डे या वकिलांची दरमहा रुपये ६००/- या स्थायी वेतनावर स्थायी वकील म्हणून नागपूर येथे नेमणूक करण्यात यावी. या रुपये ६००/- व्यतिरिक्त त्यांना इतर कोणतीही फी दिली जाणार नाही तसेच या फीमध्ये मंडळाचे सर्व कायदेविषयक प्रश्न त्यासंबंधी कोर्टात हजर रहाणे वगैरे कामे श्री. डे यांना करावी लागतील. नागपूर येथील हायकोर्टातील प्रकरणे वगळता इतर कोर्टात व नागपूर बाहेरील इतर कोर्टातही त्यांना मंडळाचे/प्राधिकरणाच्या वतीने मुख्य अधिकारी, नागपूर मंडळ यांच्या आदेशानुसार हजर राहून काम पहावे लागेल. नागपूर बाहेरील कामे चालविण्यासाठी श्री. डे यांना वर्ग १ च्या अधिकाऱ्याला मिळणारा प्रवास व दैनिक भत्ता देण्यासही प्राधिकरणाने मान्यता दिली.

**Meeting No.** 39 **Meeting Date** 25/May/1

| **Item No.** | 39/1 | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : २२ एप्रिल १९८३ रोजी झालेल्या ३८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

| **Item No.** | 39/2 | **Resolution No.** | 664 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कर्मचारी सेवा प्रवेश नियमावलीबाबत (अभियांत्रिकी विभाग).

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर दर्शविल्याप्रमाणे चर्चेतील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये सुचविलेल्या दुरुस्त्या करण्यात येऊन त्यानुसार तयार करण्यात आलेले प्रारुप नियम शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावेत.

**Item No.** 39/3 **Resolution No.** 656

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांच्या योजनांसाठी सिमेंट खरेदीबाबत पुरवठा करणाऱ्या कंपन्यांना आगाऊ द्यावयाच्या रकमांना मान्यता देण्याविषयीचे अधिकार प्रदान करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रित दराने खरेदी करावयाच्या सिमेंटबाबत आगाऊ रकमा भरण्यास मान्यता देण्यात येते. तसेच या रकमा खाली दर्शविलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या अधिकाराच्या मर्यादेत आगाऊ देण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

| अधिकाराचे वर्णन | मंडळातील अधिकाऱ्याचे नाव | अधिकाराची मर्यादा |
| --- | --- | --- |
| नियंत्रित दराने खरेदी करावयाचे सिमेंटचे बाबतीत आगाऊ रक्कम भरण्यास मान्यता देणे. | १) मुख्य अभियंता, मुंबई मंडळ | १) पूर्ण अधिकार पण जर एकेवेळी आगाऊ भरण्याची रक्कम रुपये २० लाखापेक्षा जास्त असेल तर मान्यता देण्यापूर्वी प्राधिकरणाच्या वित्त नियंत्रकांची अनुमती घेणे आवश्यक. |
| | २) मुख्य अधिकारी, पुणे, नागपूर, औरंगाबाद व कोकण प्रादेशिक मंडळे. | २) एका तिमाही काळासाठी रु. २० लाखापर्यंत परंतु यासाठी दिलेली एकूण असमायोजित रक्कम वित्त नियंत्रकांच्या पूर्वसंमतीशिवाय एकावेळी रुपये ४० लाखापेक्षा जास्त असू नये. |

**Item No.** 39/4 **Resolution No.** 657

विषय : ठेकेदाराकडून प्रारंभीची ५० टक्के प्रतिभूती ठेव (सिक्युरिटी डिपॉझिट) बँक हमी बंधपत्राच्या स्वरूपात स्विकारणेसंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयसूचीत दर्शविल्याप्रमाणे हमी बंधपत्राचा सुधारित नमुना वापरण्यास तसेच बंधपत्राच्या रकमेची मागणी मिळविण्याचे अधिकार मुख्य अधिकारी, विभागीय मंडळ यांना देण्याच्या कृतीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. त्याचप्रमाणे बंधपत्रांच्या रकमेची मागणी करण्याच्या प्रकरणासंबंधीचा अहवाल प्राधिकरणासमोर ठेवण्यात यावा.

| Item No. | 39/5 | Resolution No. | 658 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकरणाच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील निरनिराळ्या प्रकल्पांना उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी त्या प्रशासकीय मंजुऱ्या दिल्या त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येते.
ब) मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील निरनिराळ्या गृहनिर्माण प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याचे पूर्ण अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येतात व त्यानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (संविदा अंमलबजावणी) १९८१ च्या विनियमांत चुकीची दुरुस्ती करण्यात यावी.

| Item No. | 39/6 | Resolution No. | 659 |
|---|---|---|---|

विषय : उपदान प्रदान करण्यासाठी सक्षम अधिकारी

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या प्रपत्र अ नुसार उपदान प्रदान करण्यासाठी जे सक्षम अधिकारी दाखविण्यात आले आहेत त्यांना उपदान मंजूर करण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात यावेत.

| Item No. | 39/7 | Resolution No. | 660 |
|---|---|---|---|

विषय : श्री. बी. टी. देव यांची लेखापाल म्हणून नागपूर मंडळातील पुनर्नेमणूक पुढे चालू ठेवण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. बी. टी. देव, लेखापाल यांची मुदत दिनांक ३१-३-१९८५ पर्यंत वाढविण्यात यावी.

| Item No. | 39/8 | Resolution No. | 661 |
|---|---|---|---|

विषय : अल्पोपहाराकरिता होणाऱ्या खर्चासाठी कमाल मर्यादा निश्चित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयसूचीत दर्शविण्यात आलेल्या जोडपत्र अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे खर्चाचे अधिकार संबंधित अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात यावेत. त्याचप्रमाणे जोडपत्रात दर्शविण्यात आलेल्या अनुक्रमांक ४ मध्ये मुख्य अभियंता/प्राधिकरण व मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांची व अनुक्रमांक ५ मध्ये नोंद मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांच्या नावांची एकाच क्रमांक ३ नोंद करण्यात येऊन त्यानुसार अधिकार प्रदान करण्यात यावेत.

| Item No. | 39/9 | Resolution No. | 662 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरण व विभागीय मंडळांमधील कर्मचाऱ्यांचा क्रीडा महोत्सव.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) १९ मे १९८३ ते २१ मे १९८३ या कालावधीत खेळात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या कर्मचाऱ्यांना तीन दिवस विशेष किरकोळ रजेची सवलत देण्यासंबंधीच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यात येते.
ब) यापुढे अशा तऱ्हेच्या आंतरमंडळ क्रीडा स्पर्धा झाल्यास जास्तीत जास्त तीन दिवस विशेष किरकोळ रजेची सवलत देण्यात यावी व त्याचे अधिकार उपाध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वापरावेत.

| Item No. | 39/10 | Resolution No. | 663 |
|---|---|---|---|

विषय : अस्थायी कार्यकारी आस्थापनेवरील अर्हताप्राप्त मिस्त्री व कारकून यांना कनिष्ठ लिपिक या पदावर सामावून घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मिस्त्री व कारकून या नावाने ओळखल्या जाणाऱ्या व नियमित अस्थायी कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना तसेच भूतपूर्व घरदुरुस्ती मंडळातील कनिष्ठ लिपिक या नामाभिधानाने ओळखल्या जाणाऱ्या कार्यव्ययी आस्थापनेवरील व नागपूर मंडळातील टाईपकिपर या नामाभिधानाने काम करणाऱ्या व्यक्तींना चाचणी घेऊन कनिष्ठ लिपिक या पदावर सामावून घेण्यात यावे. वयाची अट शिथिल करून व शासनाच्या दिनांक ७-१-१९८३ च्या आदेशांतील इतर अटी पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची चाचणी घेऊन पुढील कारवाई करण्यात यावी.

**Item No.** 39/11 **Resolution No.** 666

विषय : भाडेखरेदी पद्धतीने किंवा एकरकमी खरेदी पद्धतीने गाळे खरेदी केलेल्या गाळेधारकांनी गाळ्यांची पुन्हा विक्री करण्यास मनाई करणारी अट घालण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भाडेखरेदी पद्धतीने किंवा एकरकमी खरेदी पद्धतीने गाळे खरेदी केलेल्या गाळेधारकांनी इमारत, सहकारी संस्थेला विक्री केल्यावर त्या गाळ्यांची १० वर्षांपर्यंत विक्री करण्यास मनाई करण्यासाठी टाकलेली अट काढून टाकण्यात यावी.
इमारतीची मालकी सहकारी संस्थांना हस्तांतरीत केल्यानंतर १० वर्षांपर्यंत गाळा प्राधिकरणाच्या/मंडळाच्या परवानगीशिवाय विकता येणार नाही अशा तऱ्हेची अट ४-५-१९७९ च्या शासकीय निर्णयात घालण्यात आली. त्याचप्रमाणे अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट यांच्यासाठी बांधलेल्या गाळ्यांच्या विक्रीवरही अशा तऱ्हेचे निर्बंध टाकणारी अट शासनाच्या दिनांक १४-२-१९७५ च्या निर्णयात नमूद केली आहे. ही अट कायदेशीरदृष्ट्या बरोबर नाही असे मत विधी सल्लागारांनी व्यक्त केले होते. मात्र अशी अट जमिनीच्या भाडेपट्ट्यांत नमूद करता येईल असे मत त्यांनी व्यक्त केल्यावर व व्यवहारात अशा अटी पाळल्या जातात किंवा नाही हे पहाणे अत्यंत कठीण असल्याने प्राधिकरणाने या प्रकरणातील निर्णय जाणीवपूर्वक घेतला अशा तऱ्हेची नोंद निर्णयात केली जावी असे मत श्री. गोकाक यांनी व्यक्त केले. यावर चर्चा करताना श्री. तिणईकर, सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासनाने निर्णयात अशा तऱ्हेची अट टाकली असेल तर ती अट काढून टाकण्याची कार्यवाही शासनालाच करावी लागेल असे म्हटले. शासन निर्णयातील अट प्राधिकरण काढून टाकू शकत नाही असे मत व्यक्त करुन जास्तीत जास्त शासनाला तशा तऱ्हेची विनंती करणारा ठराव पाठविण्यात यावा असे मत त्यांनी व्यक्त केले व ते प्राधिकरणाने मान्य केले. त्यानुसार ठराव क्रमांक : ६६६ मध्ये
"अशा तऱ्हेची विनंती शासनाला करण्यात यावी" हे शब्द ठरावाचे शेवटी वाढविण्यात आले.

**Item No.** 39/12 **Resolution No.** 667

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

अ) दिनांक १६-१२-१९८१ तसेच २ नोव्हेंबर १९८२ रोजी अनधिकृत हस्तांतरणे अधिकृत करण्यासंबंधी शासनाने जे आदेश दिले ते ३१-१२-१९८१ पूर्वी वाटप झालेल्या गाळ्यांच्या बाबतीत वापरण्यात यावेत.

ब) १९८१ च्या मिळकत व्यवस्थापन नियमातील विनियम २५ मध्ये सुधारणा करताना हस्तांतरणाच्यावेळी पात्रतेची जी अट टाकण्यात आली आहे ती खाली नमूद केलेल्या अटींना अधिन राहून वगळण्यात यावी.

१) आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट व अल्प उत्पन्न गट यातील गाळे दिल्याच्या तारखेपासून पाच वर्षांतर्यंत हस्तांतर करता येणार नाहीत.

२) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट हे पात्रतेच्या दृष्टीने एका गटातील समजले जावेत व उच्च उत्पन्न गट हा एक वेगळा गट समजण्यात यावा. उच्च उत्पन्न गटातील गाळा हस्तांतर करताना ज्या व्यक्तीला तो हस्तांतर करावयाचा आहे ती त्या उत्पन्न गटातील असली पाहिजे. तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट, अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट यातील गाळे हस्तांतर करताना या तीनही उत्पन्न गटातील कोणत्याही उत्पन्न गटाच्या व्यक्तीला गाळा हस्तांतर करता यावा.

क) २१-१-१९८३ च्या बैठकीतील ठराव क्रमांक ६२९ नुसार गाळ्यांच्या हस्तांतरणाच्यावेळी अधिमूल्य आकारण्यात यावे.

ड) औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांना ५-४-१९७९ च्या शासकीय धोरणाद्वारे जे गाळे विक्री योजनेखाली आले आहेत व ज्यामध्ये पुन्हा एकवार अनधिकृत हस्तांतरण झाले आहे त्या ठिकाणी गाळ्यांच्या मूळ किंमतीच्या ५० टक्के दंड आकारून अशी अनधिकृत हस्तांतरणे नियमित करण्यात यावीत. मात्र गाळ्यांची किंमत एकरकमी भरण्याची अटही त्यांचेबाबतीत टाकण्यात यावी.

**Item No.** 39/13 **Resolution No.** 668

विषय : वसाहतींच्या आराखड्यात निरनिराळ्या उपयोगांसाठी राखून ठेवलेल्या भूखंडांचे वाटप करण्याचे अधिकार प्रादेशिक मंडळांना प्रदान करणे व त्यासाठी मार्गदर्शक सूचना देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

अ) बाब टिप्पणीसोबत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये वर चर्चेत आल्याप्रमाणे फेरफार करून या सूचनांनुसार अनिवासी भूखंडांचे वाटप करण्यासाठी मंडळांना अधिकार प्रदान करण्यात यावेत.

ब) दर तीन महिन्यांनी मंडळाने वाटप केलेल्या भूखंडांसंबंधीची माहिती प्राधिकरणासमोर ठेवण्यात यावी.

क) ९ नागरी संकुलन क्षेत्रातील व्यापारी उपयोगाच्या भूखंडांच्या वाटपासंबंधी चर्चेत आल्याप्रमाणे सिनेमा थिएटरसाठी तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना शासनाने लागू कराव्यात असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**Item No. 39/14 Resolution No. 669**

विषय : शैक्षणिक/सांस्कृतिक संस्थांना प्राधिकरणाने दिलेल्या त्यांच्या इमारतीत बँकांना जागा देण्यास परवानगी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शैक्षणिक अथवा सामाजिक संस्थांना देण्यात आलेल्या भूखंडांचा उपयोग त्याच कार्यासाठी व्हावयास पाहिजे. त्यांचा व्यापारी उपयोगासाठी वापर करण्याची परवानगी संबंधित संस्थांना देण्यात येऊ नये.

---

**Item No. 39/15 Resolution No. 670**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि अदलाबदल विनियम) १९८१ - गाळे काळजीवाहू तत्त्वावर देण्यासाठी आकारवयाची फी ठरविण्याबाबत.

ठराव : ६७०
एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविण्यात आल्याप्रमाणे काळजीवाहू म्हणून परवानगी देताना खालीलप्रमाणे फी आकारावी.

अ) भाडे पद्धतीवर / भाडेखरेदी दिलेले गाळे.

| | |
|---|---|
| १) पहिली दोन वर्षे | आर्थिक भाडे किंवा भाडेखरेदी हप्त्याच्या २५ टक्के एवढी |
| २) दोन वर्षांपेक्षा जास्त व पाच वर्षांपर्यंत | आर्थिक भाडे किंवा भाडेखरेदी हप्त्याच्या ५० टक्के एवढी |
| ३) ५ वर्षांपेक्षा जास्त | आर्थिक भाडे किंवा भाडेखरेदी हप्त्याएवढी |

तसेच
ज्या ठिकाणी गाळ्यांची संपूर्ण किंमत भरण्यात आली आहे परंतु गाळ्यांचे खरेदीखत करून देण्यात आले नाही त्या ठिकाणी खालील दराने फी आकारण्यात यावी.

| | |
|---|---|
| अ) औद्योगिक कामगार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेले गाळे. | रु. १,०००/- |
| ब) अल्प उत्पन्न गट | रु. १,५००/- |
| क) मध्यम उत्पन्न गट | रु. २,०००/- |
| ड) उच्च उत्पन्न गट | रु. २,५००/- |

हे दर ५ वर्षांपर्यंतच्या मुदतीसाठी असावेत. त्यापेक्षा जास्त मुदतीसाठी परवानगी मागितली गेल्यास त्याच्या दुप्पट दराने फी आकारण्यात यावी.

| Item No. | 39/16 | Resolution No. | 671 |
|---|---|---|---|

विषय : मुंबई मंडळाच्या वसाहतीतील मकाशात करमणूक/उद्याने यासाठी मोकळे ठेवलेले भूखंड सहकारी गृहनिर्माण संस्थांकडे हस्तांतरण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविण्यात आलेल्या प्रस्तावानुसार पाच हजार चौरस वारापेक्षा कमी आकाराचे भूखंड संबंधित वसाहतीतील गाळेधारकांच्या संस्थांनी वापरासाठी मागितल्यास ते त्यांचेकडे देखमालीसाठी वर्ग करण्यात यावेत. विनियमांतील तसेच बाब टिप्पणीतील अटींच्या आधिन राहून हे भूखंड देण्यात यावेत.

| Item No. | 39/17 | Resolution No. | 672 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कर्मचारी सेवा प्रवेश नियमावलीबाबत. (विधी विभाग)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर चर्चेत आल्याप्रमाणे नियमामध्ये दुरुस्ती करुन हे प्रारुप नियम शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात यावेत.

| Item No. | 39/18 | Resolution No. | 673 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या जमिनीवरील गलिच्छ वस्त्यांची श्रेणीवाढ/पुनर्विकास.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीतील पृष्ठ क्रमांक १८/८ व १८/९ वरील प्रस्ताव क्रमांक १ ते ८ वर दर्शविलेल्या दुरुस्त्यांसह मान्य करण्यात येतात. त्याचप्रमाणे प्रस्ताव क्रमांक (२) मधील भाडेपट्टीची ९० वर्षांची मुदत ३० वर्षांवर आणावी व त्यानुसार इतर योग्य ते बदल करण्यात यावेत.
व
गलिच्छ वस्त्यांची श्रेणीवाढ व पुनर्विकास योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी अटी, शर्ती, भाडेपट्ट्याच्या आकारनाम्याचा नमुना वगैरे प्रशासकीय तपशील ठरविण्याचे अधिकार उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात यावेत.

**Item No.** 39/19 **Resolution No.** 674

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम, १९८१ मध्ये सुधारणा करणे (सोडत काढण्याबाबत).

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वरील दर्शविण्यात आलेल्या पद्धतीनुसार सोडत काढणे व अर्जदारांची पात्रता ठरविणे यासंबंधी १९८१ च्या विनियमांत योग्य तो बदल करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.
यानंतर अनौपचारिक चर्चा करताना सचिव/प्राधिकरण यांनी सांगितले की, ज्या जमिनी भाडेपट्ट्यांवर दिल्या जातात त्यांच्या दोन वर्षांच्या भाडेपट्ट्यांच्या रकमेएवढी रक्कम कायम अनामत ठेव म्हणून घेण्याची पद्धत आहे. समता नगर रहिवासी शिक्षण संस्था, पोईसर यांनाही अशाच तऱ्हेने अनामत रक्कम ठेवण्यास सांगण्यात आली असल्याचे सचिव/प्राधिकरण यांनी नजरेस आणले. मात्र या संस्थेने एवढी मोठी रक्कम एकाच वेळी भरण्यास असमर्थता दर्शविली व काही सवलत मिळाली अशी मागणी केलेली आहे. सचिव/प्राधिकरण यांनी असे सुचविले की, पहिल्या वर्षी एका वर्षाच्या भाड्याएवढी अनामत रक्कम व पुढील वर्षी तशीच एक वर्षाची अनामत रक्कम घेण्यात यावी व अशा तऱ्हेने दोन वर्षांच्या अनामत रकमेची पूर्तता करून घ्यावी.
क) ठराव क्रमांक : ६७४ नंतर नोंदविण्यात आलेल्या अनौपचारिक चर्चेसंबंधी श्री. हुले यांनी आक्षेप घेतला होता व सचिव/प्राधिकरण हे प्राधिकरणाचे सदस्य नसल्याने त्यांना चर्चेत भाग घेता येणार नाही व त्यांनी व्यक्त केलेली मते वृत्तांतात घेता येणार नाही असे म्हटले होते.
यावर खुलासा करताना श्री. अ. वि. गोकाक यांनी आपण त्यावेळ उपाध्यक्ष/प्राधिकरण होतो व काही महत्त्वाच्या कामामुळे आपल्याला बैठकीच्या शेवटी शेवटी हजर रहाता आले नाही व त्यामुळे सचिव/प्राधिकरण यांनी केलेली सूचना त्यांना स्वतःलाच करावयाची होती पण वेळेच्या अभावी ते ती करू न शकल्याने सचिव/प्राधिकरण यांच्यावर ती जबाबदारी टाकली होती असा खुलासा केला. तेव्हा कार्यवृत्तांत ही सूचना "उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या सूचनेवरून सचिव/प्राधिकरण यांनी केली" अशी दुरुस्ती करण्यात यावी असे सुचविले व प्राधिकरणाने ती सूचना मान्य केली.
प्राधिकरणाने या सूचनेस तत्त्वतः मान्यता दिली व त्याप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश दिले.
यानंतर उपस्थित सदस्यांनी अध्यक्षांचे व अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Item No.** 39/20 **Resolution No.** 665

विषय : सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनीच्या भूसंपादनाविषयीचे धोरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

ज्या सहकारी संस्थांची नोंदणी होऊन त्यांच्या जमीन खरेदीचा व्यवहार नोंदणीकृत खरेदीखताने प्राधिकरणातर्फे होणाऱ्या भू-संपादनाबाबत शासनाची अधिसूचना निघण्याच्या तारखेपूर्वी पूर्ण झाला असेल त्याचप्रमाणे ज्या नोंदणीकृत सहकारी संस्थांची जमीन खरेदीबाबतची साठेखते अशा अधिसूचनेच्या तारखेपूर्वी झाली असतील व अशा संस्थेने खरेदीपोटी द्यावयाची बयाना रक्कम चेकने अगर अन्य रीतीने अधिसूचनेच्या तारखेपूर्वीच दिल्याचे सिद्ध केल्यास अशा जमिनी भू-संपादनातून वगळण्यात याव्यात. असेच किमान पाच एकर जमीन एका ठिकाणी मिळत असेल तरच भू-संपादनाची कार्यवाही करावी.

या विषयाची चर्चा करताना ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांनी जमीन ताब्यात आल्यापासून ५ वर्षांपर्यंत गृहनिर्माणासंबंधी काहीच कार्यवाही केली नाही अशा संस्थांना भू-संपादनाच्या कार्यवाहीत कोणत्याही तऱ्हेची सवलत देण्याची गरज नाही अशा तऱ्हेची चर्चा झाली होती. त्या चर्चेचा वृत्तांतात उल्लेख नाही असे श्री. गोकाक यांनी सांगितले. त्याचप्रमाणे ज्या संस्थांची जमीन संपादन करावयाच्या क्षेत्राच्यामध्ये येत असल्यामुळे प्राधिकरण्याच्या एकत्रित विकास आराखड्याला बाधा येत असेल अशा संस्थांना त्यांच्या जमिनीच्या ऐवजी प्राधिकरणाच्या विकास आराखड्यात एका बाजूला जागा देण्यात यावी. याही झालेल्या चर्चेचा उल्लेख नसल्याचे श्री. गोकाक यांनी नजरेस आणले.

यावर चर्चा करताना प्राधिकरणाने असे मत व्यक्त केले की, गृहनिर्माण संस्था जरी स्थापन झाल्या तरी त्यांच्या ताब्यात जमीन आल्यापासून ते पुढे भू-संपादनाची कलम ४१ खाली पहिली नोटीस निघण्यापूर्वीचा काळ हा ५ वर्षांपेक्षा जास्त झाला असेल तर अशा संस्थांना सवलत देण्यात येऊ नये, कारण गृहनिर्माणाचे कार्य करण्याची संस्थेची प्रामाणिक इच्छा असल्यास अशा ५ वर्षांच्या काळात संस्थेकडून काही ठोस पावले उचलली गेली आहेत असे दिसले पाहिजे तसे न झाल्यास या संस्थांनी गृहनिर्माणाच्या कार्यात म्हणावा तसा रस घेतलेला नाही हे लक्षात घेऊन अशी सवलत देण्याची आवश्यकता राहणार नाही.

काही संस्थांच्या जागा प्राधिकरणाच्या भू-संपादनाच्या मधोमध आल्यामुळे प्राधिकरणाने अशा संस्थांना एका बाजूला जरी जागा देऊ केली तरी त्या संस्था ती स्वीकारतीलच असे नाही असे मत व्यक्त करण्यात आले. संस्थांची जी जागा असेल ती जागा स्थानदृष्ट्या (लोकेशन) कितपत महत्त्वाची आहे यावरच सदर संस्था प्राधिकरणाला वाटते. तेव्हा याबाबत धोरण म्हणून काही ठरविणे शक्य नाही असे मत व्यक्त करून असे प्रश्न केवळ तडजोडीनेच मिटवावे लागतील असे मत प्राधिकरणाने व्यक्त केले व अशी परिस्थिती असल्यास तडजोड करण्यात यावी असा विचार मांडला.

या विषयाच्या चर्चेनंतर श्री. तिनईकर व श्रीमती काझी हे अध्यक्षांच्या परवानगीने सभागृहातून गेले.

**Item No.** **39/24** **Resolution No.**

विषय : जमाते-ऐ-जम्हुरीया वांद्रा पश्चिम लगतची जागा ॲवझॅक फाऊंडेशन यांना नियोजित वेल्फेअर सेंटर, शशाळा, दवाखाने व सहकारी गृहनिर्माणासाठी देण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** 40 **Meeting Date** 08/Jul/19

**Item No.** 40/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २५-५-८३ रोजी झालेल्या ३९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 40/2 **Resolution No.** 675

विषय : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी त्यांची मौजे पाचपाखाडी, ठाणे येथील सर्व्हे नंतर १५४, १५५, १५७, ते १५४, १५७ येथील महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला देऊ केलेली जमीन.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मौजे पाचपाखाडी येथील सर्व्हे नंतर १५४, १५५, १५७ ते १५४, १५७ मधील महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला देऊ केलेली जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून हस्तांतरीक करून घ्यावी व त्यामध्ये महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दर्शविलेल्या अटींमध्ये वर चर्चेत आल्याप्रमाणे सुधारणा करवून घेण्याची कार्यवाही व्हावी.

---

**Item No.** 40/3 **Resolution No.**

विषय : नेहरूनगर येथील समाजमंदिराच्या भूखंडाचे वितरणाबाबत.

ठराव :

---

**Item No.** 40/6 **Resolution No.** 676

विषय : मुंबई मंडळाच्या निरनिराळ्या वसाहतींतील इमारतींच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी लागणाऱ्या खर्चासाठी निधी उपलब्ध करून देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
तातडीच्या दुरुस्तीसाठी औद्योगिक अर्थसहाय्यित गृहनिर्माण व अल्पल्प उत्पन्न गटातील गाळ्यांच्या विक्री योजनेतून दंडापोटी आलेल्या रकमेपैकी रु. २० लाख तातडीच्या व न टाळता येणाऱ्या दुरुस्तीवर खर्च करण्याच्या केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 40/8 **Resolution No.** 677

विषय : मालेगाव येथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटाकरिता बांधावयाच्या तसेच सांगली येथील अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण - ब) योजनेसाठी हुडकोकडून कर्ज उभे करण्यासाठी अनुमती व अधिकृती मिळविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
*विषय सूचीतील जोडपत्र (अ) मध्ये दर्शविलेल्या मालेगाव व सांगली येथील गृहनिर्माण योजनेखाली हुडकोकडून रु. ७३.३५ लक्ष कर्ज उभे करण्यासाठी अनुमती व अधिकृती देण्यात येते.*

---

**Item No.** 40/10 **Resolution No.** 678

विषय : अल्पकालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) विषयसूचीत दर्शविलेल्या :
१) श्री. शामसुंदर सदाशिव मापारे
२) श्री. आर. टी. बने
३) श्रीमती डी. जे. दिघे
४) श्रीमती एस्. एन्. सावे
या कर्मचाऱ्यांच्या अल्पकालावधीसाठी करण्यात आलेल्या नेमणूका नियमित करून त्यांची सेवा नियमित करण्यात यावी.
ब) तसेच अशी आणखी प्रकरणे आल्यास ही प्रकरणे वैयक्तिक गुणावगुण पाहून नियमित करण्यासंबंधीचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येतात.

---

**Item No.** 40/11 **Resolution No.** 679

विषय : श्री. यू. डी. पै, सक्षम अधिकारी यांना अतिरिक्त वेतन मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) श्री. यू. डी. पै, सक्षम अधिकारी यांना दिनांक १-१०-१९८२ नंतर सक्षम अधिकारी (२) या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी अतिरिक्त वेतन मंजूर करण्याच्या केलेल्या कार्यवाहीला कार्योत्तर मान्यता देण्यात येते.
ब) तसेच यापुढे अशी प्रकरणे आल्यास त्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येतात.

---

| Item No. | 40/12 | Resolution No. | 680 |
|---|---|---|---|

विषय : कार्यव्ययी अस्थापनेवरील पाच वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना हंगामी नियत आस्थापनेवर घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविलेल्या ५ कर्मचाऱ्यांना कार्यव्ययी आस्थापनेवरून हंगामी नियत आस्थापनेवर घेण्याबाबतच्या प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक : ५८४च्या निर्णयाप्रमाणे फायदा देण्यात यावा व दिनांक १-१०-१९८१ पासून हंगामी नियत आस्थापनेवर घेण्यात यावे.

| Item No. | 40/14 | Resolution No. | 681 |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँकेकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यामधून पार पाडावयाच्या योजना सहमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जागतिक बँकेकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून पार पाडावयाच्या योजनांसाठी प्राधिकरणाच्या आस्थापनेवर सहमुख्य कार्यकारी अधिकारी (जागतिक बँकेचा प्रकल्प) हे पद निर्माण करण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

| Item No. | 40/16 | Resolution No. | 682 |
|---|---|---|---|

विषय : कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर जादा पदे मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीतील जोडलेल्या तक्त्तील रकाना क्रमांक : ४ मधील दर्शविलेल्या पुढील जादा पदे मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) उपअभियंता | - | १ |
| २) कनिष्ठ अभियंता | - | ११ |
| ३) नियोजन सहाय्यक | - | १ |
| ४) प्रथम लिपिक | - | १ |
| ५) लेखापाल | - | १ |
| ५) वरिष्ठ लिपिक | - | ३ |
| ७) लिपिक तथा टंकलेखन | - | ८ |
| एकूण | | २६ |

| Item No. | 40/17 | Resolution No. | 683 |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पार पाडावयाच्या योजना. विविध पदे मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविलेली निरनिराळी १८९ पदे प्राधिकरण्याच्या आस्थापनेवर निर्माण करण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या कृतीला कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

| Item No. | 40/18 | Resolution No. | 684 |
|---|---|---|---|

विषय : खातेनिहाय चौकशी प्रकरणांमध्ये उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना अपिले चालविण्यासाठी अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) ज्या ठिकाणी खातेनिहाय चौकशीमध्ये वर्ग २,३ व ४ च्या अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास मॉवनर शिक्षा देण्यात आली असेल अशा प्रकरणांबाबत दाखल करण्यात आलेल्या अपिलांबाबत निर्णय घेण्यासाठी पुढीलप्रमाणे शक्ती प्रदान करण्यात येतात.
क) मूळ चौकशीमध्ये मुख्य अधिकारी, प्रादेशिक गृहनिर्माण मंडळे यांनी अशा शिक्षेचे आदेश दिले असल्यास त्या बाबतचे अपिल दाखल करून ते ऐकण्याच्या व त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार प्राधिकरणाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समितीला देण्यात येतात.
ख) मंडळाच्या अखत्यारीतील इतर अधिकाऱ्यांनी खातेनिहाय चौकशीमध्ये वर्ग २,३ व ४ च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मॉवनर शिक्षा देण्याचे आदेश दिले त्याविरुद्ध अपिल दाखल करून घेणे, ते चालविणे तसेच त्याबाबत निर्णय देणे हे अधिकार प्रादेशिक मंडळांच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या प्रदान करण्यात येतात.
२) वर्ग २, ३ व ४ चे अधिकारी/कर्मचारी यांना खातेनिहाय चौकशीमध्ये मेजर शिक्षा देण्यात आली असल्यास त्याविरुद्ध अपिल दाखल करून घेणे, ते चालविणे व त्याबाबत निर्णय देणे याबाबतचे अधिकार अध्यक्ष/प्राधिकरण तथा उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या उपसमितीस देण्यात येतात. उपसमितीच्या सदस्यांचे शिक्षेबाबत एकमत न झाल्यास अशी प्रकरणे प्राधिकरणापुढे निर्णयासाठी ठेवण्यात यावीत.
३) प्राधिकरणासमोर सध्या प्रलंबित असलेली अपिले वर दर्शविल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा अध्यक्ष/प्राधिकरण तथा उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या उपसमितीने निकाली काढावीत.

| Item No. | 40/21 | Resolution No. | 685 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंत्याचे एक अधिसंख्य (सुपरन्युमररी) पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंत्याचे एक अधिसंख्य पद निर्माण करण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या कार्यवाहास कार्योत्तर मंजूरी देण्यात येते.

| Item No. | 40/23 | Resolution No. | 686 |
|---|---|---|---|

विषय : कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकरिता एक नवीन जीपची खरेदी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कोकण मंडळासाठी एक जीप खरेदी करण्याच्या कृतीस कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

| Item No. | 40/25 | Resolution No. | 687 |
|---|---|---|---|

विषय : हुडको अर्थसहाय्याने येवला येथे मध्यम उत्पन्न गट (१) गृहनिर्माण योजनांतर्गत ५९ गाळे बांधणे - कर्जास तारण म्हणून मालमत्ता हुडकोकडे गहाण ठेवण्यास अधिकृती देणारा ठराव हुडकोच्या विहित नमुन्यात मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीसोबत जोडण्यात आलेल्या सहपत्रानुसार ठराव मंजूर करण्यात येत आहे.

| Item No. | 40/26 | Resolution No. | 688 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोशी कर्जाचे करारपत्र व गहाणखत करण्यासाठी वित्त नियंत्रक/कार्यकारी अभियंता यांना अधिकृती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे वित्त नियंत्रक, कार्यकारी अभियंता (हुडको सेल) व कार्यकारी अभियंता (प्रोग्रॅम को-ऑरडिनेशन सेल) यांना या ठरावान्वये हुडकोशी करावयाच्या कर्जाच्या करारपत्रांवर आणि गहाणखतांवर प्राधिकरण्यातर्फे सह्या करण्याचे तसेच या दस्तऐवजांवर प्राधिकरणाची मोहोर लावण्याचे अधिकार पृथकपणे देण्यात येतात.
तसेच या अधिकाऱ्यांपैकी कोणीही उपलब्ध नसल्यास उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास हुडकोशी करावयाच्या अशा करारपत्रावर व गहाणखतावर प्राधिकरणातर्फे सह्या करण्याचे तसेच या दस्तऐवजावर प्राधिकरणाची मोहोर लावण्याचे अधिकार पृथकपणे देण्यात येतात.
प्राधिकरणाच्या या बैठकीत सर्व विषयांवर चर्चा पूर्ण होऊ न शकल्याने उरलेल्या विषयोवर चर्चा करण्यासाठी प्राधिकरणाची बैठक दिनांक १५-७-१९८३ रोजी सकाळी १०.०० वाजता भरविण्यात येईल असे अध्यक्षांनी सर्व सदस्यांच्या संमतीने जाहीर केले.
श्री. अ. चि. गोकाक हे डिसेंबर १९८० पासून प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, प्रशासक व नंतर पुन्हा उपाध्यक्ष म्हणून काम पहात होते. त्यांची बदली दिल्ली येथे कंट्रोलर ऑफ सिमेंट या पदावर झाली आहे व ते तेथे ३० जुलै १९८३ रोजी रुजू होणार आहेत. प्राधिकरणाच्या बैठकीत त्यांना ते रजेवर असल्याने खास निमंत्रित म्हणून बोलाविण्यात आले होते. श्री. गोकाक यांनी उपाध्यक्ष या नात्याने तसेच प्रशासक या नात्याने बहुमोल सहाय्य केल्याचे सांगून व त्यांच्या मार्गदर्शकाचा लाभ प्राधिकरणाला नेहमी असाच होत राहील अशी आशा अध्यक्ष/प्राधिकरण यांनी व्यक्त केली व श्री. गोकाक यांस पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. श्री. गोकाक यांनी अध्यक्ष, प्राधिकरणाचे सदस्य तसेच प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे त्यांना दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.
यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Item No. 40/26 Resolution No. 688**

विषय : हुडकोशी कर्जाचे करारपत्र व गहाणखत करण्यासाठी वित्त नियंत्रक/कार्यकारी अभियंता यांना अधिकृती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे वित्त नियंत्रक, कार्यकारी अभियंता (हुडको सेल) व कार्यकारी अभियंता (प्रोग्रॅम को-ऑरडिनेशन सेल) यांना या ठरावान्वये हुडकोशी करावयाच्या कर्जाच्या करारपत्रांवर आणि गहाणखतांवर प्राधिकरण्यातर्फे सह्या करण्याचे तसेच या दस्तऐवजांवर प्राधिकरणाची मोहोर लावण्याचे अधिकार पृथकपणे देण्यात येतात.
तसेच या अधिकाऱ्यांपैकी कोणीही उपलब्ध नसल्यास उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास हुडकोशी करावयाच्या अशा करारपत्रावर व गहाणखतावर प्राधिकरणातर्फे सह्या करण्याचे तसेच या दस्तऐवजावर प्राधिकरणाची मोहोर लावण्याचे अधिकार पृथकपणे देण्यात येतात.
प्राधिकरणाच्या या बैठकीत सर्व विषयांवर चर्चा पूर्ण होऊ न शकल्याने उरलेल्या विषयोवर चर्चा करण्यासाठी प्राधिकरणाची बैठक दिनांक १५-७-१९८३ रोजी सकाळी १०.०० वाजता भरविण्यात येईल असे अध्यक्षांनी सर्व सदस्यांच्या संमतीने जाहीर केले.
श्री. अ. चि. गोकाक हे डिसेंबर १९८० पासून प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, प्रशासक व नंतर पुन्हा उपाध्यक्ष म्हणून काम पहात होते. त्यांची बदली दिल्ली येथे कंट्रोलर ऑफ सिमेंट या पदावर झाली आहे व ते तेथे ३० जुलै १९८३ रोजी रुजू होणार आहेत. प्राधिकरणाच्या बैठकीत त्यांना ते रजेवर असल्याने खास निमंत्रित म्हणून बोलाविण्यात आले होते. श्री. गोकाक यांनी उपाध्यक्ष या नात्याने तसेच प्रशासक या नात्याने बहुमोल सहाय्य केल्याचे सांगून व त्यांच्या मार्गदर्शकाचा लाभ प्राधिकरणाला नेहमी असाच होत राहील अशी आशा अध्यक्ष/प्राधिकरण यांनी व्यक्त केली व श्री. गोकाक यांस पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. श्री. गोकाक यांनी अध्यक्ष, प्राधिकरणाचे सदस्य तसेच प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे त्यांना दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.
यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.** 40 stay **Meeting Date** 15/Jul/19

**Item No.** 40/4 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास राजे रघुजीनगर, नागपूर येथे अधिक जागा देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 40/5 **Resolution No.**

विषय : श्री. भिडे यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 40/7 **Resolution No.**

विषय : निविदा स्वीकृतीबाबत, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने केलेल्या सूचनेवर विचार करणे.

ठराव :

**Item No.** 40/9 **Resolution No.** 689

विषय : संकटाच्या वेळी प्राधिकरणातील एखाद्या कर्मचाऱ्याला वैद्यकीय मदत करण्यात आल्यास ती परतफेड करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविण्यात आल्याप्रमाणे संकटाच्या वेळी प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय मदत मिळण्यासंबंधी परतफेड करण्याबाबत उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी दिनांक १०-२-१९८३ रोजी काढलेल्या आदेशांना व त्या आदेशांतील विविध अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्याबाबतच्या आदेशांना कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**Item No.** 40/13 **Resolution No.**

विषय : भाडेवसुलीकार या संवर्गाकरिता रजा राखीव पदे निर्माण करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 40/15 **Resolution No.**

विषय : छिद्रांक टंकक (पंच ऑपरेटर) यांना विशेष वेतन देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 40/19 **Resolution No.**

विषय : इस्लामपूर येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेल्या ५० गाळ्यांच्या वाटपाबाबत.

ठराव :

**Item No.** 40/20 **Resolution No.**

विषय : बोरिवली (पूर्व) येथे एल. पी. जी. गॅस सिलिंडर्स ठेवण्यासाठी कोठार बांधण्यासाठी भूखंड देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 40/22 **Resolution No.**

विषय : माहिम मच्छीमार येथील वसाहतींमध्ये गॅस सिलिंडरचा साठा करण्यासाठी भारत पेट्रोलियम यांना भूखंड देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 40/24 **Resolution No.** 690

विषय : बांद्रा पुन:निर्माण क्षेत्रात बांधावयाच्या
१) २२४ उच्च उत्पन्न गट योजनांतर्गत गाळे व
२) ८४ उच्च उत्पन्न गट योजनांतर्गत गाळे (११२ गाळ्यांपैकी) यांच्या कामासाठी मेसर्स बी. जी. शिर्के ॲण्ड कंपनी यांनी शिर्के सिपोरेक्स कॅसोर्टियम यांच्या वतीने दिलेली ठोस रक्कम (लम्पसम) निविदा स्वीकारणेबाबत विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
या विषयावर अधिक खोलवर विचार करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपसमिती नेमण्यात येत आहे. त्या उपसमितीने या विषयाबाबत विचार करून आपल्या शिफारशी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीसमोर ठेवाव्यात. उपसमितीचे सदस्य खालीलप्रमाणे आहेत.
१) अध्यक्ष/प्राधिकरण
२) उपाध्यक्ष/प्राधिकरण
३) श्री. अतुल हुले, सदस्य/प्राधिकरण
या समितीस मुख्य अभियंता/प्राधिकरण व मुख्य अभियंता/मुंबई मंडळ हे मदत करतील.

---

**Item No.** 40/27 **Resolution No.** 691

विषय : महाराष्ट्र शासनाच्या वतीने हुडको अर्थसहाय्याने ग्रामीण भागात भूमिहीन व बेघर कामगारांसाठी झोपड्या बांधण्याची योजना हाती घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या वतीने ''हुडको'' या संस्थेकडून ग्रामीण भागात भूमिहीन व बेघर कामगारांसाठी घरकुल योजना तयार करणे, राबविण्यास सहकार्य करणे, हुडकोकडून कर्ज प्राप्त करणे इत्यादी कामे प्राधिकरणाने हाती घेण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 40/28 **Resolution No.** 692

विषय : वांद्रे (पूर्व) येथील प्लॉट नं. जी-९ येथे बांधण्यात येत असलेल्या कार्यालयीन इमारतीतील जागेचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जागांचे वाटप करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती नेमण्यात यावी.

| | |
|---|---|
| १) अध्यक्ष/प्राधिकरण | समापती |
| २) उपाध्यक्ष/प्राधिकरण | सदस्य |
| ३) समापती/मुंबई मंडळ | सदस्य |
| ४) उपसमापती/मुंबई मंडळ | सदस्य |
| ५) मुख्य अभियंता/प्राधिकरण | सदस्य |
| ६) उपमुख्य अधिकारी/मुंबई मंडळ (मिळकत व्यवस्थापन) | सचिव |

समितीने जागांसाठी आलेल्या माहितीचा विचार करून कोणाला किती जागा द्यावयाची यासंबंधी विचार करून अहवाल प्राधिकरणासमोर ठेवावा.

**Item No.** 40/29 **Resolution No.** 693

विषय : शासकीय कर्जरोख्यांच्याबाबत व्यवहार करण्याचे अधिकार मुख्य अभियंता/प्राधिकरण तसेच विभागीय मंडळांचे मुख्य अधिकारी यांना प्रदान करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुख्य अधिकारी, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोकण, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना या ठरावाद्वारे शासकीय कर्जरोखे विकणे, खरेदी करणे, हस्तांतरीत करणे, पृष्ठांकित करणे, परकामित करणे आणि/किंवा सदरहू रोख्यांच्यासंबंधी सर्व व्यवहार करणे, क्षतिपूर्तीबंध पत्रकांवर स्वाक्षरी करणे, क्षतिपूर्ती हमी करारपत्र, प्रतिज्ञापत्र यावर स्वाक्षरी करणे तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अथवा मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या वतीने शासकीय कर्जरोख्यांचे मुद्दल व त्यावरील व्याज घेणे याबद्दलचे संपूर्ण अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

**Item No.** 40/30 **Resolution No.** 694

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीत गाळ्यांच्या विक्रीच्या संबंधात अतिरिक्त १० टक्के सूटीचा लाभ घेण्याची मुदत वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दिनांक १४-९-१९८२ च्या शासकीय आदेशातील तरतूदीचा फायदा घेण्याची मुदत दिनांक ३०-६-१९८३ वरून ३०-९-१९८३ पर्यंत वाढविण्यास प्राधिकरणाने संमती दर्शविली.

**Item No. 40/31 Resolution No.**

विषय : श्री. चंद्रकांत पुरंदरे, पत्रकार यांची कंत्राटी पद्धतीने जनसंपर्क कामासाठी नेमणूक करणे

ठराव :

**Item No. 40/32 Resolution No.**

विषय : कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ मुख्यालय निश्चित करण्याबाबत.

ठराव :

**Item No. 40/33 Resolution No.**

विषय : औरंगाबाद येथील सुविधांसाठी बांधलेला इमारतीतील जागा इंडस्ट्रियल ट्रिब्युनल औरंगाबादला देणे.

ठराव :

| Meeting No. | 41 | Meeting Date | 05/Aug/1 |
|---|---|---|---|
| Item No. | 41/1 | Resolution No. | 694 |

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ८ जुलै १९८३ व १५ जुलै १९८३ रोजी झालेल्या ४० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) ज्या ठिकाणी खातेनिहाय चौकशीमध्ये वर्ग २,३ व ४ च्या अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास मोठ्या शिक्षा देण्यात आली असेल अशा प्रकरणांबाबत दाखल करण्यात आलेल्या अपिलांबाबत निर्णय घेण्यासाठी पुढीलप्रमाणे शक्ती प्रदान करण्यात येतात.
क) मूळ चौकशीमध्ये मुख्य अधिकारी, प्रादेशिक गृहनिर्माण मंडळे यांनी अशा शिक्षेचे आदेश दिले असल्यास त्याबाबतचे अपिल दाखल करून ते ऐकण्याचा व त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार प्राधिकरणाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समितीला देण्यात येतात.
ख) मंडळाच्या अखत्यारीतील इतर अधिकाऱ्यांनी खातेनिहाय चौकशीमध्ये वर्ग २, ३ व ४ च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मोठ्या शिक्षा देण्याचे आदेश दिले असता त्याविरुद्ध अपिल दाखल करून घेणे, ते चालविणे तसेच त्याबाबत निर्णय देणे हे अधिकार प्रादेशिक मंडळांच्या मुख्य अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येतात.
२) वर्ग २, ३ व ४ चे अधिकारी/कर्मचारी यांना खातेनिहाय चौकशीमध्ये मेजर शिक्षा देण्यात आली असल्यास त्याविरुद्ध अपिल दाखल करून घेणे, ते चालविणे व त्याबाबत निर्णय देणे याबाबतचे अधिकार अध्यक्ष/प्राधिकरण तथा उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या उपसमितीस देण्यात येतात. उपसमितीच्या सदस्यांचे शिक्षेबाबत एकमत न झाल्यास अशी प्रकरणे प्राधिकरणापुढे निर्णयासाठी ठेवण्यात यावीत.
३) प्राधिकरणासमोर सध्या प्रलंबित असलेली अपिले वर दर्शविल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा अध्यक्ष/प्राधिकरण तथा उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या उपसमितीने निकाली काढावीत.
क) कार्यवृत्तांताच्या भाग-२ वरील पृष्ठ-१ वर शेवटून दुसऱ्या परिच्छेदात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याची सूचना मान्य करण्यात आली.
प्रथमत: मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या नेहरूनगर या वसाहतीत रहाणारे डॉ. बलविंदरसिंग संधू हे नुकत्याच इंग्लंडमध्ये झालेल्या मर्यादित षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये.☐

**Item No.** 41/1 **Resolution No.** 694

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ८ जुलै १९८३ व १५ जुलै १९८३ रोजी झालेल्या ४० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) ज्या ठिकाणी खातेनिहाय चौकशीमध्ये वर्ग २,३ व ४ च्या अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास मोठ्या शिक्षा देण्यात आली असेल अशा प्रकरणांबाबत दाखल करण्यात आलेल्या अपिलांबाबत निर्णय घेण्यासाठी पुढीलप्रमाणे शक्ती प्रदान करण्यात येतात.
क) मूळ चौकशीमध्ये मुख्य अधिकारी, प्रादेशिक गृहनिर्माण मंडळे यांनी अशा शिक्षेचे आदेश दिले असल्यास त्याबाबतचे अपिल दाखल करून ते ऐकण्याचा व त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार प्राधिकरणाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समितीला देण्यात येतात.
ख) मंडळाच्या अखत्यारीतील इतर अधिकाऱ्यांनी खातेनिहाय चौकशीमध्ये वर्ग २, ३ व ४ च्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मोठ्या शिक्षा देण्याचे आदेश दिले असता त्याविरुद्ध अपिल दाखल करून घेणे, ते चालविणे तसेच त्याबाबत निर्णय देणे हे अधिकार प्रादेशिक मंडळांच्या मुख्य अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येतात.
२) वर्ग २, ३ व ४ चे अधिकारी/कर्मचारी यांना खातेनिहाय चौकशीमध्ये मेजर शिक्षा देण्यात आली असल्यास त्याविरुद्ध अपिल दाखल करून घेणे, ते चालविणे व त्याबाबत निर्णय देणे याबाबतचे अधिकार अध्यक्ष/प्राधिकरण तथा उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या उपसमितीस देण्यात येतात. उपसमितीच्या सदस्यांचे शिक्षेबाबत एकमत न झाल्यास अशी प्रकरणे प्राधिकरणापुढे निर्णयासाठी ठेवण्यात यावीत.
३) प्राधिकरणासमोर सध्या प्रलंबित असलेली अपिले वर दर्शविल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा अध्यक्ष/प्राधिकरण तथा उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या उपसमितीने निकाली काढावीत.
क) कार्यवृत्तांताच्या भाग-२ वरील पृष्ठ-१ वर शेवटून दुसऱ्या परिच्छेदात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्याची सूचना मान्य करण्यात आली.
प्रथमतः मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या नेहरूनगर या वसाहतीत रहाणारे डॉ. बलविंदरसिंग संधू हे नुकत्याच इंग्लंडमध्ये झालेल्या मर्यादित षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये.□

**Item No.** 41/2 **Resolution No.** 695

विषय : सहमुख्य कार्यकारी अधिकारी (जागतिक बँक प्रकल्प) / प्राधिकरण यांचेकरिता वाहन खरेदी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) सहमुख्य कार्यकारी अधिकारी (जागतिक बँक प्रकल्प) यांच्या उपयोगासाठी एक वाहन खरेदी करण्यात यावे, त्याचा खर्च जागतिक बँक प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या निधीतून करावा.
ब) या वाहनासाठी वाहनचालकाची रु. २५०-४३५ या वेतनश्रेणीतील एक जागा निर्माण करण्यात यावी.

**Item No.** 41/3 **Resolution No.** 696

विषय : औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने औरंगाबाद येथे ग्रिन टॅव्हल हॉटेलजवळ बांधलेल्या दोन इमारतीतील तळमजल्यावरील दुकानांच्या गाळ्यांचे वाटप करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) व्यापारी केंद्रातील गाळ्यांचे एकरकमी विक्रीपद्धतीने वाटप करण्यासाठी दोनदा जाहिरात देऊन पुरेसा प्रतिसाद न आल्यास असे गाळे भाडे खरेदीपद्धतीने विक्री करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८१ मध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.
ब) औरंगाबाद येथे सुविधांसाठी बांधलेल्या २ इमारतीतील दुकानांचे गाळे वर चर्चेत दर्शविल्याप्रमाणे भाडेखरेदी पद्धतीने देण्यासाठी जाहिरात देऊन निविदा पद्धतीने अर्ज मागविण्यात यावेत.
क) इ. क्र. १ मधील कार्यालयीन जागा ज्या कार्यालयांना भाड्याने देण्यात आलेली आहे. त्यांनाच ती चर्चेत नमूद केलेल्या अटींवर विक्री पद्धतीने घेण्यासंबंधी कळविण्यात यावे. त्या कार्यालयांनी अशी तयारी न दर्शविल्यास त्यांचेकडून ती जागा परत घेण्याच्या दृष्टीने योग्य ती कायदेशीर कारवाई सुरू करण्यात यावी.
ड) इ. क्र. २ मधील कार्यालयीन जागा लेबर कोर्टास वर चर्चेत आलेल्या अटींवर देण्यासंबंधी पत्रव्यवहार करण्यात यावा व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**Item No.** 41/4 **Resolution No.** 697

विषय : वाळवण-बोरिवली सर्व्हे क्र. ९ येथील संपादन केलेली २ एकर ८ गुंठे ५.५ आणे (८९०५.१७ चौ. मीटर) जमीन आर्मी वेल्फेअर हौसिंग ऑर्गनायझेशनला गृहबांधणीसाठी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) वाळवण, बोरिवली येथील सर्व्हे नं. ९ मधील ८९०५.१७ चौ. मीटर जमीन आर्मी वेल्फेअर हौसिंग ऑर्गनायझेशनला गृहनिर्माणासाठी भाडेपट्ट्यावर देण्यात यावी. हा भूखंड प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणानुसार उच्च उत्पन्न गटासाठी करण्यात यावयाचे अधिमूल्य तसेच भाडेपट्टी आकारून देण्यात यावा.
ब) आर्मी वेल्फेअर हौसिंग ऑर्गनायझेशन या संघटनेने अल्प उत्पन्न, मध्यम उत्पन्न व उच्च उत्पन्न गट इत्यादी त्यांचे दृष्टीने दाखविलेले उत्पन्न गट मान्य करून प्राधिकरणाच्या किंमतविषयक धोरणानुसार अधिमूल्य व भाडेपट्टी आकारण्याची त्यांची विनंती नामंजूर करण्यात यावी.

**Item No.** 41/5 **Resolution No.** 698

विषय : हुडको अर्थसहाय्यित मालेगांव, जिल्हा नाशिक येथील संमिश्र गृहनिर्माण योजना (योजना क्र. २५२२-सी) या योजनेच्या कर्जास तारण म्हणून मालेगाव जिल्हा नाशिक येथील मालमत्ता हुडकोकडे गहाण ठेवण्यास अधिकृती देणारा ठराव हुडकोच्या विहित नमुन्यात मंजूर करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे व सदर टिप्पणीला जोडलेल्या हुडकोच्या विहित नमुन्यात सदरहू योजनेतील जमीन व तीवर असणारे बांधकाम ही मालमत्ता हुडकोकडे इक्वीटेबल पद्धतीने गहाण ठेवण्यास प्राधिकरण अधिकृती देत आहे.

**Item No.** 41/6 **Resolution No.** 699

विषय : मालेगाव, जिल्हा नाशिक येथील संमिश्र गृहनिर्माण योजना, गोरक्षण, अकोला येथील अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजना व ओशिवरा, मुंबई येथील अल्प उत्पन्न गट भूखंड विकास योजना या योजनांसाठी नवी दिल्ली येथील हुडकोकडून कर्ज उभे करण्यासाठी अनुमती व अधिकृती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या जोडपत्र-अ मध्ये दर्शविलेल्या मालेगाव-नाशिक, गोरक्षण-अकोला व ओशिवरा-मुंबई येथील योजनेसाठी हुडकोकडून रु. ७५.९३ लक्ष एवढे कर्ज उभे करण्यास प्राधिकरण अनुमती व अधिकृती देत आहे.

**Item No.** 41/7 **Resolution No.** 700

विषय : सोलापूर येथील अधिसूचित क्षेत्रासाठी की, ज्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे, त्यासाठी तयार केलेल्या प्रारुप नियोजन प्रस्तावास मान्यता देणे.

ठराव : प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की,

१) सोलापूर येथील ज्या अधिसूचित क्षेत्रासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झालेली आहे त्या क्षेत्रासाठीचे नगर-रचना अधिकाऱ्यांनी सादर केलेले प्रारुप नियोजन प्रस्ताव व विकास नियंत्रण नियम खालील दुरुस्तीसह मंजूर करण्यात आले. प्रारुप नियोजन प्रस्तावात दोन रेल्वे मार्गामधील हरितपट्टा हा रेल्वेच्या ऑपरेशनल ॲक्टीव्हिटीसाठी आरक्षित करावा व त्याचे संपादन रेल्वेने करावे.

२) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९५५ च्या कलम ११५ (२) व कलम ४० (३) मधील तरतुदीनुसार आवश्यक असल्याने प्रारुप नियोजन प्रस्ताव लोकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात यावेत. सदर प्रारुप नियोजन प्रस्ताव जनतेच्या पाहणीसाठी व तापसणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी/महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ आणि सहाय्यक नगररचनाकार, सोलापूर यांच्या कार्यालयात उपलब्ध करण्यात यावेत.

३) सदरहू प्रारुप नियोजन प्रस्ताव प्रकाशित करण्यासाठी लागणारी सर्व ती कायदेशीर कार्यवाही तसेच प्राधिकरणाच्या वतीने जरूर त्या दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास प्राधिकरण अधिकृती देत आहे.

---

**Item No.** 41/8 **Resolution No.** 701

विषय : चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील ९० हेक्टर जमिनीचे पुन:प्रारण करण्यासाठी माती भराव करण्याच्या कामाची विभागणी निविदा मागविण्याच्या दृष्टीने चार भागात करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे माती भरावाच्या कामाची चार भागात विभागणी करण्यात यावी व त्यानुसार निविदा मागविण्यात याव्यात.

---

**Item No.** 41/9 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कार्यावर अनुबोधपट काढणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 41/10 **Resolution No.**

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना भागासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 41/11 **Resolution No.** 702

विषय : वांद्रे पुनःप्रापण क्षेत्रात बांधावयाच्या १) २२४ उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत गाळे व २) ८४ उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत गाळे (११२ गाळ्यांपैकी) यांच्या कामांसाठी मे. बा. जी. शिर्के आणि कं. यांनी शिर्के सिपोरेक्स कंसोर्टियम यांच्या वतीने दिलेली ठोस रक्कम (लम्पसम) निविदा स्वीकारण्याबाबत विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) वर चर्चेत दर्शविल्याप्रमाणे मोबीलायझेशन ॲडव्हान्स संबंधी शासनाने जी पद्धत वापरली ती पद्धत वापरण्यात यावी.
२) मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांनी प्राधिकरणाच्या ज्या इमारती पूर्वी बांधलेल्या आहेत त्यामध्ये पाणी गळण्याच्या तक्रारींबाबत पूर्तता करेपर्यंत व अशा दुरुस्त्या मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांनी एक महिन्याच्या आत पूर्ण केल्यावरच मोबीलायझेशन ॲडव्हान्स, बीले वगैरे देण्यात यावीत.
३) कंत्राटाच्या करारनाम्यात काही संदिग्धपणा रहाणार नाही अशा अटी काळजीपूर्वक घालण्यात याव्यात.
४) प्राधिकरणाच्या उपसमितीने सुचविल्याप्रमाणे बांधकाम क्षेत्राच्या दर चौरस फुटास १५० या दरानेच काम देण्यात यावे व त्यानुसार कंत्राटाची रक्कम निश्चित करण्यात यावी.
५) मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांना हा दर मान्य असल्यास, वर चर्चेत आलेल्या गोष्टींची शहानिशा करून कंत्राटाची निश्चित रक्कम काढणे, कंत्राटाच्या अंतिम अटी व शर्ती तयार करून त्यास मान्यता देणे यासाठी प्राधिकरण उपसमितीस अधिकार प्रदान करीत आहे.
५) वरीलप्रमाणे तयार केलेल्या अटी व शर्ती आणि कामाचा दर मान्य असल्यासच मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांनी सदर कामाचे कंत्राट उपसमितीच्या मान्यतेनंतर देण्यात यावे.
७) प्राधिकरणाच्या पूर्वीच्या निर्णयावर मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी यांनी प्राधिकरणाची कामे देण्यात येऊ नयेत असा घेतलेला निर्णय या ठरावाच्या तारखेपासून रद्द समजण्यात यावा.

---

**Item No.** 41/12 **Resolution No.** 703

विषय : एक लाख रुपयांपर्यंत अंदाजित किंमतीच्या कामांच्या निविदा न मागविता कामगार सहकारी संस्थांना प्राधिकरणाची कामे देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत नमूद केलेला प्रस्ताव मान्य करण्यात येतो.

---

**Item No.** 41/13 **Resolution No.** 704

विषय : चाळीसगाव रोड-धुळे येथील अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण - ब) योजना, मामटी परसोडी-नागपूर येथील मध्यम उत्पन्न गट गृहनिर्माण योजना व विजयनगर वांद्रे, मुंबई येथील कर्मचारी गृहनिर्माण योजना या योजनांसाठी □हुडको□कडून कर्ज उभे करण्यासाठी प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या जोडपत्र अ मध्ये दर्शविलेल्या धुळे, मामटी-परसोडा, नागपूर व विजयनगर, वांद्रे येथील योजनांसाठी हुडकोकडून २३९.०३ लक्ष रु. कर्ज उभे करण्यासाठी प्राधिकरण अनुमती व अधिकृती देत आहे.
त्याचप्रमाणे नागपूर व मुंबई येथील योजनांच्या कर्जास तारण म्हणून त्या योजनांतील जमीन व त्यावर होणारी बांधकाम हुडकोकडे इक्विटेबल पद्धतीने गहाण ठेवण्यास प्राधिकरण बाब टिप्पणीस जोडलेल्या ठरावानुसार अधिकृती देत आहे.

**Item No.** 41/14 **Resolution No.** 705

विषय : हिवरी, नागपूर येथील एकत्रित गृहनिर्माण योजनेसाठी ''हुडको''कडून कर्ज उभे करण्यासाठी प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत तसेच सदर कर्जास तारण म्हणून याच योजनेतील मालमत्ता हुडकोकडे गहाण ठेवण्यासाठी अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हिवारी-नागपूर येथील एकत्रित गृहनिर्माण योजना (योजना क्र. २५९७ - सी) कार्यान्वित करण्यासाठी हुडकोकडून ७८.४९ लक्ष रुपयाचे कर्ज उभे करण्यासाठी प्राधिकरण अनुमती व अधिकृती देत आहे. तसेच, सदर योजनेतील जमीन व त्यावर होणारे बांधकाम हुडकोकडे तारण म्हणून गहाण ठेवण्यास हुडकोच्या विहित नमुन्यात ''इक्विटेबल मॉर्टगेज'' पद्धतीने गहाण ठेवण्यासाठी प्राधिकरण अधिकृती देत आहे.

**Item No.** 41/15 **Resolution No.**

विषय : इस्लामपूर येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेला ५० गाळ्यांच्या वाटपाबाबत.

ठराव :

**Item No.** 41/16 **Resolution No.** 706

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये सुधारण करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करण्यासाठी प्राधिकरणापुढे ठेवण्यात आलेल्या प्रारुपास प्राधिकरणाने मान्यता दिली. हे विनियम शासनाकडे पाठवावेत असे आदेश प्राधिकरणाने दिले.

| **Item No.** | **41/17** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समधील "सी" ब्लॉकमधील जमिनीचा काही भाग महानगर दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाकरिता देण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **41/18** | **Resolution No.** | **707** |
|---|---|---|---|

विषय : मुंबई मंडळातील लेखाधिकारी (वर्ग-१) या दोन पदांपैकी एका पदाचे वेतनमान सुधारण्याबाबत.

ठराव : मुंबई मंडळाच्या लेखा विभागातील लेखा अधिकारी या पदाची रु. ६८०-१२५० ही वेतनश्रेणी रु. ६८०-१५०० करण्यात यावी व श्री. बेटगीरी हे लेखा अधिकारी म्हणून काम करीत आहेत तोपर्यंत त्यांच्यासाठी वैयक्तिक वेतनश्रेणी मानण्यात यावी.

| **Item No.** | **41/19** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पार पाडावयाच्या योजना मंजूर झालेली रिक्त पदे भरण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** 42 **Meeting Date** 17/Sep/1

**Item No.** 42/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ५-८-१९८३ रोजी झालेल्या ४१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 42/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयांवर करावयाच्या कार्यवाहीचा पाठपुरावा करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 42/3 **Resolution No.** 708

विषय : उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत वांद्रे पुन:प्रापण क्षेत्र, वांद्रे (पश्चिम) मुंबई येथील गाळेबांधणी नफ्याचे प्रमाण वाढविण्याबाबत विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वांद्रे पुन:प्रापण क्षेत्र, वांद्रे (पश्चिम) येथील गाळे बांधण्यासाठी आकारावयाचे नफ्याचे प्रमाण उच्च उत्पन्न गटातील नेहमीच्या २५ टक्के ऐवजी ५० टक्के इतके आकारण्यात यावे.

**Item No.** 42/4 **Resolution No.** 709

विषय : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पार पाडावयाचे प्रकल्प -
*कार्यपद्धती - व्यवस्थापन व वित्तीय पद्धती यामध्ये सुधारणा करण्यासाठी संमंत्रकांची* नियुक्ती करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीस जोडण्यात आलेल्या प्रपत्रातील "अटी व विचारार्थ विषय" यानुसार जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पार पाडावयाच्या प्रकल्प योजनेसाठी तसेच प्राधिकरण व विभागीय मंडळे यांच्यासाठी व्यवस्थापन, वित्तीय पद्धती, प्रशासन व तांत्रिक विभाग यांच्या कार्यपद्धतीचा व व्यवस्थापनाचा अभ्यास करवून घेऊन सुधारणा करण्यासाठी संमंत्रकांची नियुक्ती करण्यात यावी.

**Item No.** 42/5 **Resolution No.** 710

विषय : श्री. ए. डी. फर्नांडिस यांचेकरिता अधिक्षक या पदासाठी अधिसंख्य पद निर्माण करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविलेल्या कारणास्तव श्री. फर्नांडिस यांचेसाठी अधिक्षक या दर्जाचे अधिसंख्य पद निर्माण करण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 42/6 **Resolution No.** 711

विषय : शक्तीचे प्रत्यायोजन करणे व क्षयरोग पिडीतांना सवलती देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीस जोडण्यात आलेल्या प्रपत्र "अ" प्रमाणे वेगवेगळ्या अधिकाऱ्यांना क्षयरोग पिडितांना सवलती देण्याबाबत अस्तित्वात असलेल्या आदेशानुसार सवलती देण्याचे अधिकार प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 42/7 **Resolution No.** 712

विषय : श्री. एस. डब्ल्यू. कांबळे, शिपाई यांना क्षयरोग रजा मंजूर करणे व वैद्यकीय प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिथिलता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे श्री. कांबळे यांची रजा मंजूर करण्यासाठी क्षयरोग सवलत नियम ६ मध्ये वेळोवेळी तपासून घेणे व दाखला देणे वगैरेसारख्या अटी शिथिल करण्यास मान्यता देण्यात येते.
ब) तसेच अशा प्रकारची प्रकरणे यापुढे आल्यास या अटी शिथिल करून निकाली काढण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात यावेत.

---

**Item No.** 42/8 **Resolution No.** 713

विषय : एम. सी. एस. (डिसिप्लिन ॲण्ड अपिल) रुल्स १९७९ प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
या विषयावर अधिक सखोल अभ्यास करून निर्णय घेण्यासाठी अध्यक्ष/प्राधिकरण, उपाध्यक्ष/प्राधिकरण व तसेच श्री. अतुल हुले, सदस्य, यांची एक उपसमिती नियुक्त करण्यात यावी व या समितीला या विषयासंबंधात निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात येतात.

---

| **Item No.** | **42/9** | **Resolution No.** | **714** |
|---|---|---|---|

विषय : नाशिक येथील गोल्फ क्लबजवळ औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने बांधलेल्या कार्यालयीन इमारतीतील जागांचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नाशिक येथील गोल्फ क्लबजवळ बांधलेल्या कार्यालयीन इमारतीतील जागेचे वाटप भाडेपद्धतीने करण्यात यावे. इमारतीचे भाडे ठरविणे तसेच जागेच्या वाटपाच्या प्रस्तावित अटी तपासून पहाण्यासाठी व जागा वाटप करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती नेमण्यात यावी.
१) सभापती, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
२) मुख्य अधिकारी, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
३) वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण प्रशासकीय अधिकारी व मिळकत व्यवस्थापन, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ - हे वरील समितीचे सचिव म्हणून काम पहातील.

| **Item No.** | **42/10** | **Resolution No.** | **715** |
|---|---|---|---|

विषय : शैक्षणिक / सांस्कृतिक संस्थांना प्राधिकरणाने दिलेल्या जागेतील त्यांच्या इमारतीत बँकांना जागा देण्यास परवानगी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीतील विषयावर विचार करण्यासाठी अध्यक्ष / प्राधिकरण, उपाध्यक्ष/प्राधिकरण तसेच श्री. अतुल हुले यांची उपसमिती नेमण्यात यावी व या समितीने यावर विचार करुन आपला अहवाल पुढील बैठकीत ठेवावा.

| **Item No.** | **42/11** | **Resolution No.** | **716** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास राजे रघुजी नगर, नागपूर येथे अधिक जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) कामगार कल्याण मंडळाला प्राथमिक शाळेच्या आरक्षित भूखंडातून १५,००० चौ. फू. जागा देण्याच्या कृतीला कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.
ब) प्राथमिक शाळेच्या आरक्षित भूखंडातून उरलेली सुमारे ४८,००० चौ. फू. जागा कामगार कल्याण मंडळाला प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणानुसार देण्यात यावी.
व
क) कामगार कल्याण मंडळाला पूर्वी देण्यात आलेल्या उरलेल्या जागेचे वाटप राष्ट्रीय बौद्धजन मंडळास देण्याबाबत नागपूर मंडळाने निर्णय घ्यावा.

**Item No.** 42/12 **Resolution No.** 717

विषय : उच्च उत्पन्न गटासाठी देण्यात यावयाच्या निवासी जागेचे अधिमूल्य व भाडेपट्ट्यांबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
उच्च उत्पन्न गटासाठी निवासी जमिनीचे वितरण करताना लावण्यात येणारे अधिमूल्य हे प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक २५३ दिनांक १५-४-८० व ठराव क्रमांक २६० दिनांक १६-५-१९८० मधील तरतुदीनुसार आहे. त्या शिवाय प्राधिकरणास योग्य वाटेल त्या ठिकाणी निविदा पद्धतीने निविदा मागवून ते ठरविण्यात येईल व त्याप्रमाणे ते आकारण्यात यावे.

---

**Item No.** 42/13 **Resolution No.** 718

विषय : श्रीमती कमलाबाई मोठाभाऊ मराठे, स. नं. १७५/ब, नंदुरबार, जिल्हा धुळे, यांची २००'' बाय २००'' जमीन मूळ जमीन मालकाला पुन्हा भाडेपट्टीवर देण्यासंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे स. नं. १७५-ब, नंदुरबार, जिल्हा धुळे येथील औरंगाबाद मंडळाच्या प्रस्तावाप्रमाणे २२.१६ आर जमीन मूळ मालक श्रीमती कमलाबाई मोठाभाऊ मराठे यांना वरील चर्चेत दर्शविलेल्या बाबींची काळजी घेऊन भाडेपट्टीने देण्यात यावी.
(ब) तसेच यासंबंधीची पुढील सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येतात.

---

**Item No.** 42/14 **Resolution No.** 719

विषय : स्टेशन रोड, औरंगाबाद (देवगिरी कॉलेज जवळ) येथील अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण -व) गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज उभे करण्यासाठी प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
स्टेशन रोड, औरंगाबाद (देवगिरी कॉलेज जवळ) येथील अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण -व) ७२ गाळे या योजनेसाठी हुडको, दिल्ली या संस्थेकडून कर्ज उभे करण्यासाठी अनुमती व अधिकृती देण्यात येते.

---

**Item No.** 42/15 **Resolution No.** 720

विषय : वांद्रा पुनःप्रापण क्षेत्रात बांधावयाच्या
१) २२४ उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत गाळे व
२) ८४ उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत गाळे (११२ गाळ्यांपैकी) यांच्या कामासाठी मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांनी शिर्के सिपोरेक्स कंसोर्टियम यांच्या वतीने दिलेली ठोस रक्कम (लम्पसम) निविदा स्वीकारण्याबाबत विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
उपसमितीने केलेल्या शिफारशी स्वीकारण्यात याव्यात. यासंबंधी पुढील वाटाघाटी करून निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार उपसमितीला देण्यात येत आहेत.

---

| Item No. | 42/16 | Resolution No. | 721 |
|---|---|---|---|

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना उपकाराच्या वसुलीच्या रकमांचा मेळ घालणे तसेच त्याबाबतचे वादग्रस्त प्रश्न हाताळणे या कामासाठी "लेखाधिकारी (वर्ग - २)" हे पद मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर निर्माण करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
इमारत दुरुस्ती व पुनर्रचना उपकाराच्या रकमांचा मेळ घालण्यासाठी व वादग्रस्त प्रश्न हाताळण्यासाठी वर्ग दोन मधील एक पद मुंबई मंडळाच्या दुरुस्ती व पुनर्रचना विभागाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात यावे.

| Item No. | 42/17 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : नेहरूनगर, कुर्ला येथील भूखंड समाजमंदिरासाठी देण्याबाबतची सद्यस्थिती.

ठराव :

| Item No. | 42/18 | Resolution No. | 722 |
|---|---|---|---|

विषय : इस्लामपूर येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेल्या ५० गाळ्यांच्या वाटपाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कासेगाव एज्युकेशन सोसायटी यांना इस्लामपूर येथे ५० गाळे सभोवतालच्या ५ एकर जमिनीसह प्राधिकरणाच्या गाळ्यांच्या व जमिनीच्या किंमतीविषयक धोरणास अनुसरून देण्यात यावेत.
नागपूर मंडळाच्या कर्मचाऱ्यांतर्फे प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा सदस्य यांचे स्वागत करण्यात आले.
यानंतर सदस्यांनी अध्यक्षांचे व अध्यक्षांनी सदस्यांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.** 43 **Meeting Date** 29/Oct/1

**Item No.** 43/1 **Resolution No.** 723

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १७-९-१९८३ रोजी झालेल्या ४२व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ठराव क्रमांक ७१४ मध्ये नाशिक येथील गोल्फ क्लबजवळ बांधलेल्या कार्यालयीन इमारतीतील जागेचे वाटप करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या समापती पदी अध्यक्ष/प्राधिकरण असतील. समितीचे बाकीचे सदस्य ठराव क्रमांक ७१४ मध्ये दर्शविल्याप्रमाणेच असतील.
यानंतर कार्यवृत्तांतावर पुन्हा एकदा विषय क्रमांक १७च्या चर्चेनंतर चर्चा झाली. यावेळी श्री. तिगईकर, सदस्य व श्री. केसकर, सदस्य बैठकीस हजर नव्हते. अध्यक्षांची परवानगी घेऊन ते अगोदरच गेले होते. मात्र यावेळी श्री. खुशालराव मोताळे, श्री. कृष्णराव पांडव व श्रीमती काझी हे सदस्य हजर होते. यावेळी श्री. अतुल हुले, सदस्य यांनी दिलेल्या दिनांक २७ ऑक्टोबर १९८३ च्या पत्रात सुचविलेल्या दुरुस्त्यासंबंधी विचार झाला. श्री. हुले यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या पुढील प्रमाणे होत्या.
(१) पृष्ठ क्रमांक २ वरील अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या घरी झालेल्या चर्चेचा जो उल्लेख आहे तो वगळावा अशी श्री. हुले यांची सूचना होती.
यावर विचार करताना अधिकृत काम कोठेही होऊ शकते. त्यामुळे अध्यक्षांच्या घरी केलेली चर्चा अधिकृतच मानावी लागते व त्यामुळे केलेल्या उल्लेखासंबंधीचा परिच्छेद वगळण्याची आवश्यकता नाही असे मत प्राधिकरणाने व्यक्त केले.
(२) पृष्ठ क्रमांक ३, परिच्छेद ३ : "यापुढे अध्यक्षांनी————————
सचिव/प्राधिकरण यांनी दिली." हे वाक्य कार्यवृत्तांतातून वगळण्यात यावे अशी श्री. हुले यांची सूचना होती.
या विषयावर स्वतंत्रपणे चर्चा झालेली असल्यामुळे आता या दुरुस्तीची गरज नाही असे श्री. हुले यांनी सांगितले.
(३) पृष्ठ क्रमांक ४, परिच्छेद ४ : सचिव/प्राधिकरण यांनी खुलासा बैठकीमध्ये वाचून दाखविल्याचे आपल्याला आठवत नसल्याचे श्री. हुले यांनी पत्रात म्हटले व त्याप्रमाणे सुधारणा करण्याची सूचना केली होती.
यावर खुलासा करताना सचिव/प्राधिकरण यांनी श्री. तारानाथ शेणॉय यांच्या प्रकरणाबाबत प्राधिकरणापुढे खुलासा करताना नवशक्तीकडे पाठविलेल्या खुलाशातूनच मजकूर वाचून दाखविला होता याची आठवण करून दिली. आपण संपूर्ण खुलासा सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचला नाही हे सचिवांनी मान्य केले. प्राधिकरणाने यावर कार्यवृत्तांत दुरुस्तीची गरज नाही असे सांगितले.
(४) पृष्ठ क्रमांक ४, परिच्छेद ४ : नवशक्तीमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले संवाद काल्पनिक आहेत असे सचिव/प्राधिकरण यांनी सांगितले होते. त्याची कार्यवृत्तांतात नोंद घ्यावी अशी श्री. हुले यांनी सूचना केली होती.
आपण असे सांगितले होते असा खुलासा सचिव/प्राधिकरण यांनी केल्यावर कार्यवृत्तांतात त्याप्रमाणे नोंद घ्यावी असे आदेश प्राधिकरणाने दिले. त्यानुसार परिच्छेद (अ) चे शेवटी "नवशक्ती" दैनिकात उद्धृत करण्यात आलेले काही संवाद काल्पनिक आहेत असाही खुलासा करण्यात आला.
हे वाक्य लिहिण्याचे आदेश देण्यात आले.
(५) पृष्ठ क्रमांक ५, परिच्छेद २ : कर्मचाऱ्यांनी आपली वैयक्तिक गाऱ्हाणी तक्रार

निवारण समितीपुढे सादर करावीत असे उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मत कार्यवृत्तांतात नोंदविण्यात यावे अशी सूचना श्री. हुले यांनी केली होती. त्यानुसार पृष्ठ पाच वरील प्राधिकरण या विचारांशी सहमत झाले या वाक्याअगोदर
"कर्मचाऱ्यांनी आपली वैयक्तिक गाऱ्हाणी तक्रार निवारण समितीपुढे सादर करावीत असे मत उपाध्यक्षांनी व्यक्त केले."
हे वाक्य कार्यवृत्तांतात नोंदविण्यात यावे असे आदेश देण्यात आले.
(६) पृष्ठ क्रमांक ६, विषयसूची क्रमांक ४२/२ परिच्छेद २ : या विषयावरील चर्चेच्या वेळी पुढील बाबींवर कार्यवाही झालेली नाही असे प्राधिकरणाच्या निदर्शनास आपण आणून दिले असे श्री. हुले यांनी सांगितले. याची नोंद कार्यवृत्तांतात करण्यात यावी असे त्यांनी म्हटले व ते प्राधिकरणाने मान्य केले. त्यानुसार परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.
श्री. हुले यांनी खालील विषयांबाबतही पुढील कार्यवाही झाली नाही असे प्राधिकरणाच्या निदर्शनास आणले.
(अ) २-४-१९८३ रोजीची बैठक : योग्य त्या अर्हतेचे उमेदवार प्राधिकरणाकडे कसे आकर्षित करावेत यासंबंधी स्वतंत्रपणे चर्चा करून हा विषय योग्य त्या स्वरुपात प्राधिकरणासमोर ठेवण्यात येईल.
(ब) २५-५-१९८३ रोजीची बैठक : या बैठकीमध्ये कन्नमवार नगर व चुनाभट्टी या वसाहतीमध्ये बी. एस. बी. एस. कंपनीला विद्युत बिले स्वीकारण्यासाठी जागा देण्याच्या संदर्भात उपसभापती, मुंबई मंडळ यांना योग्य ते आदेश देण्याचे मान्य झाले होते.
(क) कन्नमवारनगर येथील वसाहतीमधील समाजमंदिरासाठी राखून ठेवलेल्या जागेच्या वितरणासंबंधीचा विषय :
हे सर्व विषय प्राधिकरणापुढे ठेवावयाचे मान्य झाले होते. परंतु अजूनही हे विषय प्राधिकरणासमोर आले नाहीत असे त्यांनी निदर्शनास आणले.
(७) पृष्ठ क्रमांक २२ : वर दुसऱ्या ओळीत
"योग्य होणार नाही."
यानंतर
"असे शासनास कळविण्यात यावे."
हे शब्द वाढविण्यात यावेत. प्राधिकरणाने ही सूचना मान्य केली. त्यानुसार कार्यवृत्तांतात दुरुस्ती करावयाचे आदेश दिले.
(८) पृष्ठ क्रमांक २३ वर ठराव क्रमांक ७२२ : नंतर खालील परिच्छेद वाढवावा.
"नागपूर मंडळाच्या कर्मचाऱ्यांतर्फे प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा सदस्य यांचे स्वागत करण्यात आले."
तसेच नागपूर मंडळाचे सभापती व अधिकारी यांनी बैठकीची व्यवस्था उत्तम ठेवल्याबद्दल अध्यक्षांनी समाधान व्यक्त केले.
वरील दुरुस्त्यांसह कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आला.

**Item No.** 43/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करावयाच्या कार्यवाहीचा पाठपुरावा.

ठराव :

**Item No.** 43/3 **Resolution No.**

विषय : मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकारपत्र इमारतींच्या संरचनात्मक (स्ट्रक्चरल) दुरुस्तीसाठी खर्चाची कमाल मर्यादा २००/- रु. प्रति चौरस मीटरवरून ३००/- रु. प्रति चौरस मीटर केल्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 43/4 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाच्या कामांसाठी "नॉनलेव्ही" (ओपन मार्केट) सिमेंटचा वापर करण्याबाबत प्रादेशिक मंडळांनी खरेदी केलेल्या "नॉनलेव्ही" सिमेंटची माहिती.

ठराव :

---

**Item No.** 43/5 **Resolution No.** 724

विषय : गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम - कोकणातील ५०,००० लोकवस्तीपेक्षा कमी लोकवस्तीच्या गावांना पण लागू करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
५०,००० व त्याहून जास्त लोकवस्ती असलेल्या शहरातील गलिच्छ वस्त्यांमध्येपण आपण अद्याप कार्यक्रम पूर्णपण राबवू शकलो नाहीत, म्हणून सध्या ५०,००० लोकवस्तींची मर्यादा कमी करण्यात येऊ नये.

---

**Item No.** 43/6 **Resolution No.** 742

विषय : सातपूर, नाशिक येथील अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण -ब) गृहनिर्माण योजना - २२८ गाळे या योजनेसाठी "हुडको" कडून कर्ज उभे करण्यासाठी अनुमती व अधिकृती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या जोडपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या सातपूर, नाशिक येथील अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण -ब) गृहनिर्माण योजना २२८ गाळे या योजनेसाठी हुडकोकडून ३०.२९ लक्ष रु. कर्ज उभे करण्यासाठी अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

---

**Item No.** 43/7 **Resolution No.** 743

विषय : "हुडको" कडील कर्जास तारण म्हणून हमी दिल्याबद्दल महाराष्ट्र शासनाशी प्राधिकरणाच्या वतीने करारपत्र करण्याची अधिकृती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या गृहनिर्माण योजना कार्यान्वित करण्यासाठी "हुडको" कडून घ्यावयाच्या कर्जास तारण म्हणून महाराष्ट्र शासनाने हमी दिल्याबद्दल महाराष्ट्र शासनाशी शासनाच्या विहित नमुन्यात (जो बाब टिप्पणीस जोडलेला आहे) प्राधिकरणाच्या वतीने अशा प्रत्येक प्रकरणी करार करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी पुढील कार्यवाही करावी.

---

**Item No.** 43/8 **Resolution No.** 744

विषय : महाराष्ट्र शासनाच्या वतीने हाती घ्यावयाच्या अमरावती, बुलढाणा, सोलापूर आणि यवतमाळ या जिल्ह्यांतील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या महाराष्ट्र शासनाच्या वतीने हाती घेण्यात यावयाच्या अमरावती, बुलढाणा, सोलापूर व यवतमाळ या जिल्ह्यांतील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी "हुडका"कडून एकूण २०.४५ लक्ष रु. कर्ज घेण्यास प्राधिकरण अनुमती व अधिकृती देत आहे.

---

**Item No.** 43/9 **Resolution No.** 745

विषय : विजयनगर, वांद्रा, मुंबई येथील मालकतत्त्वावरील कर्मचारी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोशी करावयाच्या कर्जाच्या करारपत्रासंबंधात हुडकोस लागणारे विविध ठराव मंजूर करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या जोडपत्र "अ" मधील ठराव मंजूर करण्यात येत आहेत.

---

**Item No.** 43/10 **Resolution No.** 725

विषय : मुंबईतील कामाठीपुरा विभागाच्या नागरी नूतनीकरणासाठी प्राधिकरणाची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून झालेली नियुक्ती व त्याबाबत फेरविचार.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(१) प्राधिकरणाने शासनास आपली "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून केलेली नेमणूक रद्द करण्याची विनंती करण्यात यावी.
(२) शासनाकडून "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून केलेली ही नेमणूक रद्द होईपर्यंत कामाठीपुरा येथील अधिसूचित क्षेत्रातील इमारतींच्या बांधकामाच्या परवानगीसाठी येणाऱ्या अर्जांची छाननी बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या विकास आराखड्यानुसार व विकास नियंत्रण नियमानुसार करण्यात यावी व त्यानुसार अशा अर्जांना परवानगी देण्यात यावी वा परवानगी नाकारण्यात यावी.

---

**Item No.** 43/11 **Resolution No.** 726

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

(अ) १) ५ टक्के सूटीचा लाभ घेऊन गाळ्यांची शेष किंमत पूर्ण एकरकमी भरू इच्छिणाऱ्या गाळेधारकांना २८-१११९८३च्या ६२८ क्रमांकाच्या ठरावानुसार ३०-४-१९८३ पर्यंत देण्यात आलेली मुदत आता ३१-१२-१९८३ पर्यंत वाढविण्याच्या उपाध्यक्षांच्या निर्णयाला कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

२) तसेच आता ही मुदत ३१-३-१९४ पर्यंत वाढविण्यात यावी.

(ब) १४-९-१९८२ च्या शासकीय आदेशात दाखविण्यात आलेल्या इमारतींच्या संदर्भात गाळ्यांच्या किंमतीत अतिरिक्त १० टक्के सूट देण्यात आलेली आहे व या सूटीनुसार योजनेत भाग घेण्यासाठी प्राधिकरणाच्या ६८४च्या ठरावानुसार ३०-९-१९८३ पर्यंत देण्यात आलेली मुदत आता ३१-१२-१९८३ पर्यंत वाढविण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या निर्णयाला कार्योत्तर मान्यता देण्यात येते. तसेच आता ही मुदत ३१-३-१९८४ पर्यंत वाढविण्यात यावी.

---

**Item No.** 43/12 **Resolution No.** 727

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे उच्च उत्पन्न गटांकरिता बांधण्यात येत असलेल्या दोन इमारतीतील गाळ्यांचे वाटप विभिन्न राज्य शासनांना करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे विभिन्न राज्य शासनांना वाटप करण्यासाठी बांधावयाच्या इमारतीतील गाळ्यांचे वाटप करण्यासाठी राज्य शासनाकडून विनियम ५(१) प्रमाणे आदेश मागवावेत. तसेच गाळ्यांचे वाटप करण्यासाठी पुढील प्रमाणे समिती नेमण्यात यावी.

१) अध्यक्ष/प्राधिकरण

२) उपाध्यक्ष/प्राधिकरण

३) सभापती/मुंबई मंडळ

४) उपसभापती/मुंबई मंडळ

५) उपमुख्य अधिकारी, मिळकत व्यवस्थापन, मुंबई मंडळ - समितीचे सचिव

या व्यतिरिक्त मुख्य अभियंता/प्राधिकरण व मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांनी समितीला कामकाजात मदत करावी.

---

**Item No.** 43/13 **Resolution No.** 728

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८१ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

राखीव गटात अर्ज करून एकदा गाळा मिळाल्यानंतर त्याच नगरपालिकेच्या किंवा महानगरपालिकेच्या हद्दीत राखीव गटासाठी पुन्हा अर्ज करण्यात प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने नियमात योग्य ती दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**Item No.** 43/14 **Resolution No.** 729

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विकी, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१.
गाळ्यांच्या हस्तांतरणाची प्रकरणे नियमित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) भाडेतत्त्वावर देण्यात आलेल्या गलिच्छ वस्ती निर्मूलन योजनेतील तसेच औद्योगिक कामगारांसाठी बांधलेल्या गृहनिर्माण योजनेतील गाळ्यांच्यासंबंधी २८-१-१९८३ च्या ठरावानुसार हस्तांतरण करण्यास परवानगी देण्यात यावी. अशी परवानगी देताना या योजनेसाठी असलेल्या पात्रतेची विशेष अट म्हणजेच गलिच्छ वस्तीत राहणारे किंवा रुपये ३५० पर्यंतचे उत्पन्न असणे. या अटी शिथिल करण्यात याव्यात. उत्पन्न मर्यादेबाबत प्राधिकरणाने इतर दर्शविलेल्या अटी पाळल्या जाव्यात. गाळ्यांचे हे हस्तांतरण करताना अल्प उत्पन्न गटासाठी लावण्यात आलेले अधिमूल्य गाळेधारकाकडून वसूल करण्यात यावे;
(ब) गाळ्यांचे हस्तांतरण करताना पूर्वीच्या गाळेधारकाने भरलेल्या रकमेबाबत -
(१) गाळा वारसाच्या नावे नियमित करावयाचा झाल्यास पूर्वीच्या गाळेधारकाने किंमतीपोटी भरलेल्या रकमेचा फायदा वारसास देण्यात यावा, पण -
(२) गाळा वारसा व्यतिरिक्त कुटुंबाच्या इतर घटकाच्या नावे किंवा तिसऱ्याच व्यक्तीकडे हस्तांतरित होत असल्यास पूर्वीच्या गाळेधारकाने किंमतीपोटी भरलेली रक्कम त्याने गाळा जेवढा काळ वापरला असेल त्याच्या पोटी यावयाच्या आर्थिक भाड्यानुसार वळती करावी व शिल्लक रक्कम मंडळाकडे तशीच जमा ठेवावी.

**Item No.** 43/15 **Resolution No.** 730

विषय : श्री. म. वि. देसाई, सेवानिवृत्त लेखाधिकारी यांचे पुनर्नेमणुकीनंतर वेतन निश्चित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे श्री. एम. व्ही. देसाई, सेवानिवृत्त लेखाधिकारी यांच्या पुनर्नेमणुकीनंतर निश्चित करण्याच्या वेतनासाठी त्यांना मिळत असलेले विशेष वेतन रुपये १०० हिशेबात धरून होणाऱ्या त्यांच्या निवृत्तापूर्वीच्या रुपये १३०० या पगारानुसार कंत्राटी पद्धतीवर द्यावयाचे त्यांचे वेतन निश्चित करण्यात यावे.

**Item No.** 43/16 **Resolution No.**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील आरक्षित केलेल्या माध्यमिक शाळेच्या भूखंडाबाबत.

ठराव :

**Item No.** 43/17 **Resolution No.**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील जमिनीचे प्लॉट नं. ५७ व ७० यांची एज्युकेशन कमिटी ऑफ एन. एम. एम. जामात ऑफ इर्ला अँड विलेपार्ले या संस्थेने केलेल्या मागणीबाबत.

ठराव :

**Item No.** 43/18 **Resolution No.** 731

विषय : शैक्षणिक सांस्कृतिक संस्थांना प्राधिकरणाने दिलेल्या त्यांच्या इमारतीत जागा देण्यास परवानगी देण्याबाबत उपसमितीचा अहवाल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविलेल्या उपसमितीच्या शिफारशींच्या अधीन राहून तसेच वर चर्चेत उल्लेख आल्याप्रमाणे संबंधित महानगरपालिका अथवा नगरपरिषदा यांच्या विकास नियमांस अधीन राहून शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांना प्राधिकरणाने दिलेल्या भूखंडावर बांधलेल्या त्यांच्या इमारतीत जागा भाड्याने देण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. यासाठी जो आकार घ्यावयाचा तो वर चर्चेत उल्लेख केल्याप्रमाणे एकूण भाड्याच्या २५ टक्के एवढा आकारण्यात यावा. एकूण भाड्यात नगरपालिका कर तसेच इतर करांचा समावेश करण्यात यावा.

**Item No.** 43/19 **Resolution No.** 732

विषय : श्री. पी. एल. घागरे, संकल्पचित्र सहाय्यक यांच्या पुनर्नेमणुकीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. पी. एल. घागरे, संकल्पचित्र सहाय्यक यांना नेहमीच्या पुनर्नेमणुकीच्या अटीवर सहा महिन्यांकरिता नेमण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यात येते.

**Item No.** 43/20 **Resolution No.**

विषय : निवासी लेखा अधिकारी यांच्याकडून औरंगाबाद मंडळाच्या कार्यालयाचा परिक्षण अहवाल वाहन क्रमांक २६०० च्या संबंधाने नोंदवहीतील नोंद.

ठराव :

**Item No.** 43/21 **Resolution No.** 733

विषय : बजोरिया नगर, यवतमाळ येथील अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण -ब) भूखंड विकास योजना - २१५ भूखंड या योजनेसाठी 'हुडको' कडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या बजोरिया नगर, यवतमाळ येथील अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण -ब) भूखंड विकास योजनेसाठी हुडकोकडून ८.६६ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Item No.** 43/22 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र शासनातर्फे झोपडपट्टी वासियांसाठी बांधावयाचे ६ हजार गाळे वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तामधील वादग्रस्त निधाने.

ठराव :

---

**Item No.** 43/23 **Resolution No.**

विषय : वांद्रा पुनःप्रापण क्षेत्रात बांधावयाच्या
१) २२४ उच्च उत्पन्न योजनेअंतर्गत गाळे
व
२) ८४ उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत गाळे
(११२ गाळ्यांपैकी) यांच्या कामासाठी मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांनी शिर्के सिपोरेक्स कंसोर्टियम यांच्या वतीने दिलेली ठोस रक्कम (लम्पसम) निविदा स्वीकारण्याबाबत विचार करणे.

ठराव :

---

**Item No.** 43/24 **Resolution No.**

विषय : संक्रमण शिबिरातील वांद्रा-कुर्ला संकुल येथे दिलेले गाळे/मोकळे भूखंड याबाबत झालेला महसुली तोटा

ठराव :

---

**Item No.** 43/25 **Resolution No.** 734

विषय : वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स मधील "ए" ब्लॉक मधील भूखंड परदेशस्थ भारतीयांसाठीची गृहनिर्माण योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
परदेशस्थ भारतीयांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनेच्या भूखंडावर आगाऊ अंशदान पद्धतीने (ॲडव्हान्स कॉन्ट्रिब्युशन स्कीम) गृहनिर्माणाची योजना राबविण्यात यावी व ही योजना लवकरात लवकर सुरू करण्यात यावी.

---

| Item No. | 43/26 | Resolution No. | 735 |
|---|---|---|---|

विषय : सेवाप्रदेश व पदोन्नती करावयाच्या नेमणुकीसाठी प्रादेशिक पातळीवर निवड समिती नेमण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर चर्चेत उल्लेख आलेल्या पदांबाबत विभागीय मंडळाच्या पातळीवर वर्ग ३ व वर्ग ४ मधील सेवाप्रदेश व पदोन्नतीने करावयाच्या नेमणुकांकरिता खालीलप्रमाणे निवड समिती नेमण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) सभापती/विभागीय मंडळ | — | समितीचे सभापती |
| २) मुख्य अधिकारी/विभागीय मंडळ | — | सभासद |
| ३) मुख्य लेखाधिकारी/विभागीय मंडळ | — | सभासद |
| ४) जेष्ठतम कार्यकारी अभियंता/ विभागीय मंडळ | — | सभासद |
| ५) सचिव/प्राधिकरण किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी | — | सभासद |
| ६) प्रशासकीय अधिकारी/विभागीय मंडळ किंवा प्रशासनविषयक काम पाहणारा सर्वात वरिष्ठ अधिकारी | — | सभासद, सचिव |

| Item No. | 43/27 | Resolution No. |
|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाट) नियम १९८१ मधील नियम १३ मध्ये विभिन्न गटांसाठी विहित केलेल्या आरक्षणांपैकी अंध व शारीरिकदृष्ट्या अपंग लोकांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ देण्याची कक्षा वाढविण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 43/28 | Resolution No. | 736 |
|---|---|---|---|

विषय : श्री. बी. आर. विजन, कार्यकारी अभियंता यांचे विरुद्धची विभागीय चौकशी

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. विजन, कार्यकारी अभियंता, श्री. देवधर, उपअभियंता यांचे विरुद्ध सुरु करण्यात आलेल्या विभागीय चौकशीच्या प्रकरणात उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांनी कागदपत्र अभ्यासून चौकशीची गरज आहे काय, त्याचप्रमाणे त्यांचेविरुद्ध संयुक्त चौकशी करावी की वेगवेगळी करावी यासंबंधी निर्णय घ्यावा.

**Item No.** 43/29 **Resolution No.** 737

विषय : श्री. व्ही. टी. घारपुरे, कनिष्ठ अभियंता यांचे विरुद्ध विभागीय चौकशी

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. व्ही. टी. घारपुरे, कनिष्ठ अभियंता, कुर्ला, उपविभाग (१) यांचे विरुद्ध सुरू करण्यात आलेली विभागीय चौकशी श्री. घारपुरे हे प्राधिकरणाच्या सेवेतच नसल्यामुळे बंद करण्यात यावी.

---

**Item No.** 43/30 **Resolution No.**

विषय : श्री. आर. एन. भाऊसकर, सहाय्यक मिळकत व्यवस्थापक यांचे विरुद्धची विभागीय चौकशी

ठराव :

---

**Item No.** 43/31 **Resolution No.** 738

विषय : संत तुकाराम नगर, पिंपरी येथील नागरी गृहनिर्माण -ब प्रकारच्या ८७ अल्प उत्पन्न गटातील गाळ्यांच्या बांधकामाचे काम, सध्या त्याच ठिकाणी २२७ गाळ्यांचे (४६८ गाळ्यांपैकी) बांधकाम करीत असलेले श्री. बी. डी. देखाणे या कंत्राटदारांना देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पिंपरी, पुणे येथील नागरी गृहनिर्माण -ब प्रकारच्या ८७ अतिरिक्त गाळ्यांच्या बांधकामाचे काम सध्या त्याच ठिकाणी २२७ गाळ्यांचे (४६८ गाळ्यांपैकी) बांधकाम करीत असलेल्या श्री. बी. डी. देखाणे या कंत्राटदारांना त्या कंत्राटाची व्याप्ती वाढवून देण्यात यावी.

---

**Item No.** 43/32 **Resolution No.**

विषय : नेहरूनगर, कुर्ला येथील समाजमंदिरासाठी द्यावयाच्या भूखंडासंबंधी शासनास पाठवावयाच्या पत्रांचा मसुदा

ठराव :

---

**Item No.** 43/33 **Resolution No.**

विषय : वसाहतीतील भूखंडाबाबत दिलेल्या आदेशाबाबत मुंबई मंडळाची कार्यवाही.

ठराव :

---

**Item No.** 43/34 **Resolution No.** 739

विषय : श्रीमती कमलेश ठाकोर, सहाय्यक विधी सल्लागार/प्राधिकरण यांच्या वैद्यकीय खर्चाच्या बिलाच्या प्रतिपूर्तीचा विलंब क्षमापित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) श्रीमती कमलेश ठाकोर, सहाय्यक विधी सल्लागार/प्राधिकरण यांची वैद्यकीय खर्चाची देयके दाखल करण्यास झालेला दोन दिवसांचा विलंब क्षमापित करण्यात यावा.
(ब) यापुढे अशा प्रकारे काही विलंब झाल्यास तो क्षमापित करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात यावेत.

---

**Item No.** 43/35 **Resolution No.**

विषय : श्री. जी. व्ही. देशपांडे, उपमुख्य अभियंता यांचे विरुद्धची विभागीय चौकशी

ठराव :

---

**Item No.** 43/36 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करणे.

ठराव :

---

**Item No.** 43/37 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७५ मध्ये सुधारणा करणे.

ठराव :

---

**Item No.** 43/38 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (भू-वितरण) नियम १८९१ मध्ये सुधारणा करणे.

ठराव :

---

**Item No.** 43/39 **Resolution No.**

विषय : गाळ्यांचे भाडे, भाडे खरेदीचा हप्ता किंवा इतर देय असलेल्या रकमा भाडेकरूंनी वेळेवर न भरल्यास दंड आकारण्यासाठी नियम तयार करणे.

ठराव :

---

**Item No.** 43/40 **Resolution No.** 740

विषय : प्राधिकरण व विभागीय मंडळांमधील कर्मचाऱ्यांचा क्रीडा महोत्सव

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कर्मचाऱ्यांच्या नागपूर येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सवासाठी रुपये १०,००० एकरकमी अनुदान देण्यात यावे.

---

**Item No.** 43/41 **Resolution No.** 741

विषय : चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथे ९० हेक्टर जमिनीचे पुनःप्रापण करणे - चारकोप, कांदिवली (पश्चिम) येथील जमिनीचा विकास करण्यासाठी गट क्र. १, २, ३ व ४ च्या कामासाठी आलेल्या निविदांचा विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

(१) चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील जमिनीचा विकास करण्यासाठी गट क्र. १, २, ३ व ४ च्या कामासाठी खालील कंत्राटदारांनी निविदा खाली दिलेल्या अटींवर स्वीकृत करण्यात येत आहे.

| गट क्र. | ज्या कंत्राटदारांनी निविदा स्वीकृत केली त्यांचे नाव | टक्केवारी | स्वीकृत केलेल्या निविदेची एकक्म रु. |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १) | मे. मोतीराम बुधरमल | ४.१ टक्के कमीची | १,३१,०३,०८० |
| २) | मे. जे. पी. एन्टरप्रायझेस | ४.१ टक्के कमीची | १,१३,३२,३११ |
| ३) | मे. प्रकाश प्रॉपर्टीज प्रा. लि. | १.५३ टक्के कमीची | १,२२,०८,३४९ |
| ४) | मे. न्यू. महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन | ३.७७ टक्के कमीची | ८४,२५,०१८ |

(संबंधित कंत्राटदारांनी त्यांच्या निविदेतील दर १.१० टक्के कमी करून खाली आणून तो ३.७७ टक्के कमी असा केला पाहिजे.)

ज्या अटींवल वरील निविदा स्वीकृत केलेल्या आहेत, त्या अटी खालीलप्रमाणे राहतील.

(१) मे. न्यू. महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन कंपनी यांना अशी विनंती करण्यात यावी की, गट क्र. ४ च्या कामासाठी त्यांनी त्यांचा निविदेतील १.१० टक्के कमीचा दर आणखी कमी करून निम्नतम निविदादारांच्या निविदेतील दराइतका म्हणजे ३.७७ टक्के कमी असा करून घ्यावा. अशा रीतीने निविदेतील दर कमी करण्याची सदर कंत्राटदारांची तयारी त्यांच्याकडून लेखी घेण्यात यावी.

(२) जागतिक बँकेच्या अटीनुसार या निविदांचे मूल्यमापन आणि प्राधिकरणाने या निविदांबाबत घेतलेला निर्णय जागतिक बँकेला कळविण्यात यावा व संबंधित कंत्राटदारांना त्यांची निविदा स्वीकृत केल्याबाबतचा निर्णय जागतिक बँकेकडून मान्यता मिळाल्याशिवाय कळविण्यात येऊ नये.

(३) शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ज्या कंत्राटदारांनी नोंदणीकृत कंत्राटदार म्हणून नोंदणी करून घेतलेली नाही, अशा कंत्राटदारांकडून योग्य त्या मूल्याचे ''पतदारी प्रमाणपत्र'' (सॉल्हन्सी सर्टिफिकेट) मिळविण्यात यावे आणि त्याची पडताळणी करून ते कार्यालयाच्या कागदपत्रात समाविष्ट करण्यात यावे व त्यानंतरच संबंधित कंत्राटदारांना कंत्राट देण्यात यावे. (मे. प्रकाश प्रॉपर्टिज प्राइव्हेट लिमिटेड, मे. जे. पी. एन्टरप्रायजेस आणि मे. न्यू. महराष्ट्र कन्स्ट्रक्शन कंपनी)

यानंतर श्री. सिनईकर, सदस्य व श्री. जे. पी. केसकर, सदस्य माननीय अध्यक्षांचे परवानगीने सभेतून गेले.

**Meeting No.** 44 **Meeting Date** 23/Nov/1

**Item No.** 44/1 **Resolution No.** 746

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २९.१०.१९८२ रोजी झालेल्या ४३व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण, गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. विनियमातील या सुधारणेत शासनाची पूर्वसंमती आवश्यक असल्यामुळे त्यासाठी त्या शासनाकडे पाठवाव्यात.
वरील दुरुस्त्यांसह कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आला.

**Item No.** 44/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार करावयाच्या कार्यवाहीचा पाठपुरावा.

ठराव :

**Item No.** 44/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही न करण्यात आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 44/4 **Resolution No.**

विषय : उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना प्रदान केलेले विशेष वेतन वसूल करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 44/5 **Resolution No.** 747

विषय : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पार पाडावयाच्या योजना उपमुख्य अधिकारी या दर्जाचे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) जागतिक बँकेच्या प्रकल्पासाठी ६८०-१५०० या वेतनश्रेणीमध्ये उपमुख्य अधिकारी (गलिच्छ वस्ती सुधार, जागतिक बँक प्रकल्प) हे पद निर्माण करण्यात यावे.
(ब) श्री. व्ही. एस. मुंजे, सेवानिवृत्त अवर सचिव यांची या पदावर नेहमीच्या अटींवर पुनर्नेमणूक करण्यात यावी व ही नेमणूक प्रथमावस्थेत सहा महिन्यांसाठी करावी.
व
(क) ज्या व्यक्तीचे काही विशिष्ट क्षेत्रातील विशिष्ट ज्ञान आहे अशा व्यक्ती सोडून इतर कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही पदावर सेवानिवृत्तीनंतर पुनर्नेमणूक करण्यात येऊ नये.

**Item No.** 44/6 **Resolution No.** 748

विषय : सेवा प्रवेशासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता नसलेल्या कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीतील परिच्छेद ४ मध्ये सेवाभरती करण्यासाठी विविध विभागांच्या विविध कनिष्ठ पदांना ठरविण्यात आलेल्या आवश्यक त्या किमान शैक्षणिक अर्हतेस मान्यता देण्यात येते.
वर चर्चेत उल्लेख केल्याप्रमाणे कनिष्ठ अभियंता पदासाठी आवश्यक असलेली किमान शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहेत.
स्थापत्य अभियांत्रिकी किंवा विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी किंवा पदविका. तसेच सर्वेअर, तांत्रिक सहाय्यक वगैरे कनिष्ठ पदांवर काम करणाऱ्या योग्य त्या कालावधीची सेवा झाल्यानंतर प्राधिकरणाने विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण होऊन कनिष्ठ अभियंता म्हणून बढती मिळाल्याची शैक्षणिक अर्हता.

---

**Item No.** 44/7 **Resolution No.**

विषय : अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेखालील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी बांधलेल्या इमारतीतील व्यापारी उपयोगासाठी भाडेतत्त्वावर दिलेल्या गाळ्यांची विक्री.

ठराव :

---

**Item No.** 44/8 **Resolution No.**

विषय : वाहनभत्त्याचे दर सुधारणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 44/9 **Resolution No.**

विषय : माहिम मच्छिमार येथील वसाहतीमध्ये गॅस सिलिंडरच्या साठा करण्यासाठी भारत पेट्रोलियम यांना भूखंड देण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 44/10 **Resolution No.** 749

विषय : नागपूर येथील वसाहतीमधील भूखंड (निवासी तसेच सार्वजनिक उपयोगाचे) महापालिकेस हस्तांतरण करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे व वर चर्चा झाल्याप्रमाणे नागपूर येथील प्राधिकरणाच्या वसाहतीतील
(अ) निवासी भूखंड भाडेतत्त्वावर महापालिकेला हस्तांतरित करण्यात यावेत.
(ब) निवासी भूखंडाशिवाय इतर भूखंड व सार्वजनिक उपयोगाच्या जागा मालकी तत्त्वावर हस्तांतरित करण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात येते व त्यासंबंधीचा योग्य तो प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

---

**Item No.** 44/11 **Resolution No.** 750

विषय : चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथे ९० हेक्टर जमिनीचे पुन:प्रापण करणे चारकोप कांदिवली (पश्चिम) येथील जमिनीचा विकास करण्यासाठी गट क्र. ३ व ४ च्या कामासाठी आलेल्या निविदांचा फेरविचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(१) चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई येथील जमिनीचा विकास करण्यासाठी गट क्र. ३ व ४ च्या कामासाठी खालील कंत्राटदारांची निविदा स्वीकृत करण्यात येत आहे. याबाबतीतील प्राधिकरणाच्या दिनांक २९ ऑक्टोबर १९८३ रोजी झालेल्या ठराव क्र. ७४१ मध्ये या दोन गटाच्या कामाच्या कंत्राटदारांच्या नियुक्तीमध्ये त्यानुसार बदल करण्यात येत आहे.

| गट क्र. | ज्या कंत्राटदाराची निविदा स्वीकृत केली त्याचे नाव | टक्केवारी | स्वीकृत केलेल्या निविदेची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| ३) | मे. न्यू. महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन कंपनी | १.५३ टक्के कमीची | १,२२,०८,३४९ |
| ४) | मे. प्रकाश बिल्डिंग असोसिएटस् प्रा. लि. | ३.७७ टक्के कमीची | ८४,२५,०९८ |

(२) वरील कंत्राटदारांना त्यांच्या निविदा स्वीकृत केल्याची पत्रे पाठवावीत व त्याचबरोबर जागतिक बँकेला गट क्र. ३ व ४ च्या कामांच्या कंत्राटदारांच्या नियुक्तीत केलेला हा बदल कळविण्यात यावा.

**Item No.** 44/12 **Resolution No.** 751

विषय : जागतिक बँक अंमलबजावणी
१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८१ मध्ये सुधारणा करणे.
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८२ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८२ मध्ये सुधारणा करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. सुधारीत विनियमांचे प्रारुप शासनाकडे पूर्वसंमतीसाठी पाठविण्यात यावे.

**Item No.** 44/13 **Resolution No.** 752

विषय : महाराष्ट्र शासनाच्या वतीने हाती घ्यावयाच्या उस्मानाबाद, परभणी, भंडारा, लातूर, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, नांदेड व सातारा या जिल्ह्यांतील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

बाब टिप्पणीच्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या महाराष्ट्र शासनाच्या वतीने हाती घेण्यात यावयाच्या उस्मानाबाद, परभणी, नांदेड, भंडारा, लातूर, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर व सातारा या जिल्ह्यांतील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी "हुडको"कडून एकूण ६३.८९ लक्ष रुपये कर्ज घेण्यात प्राधिकरण अनुमती व अधिकृती देत आहे.

इतर विषय :

(अ) या विषयाच्या चर्चेनंतर श्री. हुले यांनी नेहरूनगर येथे समाजमंदिराच्या भूखंडांच्या वाटपाबाबतचा प्रश्न उपस्थित केला. अध्यक्ष/प्राधिकरण यांचेकडे बर्वे मार्ग दुकानदार संघ, कुर्ला (पूर्व) व श्री. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (पूर्व उत्तर विभाग) नेहरूनगर, कुर्ला यांचेतर्फे देण्यात आलेली दोन पत्रेही प्राधिकरणासमोर ठेवण्यात आली. सचिव/प्राधिकरण यांनी नेहरूनगर येथील संस्थांचेबाबत धर्मादाय आयुक्त यांचे कचेरीकडे प्राधिकरणाच्या मागील आदेशानुसार पत्रव्यवहार केला होता व त्या पत्राचे उत्तर बैठकीच्या दिवशीच आले आहे असे सांगितले. प्राधिकरणाने यावर संपूर्ण कागदपत्र तपासून ही बाब पुढील बैठकीत ठेवावा असे आदेश दिले.

(ब) प्राधिकरणाने मुंबई, पुणे, नागपूर वगैरे शहरातील निरनिराळ्या कारणासाठी राखून ठेवलेले भूखंड तसेच निवासी उपयोगाकरिता राखून ठेवलेल्या भूखंडाची एक यादी बनवावी व त्यानुसार त्या भूखंडांचा योग्य तो उपयोग करण्याचे दृष्टीने कार्यवाही करावी असे आदेश दिले.

(क) मागील बैठकीत चर्चा झाल्यानुसार अध्यक्ष/प्राधिकरण, उपाध्यक्ष/प्राधिकरण तसेच मुंबई मंडळाचे सभापती व उपसभापती यांनी एकत्र बसून मुंबई मंडळाच्या काही अडचणींबाबत चर्चा करावयाची आहे, ती बैठक लवकर घेण्यात यावी असेही प्राधिकरणाने सुचविले.

(ड) प्राधिकरणाच्या सेवेत आजपर्यंत प्रतिनियुक्तीवर असलेले मुख्य अभियंता श्री. फडके यांची चार वर्षांची मुदत संपल्यामुळे शासनाने त्यांना त्यांच्या मूळ खात्यात प्रत्यावर्तित केल्यामुळे ते ३० नोव्हेंबर १९८३ पासून प्राधिकरणाच्या सेवेतून मुक्त होणार असल्याचे अध्यक्ष/प्राधिकरण यांनी सांगितले. श्री. फडके, प्राधिकरणाच्या सेवेत असताना त्यांनी गौरवास्पद कामगिरी केली असल्याचा उल्लेख करून श्री. फडके यांची उणीव प्राधिकरणाला भासेल असेही मत त्यांनी व्यक्त केले. श्री. फडके यांच्या सेवेचा असा गौरव करून प्राधिकरणातर्फे पुष्पगुच्छ अर्पण करण्यात येऊन त्यांना सुयश चिंतण्यात आले. याचवेळी प्राधिकरणाचे आलेले नवीन उपाध्यक्ष श्री. पी. एस. ए. सुंदरन् यांनाही पुष्पगुच्छ देण्यात येऊन त्यांचे स्वागत करण्यात आले व प्राधिकरणातर्फे त्यांना संपूर्ण सहकार्य मिळेल असे आश्वासन देण्यात आले. त्याचप्रमाणे त्यांचेकडूनही प्राधिकरणाच्या कार्याला हातभार लागेल असाही विश्वास व्यक्त करण्यात आला.

प्राधिकरणाची यापुढील बैठक दिनांक २० डिसेंबर १९८३ रोजी सकाळी १०.०० वाजता मुंबई येथे घेण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

उपस्थितांना अध्यक्षांचे व अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.** 45 **Meeting Date** 20/Dec/1

**Item No.** 45/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २३.११.१९८३ रोजी झालेल्या ४४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 45/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावरील पाठपुराव्याचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 45/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर पाठपुरावा करण्यात न आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 45/4 **Resolution No.**

विषय : माहिम मच्छिमार येथील वसाहतीमध्ये गॅस सिलिंडरचा साठा करण्यासाठी भारत पेट्रोलियम यांना भूखंड देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 45/5 **Resolution No.** 753

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचनेची कामे निधी अभावी खोळंबून न रहाण्यासाठी उपाययोजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्वसाधारण विमा महामंडळाकडून रुपये १० कोटी कर्ज घेण्यास तात्त्विक मान्यता देण्यात येते. तसेच कर्जासंबंधीचा तपशील ठरवण्याचे व मंडळाबरोबर करार करण्याचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना अधिकार प्रदान करण्यात यावेत.

**Item No.** 45/6 **Resolution No.**

विषय : निविदा स्वीकृतीबाबत नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने केलेल्या सूचनेवर विचार करणे.

ठराव :

| Item No. | 45/7 | Resolution No. | 754 |
|---|---|---|---|

विषय : सोलापूर येथे विडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सोलापूर येथे विडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी सोलापूर-हैद्राबाद रस्त्याच्या हद्दीबाहेर असलेल्या या योजनेच्या नियोजित जागेसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात यावी अशा तऱ्हेचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा व यासंबंधीची पुढील सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात यावेत.

| Item No. | 45/8 | Resolution No. | 755 |
|---|---|---|---|

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण, सोलापूर, अधिसूचित क्षेत्रातील भूसंपादनाची कक्षा ठरविणे आणि प्रकल्पांच्या आर्थिक परिणामाचा विचार करणे आणि नियोजन समितीची नेमणूक करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) प्रारुप प्रस्तावावर आलेल्या हरकती व सूचना ऐकून घेण्यासाठी व प्राधिकरणास प्रारुप नियोजनाबद्दल अंतिम प्रस्ताव देण्यासाठी खालीलप्रमाणे सदस्यांची उपसमिती नियुक्त करण्यात यावी.
(१) उपाध्यक्ष/प्राधिकरण
(२) श्री. खुशालराव मोलाके
(३) श्री. अतुल हुले
(ब) बाब टिप्पणीला जोडलेल्या प्रस्तावातील क्रमांक २ ते ४ मध्ये भूसंपादनासंबंधी ठरविण्यात आलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

| Item No. | 45/9 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : इस्लामपूर येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेल्या ५० गाळ्यांच्या वाटपाबाबत.

ठराव :

| Item No. | 45/10 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : जमाते-ओ-जम्हुरिया, वांद्रे (पश्चिम) लगतची जागा ॲबझॅक फाऊंडेशन यांना नियोजित वेल्फेअर सेंटर, शाळा, दवाखाने, सांस्कृतिक केंद्र इत्यादी कारणासाठी देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 45/11 **Resolution No.** 756

विषय : "कांचन-गंगा" सहकारी गृहनिर्माण सोसायटी या एअरइंडियाच्या कर्मचाऱ्यांच्या सोसायटीस जमीन व इमारत गहाण ठेवण्याची परवानगी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) निवासी उपयोगासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्यात आलेल्या भूखंडांवर इमारत बांधण्यासाठी कर्ज उभे करण्याकरिता भूखंड गहाण ठेवण्याची आवश्यकता असल्यास व तशी परवानगी मागणारा अर्ज सदर संस्थेने केल्यास तशी परवानगी प्राधिकरणाचे हितसंबंध सुरक्षित ठेऊन देण्यात यावी.
(ब) अशी परवानगी देण्यासंबंधीचे अधिकार प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष व विभागीय मंडळांच्या मुख्य अधिकाऱ्यांना देण्यात यावेत.
(क) कांचन-गंगा सहकारी गृहनिर्माण सोसायटी या संस्थेला देण्यात आलेला निवासी भूखंड एअरइंडिया या संस्थेकडे कर्ज उभे करण्यासाठी गहाण ठेवण्यास त्या सोसायटीस परवानगी देण्यात यावी.

---

**Item No.** 45/12 **Resolution No.**

विषय : विभागीय मंडळांच्या अशासकीय सदस्यांना बैठक भत्ता व प्रवासभत्ता वाढविणेबाबत.

ठराव :

---

**Item No.** 45/13 **Resolution No.**

विषय : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने हाती घेण्यात यावयाचे प्रकल्प - श्री. डब्ल्यू. डी. भिडे यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक करण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 45/14 **Resolution No.**

विषय : अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली इमारतीत दुकाने इत्यादी व्यापारी उपयोगासाठी दिलेल्या गाळ्यांची विक्री.

ठराव :

---

**Item No.** 45/15 **Resolution No.** 757

विषय : वांद्रे पुनःप्रापणक्षेत्र, वांद्रे (पश्चिम) येथे उच्च उत्पन्न गटासाठी बांधण्यात येत असलेल्या इमारतींची विक्री भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळाला करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्वसाधारण विमा महामंडळाला वांद्रा-पुनःप्रापण क्षेत्रात तयार होणाऱ्या इमारतींपैकी दोन इमारतीतील ५६ गाळे त्यांच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने म्हणून वापरण्याच्या अटीवर एकरकमी पद्धतीने विकण्यात यावेत.

---

| Item No. | 45/16 | Resolution No. | 758 |
|---|---|---|---|

विषय : वांद्रा (पूर्व) येथील जी-९ या भूखंडावर बांधण्यात येणाऱ्या कार्यालय इमारतीच्या जागेचे वाटप व किंमत ठरविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जी-९ वांद्रे (पूर्व), येथील कार्यालयीन इमारतींच्या गाळ्यासाठी आकारावयाच्या किंमतीबाबतचा मुद्दा त्याच इमारतीतील गाळेवाटपासाठी नेमलेल्या समितीने विचारात घ्यावा व त्यावर अंतिम निर्णयही घ्यावा.

| Item No. | 45/17 | Resolution No. | 759 |
|---|---|---|---|

विषय : मुलुंड-मुंबई येथील संमिश्र गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत तसेच सदर कर्जास तारण म्हणून याच योजनेतील जमीन व तीवर होणारे बांधकाम हुडकोकडे गहाण ठेवण्यास प्राधिकरणाची अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणी सोबतच्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या मुलुंड, मुंबई येथील संमिश्र गृहनिर्माण योजनेसाठी हुडको या संस्थेकडून ८१.६० लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते. तसेच सदर कर्जास तारण म्हणून याच योजनेतील जमीन व त्यावर होणारे बांधकाम गहाण ठेवण्यास बाब टिप्पणीस जोडण्यात आलेल्या हुडकोच्या विहित नमुन्यानुसार ठराव मंजूर करून अधिकृती देण्यात येते.

| Item No. | 45/18 | Resolution No. | 760 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र शासनाच्या वतीने हाती घ्यावयाच्या वर्धा, जळगांव, जालना आणि नागपूर या जिल्ह्यांतील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या महाराष्ट्र शासनाच्या वतीने हाती घ्यावयाच्या वर्धा, जळगांव, जालना व नागपूर या जिल्ह्यांतील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण ५६.८६ लक्ष रुपये कर्ज घेण्यास प्राधिकरण अनुमती व अधिकृती देत आहे.

| Item No. | 45/19 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१.
गाळ्यांच्या हस्तांतरण परवानगी देताना आकारावयाच्या अधिमूल्याचे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने सुचविलेले वाढीव दर.

ठराव :

**Item No.** 45/20 **Resolution No.** 761

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या विभागीय मंडळांना १९८३-८४ या आर्थिक वर्षातील नोव्हेंबर १९८३ पर्यंत भाडे / भाडे खरेदीचे हप्ते वसूल करण्याबाबत आढावा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कर्मचाऱ्यांना आंतरमंडळ क्रीडा महोत्सवाला पूर्वी मंजूर केल्याप्रमाणे रुपये १०,००० (रुपये दहा हजार) अनुदानाव्यतिरिक्त आणखी रु. ५,००० (रुपये पाच हजार) अनुदान मंजूर करण्यात यावे. मात्र वाढीव अनुदानाची ही रक्कम महोत्सवाचा एकूण हिशेब पाहिल्यावर त्यानुसार देण्यात यावा.
(२) त्यानंतर श्री. खुशालराव मोताळे, सदस्य यांनी सचिव/प्राधिकरण यांच्या नावे दिलेल्या पत्रावर चर्चा झाली. श्री. मोताळे यांनी आपल्या पत्रात कर्मचाऱ्यांना निवासी गाळे मालकी हक्काने द्यावेत अशी विनंती केली होती. त्यावर विचार करताना प्राधिकरणाने असे विचार व्यक्त केले की, सेवानिवासस्थान म्हणून दिलेले गाळे मालकी हक्काने करून दिल्यावर मग नवीन येणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने उपलब्ध होणार नाहीत. बांधलेल्या गाळ्यांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी जे दोन टक्केचे आरक्षण आहे याचा उपयोग करून घेऊन कर्मचाऱ्यांनी घरे मालकी हक्काने मिळवावीत. यावर बोलताना श्री. अतुल हुले, सदस्य यांनी बहुसंख्य कर्मचारी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक किंवा अल्प उत्पन्न गट या दोन्ही गटामध्ये वसत नाहीत व आपला मोठा कार्यक्रम हा या दोन गटांपुरताच मर्यादित असल्याने या आरक्षणाचा पुरेपूर फायदा कर्मचाऱ्यांना घेता येत नाही, असे निदर्शनास आणले. यावर विचार करताना प्राधिकरणाने कर्मचाऱ्यांसाठी आवश्यकता व उपलब्धता असल्यास भूखंड देण्याबाबत विचार केला जावा असे विचार व्यक्त केले. प्रत्येक मंडळातून अशी मागणी आल्यास ती स्वतंत्रपणे तपासून प्राधिकरणापुढे ठेवण्यात यावी असे आदेश देण्यात आले.
यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे व अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.** 46 **Meeting Date** 04/Feb/1

**Item No.** 46/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २०-१२-१९८३ रोजी झालेल्या ४५व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 46/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावरील पाठपुराव्याचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 46/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर पाठपुरावा करण्यात न आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 46/4 **Resolution No.** 762

विषय : दिवंगत झालेल्या किंवा क्षयरोग, कर्करोग इत्यादी गंभीर आजारामुळे मुदतपूर्व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास नेमणूक देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) प्राधिकरणाच्या दिवंगत झालेल्या किंवा क्षयरोग, कर्करोग इत्यादी गंभीर आजारामुळे मुदतपूर्व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास नेमणूक देण्याबाबत केलेल्या योजनेत बाब टिप्पणीत दर्शविलेल्या शासनाच्या निरनिराळ्या आदेशानुसार झालेले बदल अंतर्भूत करण्यात यावेत.
व,
(ब) यापुढे शासनाने आपल्या योजनेत असे बदल केल्यास त्यानुसार प्राधिकरणाच्या योजनेत बदल करावयाचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी तथा उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येतात.

**Item No.** 46/5 **Resolution No.** 763

विषय : निवासी लेखा अधिकारी यांच्याकडून औरंगाबाद मंडळाच्या कार्यालयाचा निरीक्षण अहवाल - वाहन क्र. २६०० च्या संबंधाने नोंदवहीतील उतारा.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) औरंगाबाद मंडळाचे माजी सभापती श्री. एस. टी. पंडित यांनी दिनांक १२-९-१९८७ ते ३०-६-१९८१ या काळात मंडळाचे वाहन क्र. एमआरजी २६०० मधून केलेल्या १३,१०९ किलोमीटरच्या प्रवासासाठी नोंदवही (लॉग बुक) न ठेवण्याचा अनियमितपणा क्षमापित करण्यात यावा.
(ब) सर्व सभापती, विभागीय मंडळे यांना वाहनाची नोंदवही ठेवण्याची काळजी घेण्यासंबंधी सूचना पाठविण्यात याव्यात.

**Item No.** 46/6 **Resolution No.**

विषय : नाशिक येथील गोल्फ क्लबजवळ, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने बांधलेल्या कार्यालयीन इमारतीतील जागांचे वाटप.

ठराव :

---

**Item No.** 46/7 **Resolution No.**

विषय : (१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) नियम १९८१ मध्ये सुधारणा करणे.
(२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८२ मध्ये सुधारणा करणे.

ठराव :

---

**Item No.** 46/8 **Resolution No.** 764

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या कुर्ला येथील नेहरूनगर वसाहतीतील अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या इमारत क्र. ७३ च्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
इमारत क्रमांक ७३ (अल्प उत्पन्न गट) नेहरूनगर, कुर्ला या इमारतीच्या विशेष दुरुस्तीसंबंधी प्राधिकरणाने आपल्या दिनांक २-४-१९८३ च्या ठराव क्रमांक ६५५ मधील -
"१९८७ साली भाडेखरेदीचा काळ जरी संपत असला तरीही भाडेखरेदीच्या हप्त्यापोटी राहिलेली सर्व शेष रक्कम भाडेकरूंनी त्वरित जमा करावी तसेच दुरुस्तीसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चापोटी ५० टक्के रक्कम मुंबई मंडळाकडे जमा करावी."
यापैकी,
"१९८७ साली भाडेखरेदीचा काळ संपत असल्याने इतरही भाडेकरूंच्या हप्त्यापोटी राहिलेली सर्व शेष रक्कम भाडेकरूंनी त्वरित जमा करावी."
ही घालतेली अट शिथिल करण्यात यावी.
व,
भाडेकरूंनी उरलेली शेष रक्कम भाडेखरेदीच्या हप्त्यापोटी भरण्याची सवलत देण्यात यावी. मात्र भाडेखरेदी हप्त्यापोटी भरावी लागणारी रक्कम वेळेवर भरण्याचे बंधन भाडेकरूंवर टाकण्यात यावे. तसेच दिनांक ३१-१-१९८४ पर्यंतचे सर्व हप्ते भाडेकरू काम सुरू करण्याचे अगोदर भरतील याची दक्षता घ्यावी.

---

**Item No.** 46/9 **Resolution No.**

विषय : नागपूर मंडळाच्या अशासकीय सदस्यांच्या अटी व सवलतीबाबत.

ठराव :

---

**Item No.** 46/10 **Resolution No.**

विषय : सभापती/विभागीय मंडळे यांचेकडून होत असलेल्या वाहनांचे वापराबाबत.

ठराव :

**Item No.** 46/11 **Resolution No.**

विषय : वांद्रा (पूर्व) येथील जी-९ या भूखंडावर बांधण्यात येणाऱ्या कार्यालयीन इमारतीच्या जागेचे वाटप व किंमत ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 46/12 **Resolution No.** 765

विषय : महाराष्ट्र शासनाच्या वतीने हाती घ्यावयाच्या बीड व औरंगाबाद या जिल्ह्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या महाराष्ट्र शासनाच्या वतीने हाती घ्यावयाच्या बीड व औरंगाबाद (पार्ट १) या जिल्ह्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण २३.२२ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येत आहे.

**Item No.** 46/13 **Resolution No.** 766

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेतून श्री. खिल्लारे, स. नं. ९१, आंगणगाव, ता. येवले, जिल्हा नाशिक यांना त्यांच्या हद्दीत जाणेयेणेसाठी वाट (अक्सेस) देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्वे नंबर ९१, आंगणगाव, तालुका येवले, जिल्हा नाशिक यांचे मालक श्री. खिल्लारे यांना प्राधिकरणाच्या ताब्यातील जागेतून जाण्यायेण्यासाठी वाट देण्यात यावी.

**Item No.** 46/14 **Resolution No.**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजनेच्या वसाहतीच्या आराखड्यात मुलींच्या प्राथमिक शाळेसाठी आरक्षित केलेल्या भूखंडाच्या वितरणाबाबत.

ठराव :

**Item No.** 46/15 **Resolution No.** 767

विषय : गोराई रोड, बोरिवली (पश्चिम) येथील वसाहतीतील सुशिक्षित बेकारांनी उभारलेले अनधिकृत स्टॉल्स नियमाधिन करणे व त्यांना त्या वसाहतीमधील शॉपिंग सेंटरमध्ये सामावून घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाने त्यांच्या ५७व्या बैठकीतील निर्णय क्रमांक ७३२ नुसार गोराई रोड, बोरिवली (पश्चिम) येथील वसाहतीतील अनधिकृत स्टॉल्स नियमाधिन करण्याबाबत व त्यांना वसाहतीतील शॉपिंग सेंटरमध्ये सामावून घेण्याबाबत केलेल्या ठरावास अनुमती देण्यात येते. मंडळाने ठराव क्रमांक ७३२ मध्ये ठरविलेल्या पद्धतीने स्टॉल्सचे वाटप करून, तसेच अनधिकृत स्टॉल्स हटविल्याबरोबर वसाहतीतील रस्ते महापालिकेच्या ताब्यात देण्याची काळजी घेण्यात यावी.

---

**Item No.** 46/16 **Resolution No.**

विषय : मुंबई मंडळाच्या मिळकत व्यवस्थापन विभागातील तसेच प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकारी यांच्या कार्यालयातील वरिष्ठ सहाय्यक ही पदे पर्यवेक्षी पदे ठरविण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 46/17 **Resolution No.** 768

विषय : श्री. सी. जी. कुलाट, सेवानिवृत्त कारकून, यांचेवरील खातेनिहाय चौकशीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) श्री. कुलाट यांच्या विरुद्धची चौकशी ते सेवेत नसल्याने बंद करण्यात यावी.
व,
(ब) श्री. कुलाट यांचा दिनांक १-९-१९७६ ते १-२-१९७७ हा कालावधी सेवाकाळ (ड्युटी) समजण्यात यावा.

---

**Item No.** 46/18 **Resolution No.**

विषय : वांद्रे पुनःप्रापण क्षेत्र, वांद्रे (पश्चिम) येथे उच्च उत्पन्न गटासाठी बांधण्यात येत असलेल्या इमारतींची विक्री भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळाला करणे.

ठराव :

---

**Item No.** 46/19 **Resolution No.**

विषय : मुंबई गृहनिर्माण व कोकण गृहनिर्माण मंडळाच्या स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समित्या.

ठराव :

**Item No.** 46/20 **Resolution No.** 769

विषय : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाला कन्नमवारनगर येथे जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(अ) कामगार कल्याण मंडळाने मागणी केल्यानुसार वार्षिक रुपये १/- भाड्यावर २,५१० चौ. वार क्षेत्रफळाचा भूखंड कामगार कल्याण मंडळाला देण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.
(ब) १५७३ चौ. वार क्षेत्रफळाच्या पूर्वी देण्यात आलेल्या भूखंडाबाबत वेगळा विचार करून तो भूखंड वेगळ्या कारणाकरिता वापरण्याबाबतचा प्रस्ताव मुंबई मंडळाने तयार करावा
व,
(क) कामगार कल्याण मंडळाला अशा प्रकारची सवलत धोरण म्हणून इतरत्र देण्यात यावी व याबद्दल सुद्धा शासनाची मान्यता घ्यावी.

---

**Item No.** 46/21 **Resolution No.** 770

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करणे. गाळ्यांची मालकी व्यक्तिगत गाळेधारकाकडे हस्तांतरित करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणी समवेत जोडण्यात आलेल्या मसुद्यानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये दुरुस्ती करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या पूर्वसंमतीसाठी पाठविण्यात यावा.

---

**Item No.** 46/22 **Resolution No.** 771

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करणे. (सोडत काढल्यानंतर अर्जांची छाननी करणे.)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाकडून आलेल्या सूचनेनुसार विनियमांत योग्य ते बदल करण्यात यावेत.

---

**Item No.** 46/23 **Resolution No.**

विषय : कामाठीपुरा नागरी नूतन योजनेसाठी प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून झालेली नियुक्ती व त्याबाबत फेरविचार.

ठराव :

---

**Item No.** 46/24 **Resolution No.**

विषय : सोलापूर येथे विडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

ठराव :

---

| **Item No.** | **46/25** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : श्री. एस. जी. भगाडे, प्रतिनियुक्तीवरील कार्यकारी अभियंता यांची सेवानिवृत्तीनंतर प्राधिकरणात पुनर्नेमणूक करण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **46/26** | **Resolution No.** | **772** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाकडून विनियम ९ बाबत असलेली सूचना स्वीकारण्यात यावी व विनियम २८ बाबत शासनाकडून आलेली सूचना स्वीकारण्याबाबत असलेल्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

| **Item No.** | **46/27** | **Resolution No.** | **773** |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरण कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य देण्याची योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाकडून आलेल्या सुधारीत विनियमांना मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **46/28** | **Resolution No.** | **774** |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पार पाडावयाचे प्रकल्प.
कार्यपद्धती व्यवस्थापन व वित्तीय पद्धती यामध्ये सुधारणा करण्यासाठी संमंत्रकांची नियुक्ती करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
संमंत्रकांकडून आलेल्या देकारांची छाननी व शिफारस याबाबत विचार करून संमंत्रकांची नियुक्ती करण्याबाबत व जागतिक बँकेची मंजूरी मिळाल्यावर ए. एफ. फर्ग्युसन ॲण्ड कंपनी यांचेबरोबर वाटाघाटी करण्याबाबतच्या व त्यानंतर पुढील कार्यवाहीचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात यावेत.

| **Item No.** | **46/29** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : भारतनगर (वांद्रे, पूर्व) वसाहतीमधील १००० गाळे व २१४७ गाळे अर्धविकसित भूखंडामधील रहिवाशांच्याकरिता पाणीपुरवठा व ड्रेनेज व्यवस्थेच्या सुधार कामाचे प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 46/30 **Resolution No.** 775

विषय : औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने औरंगाबाद येथे प्रिंट्रॅव्हल हॉटेलजवळ बांधलेल्या दोन इमारतींतील तळमजल्यावरील दुकानांच्या गाळ्यांचे वाटप करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
औरंगाबाद मंडळाने ठराव क्रमांक १९२ अनुसार प्रिंट्रॅव्हल हॉटेलसमोर बांधलेल्या दुकानासाठी ऑफसेट किंमतीपेक्षा कमी आलेल्या गाळ्यांच्या निविदा मंजूर करण्याबाबत घेतलेल्या ठरावाला मान्यता देण्यात यावी. तसेच २० टक्के नफ्याचे प्रमाण लक्षात घेऊन त्यानुसार आणखी काही गाळे देता येण्याबद्दल मंडळाने विचार करून प्रस्ताव पाठवावा.

**Item No.** 46/31 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने भूसंपादन करून ज्या जागा व त्यावरील मोडकळीस आलेल्या इमारती ताब्यात घेतलेल्या आहेत. अशा इमारतींची पुनर्बांधणी स्वखर्चाने करण्याबाबत पूर्वीचे मालक/भाडेकरू यांनी केलेल्या 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याच्या विनंतीबाबत.
३४ एफ/जी, भवानी शंकर रोड, पाटीलवाडी, प्लॉट नं. ३३९, जी/उत्तर विभाग, दादर येथील मालकाकडून आलेली मागणी.

ठराव :

**Item No.** 46/32 **Resolution No.** 776

विषय : मुंबई महानगरपालिकेच्या पाण्याच्या विलंबाबद्दल असलेल्या तक्रारी दूर करण्यासाठी मंडळाच्या वसाहतीमध्ये नवीन जलमापके बसविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नवीन जलमापकाच्या कामासाठी रुपये १.५५ लक्ष एवढा निधी मुंबई मंडळाला उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात यावी.

**Item No.** 46/33 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाचे बोधचिन्ह ठरविण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** 47 spl **Meeting Date** 24/Feb/1

**Item No.** 47/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ४.२.१९८४ रोजी भरलेल्या ४५व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 47/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. ४.२.१९८४ रोजी भरलेल्या ४५व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 47/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करावयाच्या कार्यवाहीचा पाठपुरावा.

ठराव :

**Item No.** 47/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करावयाच्या कार्यवाहीचा पाठपुरावा.

ठराव :

**Item No.** 47/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर पाठपुरावा करण्यात न आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 47/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर पाठपुरावा करण्यात न आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 47/4 **Resolution No.** 777

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९८४-८५ चा अर्थसंकल्प व १९८३-८४ चे सुधारलेले अंदाज.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) साईट ॲण्ड सर्व्हिसेसच्या कार्यक्रमासाठी रु. ५ लाख ही तरतूद १९८३-८४ या आर्थिक वर्षात वापरली गेली पाहिजे. १९८३-८४ च्या सुधारित अंदाजपत्रकास त्याप्रमाणे दुरुस्तीसह मंजूरी देण्यात येते.

२) १९८४-८५ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते.

**Item No.** 47/5 **Resolution No.** 778

विषय : स्टाफिंग पॅटर्न - प्राधिकरण व विभागीय मंडळे यांचेकरिता सन १९८४-८५ या वर्षाकरिता कर्मचारी वर्ग अनुसूची.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीच्या सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे प्राधिकरणात तसेच विविध विभागीय मंडळांच्या आस्थापनेवर मंजूर पदांना १९८४-९५ या वित्तीय वर्षासाठी मान्यता देण्यात येते. मात्र रिकामी पदे गरजेप्रमाणेच भरली जातील याची काळजी घ्यावी.

**Item No.** 47/6 **Resolution No.** 779

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण, सोलापूर :
१) नियोजन समिती'च्या शिफारशींचा विचार करणे व सुधारीत नियोजन प्रस्तावास मान्यता देणे.
२) विकास खर्च वसुलीच्या तात्त्विक प्रस्तावावर विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविण्यात आलेल्या सुधारीत नियोजन प्रस्तावांना व इतर सूचनांना मान्यता देण्यात येते. सदरहू योजना मान्यतेसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात यावी. तसेच पुढील कार्यवाहीसाठी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना अधिकार प्रदान करण्यात येतात.

**Item No.** 47/7 **Resolution No.** 780

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या कुर्ला येथील नेहरूनगर वसाहतीतील अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या इमारत क. ७४ च्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नेहरूनगर वसाहतीतील इ. क. ७४ ची संरचनात्मक दुरुस्ती बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे इ. क. ७३ नेहरूनगरसाठी मान्य केलेल्या अटींवर करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 47/8 **Resolution No.**

विषय : सहकारी तत्त्व आणि सामुदायिक गृहनिर्माण या विषयावरील आंतरराष्ट्रीय अभ्यासवर्ग.

ठराव :

**Item No.** 47/9 **Resolution No.** 781

विषय : रोजंदारी कामगारांना कार्यव्ययी आस्थापनेवर घेण्याबाबत.

ठराव : एकमताने असा निर्णय घेतला की,
दि. १.१०.८३ रोजी रोजंदारी आस्थापनेवर काम करणाऱ्या व २ वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना कार्यव्ययी आस्थापनेवर दि. १.१०.८३ पासून घेण्यात यावे.

**Item No.** 47/10 **Resolution No.** 782

विषय : कार्यव्ययी आस्थापनेवर ५ वर्षे पूर्ण झालेल्या कामगारांना हंगामी नियत आस्थापनेवर घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ज्या कर्मचाऱ्यांना रोजंदारी आणि कार्यव्ययी आस्थापनेवर मिळून १.१०.८३ रोजी ५ वर्षे पूर्ण झाली आहेत अशा कर्मचाऱ्यांना दि. १.१०.८३ पासून कार्यव्ययी आस्थापनेच्या हंगामी नियत आस्थापनेवर घेण्यात यावे.

---

**Item No.** 47/11 **Resolution No.** 783

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विक्री योजनेत सामील झालेल्या सर्व औद्योगिक कामगार तसेच अत्यल्प उत्पन्न गटाच्या इमारतीतील गाळेधारकांना गाळ्याची किंमत व पूर्ण थकबाकी एकरकमी दखल करून घ्यावी व यासाठी ३०.६.८४ पर्यंत मुदत देण्यात यावी. दि. १४.८० रोजी ठरविलेली गाळ्याची किंमत व थकबाकी त्यांना भरता येईल. अशा गाळेधारकांपैकी किंमतीत २० सूट दिलेल्या गाळ्यातील गाळेधारकांनी आजपर्यंत भाडेखरेदी हप्त्यापोटी जमा केलेली रक्कम या खरेदीच्या किंमतीपोटी आल्याचे धरण्यात यावे.

---

**Item No.** 47/12 **Resolution No.** 784

विषय : जमाते-ऐ-जम्बोरिया, वांद्रे (पश्चिम) लगतची जागा ॲबझॅक फाऊंडेशन यांना नियोजित वेलफेअर सेंटर, शाळा, दवाखाने, सांस्कृतिक केंद्रे इत्यादी कारणासाठी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वांद्रा पुनःप्रापण क्षेत्रातील जमाते-ऐ-जम्बोरिया या वसाहतीला लागून असलेल्या अंदाजे ६००० चौ. मीटरचा भूखंड ॲबझॅक फाऊंडेशन यांना बाब टिप्पणीत दर्शविण्यात आलेल्या कामासाठी देऊ केल्याबाबतचे पत्र त्या संस्थेला देण्यात यावे. मात्र १ महिन्याच्या कालावधीत सदर संस्थेने प्रकल्पासाठी आवश्यक असा ५० टक्के निधी जमा करणे, मुंबई महापालिका तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून प्रस्तावाला मान्यता व शासनाच्या शिक्षण खात्याकडून आवश्यक ती मान्यता या अटींची पूर्तता करणे व प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची खात्री पटवून देणे आवश्यक असल्याचे पत्रात स्पष्टपणे नमूद करावे. तसेच सदर भूखंडाचा ताबा जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी (यूजर्स लायसन्स) पद्धतीवर संस्थेस देण्यास हरकत नाही. मात्र भूखंडाबाबतचा भाडेपट्टा करारावरील अटींची पूर्तता झाल्यावरच विनियमांतील तरतुदींनुसार अंतिम केला जावा व याबाबत पूर्तता अहवाल प्राधिकरणासमोर ठेवण्यात यावा.

---

**Item No.** 47/13 **Resolution No.** 785

विषय : चाळीसगांव रोड, धुळे येथील नागरी गृहनिर्माण 'ब' योजना (योजना क्र. २६६०-सी) ८३१ गाळे या हुडको अर्थसहाय्यित योजनेत जमीन व भूविकास यावरील खर्चास अर्थसहाय्य (सबसिडी) देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
चाळीसगांव रोड, धुळे येथील नागरी गृहनिर्माण 'ब' ८३ गाळे या हुडको अर्थसहाय्यित योजनेत जमीन व भूविकास यावरील खर्चात २२५ रु. प्रति गाळा याप्रमाणे दिलेल्या योजनेअंतर्गत अर्थसहाय्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 47/14 **Resolution No.** 786

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील आरक्षित केलेल्या माध्यमिक शाळेच्या भूखंडाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) वर्सोवा एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेला माध्यमिक शाळेसाठी भूखंड देण्याबाबत प्राधिकरणाने ठराव क्रमांक ३११, दि. २४.१०.१९८० नुसार घेतलेला निर्णय रद्द करण्यात येतो,
ब) वर्सोवा एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेला भूखंड देण्याबाबतचा ठराव रद्द केल्यानंतर १९८० साली जाहिरातील अनुसरुन जे अर्ज प्राधिकरणासमोर ठेवण्यात आले होते त्यांचाच विचार भूखंड वाटपासाठी करण्यात यावा,
क) वरील 'ब' मध्ये दर्शविलेल्या अर्जापैकी 'कमल एज्युकेशन ट्रस्ट' या संस्थेला माध्यमिक शाळेसाठी राखून ठेवलेला हा भूखंड नेहमीच्या अटींशिवाय वर उल्लेख केलेल्या विशेष अटींवर देण्यात यावा. 'कमल एज्युकेशन ट्रस्ट' या संस्थेने फीच्या दरामध्ये कपात करावी.
वरील विषयावर चर्चेनंतर प्राधिकरण सदस्यांनी पुढील बैठकीत खालील विषय निश्चितपणे चर्चेला आणावे अशी मागणी केली.
१) नेहरुनगर, कुर्ला येथील समाजमंदिरासाठी द्यावयाचा भूखंडाचे वाटप,
२) इर्ला एज्युकेशन कमिटी ऑफ एन. एस. जमाते ऑफ जुहू इर्ला या संस्थेने मागणी केल्याप्रमाणे भूखंडाच्या वाटपाबाबत.
हे दोन विषय प्राधिकरणापुढे बऱ्याच दिवसांपासून द्यावयाचे राहिले आहेत असे सदस्यांनी म्हटले.
यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे व अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर सभा समाप्त झाली.

**Meeting No.** 48 **Meeting Date** 31/Mar/1

**Item No.** 48/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २४-२-१९८४ रोजी झालेल्या ४७व्या (खास) बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 48/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करावयाच्या कार्यवाहीचा पाठपुरावा करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 48/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर पाठपुरावा करण्यात न आलेल्या निर्णयाची यादी.

ठराव :

**Item No.** 48/4 **Resolution No.**

विषय : ३४-एफ/जी, भवाणी शंकर रोड, पाटील वाडी, प्लॉट नं ३३९, जी/उत्तर विभाग, दादर येथील मालकांकडून आलेली ना हरकत प्रमाणपत्राबद्दलची मागणी.

ठराव :

**Item No.** 48/5 **Resolution No.** 787

विषय : निवासी शिपायाऐवजी रोख भत्ता करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या क्रमांक सीएफएस १४७७/सीआर ५७७/ एसईआर ७ दिनांक १५ नोव्हेंबर १९७८ च्या शासन निर्णयाप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण, उपसभापती तथा उपाध्यक्ष तथा मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, सहमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण, यांचेप्रमाणेच मुख्य अभियंता/प्राधिकरण, मुंबई मंडळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (उपसचिवाचे दर्जाचे असल्यास) वित्त नियंत्रक/प्राधिकरण, विधी सल्लागार/प्राधिकरण, उपमुख्य अभियंता तथा त्याच दर्जाचे सर्व विभागीय मंडळाचे मुख्य अधिकारी या अधिकाऱ्यांना शासन निर्णयाप्रमाणे निवासी शिपायाऐवजी रुपये ६०/- रोख भत्ता देण्यात यावा. प्राधिकरणाच्या या निर्णयाची अंमलबजावणी १-४-१९८४ पासून करण्यात यावी.

| **Item No.** | **48/6** | **Resolution No.** | **788** |
|---|---|---|---|

विषय : श्रीमती शरयु ठाकूर, सभापती/मुंबई मंडळ यांच्या दिल्ली भेटीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(१) ६-१२-१९८२ ते ९-१२-१९८२ या काळात सभापती, मुंबई मंडळ यांनी दिल्ली येथे जी भेट दिली व त्या संदर्भात प्रवास खर्चही घेतलेला आहे. त्याला अपवाद म्हणून मान्यता देण्यात येते.
तसेच,
(२) ऑक्टोबर १९८३ मध्ये मुंबई मंडळाच्या सभापतींनी प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगी शिवाय दिल्लीस जी भेट दिली होती तिला अनुमती नाकारण्यात येते.

| **Item No.** | **48/7** | **Resolution No.** | **789** |
|---|---|---|---|

विषय : दिवंगत झालेल्या अथवा क्षयरोग, कर्करोग इत्यादी गंभीर आजारामुळे मुदतपूर्व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास नेमणूक देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दिवंगत झालेल्या अथवा क्षयरोग, कर्करोग इत्यादी गंभीर आजारामुळे मुदतपूर्व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास नेमणूक देण्याबाबतच्या वैयक्तिक प्रकरणाचे गुणावगुण तपासण्यासाठी खालीलप्रमाणे उपसमिती नियुक्त करण्यात यावी.
१) श्री. अमतुल लतिफा जागरअली काझी, सदस्या
२) श्री. अतुल हुले, सदस्य
३) श्री. नंदलाल, सहमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण
या उपसमितीने वैयक्तिक प्रकरणांचे गुणावगुण तपासून योग्य लोकांना नेमणुका करण्यासंबंधी प्रशासनाला शिफारस करावी व ती विचारात घेऊन उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी पुढील कार्यवाही करावी.

| **Item No.** | **48/8** | **Resolution No.** | **790** |
|---|---|---|---|

विषय : श्री. व्ही. एच. डिंगणकर, भू-व्यवस्थापक यांच्या पुनर्नेमणुकीची मुदत वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. डिंगणकर, सेवानिवृत्त जिल्हा भूमिनिरिक्षक यांची पुनर्नेमणूक दिनांक ३०-४-१९८४ पर्यंत नेमणूकीच्या पूर्वीच्याच अटींवर वाढविण्यात यावी.

**Item No.** 48/9 **Resolution No.** 791

विषय : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पार पाडावयाच्या प्रकल्पांची प्राधिकरण पातळीवर अंमलबजावणी करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने घ्यावयाच्या योजनेच्या कामाची प्राधिकरणाच्या पातळीवर अंमलबजावणी करण्यात येईल
तसेच
या कामासाठी निर्माण करण्यात आलेला कक्ष प्रशासकीय पातळीवर प्राधिकरणाचे अंग म्हणून स्वतंत्र ठेवण्यात यावा.

---

**Item No.** 48/10 **Resolution No.** 792

विषय : प्राधिकरण व विभागीय मंडळांच्या अश्शासकीय सदस्यांचा बैठकभत्ता वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाच्या वित्त विभागाच्या दिनांक ९ जानेवारी १९८४ च्या आदेशानुसार तसेच गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने पाठविलेल्या दिनांक १९-३-१९८४ च्या पत्रातील आदेशानुसार प्राधिकरण व विभागीय मंडळांच्या अशासकीय सदस्यांना दिनांक २-१-१९८४ पासून रुपये ६०/- बैठकभत्ता देण्यात यावा. त्यानुसार थकबाकी असल्यास ती देण्यात यावी.

---

**Item No.** 48/11 **Resolution No.**

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विक्रोळी येथील टागोरनगर वसाहतीतील कार्यालयीन इमारत क्र. १ स्वतःच्या नावे करण्यासंबंधी डॉ. मधुसूदन स. पांडव यांची विनंती.

ठराव :

---

**Item No.** 48/12 **Resolution No.**

विषय : हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी कर्मचाऱ्यांना देण्यासाठी केलेली गाळ्यांची मागणी.

ठराव :

---

**Item No.** 48/13 **Resolution No.**

विषय : माझगाव डॉक कामगार 'निवारा' को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी (नियोजित) यांची रहाण्याकरिता १-२ इमारती मिळण्याबाबत विनंती.

ठराव :

---

| Item No. | 48/14 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळाची सेवा निवासस्थाने बांधण्यासाठी जमीन देण्याची विनंती.

ठराव :

| Item No. | 48/15 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : नालंदा महाकनिष्ठ एज्युकेशन इन्स्टिट्यूट या संस्थेची काळाचौकी येथील अभ्युदयनगर या वसाहतीत शाळा चालविण्याकरिता जागा देण्याची विनंती.

ठराव :

| Item No. | 48/16 | Resolution No. | 796 |
|---|---|---|---|

विषय : मालेगाव नगरपालिकेला, मालेगाव येथे गलिच्छवस्ती निर्मुलन योजनेअंतर्गत बांधलेल्या १००० गाळ्यांच्या विक्रीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
राज्य शासनाने योजनेसाठी दिलेली अनुदानाची रुपये १६, ३७, २१२ ही रक्कम परत न घेण्याचे मान्य केल्यास नगर विकास खात्याने सुचविलेल्या खरेदीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. यासंबंधी शासनाशी चर्चा करुन निर्णय घेण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येतो.

| Item No. | 48/19 | Resolution No. | 797 |
|---|---|---|---|

विषय : परभणी आणि तुळजापूर येथे औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी बांधलेल्या गाळ्यांचे वाटप.

ठराव : 'प्रथम येणाऱ्यास प्रथम गाळा' हे तत्त्व स्वीकारुन परभणी व तुळजापूर येथील गाळे वाटपास मान्यता देण्यात यावी. मात्र मागासवर्गीयांकरिता राखून ठेवलेले २० टक्के गाळे यासाठीही 'प्रथम येणाऱ्यास प्रथम गाळा' या तत्त्वावरच वाटप करण्यात यावे. अशाप्रकारे इतर ठिकाणी निर्णय घेण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात यावा.

| Item No. | 48/20 | Resolution No. | 813 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (तांत्रिक विभाग) सेवा-प्रवेश नियमावली विभागीय परीक्षा अनिवार्य करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या स्वतःच्या निरनिराळ्या पदांसाठी घ्यावयाच्या विभागीय परीक्षांचा अभ्यासक्रम व कार्यक्रम तयार होईपर्यंत तांत्रिक विभागातील अभियंत्यांनी सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत घ्यावयाच्या परीक्षेला बसणे अनिवार्य करण्यात यावे.
परीक्षेसंबंधीच्या वाटटिप्पणीत नमूद केलेल्या अटी व शर्तींना प्राधिकरणाने मान्यता दिली.

**Item No.** **48/21** **Resolution No.**

विषय : सी. टी. सर्व्हे नं. ४०, परेल सिवरी विभाग 'फ' वॉर्डाच्या पुनर्बांधणी योजनेसाठी संपादनाखाली असलेल्या जमिनीबद्दल पर्यायी भूखंड देण्याविषयीची श्रीमती सुशिला द. चौधरी यांची विनंती.

ठराव :

**Item No.** **48/22** **Resolution No.** **798**

विषय : व्यापारी उपयोगासाठी द्यावयाच्या जमिनीच्या किंमतविषयक प्राधिकरणाचे धोरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
व्यापारी उपयोगासाठी शासकीय विभाग संविधानिक कॉर्पोरेशन्स व मंडळे वगैरेंना पूर्वी अनुदेश केल्याप्रमाणे बाजारभावाच्या ७५ टक्के किंमतीऐवजी बाजारभावाप्रमाणे येणारी रक्कम अधिमूल्य म्हणून घेण्यात यावी. तसेच याच उपयोगासाठी सहकारी संस्थांना वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम नाममात्र रुपये १/- होती त्याऐवजी ती अधिमूल्याच्या रकमेच्या २.५ टक्के इतकी आकारण्यात यावी.

**Item No.** **48/23** **Resolution No.** **799**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या वसाहतीत जाहिरातीसाठी जागा उपलब्ध करुन देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अ) वर चर्चेत दर्शविल्याप्रमाणे जाहिरातीसाठी फलक लावावयाच्या २३ जागांची जाहिरात देण्यासंबंधी कार्यवाही पूर्ण करण्यात यावी.
व
ब) मेसर्स मशहूर ॲडव्हरटायझर्स यांना दिनांक १-४-१९८४ पासून सध्याच्या दराने ६ महिन्याची आणखी मुदत वाढवून देण्यात यावी. तसेच ही जागा त्या मुदतीनंतर पुन्हा भाड्याने देण्यासंबंधीची जाहिरातही वरील २३ जागांच्या जाहिरातीबरोबरच करण्यात यावी.

**Item No.** **48/24** **Resolution No.**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील जमिनीचे प्लॉट नं. ५७ व ७० यांची एज्युकेशन कमिटी ऑफ इर्ला ॲंड विलेपार्ले या संस्थेने केलेल्या मागणीबाबत.

ठराव :

**Item No.** 48/25 **Resolution No.** 812

विषय : नेहरूनगर, कुर्ला येथील वसाहतीमधील समाजमंदिराच्या भूखंडाचे वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या नेहरूनगर, कुर्ला येथील समाज मंदिरासंबंधीचा ठराव क्रमांक ५७४३ मधील उल्लेख तसेच प्राधिकरणाने घेतलेल्या ठराव क्रमांक ४०२ द्वारे नेहरूनगर टेनंट असोसिएशनला सदरहू वसाहतीत समाजमंदिरासाठी राखून ठेवण्यात आलेला भूखंड पाठविण्यात यावे.
व
नेहरूनगर वेल्फेअर सेंटर या संस्थेला लायसन्स पद्धतीवर हा भूखंड देऊ करण्यात यावा व त्याचबरोबर नेहरूनगर वेल्फेअर सेंटर या संस्थेकडून या भूखंडाचा वापर कशाप्रकारे केला जाणार आहे याबाबतची माहिती मागवून घ्यावी. त्याचप्रमाणे त्यांची आर्थिक क्षमता वगैरे बाबतचा तपशील मागवावा.

---

**Item No.** 48/26 **Resolution No.** 811

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचारी/अधिकारी वर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वसाहतीतील मोकळे भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या कर्मचारी/अधिकारी वर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस वसाहतीतील मोकळे भूखंड देण्याबाबतच्या विषयाचा अभ्यास करून तपशील ठरविण्यासाठी,
तसेच,
असे मोकळे भूखंड नाम-निर्देशित करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपसमिती नेमण्यात येत आहे.
१) अध्यक्ष/प्राधिकरण
२) उपाध्यक्ष/प्राधिकरण
३) श्री. कृष्णराव पांडव, सदस्य/प्राधिकरण
उपसमितीने सत्वर प्राधिकरणापुढे अहवाल सादर करावा.एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या कर्मचारी/अधिकारी वर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस वसाहतीतील मोकळे भूखंड देण्याबाबतच्या विषयाचा अभ्यास करून तपशील ठरविण्यासाठी,
तसेच,
असे मोकळे भूखंड नाम-निर्देशित करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपसमिती नेमण्यात येत आहे.
१) अध्यक्ष/प्राधिकरण
२) उपाध्यक्ष/प्राधिकरण
३) श्री. कृष्णराव पांडव, सदस्य/प्राधिकरण
उपसमितीने सत्वर प्राधिकरणापुढे अहवाल सादर करावा.

**Item No.** **48/27** **Resolution No.** **793**

विषय : प्राधिकरणाच्या वसाहतीत बांधलेल्या कार्यालयीन इमारतीची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

वर चर्चेत उल्लेख केलेल्या अटींवर कार्यालयीन इमारतीतील (ऑफिस बिल्डिंग) गाळ्यांची विक्री खालील अटींनुसार करण्यात यावी.

१) गाळे "जेथे व जसे" या तत्त्वार विक्री करण्यात येतील.

२) सध्याच्या गाळेधारकालाच गाळा विकण्यात येईल. (अधिकृत वा अनधिकृत)

३) गाळेधारकाला कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकाम मंडळाच्या परवानगीशिवाय करता येणार नाही.

४) इमारत विक्री करण्यात येईल व इमारतीच्या समोवती नियमानुसार आवश्यक एवढीच जमीन भाडेपट्ट्याने देण्यात येईल. (लँड अपार्टमेंट).

५) दुरुस्ती व परिरक्षण करण्याची व सेवा-सुविधा मिळविण्याची जबाबदारी गाळे विकत घेणाऱ्यावर राहील.

५) गाळेधारकांना अधिक चटईक्षेत्र निर्देशांक वापरता येणार नाही.

७) गाळ्यांची किंमत त्या वसाहतीतील गाळ्यांच्या बांधणीसाठी प्रति चौ. फुटास आलेल्या खर्चावरून निश्चित केली जाईल.

८) वर प्रति चौ. फू. निश्चित केलेल्या किंमतीनुसार गाळेधारकाच्या ताब्यात असलेल्या क्षेत्राची किंमत घेतली जाईल. अधिकृत गाळेधारकाला ती किंमतीच्या तीनपट व अनधिकृत गाळेधारकाला ती किंमतीच्या पाचपट याप्रमाणे द्यावी लागेल.

९) ही रक्कम गाळेधारकांना एकरकमी भरावी लागेल.

१०) शासकीय व निमशासकीय संस्थांना वसाहतीतील गाळ्यांच्या किंमतीएवढी किंमत आकारली जाईल.

**Item No.** 48/28 **Resolution No.** 814

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांच्या विक्री योजनेची अंमलबजावणी अनिवासी उपयोगासाठी दिलेल्या गाळ्यांची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीमध्ये अनिवासी उपयोगासाठी दिलेल्या शाळा, दवाखाने, पोलिस स्टेशन वगैरे सोयींची व्यवस्था करण्याकरीता भाडेतत्त्वावर जे गाळे वितरीत करण्यात आले आहेत त्यांची विक्री त्या त्या संस्थांना करण्यात यावी. परंतु ज्या संस्थांना वापरासाठी गाळे देण्यात येऊन नंतर भूखंडही देण्यात आले आहेत अशा संस्था गाळेविक्री योजनेतून वगळाव्या व त्यांना गाळेविक्री करण्यात येऊ नयेत. त्या संस्थांना त्या गाळ्यातून काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२) शासकीय कार्यालये, तसेच नफा करणे हा ज्यांचा हेतू नाही अशा संस्थांना मूळ किंमतील रिबेट विरहित हे गाळे विक्री करण्यात यावेत.

३) इतर संस्थांना व खाजगी शाळांना मूळ किंमतीच्या तीन पट किंमतीत हे गाळे विक्री करण्यात यावेत.

४) जे गाळे प्राधिकरणाच्या अनिवासी व निवासी उपयोगासाठी वापरले जातात त्यांची विक्री करू नये.

**Item No.** 48/29 **Resolution No.** 815

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना सेवानिवासस्थानांच्या वाटपासंबंधी मार्गदर्शन तत्त्वे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना द्यावयाच्या सेवानिवासस्थानांच्या वाटपासंबंधीच्या मार्गदर्शक तत्त्वावर विचार करण्यासाठी व अहवाल सादर करण्यासाठी पुढील उपसमिती नेमण्यात यावी.
१) अध्यक्ष/प्राधिकरण
२) उपाध्यक्ष/प्राधिकरण
३) श्री. कृष्णराव पांडव, सदस्य/प्राधिकरण

शेवटी श्री. खुशालराव मोताळे, सदस्य यांनी कर्मचाऱ्यांना ते रहात असलेली घरे त्यांच्या मालकीहक्काने देण्याबाबत विषय प्राधिकरणासमोर मांडला. अध्यक्षांना दिनांक ३१-३-१९८४ रोजी दिलेल्या पत्रात त्यांनी याबाबत उल्लेख करून औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ते रहात असलेली घरे त्यांच्या मालकीची करून मिळावीत हा विषय चर्चेस घेण्यात यावा अशी विनंती. यावर चर्चा होऊन हा विषय केवळ औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाशीच संबंधित नसून इतर मंडळातही हाच प्रश्न असल्यामुळे हा विषय प्राधिकरणासमोर पुढील बैठकीत आणण्यात यावा असे आदेश देण्यात आले.
१) सचिव/प्राधिकरण यांनी कार्यवृत्तांतामध्ये मागील बै□कीतील विषय क्रमांक १७, १८ व ४० यावर चर्चा न होता ते पुढील बैठकीत विचारासाठी घेण्यात यावेत असे ठरले. परंतु त्याबाबतची नोंद घ्यावयाची राहिली असे सांगितले. त्यानुसार कार्यवृत्तांतातील पृष्ठ ४५ वरील पहिल्या परिच्छेदानंतर पुढील परिच्छेद वाढविण्यात यावा, याला प्राधिकरणाने मान्यता दिली.
"बैठकीतील विषय क्रमांक १७, १८ व ४० यावर चर्चा न झाल्यामुळे ते विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावेत असे आदेश प्राधिकरणाने दिले."
बैठक संपण्यापूर्वी बैठकीची त्याचप्रमाणे सदस्यांच्या निवासाची वगैरे उत्कृष्ट व्यवस्था केल्याबद्दल अध्यक्ष/प्राधिकरण यांनी मुख्य अधिकारी, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ तसेच औरंगाबाद मंडळाच्या कर्मचारी वर्गाला धन्यवाद दिले. यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Item No.** 48/30 **Resolution No.** 800

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या धुळे आणि मिरज येथील नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ'मध्ये दर्शविलेल्या धुळे आणि मिरज येथील नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हडकोकडून अनुक्रमे ३३.३० लक्ष रुपये व ४७.३४ लक्ष रुपये घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 48/31 **Resolution No.** 809

विषय : वांद्रे-पुन:प्रापण क्षेत्रात उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत (टाईप-२) एकंदर ५६ अधिक २८० गाळ्यांचे बांधकाम मे. वी. जी. शिर्के आणि कंपनी यांनी शिर्के सिपोरेक्स कंसोर्टियम यांच्यावतीने दिलेली ठोस रक्कम निविदा (ऑफर) स्वीकारण्याबाबत विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वांद्रे-पुन:प्रापण क्षेत्रातील नवीन ३३६ गाळ्यांच्या कामासाठी मेसर्स वी. जी. शिर्के आणि कंपनी यांनी दिनांक ६-२-१९८४ च्या पत्राद्वारे हे काम आपणास मिळावे यासंबंधी केलेल्या विनंतीला तत्वत: मान्यता देण्यात येते. तरी त्यावर सखोल विचार करण्यासाठी व त्यानुसार मोबिलायझेशन ॲडव्हान्सची रक्कम किती देण्यात यावी व इतर कोणत्या अटी मान्य कराव्या याबाबीवर विचार करून निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे उपसमिती नेमण्यात यावी.
१) अध्यक्ष/प्राधिकरण
२) उपाध्यक्ष/प्राधिकरण
३) श्री. अतुल हुले, सदस्य/प्राधिकरण

---

**Item No.** 48/32 **Resolution No.** 801

विषय : नांदेड येथील पुनग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता घरबांधणी योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
योजनेच्या खर्चाच्या किमान १० टक्के किंवा आस्थापना खर्चासाठी संपूर्ण अनुदान या अटीवर बाब टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे योजना राबविण्यात अनुमती व अधिकृती देण्यात येते.

---

**Item No.** 48/33 **Resolution No.** 810

विषय : कन्नमवारनगर, विक्रोळी वसाहतीत 'शुश्रुषा सिटिझन को-ऑपरेटिव्ह हॉस्पिटल लिमिटेड' या संस्थेस भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शुश्रुषा सिटिझन को-ऑपरेटिव्ह हॉस्पिटल लिमिटेड या संस्थेचे कन्नमवार नगर विक्रोळी वसाहतीच्या ज्या कार्यालयीन इमारतीत हे हॉस्पिटल चालत आहे ती इमारत संस्थेला प्राधिकरणाच्या धोरणानुसार विकत द्यावी व संस्थेने खरेदी केल्यानंतर इमारतीच्या आजूबाजूला १८०० चौ. वाराचा भूखंड प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणास अनुसरून सदर हॉस्पिटलला नेहमीच्या अटी व शर्तीवर देण्यास मान्यता देण्यात येते.

---

| **Item No.** | **48/34** | **Resolution No.** | **808** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र आयुर्वेदिक मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनला उन्नतनगर, गोरेगाव येथे कुटुंब कल्याण व धर्मार्थ दवाखान्यासाठी भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
उन्नतनगर, गोरेगाव येथील ४२५.२१ चौ. वाराचा भूखंड जमिनीच्या किंमतविषयक धोरणास अनुसरून, ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने महाराष्ट्र आयुर्वेदिक मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनला कुटुंब कल्याण केंद्र व धर्मार्थ दवाखाना यासाठी भाडेपट्ट्याने नेहमीच्या अटी व शर्तींवर देण्यात यावा.

| **Item No.** | **48/35** | **Resolution No.** | **807** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या शिस्त, वर्तणूक व अपिल, नियम लागू करण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या वर्तणूक, शिस्त व अपिल विनियमांना मान्यता देण्यात येते. हे विनियम पूर्व मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावेत.

| **Item No.** | **48/36** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेअंतर्गत जुहू-विलेपार्ले विकास योजनेत २० गाळ्यांची घरबांधणी अग्रीम अंशदान योजनेतून भाडेखरेदी योजनेत बदल करणे.

ठराव :

| **Item No.** | **48/37** | **Resolution No.** | **795** |
|---|---|---|---|

विषय : राज्य शासनाच्या उपक्रमांच्या संघटनेस सेवानिवासस्थानासाठी वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स 'ए' ब्लॉक येथील भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
राज्यशासनाच्या उपक्रमाच्या संघटनेस सेवानिवासस्थानासाठी वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील भूखंडाऐवजी तयार गाळे ठरलेल्या किंमतीत देण्यात यावेत. वेगळे कशा पद्धतीने बांधावेत हे राज्यशासनाच्या उपक्रमाच्या संघटनांबरोबर उपाध्यक्षांनी चर्चा करून ठरविण्यात यावे.

**Item No.** 48/38 **Resolution No.** 802

विषय : महाराष्ट्र शासनाच्या वतीने हाती घ्यावयाच्या उस्मानाबाद, औरंगाबाद व जालना या जिल्ह्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांकडे हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ'मध्ये दर्शविलेल्या उस्मानाबाद, औरंगाबाद व जालना या जिल्ह्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनेत सहभागी घेण्यासाठी हुडकोकडून एकूण १८.३८ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

---

**Item No.** 48/39 **Resolution No.** 803

विषय : जागतिक बँक प्रकल्प, चारकोप, कांदिवली येथील उच्च उत्पन्न गटाच्या नियोजित भूखंड वितरण करण्याबाबत प्राधिकरणाची मान्यता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
चारकोप-कांदिवली येथे भूखंड क्रमांक १ ते ९ हे उच्च उत्पन्न गटाच्या व्यक्तीच्या सहकारी संस्थांच्या इमारतींसाठी वितरण करण्यास मान्यता देण्यात येते.
व
वितरणासाठी बाब टिप्पणीत दर्शविण्यात आलेल्या ऑफसेट किंमतीला (ऑफसेट प्राइस) मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 48/41 **Resolution No.** 806

विषय : औरंगाबाद मंडळाने, औरंगाबाद येथे प्रिंट्रैव्हल हॉटेलजवळ बांधलेल्या दोन इमारतीतील तळमजल्यावरील दुकानांच्या गाळ्यांचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
दुकान क्रमांक ४, ६ आणि १८ चे वाटप करण्यासाठी औरंगाबाद मंडळाने केलेल्या कार्यवाहीला मान्यता देण्यात येते. उरलेल्या दुकानांसंबंधी प्राधिकरणाच्या यापूर्वीच्या सूचनेला अनुसरून व मंडळाच्या प्रस्तावानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येतो.

---

**Item No.** 48/42 **Resolution No.** 805

विषय : नाशिक येथील गोल्फ क्लबजवळ, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने बांधलेल्या कार्यालयीन इमारतीतील जागेचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) जागेसाठी दर चौ. फुटास रुपये ५/- या दराने म्युनिसिपल करासह भाडे आकारण्यात यावे.
२) जागेचे वाटप समितीने निश्चित केलेल्या अटी २ शर्तीच्या आधिन राहून करावे.
३) अतिथी गृहासाठी समितीने निश्चित केलेल्या दराप्रमाणे आकार घेण्यात यावा.
४) यासंबंधी पुढील कार्यवाही उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी करावी.

---

| **Item No.** | **48/43** | **Resolution No.** |
|---|---|---|

विषय : दि नॅशनल सेंटर फॉर सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट ॲंड कॉम्प्युटिंग टेकनिक्स (एनसी-एस-डी-सीटी) यांची ऑफिससाठी जागा व सेवानिवास स्थानासाठी गाळे मिळण्यासाठी विनंती.

ठराव :

| **Item No.** | **48/44** | **Resolution No.** | **794** |
|---|---|---|---|

विषय : भारतीय युनिट ट्रस्ट या संस्थेची वांद्रे रेक्लमेशन स्कीममध्ये बांधण्यात येणाऱ्या इमारतीपैकी एच. आय. जी. - २ श्रेणीतील इमारती मिळण्याबाबतची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळाला वांद्रे पुनःप्रापण क्षेत्रात नवीन भूखंडावर बांधावयाच्या गाळ्यांपैकी २८ गाळे सेवानिवासस्थान म्हणून वापरण्यासाठी वाटप करण्यात यावेत.

२) हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन, नॅशनल सेंट फॉर सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट ॲंड कॉम्प्युटिंग टेकनिक्स व भारतीय युनिट ट्रस्ट या संस्थांना गाळेवाटप करण्यास हरकत नाही असा तत्वतः निर्णय घेण्यात येतो. परंतु तपशिलाबाबत मात्र अध्यक्ष व उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचेशी संबंधित संस्थांच्या प्रमुखांची बैठक झाल्यावर निर्णय घेण्याचा अधिकार उपाध्यक्षांना देण्यात येतो.

३) नॅशनल सेंटर फॉर सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट ॲंड कॉम्प्युटिंग टेकनिक्स या संस्थेला जुहू-विलेपार्ले विभागात बांधण्यात येत असलेल्या व्यापारी इमारतींमध्ये कार्यालयीन उपयोगासाठी जागा देण्यात यावी. त्यासाठी त्या जागेची ऑफसेट किंमत (ऑफसेट प्राइस) आकारण्यात यावी.

४) या सर्व संस्थांना नफ्यासह ठरलेल्या किंमतीत काही सूट देऊ नये.

| **Item No.** | **48/45** | **Resolution No.** | **804** |
|---|---|---|---|

विषय : औरंगाबाद मंडळाच्या देवगिरी कॉलेजजवळील जागेतील अल्प उत्पन्न गटातील हुडकोसहाय्यित योजनेची अंमलबजावणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

औरंगाबाद मंडळाच्या देवगिरी कॉलेजजवळील जागेतील अल्प उत्पन्न गटासाठी बांधण्यात येणाऱ्या इमारतीतील गाळ्यांतील प्रिंट्रेव्हलसमोरील अल्प उत्पन्न गटातील योजनेसाठी जे मागणी अर्ज मागविले होते त्यांच्यापुरतीच मर्यादित जाहिरात प्रथम देण्यास अपवाद म्हणून मान्यता देण्यात येते. पुरेसे अर्ज न आल्यास पुढे नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी.

**Meeting No.** 49 **Meeting Date** 19/May/1

**Item No.** 49/1 **Resolution No.** 812

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३१-३-१९८४ रोजी झालेल्या ४८च्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या नेहरूनगर, कुर्ला येथील समाज मंदिरासंबंधीचा ठराव क्रमांक ५७४३ मधील उल्लेख तसेच प्राधिकरणाने घेतलेल्या ठराव क्रमांक ४०२ द्वारे नेहरूनगर टेनंट असोसिएशनला सदरहू वसाहतीत समाज मंदिरासाठी राखून ठेवण्यात आलेला भूखंड देण्याबाबतचा निर्णय रद्द करण्यात येतो. हा निर्णय कळविणारे पत्र संस्थेला पाठविण्यात यावे.
व,
नेहरूनगर वेल्फेअर सेंटर या संस्थेला लायसन्स पद्धतीवर हा भूखंड देऊ करण्यात यावा व त्याचबरोबर नेहरूनगर वेल्फेअर सेंटर या संस्थेकडून या भूखंडाचा वापर कशा प्रकारे केला जाणार आहे याबाबतची माहिती मागवून घ्यावी. त्याचप्रमाणे त्यांची आर्थिक क्षमता वगैरेबाबतचा तपशील मागावा.
(३) श्री. अतुल हुले, सदस्य यांनी पृष्ठ १ वरील नाशिक येथील कार्यालयीन इमारतीच्या जागेच्या वाटपासंबंधीच्या विषयाबाबत पुढीलप्रमाणे दुरुस्ती सुचविली. विषय सूचीतील चर्चेच्या दुसऱ्या परिच्छेदातील शेवटी पुढील वाक्य वाढविण्यात यावे.
कार्यालयीन इमारतीच्या जागेचे वाटप दिनांक १-४-१९८४ पासून केले जावे.
(४) मालेगाव येथील एक रखवालदार श्री. पाटील यांनी दाखविलेल्या अतुलनीय धैर्याबद्दल त्यांचा सत्कार करावा अशी सूचना श्री. हुले यांनी औरंगाबाद येथील बैठकीत केली होती. याबाबतचा उल्लेख कार्यवृत्तांत आला नाही असे श्री. हुले यांनी नमूद केले. हा उल्लेख कार्यवृत्तांत करण्यात यावा असे त्यांनी म्हटले.
यावर चर्चा करताना प्राधिकरणाने असे मत व्यक्त केले की, श्री. हुले यांनी या विषयाचा औरंगाबादच्या बैठकीत उल्लेख केला होता. परंतु त्यावर प्राधिकरणाने त्याचवेळी असे मत व्यक्त केले होते की, यासंबंधीचा संपूर्ण अहवाल आल्यानंतर मग याबाबत विचार करता येईल. यासंबंधीची कोणतीही अधिकृत माहिती प्राधिकरणासमोर नसताना या विषयासंबंधी चर्चा करणे योग्य होणार नाही.
उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी अशी माहिती दिली की, प्रशासकीय स्तरावर हे प्रकरण तपासले आहे व प्राधिकरणाच्या पुढील बैठकीसमोर प्रस्ताव ठेवण्यात येईल.
वर दर्शविलेल्या क्रमांक १, २ व ३ मधील दुरुस्त्या प्राधिकरणाने मान्य केल्या व त्यासह कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आला.

**Item No.** 49/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करावयाच्या कार्यवाहीचा पाठपुरावा करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 49/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कारवाई करण्यात न आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 49/4 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल विनियम १९८१) गाळे काळजीवाहू तत्त्वावर देण्यासाठी आकारावयाची फी ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 49/4 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल विनियम १९८१) गाळे काळजीवाहू तत्त्वावर देण्यासाठी आकारावयाची फी ठरविण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 49/5 **Resolution No.** 816

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणासाठी होणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनीच्या संपादनाविषयीचे धोरणासंबंधी घेतलेल्या निर्णय क्र. ६६५ यात नागपूर मंडळाने सुचविलेले काही बदल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाची कलम ४१ खाली भूसंपादनाबाबतची प्रारंभिक अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध होण्यापूर्वी नोंदणीकृत सहकारी संस्थांनी नोंदणीकृत खरेदी खताने खरेदी केलेल्या जमिनी प्राधिकरणाच्या भूसंपादनातून वगळण्यात याव्यात. अशा प्रकरणांची छाननी करून निर्णय घेण्याचा अधिकार प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांना देण्यात यावा.
प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक ६६५ नुसार प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात वरील निर्णयानुसार योग्य ती सुधारणा करण्यात आली.

**Item No.** 49/6 **Resolution No.**

विषय : वसाहतीतील इमारतींच्या अत्यावश्यक दुरुस्तीची कामे करणे.

ठराव :

**Item No.** 49/7 **Resolution No.**

विषय : सेवेत असताना अपघाताने अपंगत्व असलेल्या कर्मचाऱ्यांना पर्यायी नोकरी अनुकंपा तत्त्वावर जवळच्या नातेवाईकास देणे.

ठराव :

| Item No. | 49/8 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : सेवा प्रवेश नियमावली सेवा प्रवेशासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता धारण न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती न देण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 49/9 | Resolution No. | 817 |
|---|---|---|---|

विषय : येवला आणि मनमाड येथे औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने बांधलेल्या गाळ्यांचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
येवला तसेच मनमाड येथील नागरी 'अ' व नागरी 'ब' या योजनेत बांधलेल्या गाळ्यांसाठी उत्पन्नाची मर्यादा रुपये ६००/- वरुन रुपये १०००/- पर्यंत नेण्यास मान्यता देण्यात येते. तसेच 'प्रथम येणाऱ्यास प्रथम गाळा' या पद्धतीने गाळ्यांचे वाटप करण्यासाठी मान्यता देण्यात येते.
त्याचप्रमाणे,
अशाच तऱ्हेच्या इतर प्रस्तावांवर निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येतात. अशी प्रकरणे प्राधिकरणाच्या माहितीसाठी नंतर ठेवण्यात यावीत.

| Item No. | 49/10 | Resolution No. | 818 |
|---|---|---|---|

विषय : आतिथ्यासाठी होणाऱ्या खर्चाची परिपूर्ती करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सभापती, विभागीय मंडळ यांना आतिथ्यासाठी दरमहा रुपये १५०/- खर्च करावयास अनुमती देण्यात आली आहे. त्या खर्चाच्या मंजूरीबाबतचे अधिकार मुख्य अधिकारी विभागीय मंडळ यांचे ऐवजी मुख्य लेखा अधिकारी, विभागीय मंडळ यांना प्रदान करण्यात यावेत.

| Item No. | 49/11 | Resolution No. | 819 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या कळंब, कोल्हापूर येथील नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून रुपये १८.३८ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| **Item No.** | **49/12** | **Resolution No.** | **820** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या लातूर जिल्हा व अकोला जिल्हा यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रु. ७.२९ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| **Item No.** | **49/13** | **Resolution No.** | **821** |
|---|---|---|---|

विषय : वांद्रा पुनःप्रापण क्षेत्रात उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या (टाईप २) चार इमारती ११२ गाळे व (टाईप १) आठ इमारतीमध्ये २२४ गाळे एकूण ३३६ गाळ्यांच्या बांधकामाबाबत मे. बी. जी. शिर्के आणि के. यांनी शिर्के सिपोरेक्स कंसोर्टियम यांच्या वतीने दिलेली ठोस रक्कम निविदा स्वीकारणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
उपसमितीने याबाबत घेतलेल्या निर्णयास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **49/14** | **Resolution No.** | **822** |
|---|---|---|---|

विषय : श्री. व्ही. एस. मुंजे, उपमुख्य अधिकारी (जा. बँ. प्र.) यांच्या पुनर्नेमणुकीची मुदत वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. मुंजे, उपमुख्य अधिकारी, जागतिक बँक प्रकल्प यांची सध्याच्याच अटी व शर्तीवर त्यांची मुदत दिनांक ४-६-१९८४ रोजी संपल्यावर आणखी ६ महिने नेमणुकीस मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **49/15** | **Resolution No.** | **823** |
|---|---|---|---|

विषय : श्री. एम. व्ही. ताथवडकर, विधी सल्लागार यांच्या पुनर्नेमणुकीची मुदत वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. एम. व्ही. ताथवडकर, विधी सल्लागार यांची तीन वर्षांची मुदत १ जुलै १९८४ रोजी संपल्यावर त्यांना आणखी दोन वर्षे सध्याच्याच अटी व शर्तीवर पुनर्नेमणूक देण्यात यावी.

| **Item No.** | **49/16** | **Resolution No.** | **824** |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरण व मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर वरिष्ठ लिपिक (टंकलेखक) या प्रकारची पदे निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या सेवेत असलेल्या वरिष्ठ लिपिक (टंकलेखक) या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्राधिकरणाने १५ कनिष्ठ लिपिक (टंकलेखक) पदे परिवर्तित करण्यात यावीत व त्यावर या कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी. हे कर्मचारी सेवेतून निवृत्त होतील किंवा सेवेतून जसजसे कमी होतील तसतशी ही पदे पुन्हा परत कनिष्ठ लिपिक (टंकलेखक) या मूळ पदात प्रत्यावर्तित होतील.

| **Item No.** | **49/17** | **Resolution No.** | **825** |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पार पाडावयाचे प्रकल्प - जादा पदे मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीसोबत जोडलेल्या सहपत्र-ब मध्ये 'मंजूर करावयाची जादा पदे' या सदरात दाखविलेली १५५ पदे निर्माण करण्यात यावीत.

| **Item No.** | **49/18** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई महानगर प्रदेशात जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पार पाडावयाचा निवारा कार्यक्रम.

ठराव :

| **Item No.** | **49/19** | **Resolution No.** | **826** |
|---|---|---|---|

विषय : राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था (भारत सरकार) यांना गृहनिर्माण मंडळाच्या ताब्यातील सर्वे नं. १२० वर्सोवा, तालुका-अंधेरी येथील २.७५ एकर जागा प्रादेशिक केंद्र स्थापन करण्यासाठी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर्सोवा येथील सर्वे नंबर १२० मधील २.७५ एकर जमीन राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्था (भारत सरकार) या संस्थेला प्राधिकरणाच्या किंमतविषयक धोरणानुसार किंमत आकारून वाटप करण्यात यावी.

| **Item No.** | **49/20** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या कुर्ला येथील नेहरूनगर वसाहतीतील अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या इमारत क्र. ७४ च्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

ठराव :

| **Item No.** | **49/21** | **Resolution No.** | **827** |
|---|---|---|---|

विषय : ॲप्रेंटिस ॲक्ट १९८१ अनुसार शिकावू उमेदवार नेमण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविण्यात आलेल्या 'शिकावू उमेदवार' (ॲप्रेंटिस) नेमण्यासंबंधीच्या प्रस्तावाचा तसेच सेवाप्रवेशासाठी देण्यात आलेल्या अटींना मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **49/22** | **Resolution No.** | **828** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (लघुटंकलेखक व लघुलेखक) सेवा प्रवेश नियमावली.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (लघुटंकलेखक व लघुलेखक) यांच्या सेवाप्रवेश नियमांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. ही नियमावली शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याची प्राधिकरणाने आदेश दिले.

| **Item No.** | **49/23** | **Resolution No.** | **829** |
|---|---|---|---|

विषय : बृहन्मुंबई येथील प्लॉटस माध्यमिक शाळेसाठी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या ठराव क्र. ६५९ नुसार गोरेगाव येथील माध्यमिक शाळेसाठी राखून ठेवलेला भूखंड प्रार्थना समाज, मुंबई या संस्थेस देण्यासंबंधी तसेच कांदिवली, पोयसर येथील माध्यमिक शाळेसाठी राखून ठेवलेला भूखंड 'श्री श्रीकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ', श्रीकृष्ण नगर, बोरिवली पूर्व यांना देण्यासंबंधीचा निर्णय रद्द करण्यात येतो.
व,
हे दोन्ही भूखंड प्राधिकरणाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वावर माध्यमिक शाळेस वाटप करण्यासंबंधीची पुढील कार्यवाही करण्यासाठी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाला कळविण्यात यावे.

| **Item No.** | **49/24** | **Resolution No.** | **830** |
|---|---|---|---|

विषय : इचलकरंजी येथील पुणे मंडळाच्या वसाहतीतील दुकानासाठी राखून ठेवलेल्या भूखंडाच्या वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुणे मंडळाच्या प्रस्तावानुसार इचलकरंजी नगरपालिका तसेच इचलकरंजी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स होलसेल व रिटेल स्टोर्स लिमिटेड या संस्थांना इचलकरंजी येथील वसाहतीतील दुकानासाठी राखून ठेवलेला भूखंड प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणानुसार वाटप करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

| | | | |
|---|---|---|---|
| **Item No.** | **49/25** | **Resolution No.** | |

विषय : परस्पेक्टिव्ह प्लॅनसंबंधी माहिती गोळा करण्यासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्था यांची नेमणूक करण्याबाबत.

ठराव :

| | | | |
|---|---|---|---|
| **Item No.** | **49/26** | **Resolution No.** | **831** |

विषय : प्राधिकरणाचे सल्लागार म्हणून नेमलेल्या आपटे कन्सल्टन्सी या संस्थेच्या नेमणूकीची मुदत वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
'आपटे कन्सल्टन्सी' या संस्थेला सल्लागार म्हणून नेमलेल्या दोन वर्षांच्या मुदतीनंतर त्याच अटी व शर्तीवर आणखी दोन वर्षांसाठी नेमण्यात यावे.

| Item No. | 49/27 | Resolution No. | 832 |
|---|---|---|---|

विषय : अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली बांधलेल्या इमारतीत अनिवासी उपयोगासाठी दिलेल्या गाळ्यांची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटातील गाळ्यांमध्ये अनिवासी उपयोगाकरिता देण्यात आलेल्या गाळ्यांची विक्री खालील अटींवर करण्यात यावी.
१) अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीमध्ये अनिवासी उपयोगासाठी दिलेल्या शाळा, दवाखाने, पोलिस स्टेशन वगैरे सोयींची व्यवस्था करण्याकरिता भाडेतत्त्वावर जे गाळे वितरीत करण्यात आले आहेत त्यांची विक्री त्या त्या संस्थांना करण्यात यावी. परंतु ज्या संस्थांना वापरासाठी गाळे देण्यात येऊन नंतर भूखंडही देण्यात आले आहेत अशा संस्था गाळेविक्री योजनेतून वगळाव्या व त्यांना गाळे विक्री करण्यात येऊ नयेत. त्या संस्थांना त्या गाळ्यातून काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात यावी.
२) शासकीय कार्यालये, तसेच नफा करणे हा ज्यांचा हेतू नाही अशा संस्थांना मूळ किंमतीत हे गाळे विक्री करण्यात यावेत.
३) इतर संस्थांना व खाजगी शाळांना मूळ किंमतीच्या तीनपट किंमतीत हे गाळे विक्री करण्यात यावेत.
४) जे गाळे प्राधिकरणाच्या अनिवासी व निवासी (सेवानिवासस्थानांसह) उपयोगासाठी वापरले जातात त्यांची विक्री करू नये.
त्याचप्रमाणे,
व्यापारी उपयोगासाठी वरील योजनेत दिलेल्या गाळ्यांची विक्री पुढील अटींवर करण्यास मान्यता देण्यात येते.
१) दुकाने, दवाखाने इत्यादी व्यापारी उपयोगासाठी देण्यात आलेल्या गाळ्यांची विक्री सध्या असलेल्या गाळेधारकांना करण्यात यावी.
२) हे गाळे बांधकामाच्या मूळ किंमतीच्या तिप्पट रकमेत विकण्यात यावेत.
३) गाळेधारक हा अनधिकृत भाडेकरू असेल तर त्याचेकडून वरील किंमती व्यतिरिक्त गाळ्याच्या मूळ किंमतीच्या दुप्पट इतकी रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात यावी.
४) वरील सर्व किंमत एकरकमी वसूल करण्यात यावी.
५) या व्यतिरिक्त भाड्यापोटी काही थकबाकी असल्यास ती पूर्णपणे द्यावी लागेल व त्यानंतरच किंमत अथवा किंमत आणि दंड एकरकमी वसूल केला जावा.

| Item No. | 49/28 | Resolution No. |
|---|---|---|

विषय : गृहनिर्माण भवन, वांद्रे येथील उपहारगृह.

ठराव :

| Item No. | 49/29 | Resolution No. | 833 |
|---|---|---|---|

विषय : मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर मुख्य प्रशासकीय अधिकारी या दर्जेची दोन पदे निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर रुपये ११००-५०-१५५०-७५-१९०० या वेतनश्रेणीतील मुख्य प्रशासकीय अधिकारी, गलिच्छवस्ती सुधारणा व मुख्य प्रशासकीय अधिकारी दुरुस्ती व पुनर्रचना ही पदे निर्माण करण्यात मान्यता देण्यात येते.

| Item No. | 49/30 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या नेहरुनगर या कुर्ला येथील वसाहतीतील अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या इमारत क्र. ७५ ची विक्री.

ठराव :

| Item No. | 49/31 | Resolution No. | 834 |
|---|---|---|---|

विषय : गाळ्याचे वाटप करताना अगोदरची जागा रिकामी करून मालकाला परत करण्याच्या अटीचे पालन करण्याच्या संबंधात.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
(१) अगोदरची जागा भाडेकरूच्या किंवा त्याच्याबरोबर नवीन गाळ्यात रहावयास आलेल्या कुटुंबाच्या घटकाच्या नावे भाडेतत्त्वावर असली व ती जागा खाजगी असल्यास त्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. मात्र अगोदरची जागा प्राधिकरणाचीच असल्यास ती प्राधिकरणाच्या विनियमातील तरतुदीनुसार हस्तांतरित करण्यास परवानगी देण्यात यावी.
(२) अगोदरची जागा भाडेकरूच्या कुटुंबाच्या घटकाच्या नावे असल्यास ती जागा मालकाला परत करण्याचा आग्रह धरण्यात येऊ नये. तसेच अशा प्रकरणात कार्यवाही सुरू केली असल्यास ती मागे घेण्यात यावी.
(३) अगोदरची जागा प्राधिकरणाची असून ती भाडेकरूच्या कुटुंबाच्या घटकाच्या नावे हस्तांतरित करावयाची परवानगी मागण्यात आली असल्यास अशी प्रकरणे त्यासंबंधीच्या प्राधिकरणाच्या धोरणानुसार नियमित करण्यात यावीत.
(४) अगोदरची जागा प्राधिकरणाची असून ती भाडेकरूच्या कुटुंबाचा घटक नसलेल्याच्या नावे हस्तांतरित करावयाची परवानगी मागण्यात आलेली असल्यास, अशी प्रकरणेही विनियमातील तरतुदीनुसार व त्यासंबंधीच्या प्राधिकरणाच्या धोरणानुसार नियमित करण्यात यावीत.
(५) अगोदरची जागा भाडेकरूने परस्पर दुसऱ्यास देऊन टाकली असल्यास व ती मालकाला किंवा प्राधिकरणाला परत केली नसल्यास अशा प्रकरणांतही कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

**Item No.** 49/32 **Resolution No.** 835

विषय : गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम - गलिच्छ वस्त्यांमध्ये परिसर सुधार कामे करताना विशिष्ट मूलभूत सुविधांसाठी कमाल खर्चाची मर्यादा ठरविणे आणि गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमास नवीन दिशा देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर उल्लेख केलेल्या चर्चेनुसार बाब टिप्पणीत दर्शविलेल्या प्रस्तावांना मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 49/34 **Resolution No.** 837

विषय : एकसर, तालुका, बोरिवली येथील भूसंपादन केलेल्या जागेपैकी विद्यमान बांधकामे व त्या अनुषंगिक अंदाजे २४७० चौ. मी. क्षेत्र व उर्वरित क्षेत्राच्या २५ टक्के क्षेत्र मूळ मालक श्रीयुत रमाकांत वर्दे, श्रीमती सुधा वर्दे व इतर यांना भाडेपट्ट्याने देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर चर्चेत दर्शविलेल्या फेरफारासह २४ डिसेंबर १९८२ मध्ये परस्पर संमतीने घेतलेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 49/35 **Resolution No.** 841

विषय : मुंबई मंडळाव्यतिरिक्त अन्य प्रादेशिक मंडळामधील मिळकत व्यवस्थापन विभागासाठी जादा पदे मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविण्यात आल्याप्रमाणे खालीलप्रमाणे जादा पदे मुंबई मंडळाव्यतिरिक्त इतर विभागीय मंडळांच्या आस्थापनेवर गाळ्यांच्या मागणीचा अंदाज गाळ्यांचे वाटप व तत्संबंधिच्या अन्य कामासाठी मंजूर करण्यात यावीत.

१) सहाय्यक मिळकत व्यवस्थापक १ पद
२) कनिष्ठ सहाय्यक १ पद
३) वरिष्ठ लिपिक १ पद
४) कनिष्ठ लिपिक ४ पदे

ही पदे 'अॅडव्हॉक' धर्तीवर जादा पदे म्हणून भरली जातील व मिळकत व्यवस्थापनाच्या आस्थापना विषयक एकूण प्रश्नाचा विचार झाल्यावर त्यामध्ये त्या पदांचा फेरविचार केला जाईल.

---

**Item No.** 49/36 **Resolution No.** 843

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण - सक्तीची सेवानिवृत्ती योजना १९७८ मध्ये दुरुस्ती करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविण्यात आलेल्या परिच्छेद ४ प्रमाणे अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांचे परिक्षण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समित्यांची पुनर्रचना करण्यास मान्यता देण्यात येते.

| Item No. | 49/37 | Resolution No. | 839 |
|---|---|---|---|

विषय : मागाठाणे, बोरिवली येथील भूखंड बी. ई. एस. टी. ला बस आगार (डेपो) बांधण्यासाठी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मागाठाणे, बोरिवली येथील भूखंड बी. ई. एस. टी. ला भूसंपादनाची किंमत त्याचप्रमाणे भूविकास व त्यावर केलेला प्रत्यक्ष खर्च (व्याजासहित) वसूल करण्याच्या अटीवर वितरीत करण्यास मान्यता देण्यात येते.
श्री. तिनईकर, सदस्य हे अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या परवानगीने यानंतर बैठकीतून गेले.

| Item No. | 49/38 | Resolution No. | 840 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवास-स्थाने म्हणून देण्यात आलेले गाळे कर्मचाऱ्यांना विक्री करण्याची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
याप्रश्नावर अधिक विचार करून उपाय शोधण्यासाठी पुढीलप्रमाणे उपसमिती नेमण्यात यावी.
१) अध्यक्ष/प्राधिकरण
२) उपाध्यक्ष/प्राधिकरण
३) श्री. खुशालराव मोताळे, सदस्य/प्राधिकरण
उपसमितीने आपला अहवाल प्राधिकरणासमोर ठेवावा.

| Item No. | 49/39 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : भारतीय युनिट ट्रस्ट आणि हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन या संस्थांना वांद्रे पुनःप्रापण गटासाठी बांधलेल्या इमारती देण्याबाबत.

ठराव :

| Item No. | 49/40 | Resolution No. | 838 |
|---|---|---|---|

विषय : श्री. सलीम अब्दुल शेख यांनी पात्रतेसंबंधी केलेले अपील.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. सलीम अब्दुल शेख यांनी १५ वर्षांच्या महाराष्ट्रातील वास्तव्यासंबंधीचा पुरावा दाखल केला आहे, तो लक्षात घेता त्यांना वास्तव्यासंबंधीच्या अग्रक्रमास पात्र धरण्यात यावे व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.
तसेच,
यापुढील अशा प्रकरणास निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येतात.

| Item No. | 49/41 | Resolution No. | 842 |
|---|---|---|---|

विषय : अखिल भारतीय गृहनिर्माण विकास संस्थेचे (ऑल इंडिया हाऊसिंग डेव्हलपमेंट असोसिएशन) संयुक्त निगम आणि नियामक परिषद सभासदत्वासाठी (कॉम्पोझिट कॉर्पोरेट अँड गवर्निंग कौंसिल मेंबरशिप) - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सभासदत्वासाठी मंजूरी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अखिल भारतीय गृहनिर्माण विकास संस्थेचे 'कॉम्पोझिट कॉर्पोरेट अँड गवर्निंग कौंसिल मेंबरशिप' घेण्यास मान्यता देण्यात येते.
तसेच,
यावर प्रतिनिधीत्व करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्यांच्या गैरहजेरीत त्यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यास मान्यता देण्यात येते.

---

| Item No. | 49/42 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई मंडळातील दुरुस्ती व पुनर्रचना कार्यासंबंधीचा आढावा.

ठराव :

---

| Item No. | 49/44 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : एकरकमी पद्धतीवर/भाडेखरेदी वाटप करण्यात आलेल्या गाळ्यांच्या बाबतीत तात्पुरती ठरविलेली किंमत आणि अंतिम किंमत यामधील फरकाची रक्कम व त्यावरील व्याजाची वसुली.

ठराव :

---

| Item No. | 49/44 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : एकरकमी पद्धतीवर/भाडेखरेदी वाटप करण्यात आलेल्या गाळ्यांच्या बाबतीत तात्पुरती ठरविलेली किंमत आणि अंतिम किंमत यामधील फरकाची रक्कम व त्यावरील व्याजाची वसुली.

ठराव :

---

| Item No. | 49/45 | Resolution No. | 836 |
|---|---|---|---|

विषय : मालवणी (मालाड पश्चिम) येथील विकसित भूखंडांना तातडीने पाणी पुरवठा करण्यासाठी रु. १.२७ लाख रकमेची गलिच्छ वस्ती सुधार योजना निधीतून देण्यासंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर चर्चेत ठरविण्यात आलेल्या मुद्यांचा सारांश लक्षात घेऊन बाब टिप्पणीत दर्शविलेल्या प्रस्ताव क्र. १ ते ४ यांना मान्यता देण्यात येते.

**Meeting No.** 50 spl **Meeting Date** 19/Jun/1

**Item No.** 50/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १९-५-१९८४ रोजी झालेल्या ४९ व्या (सर्वसाधारण) बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 50/2 **Resolution No.**

विषय : मुंबई मंडळातील दुरुस्ती व पुनर्रचना कार्यासंबंधीचा आढावा.

ठराव :

---

**Item No.** 50/3 (A **Resolution No.** 844

विषय : गोराई रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई येथील ४४ हेक्टर जमिनीचे पुन:प्रापण करण्यासाठी माती भराव करण्याच्या कामाची विभागणी निविदा मागविण्याच्या दृष्टीने दोन भागात करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गोराईरोड, बोरिवली (पश्चिम) मुंबई येथील ४४ एकर जमिनीचे पुन:प्रापण करण्यासाठी माती भराव करण्याच्या कामाची विभागणी निविदा मागविण्याच्या दृष्टीने दोन भागात करण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 50/4 (A **Resolution No.**

विषय : वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील 'डी' ब्लॉकमधील जमिनीचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रा. अनंत काणेकर मार्गावर बांधावयाच्या पुलाच्या अंदाजित रकमेपैकी १/४ रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यास मान्यता देण्यात येते.

ठराव :

---

**Item No.** 50/5 (A **Resolution No.**

विषय : महात्मा फुले शिक्षण संस्था यांना कन्नमवारनगर, नंबर-२, विक्रोळी (पूर्व) येथे प्राथमिक व माध्यमिक शाळेकरिता संक्रमण शिबिरात जागा देण्याबाबत.

ठराव :

---

**Meeting No.** 51 **Meeting Date** 29/Jun/1

**Item No.** **Resolution No.** 857

विषय :

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने श्री. सदाशिवराव तिनईकर, माजी सचिव, गृहनिर्माण व सदस्य/प्राधिकरण यांनी प्राधिकरणाच्या कार्यात केलेल्या मौल्यवान मार्गदर्शनाबद्दल व दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानणारा ठराव एकमताने मंजूर केला.

वरील चर्चेनंतर अध्यक्ष/प्राधिकरण यांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्ष/प्राधिकरण यांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

---

**Item No.** 51/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १९-५-१९८४ रोजी झालेल्या ५० व्या (खास) बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 51/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 51/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही न करण्यात आलेल्या निर्णयाची यादी.

ठराव :

---

**Item No.** 51/4 **Resolution No.** 846

विषय : अभ्युदय को-ऑप. बँक लिमिटेड यांना नेहरूनगर (कुर्ला) येथील इमारत क्र. ७१ सलग्न भूखंडासह वितरीत करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत दर्शविलेल्या अटींना अनुसरून इमारत क्रमांक ७१, नेहरूनगर, कुर्ला, अभ्युदय को-ऑप. बँक लिमिटेड यांना संलग्न भूखंडासह वितरित करण्यास मान्यता देण्यात येते. त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येतात.
यानंतर श्रीमती शालिनी राणे, सदस्या या अध्यक्षांचे परवानगीने बैठकीतून गेल्या.

---

**Item No.** 51/5 **Resolution No.**

विषय : प्राधिकरण कर्मचाऱ्यांना दोन टक्के आरक्षणातून दिलेल्या गाळ्यांसाठी आस्थापना खर्च व नफा न आकारण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 51/6 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने भाडेपद्धतीने घरबांधणी करावी काय याबाबत धोरण ठरवावे.

ठराव :

**Item No.** 51/7 **Resolution No.** 847

विषय : वसाहतीतील अनधिकृत प्रार्थना/धार्मिक स्थळांचे नियमन/आरक्षण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या वसाहतीत धार्मिक उपयोगाकरिता भूखंड आरक्षित करण्यास हरकत नाही. मात्र अशा भूखंडाचे क्षेत्रफळ शासनाच्या धोरणानुसार व मान्य प्रमाणानुसार निश्चित करण्यात यावे व पोलिसखात्याच्या सहाय्याने व भाडेकरू संघटनांच्या सूचना विचारात घेऊन त्यांचे वाटप केले जावे.

**Item No.** 51/8 **Resolution No.** 848

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने कार्यान्वित केलेल्या काही योजनांचे मूल्यमापन करण्याच्या कामासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्था यांची नियुक्ती करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कार्यान्वित केलेल्या योजनांच्या मूल्यमापनाचे टाटा सामाजिक विज्ञान संस्थेस देण्याचा तत्वत: निर्णय घेण्यात येतो. त्याबाबतचा तपशील अध्यक्ष व उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या संमतीने संबंधितांशी चर्चा करून ठरवावा. तद्नंतर सदरहू संस्थेबरोबर करार करण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात यावा.

**Item No.** 51/9 **Resolution No.** 849

विषय : उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोख बक्षिस देऊन गौरव करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. टी. बी. पाटील, चौकीदार, औरंगाबाद मंडळ यांनी जून १९८३ मध्ये मालेगाव येथे झालेल्या जातीय दंगलीत उल्लेखनीय कामगिरी करून मंडळाच्या मालमत्तेचे संरक्षण केल्याबद्दल त्यांना रुपये २५०/- रोख बक्षिस देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 51/10 **Resolution No.**

विषय : श्री. मोहन केशव धारिया, जमीन मालक सं. नं. १०७, हिस्सा नं. २ - ब/२ चिपळूण जिल्हा रत्नागिरी यांची जमीन वगळणे विषयीची विनंती.

ठराव :

---

**Item No.** 51/11 **Resolution No.** 850

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, कर्मचारी सेवा-प्रवेश नियमावली (अभियांत्रिकी विभाग).

ठराव : बहुमताने निर्णय घेतला की,
सध्या प्राधिकरणाच्या सेवेत कार्यकारी अभियंता म्हणून काम करणारया अधिकाऱ्यांना उपअभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी होणारी व्यावसायिक परीक्षा अनिवार्य करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 51/12 **Resolution No.** 851

विषय : भाडेखरेदी पद्धतीने किंवा एकरकमी खरेदी पद्धतीने गाळे खरेदी केलेल्या गाळेधारकांनी गाळ्यांची पुन्हा विक्री करण्यास मनाई करणारी अट काढून टाकण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
औद्योगिक कामगारांसाठीची सहाय्यित गृहनिर्माण योजना तसेच अत्यल्प उत्पन्न गटातील व्यक्तींसाठीच्या गृहनिर्माण योजनेतील गाळे विक्री करताना त्याचप्रमाणे दिनांक १४-२-१९७५ च्या शासनाच्या आदेशानुसार अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटातील गाळेधारकांना गाळ्यांची विक्री केल्यावर १० वर्षांपर्यंत गाळा विक्री करण्यास मनाई करण्यासंबंधीची अट काढून टाकण्यात यावी.

---

**Item No.** 51/13 **Resolution No.** 852

विषय : प्राधिकरणाच्या घरबांधणी कार्यक्रमासाठी भारतीय युनिट ट्रस्ट या संस्थेकडून कर्ज मिळविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भारतीय युनिट ट्रस्ट या संस्थेकडून कर्ज घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात येते. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी केलेल्या सुचनेनुसार त्यामध्ये व्याजाचा दर कमी करण्याच्या दृष्टीने अथवा परतफेडीचा कालावधी वाढविण्याच्या दृष्टीने संबंधित संस्थेशी पुन्हा एकवार बोलणी करावी. यासंबंधी पुढील सर्व कारवाई करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येतात.

---

| **Item No.** | **51/13** | **Resolution No.** | **852** |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या घरबांधणी कार्यक्रमासाठी भारतीय युनिट ट्रस्ट या संस्थेकडून कर्ज मिळविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भारतीय युनिट ट्रस्ट या संस्थेकडून कर्ज घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात येते. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी केलेल्या सुचनेनुसार त्यामध्ये व्याजाचा दर कमी करण्याच्या दृष्टीने अथवा परतफेडीचा कालावधी वाढविण्याच्या दृष्टीने संबंधित संस्थेशी पुन्हा एकवार बोलणी करावी. यासंबंधी पुढील सर्व कारवाई करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येतात.

| **Item No.** | **51/14** | **Resolution No.** | **853** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या गृहनिर्माण योजनांसाठी होणाऱ्या भूसंपादनात समाविष्ट झालेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनी वगळण्यासंबंधीच्या धोरणाबद्दल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या भूसंपादनात येणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनी वगळण्याच्या धोरणात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात याव्यात.
१) संस्थेचा जमीन खरेदीचा व्यवहार, शासनाची प्रारंभिक अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध होण्यापूर्वी, नोंदणीकृत खरेदीखताने पूर्ण झालेला असावा.
२) प्रारंभिक अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध होण्यापूर्वी, संस्थेच्या नोंदणीसाठी, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यांजकडे अर्ज केलेला असावा. ते रजिस्टर होण्यासाठी सारखे प्रयत्न केले असावे.
३) संस्थेच्या या अर्जाला अनुसरून, सहाय्यक निबंधकांनी, संस्थेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते उघडण्याची परवानगी, अधिसूचनेपूर्वी दिलेली असावी.
४) वरील परवानगीनुसार संस्थेने संस्थेच्या नावाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अधिसूचना प्रसिद्ध होण्याच्या तारखेपूर्वी खाते उघडलेले असावे व ते खाते चालू स्थितीत असावे.

वरील चारही अटींची पूर्तता जी नियोजित सहकारी संस्था कागदपत्रांच्या सहाय्याने पूर्ण करू शकेल त्यांच्या जमिनी भूसंपादनातून वगळण्यात याव्यात. तसेच या संबंधीचे वैयक्तिक प्रकरणांचे निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात यावेत.

| **Item No.** | **51/15** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : वांद्रे (पूर्व) येथे प्लॉट नं. जी-९ येथे बांधण्यात येत असलेल्या कार्यालयीन इमारतीत जागेचे वाटप.

ठराव :

| **Item No.** | **51/16** | **Resolution No.** | **854** |
|---|---|---|---|

विषय : मराठी टंकलेखन, लघुलेखन व प्रशिक्षण बक्षीस योजना - प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मराठी टंकलेखन व लघुलेखनाचे शिक्षण घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून शासनाच्या दिनांक १६ जून १९८१, १२ ऑगस्ट १९८२, तसेच ११ सप्टेंबर १९८४ च्या आदेशान्वये मान्य करण्यात आलेली बक्षीस योजना प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना शासन निर्णयाच्या तारखेपासून लागू करण्यात यावी.

| **Item No.** | **51/17** | **Resolution No.** | **855** |
|---|---|---|---|

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या ७८३ क्रमांकाच्या ठरावानुसार एकरकमी किंमत भरण्यासाठी ३०-६-१९८४ पर्यंत देण्यात आलेली मुदत ३०-९-१९८४ पर्यंत वाढविण्यात यावी. तसेच या निर्णयाला पुरेशी प्रसिद्धी देण्यात यावी.

**Item No.** 51/18 **Resolution No.** 856

विषय : भारतीय युनिट ट्रस्ट या संस्थेला वांद्रे पुन:प्रापण योजना येथे उच्च उत्पन्न गटासाठी बांधलेल्या इमारतीपैकी २८ गाळ्यांची एक अतिरिक्त इमारत देण्याबद्दल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

भारतीय युनिट ट्रस्ट या संस्थेला वांद्रा पुन:प्रापण विभागातील एच-२ प्रकारची एकच स्वतंत्र इमारत निवासस्थानांसाठी देण्यात यावी. तसेच जुहू विलेपार्ले विभागामध्ये व्यापारी उपयोगाच्या विभागातील १०,००० चौ. फुटाचे क्षेत्र नेहमीच्या अटींना अनुसरून देण्यास मान्यता देण्यात येते.

यानंतर प्राधिकरण्यासमोर श्री. अतुल हुले यांनी पाठविलेली निरनिराळी पत्रे सादर करण्यात आली. दिनांक २६-६-१९८४ च्या पत्रात श्री. हुले यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.

१) मराठी भाषेच्या कारभारात जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी शासनाने अंगिकारलेली बक्षिस योजना कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतच्या विषयावर असे सांगण्यात आले की, ही बाब प्राधिकरणाच्या ५१ व्या बैठकीत चर्चेला आली असताना त्यामध्ये निर्णय झाला आहे.

२) प्राधिकरण व विभागीय मंडळांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध सुरु असलेल्या चौकशी प्रकरणासंबंधीचा आढावा घेतला असून योग्य त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना सुधारीत दराने भत्ते देण्याची तरतूद असल्यास त्याप्रमाणे भत्ते देण्यात यावेत.

३) श्री. वसंत केळकर, कनिष्ठ अभियंता यांचे प्रकरण प्राधिकरणाच्या पुढील बैठकीसमोर ठेवण्यात येत आहे.

४) श्री. सैय्यद अहमद (दिवंगत) कार्यकारी अभियंता यांच्या भविष्य निर्वाह निधीतील त्यांच्या स्वत:च्या वर्गणीच्या रकमेचा चेक देण्यात आल्याचे श्री. अतुल हुले यांनीच सांगितले. बाकीच्या रकमाबद्दल काही कार्यवाही अजून बाकी आहे ती संपताच पुढील निर्णय दिले जातील असे सांगण्यात आले.

दिनांक २७ जून १९८४ च्या पदविधर व अन्य कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित दर्जा देण्याच्या श्री. हुले यांच्या पत्रावर असा खुलासा करण्यात आला की, या विषयाची बाब टिप्पणी ५१ व्या बैठकीसमोर ठेवावयाची होती. परंतु काही अपरिहार्य अडचणींमुळे ती ठेवता आली नाही ती आता पुढील बैठकीसमोर ठेवण्यात येईल.

श्री. हुले यांनी दिनांक २८-३-१९८४ च्या श्री. रविंद्र मंकणी यांना विशेष रजा मंजूर करण्यासंबंधीच्या पत्रावर असे सांगण्यात आले की, यासाठी कोणत्याही तऱ्हेची विशेष रजा देण्याची नियमांत तरतूद नाही. परंतु पुन्हा एकवार शासनाकडे विचारणा केली जाईल. नियमानुसार सर्व रजा श्री. मंकणी यांना देण्यात येईल.

यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने 'महात्मा फुले शिक्षण संस्थेस' संक्रमण शिबिरातील ९ गाळे देण्यासंबंधीच्या विषयावर चर्चा करण्यात आली. हा विषय प्राधिकरणाच्या ५० व्या बैठकीसमोर आणण्यात आला होता व त्यावेळी घेतलेल्या निर्णयानुसार संक्रमण शिबिरातील गाळे या कामासाठी देता येणार नाही असा झालेला निर्णय संबंधित

संस्थेला कळविण्यात आला होता. संक्रमण शिबिरांतील गाळ्यांची आवश्यकता लक्षात घेता अशा तऱ्हेच्या प्रस्तावाला मान्यता देणे योग्य होणार नाही असे मत प्राधिकरणाने पुन्हा एकदा व्यक्त केले. कन्नमवारनगर येथे माध्यमिक शाळेसाठी द्यावयाचा भूखंड लवकर देण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी असे आदेश मुंबई मंडळाला देण्यात यावेत असे मत प्राधिकरणाने व्यक्त केले.

वरील चर्चेनंतर अध्यक्ष/प्राधिकरण यांनी श्री. सदाशिवराव तिनईकर यांची सचिव गृहनिर्माण या पदावरून सचिव, ग्रामविकास या पदावर बदली झाल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आणले. श्री. सदाशिवराव तिनईकर यांनी सचिव, गृहनिर्माण या नात्याने/प्राधिकरणाच्या कार्यात तसेच प्राधिकरणाचे सदस्य या नात्याने नेहमीच रस घेतला व या किचकट आणि अवघड विषयावर अत्यंत मोलाचे मार्गदर्शन सतत केले त्याबद्दल आभार व्यक्त करणारा ठराव मंजूर करण्यात यावा असे मत सर्व सदस्यांनी व्यक्त केले.

**Meeting No.** 52 **Meeting Date** 06/Aug/1

**Item No.** 52/24a **Resolution No.** 874

विषय :

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या सेवेतून त्यांच्या मूळ खात्यात प्रत्यावर्तित झालेले प्राधिकरणाचे वित्त नियंत्रक श्री. ह. वा. मातखंडे यांनी प्राधिकरणाच्या सेवेत असताना केलेल्या मौलिक कार्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात यावेत.
त्याचप्रमाणे,
प्राधिकरणाचे सचिव, श्री. प्र. द. राजपाठक यांनी चार वर्षांच्या कालावधीत केलेल्या मौलिक सेवेबद्दल त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.
त्याचप्रमाणे,
प्राधिकरणाच्या सेवेत रुजू झालेले उपमुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. व रा. खोब्रागडे व प्राधिकरणाचे सचिव म्हणून रुजू झालेले श्री. द. न. शृंगारपुरे व वित्त नियंत्रक, श्री. ज. रा. बक्षी यांचे स्वागत करण्यात येत आहे.
त्यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे व अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

---

**Item No.** 52/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २९-६-१९८४ रोजी झालेल्या ५१ व्या (सर्वसाधारण बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 52/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करावयाच्या कार्यवाहीचा पाठपुरावा करण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 52/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर पाठपुरावा करण्यात न आलेल्या निर्णयाची यादी.

ठराव :

---

**Item No.** 52/4 **Resolution No.** 858

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नवे औरंगाबाद व नागपूर येथील नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयटिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नवे औरंगाबाद व नागपूर येथील नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण १७५.९८ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 52/5 **Resolution No.** 859

विषय : सोलापूर येथे बिडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून झालेली नेमणूक.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) सोलापूर येथे बिडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत हुडको कन्सल्टन्सी यांच्या नेमणूकीच्या संदर्भात सल्लामसलतीच्या अटी व शर्ती ठरविण्याचे अधिकार प्राधिकरणाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना देण्यात येतात.
२) ही योजना राबविण्यासाठी श्री. सु. वि. याडकीकर यांची नगररचना अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास व त्यांची सहाय्यक उपसंचालक म्हणून श्रेणी वाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे व नेमणूकीबद्दल शासनाच्या आवश्यक त्या पूर्वपरवानगीसाठी योग्य तो प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.
३) सोलापूर येथील दुसऱ्या अधिसूचित क्षेत्रासाठी लागू करण्यात आलेले विकास नियोजन नियम याही अधिसूचित क्षेत्रासाठी लागू करण्यात यावे.

---

**Item No.** 52/6 **Resolution No.** 860

विषय : श्री. व्ही. एस. केळकर, अस्थायी आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता यांना नियत आस्थापनेवर नेमणूक देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. व्ही. एस. केळकर, अस्थायी आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता यांना नियत आस्थापनेवर त्याच पदावर नेमणूक मिळण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 52/7 **Resolution No.** 861

विषय : श्री. सय्यद अहमद, कार्यकारी अभियंता यांची खंडीत सेवा चालू ठेवण्यासाठी अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. सय्यद अहमद यांच्या बडतर्फीच्या दिनांक १८-१२-१९७८ (मध्यान्ह नंतर) पासून ते दिनांक ४ मे १९८३ (मध्यान्ह पूर्व) पर्यंतच्या कालावधीसाठी मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंत्याचे एक अधिसंख्य पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात येते. श्री. सय्यद अहमद हे दिनांक ४-४-१९८४ रोजी दिवंगत झाल्यामुळे त्यांचेविरुद्ध फेरचौकशी करण्याची आवश्यकता नाही.

---

**Item No.** 52/8 **Resolution No.** 862

विषय : माहिम मच्छिमार येथील वसाहतीमध्ये गॅस सिलिंडरचा साठा करण्यासाठी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांना भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
माहिम मच्छिमार येथील वसाहतीमध्ये गॅस सिलिंडरचा साठा करण्यासाठी द्यावयाचा भूखंड भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांना नेहमीच्या अटी व शर्तींवर वितरण करण्यात यावा.

---

**Item No.** 52/9 **Resolution No.**

विषय : कर्मचारी संघटनेची बोनसबाबतची मागणी.

ठराव :

---

**Item No.** 52/10 **Resolution No.**

विषय : कोले कल्याण येथील स. नं. १५७/२, १५८/२३ (भाग) २९७/८, २९८/१,२,३ वगैरे अंदाज ६ एकर ११ गुंठे ही प्राधिकरणासाठी भूसंपादनाखाली असणारी जागा मे. डॅमी उल्टेक्स कॉर्पोरेशन व एशियन पेंट्स यांच्या कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधण्यासाठी उपयोगात आणण्याकरीता वगळण्याविषयी.

ठराव :

---

**Item No.** 52/11 **Resolution No.** 863

विषय : कार्यव्ययी आस्थापनेवर ५ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कामगारांना हंगामी नियत आस्थापनेवर घेणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यव्ययी आस्थापनेवर मजदूर म्हणून काम करीत असलेले श्री. एस. एल. खरात यांना दिनांक १-१०-१९८३ पासून हंगामी नियत आस्थापनेवर घेण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 52/12 **Resolution No.** 864

विषय : वैद्यकीय खर्चाच्या परतफेडीच्या नियमावलीमधील क्रमांक ६ अनुसार हातावळवयाच्या प्रकरणी निकष ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वैद्यकीय खर्चाच्या परतफेडीच्या नियमावलीमधील क्रमांक ६ अनुसार हातावळवयाच्या प्रकरणी विषय टिप्पणीला जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांना मान्यता देण्यात येते. यापुढे अशी प्रकरणे या तत्वांना अनुसरून निकालात काढण्यात यावीत.

---

**Item No.** 52/13 **Resolution No.** 865

विषय : एकूण व्यवस्थापन संकल्पनावरील सहावा प्रगत आंतरराष्ट्रीय निवासी शिक्षणक्रम काठमांडू, नेपाळ २३-९-१९८४ ते २९-९-१९८४

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नवी दिल्ली येथील इन्स्टिट्यूट ऑफ मार्केटिंग मॅनेजमेंट या संस्थेतर्फे काठमांडू, नेपाळ येथे दिनांक २३-९-१९८४ ते २९-९-१९८४ या कालावधीत घेण्यात येणाऱ्या एकूण व्यवस्थापन संकल्पनावरील सहाव्या प्रगत आंतरराष्ट्रीय शिक्षणक्रमासाठी जागतिक बँक प्रकल्पाचे संचालक श्री. चन्दलाल यांचे नाव प्रस्तावित करण्यास मान्यता देण्यात येते व या अभ्यासक्रमाची फी रुपये ९,५०० भरण्यासही मान्यता देण्यात येते आहे.

---

| **Item No.** | **52/14** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांना कर्मवारनगर व राजे रघुजीनगर, नागपूर येथे देण्यात आलेल्या भूखंडाचे अधिमूल्य आकारण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **52/15** | **Resolution No.** | **866** |
|---|---|---|---|

विषय : हुडको व हरीओम ट्रस्ट यांचे संयुक्त प्रयत्नाने आयोजिलेल्या उपेक्षित वस्ती सुधारणा रचना संकल्पना, स्पर्धा, १९८३ यात महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने पाठविलेल्या योजना प्रकल्पाला द्वितीय पारितोषिक मिळाल्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुलुंड येथील 'वडारपाडा' या उपेक्षित वस्तीसाठी तयार केलेल्या सुधारणा प्रकल्पाची रचना व संकल्पना तयार करण्यात सहभागी असलेल्या खालील कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रुपये ५००/- चा रोख पुरस्कार देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
१) श्री. जे. आर. शहा, कार्यकारी अभियंता
२) श्री. टी. शेखदार, वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार
३) श्री. ए. एस. जोशी, सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार
४) श्री. ए. पी. वेलिंग, सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार
५) श्री. ए. ए. टोले, उपअभियंता
६) श्री. बी. डी. साळरकर, उपअभियंता
७) श्री. आर. पी. पाटील, संकल्प चित्र सहाय्यक

| **Item No.** | **52/16** | **Resolution No.** | **867** |
|---|---|---|---|

विषय : श्रीमती एस. आर. देसाई, वरिष्ठ सहाय्यक यांना वैद्यकीय खर्चाची परतफेड करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सेवेत वरिष्ठ सहाय्यक म्हणून काम करीत असलेल्या श्रीमती एस. आर. देसाई यांना त्यांच्या पतीच्या गंभीर आजारपणात झालेल्या खर्चाची परतफेड म्हणून रुपये ३,०००/- अपवादात्मक बाब म्हणून देण्यास मान्यता देण्यात येते. हा निर्णय पूर्वदाखल म्हणून (प्रिसिडंट) उद्धृत करण्यात येऊ नये.

| **Item No.** | **52/17** | **Resolution No.** | **868** |
|---|---|---|---|

विषय : प्रशंसनीय सेवेबद्दल कर्मचाऱ्याला रोख बक्षिस देऊन गौरव करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. जे. बी. म्हस्के, सेवानिवृत्त वाहनचालक यांनी केलेल्या प्रशंसनीय सेवेबद्दल प्राधिकरणातर्फे त्यांना रुपये १००/- रोख रक्कम बक्षिस म्हणून देऊन त्यांचा गौरव करण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **52/18** | **Resolution No.** | **869** |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या घरबांधणी कार्यक्रमासाठी भारतीय युनिट ट्रस्ट या संस्थेकडून कर्ज मिळविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) भारतीय,युनिट ट्रस्ट या संस्थेकडून १२.५ टक्के व्याजाने ५ कोटी रुपयांचे कर्ज मुंबई शहरातील जुन्या इमारतीच्या दुरुस्ती/पुनर्रचना या कार्यक्रमासाठी घेण्यास मान्यता देण्यात येते.
२) वांद्रे रिक्लमेशन स्कीममधील हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन या संस्थेस देऊ करण्यात आलेल्या २८ गाळ्यांपैकी त्या संस्थेला पाहिजे असलेले १२ गाळे दिल्यानंतर उरलेले १६ गाळे भारतीय युनिट ट्रस्ट या संस्थेस देण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **52/19** | **Resolution No.** | **870** |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील वांद्रे येथील गांधीनगर वसाहतीत औद्योगिक कामगारासाठी बांधलेल्या इमारत क्र. ४६ ची विक्री करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वांद्रे येथील गांधीनगर वसाहतीतील इमारत क्र. ४६ ची विक्री गाळेधारकांना विक्री योजनेतील तरतुदीनुसार म्हणजेच किंमतीत २० टक्के सूट देऊन करण्यात यावी. या इमारतीच्या दुरुस्तीवर झालेला खर्च गाळेधारकाकडून वसूल करण्यात येऊ नये.

| **Item No.** | **52/20** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील शिवडी-वडाळा ज्ञानेश्वरनगर आणि गोरेगाव येथील सिद्धार्थनगर व मोतीलाल नगर, वसाहतीतील बैठ्या इमारती पाडण्याविरुद्ध माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री यांनी दिलेले स्थगिती आदेश.

ठराव :

| **Item No.** | **52/21** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : कन्नमवारनगर, विक्रोळी येथे इमारत क्र. ५९ जवळील शेड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयास मिळण्याबाबत विनंती.

ठराव :

**Item No.** 52/22 **Resolution No.** 871

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे बांधल्या जाणाऱ्या उच्च उत्पन्न गटाच्या गाळ्यामध्ये घेण्यात येणाऱ्या नफ्याचे प्रमाण

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कांदिवली येथील ११२ उच्च उत्पन्न गटासाठी बांधलेल्या गाळ्यांची किंमत ठरविताना नफ्याचे प्रमाण १० टक्के असावे या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या ठरावास मान्यता देण्यात येऊ नये.

---

**Item No.** 52/23 **Resolution No.** 872

विषय : भारतमाता इंग्लिश स्कूल यांची मालवणी येथील दादासाहेब गायकवाड नगर वसाहतीत शाळेकरिता चार अधिक गाळे देण्याबाबतची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मालवणी येथील दादासाहेब गायकवाड या वसाहतीत रिकामे असलेले हेच गाळे म्हणजेच क्रमांक ६८६, ६८६-अ, ६८७ व ६८७-अ, हे भारतमाता, इंग्लिश स्कूल या संस्थेला शाळा चालविण्याकरिता नेहमीच्या अटी व शर्तीवर त्याचप्रमाणे किमान ८० टक्के जागा प्राधिकरणाच्या वसाहतीतील रहिवासी विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्याच्या अटीवर देण्यात यावेत.
त्याचप्रमाणे,
या संस्थेला एक वर्षाच्या मुदतीसाठी म्हणून दिलेले याच वसाहतीतील दोन गाळे म्हणजेच ७४७ व ७४८-ए क्रमांकाचे गाळे या संस्थेला रितसर वाटप करून नियमित करण्यात यावेत. असे एकूण ५ गाळे संस्थेला रितसर वाटप करण्यात यावेत व त्यासाठी नेहमीच्या गाळेवाटपाच्या अटी व शर्ती लागू होतील.

**Item No.** 52/24 **Resolution No.** 873

विषय : दादामाई नौरोजीनगर, अंधेरी (प.) येथील ६६० गाळ्यांना होणारा अपुरा पाणीपुरवठा ४' व्यासाची पाईपलाईन टाकण्यासाठी लागणारा खर्च मंजूर करणेबाबत (१.६७ लाख)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

दादामाई नौरोजी नगर या अंधेरी येथील वसाहतीतील ६६० गाळ्यांना होणाऱ्या पाणीपुरवठा सुधारणा करण्याच्या दृष्टीने ४' इंच व्यासाची अतिरिक्त जलवाहिनी टाकण्याचे काम करण्यास मंजूरी देण्यात येत आहे व त्याकरिता लागणाऱ्या अंदाज पत्राची रक्कम रुपये १,६७,१०० मंजूर करण्यात येत आहे. तसेच या कामी होणारा खर्च संबंधित गाळेधारकाकडून खरेदी किंमतीत वाढ करून वसूल करण्यात यावा.

वरीलप्रमाणे विषयसूचीवरील सर्व विषय संपल्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने खालील मुद्दे विचारात घेण्यात आले.

श्रीमती शालिनी राणे, सदस्या यांनी सगुणा महिला मंडळ यांना पुणे येथील गोखलेनगर वसाहतीतील २०० चौ. मिटर जागा दीर्घमुदतीने भाडेपट्ट्याने देण्यात यावी अशी विनंती त्यांच्या दिनांक ६-८-१९८४ च्या प्राधिकरणाचे माननीय अध्यक्ष यांना लिहिलेल्या पत्राद्वारे केली आहे. यावर चर्चा करताना प्राधिकरणाला असे सांगण्यात आले की, या महिला मंडळाला त्या वसाहतीत अगोदरच जागा देण्यात आली आहे. मात्र ती दोनवर्षांच्या मुदतीसाठी देण्यात आली आहे. यावर चर्चा केल्यानंतर असे ठरविण्यात आले की, या संस्थेला दीर्घमुदतीने जागा देण्याचा प्रस्ताव तपासून पहाण्यात यावा व प्राधिकरणापुढे विचारार्थ ठेवण्यात यावा.

यानंतर श्री. हुले यांनी कर्मचाऱ्यांना घरेबांधण्यासाठी भूखंड देण्याचा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी अशी विनंती केली की, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथे भूखंड उपलब्ध आहेत व त्या तुलनेने मागणी कमी आहे म्हणून त्यावर याच बैठकीत भूखंड देण्याचा निर्णय घेण्यात यावा. मुंबई शहराच्या बाबतीत भूखंड कमी आहेत व मागणी जास्त आहे. हे लक्षात घेऊन यावर नंतर निर्णय घेण्यात येईल. व भूखंडाचे वाटप कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी प्राधिकरणाने एक उपसमिती नियुक्त केली आहे. या उपसमितीच्या अगोदरच दोन बैठका झाल्या असून या प्रश्नाचा विचार उपसमितीने केला असल्याचे प्राधिकरणाला सांगण्यात आले. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांना संघटनांशीही उपसमितीने विचारविनिमय केला आहे. या उपसमितीची बैठक लवकर भरून या एकूण प्रश्नाचा विचार करून तो प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचारार्थ लवकरात लवकर ठेवण्यात यावा असे ठरविण्यात आले.

मुंबई मंडळाच्या सभापती श्रीमती शरयु ठाकूर यांनी दिनांक ३०-७-१९८४ रोजी प्राधिकरणाच्या अध्यक्षांना एक पत्र पाठवून मुंबई शहरामधील पुनर्रचना करण्यायोग्य अशा ३४ जागा भाडेकरूंच्या सहकारी संस्थांना देण्याविषयी प्राधिकरणाने निर्णय घ्यावा अशी विनंती केली आहे. आपल्या पत्रासोबत त्यांनी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने मंजूर केलेल्या ८१/११०५ क्रमांकाच्या ठरावाची प्रत सोबत पाठविली आहे. यावर प्राधिकरणाने मागील बैठकीत विचार केला होता. त्या संदर्भात मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने मंजूर केलेला ठराव तपासून प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत विचारार्थ ठेवण्यात यावा असे ठरविण्यात आले.

त्यानंतर श्री. हुले, सदस्य यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, पुणे शहरात महापालिकेला शाळा बांधण्यासाठी अगोदर गाळे देण्यात आले व नंतर त्या वसाहतीत

भूखंडही देण्यात आले. अशाप्रकारच्या ज्या वसाहतीत शाळेसाठी भूखंड देण्यात आले त्या वसाहतीत महानगरपालिकेला अगोदर दिलेले गाळे रिकामे करून घेण्यात यावेत व ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. श्री. हुले यांच्या या विनंतीवर हा प्रश्न तपासून पहाण्यात यावा असे ठरविण्यात आले.

श्री. हुले यांनी येरवडा, पिंपरी येथे अनुक्रमे ९० व ५० गाळे मागणी नसल्यामुळे रिकामे आहेत व ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत असा प्रश्न उपस्थित केला. हा विषय तपासून पहाण्यात यावा असे ठरविण्यात आले.

यानंतर श्री. हुले, सदस्य यांनी पुणे येथील विश्रामधामाचा दुरुपयोग होत असल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून दिले. यासंबंधात पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांकडून वस्तुस्थिती जाणून घेतल्यानंतर प्राधिकरणाने पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी यांना असे आदेश दिले की, विश्रामधामात प्राधिकरणाचे व मंडळाचे सदस्य व कर्मचारी याशिवाय इतर कोणासही जागा देताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार आरक्षण करून आकार घेण्यात यावा. कोणालाही विश्रामधामाचा उपयोग आकार न देता करण्यात येऊ नये. व त्याचा कोणत्याही प्रकारे गैरवापर होणार नाही याची दक्षता मुख्य अधिकारी पुणे मंडळ यांनी घ्यावी.

यानंतर श्री. हुले, सदस्य यांनी नामदार गृहनिर्माण मंत्री यांनी मुंबई व कोकण गृहनिर्माण मंडळाच्या सदस्यांची व अधिकाऱ्यांची जी बैठक काही दिवसांपूर्वी घेतला होती त्या बैठकीत ज्या सूचना केल्या होत्या त्यांचा विचार व्हावा अशी सूचना मांडली. या सूचना तपासून पहाण्यात याव्यात असे ठरले.

यानंतर श्री. हुले, सदस्य यांनी प्राधिकरणाच्या सेवेतून प्रतिनियुक्ती वरील अधिकारी मूळ विभागाकडे प्रत्यावर्तित झालेले, प्राधिकरणाचे सचिव, श्री. प्र. द. राजपाठक व वित्त नियंत्रक, श्री. ह. वा. भातखंडे यांचे त्यांनी प्राधिकरणाच्या सेवेत असताना केलेल्या कामाबद्दल आभार मानण्यात यावेत असा प्रस्ताव मांडला.

**Meeting No.** 53 **Meeting Date** 17/Sep/1

**Item No.** 53/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ६-८-१९८४ रोजी झालेल्या ५२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 53/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 53/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही न करण्यात आलेल्या निर्णयाची यादी.

ठराव :

**Item No.** 53/4 **Resolution No.**

विषय : लोकमान्य नगर, दादर येथे स्त्री हितकारिणी या संस्थेस २ वर्षांच्या कराराने दिलेला भूखंड ३० वर्षांच्या कराराने देण्याच्या विनंतीबाबत.

ठराव :

**Item No.** 53/5 **Resolution No.** 875

विषय : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांना कत्रमवारनगर व राजेरघुजी नगर, नागपूर येथे देण्यात आलेल्या भूखंडाचे अधिमूल्य आकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कामगार कल्याण मंडळाने मागणी केल्यानुसार वार्षिक रुपये १/- भाडेपट्ट्यावर २५१० चौ. वार क्षेत्रफळाचा भूखंड कामगार कल्याण मंडळाला द्यावयाचा झाल्यास जमिनीच्या मूळ किंमतीनुसार भूखंडाची किंमत रु. ३,३६,३४० शासनाने सोसण्याविषयी शासनास पत्राद्वारे कळवावे असा निर्णय घेतला, व नागपूर येथील राजेरघुजीनगर या वसाहतीतील भूखंड कामगार कल्याण मंडळाला नाममात्र रु. १/- किंमत आकारून देण्यात यावा.

**Item No.** 53/6 **Resolution No.** 876

विषय : हुडकोने मंजूर केलेली मालेगाव येथील ३९४ गाळ्यांची अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण - ब) गृहनिर्माण योजना (योजना क्र. २४३५ - सी) - हुडको अर्थसहाय्यामधून वगळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) हुडकोने मंजूर केलेली ३९४ गाळ्यांची अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण - ब) गृहनिर्माण योजना (योजना क्रमांक २४३५ - सी) हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्यास प्राधिकरणाने अनुमती दिली व या योजनेसाठी हुडकोकडून मिळालेल्या कर्जाचा पहिला हप्ता रुपये ७.२१ लक्ष व्याजासहित हुडकोस त्यांच्या अटीनुसार परत करण्याकरिता अनुमती देण्यात येत आहे.

२) सदर योजनेच्या कर्जास महाराष्ट्र शासनाने मान्यता व हमी दिल्यामुळे सदर योजना वगळण्याचा प्राधिकरणाने घेतलेला निर्णय शासनास कळवावा.

व,

३) या योजनेवर आतापर्यंत झालेला खर्च याच जागेवर हाती घ्यावयाच्या सोयीसह भूखंड योजनेवरील खर्चात समाविष्ट करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

---

**Item No.** 53/7 **Resolution No.** 877

विषय : हुडकोने मंजूर केलेली लोणावळा येथील ३३७ अल्प उत्पन्न गट गाळ्यांची योजना (योजना क्र. २१२० - सी) हुडको सहाय्यातून वगळण्याबाबत माहिती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

लोणावळा येथील अल्प उत्पन्न गट - ३३७ गाळ्यांची गृहनिर्माण योजना (योजना क्रमांक २१२० - सी) हुडको अर्थसहाय्यातून वगळण्याबद्दल उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास प्राधिकरणाने मान्यता दिली.

व,

या योजनेकरिता दस्तऐवजासाठी हुडकोने समपहरित (फॉरफिट) केलेले रु. ५,००० लोणावळा येथील अन्य योजनांवर यथाप्रमाण आकारण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

| Item No. | 53/8 | Resolution No. | 878 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेली मालेगाव येथील ८० आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गाळ्यांची व १५० मध्यम उत्पन्न गट - २ गाळ्यांची संमिश्र गृहनिर्माण योजना (योजना क्र. २६२२ - सी) हुडको अर्थसहाय्यामधून वगळल्याबाबत माहिती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मालेगाव येथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी ८० गाळे व मध्यम उत्पन्न गट - २ साठी १५० गाळे यांची संमिश्र गृहनिर्माण योजना (योजना क्र. २६२२ - सी) हुडको अर्थसहाय्यातून वगळण्याबाबत उपाध्यक्ष / प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास प्राधिकरणाने कार्योत्तर मान्यता दिली.
व,
योजनेकरिता (डॉक्युमेंटेशन चार्जेस) दस्तऐवजासाठी हुडकोने समपहरित (फॉरफिट) केलेले पैसे याच जागी हात घ्यावयाच्या नवीन योजनेच्या खर्चात समाविष्ट करण्यास मान्यता दिली.

| Item No. | 53/9 | Resolution No. | 879 |
|---|---|---|---|

विषय : विश्वेश्वरय्या कॉलेज ऑफ इंजिनिअरींग नागपूर या संस्थेस स्वस्त घरबांधणीमध्ये अधिक काटकसरीच्या कार्यपद्धतीचा विकास करणे या योजनेसाठी चुना, फ्लाय अॅश व रेती यांच्या मिश्रणाच्या विटा इत्यादी तयार करणेसाठी आर्थिक सहाय्य करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अल्प किंमतीच्या घरबांधणीत काटकसर करण्याच्या कार्यपद्धतीचा विकास करणे, या योजनेसाठी ठराव क्रमांक १२६ द्वारे मंजूर करण्यात आलेल्या रु. ३६,००० या आर्थिक अनुदानाएवढे सुधारीत अंदाजपत्रकाप्रमाणे रु. ७५,३०० एवढ्या आर्थिक अनुदानास प्राधिकरणाने मंजूरी दिली.
२) ठराव क्र. १२६ च्या निर्णयानुसार नमुन्यासाठी बांधण्यात येणार घर नागपूर मंडळाच्या जागेवर बांधण्याऐवजी कॉलेजच्या परिसरात बांधण्यास प्राधिकरणाने मंजूरी दिली.
व,
ठरावात दिलेल्या रक्कमेशिवाय रु. १२,००० विश्वेश्वरय्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला देण्यास प्राधिकरणाने कार्योत्तर मंजूरी दिली.

| Item No. | 53/10 | Resolution No. | 880 |
|---|---|---|---|

विषय : गलिच्छ वस्ती सुधार कामे, कोकण मंडळाने कार्यान्वित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कल्याण येथील गलिच्छ वस्ती सुधार कामे घेण्याच्या कार्यवाहीस एकमताने मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** **53/11** **Resolution No.** **881**

विषय : हुडकोने मंजूर केलेली ओशिवरा, मुंबई येथील ४०२ अल्प उत्पन्न गट भूखंड विकासयोजना (योजना क्रमांक २६६७ - सी) हुडको अर्थसहाय्यातून वगळल्याबाबत माहिती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ओशिवरा मुंबई येथील ४०२ अल्प उत्पन्न गटाच्या विकसित भूखंडाची योजना (योजना क्र. २६६७-सी) हुडको अर्थसहाय्यातून वगळण्याबाबत उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी घेतलेल्या निर्णयास प्राधिकरणाने कार्योत्तर मंजूरी दिली.
तसेच,
*या योजनेकरिता दस्तऐवजासाठी हुडकोने समपहरित (फॉरफिट) केलेले रु.* ५,००० व या योजनेवर आजपावेतो झालेला इतर एकूण खर्च याच योजना क्षेत्रावर हाती घेण्यात येणाऱ्या उच्च उत्पन्न गटाच्या सहकारी संस्थांसाठी विकसित भूखंड योजनेवर यथाप्रमाण आकारण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

**Item No.** **53/12** **Resolution No.**

विषय : मुंबई शहरामधील पुनर्रचना करण्यायोग्य अशा ३४ जागांचा फेरविचार करणे.

ठराव :

**Item No.** **53/13** **Resolution No.**

विषय : श्री. जी. पी. गिरकर आणि श्री. ल. ह. जोशी प्रतिनियुक्तीवरील उपजिल्हाधिकारी यांना प्राधिकरणाच्या सेवेत पुनर्नेमणूक देण्याबाबत.

ठराव :

**Item No.** **53/14** **Resolution No.** **882**

विषय : ॲप्रेंटिस ॲक्ट १९५१ अनुसार शिकाऊ उमेदवार नेमण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) बाबटिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे ९२ शिकाऊ उमेदवारांच्या दि. १-२-१९८५ पासून नेमणूका करण्याकरिता प्राधिकरणाने मंजूरी दिली.
२) या नेमणूकीकरिता प्रतिवर्षी रक्कम रु. २,५३,९२० खर्चाला प्राधिकरणाने मंजूरी दिली
व,
३) पुढील वित्तीय वर्षापासून अर्थसंकल्पात शिकाऊ उमेदवारांच्या भरतीपोटी होणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यात मान्यता देण्यात आली.

**Item No.** **53/15** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबत.

ठराव :

**Item No. 53/16 Resolution No. 883**

विषय : अ) हुडको अर्थसहाय्यित ग्रामीण भागात भूमिहीन व बेघर कामगारांसाठी घरकुले (झोपड्या) बांधण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या योजनेस, शासनाच्या वतीने, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने हुडकोकडून कर्जरुपी अर्थसहाय्य मिळवून देण्यास मान्यता देणे.

व,

ब) महाराष्ट्र शासनाच्या वतीने बीड जिल्ह्यातील हाती घ्यावयाच्या १८७३ घरकुलांच्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेस हुडकोने मंजूर केलेल्या २५.२८ लक्ष रुपयांच्या कर्जास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

ग्रामीण भागातील भूमिहीन व बेघर कामगारांसाठी घरकुल बांधण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या १९८४-८५ सालच्या योजनेस प्राधिकरणाद्वारे शासनाच्या वतीने हुडकोकडून कर्जरुपी अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीस अनुमती व अधिकृती देण्यात येते.

व,

बीड जिल्ह्यातील १८७३ घरकुलांच्यासाठी येणाऱ्या ५०.५३ लक्ष अंदाजित खर्चाबद्दल हुडकोने मंजूर केलेल्या २५.२८ लक्ष रुपये कर्जरुपी अर्थसहाय्यास प्राधिकरण अनुमती व अधिकृती देत आहे.

**Item No. 53/17 Resolution No. 884**

विषय : तेल उद्योग विकास बोर्ड यांना जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे विकसित करण्यात येत असलेल्या व्यापारी केंद्रास कार्यालयासाठी जागा देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

तेल उद्योग विकास बोर्ड या संस्थेला जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून प्लॉट 'बी' या जागेवर उभारण्यात येत असलेल्या व्यापारी केंद्रातील युनिट नंबर १ हे तेल उद्योग विकास बोर्डाला नेहमीच्या अटीवर व शर्तीवर विकत देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No. 53/18 Resolution No.**

विषय : नागपूर येथील पूरग्रस्तांना नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या गाळ्यांत तात्पुरती निवासाची जागा देण्याबाबत करण्यात आलेली कार्यवाही.

ठराव :

**Item No. 53/19 Resolution No. 885**

विषय : औरंगाबद विभागीय मंडळातील सिमेंट वाहतूकीच्या कामाचे कंत्राट देण्यातील व या कामाचे पेमेंट करण्यातील अनियमितता व त्यामुळे झालेला अवाजवी खर्च.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
१) या प्रकरणातील संबंधित अधिकारी श्री. उ. तु. नाडे मुख्य अधिकारी (सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिक्षक अभियंता) व श्री. कामिटकर (कार्यकारी अभियंता) यांना देखिल निलंबित करण्याचेच आदेश काढण्यात यावेत
व त्यानंतर,
२) वरील दोन्ही अधिकाऱ्यांच्या मूळ खात्याकडे सदरहू कार्यवाहीचा अहवाल पाठविण्यात येऊन शासनास त्यांच्या विरुद्ध खातेनिहाय चौकशी करण्यासंबंधी प्रस्ताव पाठवावा.

**Item No. 53/20 Resolution No. 886**

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे नाशिक येथील ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून एकूण ८.१० लक्ष रुपये कर्ज घेण्यास प्राधिकरण अनुमती व अधिकृती देत आहे.

**Item No. 53/21 Resolution No. 887**

विषय : गोराई रोड, बोरीवली, मुंबई येथे ४४ हेक्टर जमिनीचे पुन:प्रापण करून त्या जमिनीचा विकास करण्यासाठी, गट कमांक १/२ च्या कामासाठी आलेल्या निविदांचा विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन वरील प्रस्ताव मंजूर करण्यास प्राधिकरणाने अंशत: मंजूरी दिली.

**Item No.** 53/22 **Resolution No.** 888

विषय : परभणी येथे औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेल्या गाळ्यांचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
परभणी येथे औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता बांधलेल्या गाळ्यांपैकी उरलेल्या गाळ्यांचे वाटप किंमतीपोटी घ्यावयाचा सुरुवातीचा हप्ता रु. ११००/- (रु. अकराशे मात्र) ठरविण्यात यावा. व त्यापैकी रुपये ५०० गाळ्यांचा ताबा घेताना व रुपये ६०० (रु. सहाशे मात्र) पाच वर्षांच्या कालावधीत समान हप्त्याने वसूल करण्यात यावेत. सुरुवातीच्या हप्त्यापैकी घ्यावयाची बाकीची रक्कम रुपये ६०० (रु. सहाशे मात्र) ही गाळेधारकांना दिलेले कर्ज म्हणून धरून योजनेतील दराने व्याज आकारण्यात यावे. त्याचप्रमाणे गाळे तयार झालेल्या तारखेपासून त्यांचे प्रत्यक्ष वाटप होण्यापर्यंतच्या कालावधीसाठी गुंतवणूक केलेल्या भांडवलावरील व्याजाची भरपाई योजनेतील दर करून तो भाडेखरेदीच्या २० वर्षांच्या समान हप्त्यांत अंतर्भूत करून वसूल करण्यात प्राधिकरणाने मान्यता दिली.

---

**Item No.** 53/23 **Resolution No.** 889

विषय : तुळजापूर येथे औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाकरिता बांधलेल्या गाळ्यांचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
तुळजापूर येथे औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता बांधलेल्या १८६ आणि अल्प उत्पन्न गटाकरिता बांधलेल्या २४६ गाळ्यांपैकी उरलेल्या गाळ्यांचे वाटप किंमतीपोटी घ्यावयाचा सुरुवातीचा हप्ता कमी करून करण्यात यावे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता बांधलेल्या गाळ्यांसाठी सुरुवातीच्या हप्त्यापैकी रु. ५०० (रु. पाचशे मात्र) व अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या गाळ्यासाठी सुरुवातीच्या हप्त्यापैकी रुपये १५०० (रु. पंधराशे मात्र) गाळ्याचा ताबा देताना वसूल करण्यात यावेत. व सुरुवातीच्या हप्त्याची बाकीची रक्कम पाच वर्षांच्या कालावधीत समान हप्त्याने योजनेतील दराने व्याज आकारून वसूल करण्यात यावी. त्याचप्रमाणे गाळे तयार झाल्याच्या तारखेपासून तो त्यांचे प्रत्यक्ष वाटप होईपर्यंतच्या कालावधीसाठी गुंतवणूक केलेल्या भांडवलावरील व्याजाची भरपाई भाडेखरेदीच्या कालावधीत समान हप्त्यात अंतर्भूत करून वसूल करण्यात यावी.
वरीलप्रमाणे उपाय योजना केल्यानंतरदेखील गाळ्यांना पुरेशी मागणी न आल्यास गाळ्यांचे वाटप आवश्यक तर भाडेपट्टीवर आर्थिक भाडे आकारून करण्यात यावे. याबाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

---

**Item No.** **53/24** **Resolution No.** **890**

विषय : श्री. एस. के. शेट्टी यांना चालविण्यात देण्यास आलेल्या कॅन्टीनची दि. १-१०-१९८४ पासून मुदत वाढविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

दिनांक १-१०-१९८४ पासून ११ महिन्याच्या मुदतीने श्री. शेट्टी यांना पूर्वीच्याच अटी व शर्तीवर कॅन्टीन चालू ठेवण्याचे नवे लायसन्स देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. श्री. शेट्टी यांनी सचिव/प्राधिकरण यांचेशी जरूर तो त्याबाबत करारनामा करण्यास प्राधिकरणाने मंजूरी दिली.

वरीलप्रमाणे विषयसूचीवरील सर्व विषय संपल्यावर अध्यक्षांच्या परवानगीने खालील मुद्दे विचारात घेण्यात आले.

मुद्दा क्रमांक (१) :

महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटनेचे प्रधान कार्यवाह यांनी दिनांक १७.९.१९८४ रोजी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना जाहीर झालेली अंतरिम वाढ प्राधिकरण कर्मचाऱ्यांना लागू करण्याबद्दल प्राधिकरणाकडे पत्र पाठविले आहे. या बाबतीत चर्चा होऊन शासनाकडून नवीन केंद्र शासनाच्या वेतन सुधारणेपुर्वी अंतरिम वाढ १.६.१९८३ पासून शासन निर्णयाप्रमाणे प्राधिकरण कर्मचाऱ्यांना देण्याबद्दल प्रशासनाने जरूरी ती विचारणा करावी असे ठरले.

मुद्दा क्रमांक (२) :

दिनांक ४.९.१९८४ रोजी प्राधिकरणाच्या (पाण्याचे पंपावर काम करणारे पंपमन व प्राधिकरणाचे रक्षण करणारे वॉचमन वगळून) कर्मचाऱ्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांना लाक्षणिक संपात भाग घेतल्यामुळे प्राधिकरणाच्यांचा सप्टेंबर १९८४ च्या पगाराबद्दल काय आदेश देण्यात आले आहेत याची विचारणा प्राधिकरणाचे सदस्य श्री. अतुल हुले यांनी केली. त्यावेळी या बाबतील निर्णय शासनाच्या धोरणावर अवलंबून राहील असे प्राधिकरणाकडून सांगण्यात आले.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.** 54 **Meeting Date** 29/Sep/1

**Item No.** 54/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १७-९-१९८४ रोजी झालेल्या ५३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 54/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 54/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही न करण्यत आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 54/4 **Resolution No.**

विषय : मुंबई शहरामधील पुनर्रचना करण्यायोग्य ३४ जागांचा फेरविचार करणे.

ठराव :

**Item No.** 54/5 **Resolution No.** 891

विषय : सर्वश्री जी. पी. गिरकर आणि ल. ह. जोशी, प्रतिनियुक्तीवरील उपमुख्य अधिकारी यांना प्राधिकरणाच्या सेवेत पुनर्नेमणूक देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. गिरकर व श्री. जोशी यांना पुनर्नेमणूक न देता प्राधिकरणाच्या सेवेतून दिनांक ३१-१०-१९८४, मध्यान्हनंतर कार्यमुक्त करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

**Item No.** 54/6 **Resolution No.** 892

विषय : कर्मचाऱ्यांचा निवृत्ती दिनांकानंतरचा वाढीव सेवाकालावधी अखंडीत चालू ठेवण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. भोसले व श्री. काना भिका यांचा वाढीव सेवा कालावधी हा नियमानुसार पुनर्नेमणूक म्हणून ठरविण्यात येऊन त्याप्रमाणे प्रशासनाने आदेश द्यावेत.

| Item No. | 54/7 | Resolution No. | 893 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना अंतरिम वाढ मंजूर करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासन ठराव दिनांक ११-९-१९८४ प्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांना करण्यात आलेली अंतरिम वाढ, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करावी व त्याप्रमाणे प्राधिकरणाने शासनाकडे शिफारस करावी.

| Item No. | 54/8 | Resolution No. | 894 |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँकेच्या सहाय्याने कार्यान्वित करण्यात येत असलेल्या योजनांच्या अंतर्गत जमिनीच्या वितरणाच्या संबंधात संचालक जागतिक बँक प्रकल्प यांना अधिकार प्रदान करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
संचालक जागतिक बँक प्रकल्प यांनी वितरणासंबंधी गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमीन विनीयोग) नियम व विनियम यामध्ये अधिक स्पष्ट तरतूद असण्याच्या आवश्यकतेबाबत अधिक विचार करून त्याबाबतीत प्रस्ताव जरूर पडल्यास प्राधिकरणापुढे यथावकाश मांडावा व तोपर्यंत निवासी व अनिवासी भूखंड वितरणाबाबतचे प्राधिकरणाचे वरील उल्लेखनीय अधिकार संचालक जागतिक बँक प्रकल्प यापुरते सुचविल्याप्रमाणे प्रदान करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

| Item No. | 54/9 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरण कर्मचाऱ्यांना दोन टक्के आरक्षणातून दिलेल्या गाळ्यांसाठी आस्थापना खर्च व नफा न आकारणेबाबत.

ठराव :

**Item No.** 54/10 **Resolution No.** 895

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे उच्च उत्पन्न गटाकरिता बांधण्यात येत असलेल्या दोन इमारतीतील गाळ्यांचे वाटप विभिन्न राज्य शासनाना करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे बांधण्यात येत असलेल्या दोन इमारतीतील ३२ व १८ गाळ्यांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| | |
|---|---|
| दादरा व नगरहवेली | १ गाळा |
| गुजराथ | १८ गाळे |
| गोवा | १० गाळे |
| हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया | ३ गाळे |
| एकूण | ३२ गाळे |
| बी. ए. आर. सी. | १८ गाळे |

या गाळ्यांची विक्री वरीलप्रमाणे राज्यशासनाना व कॉर्पोरेशनना एकरकमी किंमत देऊन करण्यात यावी व त्यासाठी नेहमीच्या अटी व शर्ती घालण्यात याव्यात.

**Item No.** **54/11** **Resolution No.** **896**

विषय : बांद्रा (पूर्व), येथील प्लॉट नं. जी-९ मधील बांधलेल्या कार्यालयीन इमारतीच्या वितरणाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

| | |
|---|---|
| १) हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड | १ मजला |
| २) बँक ऑफ महाराष्ट्र, मुंबई | १ मजला |
| ३) स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया | १ मजला |
| ४) महाराष्ट्र स्टेट पोलीस हाऊसिंग व वेल्फेअर कॉर्पोरेशन लिमिटेड | १/२ मजला |
| ५) महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड | १/२ मजला |
| एकूण | ४ मजले |

वरील संस्थांपैकी पहिल्या तीन संस्थांशी प्राधिकरणाचे कार्यालयीन घनिष्ट संबंध आहेत. तर शेवटच्या दोन संस्था ह्या याच राज्याच्या राज्यस्तरीय संस्था असून त्यांची मागणी वाजवी आहे. म्हणून त्यांच्या विनंतीला प्राधान्य द्यावयाचा विचार करण्यात आला. संस्था क्रमांक २ शासकीय संस्था नाही. संस्था क्रमांक १, ५, ६ ह्या संस्थेचा प्राधिकरणाच्या कार्यालयाशी काही संबंध येत नाही. संस्था क्र. ९ करता मंडळाने अगोदरच एक भूखंड दिला असून त्यांनी जवळजवळ आपली इमारत बांधलेली आहे. त्यामुळे वरील संस्थांची मागणी मान्य करण्यात आलेली नाही.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.** 55 **Meeting Date** 09/Oct/1

**Item No.** 55/2 **Resolution No.** 897

विषय : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांना कन्नमवार नगर येथे देण्यात आलेल्या भूखंडाचे अधिमूल्य आकारण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या पूर्वीच्या निर्णयानुसार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांना कन्नमवार नगर येथील भूखंड नाममात्र रु. १/- वार्षिक भाड्याने नेहमीच्या अटी व शर्तीनुसार वितरीत करण्यात यावा.

**Item No.** 55/3 **Resolution No.** 898

विषय : कन्नमवार नगर विक्रोळी येथील वसाहतीत श्रीमती इनकर यांच्या पिठाच्या गिरणीसह मसाला दळण्याची गिरणी व किराणा मालाचे दुकान चालविण्याच्या विनंतीचा विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्रीमती इनकर या सध्याच्या बाजारभावाप्रमाणे भुईभाडे देण्यास तयार असल्याने त्यांना ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने प्राधिकरणाच्या जमीन विषयक धोरणांना अनुसरून खालील अटी व शर्तीवर ४७ बाय ३० आकाराचा भूखंड वितरीत करण्यात यावा.
१) भूखंडाचा उपयोग फक्त पिठाची गिरणी मसाला, दळण्याची गिरणी व किराणा मालाचे दुकान याकरिता केला पाहिजे.
२) वरील व्यवसायाकरिता मुंबई महापालिकेकडून दाखला आणणे जरूरीचे आहे.
३) बांधकामाचे नकाशे प्रथम मुंबई मंडळाकडून व महापालिकेकडून मान्य करून घ्यावेत.
४) महापालिकेच्या विकास आराखड्याच्या नियम २७ (६) प्रमाणे पिठाच्या गिरणीभोवती ५ ते १० फूट सलग मोकळी जागा सोडणे क्रमप्राप्त राहील.

**Item No.** 55/4 **Resolution No.**

विषय : भारतनगर, वांद्रे (पूर्व) वसाहतीमध्ये समाधानकारकपणे पाणीपुरवठा करण्यासाठी रु. ३८.५० लाख मंजूर करणेबाबत.

ठराव :

**Item No.** 55/4 **Resolution No.**

विषय : भारतनगर, वांद्रे (पूर्व) वसाहतीमध्ये समाधानकारकपणे पाणीपुरवठा करण्यासाठी रु. ३८.५० लाख मंजूर करणेबाबत.

ठराव :

**Meeting No.** 56 **Meeting Date** 30/Oct/1

**Item No.** 56/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २९-९-१९८४ रोजी झालेल्या ५४ व्या बैठकीचा व दिनांक ९-१०-१९८४ रोजी झालेल्या ५५ व्या (खास) बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 56/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल..

ठराव :

**Item No.** 56/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही करण्यात न आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 56/4 **Resolution No.**

विषय : प्राधिकरण कर्मचाऱ्यांना दोन टक्के आरक्षणातून दिलेल्या गाळ्यांसाठी आस्थापना खर्च व नफा न आकारणेबाबत.

ठराव :

**Item No.** 56/5 **Resolution No.** 899

विषय : कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित दर्जा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता दिली. शासनाच्या दिनांक १६ एप्रिल १९८४ च्या आदेशामध्ये निवासी अभियंत्यांचा दर्जा व वेतनश्रेणी यामध्ये जो बदल करण्यात आला आहे तो बदल प्राधिकरणाच्या कनिष्ठ अभियंत्यांना लागू करण्याबद्दल शासनाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने शासनाकडून प्राधिकरणाच्या निर्णयानुसार मान्यता घेऊन पुढील कार्यवाही मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी करावी.

**Item No.** 56/6 **Resolution No.** 900

विषय : सातपूर-नाशिक येथे औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या २२८ गाळ्यांचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सातपूर-नाशिक येथे अल्प उत्पन्न गटासाठी कार्यान्वित केलेल्या ८० गाळ्यांच्या योजनेसाठी जे रितसर अर्ज आले होते त्या अर्जांचा विचार त्याच ठिकाणी त्याच उत्पन्न गटासाठी कार्यान्वित करण्यात येत असलेल्या २२८ गाळ्यांच्या योजनेसाठी गाळे वितरण करण्यात यावेत व तत्संबंधीची आवश्यक कार्यवाही मा. उपाध्यक्ष यांच्या सुचनेनुसार करण्यात यावी.

**Item No.** 56/7 **Resolution No.** 901

विषय : येरवडा आणि पिंपरी येथील अनुक्रमे ९० ते १० गाळे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना देण्याबाबतची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुणे येथील पिंपरी व येरवडा येथे उपलब्ध असलेले अनुक्रमे अल्प उत्पन्न गट पुणे आणि मध्यम उत्पन्न गट यांच्यासाठी बांधलेले १० व ८९ गाळे हे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना विक्री तत्वावर देण्यात येऊ नयेत. या गाळ्यांचे मिळकत व्यवस्थापन विषयक विनियमातील तरतुदीनुसार रितसर वितरण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

**Item No.** 56/8 **Resolution No.** 902

विषय : औद्योगिक कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी मुंबई, पुणे आणि ठाणे या शहरात बांधलेल्या बैठ्या इमारतीतील गाळ्यांची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
औद्योगिक कामगार व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी मुंबई, पुणे व ठाणे या शहरात बांधलेल्या बैठ्या इमारतीतील गाळ्यांचे विक्री शासनाने मंजूर केलेल्या बाब टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे दिनांक ५-९-१९७९ च्या विक्री योजनेमध्ये समावेश करण्यात यावी. यासाठी योग्य तो प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. मात्र या विक्री योजनेतून मुंबईतील ज्ञानेश्वर-नगर या वसाहतीतील औद्योगिक कामगारांसाठी बांधलेले गाळे वगळण्यात यावेत.

**Item No. 56/9 Resolution No. 903**

विषय : नालंदा महाकनिष्ठ एज्युकेशन इन्स्टिटयूट या संस्थेची काळाचौकी येथील अभ्युदयनगर या वसाहतीत शाळा चालविण्याकरिता जागा देण्याची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अभ्युदय नगर, काळाचौकी येथे नालंदा महाकनिष्ठ एज्युकेशन इन्स्टिटयूट या संस्थेने शाळेसाठी जादा गाळे मिळण्याची केलेली विनंती अमान्य करण्यात यावी. त्या वसाहतीत संस्थेला अगोदर दोन वर्षांच्या मुदतीकरिता दिलेले १२ गाळे दोन वर्षांची मुदत संपल्याबरोबर रिकामे करून घेण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यात यावी.

**Item No. 56/10 Resolution No. 904**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना सेवानिवासस्थानांच्या वाटपासंबंधी मार्गदर्शक तत्वे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थानांचे वितरण करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याकरिता नेमण्यात आलेल्या उपसमितीचा अहवाल स्वीकारण्यात येत आहे. यापुढे सेवानिवासस्थानांचे वितरण या अहवालातील मार्गदर्शक तत्वांना अनुसरून करण्यात यावे.

**Item No. 56/11 Resolution No. 905**

विषय : वांद्रे (पूर्व), येथे प्लॉट नं. जी-९ येथे बांधण्यात येत असलेल्या कार्यालयीन इमारतीतील जागेचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
यापूर्वी या विषयावर दिनांक २९-९-१९८४ रोजी घेतलेल्या निर्णयात बदल करून वांद्रे (पूर्व) येथे प्लॉट नंबर जी-९ या जमिनीवर बांधण्यात येत असलेल्या कार्यालयीन इमारतीची विक्री नफा सोडून शासनाच्या विधी व न्याय विभागाला करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या इमारतीची किंमत ठरवून योग्य ती पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांना सर्व अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

**Item No. 56/12 Resolution No. 906**

विषय : सिद्धार्थनगर, विभाग-१, गोरेगाव येथील वसाहतीमधील भाडेकरूंना घरबांधणीसाठी जमीन देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बांधकामाचा तपशिल योग्य असल्याची खात्री झाल्यावर व इतर कायदेशीर बाबींची पूर्तता पूर्ण केल्यानंतर भाडेपट्ट्याने लीज डीड पूर्ण करून ८ एकर (एकूण) जमिनीचा ताबा संस्थेकडे देण्याचा करार पूर्ण करण्याबद्दल सर्व अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

**Item No.** 56/12 **Resolution No.** 906

विषय : सिद्धार्थनगर, विभाग-१, गोरेगाव येथील वसाहतीमधील भाडेकरूंना घरबांधणीसाठी जमीन देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बांधकामाचा तपशिल योग्य असल्याची खात्री झाल्यावर व इतर कायदेशीर बाबींची पूर्तता पूर्ण केल्यानंतर भाडेपट्ट्याने लीज डीड पूर्ण करून ८ एकर (एकूण) जमिनीचा ताबा संस्थेकडे देण्याचा करार पूर्ण करण्याबद्दल सर्व अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

---

**Item No.** 56/13 **Resolution No.** 907

विषय : निवासी शिपायाऐवजी मासिक रु. १००/- रोख भत्ता मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना निवासी शिपायाऐवजी मासिक रुपये १००/- रोख भत्ता देण्याबद्दल निर्णय घेण्यास आला व सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १-४-१९८४ पासून करावी असाही निर्णय प्राधिकरणाने घेतला.

---

**Item No.** 56/14 **Resolution No.** 908

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या नेहरूनगर या कुर्ला येथील वसाहतीतील अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या इमारत क्र. ७६ ची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नेहरूनगर कुर्ला येथील वसाहतीत अल्प उत्पन्न गटासाठी बांधलेल्या इमारत क्रमांक ७६ ची विक्री येथील गाळेधारकांना किंमतीत २० टक्के सूट देऊन करण्यास अपवाद म्हणून मान्यता देण्यात येते. मात्र त्यासाठी गाळेधारकांनी शेष किंमत आणि भाड्याची थकबाकी असल्यास ती संपूर्णपणे एकरकमी भरावी. या इमारतीस सूट देण्यात आल्याचे उदाहरण देऊन दुसऱ्या कोणत्याही इमारतीच्या बाबतीत सूट देण्यात येऊ नये.
इमारतीची विक्री करताना अनधिकृत गाळेधारक आढळून आल्यास त्यांनादेखील गाळ्यांची विक्री करण्यात यावी. मात्र त्यांना किंमतीच्या ५० टक्के एवढी रक्कम दंड म्हणून जादा आकारण्यात यावी. ही अट गाळाधारक हा भाडेकरूंच्या वारस असल्यास लागू करण्यात येऊ नये.

---

**Item No.** **56/15** **Resolution No.** **909**

विषय : मुंबई शहरामधील पुनर्रचना करण्यायोग्य अशा ३४ जागांचा फेरविचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) सर्व इमारतीच्या पुनर्रचनेच्या कामाच्या जबाबदारीतून प्राधिकरण पूर्णतः मोकळे व्हावे आणि प्राधिकरणाने फक्त इमारत दुरुस्तीचा कार्यक्रम आणि संक्रमण शिबिरे बांधण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा.

२) जमिनीच्या व इमारतीच्या मालकांना इमारत पुन्हा बांधण्याची संधी प्रथमतः खालील अटींवर देण्यात यावी. इमारतीत सध्या रहात असलेल्या गाळेधारकांचे नव्या इमारतीत पुनर्वसन करणे आणि पूर्वीइतकेच जोतेक्षेत्र किंवा अधिकाधिक ६८ चौ. मी. एवढे क्षेत्र पुरविणे. सध्या मंडळामार्फत पुनर्रचित करण्यात येणाऱ्या इमारतीचे बाबतीतच जादा चटईक्षेत्र निर्देशांक प्राप्त होऊ शकते. एखादा मालक, प्राधिकरणाने ठरवून दिलेले जादा गाळे, संक्रमण शिबिरात रहाणाऱ्यांना तसेच पूर्वीच्या सर्व भाडेकरूंना सामावून घेण्यासाठी गाळे उपलब्ध करून देण्यास तयार होत असल्यास, मालकासही प्रचलित विकास नियमापेक्षा अधिक चटईक्षेत्र (एफ. एस. आय.) जास्तीत जास्त दोनपर्यंत उपलब्ध करून देण्यास हरकत नसावी. अतिरिक्त उपलब्ध रहाणाऱ्या एफ. एस. आय. मुळे बांधकामाची किंमत कमी होऊन गाळेधारकांना कमी भाडे/किंमत आकारणे मालकास शक्य होईल. बाब क्रमांक ५४/४ च्या टिप्पणीस प्राधिकरणाने मालक किंवा खाजगी व्यक्ती यांचेकडे 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यापूर्वी मागावयाच्या अतिरिक्त जागेविषयी जे कोष्टक जोडले आहे ते याबाबतीत उपयोगात आणावे व त्याप्रमाणे अतिरिक्त जागा संक्रमण शिबिरांतील इतर व्यक्तींच्या मालकी तत्वावर पुनर्वसनासाठी विहीत किंमतीत मिळावी. एन्ओसी देण्यापूर्वी मालकाने भाडेकरूंना त्यांच्या पूर्वीच्या जागेएवढी जागा देण्याचे कबुल केल्याची करारपत्रे सादर करावी. अतिरिक्त गाळे देण्याचे कबुल केल्यास प्राधिकरणाबरोबर ही अशा प्रकारची करारपत्रे कायद्यात जरूर ते फेरबदल होईपर्यंत घेण्यात यावीत. मालक किंवा भाडेकरू संस्थेने, बांधकामाच्या काळात भाडेकरूंच्या संक्रमण जागेची व्यवस्था करावी. मालकाने किंवा सोसायटीने ज्या शर्ती मान्य केल्या असतील त्यांची परिपूर्तता झाल्याचे सर्टिफिकेट सादर केल्याशिवाय मुंबई महानगर पालिकेने त्यास वापर परवाना देऊ नये असे आदेश शासनाने महानगरपालिकेस द्यावेत.

३) शहरातील ज्या इमारतीवर दुरुस्ती उपकर लागू केला आहे, त्यापैकी कोणत्याही इमारतीच्या पुनर्रचनेसंबंधीचे प्लॅन्स प्राधिकरणाने मान्य केल्याशिवाय महापालिकेने संमत करू नयेत.

४) मंडळाने दिलेल्या विशिष्ट मुदतीत इमारत पुनर्रचनेसाठी मालकाने स्वीकृती दिली नाही तर, इमारतीत रहात असलेल्या भाडेकरूंनी स्थापन केलेल्या सहकारी सोसायटीस, इमारत पुनर्रचनेची संधी द्यावी. याप्रकरणी प्राधिकरणामार्फत जमीन संपादन केली जाईल आणि प्रथमतः इमारतीची पुनर्रचना होईपर्यंत आणि पूर्वीचे सर्व रहिवाशी आणि प्राधिकरणाने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची सोय होईपर्यंत जमीन सोसायटीस लायसेन्सवर देण्यात येईल. सुरुवातीस जमीन सोसायटीस लिजवर देताना गाळ्यांचे क्षेत्र, गाळे कोणाला द्यावयाचे वगैरेबाबतीत मंडळाने तयार केलेल्या अटी व शर्ती यांची सोसायटीने पूर्तता करणे जरूरीचे राहील. इमारत पूर्ण बांधून झाल्यानंतर आणि मंडळाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून गाळ्यांचे वाटप झाल्यानंतर, इमारत बांधलेली जमीन सोसायटीच्या नावावर, नेहमीच्या शर्ती व अटींवर

९० वर्षापेक्षा जास्त नाही एवढ्या कालावधीसाठी लिजवर देण्यात यावी.

५) इमारत पुनर्रचित करण्यासाठी सोसायटी, हुडको, हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन, जी. आय. सी. आणि राष्ट्रीयकृत बँकामार्फत कर्जास सोय करू शकते. बांधकाम करावयाच्या इमारतीवर सोसायटीस कर्ज उपलब्ध होऊ शकते. सोसायटीच्या नावे जमिनीचे लिजपत्र झाल्यावर सोसायटी जमीन गहाण ठेऊ शकते. कर्ज परतफेडीची जबाबदारी सोसायटीचीच राहील; परंतु प्राधिकरण सोसायटीस कर्ज मिळणे कामी जरूर असल्यास व गरज पडल्यास मदत करू शकते. जादा उपलब्ध झालेल्या चटईक्षेत्रावर करण्यात आलेल्या बांधकामावर ठराविक टक्केवारीपर्यंत मंडळाने प्राधिकृत केलेल्या संक्रमण शिबिरातील रहिवाश्यांना गाळे उपलब्ध करून देण्यास तयार असल्यास, मंडळास उपलब्ध असणाऱ्या अतिरिक्त चटईक्षेत्राचा उपयोग करण्यास सोसायटी पात्र राहील.

६) सहकारी संस्थेचा सभासद होण्यासाठी किंवा त्यातला एखादा फ्लॅट विकत घेण्यास एखाद्या व्यक्तीवर दडपण आणणे कायदेशीरदृष्ट्या शक्य होणार नाही. अशा प्रकरणी; इच्छुक नसलेली व्यक्ती ही संक्रमण शिबिरात अनिश्चित कालावधीपर्यंत ठेवणे जरूर असेल आणि त्यामुळे निर्माण झालेल्या रिक्त जागी संक्रमणशिबिरातील व्यक्ती जिचे नाव प्रतिक्षा यादीवर आहे व सोसायटीचा सदस्य होऊन फ्लॅट विकत घेण्यास तयार आहे अशी व्यक्ती पात्र ठरेल.

७) जमीन संपादन केल्यानंतर, जर एखादी सहकारी संस्था इमारत बांधण्यास असमर्थ असेल तर मंडळाने संपादित जमीन, सोसायटी तयार करून, स्वतःच इमारतीची पुनर्रचना करण्यास तयार असलेल्या संक्रमण शिबिरातील गाळेधारकांची सोसायटी बनवून रितसर देऊ शकते.

८) संबंधित इमारतीतील भाडेकरूंनी सहकारी संस्था तयार करून आणि मंडळाकडे ठराविक रक्कम जमा केल्यानंतरच भूसंपादनाची कार्यवाही करण्यास काम सुरू करण्याच्या अवस्थेत नसेल किंवा बांधकाम पूर्ण करण्याच्या अवस्थेत नसेल तर, मंडळाकडे जमा झालेली इसारा रक्कम जप्त होईल. व भाडेकरू नव्या इमारतीत समावेश करून घेण्याचा हक्क गमावून बसतील. तसेच संक्रमण शिबिरातील निवासाचाही हक्क गमावतील.

९) मंडळामार्फत बांधण्यात आलेल्या इमारतींच्या बाबतीत असे सुचविण्यात येते की, मालकी तत्वावर इमारतीत रहाणाऱ्या गाळेधारकांना हेच तत्व लागू करण्यात यावे आणि मालकी तत्वावर दीर्घ मुदतीच्या खरेदी तत्वावर देण्यात यावे. दुरुस्ती फंडातून काही भाग सबसिडी म्हणून देण्यात यावा. जर अशा प्रकारच्या इमारतीचे सर्व ताबेधारक निवासी सहकारी संस्था स्थापन करण्यास व विकत घेण्यास तयार नसल्यास किंवा संस्था त्यांना भाडेकरू म्हणून स्वीकृत करण्यास तयार नसल्यास सोसायटीच्या नावावर इमारतीचे करारपत्र करणे मंडळास शक्य होणार नाही. अशा प्रकरणी एखाद्याला सवलतीचे भाडे खंडीत करण्याचा व आर्थिक भाडे आकारण्याचा विचार प्राधिकरण करू शकते. त्यामुळे अप्रत्यक्षरित्या ताबेधारकांना मालकी तत्वाचे योजनेत सहभागी होण्यास प्रवृत्त करता येईल.

१०) संपादन केलेल्या जमिनीवर जर बांधकाम झाले नसेल तर विकीने किंवा अन्य मार्गाने मूळ जमीन मालक किंवा सहकारी संस्थेस वर निर्देशित अटीवर शर्तीस अधिन राहून लीज करावयाची झाल्यास यासाठी कायद्यात दुरुस्ती करावी लागेल.

११) जेथे भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली नसेल त्या प्रकरणी भू-संपादनाच्या हेतूने काढण्यात आलेल्या सूचना (नोटीसा) रद्द करण्याची शासनास मुभा राहील.

वरील सूचनांच्या अंमल बजावणीसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास कायद्यामध्ये प्रकरण ८ मध्ये काही बदल करणे आवश्यक ठरेल. ते बदल लवकर घडवून सदरील योजना लवकर अंमलात आणण्यासंबंधी शासनास त्वरित विनंती करावी.
वरील प्रमाणे शासनाकडून नवीन धोरण जाहीर झाल्यावर तदनुषंगाने मार्गदर्शक तत्व तयार करून प्राधिकरणापुढे सादर करावे.

---

**Item No.** 56/16 **Resolution No.**

विषय : वसाहतीमधील टेलिफोन बूथ अपंगाला वितरित करण्याबाबत.

ठराव :

---

**Item No.** 56/17 **Resolution No.** 910

विषय : प्राधिकरणाच्या वसाहतीत बांधलेल्या कार्यालयीन इमारतीची (ऑफीस बिल्डींग) विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वसाहतीतील कार्यालयीन इमारत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीची विक्री करताना त्या अशा आहेत व जेथे आहेत या तत्वावर प्राधिकरणाने अगोदर घेतलेल्या निर्णयाच्या अधिन राहून विकण्यात याव्यात.
१) ज्या इमारतीखालील भूखंड बहुमजली इमारती बांधण्याजोगा आहे व वसाहतीत चटईक्षेत्र निर्देशांकही उपलब्ध आहे. परंतु अशी बहुमजली इमारत बांधणे हे गुंतागुंतीचे आहे. त्या इमारती त्या खालील जमिनीच्या चटईक्षेत्र निर्देशांकासह विकण्यात याव्यात. व त्यासाठी टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे जमिनीच्या सध्याच्या व संभाव्य वापरानुसार प्राधिकरणाचे जमिनीच्या किंमत विषयक धोरणाच्या आधारे किंमत आकारावी लागेल.
२) एखाद्या कार्यालयीन इमारतीच्या विक्रीच्या संबंधात प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कार्यवाही शक्य नसल्यास अशी प्रकरणे तपासून त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांना देण्यात येत आहेत.

---

**Item No.** 56/18 **Resolution No.** 911

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणासाठी होणाऱ्या भूसंपादनात समाविष्ट असलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या जमिनीच्या संपादनाविषयीचे धोरण ठरविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) याबाबतीत प्राधिकरणाने यापूर्वी वेळोवेळी ठरविलेले धोरण रद्दबातल करावे. प्राधिकरणासाठी संपादन होणाऱ्या जमिनीमधून कोणतीही जमीन, ती पूर्वी सहकारी संस्थेसाठी विकण्यात आलेली आहे या कारणास्तव वगळण्यात येऊ नये.

२) कायद्यातील तरतुदीनुसार संस्थांना त्यांच्या जमिनीची किंमत अदा केल्यावर विषयसूचीत सुचविलेल्या अटींनुसार पात्र असलेल्या संस्थांना त्यांच्या गृहनिर्माण योजनांसाठी जमिनीची उपलब्धता, प्राधिकरणाची गरज व संस्थेच्या सभासदांची संख्या; हे सर्व लक्षात घेऊन शक्य असेल तसे संपादित जमिनीपैकी जमीन, नियमानुसार भाडेपट्ट्यावर देण्याचा विचार करावा.

संस्थेला जमीन देणे शक्य नसल्यास, संस्थेतील सभासदांना प्राधिकरणाच्या नियमांप्रमाणे प्राधिकरणाच्या योजनेत सहभागी होण्यास परवानगी देण्याचा विचार करावा.

वरीलप्रमाणे निर्णय घेऊन त्याप्रमाणे अधिनियमांत योग्य ती तरतूद करण्याबद्दल प्रस्ताव सादर करावा.

**Item No.** 56/18 **Resolution No.** 911

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणासाठी होणाऱ्या भूसंपादनात समाविष्ट असलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या जमिनीच्या संपादनाविषयीचे धोरण ठरविणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) याबाबतीत प्राधिकरणाने यापूर्वी वेळोवेळी ठरविलेले धोरण रद्दबातल करावे. प्राधिकरणासाठी संपादन होणाऱ्या जमिनीमधून कोणतीही जमीन, ती पूर्वी सहकारी संस्थेसाठी विकण्यात आलेली आहे या कारणास्तव वगळण्यात येऊ नये.

२) कायद्यातील तरतुदीनुसार संस्थांना त्यांच्या जमिनीची किंमत अदा केल्यावर विषयसूचीत सुचविलेल्या अटींनुसार पात्र असलेल्या संस्थांना त्यांच्या गृहनिर्माण योजनांसाठी जमिनीची उपलब्धता, प्राधिकरणाची गरज व संस्थेच्या सभासदांची संख्या; हे सर्व लक्षात घेऊन शक्य असेल तसे संपादित जमिनीपैकी जमीन, नियमानुसार भाडेपट्ट्यावर देण्याचा विचार करावा.

संस्थेला जमीन देणे शक्य नसल्यास, संस्थेतील सभासदांना प्राधिकरणाच्या नियमांप्रमाणे प्राधिकरणाच्या योजनेत सहभागी होण्यास परवानगी देण्याचा विचार करावा.

वरीलप्रमाणे निर्णय घेऊन त्याप्रमाणे अधिनियमांत योग्य ती तरतूद करण्याबद्दल प्रस्ताव सादर करावा.

**Item No.** **56/19** **Resolution No.** **912**

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या पिंपरी, पुणे येथील १७९ गाळ्यांच्या मध्यम उत्पन्न गट नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून ४८.७८ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात आली.

तक्ता - 'अ'

हुडकोने मंजूर केलेल्या योजनांचा तपशील

| अ. क्र. | योजनेचे नाव | अंदाजित किंमत (लक्ष रु.) | कर्जाची रक्कम (लक्ष रु.) | हुडकोकडील कर्ज मंजूरीचे पत्र क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | हुडको अर्थसहाय्यित पिंपरी, पुणे येथील मध्यम उत्पन्न गट -२ गृहनिर्माण योजना (योजना क्र. ३४०५-सी) १७९ गाळे | ७१.४९ | ४८.७८ | एमएचए/म्हाडा/ एमआयजी हाऊसिंग स्कीम/पुणे/८४/ ११५५१ दिनांक : १-१०-१९८४ |

**Item No. 56/19 Resolution No. 912**

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या पिंपरी, पुणे येथील १७९ गाळ्यांच्या मध्यम उत्पन्न गट नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून ४८.७८ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात आली.

तक्ता - 'अ'

हुडकोने मंजूर केलेल्या योजनांचा तपशील

| अ. क्र. | योजनेचे नाव | अंदाजित किंमत (लक्ष रु.) | कर्जाची रक्कम (लक्ष रु.) | हुडकोकडील कर्ज मंजूरीचे पत्र क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | हुडको अर्थसहाय्यित पिंपरी, पुणे येथील मध्यम उत्पन्न गट -२ गृहनिर्माण योजना (योजना क्र. ३४०५-सी) १७९ गाळे | ७१.४९ | ४८.७८ | एमएचए/म्हाडा/ एमआयजी हाऊसिंग स्कीम/पुणे/८४/ १९५५१ दिनांक : १-१०-१९८४ |

**Item No. 56/20 Resolution No. 913**

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील १०२६ घरकुलांच्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून १३.८५ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात आली.

तक्ता - 'अ'

हुडकोने मंजूर केलेल्या योजनांचा तपशील

| अ. क्र. | योजनेचे नाव | अंदाजित किंमत (लक्ष रु.) | कर्जाची रक्कम (लक्ष रु.) | हुडकोकडील कर्ज मंजूरीचे पत्र क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १) | यवतमाळ जिल्ह्यातील हुडको अर्थसहाय्यित १९८४-८५ सालची ग्रामीण गृहनिर्माण योजना (योजना क्र. ३४६०-सी) १०२६ घरकुले | २७.७० | १३.८५ | एमएचए/म्हाडा/ रुरल स्कीम/ यवतमाळ/८४/ २०३१४ दिनांक १०-१०-१९८४ |

**Item No. 56/21 Resolution No.**

विषय : चेंबूर येथील टिळकनगर वसाहतीत महाराष्ट्र सहकारी उद्योगिनी लि. या संस्थेच्या आम्रपाली वर्कींग वुमेन्स हॉस्टेलसाठी वितरण केलेल्या वसतिगृह इमारतीच्या बाबतीत मांडवलावरील व्याजाची रक्कम वसूल करणे.

ठराव :

| Item No. | 56/22 | Resolution No. | 915 |
|---|---|---|---|

विषय : राजेश सहकारी गृहनिर्माण संस्थेला निवासी गाळे बांधण्यासाठी भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
एखाद्या विशिष्ट सोसायटीला टिप्पणीत सुचविलेल्या परिस्थितीत असा भूखंड देता येतो किंवा कसे याबाबतीत प्राधिकरणाचे विधी सल्लागार यांनी तपासणी करावी व तशी तपासणी झाल्यानंतर एखाद्या विशिष्ट सोसायटीला भूखंड देता येण्यास कायदेशीर अडचण नसल्यास राजेश को. ऑ. हौ. सोसायटी या मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेला एक मोकळा भूखंड बाब टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे देण्याबद्दल उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मान्यतेने कार्यवाही करावी असा निर्णय घेण्यात आला.

| Item No. | 56/23 | Resolution No. | 916 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचारी/अधिकारी वर्गाच्या सहकारी संस्थांना वसाहतीतील मोकळे भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या कर्मचारी/अधिकारी वर्गाच्या सहकारी गृहनिर्माणाची नियमातील तरतुदीनुसार कल्याणकारी योजना तयार करून उपसमितीने शिफारस केलेली मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घेऊन योजनेला प्रसिद्धी देण्यास तसेच प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून भूखंडासाठी अर्ज मागविण्याची कार्यवाही करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात आले व सदरहू कार्यवाही पूर्ण झाल्यावर अर्जांची छाननी करून अंतिम वाटपाबद्दलचा प्रस्ताव प्राधिकरणापुढे ठेवण्यात यावा.

**Item No. 56/24 Resolution No. 917**

विषय : मुलुंड येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटाकरिता बांधलेल्या गाळ्यांमधील २४ गाळ्यांचे वितरण चाकाची खुर्ची वापरणाऱ्या अपंगांना करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

मुलुंड येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता बांधलेल्या गाळ्यांमधील चाकाची खुर्ची वापरणाऱ्या अपंगांकरिता राखून ठेवण्यात आलेल्या २४ गाळ्यांमधून रिकाम्या गाळ्यांचे वाटप फेब्रुवारी १९८४ मध्ये जाहिरातीस अनुसरून आलेल्या अर्जांचा विचार करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र या गाळ्यांचे वाटप रीतसर कार्यपद्धती अनुसरून करण्यात यावेत. त्यासाठी त्यांनी चाकाची खुर्ची वापरली पाहिजे ही अट शिथिल करण्यात यावी. फेब्रुवारी १९८४ मध्ये आलेल्या या अर्जदारांची पात्रता ठरविताना ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिसिन ॲण्ड रिहॅबिलिटेशन या संस्थेचे अर्जदार शारीरिकदृष्ट्या अपंग असल्याबद्दलचे प्रमाणपत्र ग्राह्य धरून अर्जदारांची पात्रता ठरविण्यात यावी.

यानंतर खालील पत्रावर चर्चा करण्यात आली.

१) ३० ऑक्टोबर हा प्राधिकरणाचे अध्यक्ष, माननीय श्री. बी. डी. झुटे यांचा जन्मदिवस असून त्या दिवशी ते वयाची ६४ वर्षे पूर्ण करून ६५ वर्षात त्यांनी पदार्पण केले. प्राधिकरणाच्या सदस्यांतर्फे त्यांचे अभिष्ट चिंतन करण्यात आले.

२) मुंबई गृहनिर्माण मंडळाचे जनसंपर्क अधिकारी श्री. महादेव दळवी यांनी लिहिलेल्या □अल्बर्ट आईन्स्टाईन, एक माणूस□ या चरित्रात्मक पुस्तकास महाराष्ट्र शासनाने १९८१-८२ या वर्षासाठी आयोजित केलेल्या उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार जाहीर केलेला आहे. त्याबद्दल प्राधिकरणातर्फे श्री. महादेव दळवी यांचे अभिनंदन करण्यात आले.

३) मुंबई मंडळाचे उपसभापती तथा मुख्य अधिकारी श्री. मनमोहन सिंह यांची औरंगाबाद येथे मुंबई महानगरपालिकेचे प्रशासक म्हणून बदली झाल्याने त्यांना मंडळाच्या सेवेतून मुक्त करण्यात येत आहे. त्यांनी मुंबई मंडळाचे उपसभापती म्हणून गौरवपूर्ण कामगिरी केल्याबद्दल प्राधिकरणाच्या वतीने त्यांच्या सेवेची प्रशंसा करण्यात आली.

४) सभापती, मुंबई मंडळ यांनी पाठविलेल्या पत्राच्या संदर्भात असे ठरविले की,

१) भारत पेट्रोलियम कंपनीला पेट्रोल पंपासाठी देऊ केलेल्या भूखंडासाठी प्राधिकरणाच्या किंमतविषयक धोरणानुसारच किंमत ठरवावी लागेल व सदरहू कंपनी मोठा नफा कमविणार असल्याने त्याला काही सवलत देणे योग्य होणार नाही.

२) सेकंडरी शाळांना देऊ केलेल्या भूखंडासाठी ठरविलेली किंमत अधिक वाटत असल्याने ती किंमत कोणत्या आधारावर ठरविण्यात आली ते मुंबई मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून तपासून घेऊन ती योग्य असल्याची खात्री करून घ्यावी. याबद्दल पुढील बैठकीमध्ये माहिती देण्यात यावी.

यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे व अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

| **Item No.** | **56/25** | **Resolution No.** | **914** |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँक प्रकल्प, चारकोप, कांदिवली येथील उच्च उत्पन्न गटाच्या नियोजित भूखंड वितरण करण्याबाबत प्राधिकरणाची मान्यता देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

जागतिक बँकेच्या सहाय्याने चारकोप, कांदिवली येथे विकसित करण्यात येत असलेल्या भूखंडांपैकी वितरणासाठी जाहीर करावयाच्या १०० भूखंडांचे वितरण रुपये ७००/- प्रति चौ. मी. ही गृहित किंमत धरून सहकारी संस्थांना जाहीर प्रसिद्धीकरणाने देऊ करण्यात यावेत व विनियमातील तरतुदीनुसार सोडत काढून भूखंडांचे वितरण करण्यात यावे.

२) केंद्र किंवा राज्य शासनाचे उपक्रम इत्यादी संस्थांकडून भूखंडांच्या वितरणासाठी मागणी आल्यास त्याचा विचार विनियमातील तरतुदीनुसार सोडत न काढता करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३) भूखंडांचे वितरण करताना महाराष्ट्रात सहकारी संस्थेच्या सभासदाचे किमान १५ वर्षे वास्तव्य असले पाहिजे या अटीऐवजी शासनाने या योजनेच्या संबंधात घेतलेल्या निर्णयानुसार सहकारी संस्थेच्या सभासदाचे मुंबईत किमान पाच वर्षे वास्तव्य असले पाहिजे ही अट घालण्यात यावी. अशी अट घालण्यात येत असल्याबद्दल शासनाला कळविण्यात यावे.

४) भूखंडांचे वाटप करण्यासाठी सहकारी संस्थेच्या सभासदाचे त्याच्या किंवा त्याच्या पत्नीच्या नावे मुंबईत मालकीचे घर नसावे ही अट काढून टाकण्यात येऊ नये व तसे जागतिक बँकेला कळवावे.

**Meeting No.** 57 **Meeting Date** 05/Dec/1

**Item No.** 57/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३०.१०.१९८४ रोजी झालेल्या ५६व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 57/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 57/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही न करण्यात आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 57/4 **Resolution No.**

विषय : मुंबई मंडळातील दक्षता कक्षामध्ये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त वेतन मंजूरीबाबत.

ठराव :

**Item No.** 57/5 **Resolution No.**

विषय : अधिक्षक अभियंता या दर्जाच्या अधिकाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्याबाबत.

ठराव :

**Item No.** 57/6 **Resolution No.** 918

विषय : सदस्य नसलेल्या मान्यवर व्यक्तींना मंडळाच्या कामामध्ये सहभागी करून घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विभागीय मंडळांनी काही मान्यवर व्यक्तींना त्यांच्या कामकाजात सहभागी करून घेण्याचे ठरविल्यास अशा व्यक्तींना, ते विशेषज्ञ असतील अशा विषयांचा विचार करतानाच मंडळाच्या कामकाजात सहभागी करून घेण्यात यावे. अशा व्यक्तींनी मंडळाच्या सदस्यांनी पाळावयाचे सर्व संकेत पाळले पाहिजेत असे बंधन त्यांच्यावर कामकाजात सहभागी करून घेताना घालण्यात यावे व संकेताचे उल्लंघन केल्यास त्यांचे आमंत्रण रद्द केले पाहिजे. याप्रमाणे सभापती, मुंबई मंडळाला कळविण्यात यावे व त्यांना पूर्वीचे आमंत्रण पत्र रद्द करून वरीलप्रमाणे नवीन पत्र पाठविण्यास सुचवावे.

| **Item No.** | **57/7** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : सुहृद मंडळ, पुणे या संस्थेस बधीर व मूक शिक्षण केंद्रासाठी लक्ष्मीनगर वसाहतीतील मोकळी जागा देण्याबाबत.

ठराव :

| **Item No.** | **57/8** | **Resolution No.** | **919** |
|---|---|---|---|

विषय : श्री. राघवेंद्र स्वामी वृंदावन स. नं. ४१/१ ओशिवरा येथील भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. राघवेंद्र स्वामी वृंदावन या संस्थेस ओशिवरा येथे सर्वे नंबर ४१/१ या जमिनीवर जो भूखंड देण्यात आला आहे त्यासाठी त्यांना जमिनीच्या प्रत्यक्ष किंमतीच्या १.५ पट दराने अधिमूल्य आकारण्यात यावे.

| **Item No.** | **57/9** | **Resolution No.** | **920** |
|---|---|---|---|

विषय : विभागीय मंडळांच्या सभापतींच्या मानधनात वाढ करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या अध्यक्षांना तसेच विभागीय मंडळांच्या सभापतींना सध्या जे मानधन देण्यात येते त्याऐवजी त्यांना अनुक्रमे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना व पंचायत समितीच्या सभापतींना देण्यात येते तेवढे मानधन मंजूर करण्याची शिफारस शासनाला करण्यात यावी.

| **Item No.** | **57/10** | **Resolution No.** | **921** |
|---|---|---|---|

विषय : श्री. व्ही. एस. मुंजे, (जा. बँ. प्र.) यांच्या पुनर्नेमणूकीची मुदत वाढविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. व्ही. एस. मुंजे, उपमुख्य अधिकारी (जा. बँ. प्र.) यांच्या पुनर्नेमणूकीची मुदत सध्याच्याच अटी व शर्तीवर सप्टेंबर १९८५ अखेर वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **57/11** | **Resolution No.** | **922** |
|---|---|---|---|

विषय : सर्व्हे नं. १२०, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम) येथील ११.२३ हेक्टर जमिनीचे पुन:प्रापण करून त्या जमिनीचा विकास करण्यासाठी, आलेल्या निविदांचा विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सर्व्हे नंबर १२०, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम) येथील ११.२३ हेक्टर जमिनीचे पुन:प्रापण करून त्या जमिनीचा विकास करण्याच्या कामासाठी आलेली मेसर्स इ. एम. ब्रदर्स यांची रुपये ६१,७६,७२२.४४ एवढ्या रकमेची अंदाजित खर्चापेक्षा १२.९९ कमी टक्केवारीची निविदा स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 57/12 **Resolution No.** 923

विषय : हुडको अर्थसहाय्यित विजयनगर, वांद्रा, मुंबई येथील कर्मचारी गृहनिर्माण योजना हुडको अर्थसहाय्यामधून वगळून प्राधिकरण निधीमधून हाती घेण्याचा विचार करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडको अर्थसहाय्यित विजयनगर, वांद्रे, मुंबई येथील कर्मचारी गृहनिर्माण योजना हुडको अर्थसहाय्य योजनेमधून वगळण्यास व ती योजना प्राधिकरणाच्या निधीमधून हाती घेण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 57/13 **Resolution No.** 924

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या अमरावती व बुलढाणा जिल्ह्यांतील प्रत्येकी ६०० घरकुलांच्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडकोने मंजूर केलेल्या अमरावती व बुलढाणा जिल्ह्यातील विषय टिप्पणीत दर्शविलेल्या प्रत्येकी ६०० घरकुलांच्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून १९८४-८५ या वर्षासाठी एकूण रुपये १६.१७ लक्ष एवढ्या रकमेचे कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

---

**Item No.** 57/14 **Resolution No.** 925

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नवीन औरंगाबाद (एन-६) मधील संमिश्र नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडकोने मंजूर केलेल्या नवीन औरंगाबाद (एन-६) मधील संमिश्र नागरी गृहनिर्माण योजनेसाठी विषय टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे हुडकोकडून रुपये ४३.८३ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

---

**Item No.** 57/15 **Resolution No.** 926

विषय : हुडको अर्थसहाय्यित वांद्रा पुन:प्रापण मुंबई येथील उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजना हुडको अर्थसहाय्यामधून वगळून प्राधिकरण निधीमधून हाती घेण्याचा विचार करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडको अर्थसहाय्यित वांद्रे पुन:प्रापण योजना, मुंबई येथील उच्च उत्पन्न गटाकरिता बांधण्यात येत असलेल्या २२४ गाळ्यांची हुडकोने दिनांक ४-१०-१९८२ रोजी मंजूर केलेली योजना क्रमांक २२६४-सी हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्यास व प्राधिकरणाच्या निधीमधून हाती घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे. या योजनेसाठी मंजूर झालेल्या रुपये १२८.९५ लक्ष कर्जाच्या रकमेपैकी हुडकोकडून मिळालेला रुपये २८.६७ लक्षांचा कर्जाचा हप्ता त्यावरील व्याजासह हुडकोस परत करण्यास मान्यता देण्यात येते.
ही योजना हुडकोकडून मंजूर करुन घेताना भरलेला दस्तऐवज खर्च, बँकेस प्रदान केलेले बँक हमी शुल्क इत्यादींवर झालेला खर्च सदर योजनेवरील खर्चात इमारतींच्या विक्रीची किंमत ठरविताना समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 57/16 **Resolution No.**

विषय : १९८३-८४ सालाचा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा जमा व खर्चाचा तपशिल.

ठराव :

**Item No.** 57/17 **Resolution No.** 927

विषय : सोलापूर येथील अधिसूचित व क्षेत्रासाठी की, ज्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे, त्यासाठी तयार केलेल्या प्रारुप नियोजन प्रस्तावास मान्यता देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सोलापूर येथील अधिसूचित क्षेत्रासाठी तयार केलेल्या विषयटिप्पणीच्या सहपत्राप्रमाणे प्रारुप नियोजन प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. व याला सत्वर प्रसिद्धी देऊन पुढील कार्यवाही उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी करण्यासाठी त्यांना अधिकार प्रदान करण्यात आले.

**Item No.** 57/18 **Resolution No.** 928

विषय : सर्वे नं. ४१ (भाग) ओशिवरा येथे ओव्हरहेड ट्रान्समिशन लाईन्स टाकण्यास मेसर्स टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांना परवानगी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ओशिवरा येथील सर्वे नंबर ४१ (भाग) या जमिनीवरुन दी टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांना ओव्हरहेड ट्रान्समिशन लाईन्स टाकण्यास परवानगी देताना त्यासाठी भूखंड वितरण नियम १०(१), १०(२) प्रमाणे लागणाऱ्या जमिनीचे भाडे आकारण्यात यावे.

**Item No.** 57/19 **Resolution No.** 929

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजनेच्या आराखड्यात मुलींच्या प्राथमिक शाळेसाठी आरक्षित केलेल्या भूखंडाचे वाटप करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जुहू-विलेपार्ले विकास योजनेच्या आराखड्यात मुलींच्या प्राथमिक शाळेसाठी राखून ठेवलेल्या भूखंडाचे वितरण मॉडेल एज्युकेशन सोसायटी या संस्थेस प्राथमिक शाळा चालविणे व औद्योगिक प्रशिक्षण देणे या कार्यासाठी करण्यात यावे व त्यासाठी प्राधिकरणाने ठरविल्याप्रमाणे जमिनीच्या किंमत विषयक धोरणानुसार अधिमूल्य आणि भाडेपट्टी आकारण्यात यावी.

---

**Item No.** 57/20 **Resolution No.** 930

विषय : सोलापूर येथील विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्रामधील संपादन करावयाच्या क्षेत्राच्या मर्यादा ठरविणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सोलापूर येथील विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्रामधील संपादन करावयाच्या क्षेत्राची मर्यादा ठरविण्याच्या संबंधात अधिसूचित क्षेत्रात नागरी कमाल मूधारणा कायद्याच्या मर्यादेत असणाऱ्या परंतु मान्यताप्राप्त अभिन्यासाबाहेर असलेल्या अशा ज्या जमिनी आहेत त्या भूसंपादनातून वगळण्याकरिता, प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक ७५५ अनुसार ठरविलेल्या धोरणामध्ये अंतर्भूत करण्यास मान्यता देण्यात येते.

---

**Item No.** 57/21 **Resolution No.** 931

विषय : श्री. पी. एस. पगारे, यांना पुणे येथील लक्ष्मीनगर वसाहतीतील उच्च उत्पन्न गटासाठी बांधलेल्या गाळ्यांचे वितरण करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. पी. एस. पगारे यांना पुणे येथील लक्ष्मीनगर, वसाहतीत उच्च उत्पन्न गटासाठी बांधलेल्या गाळ्यांमधून मागासवर्गीयांकरिता राखून ठेवलेल्या गाळ्यांपैकी शिल्लक असलेला एक गाळा त्यांच्या आगरकरनगर वसाहतीच्या प्रतिक्षा सूचीवरील अर्जावर नियमाप्रमाणे किंमत घेऊन वितरण करण्यास मान्यता.

---

**Item No.** 57/22 **Resolution No.**

विषय : परभणी येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता बांधलेल्या ५९४ गाळ्यांमधून वसाहतीत सुविधा पुरविण्याकरिता गाळ्यांचे वितरण करणे.

ठराव :

---

**Item No. 57/23 Resolution No. 932**

विषय : सोलापूर स्पेशल प्लॅनिंग ऑथॉरिटीसाठी जादा कर्मचारी वर्ग.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सोलापूर येथील अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरणाच्या कामाकरिता पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या आस्थापनेवर खालीलप्रमाणे अतिरिक्त पदे निर्माण करावयास मान्यता देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १) सहाय्यक वास्तुशास्त्रज्ञ | - | १ |
| २) असिस्टंट टाऊन प्लॅनर ज्युनियर आर्किटेक्चरल असिस्टंट प्लॅनिंग असिस्टंट | - | १ |
| ३) असिस्टंट ड्राफ्टसमन | - | ३ |
| ४) उपलेखापाल | - | १ |
| ५) वरिष्ठ लिपिक | - | २ |
| ६) मजदूर कम प्यून | - | २ |
| ७) वाहन चालक | - | १ |
| | एकूण | ११ |

**Item No. 57/24 Resolution No. 933**

विषय : गाडगा, नागपूर येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात येणाऱ्या १६८ गाळ्यांच्या निविदा स्वीकारण्याचा विचार करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गाडगा, नागपूर येथे उच्च उत्पन्न गटाकरिता बांधण्यात यावयाच्या १६८ गाळ्यांच्या बांधकामाकरिता आलेल्या निविदांवर सांगोपांग विचार करून निर्णय घेण्याकरिता खालीलप्रमाणे उपसमिती नेमण्यात येत आहे.

१) अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
२) उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
३) श्री. कृष्णराव पांडव, सदस्य, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
४) मुख्य अभियंता, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

**Item No.** 57/25 **Resolution No.** 934

विषय : एकरकमी पद्धतीवर/भाडेखरेदी पद्धतीवर वाटप करण्यात आलेल्या गाळ्यांच्या बाबतीत तात्पुरती ठरविलेली किंमत व अंतिम किंमत यामधील फरकाची रक्कम व त्यावरील व्याजाची वसुली.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

एकरकमी पद्धतीवर/भाडेखरेदी पद्धतीवर वितरण करण्यात आलेल्या गाळ्यांच्या बाबतीत तात्पुरती किंमत आणि अंतिम किंमत यामधील फरकाची रक्कम व त्यावरील व्याजाची आकारणी करण्याच्या संबंधात एकरकमी विक्री पद्धतीवर दिलेल्या इमारतीतील गाळेधारक तसेच भाडेखरेदी पद्धतीवर दिलेल्या इमारतीतील गाळेधारक यांना खालीलप्रमाणे सवलती देण्यात याव्यात :

(अ) गाळेधारकांना अंतिम किंमत कळविल्यानंतर अगोदर जाहिर केलेल्या तात्पुरत्या किंमतीत वाढ झाली असल्यास, गाळेधारकांनी तात्पुरती किंमत आणि अंतिम किंमत यातील फरकाची रक्कम विहित मुदतीत भरली पाहिजे. तशी ती भरली न गेल्यास किंमतीतील फरकाच्या रकमेवर पिनल दराने व्याज आकारण्यात येते. त्याऐवजी फरकाच्या रकमेवर योजनेतील व्याजाचा दर अधिक १/२ टक्का प्रशासकीय आकार याप्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात यावी.

(आ) ज्या गाळ्यांच्या किंमतीत नफा अंतर्भूत आहे त्या गाळ्यांची तात्पुरती किंमत आणि अंतिम किंमत यामधील फरकाची रक्कम किंमतीतील नफ्याच्या रकमेपेक्षा कमी असल्यास, फरकाच्या रकमेवर व्याज आकारण्यात येऊ नये. उलट किंमतीतील फरकाची रक्कम नफ्याच्या रकमेपेक्षा जास्त असल्यास नफा सोडून केवळ जास्त असलेल्या रकमेवरच व्याज आकारण्यात यावे.

(इ) तात्पुरती किंमत आणि अंतिम किंमत यातील फरकाची वाढीव रक्कम एकरकमी भरणे गाळेधारकांना शक्य नसल्यास ती भरण्यासाठी त्यांना चार महिन्यांची मुदत द्यावी; व या मुदतीसाठी व्याज आकारण्यात येऊ नये. या मुदतीत रक्कम भरली न गेल्यास त्यापुढील मुदतीसाठी व्याज आकारण्यात यावे.

| Item No. | 57/25 | Resolution No. | 934 |
|---|---|---|---|

विषय : एकरकमी पद्धतीवर/भाडेखरेदी पद्धतीवर वाटप करण्यात आलेल्या गाळ्यांच्या बाबतीत तात्पुरती ठरविलेली किंमत व अंतिम किंमत यामधील फरकाची रक्कम व त्यावरील व्याजाची वसुली.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

एकरकमी पद्धतीवर/भाडेखरेदी पद्धतीवर वितरण करण्यात आलेल्या गाळ्यांच्या बाबतीत तात्पुरती किंमत आणि अंतिम किंमत यामधील फरकाची रक्कम व त्यावरील व्याजाची आकारणी करण्याच्या संबंधात एकरकमी विक्री पद्धतीवर दिलेल्या इमारतीतील गाळेधारक तसेच भाडेखरेदी पद्धतीवर दिलेल्या इमारतीतील गाळेधारक यांना खालीलप्रमाणे सवलती देण्यात याव्यात :

(अ) गाळेधारकांना अंतिम किंमत कळविल्यानंतर अगोदर जाहिर केलेल्या तात्पुरत्या किंमतीत वाढ झाली असल्यास, गाळेधारकांनी तात्पुरती किंमत आणि अंतिम किंमत यातील फरकाची रक्कम विहित मुदतीत भरली पाहिजे. तशी ती भरली न गेल्यास किंमतीतील फरकाच्या रकमेवर पिनल दराने व्याज आकारण्यात येते. त्याऐवजी फरकाच्या रकमेवर योजनेतील व्याजाचा दर अधिक १/२ टक्का प्रशासकीय आकार याप्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात यावी.

(आ) ज्या गाळ्यांच्या किंमतीत नफा अंतर्भूत आहे त्या गाळ्यांची तात्पुरती किंमत आणि अंतिम किंमत यामधील फरकाची रक्कम किंमतीतील नफ्याच्या रकमेपेक्षा कमी असल्यास, फरकाच्या रकमेवर व्याज आकारण्यात येऊ नये. उलट किंमतीतील फरकाची रक्कम नफ्याच्या रकमेपेक्षा जास्त असल्यास नफा सोडून केवळ जास्त असलेल्या रकमेवरच व्याज आकारण्यात यावे.

(इ) तात्पुरती किंमत आणि अंतिम किंमत यातील फरकाची वाढीव रक्कम एकरकमी भरणे गाळेधारकांना शक्य नसल्यास ती भरण्यासाठी त्यांना चार महिन्यांची मुदत द्यावी; व या मुदतीसाठी व्याज आकारण्यात येऊ नये. या मुदतीत रक्कम भरली न गेल्यास त्यापुढील मुदतीसाठी व्याज आकारण्यात यावे.

| Item No. | 57/26 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : भूसंपादन अधिनियम दुरुस्ती कायदा नुकसान भरपाई रकमेवरील वाढ व अन्य महत्वाच्या तरतुदी.

ठराव :

| Item No. | 57/27 | Resolution No. | 935 |
|---|---|---|---|

विषय : अंध व अस्थिव्यंगामुळे अधू असलेल्या कर्मचाऱ्यांना वाहन भत्ता मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

अंध व अस्थिव्यंगामुळे अधू झालेल्या कर्मचाऱ्यांना विशेष वाहनभत्ता शासनाच्या वित्त विभागाच्या क्र. टीआरए १०८३/सीआर १३७५/एसईआर-५ दिनांक ४ जानेवारी १९८४ च्या आदेशानुसार मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 57/28 **Resolution No.** 936

विषय : कर्मचारी कल्याण निधी योजना

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने या योजनेत भाग घ्यावा व या निधीला देणगी देण्यासाठी कायदेशीर दुरुस्तीबद्दल शासनास विनंती करावी. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांकरिता कर्मचारी कल्याण निधी स्थापण्याच्या प्रस्तावाचा विचार करून त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणाचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना प्रदान करण्यात येत आहे.

**Item No.** 57/29 **Resolution No.** 937

विषय : प्राधिकरणाच्या/मंडळाच्या मालकीच्या तेवढ्याच क्षेत्राच्या (९८०१ चौ. वार) भूखंड क्रमांक ३२४ भाग, नगर रचना योजना नं. ३ घाटकोपर देण्याबद्दल शासनाच्या गृहनिर्माण विभागाने पत्र क्र. एडीएल ३४७५/२४८/३२८ निर्णयावर विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
शासनाने दिनांक १७-११-१९८४ च्या पत्राद्वारे कळविलेल्या निर्णयाप्रमाणे प्राधिकरणाच्या ताब्यातील भूखंड क्रमांक ३२४ (इ) ही ८,१०० चौ. मी. क्षेत्रफळाची जमीन मूळ भूखंड क्रमांक ३२३ च्या बदल्यात श्री. एन. के. शहा व इतर यांना द्यावयास मान्यता देण्यात येते. मात्र त्यापूर्वी विषय टिप्पणीत नमूद केलेल्या सर्व बाबींची पूर्तता केली गेली पाहिजे. श्री. एन. के. शहा यांना द्यावयाची जमीन ही विषय टिप्पणीत नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून देण्यात यावी. यासंबंधीची पुढील कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांना देण्यात येत आहेत.

**Item No.** 57/30 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने सन १९८४-८५ मधील चारमाही सुधारित अंदाजपत्रक.

ठराव :

**Item No.** 57/31 **Resolution No.** 938

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मधील विनियम ९६ मध्ये सुधारणा करणे - शासनाच्या स्वेच्छानिर्णयानुसार वितरीत करावयाचे गाळे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मधील विनियम ९६ मध्ये विषय टिप्पणीस जोडलेल्या मसुद्याप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येते; याला शासनाची मान्यता घेण्यात यावी.

| **Item No.** | **57/32** | **Resolution No.** | **939** |
|---|---|---|---|

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
औद्योगिक कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री करताना मुंबईतील काही वसाहतीतील इमारतींच्या संबंधात शासनाने मंजूर केलेली किंमतीतील २० टक्के ऐवजी ३० टक्के सूट त्यासंबंधीच्या अटींच्या आधिन राहून देण्याकरिता दिनांक ३१ मार्च १९८५ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे गाळेधारकांनी गाळ्यांची संपूर्ण किंमत आणि थकबाकी असल्यास ती संपूर्णपणे भरल्यास किंमतीत ५ टक्के घटाव देण्याकरिता दिनांक ३१ मार्च १९८५ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **57/33** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरपात्र इमारतींची पुनर्रचना - घरमालक रहिवासी यांचा सहभाग.

ठराव :

| **Item No.** | **57/33** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरपात्र इमारतींची पुनर्रचना - घरमालक रहिवासी यांचा सहभाग.

ठराव :

| **Item No.** | **57/34** | **Resolution No.** | **940** |
|---|---|---|---|

विषय : श्री. सुवर्ण कवच भवानी माता सेवा शक्तीपीठ यांना गोरेगाव सी. टी. एस. नं. ५५ मधील जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. सुवर्ण कवच भवानी माता सेवा शक्तीपीठ या संस्थेला गोरेगाव सी. टी. एस. नं. ५५ या जमिनीपैकी सुमारे २,२६० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड देवळाकरिता नेहमीच्या अटी व शर्तींवर भाडेपट्टीने वितरीत करण्यास मान्यता देण्यात येते. त्यासाठी संस्थेला जमिनीच्या प्रत्यक्ष किंमतीच्या १ १/२ (दीडपट) दराने अधिमूल्य व प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतविषयक धोरणानुसार भाडेपट्टी आकारण्यात यावी.

**Item No.** 57/35 **Resolution No.** 941

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१.
गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ठराव क्रमांक : ७२९ अनुसार घेतलेला निर्णय अंशतः सुधारून गाळ्यांच्या हस्तांतरणाची प्रकरणे खालीलप्रमाणे नियमित करण्यात यावीत.
(१) ज्या गाळ्याची किंमत पूर्णतः किंवा अंशतः भरली गेली आहे त्या गाळ्याच्या भाडेकरूने किंमतीपोटी भरलेली रक्कम नवीन भाडेकरूच्या नावे जमा करण्याची लेखी विनंती केल्यास ती मान्य करण्यात यावी. परिणामी गाळ्याची पूर्ण किंमत भरली गेली असल्यास नवीन भाडेकरूस पुन्हा किंमत आकारण्यात येऊ नये. भाडेखरेदी पद्धतीवरील गाळ्याची अगोदरच्या भाडेकरूने भरलेली अंशतः किंमत त्याने लेखी विनंती केल्यास नवीन भाडेकरूच्या नावे जमा करण्यात यावी व नवीन भाडेकरूने, भरलेले हप्ते भरण्याच्या अटीवर हस्तांतरणास परवानगी देण्यात यावी. अशी परवानगी देताना प्राधिकरणाने दर्शविल्याप्रमाणे अधिमूल्य आकारण्यात यावे.
(२) मृत भाडेकरूच्या वारसाने, भाडेकरूने किंमतीपोटी भरलेली रक्कम त्याच्या नावे जमा करण्याची विनंती केल्यास ती मान्य करण्यात यावी. अशा गाळ्याचे किंमतीचे काही हप्ते भरणे बाकी असल्यास ते भाडेकरूच्या वारसाने भरण्याच्या अटीवर गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देण्यात यावी. अशी परवानगी देताना प्राधिकरणाने ठरविल्याप्रमाणे अधिमूल्य आकारण्यात यावे.
(३) रितसर परवानगी न घेता गाळ्याचे परस्पर हस्तांतरण झालेले असल्यास, अगोदरच्या भाडेकरूने किंमतीपोटी भरलेल्या रकमेचा लाभ नवीन भाडेकरूस देण्यात यावा. मात्र ज्याच्या नावे गाळ्याचे हस्तांतरण झाले आहे तो भाडेकरूचा वारस किंवा त्याच्या कुटुंबाचा घटक नसल्यास हस्तांतरणास परवानगी देण्यासाठी खालीलप्रमाणे अधिमूल्य आकारण्यात यावे.

(१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई :

| अ.क्र. | गटाचे नाव | अधिमूल्याचे दर |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १) | उच्च उत्पन्न गटाचे गाळे | रु. २५,००० |
| २) | मध्यम उत्पन्न गटाचे गाळे | रु. १२,५०० |
| ३) | अल्प उत्पन्न गटाचे गाळे | रु. १०,००० |
| ४) | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, औद्योगिक कामगार आणि गलिच्छवस्तीतील रहिवाश्यांसाठी बांधलेले गाळे. | रु. ५,००० |

(२) इतर मंडळे :

| | |
|---|---|
| १) उच्च उत्पन्न गटाचे गाळे | रु. १७,५०० |
| २) मध्यम उत्पन्न गटाचे गाळे | रु. १०,००० |
| ३) अल्प उत्पन्न गटाचे गाळे | रु. ७,५०० |
| ४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, औद्योगिक कामगार आणि गलिच्छवस्तीतील रहिवाश्यांसाठी बांधलेले गाळे | रु. २,५०० |

**Item No. 57/36 Resolution No. 942**

विषय : भाग्यश्री सगुणा महिला मंडळ या संस्थेला गोखलेनगर, पुणे येथील सुमारे ४०० चौ. मी. जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भाग्यश्री सगुणा महिला मंडळ या संस्थेला पुणे येथील गोखलेनगर वसाहतीत सुमारे ४०० चौ. मी. जागा संस्थेचे कार्य चालविण्याकरिता नेहमीच्या अटी व शर्तीवर भाडेपट्ट्याने वितरित करण्यास मान्यता देण्यात येते. याशिवाय विषय टिप्पणीत नमूद केलेल्या अटीही जमिनीचे वितरण करण्याकरिता घालण्यात याव्यात. यासाठी संस्थेला प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमत विषयक धोरणानुसार अधिमूल्य आकारण्यात यावे.

**Item No. 57/37 Resolution No. 943**

विषय : गाडगा, नागपूर येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात येणाऱ्या १२० गाळ्यांच्या निविदा स्वीकारण्याचा विचार करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गाडगा, नागपूर येथे उच्च उत्पन्न गटाकरिता बांधण्यात येणाऱ्या गाळ्यांच्या निविदा स्वीकारण्याचा प्रश्न, त्याच ठिकाणी उच्च उत्पन्न गटाकरिता बांधण्यात यावयाच्या १६८ गाळ्यांच्या दुसऱ्या कामासाठी निविदा स्वीकारण्याचा विचार करून निर्णय घेण्याकरिता प्राधिकरणाने जी उपसमिती नेमली आहे त्या उपसमितीकडे या १२० गाळ्यांच्या निविदा स्वीकारण्याचा विचार करून निर्णय घेण्याचा प्रश्न सोपविण्यात येत आहे.

**Item No. 57/38 Resolution No.**

विषय : प्राधिकरण व विभागीय मंडळांचे अधिकार, कर्तव्ये, जबाबदारी यामधून निर्माण झालेल्या संघर्षाबाबत.

ठराव :

**Item No. 57/38 Resolution No.**

विषय : प्राधिकरण व विभागीय मंडळांचे अधिकार, कर्तव्ये, जबाबदारी यामधून निर्माण झालेल्या संघर्षाबाबत.

ठराव :

**Meeting No. 58 Meeting Date 07/Jan/1**

**Item No. 58/1 Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ५-१२-१९८४ रोजी झालेल्या ५७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No. 58/2 Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

**Item No. 58/3 Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही न करण्यात आलेल्या निर्णयाची यादी

ठराव :

**Item No. 58/4 Resolution No. 944**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील आरक्षित केलेल्या माध्यमिक शाळेच्या भूखंडाबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील आरक्षित केलेला अंदाजे ४६२९.५० चौ. चार क्षेत्रफळाचा भूखंड कमल एज्युकेशन ट्रस्ट या संस्थेला माध्यमिक शाळांसाठी भाडेपट्टीने देण्यात आलेला निर्णय रद्द करण्यात यावा. सदरहू भूखंडाच्या वाटपाबद्दल फेरप्रस्ताव सादर करावा.

**Item No. 58/5 Resolution No. 945**

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण सोलापूर-प्रारुप नियोजन प्रस्तावाबाबत सूचना व हरकतीचा विचार करण्यासाठी नियोजन समितीची नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाबटिप्पणीत नमूद केलेल्या प्रारुप नियोजनाचे कामी उपाध्यक्ष/प्राधिकरण, श्री. कृष्णराव पांडव, सदस्य, श्रीमती शालिनी राणे, सदस्या यांची नियोजन समितीवर नेमणूक केली व त्या समितीने सोलापूरला भेट देऊन याबाबतीत स्वीकारण्यात आलेल्या हरकती व सूचनाबाबत संबंधित लोकांचे म्हणणे ऐकून प्राधिकरणाकडे अहवाल द्यावा.

**Item No.** 58/6 **Resolution No.** 946

विषय : चारकोप, कांदिवली (पश्चिम) येथील पुन:प्रापण केलेल्या जमिनीवर आनुषंगिक सेवा (पाणीपुरवठा व्यवस्था) उपलब्ध करून देण्यासंबंधीच्या कामासाठी आलेल्या निविदांचा विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मे. शिव्हाईन कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी दिलेल्या देकाराचा (३१ जाने. १९८५ पर्यंत निविदा स्वीकृती झाल्यास दोन टक्के जादा सवलत) फायदा घेण्याच्या दृष्टीने जागतिक बँक अधिकाऱ्यांकडून छाननी अहवालावर प्रतिक्रियेच्या अपेक्षेवर प्राधिकरणाने या निविदा स्वीकारण्याची मान्यता दिली. मात्र जागतिक बँकेकडून सहमती आल्याखेरीज प्रत्यक्ष काम करण्याचे आदेश देऊ नयेत या अटीवर प्राधिकरणाने न्युनतम निविदा स्वीकारण्याची मान्यता दिली व जागतिक बँकेकडून यावयाच्या टिप्पणीनुसार या निर्णयात काही महत्वाचे फेरबदल करण्याची पाळी आल्यास ही बाब पुन:श्च प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यात यावी.

**Item No.** 58/7 **Resolution No.** 947

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नारी इंदोरा नागपूर व बांझरी, नागपूर येथील नागरी सोयीसह भूखंड योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयटिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या नारी इंदोरा, नागपूर व बांझरी, नागपूर येथील नागरी सोयीसह भूखंड योजनांसाठी हुडकोकडून एकूण ३६.७७ लक्ष रुपये कर्ज घेण्यास प्राधिकरणाने अनुमती व अधिकृती दर्शविली.

**Item No.** 58/8 **Resolution No.** 948

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या अहमदनगर, नांदेड व गडचिरोली या जिल्ह्यातील १९८४-८५ मधील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाबटिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे अहमदनगर, नांदेड व गडचिरोली या जिल्ह्यातील १९८४-८५ मधील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण २४.३० लक्ष रुपये कर्ज घेण्यास प्राधिकरणाने अनुमती व अधिकृती दर्शविली.

**Item No.** 58/9 **Resolution No.** 949

विषय : मुंबई गृहनिर्माण व कोकण गृहनिर्माण मंडळानी स्थापन केलेल्या उपसमित्या.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कायम स्वरूपाच्या स्थायी समिती व देखरेख समिती नेमण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात येऊ नये.

| **Item No.** | **58/10** | **Resolution No.** | **950** |
|---|---|---|---|

विषय : गाळ्यांच्या/भूखंडाच्या वाटपात अर्जदारांच्या महाराष्ट्रातील किमान १५ वर्षांच्या वास्तव्याच्या आधारे पसंतीक्रम देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नवीन मिळकत व्यवस्थापन विषयक विनियमांतील विनियम १२ (३) च्या तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्रात १५ वर्षे किंवा अधिक काळ वास्तव्य झालेले अर्जदार आणि १५ वर्षांपेक्षा कमी वास्तव्य असलेले अर्जदार याप्रमाणे जो पसंतक्रम देण्यात येतो त्याला प्राधिकरणाची रितसर मान्यता दिली.

| **Item No.** | **58/11** | **Resolution No.** | **951** |
|---|---|---|---|

विषय : येरवडा आणि पिंपरी येथील अनुक्रमे ९० व १० गाळे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना देण्याबाबतची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
येरवडा व पिंपरी येथील गाळे विनियमांतील कार्यपद्धती अनुसरून वाटप करण्याचा प्राधिकरणाने ठराव क्रमांक ९०१ अन्वये घेतलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. मात्र येरवडा येथील २४ गाळ्यांची एक इमारत सेवा निवासस्थाने म्हणून वाटप करण्याकरिता राखून ठेवून प्राधिकरणाने घालून दिलेल्या तत्वानुसार सेवानिवासस्थानांचे वाटप करण्यात यावे.

| **Item No.** | **58/12** | **Resolution No.** | **952** |
|---|---|---|---|

विषय : व्यापारी उपयोगासाठी वाटप करण्याकरिता बांधलेले गाळे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई व इतर मंडळाने व्यापारी उपयोगाकरिता बांधलेल्या काही गाळ्यांचे निविदा मागवूनही वाटप होऊ शकले नाही अशा गाळ्यांचे वाटप सुधारीत नियमांतील तरतुदी लक्षात घेऊन निर्णय घेण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

| **Item No.** | **58/13** | **Resolution No.** | **953** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्रात विपुल प्रमाणात घरबांधणी करण्यासाठी विश्वसनीय व उत्तम प्रकारचे बांधकाम करता यावे यासाठी सुहृद गरजा मागविण्यासाठी नव्या धोरणाचा शोध.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने श्री. बी. जी. शिर्के आणि कंपनीला बांधकाम देण्याबाबतची शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता ज्या तांत्रिक व कायदेशीर अडचणी आहेत त्या शासनाकडे कळवून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला या योजनेतील शर्तीनुसार कितपत सहभागी होता येईल याचा फेरविचार शासनाने करावा, असे शासनाला कळवावे.

| **Item No.** | **58/14** | **Resolution No.** | **954** |
|---|---|---|---|

विषय : सुहृद मंडळ, पुणे या संस्थेला बधीर व मूक शिक्षण केंद्रासाठी लक्ष्मीनगर वसाहतीत मोकळी जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सुहृद मंडळाला लक्ष्मीनगर वसाहतीतील बाबटिप्पणीत उल्लेखिलेली सुमारे ९०० चौ. मी. आकाराची जागा प्राधिकरणाच्या नेहमीच्या किंमतविषयक धोरणास बाबटिप्पणीत सूचित केलेल्या अटींना आधिन राहून मंजूर करावी.

| **Item No.** | **58/15** | **Resolution No.** | **955** |
|---|---|---|---|

विषय : सिद्धार्थनगर विभाग-१ या गोरेगाव येथील वसाहतीतील भाडेकरूंच्या घरबांधणीसाठी जमीन देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
या विषयावरील ५६ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयात फेरबदल करून गोरेगाव सिद्धार्थनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेला ८ एकर निव्वळ (नेट) जमीन देऊ करताना त्या सर्व जागेच्या क्षेत्रफळाच्या १५ टक्के मोकळी जागा सार्वजनिक सुविधांसाठी देण्यात मंजूरी देण्यात आली.

| **Item No.** | **58/16** | **Resolution No.** | **956** |
|---|---|---|---|

विषय : उस्मानाबाद, कोल्हापूर, जळगांव, सोलापूर, लातूर, भंडारा व जालना या जिल्ह्यांतील १९८४-८५ या कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण ६६.४८७ लक्ष रुपये कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयटिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या उस्मानाबाद, कोल्हापूर, जळगांव, सोलापूर, लातूर, भंडारा व जालना या जिल्ह्यातील १९८४-८५ मधील गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण ६६.४८७ लक्ष रु. कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यास मान्यता देण्यात आली.

| **Item No.** | **58/17** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या डी. एन. नगर अंधेरी, या वसाहतीतील औद्योगिक कामगारांसाठी बांधलेल्या इ. क्र. २७, २८, २९, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२ आणि ४३ या इमारतींच्या दुरुस्तीबाबत प्राधिकरणाच्या बैठकीत चर्चा करण्यासाठी बाबटिप्पणी.

ठराव :

| **Item No.** | **58/18** | **Resolution No.** | **957** |
|---|---|---|---|

विषय : युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाकडून रुपये २.५ कोटी विशेष अनामत म्हणून स्वीकारणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

| Item No. | 58/19 | Resolution No. | 958 |
|---|---|---|---|

विषय : नेहरूनगर वेल्फेअर सेंटर कुर्ला या संस्थेला नेहरूनगर कुर्ला येथे भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ठराव क्रमांक ८१२ मध्ये सुधारणा करून नेहरूनगर, कुर्ला येथील वसाहतीत समाज मंदिरासाठी राखून ठेवण्यात आलेला भूखंड नेहरूनगर वेल्फेअर सेंटर या संस्थेला ३० वर्षांच्या भाडे कराराने प्राधिकरणाने ठरविलेल्या पद्धतीनुसार अधिमूल्य व वार्षिक भाडे आकारून तसेच नेहमीच्या अटी व तरतुदीस अनुसरून देण्याचे मान्य करण्यात आले. भाडेकरारातील काळापैकी पहिल्या तीन वर्षांच्या काळामध्ये किंवा प्राधिकरणाने हा कालावधी वाढविल्यास अशा वाढीव कालापर्यंत सदरहू भूखंड वरील संस्थेला लायसेन्स पद्धतीवर देण्यात यावा.

| Item No. | 58/19 | Resolution No. | 958 |
|---|---|---|---|

विषय : नेहरूनगर वेल्फेअर सेंटर कुर्ला या संस्थेला नेहरूनगर कुर्ला येथे भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ठराव क्रमांक ८१२ मध्ये सुधारणा करून नेहरूनगर, कुर्ला येथील वसाहतीत समाज मंदिरासाठी राखून ठेवण्यात आलेला भूखंड नेहरूनगर वेल्फेअर सेंटर या संस्थेला ३० वर्षांच्या भाडे कराराने प्राधिकरणाने ठरविलेल्या पद्धतीनुसार अधिमूल्य व वार्षिक भाडे आकारून तसेच नेहमीच्या अटी व तरतुदीस अनुसरून देण्याचे मान्य करण्यात आले. भाडेकरारातील काळापैकी पहिल्या तीन वर्षांच्या काळामध्ये किंवा प्राधिकरणाने हा कालावधी वाढविल्यास अशा वाढीव कालापर्यंत सदरहू भूखंड वरील संस्थेला लायसेन्स पद्धतीवर देण्यात यावा.

| Item No. | 58/20 | Resolution No. | 959 |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या टिळकनगर, चेंबूर या वसाहतीतील औद्योगिक कामगारांसाठी बांधलेल्या इमारत क्रमांक २६ च्या दुरुस्तीबाबत प्राधिकरणाच्या बैठकीत चर्चा करण्यासाठीची बाब टिप्पणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
टिळकनगर, चेंबूर येथील इमारत क्रमांक २६ मधील शाळांकरिता दिलेल्या गाळ्यांच्या विशेष दुरुस्तीपोटी रुपये ५४,००० खर्चास मान्यता देण्यात येत आहे. यासाठी आवश्यक ती तरतूद अंदाजपत्रकात करण्यात यावी.

| Item No. | 58/21 | Resolution No. | 960 |
|---|---|---|---|

विषय : अधिक्षक अभियंता या दर्जाच्या अधिकाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अधिक्षक अभियंता या दर्जाच्या अधिकाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने दोन वर्षांच्या मुदतीसाठी नेमणूक करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. मात्र त्यामुळे प्राधिकरणाच्या आस्थापनावरील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीस कोणत्याही प्रकारचा बाध येता कामा नये, ही प्रशासनाने काळजी घ्यावी.

**Item No. 58/22 Resolution No. 961**

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या गृहबांधणी सहकारी संस्थासाठी भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्थांना घरबांधणीसाठी भूखंड देण्याकरिता नेमलेल्या उपसमितीने सुचविलेल्या विषयटिप्पणीस जोडलेल्या प्रपत्रात कळविलेल्या अटी व शर्तीस मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे विषयटिप्पणीस जोडलेल्या वेगळ्या प्रपत्रात दाखविल्याप्रमाणे उल्लेखित कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्थांना भूखंडाचे वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.
उत्पन्न गटाप्रमाणे संस्था करण्याविषयीच्या अडचणींची श्री. अतुल हुले, सदस्य यांनी समागृहास कल्पना दिली होती. गेल्यावर्षी पगारामध्ये व महागाई भत्यामध्ये सातत्याने वाढ झाली असल्यामुळे कर्मचाऱ्यांचे उत्पन्न गट बदलत आहेत, व संस्थांना आपले सदस्य त्याप्रमाणे बदलावे लागत आहेत. यावर उत्पन्न गट निश्चित करताना योजना जाहिर झाल्यापासून (नोव्हेंबर १९८४) त्यापूर्वीच्या ३६ (छत्तीस) महिन्यांच्या पगाराची सरासरी धरण्यात यावी असे सांगण्यात आले होते.

प्राधिकरण कर्मचारी कल्याणकारी योजना
प्राधिकरणाच्या सेवेमधील कर्मचारी/अधिकारी यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना 'प्राधिकरण कर्मचारी कल्याण योजनांद्वारे' वितरीत करावयाच्या भूखंडाबाबत शर्ती व अटी.

१/- प्राधिकरणाच्या कर्मचारी/अधिकारी यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचे समासदत्व नोंदणीसाठी समासद प्राधिकरणाचा कर्मचारी अथवा समासद प्राधिकरणात प्रतिनियुक्तीवर असावा. तसेच प्राधिकरणाच्या अथवा मंडळाच्या नियुक्त सदस्यांनाही अशा योजनेत समासद करून घेण्यास हरकत नसावी. मात्र प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी तसेच प्राधिकरणाचे/मंडळाचे सदस्य या सर्वांची मिळून एकूण संख्या सहकारी संस्थेच्या समासद संख्येच्या १० टक्क्यांहून अधिक असावी.

२/- भूखंडाचे वितरण प्राधिकरणाच्या निवासी प्रयोजनासाठी भूखंड देण्याच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार खालीलप्रमाणे आकारले जाईल.

| उत्पन्न गट | अधिमूल्य | वार्षिक भाडेपट्टा |
|---|---|---|
| १. अत्यल्प उत्पन्न<br>२. अल्प उत्पन्न | जमिनीच्या (विकासासह) मूळ किंमत | २ १/२ टक्के |
| ३. मध्यम उत्पन्न | जमिनीच्या (विकासासह) मूळ किंमत | ३ टक्के |
| ४. उच्च उत्पन्न गट | जमिनीच्या मूळ किंमतीच्या दुप्पट | ५ टक्के |

३/- सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सभासद एकाच उत्पन्न गटाचे असणे आवश्यक राहील. त्यानुसार वरील जमिनीच्या किंमतीच्या प्रचलित धोरणानुसार अधिमूल्य व वार्षिक भाडेपट्टा आकारला जाईल.
४/- भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्टा ठरविलेल्या दिवशी एकाच रकमेत भरावा लागेल. त्यामध्ये कोणत्याच प्रकारची सवलत देता येणार नाही.
५/- महाराष्ट्र हाऊसिंग ॲन्ड एरिया डेव्हलपमेंट ॲथॉरिटी एम्प्लॉईज (हाऊस बिल्डींग लोन्स) रेग्युलेशन ८४, अन्वये विहित प्रमाणात कर्ज उपलब्ध होऊ शकेल. परंतु त्यासाठी सभासदाच्या प्राधिकरणातील पाच वर्षांसाठी सेवेची अट अत्यावश्यक राहील.
६/- भूखंड वितरणानंतर सहकारी गृहनिर्माण संस्थेने त्यावर बांधलेल्या गाळ्याचे हस्तांतरण करता येणार नाहीत. याला अपवाद फक्त एकाच गोष्टीचा असेल आणि तो म्हणजे सभासद मरण पावल्यावर त्याचा गाळा वारसहक्काने त्याच्या कुटुंबियांकडे हस्तांतरीत करता येईल. हा एक अपवाद सोडता केवळ हस्तांतरण करताना ज्या व्यक्तीला गाळा हस्तांतर करावयाचा असेल ती व्यक्ती प्राधिकरणाची कर्मचारी असावी. प्राधिकरणाच्या संमतीने सहकारी सोसायटीने ह्या संबंधात वेळोवेळी कार्यवाही करावी व त्या अनुषंगाने संस्थेच्या पोटनियमात त्याच्या अंतर्भाव करावा.
७/- सभासद किंवा त्यांच्या कुटुंबियांच्या नावे भूखंड असलेल्या महानगरपालिकेच्या हद्दीत मालकीचे रहाते घर नसावे. ज्या सभासद कर्मचाऱ्यांच्या भाडेतत्वावर गाळे अथवा सेवानिवास मिळाले असेल तर त्याने सोसायटीचे बांधकाम पूर्ण होऊन गाळ्यांचा ताबा मिळताच भाडेतत्वावरील अथवा निवासी गाळा मंडळाकडे त्वरीत परत करावा लागेल.
८/- सहकारी गृहनिर्माण संस्थेत किमान २० टक्के सभासद अनुसूचित जाती जमाती किंवा भटक्या व विमुक्त जातीपैकी असावेत.
९/- ज्या कर्मचाऱ्यांना पूर्वी गाळे दिले होते किंवा सेवानिवासस्थाने दिली होती व ज्यांनी अशा गाळ्यांचे अनधिकृत हस्तांतरण केले त्यांचा सहकारी संस्थेचे सभासद करू नये.
१०/- संस्थेने सभासदांच्या नावांची यादी त्यांच्या मासिक उत्पन्नाच्या दाखल्यानिशी सादर करावी व सहकारी संस्था सर्व तऱ्हेचे योग्य असल्याची खात्री करून घ्यावी.
११/- संस्थेस भूखंडाचे अधिमूल्य भरण्याचे कळविल्यानंतर संस्थेने नेमून दिलेल्या वेळेस अधिमूल्य भरणे आवश्यक राहील. तसेच भूखंडाचा ताबा मिळाल्यानंतर सहा महिन्याच्या आत बांधकामास सुरुवात करून ते जास्तीत जास्त दोन वर्षांचे आत इमारतीचे बांधकाम पूर्ण करावे लागेल.
१२/- पती आणि पत्नी प्राधिकरणाचे सेवेत असल्यास कुणा एकासच सहकारी संस्थेचा सभासद होता येईल.
१३/- इमारतीचे नकाशे महापालिकेकडे सादर करण्यापूर्वी ते विभागीय मंडळाकडून मान्य करून घेणे आवश्यक राहील.
१४/- रजिस्टर ऑफ को. ऑ. सोसायटीकडे संस्था रजिस्टर झाल्याचा दाखला सादर करावा लागेल.
१५/- भूखंडाचे अंतिम करण्यात आलेले अधिमूल्य (भूखंडाचा विकासबाह्य सेवा) व संस्थेचे भरलेले अधिमूल्य यांतील फरक भरण्याच्या संमतीबाबतचे अंडरटेकींग संस्थेचे विभागीय मंडळाला द्यावे.

१६/- वरील शर्ती व अटी व्यतिरिक्त परिस्थितीनुसार किंमत व इतर बाबींबद्दल अन्य अटींचा अंतर्भाव करण्याचा अधिकार प्राधिकरणाकडे राहील.

| **Item No.** | **58/23** | **Resolution No.** | **962** |
|---|---|---|---|

विषय : श्री. सु. रा. राजगुरू, सहाय्यक आरेखक यांच्या अपिलाचा विचार करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. सु. रा. राजगुरू माजी सहाय्यक आरेखक यांना प्राधिकरणाच्या नोकरीतून दूर करताना संबंधित आदेशात बडतर्फ असा शब्द वापरण्यात आला आहे. त्याऐवजी त्यांना अन्य ठिकाणी नोकरी करण्यास बाधा येऊ नये अशा तऱ्हेने त्या आदेशात नोकरीतून दूर करण्यात आले आहे असा शब्दप्रयोग करण्यास व शिक्षेच्या आदेशामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **58/24** | **Resolution No.** | **963** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेली सांगली येथील २१८ अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण-ब) गाळ्यांची योजना (योजना क्र. २५७८-सी) हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडकोने मंजूर केलेली सांगली येथील अल्प उत्पन्न गट (नागरी गृहनिर्माण-ब) गृहनिर्माण योजना (योजना क्र. २५७८-सी) २१८ गाळे ही योजना सदर योजनेची जागा महाराष्ट्रात शासनास हवी असल्यामुळे हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्यात प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच या योजनेवर आतापर्यंत दस्तऐवज आकार रु. ५,०००/- कमिटमेंट चार्जेस रु. २,८११/- हुडकोस दिलेले ३१-१२-८४ पर्यंतचे कर्जावरील व्याज रुपये ३४,१५२/- व ८४-८५ सालापर्यंतची शासनास भरलेली हमी फी रुपये २,८३८/- मिळून झालेला एकूण खर्च रु. ४४,८०१/- व योजना मागे घेण्याच्या दिनांकापर्यंत व्याज व हमी फी यासाठी होणारा खर्च शासनाने भरून द्यावा अशी महाराष्ट्र शासनास विनंती करण्यात यावी.
यानंतर प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांनी गोवा राज्यात एक अभ्यासदौरा आयोजित करण्यात यावा अशी विनंती केली. चर्चेनंतर असा निर्णय घेण्यात आला की प्राधिकरणाचे सदस्य व दोन अधिकारी यांनी दि. १५/१/८५ ते १८/१/८५ या काळात गोवा येथे विमानाने जावे व त्याकरिता रक्कम रु. ८,०००/- (आठ हजार मात्र) खर्चाची मंजूरी प्राधिकरणाने दिली.
यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.** 60 **Meeting Date** 30/Mar/1

**Item No.** 60/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दि. २५.२.१९८५ रोजी झालेल्या ५९ व्या (खास) बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 60/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 60/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही न करण्यात आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 60/4 **Resolution No.** 984

विषय : जुहू विलेपार्ले विकास योजना येथे उच्च उत्पन्न गटाकरिता बांधण्यात येत असलेल्या दोन इमारतीतील गाळ्यांचे वाटप विभिन्न राज्य शासनांना करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गुजरात शासन व गोवा प्रशासन यांना देऊ करण्यात आलेल्या गाळ्यांपैकी अनुक्रमे ४ व २ गाळे कमी करून ते अनुक्रमे महाराष्ट्र स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन व केरळ शासन यांना विकत देण्यास प्राधिकरण मंजुरी देत आहे. तसेच गुजरात शासन व गोवा प्रशासन यांना कमी करण्यात आलेल्या गाळ्यांची भरपाई म्हणून अन्यत्र उपलब्धेनुसार गाळे देण्याच्या प्रश्नावर निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांना देण्याचा ठराव करण्यात आला.

**Item No.** 60/5 **Resolution No.** 985

विषय : ज्ञानेश्वरनगर, शिवडी-वडाळा या वसाहतीतील गाळेधारकांच्या सहकारी संस्थेला घरबांधण्यासाठी जमिन देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की.
सदर सहकारी संस्थेस १२५ गाळे बांधण्याकरिता मर्यादित १.५ एकर भूखंड बाब टिप्पणीत नमूद केलेल्या अटींवर द्यावा. व या प्रकरणी इतर तपशिल ठरविण्याचे अधिकारी प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांना द्यावेत.

**Item No.** **60/6** **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ गाळ्यांची मालकी व्यक्तिगत गाळेधारकाकडे हस्तांतरित करणे.

ठराव :

---

**Item No.** **60/7** **Resolution No.** **986**

विषय : सांगली येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता बांधलेल्या २३२ गाळ्यांपैकी ११४ गाळे "ओम नम: शिवाय जिवन आश्रम" या संस्थेस वाटप करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रस्तावित ११४ सलग गाळे "ओम नम: शिवाय जीवन आश्रम" या संस्थेस वापरण्यासाठी शासनाला नेहमीच्या अटी व शर्तीवर वाटप करण्यास प्राधिकरणाने संमती दिली.

---

**Item No.** **60/8** **Resolution No.** **987**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अधिमूल्य ५०००/- रू. ठरविताना फक्त बांधकामाच्या किंमतीचा विचार न करता बांधकामाखालील जागा व रहाण्याच्या जागेकरिता टंचाई या गोष्टी विचारात घेतल्या आहेत. त्यामुळे अधिमूल्याची रक्कम रूपये ३०००/- प्रस्तावित केल्याप्रमाणे कमी करू नये व अधिमूल्य ५०००/- रूपये याप्रमाणे आकारावेत व यासंबंधी काही अडचण भासल्यास प्रस्ताव परत प्राधिकरणापुढे ठेवावा.

---

**Item No.** **60/9** **Resolution No.**

विषय : श्री. जी.सी. पाटील आरेखक मुंबई मंडळ यांची सेवा मूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळातील पहिल्या नेमणूकीच्या तारखेपासून नियमित करणे.

ठराव :

---

**Item No.** **60/10** **Resolution No.** **988**

विषय : अर्धवेळ कामगारांच्या एकत्रित वेतनामध्ये सुधारणा करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वर प्रस्तावित केल्याप्रमाणे अर्धवेळ कामगारांच्या वेतनमानामध्ये दिनांक १.२.१९८५ पासून सुधारणा करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. पर्यायी व्यवस्थेबद्दल सत्वर कार्यवाही करण्यास मुंबई मंडळाला आदेश देण्यात यावेत.

---

**Item No.** **60/11** **Resolution No.** **989**

विषय : जागतिक बँक प्रकल्प विभागाकरिता जादा पदे मंजूर करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाचे जागतिक बँक प्रकल्पाची तातडीची गरज लक्षात घेता, बाबटिप्पणीसोबत जोडलेल्या तक्त "अ" रकाना मध्ये दर्शविल्याप्रमाणे जादा पदे मंजूर करण्यास मान्यता दिली. तसेच सदर पदे आवश्यकतेनुसार भरण्यात यावीत. तांत्रिक वर्गातील सदरहू पदे भरताना प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या हक्काला बाधा येऊ नये याची काळजी घ्यावी. गरजेनुसार पदांचे वर्णन बदलण्यास व इतर बाबतीत उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना अधिकार देण्यात यावे असे ठरविण्यात आले.

**Item No.** **60/12** **Resolution No.** **990**

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीत बृहन्मुंबई महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांना शाळेसाठी दिलेल्या गाळ्यांची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीतील परिस्थितीनुरूप मुंबई, पुणे महानगरपालिकांना शाळेसाठी व इतर सार्वजनिक वापरासाठी दिलेले गाळे त्या त्या वसाहतीत भूखंड देण्यात आले असले तरी त्यांच्याकडून परत मागण्यात येऊ नयेत व असे गाळे त्यांना प्राधिकरणाचे ठराव क्र. ८१४ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार वापर आकारून विकणेस प्राधिकरणाने मंजूरी दिली. मात्र या गाळ्यांचा वापर त्यांच्याकडून अन्य कोणत्याही उपयोगासाठी केला जाऊ नये ही अट असावी व यासंबंधीचा इतर तपशील संबंधित महापालिकांच्या आयुक्तांशी चर्चा करून नंतर ठरविण्यात यावा.

**Item No.** **60/13** **Resolution No.** **991**

विषय : वांद्रे पुनःप्रसारण विभागातील हॉस्पिटलसाठी आरक्षित केलेला भूखंड लीलावती कीर्तीलाल मेहता अँड फॅमिली ट्रस्ट यांना वितरण करण्याबद्दल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
उच्च न्यायालयात श्रीमती रेखा एस. शेठ आणि अन्य यांनी दाखल केलेल्या दाव्याचा निर्णय लागून शासन पत्र क्र. एडीएल ३४८२/(४१४)/डी १०-३, दिनांक १९.२.१९८५ ने उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना शासनाचा आदेश कळविण्यात आला. त्या निर्णयाला अनुसरून लिलावती कीर्तीलाल मेहता अँड फॅमिली मेडिकल ट्रस्ट यांना त्यांनी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने डिसेंबर १९८३ मध्ये हॉस्पिटलच्या भूखंडाची जाहीरात करताना अर्जासोबत देण्यात येणाऱ्या माहिती पत्रकातील अटींना अधिन राहून भूखंडाचे सुमारे अधिमूल्य रु. ७२,१३,५८० भरून भूखंड स्विकारण्याची तयारी दर्शविल्यामुळे सदरहू ट्रस्टला भूखंड देण्याच्या नेहमीच्या कार्यपद्धती पूर्ण झाल्यावर सदरहू भूखंड देण्यात प्राधिकरणाने मंजूरी दिली.

| Item No. | 60/14 | Resolution No. | 992 |
|---|---|---|---|

विषय : सुभाषनगर, तीन डोंगरी, गोरेगांव येथे बालवाडी चालविण्यासाठी
१) नवभूमी सेवा मित्र मंडळ व
२) केशव मोरे ट्रस्ट यांना सामाजिक सांस्कृतिक कार्यासाठी जागा देण्याबाबत

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सुभाषनगर, तीन डोंगरी गोरेगांव येथे टिप्पणीत सूचविलेल्या ठिकाणी
१) नवभूमी सेवा मित्र मंडळ व
२) केशव मोरे ट्रस्ट यांना सामाजिक व सांस्कृतिक इत्यादि बहुउद्देशीय कार्याबरोबर बालवाडी चालविण्यासाठी दोन्ही संस्थांना नेहमीच्या अटीप्रमाणे प्रत्येकी एक भूखंड देण्याचे प्राधिकरणाने ठरविले. मात्र केशव मोरे ट्रस्टला त्यांच्या कार्याचा व्याप लक्षात घेता मोठा भूखंड देण्यात यावा.

| Item No. | 60/15 | Resolution No. | 993 |
|---|---|---|---|

विषय : ॲबझॅक फाऊंडेशन यांना माध्यमिक औद्योगिक व तांत्रिक शाळा तसेच महाविद्यालये यासाठी जमाते-ए-जाम्बुरिया, वांद्रे (पश्चिम) लगतची जागा देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
ॲबझॅक फाऊंडेशन या संस्थेस प्राधिकरणाने देऊ केलेल्या भूखंडाबाबतच्या अटीची पूर्तता अद्यापर्यंत संस्थापकांनी न केल्यामुळे या संस्थेस जमाते-ए-जम्बोरिया येथील भूखंड वितरण करण्याबाबतचा प्राधिकरणाने घेतलेला निर्णय रद्द करण्यात येत आहे, व सदर भूखंडाची विल्हेवाट अन्य कारणाकरिता करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

| Item No. | 60/16 | Resolution No. | 994 |
|---|---|---|---|

विषय : श्री. बी.टी. देव यांची नागपूर मंडळातील लेखापाल पदावरील पुनर्नेमणूक पुढे चालू ठेवण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
नागपूर मंडळातील लेखापाल श्री. बी.टी. देव यांच्या पुनर्नेमणूकीची मुदत पुढील एक वर्षासाठी म्हणजेच ३१.३.१९८६ पर्यंत नेहमीच्या अटी व शर्तींना अनुसरून वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| Item No. | 60/17 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँक प्रकल्पाच्या अंतर्गत विकसित भूखंड/घरे यांच्या वाटपास मुंबई महानगरप्रदेशात किमान १५ वर्षांचे वास्तव्य असलेल्यांना प्राधान्य देणे.

ठराव :

| Item No. | 60/18 | Resolution No. | 995 |
|---|---|---|---|

विषय : गलिच्छवस्ती सुधार क्षेत्रात पंचायतीची स्थापना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाब टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे शासनास कळविण्यात यावे.

**Item No.** **60/19** **Resolution No.** **996**

विषय : निरनिराळ्या महानगरपालिका क्षेत्रात गलिच्छवस्ती विकासाकरिता सामूहिक विस्तार सेवा कक्ष स्थापन करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई शहराव्यतिरिक्त निरनिराळ्या महानगरपालिका क्षेत्रात गलिच्छवस्ती विकासाकरिता प्राधिकरण व महानगरपालिकेकडे सामूहिक विस्तार सेवा कक्ष स्थापन करण्यास मान्यता देण्यात येते. यासंबंधीचा तपशील शासनाच्या संमतीने उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी ठरवावा.

**Item No.** **60/19** **Resolution No.** **996**

विषय : निरनिराळ्या महानगरपालिका क्षेत्रात गलिच्छवस्ती विकासाकरिता सामूहिक विस्तार सेवा कक्ष स्थापन करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई शहराव्यतिरिक्त निरनिराळ्या महानगरपालिका क्षेत्रात गलिच्छवस्ती विकासाकरिता प्राधिकरण व महानगरपालिकेकडे सामूहिक विस्तार सेवा कक्ष स्थापन करण्यास मान्यता देण्यात येते. यासंबंधीचा तपशील शासनाच्या संमतीने उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी ठरवावा.

**Item No.** **60/20** **Resolution No.** **997**

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचनेची कामे सर्वसाधारण विमा महामंडळाकडून घ्यावयाचे कर्ज.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाबटिप्पणीत सुचविल्याप्रमाणे सर्वसाधारण विमा महामंडळाकडून ५ कोटी रुपये कर्ज घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच कर्जासंबंधीचा तपशिल ठरविण्याचे व सर्वसाधारण विमा महामंडळाबरोबर करार करण्याचे अधिकार उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Item No.** **60/21** **Resolution No.** **998**

विषय : गलिच्छ वस्ती दर्जा सुधारणा कार्यक्रम (स्लम अपग्रेडेशन) मुंबई शिवाय इतर शहरात ७ व्या पंचवार्षिक योजना सुरू करण्याबद्दल.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सातव्या पंचवार्षिक योजनेतील गलिच्छवस्ती दर्जा सुधारणा कार्यक्रम मुंबई शिवाय इतर शहरात शासनाच्या अर्थसहाय्याने प्राधिकरणाने महापालिकामार्फत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **60/22** | **Resolution No.** | **999** |
|---|---|---|---|

विषय : सोलापूर येथील विशेष नियोजन प्राधिकरण (.१)(जुळे सोलापूर) अधिकार क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा योजना (बाह्य सेवा) उपलब्ध करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सोलापूर येथील विशेष नियोजन प्राधिकरण-१ (जुळे सोलापूर) अधिकार क्षेत्रामध्ये महाराष्ट्र पाणीपुरवठा व मल:निस्सारण मंडळामार्फत पाणीपुरवठा योजना (बाह्य सेवा) राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. यासंबंधीचा तपशील ठरविण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे या कामाकरिता त्याच कामाच्या एकूण खर्चाच्या १३.८५ टक्के इतकी रक्कम अभिकरण आकार म्हणून देण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **60/23** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : निविदांचा वैध कालावधी.

ठराव :

| **Item No.** | **60/24** | **Resolution No.** | **1000** |
|---|---|---|---|

विषय : लेखापाल पदाच्या परिक्षेसाठी पात्रता ठरविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाबटिप्पणीत सूचविल्याप्रमाणे लेखापाल पदाच्या परिक्षेसाठी पात्रता ठरविण्याच्या तत्वांना मान्यता देण्यात येत आहे. परंतु जे कर्मचारी त्यावेळी धारण करीत असलेल्या पदावरून वरिष्ठ पदावर पदोन्नती मिळण्यास गोपनिय अहवालाचे आधारे अपात्र समजले जातील. अशा कर्मचाऱ्यांचे बाबत अंतिम निर्णय उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनीच घ्यावा.

| **Item No.** | **60/25** | **Resolution No.** | **1001** |
|---|---|---|---|

विषय : वसाहतीत स्वच्छता राखण्याचे काम करणाऱ्या सफाई कामगारांना देण्यात येणाऱ्या मेहतर (वेट स्विपिंग) भत्त्याच्या दरात वाढ करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
वसाहतीतील सफाई कामगारांच्या मेहतर भत्त्यामध्ये वाढ करून तो ५/- रूपयावरून २०/- रूपये करण्यात यावा व प्राधिकरणाचा हा निर्णय गटारातील अडथळे (ड्रेनेज चोकअप) दूर करणाऱ्या सफाई कामगारांना देखिल लागू करण्यात यावा.

**Item No.** 60/26 **Resolution No.** 1002

विषय : हडकोने मंजूर केलेल्या वजोरिया नगर यवतमाळ येथील नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हडकोने मंजूर केलेल्या वजोरिया नगर यवतमाळ येथील अल्प उत्पन्न गटाखालील १९४ गाळ्यांच्या नागरी गृहनिर्माण योजनेसाठी हडकोकडून एकूण २४.७९ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 60/27 **Resolution No.** 1003

विषय : प्राधिकरण व मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, बाबटिप्पणीत सुचविल्यानुसार प्राधिकरण व विभागीय मंडळ यांच्या कर्मचाऱ्यांकरिता सेंटर फॉर डेव्हलपमेंट स्टडीज पुणे यांचे प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. याबद्दल पुढील तपशील ठरविण्याचा व करार करण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहे.

**Item No.** 60/28 **Resolution No.** 1004

विषय : प्राधिकरणास प्रशिक्षण व संशोधन कक्ष करण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
निवारा, गलिच्छ वस्ती सुधार, दुरुस्ती व पुनर्रचना या क्षेत्रात काम करणाऱ्या प्राधिकरणाच्या तांत्रिक व व्यावसायिक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी तसेच संशोधन व माहिती संकलनासाठी स्वतंत्र कक्ष प्राधिकरणामध्ये निर्माण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. यासंबंधीचा तपशील ठरविण्याचा व आवश्यक पदे निर्माण करण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहे.

**Item No.** 60/29 **Resolution No.** 1005

विषय : सुगत शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस परभणी येथील वसाहतीत ६ गाळे देण्याविषयी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सुगत शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस परभणी येथील वसाहतीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी बांधण्यास आलेल्या ५९४ गाळ्यांपैकी ६ गाळे भाडेखरेदी पध्दतीने नेहमीच्या शर्तीस आधिन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच संस्थेला वितरित करण्यात आलेल्या गाळ्यांची किंमत भाडेखरेदी पध्दतीने भरण्याची सवलत देण्याच्या बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांना देण्यात येत आहेत.

| **Item No.** | **60/30** | **Resolution No.** | **1006** |
|---|---|---|---|

विषय : दक्षता कक्ष निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या व विभागीय मंडळाच्या कार्यालयातील भ्रष्टाचाराची प्रकरणे शोधून काढण्यासाठी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे थेट नियंत्रणाखाली बाबटिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे स्वतंत्र दक्षता कक्ष निर्माण करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **60/30** | **Resolution No.** | **1006** |
|---|---|---|---|

विषय : दक्षता कक्ष निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या व विभागीय मंडळाच्या कार्यालयातील भ्रष्टाचाराची प्रकरणे शोधून काढण्यासाठी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे थेट नियंत्रणाखाली बाबटिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे स्वतंत्र दक्षता कक्ष निर्माण करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **60/31** | **Resolution No.** | **1007** |
|---|---|---|---|

विषय : पुणे महानगर पालिकेने हाती घेतलेल्या गलिच्छ वस्ती निर्मुलन योजनेसंबंधी प्रबंधात्मक अहवाल तयार करण्यासंबंधी (डाक्युमेंटेशन)

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुणे महानगर पालिकेने पुणे शहरातील मुठा नदीच्या कालव्या लगत असलेल्या गलिच्छ वस्तीमधील कुटुंबांचे पुनर्वसन करण्याच्या योजनेवर प्रबंधात्मक अहवाल तयार करण्याचे व अनुबोधपटाचा आराखडा तयार करण्याचे काम सेंटर फॉर डेव्हलपमेंट स्टडिज ॲण्ड ॲक्टिव्हिटीज, पुणे यांना देण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सदर कामासाठी येणारा एकूण खर्च रु.१,८९,०७३/- (अक्षरी एक लाख एकोणनव्वद हजार त्र्याहत्तर फक्त) खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. यासंबंधीचा अधिकार देण्यात येत आहेत.

| **Item No.** | **60/32** | **Resolution No.** | **1008** |
|---|---|---|---|

विषय : हडकोने मंजूर केलेल्या प्रिन्स्टव्हल हॉटेल जवळील जागा औरंगाबाद येथील समिश्र/गृहनिर्माण योजनेसाठी व सावेडी अहमदनगर येथील मध्यम उत्पन्न गट-२ गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडकोने मंजूर केलेल्या प्रिन्स्टव्हल हॉटेल जवळील जागा औरंगाबाद येथील समिश्र गृहनिर्माण योजना १९२ मध्यम उत्पन्न गट-२ गाळे व १२८ उच्च उत्पन्न गट गाळे. तसेच सावेडी-अहमदनगर येथील मध्यम उत्पन्न गट-२ गृहनिर्माण योजना १९२ गाळे या योजनेसाठी हुडकोकडून एकूण १९६.३७ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| **Item No.** | **60/32** | **Resolution No.** | **1008** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या प्रिन्स्टॅव्हल हॉटेल जवळील जागा औरंगाबाद येथील समिश्र/गृहनिर्माण योजनेसाठी व सावेडी अहमदनगर येथील मध्यम उत्पन्न गट-२ गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडकोने मंजूर केलेल्या प्रिन्स्टॅव्हल हॉटेल जवळील जागा औरंगाबाद येथील समिश्र गृहनिर्माण योजना १९२ मध्यम उत्पन्न गट-२ गाळे व १२८ उच्च उत्पन्न गट गाळे. तसेच सावेडी-अहमदनगर येथील मध्यम उत्पन्न गट-२ गृहनिर्माण योजना १९२ गाळे या योजनेसाठी हुडकोकडून एकूण १९६.३७ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| **Item No.** | **60/33** | **Resolution No.** | **1009** |
|---|---|---|---|

विषय : कन्नमवारनगर व टागोरनगर विक्रोळी येथे जलमापके बसविण्यासाठी येणाऱ्या जादा खर्चास (अंदाजे रू. २७ हजार) मंजूरी देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
टागोरनगर व कन्नमवारनगर, विक्रोळी या वसाहतीत जलमापके बसविण्यासाठी रू. २७ हजाराने जादा खर्च येत असल्याने सुधारित अंदाजाप्रमाणे रू. १.८२ लाख पर्यंत खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. सदरचा खर्च भाडेकरूकडून नियमानुसार व प्राधिकरणाने याबाबत घेतलेल्या आधिच्या निर्णयानुसार सेवाआकार वाढवून वसूल करण्यात यावा.

| **Item No.** | **60/34** | **Resolution No.** | **1010** |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँक प्रकल्पाखाली उपेक्षित वस्त्यांची श्रेणीवाढ करण्याचा कार्यक्रम.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई नागरी विकास प्रकल्प क्र. १ खालील प्रस्तावित झोपडपट्टयांची श्रेणीवाढ योजना प्राधिकरणामार्फत जागतिक बँक प्रकल्पाखाली हाती घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या वस्त्यांच्या कामाना प्रशासकीय मान्यता देणे रहिवाशांशी तसेच त्यांच्या संस्थांशी करार करणे रहिवाशांच्या वर्गणीची रक्कम ठरविणे, झोपडी सुधारणेसाठीच्या कर्जाच्या रक्कमा मंजूर करणे, इत्यादि संबंधिचे अधिकारी, संचालक, जागतिक बँक प्रकल्प यांना प्रदान करण्यात येतात.

**Item No.** 60/35 **Resolution No.** 1011

विषय : राजेंद्रनगर, बोरिवली येथे मध्यम उत्पन्न गटाकरिता १४० गाळ्यांपैकी २० गाळ्यांची एक इमारत प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना विशेष गृहनिर्माण योजनेखाली वाटप करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
राजेंद्रनगर, बोरिवली येथे मध्यम उत्पन्न गटाकरिता बांधण्यात आलेल्या १४० गाळ्यांपैकी २० गाळ्यांची एक इमारत प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना विशेष गृहनिर्माण योजनेखाली वाटप करण्यास खालील अटीवर मान्यता देण्यात येते.
१) गाळ्यांचे वाटप रितसर नोटीस काढून, अर्ज मागवून व आलेल्या अर्जामधून सोडत काढून करण्यात यावे.
२) ज्या कर्मचाऱ्यांची प्राधिकरणात १५ वर्षे किंवा जास्त सेवा झाली आहे. त्यांना गाळ्यांच्या वाटपास प्राधान्य देण्यात यावे. अशा अर्जदारांना वाटप केल्यानंतर उरलेले गाळे त्यापेक्षा कमी सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत.
३) उत्पन्न मर्यादित अट लावताना गाळ्यांचे बांधकाम जेव्हा पूर्ण झाले त्या तारखेस अर्जदाराचे असणारे उत्पन्न लक्षात घेऊन गाळ्यांचे वाटप करण्यात यावे.
४) ज्या कर्मचाऱ्यांना प्राधिकरणाने विभिन्न योजनाखाली गाळे दिले परंतु ज्यांनी परस्पर ते दुसऱ्यांना देऊन टाकले व स्वतः दुसरीकडे रहावयास गेले अशा कर्मचाऱ्यांना या योजनेत अर्ज करण्यास प्रतिबंध करण्यात यावा.
५) एखाद्या कर्मचाऱ्यांच्या किंवा त्याच्या पत्नीच्या नावे मुंबईत स्वतःच्या मालकीचे घर अथवा भूखंड असल्यास त्यांना या योजनेत अर्ज करण्यास प्रतिबंध करण्यात यावा.

---

**Item No.** 60/36 **Resolution No.** 1012 .

विषय : सभापती, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, श्री. डॅनियल ताराचंद थोरात, श्री. श्रीकृष्ण भिवसन वाविसकर व श्री. नरेंद्र संभाजी जावळेकर यांनी पुणे येथे गाळे मिळण्याकरिता केलेल्या अर्जांच्या संबंधात प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांना दिलेले निवेदन.

ठराव : १) स्वामी विवेकानंद नगर, पुणे या वसाहतीत अथवा पुणे येथील कोणत्याही वसाहतीत अल्प उत्पन्न गटाकरिता बांधलेला गाळा उपलब्धतेनुसार श्री. डॅनियल ताराचंद थोरात यांच्या पत्नीस अथवा इतर वारसास मूळ अर्जावर वाटप करण्यास मान्यता देण्यात येते.
२) श्री. श्रीकृष्ण भिवसन वापिसकर यांना संत तुकाराम नगर, पुणे येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता बांधलेल्या गाळ्यामधून उपलब्ध असलेल्या गाळ्यांपैकी एक गाळा वितरण करण्यास मान्यता देण्यात येते.
३) श्री. नरेंद्र संभाजी जावळेकर यांना पुणे येथील गोखलेनगर वसाहतीत अल्प उत्पन्न गटाकरिता बांधलेल्या गाळ्यांपैकी त्यांच्यासाठी शिल्लक ठेवलेला गाळा त्यांना वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

---

**Item No. 60/37 Resolution No. 1013**

विषय : अंधेरी येथील दादाभाई नौरोजी नगर वसाहतीत गलिच्छ वस्ती निर्मूलन योजनेखाली बांधलेल्या इमारतीतील ८० गाळे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवा निवासस्थाने म्हणून देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
अंधेरी येथील दादाभाई नौरोजी नगर वसाहतीत गलिच्छ वस्ती निर्मूलन योजनेखाली बांधलेल्या व संक्रमण शिबीराकरिता राखून ठेवण्यात आलेले ८० गाळे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवा निवासस्थाने म्हणून प्राधिकरणाने निश्चित केलेल्या तत्त्वाच्या आधारे वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **60/38** **Resolution No.** **1014**

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या मौजे नरी इंदोरा, नागपूर येथील संमिश्र गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : मौजे नरी इंदोरा, नागपूर येथील ८८.०८ लक्ष रु. अंदाजित किंमतीच्या १९३ अल्प उत्पन्न गट - नागरी गृहनिर्माण (ब) व ११८ मध्यम उत्पन्न गट - २ गाळ्यांच्या संमिश्र गृहनिर्माण योजनेसाठी (योजना क्र. ३६२८ - सी) हुडकोकडून ६२.८५ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

यानंतर श्री. अतुल हुले, सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली.

प्राधिकरणाचे कर्मचाऱ्यांनी गृहनिर्माण संस्था स्थापन करून त्या कर्मचाऱ्यांना भूखंडही मंजूर झाले आहेत. तथापि वाढीव महागाई भत्त्यामुळे बरेचसे कर्मचारी उच्च उत्पन्न गटात मोडतात. त्यामुळे बांधकामाकरिता प्राधिकरणाच्या नियमानुसार कर्ज मिळणेस पात्र ठरत नाही. त्यामुळे अल्प उत्पन्न गटाप्रमाणे उच्च उत्पन्न गटातील कर्मचाऱ्यांनाही प्राधिकरणाकडून बांधकाम कर्ज मिळणेस पात्र ठरविण्याचे दृष्टीने प्रचलित नियमामध्ये सुधारणा करावी अशी श्री. हुले, सदस्य यांनी सूचना मांडली ती प्राधिकरणाने मान्य करून शासनाकडे या बाबतीत पत्रव्यवहार करून प्रचलित नियमावलीत दुरुस्ती करून घ्यावी असे ठरले.

२/- कर्जाची मर्यादा रु. ४५,००० पासून रु. १,२५,००० पर्यंत वाढवावी अशी श्री. हुले यांनी सूचना केली. त्यावर वित्त नियंत्रकांनी मत द्यावे व पुढील बैठकीपुढे ठेवावे असे ठरले.

प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्थेच्या बाबतीत लीज रेंट कमी करावे. ही श्री. हुले यांची सूचना सर्वसाधारण भूखंड वितरण तत्त्वांच्या पुनर्विचाराच्या संदर्भात विचारात घ्यावी असे ठरले.

प्राधिकरणाच्या कारभारात मराठीचा वापर करण्याबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्यावर कोणती उपाय योजना करण्यात येत आहे याची माहिती उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी प्राधिकरणास दिली.

गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतीतील समाज मंदिरांचा गैरवापर होत असल्याचे श्री. अतुल हुले, सदस्य यांनी प्राधिकरणाचे निदर्शनास आणले. तेव्हा समाज मंदिरे महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण केंद्राच्या ताब्यात देण्याबद्दल चर्चा चालू असल्याची माहिती उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी दिली.

प्राधिकरणाची पुढील बैठक मुंबई येथे दिनांक २९-४-१९८५ रोजी घेण्याचे ठरले.

यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.** 61 **Meeting Date** 02/May/1

**Item No.** 61/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ३०-३-१९८५ रोजी झालेल्या ६०व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

**Item No.** 61/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

**Item No.** 61/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही न करण्यात आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

**Item No.** 61/4 **Resolution No.** 1015

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या मालेगाव येथील संमिश्र सोयींसह भूखंड व विकसित भूखंड योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या मालेगाव येथील संमिश्र सोयींसह भूखंड व विकसित भूखंड योजनेसाठी २५.९२ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 61/5 **Resolution No.** 1016

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या रायगड जिल्ह्यातील १९८४-८५ मधील ६०० घरकुलांच्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून ८.१० लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| Item No. | 61/6 | Resolution No. | 1017 |
|---|---|---|---|

विषय : श्री. एस. उचिल, सेवानियुक्त प्रशासकीय अधिकारी यांची पुनर्नेमणूक पुढे चालू ठेवण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
उच्च न्यायालयाचा प्राधिकरणाचे कर्मचाऱ्यांना पदोन्नती न देण्याचा मनाई आदेश उठेपर्यंत अगर दिनांक १-५-१९८५ पासून सहा महिन्याचे कालावधीकरिता जो कालावधी लवकर संपेल त्याप्रमाणे श्री. उचिल यांची पुनर्नेमणूक नियमानुसार चालू ठेवावी.

| Item No. | 61/7 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : औरंगाबाद विभागीय मंडळातील सिमेंट वाहतुकीची कामे अनियमितपणे बहाल करणे व या कामाबद्दल अनियमितपणे रकमा अदा करणे व त्यामुळे प्राधिकरणाला झालेला अवाजवी खर्च.

ठराव :

| Item No. | 61/8 | Resolution No. | 1018 |
|---|---|---|---|

विषय : दक्षता कक्ष निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाचे दक्षता प्रमुख पदी जिल्हा पोलीस निरीक्षक या दर्जाचा अधिकारी नेमणेस प्राधिकरणाने मंजूरी दिली.

| Item No. | 61/9 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या बैठकांबाबत आवश्यक कायदेशीर कार्यवाही (गोपनीय)

ठराव :

| Item No. | 61/10 | Resolution No. | 1019 |
|---|---|---|---|

विषय : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना अंतर्गत उपकर लागू असणाऱ्या इमारतींचे संबंधित घडणाऱ्या दुर्घटनाग्रस्त इसमांचे बाबत विमा योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय सूचीमध्ये निर्दिष्ट केलेली जनरल विमा कॉर्पोरेशनची विमा योजना मुंबई मंडळाला सेसपात्र इमारतीसाठी लागू करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

| Item No. | 61/11 | Resolution No. | 1020 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना पुनर्नेमणूक देण्याबाबत.

ठराव : १०२०

एकमताने निर्णय घेतला की,

अशा पुनर्नेमणूका, पात्र व्यक्तींची निवड समितीने निवड केल्यानंतर प्राधिकरणापुढे ठेवून मंजूर करून घ्याव्यात. मात्र पुनर्नेमणूकीचा कालावधी, उच्च न्यायालयाचा मनाई आदेश उठेपर्यंत अगर पुनर्नेमणूकीच तारखेपासून दहा महिन्याचे मुदतीने, जी मुदत अगोदर संपेल त्याप्रमाणे असावा.

| Item No. | 61/12 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचा पुणे व औरंगाबाद येथे आयोजित करण्यात येणारा अभ्यास दौरा.

ठराव :

| Item No. | 61/13 | Resolution No. | 1021 |
|---|---|---|---|

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण, सोलापूर नियोजन समितीच्या अहवालावर विचार करून त्यांच्या शिफारशींना व त्याअन्वये सुधारित केलेल्या नियोजन प्रस्तावास मंजूरी देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

नियोजन समितीचा अहवाल मान्य करून शासनाकडे पाठवावा. बाब टिप्पणीत उल्लेख केल्याप्रमाणे विकास नियंत्रक नियमांच्या पान क. १८ व ४६ वरील बदल (की जो बदल बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या संक्षिप्त सूची नियमावलीच्या अखेरीस जोडण्यात आला आहे.) विचारात घेऊन प्राधिकरणाने सुधारित नियोजन प्रस्तावाला मंजूरी दिली व तो प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्याबाबत उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना अधिकार प्रदान केले.

| Item No. | 61/14 | Resolution No. | 1022 |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहतीतील माध्यमिक शाळा, अपंगांसाठी शाळा व नर्सरी स्कूल यासाठी भूखंडाचे वाटप.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

भुवनेश्वरी एज्युकेशन सोसायटीची व डॉ. श्रीमती ललिता राव यांची भूखंड विभाजनाला हरकत असल्याने भुवनेश्वरी सोसायटी व विद्या विकास एज्युकेशन सोसायटी यांना वाटाघाटी करून विभाजनास संमती मिळवून दोन प्लॉट त्या संस्थांना देता येत नसतील तर मुंबई मंडळानी भूखंड वितरण करण्याकरिता पुन्हा जाहिरात काढावी असा प्राधिकरणाने निर्णय घेतला.

| Item No. | 61/15 | Resolution No. | 1023 |
|---|---|---|---|

विषय : शीव, कोळीवाडा (संक्रमण शिबिर) येथील मंडळाच्या (भूतपूर्व घर दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ) मोकळ्या जागेतून १९७४ साली चोरीस गेलेल्या लोखंडाच्या सळ्यांची किंमत निर्लेखित करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की, या चोरीमुळे प्राधिकरणाला आलेला रूपये १०,०००/- (रू. दहा हजार फक्त) चा तोटा निर्लेखित करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

| Item No. | 61/16 | Resolution No. | 1024 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कर्मचारी घरबांधणी अग्रिम विनियम १९८४ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाबटिप्पणीतील वस्तुस्थिती विचारात घेऊन, प्राधिकरण कर्मचारी घरबांधणी अग्रिम विनियम १९८४ मध्ये विनियम क्र.२ (३) व विनियम क्र. ६ (२) मधील प्रस्तावित दुरूस्तीला प्राधिकरणाने मान्यता दिली. प्रस्ताव, मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा.

| Item No. | 61/17 | Resolution No. | 1025 |
|---|---|---|---|

विषय : भूखंड अधिमूल्य सुधारित धोरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
याबाबतीत प्रस्तावित सुधारित अधिमूल्याचे दर आकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. मात्र सुधारित दराचा अंमल १ जून १९८५ पासून होईल. तसेच सध्या अशा संस्थाना लिजने दिलेल्या जमिनीबाबत लीजची मुदत संपल्यानंतर सुधारित अधिमुल्याचे दर आकारले जातील.
हा ठराव पुढल्या बैठकीत स्थायी होईपर्यंत मुख्य अभियंता/प्राधिकरण व जमिन व्यवस्थापक/प्राधिकरण यांनी बाबटिप्पणीतील दुसऱ्या परिशिष्टामधील अधिमूल्याचे दर तपासून, पुढल्या बैठकीच्या वेळी तपासणी अहवाल प्राधिकरणापुढे सादर करावा. तसेच गुणानुसार वैयक्तिक प्रकरणे तपासून गरज भासल्यास प्राधिकरणापुढे ठेवावे. यासंबंधी प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्थेला दिलेल्या भूखंडासाठी कर्मचारी कल्याणाचा हेतू लक्षात घेऊन सहानुभूतीचे धोरणाचा अवलंब करावा. व या संस्थाना सध्याच्या दराने अर्थात वास्तविक खर्च किंवा खर्चाच्या दुप्पट अधिमूल्य आकारून नवीन धोरणाप्रमाणे वार्षिक भाडे आकारावे. शासन देखिल स्वतःच्या कर्मचाऱ्यांसाठी अशा रितीने सवलतीच्या धोरणाचा अवलंब करते.

**Item No.** 61/17 **Resolution No.** 1025

विषय : भूखंड अधिमूल्य सुधारित धोरण.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
याबाबतीत प्रस्तावित सुधारित अधिमूल्याचे दर आकारण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. मात्र सुधारित दराचा अंमल १ जून १९८५ पासून होईल. तसेच सध्या अशा संस्थाना लिजने दिलेल्या जमिनीबाबत लीजची मुदत संपल्यानंतर सुधारित अधिमुल्याचे दर आकारले जातील.
हा ठराव पुढल्या बैठकीत स्थायी होईपर्यंत मुख्य अभियंता/प्राधिकरण व जमिन व्यवस्थापक/प्राधिकरण यांनी बाबटिप्पणीतील दुसऱ्या परिशिष्टामधील अधिमूल्याचे दर तपासून, पुढल्या बैठकीच्या वेळी तपासणी अहवाल प्राधिकरणापुढे सादर करावा. तसेच गुणानुसार वैयक्तिक प्रकरणे तपासून गरज भासल्यास प्राधिकरणापुढे ठेवावे. यासंबंधी प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्थेला दिलेल्या भूखंडासाठी कर्मचारी कल्याणाचा हेतू लक्षात घेऊन सहानुभूतीचे धोरणाचा अवलंब करावा. व या संस्थाना सद्याच्या दराने अर्थात वास्तविक खर्च किंवा खर्चाच्या दुप्पट अधिमूल्य आकारून नवीन धोरणाप्रमाणे वार्षिक भाडे आकारावे. शासन देखिल स्वत:च्या कर्मचाऱ्यांसाठी अशा रितीने सवलतीच्या धोरणाचा अवलंब करते.

---

**Item No.** 61/18 **Resolution No.**

विषय : लोकमान्यनगर, दादर येथे ''स्त्री हितकारिणी'' या संस्थेला या संस्थेला दिलेला भूखंड ३० वर्षांचे कराराने देण्याच्या विनंतीबाबत.

ठराव :

---

**Item No.** 61/18 **Resolution No.** 1035

विषय : जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यपातळीवर एकात्मिक गृहनिर्माण व नागरी विकासासाठी कार्यपध्दती व धोरण ठरवून त्या आधारे एक एकत्रित असा कार्यक्रम राबविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रस्तावित योजनेची जबाबदारी प्राधिकरणाने घेण्याबद्दल तत्वत: मान्यता देण्यात आली. तसेच या योजनेबाबत राज्याच्या सर्व प्रदेशाच्या नागरी विकासाचा अभ्यास करणे यासाठी योग्य त्या संस्थांची व अभ्यासगटाची नेमणूक करणे, या प्रकल्पाची रुपरेषा व कार्यरेषा ठरविणे, यासाठी आवश्यक तो पत्रव्यवहार व खर्च करणेबाबत कार्यवाही करणेबाबत आवश्यक ते अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी व उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

---

**Item No.** 61/18 **Resolution No.**

विषय : लोकमान्यनगर, दादर येथे ''स्त्री हितकारिणी'' या संस्थेला या संस्थेला दिलेला भूखंड ३० वर्षांचे कराराने देण्याच्या विनंतीबाबत.

ठराव :

---

| Item No. | 61/19 | Resolution No. | 1026 |
|---|---|---|---|

विषय : पुणे/औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थाना भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रस्तावित भूखंड प्राधिकरणाच्या नियमानुसार बाबटिप्पणीत प्रस्तावित भूखंड कर्मचाऱ्यांच्या सहकारी संस्थेला देण्यास मान्यता देण्यात येत आहे. या भूखंडावर पुणे मंडळाचे कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त जे कोणी असतील त्यांना मंडळाने दुसऱ्या ठिकाणी हलवून नंतरच हा भूखंड चतूर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या सहकारी सोसायटीस नेहमीच्या अटी व शर्थींना आधिन राहून वितरण करावा.

| Item No. | 61/20 | Resolution No. | 1027 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्याचे हस्तांतरण व गाळ्यांची अदलाबदल) विनियम १९८१ मधील विनियम २४ व २५ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाबटिप्पणीत सुचीत केल्याप्रमाणे अधिसूचनेच्या सुधारणेला प्राधिकरण मान्यता देत आहे. व सदरहू सुधारणा मान्य होईपर्यंत मुंबई मंडळात हा अधिकार उपमुख्य अधिकारी (मिळकत व्यवस्थापन) यांना प्रदान करण्यास प्राधिकरण मान्यता देते. तसेच विनियम २४ व २५ प्रमाणे मुख्याधिकारी यांच्या निर्णयावर अपिलाची तरतूद विनियमात नाही. विधी सल्लागार यांनी मिळकत व्यवस्थापकाचे आदेशाविरुध्द मुख्याधिकारी व मुख्याधिकारी यांचे आदेशाविरुध्द उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचेकडे अपिलाची तरतूद करण्याबाबत जरूर ती कार्यवाही करावी असे प्राधिकरणाने ठरविले.

| Item No. | 61/21 | Resolution No. | 1028 |
|---|---|---|---|

विषय : गाळ्यांच्या अतिरिक्त बांधकामास परवानगी देणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने शासनाकडे कलम ५५ च्या दुरुस्तीबद्दल प्रस्ताव पाठविलेला आहेत. शासनाने याबाबतीत अंतिम निर्णय कळविणेपर्यंत हा विषय प्रलंबित ठेवावा व दरम्यान अशा अनधिकृत बांधकामाची तसेच गाळ्यांच्या बांधकामामधील बदल करण्याची प्रत्येक मंडळात किती प्रकरणे आहेत याबदलची माहिती मंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांकडून गोळा करून प्राधिकरणापुढे ठेवावी.

| **Item No.** | **61/22** | **Resolution No.** | **1029** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोच्या संशोधन व विकास निधीमधून बिनव्याजी तांत्रिक सहाय्य कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
संगणित्रावर आधारित कार्यक्रमाच्या तंत्रशास्त्राची अदलाबदल करण्यावरील कार्यसत्र आयोजित करणे व प्राधिकरणातर्फे सोलापूर येथे विडी कामगारांसाठी हाती घ्यावयाची नमुनेदार क्षेत्रिय नियोजन योजना तयार करणे या दोन प्रस्तावांसाठी हुडकोकडून दिनांक ४ व ५ मार्च १९८५ च्या हुडकोकडील कर्जमंजुरीच्या करारपत्रांप्रमाणे हुडकोच्या संशोधन व विकास निधीमधून अनुक्रमे रु. ६३,५००/- व रु. १,००,०००/- बिनव्याजी तांत्रिक सहाय्य कर्ज घेण्यास प्राधिकरण अनुमती व अधिकृती देत आहे.

---

| **Item No.** | **61/23** | **Resolution No.** | **1030** |
|---|---|---|---|

विषय : गट विमा योजनांतर्गत हुडको अर्थसहाय्याने केंद्र श्शासकीय कर्मचाऱ्यांसाठी गृहनिर्माण योजना हाती घेण्याचा विचार करणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गट विमा योजनांतर्गत हुडको सहाय्य गृहनिर्माण योजना प्राधिकरणाने मुंबईत व महाराष्ट्रात इतर जागेच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे हाती घेण्यास प्राधिकरणाची संमती आहे. तसेच जागा स्वत:कडे असलेल्या केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांसाठी कर्ज मिळवून त्यांना वितरीत करण्याबद्दलही प्राधिकरण मान्यता देत आहे.

---

| **Item No.** | **61/24** | **Resolution No.** | **1031** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र विपुल प्रमाणात घरबांधणी करण्यासाठी विश्वसनीय व उत्तम प्रकारचे बांधकाम करता यावे यासाठी सुदृढ गरजा भागविण्यासाठी नव्या धोरणांचा शोध मे. वी. जी. शिर्के आणि कं. यांना बांधकाम देण्यासंबंधी शासनाचे आदेश.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रस्तावित केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे उपसमिती नेमण्यास प्राधिकरण संमती देत आहे. त्या समितीत मुख्य अभियंता/प्राधिकरण व मुंबई मंडळ यांनी मदत करावी असे ठरले.
१) अध्यक्ष/प्राधिकरण
२) उपाध्यक्ष/प्राधिकरण
३) श्री. अतुल हुले, सदस्य/प्राधिकरण
उपसमितीने सत्वर वाटाघाटी करून प्रस्ताव प्राधिकरणापुढे ठेवावा.

| **Item No.** | **61/25** | **Resolution No.** | **1032** |
|---|---|---|---|

विषय : हिंद मील कंपाउंड, लोकमान्यनगर, दादर येथील जुन्या गाळेधारकांना विकास प्रस्तावामध्ये सवलत देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयसूचीत प्रस्तावित केल्याप्रमाणे सध्याचे रहिवाशांशी वाटाघाटी करून जमीन लीजवर देण्याच्या अटी, माडेकरूकडून घ्यावयाचे क्षेत्रफळ या विषयाबद्दल निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणाने उपसमितीस द्यावे असे ठरले. या उपसमितीत अध्यक्ष/प्राधिकरण व उपाध्यक्ष/प्राधिकरण राहतील.

| **Item No.** | **61/26** | **Resolution No.** | **1033** |
|---|---|---|---|

विषय : श्री. एस. आर. वाडेकर, मुख्य अभियंता, मुंबई मंडळ यांना उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
याबाबतीत शासनाकडे पत्रव्यवहार करून श्री. वाडेकर यांना प्रतिनिधीयुक्ती वेतनाव्यतिरिक्त काही वेतनवाढ देता येईल अगर कसे याबाबत शासनाकडून ठरवून घ्यावे असे प्राधिकरणाने ठरविले.

| **Item No.** | **61/27** | **Resolution No.** | **1034** |
|---|---|---|---|

विषय : चेंबूर येथील टिळकनगर वसाहतीत महाराष्ट्र सहकारी उद्योगिनी लि. या संस्थेच्या आम्रपाली वर्किंग वुमेन्स होस्टेलसाठी वितरण केलेल्या वसतीगृह इमारतीच्या बाबतीत भांडवलावरील व्याजाची रक्कम वसूल करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
याबाबतीत वित्त नियंत्रक/प्राधिकरण, विधी सल्लागार/प्राधिकरण यांचे सल्ल्यानुसार वरील व्याजाची आकारणी माफ करावी व ही रक्कम हिशोबातूनच काढून टाकावी (राईट ऑफ) असा निर्णय घेण्यात आला.

| **Item No.** | **61/28** | **Resolution No.** | **1035** |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यपातळीवर एकात्मिक गृहनिर्माण व नागरी विकासासाठी कार्यपध्दती व धोरण ठरवून त्या आधारे एक एकत्रित असा कार्यक्रम राबविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रस्तावित योजनेची जबाबदारी प्राधिकरणाने घेण्याबद्दल तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच या योजनेबाबत राज्याच्या सर्व प्रदेशाच्या नागरी विकासाचा अभ्यास करणे यासाठी योग्य त्या संस्थांची व अभ्यासगटाची नेमणूक करणे, या प्रकल्पाची रूपरेषा व कार्यरेषा ठरविणे, यासाठी आवश्यक तो पत्रव्यवहार व खर्च करणेबाबत कार्यवाही करणेबाबत आवश्यक ते अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी व उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Item No.** 61/29 **Resolution No.** 1036

विषय : जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या समाज विकास कक्षाच्या प्रमुख पदी तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जागतिक बँक प्रकल्पाच्या कामाचे महत्व जाणून टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स यांच्या संचालकांच्या शिफारशीनुसार श्रीमती पी. पानवलकर यांची प्रमुख समाज विकास कक्ष म्हणून प्रथम एक वर्षासाठी कंत्राटी पध्दतीवर बाबटिप्पणीत स्पष्ट केलेल्या शर्ती व अटींवर नेमणूक करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**Item No.** 61/30 **Resolution No.** 1037

विषय : गोरेगांव येथे तीन डोंगरी भागात गलिच्छवस्ती रहिवाश्यांसाठी बांधलेल्या ४०० गाळ्यांची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गोरेगांव येथे तीन डोंगरी भागात गलिच्छ वस्ती रहिवाश्यांसाठी बांधलेल्या ४०० गाळ्यांचे विक्री संबंधात शासनाचे आदेश येईपर्यंत गाळ्यांच्या विक्रीचा प्रश्न अनिर्णित न ठेवता बाब टिप्पणीतील परिच्छेद ३ मधिल अटींवर या गाळ्यांची विक्री करण्यास प्राधिकरण मान्यता देते. तसेच, अनधिकृत गाळेधारकांना प्रत्येकी रू.५०००/- (रू. पाच हजार मात्र) अधिमुल्य आकारून गाळ्यांची विक्री करण्यासाठी प्राधिकरण मान्यता देत आहे.

**Item No.** 61/31 **Resolution No.** 1038

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने म्हणून देण्यात आलेले गाळे कर्मचाऱ्यांना विक्री करण्याची मागणी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाबटिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने म्हणून देण्यात आलेले गाळे कर्मचाऱ्यांना विक्री करण्याची मागणी प्राधिकरणाने बाबटिप्पणीतील अटी व शर्तीवर मान्य केली. तसेच, याबाबतीत केलेल्या कार्यवाहीमुळे अध्यक्ष/प्राधिकरण व उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे आभार मानण्याचा ठराव सदस्य श्री. अतुल हुले यांनी मांडला व तो एकमुखी पास करण्यात आला.

**Item No.** 61/32 **Resolution No.** 1039

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतींतील गाळ्यांची विक्री योजना.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतींतील गाळ्यांचे विक्रीबाबत गाळ्यांची शेष किंमत किंवा पूर्ण किंमत एक रकमी भरणेकरिता दिनांक ३१.७.१९८५ पर्यंत मुदतवाढ देण्याकरिता प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**Item No.** **61/33** **Resolution No.** **1040**

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या गाळ्यांची विक्री योजनेच्या अंमलबजावणीच्या संदर्भात घाटकोपर येथील पंतनगर वसाहतीतील गाळेधारकाकडून येणे असलेल्या रकमेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
घाटकोपर येथील पंतनगर वसाहतीतील गाळेधारकाकडून येणे असलेल्या थकबाकीबद्दल बाबटिप्पणीतील परिच्छेद २ मध्ये स्पष्ट केलेल्या मुद्यावर वाद निर्माण होऊन गाळेधारक सदर थकबाकी भरण्यास तयार नाहीत. या गोष्टींचा सांगोपांग विचार करून निर्णय घेण्यासाठी
१) अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
२) उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
३) उपसभापती तथा मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई
४) वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांची समिती नेमण्यास व याबाबतीत त्या समितीला निर्णय घेण्याचा अधिकार देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. तसेच, या समितीने सचिव म्हणून मुख्य लेखा अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना नेमण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.
प्राधिकरणाची पुढील बैठक दिनांक ३.६.१९८५ रोजी मुंबई येथे, वांद्रे येथील गृहनिर्माण भवनातील सभागृहात घेण्याचे ठरले.
यानंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे व उपस्थितांनी अध्यक्षांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 03/May/1

**Item No.** 4 **Resolution No.** 1219

विषय : प्राधिकरणात सक्षम प्राधिकारी पदे निर्माण करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,

शासनाचे आदेश लक्षात घेऊन, सक्षम प्राधिकाऱ्याकडील अनधिकृत भाडेकरूंच्या प्रलंबित प्रकरणाचा तातडीने निपटारा करण्याच्या दृष्टीकोनातून व अधिक गाळे उपलब्ध करून घेण्यासाठी खालीलप्रमाणे पदे प्रारंभी एक वर्षाच्या कालावधीसाठी शासनाची परवानगी अपेक्षित धरून निर्माण करण्यास मंजूरी दिली.

| पदनाम | वेतनश्रेणी | संख्या |
|---|---|---|
| १) सक्षम प्राधिकारी (उपजिल्हाधिकारी श्रेणीतील वर्ग-१ चे २ अधिकारी) | रु. ६८०-४०-९००-५०-१५०० | ४ |
| २) वरिष्ठ लिपीक | रु. ३३५-१५-५००-२०-५८०-विस्तार-२०-६८० | ४ |
| ३) लघु-टंकलेखक | रु. ३३५-१५-५००-२०-५८०-विस्तार-२०-६८० | ४ |
| ४) कनिष्ठ लिपीक | रु. २६०-१०-३९०-१५-४२०-विस्तार-१५-४९५ | ४ |
| ५) शिपाई | रु. २००-३-२३०-५-२५५-विस्तार-५-२८० | ४ |

| Item No. | 59/6 | Resolution No. | 966 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरण व विभागीय मंडळाच्या आस्थापनेवरील पदांच्या वेतनश्रेणीमध्ये वाढ करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

१) मुंबई मंडळामधील 'सहमुख्य लेखा अधिकारी' या पदाची वेतनश्रेणी रु. ६८०-१२५० वरून रु. १०००-५०-१५०० अशी दिनांक १-२-१९८५ पासून वाढविण्यास व ह्या पदाची श्रेणी वाढविण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच,

२) प्राधिकरणाच्या सोलापूर विशेष नगरविकास प्राधिकरणामधील 'सहाय्यक टाऊन प्लॅनर' या पदाची वेतनश्रेणी ५००-२०-७००-२५-९०० वरून रुपये ६८०-४०-१०००-५०-१२५० अशी सुधारण्यास व या पदाचे पदनाम 'टाऊन प्लॅनर' असे करण्यासही मायता देण्यात येते. त्याचप्रमाणे सदर वेतनश्रेणी सध्या त्या पदाचे धारक श्री. घालवडकर ज्या दिनांकापासून पदोन्नत झाले, त्या दिनांकापासून लागू करण्यात मान्यता देण्यात येते.

| Item No. | 59/7 | Resolution No. | 967 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्रातील गृहनिर्माण योजनेसाठी वित्त कॉर्पोरेशन स्थापन करणे; व योजना करण्यासाठी सोसायटी फॉर डेव्हलपमेंट स्टडीज यांची नेमणूक करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

शासनाच्या शासनांतर्गत निर्माण करावयाच्या वित्त कॉर्पोरेशनचे स्वागत करण्यात येत असून त्याकरिता सोसायटी फॉर डेव्हलपमेंट स्टडीज संस्थेमार्फत तयार करावयाच्या सर्वंकष अहवालाच्या अभ्यासासाठी रु. १,१०,००० (रुपये एक लाख दहा हजार फक्त) खर्चास मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे सदरहू संस्थेबरोबर तत्संबंधीचे करार व पुढील इतर कारवाई करण्याचे तसेच वेळोवेळी ॲडव्हान्स देण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात येत आहेत.

| Item No. | 59/8 | Resolution No. | 968 |
|---|---|---|---|

विषय : दिपावली शुभचिंतनबाबतचे वर्तमानपत्राचे देयकास मंजूरी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,

सभापती/पुणे मंडळ यांनी दैनिक महाराष्ट्र या दैनिकास दिपावली शुभेच्छाबाबत दिलेल्या जाहिरातीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून त्याकरिताचे देयक क्र. १४३, दिनांक २३-१०-१९ रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या नाहक खर्चास मर्यादा पाडण्याच्या दृष्टीने या अनिष्ट प्रथा टाळण्यात याव्यात असे आदेश विभागीय मंडळांना देण्यात यावेत असे आदेश प्राधिकरणाने दिले.

| Item No. | 59/8 | Resolution No. | 968 |
|---|---|---|---|

विषय : दिपावली शुभचिंतनबाबतचे वर्तमानपत्राचे देयकास मंजूरी देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
समापती/पुणे मंडळ यांनी दैनिक महाराष्ट्र या दैनिकास दिपावली शुभेच्छाबाबत दिलेल्या जाहिरातीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून त्याकरिताचे देयक क्र. १४३, दिनांक २३-१०-१९ रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) खर्चास मंजूरी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या नाहक खर्चास मर्यादा पाडण्याच्या दृष्टीने या अनिष्ट प्रथा टाळण्यात याव्यात असे आदेश विभागीय मंडळांना देण्यात यावेत असे आदेश प्राधिकरणाने दिले.

| Item No. | 59/9 | Resolution No. | 969 |
|---|---|---|---|

विषय : श्री. एस. उचिल, प्रशासकीय अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक/कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांची पुनर्नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. एस. उचिल यांना १-२-१९८५ पासून सध्याच्या पदावर प्रारंभी तीन महिनेपर्यंत पुनर्नेमणूक देण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

| Item No. | 59/10 | Resolution No. | 970 |
|---|---|---|---|

विषय : श्री. के. स्वामिनाथन, सेवानिवृत्त उपमुख्य अधिकारी यांचे पुनर्नेमणूकीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. के. स्वामिनाथन, सेवानिवृत्त उपमुख्य अधिकारी यांची जागतिक बँक प्रकल्प विभागातील उपमुख्य अधिकारी या पदावर रु. ६८०-१५०० या वेतनश्रेणीमधील रिक्त पदावर नेहमीच्या अटी व शर्तीवर पुनर्नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येते. पुनर्नेमणूकीच्या कालावधीत नियमानुसार देय वेतन त्यांना देण्यात यावे व एक महिन्याच्या नोटिसीने त्यांची सेवा समाप्ती करण्यास मान्यता देण्यात येते.

| Item No. | 59/11 | Resolution No. | 971 |
|---|---|---|---|

विषय : श्री. बी. सी. लाल, उपमुख्य अभियंता यांच्या पुनर्नेमणूकीसंबंधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. बी. सी. लाला, उपमुख्य अभियंता यांची दिनांक १-२-१९८५ पासून एक महिन्याच्या कालावधीकरिता पुनर्नेमणूक करण्याच्या उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. तसेच ही पुनर्नेमणूक श्री. लाला यांचे जागी अधिकारी उपलब्ध होईपर्यंत अथवा पुनर्नेमणूकीपासून सहा महिने यापैकी ज्याचा कालावधी अगोदर संपेल अशा मुदतीपर्यंत चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| Item No. | 59/12 | Resolution No. | 972 |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाचे कार्यावर अनुबोधपट काढणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या कार्यावर अनुबोधपट निर्माण करण्याच्या प्रश्नाचा तसेच इतर प्रसिद्धी माध्यमाचा अभ्यास करुन सूचना करण्यासाठी खालील सदस्यांची तज्ञ समिती नेमण्यास मान्यता देण्यात येते.
१) उपाध्यक्ष/प्राधिकरण
२) श्री. अतुल हुले, सदस्य
३) श्रीमती शालिनी राणे, सदस्या
४) संचालक, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन
५) सचिव, गृहनिर्माण विभाग
तज्ञ समितीतील या सदस्यांनी इतर तज्ञांना भेटून अनुबोधपटाच्या निर्मितीबाबत तसेच इतर प्रसिद्धीबाबत सूचना कराव्यात असे आदेश प्राधिकरणाने दिले.

| Item No. | 59/13 | Resolution No. | 973 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या जालना येथील सोयीसह भूखंड योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या जालना येथील सोयीसह भूखंड योजनेसाठी हुडकोकडून ६.३१ लक्ष रुपये, कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| Item No. | 59/14 | Resolution No. | 974 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या धुळे, रत्नागिरी, पुणे, अकोला, वर्धा, सांगली, औरंगाबाद आणि नागपूर या जिल्ह्यातील १९८४-८५ मधील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयटिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या धुळे, रत्नागिरी, पुणे, अकोला, वर्धा, सांगली, औरंगाबाद आणि नागपूर या जिल्ह्यातील १९८४-८५ मधील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण ७०.४६ रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 59/15 **Resolution No.** 975

विषय : कला व सांस्कृतिक वारसा जतन करणाऱ्या भारतीय राष्ट्रीय प्रतिष्ठानचे समासद होण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
कला व सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'भारतीय प्रतिष्ठान' या संस्थेचे समासदत्व प्राधिकरणाने स्वीकारण्यास व त्याकरिता समासदत्वाची फी व वार्षिक फीच्या स्वरूपात येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 59/16 **Resolution No.** 976

विषय : गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे मुख्य अभियंता यांना निविदा स्वीकृतीचे अधिकार प्रदान करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
बाबटिप्पणीस जोडलेल्या प्रपत्रात दर्शविलेल्याप्रमाणे मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना रु. ५० लाख पर्यंत निविदा मंजूर करणे व चालू दर पत्रकाप्रमाणे अंदाजित रकमेपेक्षा २५ टक्केपर्यंत निविदांच्या जादा रकमेस प्रपत्रातील अटीनुसार मंजूरी देण्याबाबत अधिकार मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 59/17 **Resolution No.** 977

विषय : श्री. एस. एस. कुरुंदवाड, भू-व्यवस्थापक यांचे पुनर्नेमणूकीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. कुरुंदवाड यांची जागतिक बँक प्रकल्प विभागामध्ये भू-व्यवस्थापक या रु. ६००-३०-७५०- द. रो. ४०-११५० या वेतनश्रेणीमधील पदावर प्रारंभी तीन महिन्यांच्या कालावधीसाठी नेहमीच्या अटी व शर्तीवर पुनर्नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येते. सदर नेमणूक एक महिन्याच्या नोटिसीने संपुष्टात आपल्यास तसेच शासनाच्या नियमाच्या आधिन राहून श्री. कुरुंदवाड यांना वेतन व अन्य भत्ते देण्यास मान्यता देण्यात येते.

**Item No.** 59/18 **Resolution No.** 978

विषय : गोवा राज्यात आयोजित करण्यात आलेल्या अभ्यास दौऱ्यासाठी आलेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गोवा राज्यात आयोजित करण्यात आलेल्या अभ्यास दौऱ्यासाठी झालेल्या खर्चास रुपये २२१०-०० (अक्षरी रुपये दोन हजार दोनशे दहा फक्त) मान्यता देण्यात येत आहे.

| Item No. | 59/19 | Resolution No. | 979 |
|---|---|---|---|

विषय : चारकोप-कांदिवली येथील पुन:प्रापण केलेल्या जमिनीवर आनुषंगिक सेवा (मल:निस्सारण व्यवस्था) उपलब्ध करून देण्यासंबंधीच्या कामासाठी आलेल्या निविदांचा विचार करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
चारकोप-कांदिवली येथील पुन:प्रापण केलेल्या जमिनीवर आनुषंगिक सेवा (मल:निस्सारण व्यवस्था) उपलब्ध करून देण्यासंबंधीच्या कामासाठी आलेल्या निविदांपैकी मे. गुप्ता आणि कंपनी यांची निविदा सर्वात कमी किंमतीची म्हणजे ३.३० टक्क्यांनी जास्त असल्याने स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| Item No. | 59/20 | Resolution No. | 980 |
|---|---|---|---|

विषय : चारकोप-कांदिवली येथील ३९ हेक्टर अतिरिक्त जमिनीचे पुन:प्रापण करणे, त्यासाठी आलेल्या गट क्र. ५/६/७ व ८ यासंबंधीचा निर्णय.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
गट क्र. ५, ६ व ८ यासाठी आलेल्या न्यूनतम निविदा वाजवीपेक्षा जास्त किंमतीच्या असल्याने त्या फेटाळण्यात येऊन त्याऐवजी बाबटिप्पणीच्या तालिका ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे चालू कंत्राटदारांकडून जादा काम करून घेण्यास प्राधिकरणाने मंजूरी दिली. (सोबत पत्र)
गट क्र. ७ साठी आलेली भारत कन्स्ट्रक्शन यांची निविदा जरी १३ टक्के जास्त किंमतीची असली तरी ती सर्व बाबींचा विचार करता पंजीकरण सार्वजनिक बांधकाम खात्याकडे वर्ग २ मध्ये असल्याने त्यांची कितीही रकमेची निविदा भरण्यास पात्रता आहे. त्यामुळे वरील श्री. भारत कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा १३ टक्के जास्त दराने म्हणजेच ७४,९१,१५०.८१ पैसे इतक्या रकमेत प्राधिकरण मंजूरी देत आहे.

| Item No. | 59/21 | Resolution No. | 981 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
भूखंड वाटपासाठी आलेल्या अर्जांची प्रथम सोडत काढून नंतर पात्रतेच्या अटी लावून अर्जदारांची पात्रता ठरविण्याच्या नवीन कार्यपद्धती चालू करण्यास त्याचप्रमाणे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येते.

| **Item No.** | **59/22** | **Resolution No.** | **982** |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचारी/अधिकारी वर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वसाहतीतील मोकळे भूखंड देण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळातील कर्मचाऱ्यांच्या सिद्धिविनायक गृहनिर्माण संस्थेला ओशिवरा येथील संस्थेने मागितलेला भूखंड वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे बाब टिप्पणीस जोडलेल्या प्रपत्रात नमूद केल्याप्रमाणे कर्मचारी गृहनिर्माण संस्थांच्या भूखंड वाटपाचे फेरबदलास मान्यता देण्यात येत आहे. (सोबत पत्रानुसार)
३ टेबल्स
कार्यवृत्तांत पुस्तिका क्रमांक ६, पान क्रमांक ३७७, ३७९ व ३८१.

| **Item No.** | **59/23** | **Resolution No.** | **983** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयटिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील १९८४-८५ मधील ६०० घरकुलांच्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून रक्कम ८.०९ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.
यानंतर उपस्थितांनी अध्यक्षांचे व अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानल्यावर बैठक समाप्त झाली.

**Meeting No.** 62 **Meeting Date** 31/May/1

**Item No.** 62/1 **Resolution No.**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २.५.१९८५ रोजी झालेल्या ६१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

ठराव :

---

**Item No.** 62/2 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर करण्यास आलेल्या कार्यवाहीचा अहवाल.

ठराव :

---

**Item No.** 62/3 **Resolution No.**

विषय : प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही न करण्यात आलेल्या निर्णयांची यादी.

ठराव :

---

**Item No.** 62/4 **Resolution No.**

विषय : हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीतून विशिष्ट पदावरील कर्मचाऱ्यांना सूट देणे.

ठराव :

---

**Item No.** 62/5 **Resolution No.** 1041

विषय : रोजंदारीवरील कामगारांना कार्यव्ययी आस्थापनेवर घेण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातील १० रोजंदारी सफाई कामगारांना कार्यव्ययी आस्थापनेवर नेमण्यास संमती दिली व त्याकरिता होणाऱ्या जादा खर्चास मंजूरी दिली.

---

**Item No.** 62/6 **Resolution No.** 1042

विषय : पैगंबरवासी सय्यद अहमद, कार्यकारी अभियंता/मुंबई मंडळ यांना मराठी भाषेच्या परिक्षेमधून सूट देणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पैगंबरवासी सय्यद अहमद यांना मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्याबाबतच्या बंधनातून अपवादात्मक बाब म्हणून सूट देण्यात यावी. व पर्यायाने त्यांना देय असलेली दिनांक १.७.१९८१ नंतरची वार्षिक वेतनवाढ मंजूर करुन त्यापोटी देय असलेली वेतनामधील फरकाची रक्कम त्यांच्या वारसाला देण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

---

| Item No. | 62/7 | Resolution No. | 1043 |
|---|---|---|---|

विषय : मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर तहसिलदार श्रेणीचे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाच्या इमारत दुरुस्ती व पुनर्रचना विभागाच्या आस्थापनेवर विमा योजनेच्या कामी "तहसिलदार" श्रेणीचे रूपये ६००-३०-७५०-पीबी-४०-११५० या वेतनश्रेणीचे एक पद निर्माण करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

| Item No. | 62/7 | Resolution No. | 1043 |
|---|---|---|---|

विषय : मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर तहसिलदार श्रेणीचे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मुंबई मंडळाच्या इमारत दुरुस्ती व पुनर्रचना विभागाच्या आस्थापनेवर विमा योजनेच्या कामी "तहसिलदार" श्रेणीचे रूपये ६००-३०-७५०-पीबी-४०-११५० या वेतनश्रेणीचे एक पद निर्माण करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

| Item No. | 62/8 | Resolution No. | 1044 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या परभणी व ठाणे या जिल्ह्यातील १९८४-८५ मधील गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयटिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या परभणी व ठाणे या जिल्ह्यातील १९८४-८५ मधील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण १४.८५ लक्ष रूपये कर्ज घेण्यास प्राधिकरणाने अनुमती व अधिकृती दिली.

| Item No. | 62/9 | Resolution No. | 1045 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या स्टेशन रोड, औरंगाबाद येथील उच्च उत्पन्न गट व दुकाने या गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
विषयटिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या स्टेशनरोड, औरंगाबाद येथील उच्च उत्पन्न गट व दुकाने या गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून ४८.८७ लक्ष रूपये कर्ज घेण्यास प्राधिकरणाने अनुमती व अधिकृती दिली.

| Item No. | 62/10 | Resolution No. | 1046 |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
सातारा जिल्ह्यातील १०८४-८५ मधील २७३ घरकुलांच्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून ३.६८६ लक्ष कर्ज घेण्यास प्राधिकरणाने अनुमती व अधिकृती दिली.

| Item No. | 62/11 | Resolution No. | 1047 |
|---|---|---|---|

विषय : पुणे महानगरपालिकेने हाती घेतलेल्या गलिच्छ वस्ती निर्मूलन योजनेसंबंधी प्रबंधात्मक अहवाल व चित्रपट तयार करण्याबद्दल (सुधारित प्रस्ताव)-सेंटर फॉर डेव्हलपमेंट स्टडीज अॅन्ड अॅक्टीव्हिटीज, पुणे, यांना सोपवावयाचे काम.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
पुणे महानगर पालिकेने हाती घेतलेल्या गलिच्छ वस्ती निर्मूलन योजनेसंबंधी प्रायोगिक अहवाल तसेच २० मिनिटांचा १५ एम.एम. चा रंगीत अनुबोधपट तयार करण्याकरिता खर्च, पॅकेज डील म्हणून सेंटर फॉर डेव्हलपमेंट स्टडीज अॅन्ड अॅक्टिव्हिटीज, पुणे, यांना द्यावयाचा रूपये ३ लाख हा खर्च वाजवी वाटत असल्याने प्राधिकरणाने या खर्चास मंजूरी दिली. या पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आले.

| Item No. | 62/12 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे घरबांधणीसाठी देण्यात आलेले भूखंड.

ठराव :

| Item No. | 62/13 | Resolution No. | 1048 |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांना घरबांधणीसाठी, एच.डी.एफ.सी. कर्जपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्थेकडून कर्ज मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने आपले कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, सभासदांना कर्ज पुरवठा होण्यासाठी लाईन ऑफ क्रेडीट स्कीम थ्रू योजना स्विकारण्यास संमती दिली व प्रस्तावित केल्याप्रमाणे याबाबतीत सर्व अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्याचे ठरले. मात्र उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी असे स्पष्ट केले की, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना या योजनेखाली कर्ज मिळविण्याच्या कामी प्राधान्य म्हणून रहाणार नाही व त्या कर्जाच्या वसूलीची जबाबदारी प्राधिकरण घेणार नाही असे ठरले.

**Item No. 62/13 Resolution No. 1048**

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या समासदांना घरबांधणीसाठी, एच.डी.एफ.सी. कर्जपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्थेकडून कर्ज मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने आपले कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, समासदांना कर्ज पुरवठा होण्यासाठी लाईन ऑफ क्रेडीट स्कीम थ्रू योजना स्विकारण्यास संमती दिली व प्रस्ताविल केल्याप्रमाणे याबाबतीत सर्व अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्याचे ठरले. मात्र उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी असे स्पष्ट केले की, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना या योजनेखाली कर्ज मिळविण्याच्या कामी प्राधान्य म्हणून रहाणार नाही व त्या कर्जाच्या वसूलीची जबाबदारी प्राधिकरण घेणार नाही असे ठरले.

**Item No. 62/14 Resolution No. 1049**

विषय : जागतिक बँक प्रकल्प विमागाकरिता श्री. श्री.ग. सहस्त्रभोजनी यांचे पुनर्नेमणूकीबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. सहस्त्रभोजनी यांची जागतिक बँक प्रकल्प विमागाकरिता जनसंपर्क अधिकारी म्हणून प्रस्तावित केल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने दोन वर्षांच्या कालावधिकरिता नेमणूक करावी व त्यांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व कंत्राटाच्या अटी ठरविण्यासाठी प्राधिकरणाने उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना अधिकार प्रदान केले.

**Item No. 62/15 Resolution No. 1050**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना - श्री. एस. नसीम सिद्दीकी व श्री. एस.नझीर सिद्दीकी यांना वितरित करण्यास आलेल्या भूखंड क्र. ५६ व ५७ लगतची अतिरिक्त जमिन वितरित करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
जुहू-विलेपार्ले विकास योजनेतील क्रमांक ५६ व ५७ लगतची अतिरिक्त जमिन क्षेत्र १४२ चौ. यार्ड ही श्री. एस.नसीम सिद्दीकी व श्री. एस. नझीर यांना भाडेपट्ट्याने दिनांक ६.२.२०६३ पर्यंत देण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. व त्याकरिता अधिमूल्य दर चौ. मि. ला रूपये १५००, शिवाय अधिमूल्याच्या एक टक्का वार्षिक भाडेपट्ट्याची आकारणी करून सदर अतिरिक्त भूखंड भूखंडधारकास देण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

**Item No. 62/16 Resolution No. 1051**

विषय : उपमुख्य अभियंता या दर्जाच्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विमागासाठी प्रतिनियुक्तीवर दोन अधिकारी जे प्राधिकरणाकडे येणार आहेत त्यांची केंद्रीय वेतन श्रेणीमध्ये वेतन अधिक प्रतिनियुक्ती वेतन याप्रमाणे प्राधिकरणाच्या पदाचे वेतनमान सुधारणेस प्राधिकरणाने मंजूरी दिली.

**Item No. 62/17 Resolution No. 1052**

विषय : जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यपातळीवर एकात्मिक गृहनिर्माण व नागरी विकासासाठी कार्यपद्धती व धोरण ठरवून त्या आधारे एक एकत्रित असा कार्यक्रम राबविण्याबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
या कामी प्रस्तावित केल्याप्रमाणे "ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई" यांनी अंदाज केल्याप्रमाणे १.५ ते २ लाख खर्चात व पुढील कार्यवाहीस प्राधिकरणाने मंजूरी दिली.

**Item No. 62/18 Resolution No. 1053**

विषय : कोलेकल्याण कालीना येथील भू-संपादन प्रकरणाबाबत पुनरावलोकन करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
मौजे कोलेकल्याण येथील गृहनिर्माण योजनेखाली संपादनाखाली आलेल्या जमिनीपैकी खालीलप्रमाणे दर्शविलेली जमीन ताब्यात घ्यावी किंवा वगळण्यात यावी.

| | |
|---|---|
| (१) विभाग - ए | वगळण्यात यावे |
| (२) विभाग - बी | वगळण्यात यावे |
| (३) विभाग - सी | उत्तरेकडील रिकामा भाग संपादित करावा व दक्षिणेकडील अतिक्रमीत भाग वगळण्यात यावा. |
| (४) विभाग - डी | यापैकी डी-१ व डी-२ हे पोटविभाग संपादित करण्यात यावे व उर्वरित जमीन वगळण्यात यावी. |
| (५) विभाग - ई | वगळण्यात यावे |
| (५) विभाग - एफ | वगळण्यात यावे |
| (७) विभाग - जी | वगळण्यात यावे |
| (८) विभाग - एच | वगळण्यात यावे |
| (९) विभाग - आय | वगळण्यात यावे |
| (१०) विभाग - जे | वगळण्यात यावे |
| (११) विभाग एक्स-१, एक्स-२, एक्स-३ | संपादित करावी |
| (१२) विभाग - वाय | संपादित करावी |
| (१३) विभाग - एल | मंजूर विकास आराखड्यातील आरक्षित जमीन वगळून उर्वरित जमीन संपादित करावी. |
| (१४) विभाग एम, एन, पी, क्यू, आर, एस, टी, यू | वगळण्यात यावी |
| (१५) पूर्व-पश्चिम रस्त्याच्या दक्षिणेकडील भाग | संपादित करावा |

वरील प्रस्तावावर विचार विनिमय करून प्राधिकरणाने वरील संपादन करण्याच्या/वगळण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली. विभाग ए, बी, ई, एफ, जी, एच, आय, जे, एम, एन, पी, क्यू, आर, एस, टी, यू हे विभाग वगळण्याचे ठरले. विभाग डी मधील डी-१, डी-२ हे विभाग संपादित करावे व उर्वरित डी विभाग वगळावा असे ठरले. तसेच विभाग एक्स-१, एक्स-२, एक्स-३ वाय, एल (आरक्षित जमीन वगळून) पूर्व पश्चिम रस्त्याच्या दक्षिणेकडील भाग संपादित करावा असे ठरले.
तसेच एअर मेट्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी व मे. डॅनी वुल्टेक्स कॉर्पोरेशन यांना शासनाच्या निर्देशानुसार जागा भुईभाड्याने द्यावयाची झाल्यास कोणती जमीन द्यावी व कोणत्या अटी शर्तीवर भाडेपट्ट्याने द्यावयाची हे ठरविण्याचा व विधी सल्लागार/प्राधिकरण यांचा अभिप्राय घेऊन अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना देण्यात आले.

| **Item No.** | **62/19** | **Resolution No.** | **1054** |
|---|---|---|---|

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील ६/६२, क्रमांकाचा गाळा काळजीवाहू तत्वावर देण्याकरिता आकारण्यात आलेली फी कमी करण्याबद्दल श्री. श.ना. माने यांची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. माने यांना २५.५.१९८३ च्या ठरावाचा फायदा देऊन त्या दिनांकापासून त्यांचेकडून एकदाच रु. २५०० फी आकाराची व तत्पूर्वीच्या काळासाठी दरमहा रु. १००० फी आकारावी. तसेच मुंबई मंडळात अशा तऱ्हेची आणखी काही प्रकरणे असतील तर ती सुध्दा याचप्रमाणे नियमित करण्यात यावी त्यास मान्यता दिली.

| **Item No.** | **62/19** | **Resolution No.** | **1054** |
|---|---|---|---|

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील ६/६२, क्रमांकाचा गाळा काळजीवाहू तत्वावर देण्याकरिता आकारण्यात आलेली फी कमी करण्याबद्दल श्री. श.ना. माने यांची विनंती.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. माने यांना २५.५.१९८३ च्या ठरावाचा फायदा देऊन त्या दिनांकापासून त्यांचेकडून एकदाच रु. २५०० फी आकाराची व तत्पूर्वीच्या काळासाठी दरमहा रु. १००० फी आकारावी. तसेच मुंबई मंडळात अशा तऱ्हेची आणखी काही प्रकरणे असतील तर ती सुध्दा याचप्रमाणे नियमित करण्यात यावी त्यास मान्यता दिली.

| **Item No.** | **62/20** | **Resolution No.** | |
|---|---|---|---|

विषय : जागतिक बँकेच्या सहाय्याने कार्यान्वित करण्यात येत असलेल्या निवारा प्रकल्पाच्या अंतर्गत विकसित भूखंडाचे वाटप करण्यासाठी महाराष्ट्रातील किमान १५ वर्षे वास्तव्याची अट घालणे.

ठराव :

| **Item No.** | **62/21** | **Resolution No.** | **1055** |
|---|---|---|---|

विषय : हुडको अर्थसहाय्यित ग्रामिण गृहनिर्माण योजनांतर्गत घरकुलांमध्ये धुररहित चूली बांधण्यासाठी हुडकोकडून अनुदान (ग्रॅन्ट) घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
हुडको अर्थसहाय्यित ग्रामिण गृहनिर्माण योजनांतर्गत घरकुलामध्ये धुररहित चुली बांधण्यासाठी हुडकोकडून अनुदान (ग्रॅन्ट) घेण्यास प्राधिकरण अनुमती व अधिकृती देत आहे.

| Item No. | 62/22 | Resolution No. | 1056 |
|---|---|---|---|

विषय : ठराव क्र. २५६ अन्वये मूळ धारकांना जाहिर केलेल्या सवलती व ठराव क्र. ९११ अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जमिनीच्या संबंधास प्राधिकरणाच्या जमिन वाटप नियमात व मिळकत व्यवस्थापन विनियमात बदल करणे.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्राधिकरणाने सदर दोन्ही प्रारुपांना मान्यता देवून ती प्रारुपे शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावी.

| Item No. | 62/23 | Resolution No. | 1057 |
|---|---|---|---|

विषय : पंतनगर, घाटकोपर येथे दादासाहेब गायकवाड कन्झुमर्स को. ऑ. सोसायटीला वितरित केलेल्या भूखंडासंबधी.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
श्री. दादासाहेब गायकवाड कन्झुमर्स को. ऑ. सोसायटीला त्यांनी ताब्यात घेतलेल्या ११६०.३६ चौ. वार (म्हणजे ११६०.३६ चौ. वार - ८५२.५५ चौ. वार बरोबर ३७०.८१ अधिक जमिन) सोसायटीला नगररचना विभागाच्या सल्ल्यानुसार अधिमूल्य घेऊन चालू बाजारभावाने वितरित करावी.
१) सदर भूखंड वितरित करताना ज्या भूखंडावर दुकानासाठी व सोसायटी सभासदाच्या स्वतःच्या घरासाठी परवानगी द्यावी.
२) प्राधिकरणाने स्विकारलेल्या नवीन जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार भाडेपट्टा आकारावा.
३) सोसायटीच्या निवासी उपयोगासाठी वर सुचविल्यानुसार मान्यता द्यावी.

| Item No. | 62/24 | Resolution No. | 1058 |
|---|---|---|---|

विषय : अल्प उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गट यांच्यासाठी बांधलेल्या मुंबईतील बैठ्या गाळ्यांची विक्री.

ठराव : एकमताने निर्णय घेतला की,
प्रस्तावित बैठ्या गाळ्यांची विक्री जमिनीच्या चटईक्षेत्र निर्देशकासह करण्यात यावी. याच तत्वावर मुंबई, पुणे शहरातील औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या बैठ्या इमारतीतील गाळ्यांची विक्री करावी असा प्राधिकरणाचा निर्णय शासनाचे विचाराधिन आहे. याबाबतीत शासन निर्णय घेईल तो लक्षात घेऊन बैठ्या गाळ्यांची विक्री करावी असा प्राधिकरणाने निर्णय घेतला. मात्र अल्प उत्पन्न गटाच्या योजना प्राधिकरणाने स्वतःचे साधनातून कार्यान्वित केल्या असल्याने त्यांची विक्री करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार प्राधिकरणाला आहे असे शासनास कळवावे असे ठरविण्यात आले.

| Item No. | 62/25 | Resolution No. | |
|---|---|---|---|

विषय : लोकमान्यनगर, दादर, हिंद मिल कंपाऊंड ही मालमत्ता भाडेकरूंच्या सोसायटीला पुनर्बांधणीसाठी मालकी हक्काने देणेबाबत.

ठराव :

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 14/Jun/1 |
|---|---|---|---|

| Item No. | Resolution No. | 1061 |
|---|---|---|

विषय : ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांना गोराई रोड, बोरिवली (पश्चिम) येथील वसाहतीत भूखंड मिळणेबाबत.

ठराव : गोराई रोड, बोरिवली येथील सुमारे ४८४० चौरस वार आकाराचा भूखंड ऑफ इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांना ३० वर्षांच्या मुदतीने प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमत विषयक धोरणास अधिन राहून वितरीत करावा. भूखंड वितरण करण्याच्या नेहमीच्या शर्ती व अटींचे पालन करण्यात यावे.

| Item No. | Resolution No. | 1060 |
|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या विश्रामगृहाचा, प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर संस्थांचे अधिकारी / कर्मचारी यांनी प्राधिकरणाचे कामानिमित्त वापर केल्यास आकारावयाचे दर ठरविणेबाबत.

ठराव : दिनांक ३०-१०-१९८४ रोजी मंजूर केलेल्या ठराव क्रमांक ९०४ मध्ये सुधारणा करून प्राधिकरणाच्या विश्रांतीगृहाचा प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर संस्थांचे तसेच राज्य किंवा केंद्र शासनाचे अधिकारी/कर्मचारी यांनी प्राधिकरणाच्या कामानिमित्त वापर केल्यास त्या कालावधीसाठी त्यांना प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्याप्रमाणे दर दिवशी रुपये ३/- याप्रमाणे आकार लावण्यात यावा. मात्र त्यासाठी त्यांनी प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मुख्य अभियंता, वित्त नियंत्रक, विधी सल्लागार, सचिव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यापैकी एखाद्या अधिकाऱ्याचे किंवा मंडळाचे मुख्य अधिकाऱ्यांचे प्राधिकरणाच्या कामानिमित्त विश्रांतीगृहाचा वापर करणार असल्याबद्दलचे पत्र दाखल करणे आवश्यक राहील.

| Item No. | Resolution No. | 1059 |
|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना पुनर्नेमणूक देण्याबाबत.

ठराव : श्री. बी. ए. शेट्टी सेवानिवृत्त वर्ग - २ चे अधिकारी यांची कंत्राट पद्धतीने पुनर्नेमणूक नेहमीच्या अटी व शर्तीनुसार करण्यास प्रशासक/प्राधिकरण मान्यता देत असून पुनर्नेमणूकीचा कालावधी उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेश उठेपर्यंत अथवा पुनर्नेमणूकीचे तारखेपासून सहा महिन्याचे मुदतीने, जी मुदत अगोदर संपेल तोपर्यंत राहील.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 27/Jun/1

**Item No.** **Resolution No.** 1062

विषय : श्री. एस. एस. कुरुंदवाड, भू-व्यवस्थापक यांच्या पुनर्नेमणूकीस मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : श्री. एस. एस. कुरुंदवाड, भू-व्यवस्थापक यांचा पुनर्नेमणूकीचा कालावधी दिनांक २०.६.१९८५ पासून आणखी तीन महिनेपर्यंत नेहमीच्या अटी व शर्तीवर वाढविण्यात येत आहे.

**Item No.** **Resolution No.** 1062

विषय : श्री. एस. एस. कुरुंदवाड, भू-व्यवस्थापक यांच्या पुनर्नेमणूकीस मुदतवाढ देण्याबाबत.

ठराव : श्री. एस. एस. कुरुंदवाड, भू-व्यवस्थापक यांचा पुनर्नेमणूकीचा कालावधी दिनांक २०.६.१९८५ पासून आणखी तीन महिनेपर्यंत नेहमीच्या अटी व शर्तीवर वाढविण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 06/Jul/19

**Item No.** **Resolution No.** 1063

विषय : इचलकरंजी (कोल्हापूर) येथील वसाहतीतील भाडेकरूंच्या सहकारी संस्थेला कार्यालयाच्या इमारतीसाठी भूखंड देण्याबाबत.

ठराव : वरील बाब टिप्पणीचा आशय लक्षात घेऊन प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, इचलकरंजी येथील अत्यल्प उत्पन्न गट (५० गाळे) इमारत क्रमांक १५ व १९च्या २०' रुंद रस्त्याला लागून असलेला सुमारे ७३२० चौ. फूट आकाराचा भूखंड येथील अत्यल्प उत्पन्न गट भाडेकरू सहकारी गृह मालकी संस्था लिमिटेड यांना भूखंड वाटपाच्या नेहमीच्या अटी व शर्तीना अधीन राहून फक्त त्यांच्या कार्यालयीन इमारतीसाठी देण्यात यावा.
कार्यालयीन इमारतीसाठी भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या सुधारित जमिनीच्या किंमतीनुसार आकारावे. भाडेपट्ट्याचा दर अधिमूल्याच्या वार्षिक १ टक्का आकारावा. भाडेपट्ट्याचा काळ ३० वर्षे ठेवण्यात यावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 08/Jul/19

**Item No.** **Resolution No.** 1064

विषय : पुनर्नेमणूक
प्राधिकरणाचे वर्ग-२ चे अधिकारी श्री. ए. आर. शिंदे

ठराव : प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त होणारे श्री. ए. आर. शिंदे, लेखाधिकारी (वर्ग-२) यांना दिनांक ३१-७-१९८५ मध्यान्हानंतर त्यांनी अर्ज केल्यास प्रारंभी सहा महिन्याच्या कालावधीसाठी अपवादात्मक बाब म्हणून नेहमीच्या अटी व शर्तीनुसार पुनर्नेमणूक देण्यास प्राधिकरण संमती देत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 09/Jul/19

**Item No.** **Resolution No.** 1065

विषय : हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीतून विशिष्ट पदावरील कर्मचाऱ्यांना सूट देणे.

ठराव : दिनांक ३१ मे १९८५ रोजी झालेल्या ६२ व्या बैठकीस वरील विषयाच्या वेळी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री. रांगणेकर यांना खास आमंत्रित केले होते. प्राधिकरणाशी चर्चा केल्यानंतर बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे दिनांक २१-६-१९८२ चे शासन निर्णयातील शासनाने घेतलेली भूमिका पाहता सर्वसाधारण ज्या पदांच्या बाबतीत 'शालांत परीक्षा उत्तीर्ण' असे शैक्षणिक अर्हतेचे बंधन असताना प्राधिकरणाने आपल्या अधिकारात शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करून काही पदांवर शालांत परीक्षा अनुत्तीर्ण कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. अशा पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात यावी या प्रस्तावाशी श्री. रांगणेकर सहमत झाले आणि प्राधिकरणाने सदर प्रस्ताव मान्य केला.

**Item No.** **Resolution No.** 1065

विषय : हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीतून विशिष्ट पदावरील कर्मचाऱ्यांना सूट देणे.

ठराव : दिनांक ३१ मे १९८५ रोजी झालेल्या ६२ व्या बैठकीस वरील विषयाच्या वेळी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री. रांगणेकर यांना खास आमंत्रित केले होते. प्राधिकरणाशी चर्चा केल्यानंतर बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे दिनांक २१-६-१९८२ चे शासन निर्णयातील शासनाने घेतलेली भूमिका पाहता सर्वसाधारण ज्या पदांच्या बाबतीत ''शालांत परीक्षा उत्तीर्ण'' असे शैक्षणिक अर्हतेचे बंधन असताना प्राधिकरणाने आपल्या अधिकारात शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करून काही पदांवर शालांत परीक्षा अनुत्तीर्ण कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. अशा पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात यावी या प्रस्तावाशी श्री. रांगणेकर सहमत झाले आणि प्राधिकरणाने सदर प्रस्ताव मान्य केला.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 15/Jul/19

**Item No.** **Resolution No.** 1066

विषय : पुनर्वसु एज्युकेशन सोसायटी या संस्थेला मंदगती मुलां/मुलींच्या शाळेसाठी गोरेगाव वसाहतीतील मोकळा भूखंड देण्याबाबत.

ठराव : वरील विषय सूचीचा विचार करून असा ठराव करण्यात आला आहे की, पुनर्वसु एज्युकेशन सोसायटीला उन्नतनगर विभाग - २ इमारत क्रमांक ५९ जवळील सुमारे १५४९.८७ चौ.मी. आकाराचा भूखंड मंदगती असणाऱ्या मुलां/मुलींच्या शाळा चालविण्याकरिता ३० वर्षांचे भाडे कराराने बाब टिप्पणीत सूचित केलेल्या शर्तींना अधिन राहून व जमिनीच्या किंमती विषयक धोरणानुसार प्राधिकरण मान्यता देत आहे.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **18/Jul/19** |
|---|---|---|---|
| **Item No.** | | **Resolution No.** | **1067** |

विषय : श्री. बी. सी. लाला यांना मुदतवाढ

ठराव : श्री. बी. सी. लाला, उपमुख्य अभियंता यांची पुनर्नेमणूकीची मुदत आणखी एक महिनापर्यंत नेहमीच्या अटी व शर्तीनुसार वाढविण्यात येत आहे.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **22/Jul/19** |
|---|---|---|---|
| **Item No.** | | **Resolution No.** | **1068** |

विषय : श्री. एम. आर. पाटील, माजी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचा प्रवासभत्ता क्षमापित करण्याच्या प्रश्नाचा विचार करणेबाबत.

ठराव : देयक सादर करण्यातील विलंब अपवादात्मक बाब म्हणून क्षमापित करून देयक मंजूर करण्यास मान्यता देण्यात येते.
तसेच दिनांक २२-९-१९८३ व २३-९-१९८३ रोजी केलेल्या विमान प्रवासाची प्रमाणके प्रवासभत्ता देयकाबरोबर सादर केलेली नाही हीसुद्धा एक अपवादात्मक बाब म्हणून क्षमापित करण्यात येते.

| **Item No.** | **7** | **Resolution No.** | **1069** |
|---|---|---|---|

विषय : प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या वरिष्ठ सहाय्यक दर्जाच्या कर्मचाऱ्यांना पुनर्नेमणूक देण्याबाबत.

ठराव : गेले वर्ष-दीडवर्ष सेवानिवृत्त झालेल्या वरिष्ठ सहाय्यक दर्जाच्या कर्मचाऱ्यांनी शारीरिक क्षमता व पात्रता लक्षात घेऊन खालील निवड उपसमितीने,
१) वित्त नियंत्रक/प्राधिकरण
२) सचिव/प्राधिकरण
३) उपमुख्य अधिकारी (प्रशासन)/मुंबई मंडळ
शिफारस केलेल्या उमेदवारांना वरीलप्रमाणे कंत्राटीपद्धतीने सुरुवातीस सहा महिन्यांसाठी नेमणूक देण्यास त्या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **25/Jul/19** |
|---|---|---|---|
| **Item No.** | | **Resolution No.** | **1070** |

विषय : कार्यकारी अभियंताचे ७-८-१९८० पासून अधिसंख्य पद निर्माण करणे.

ठराव : प्राधिकरणाच्या आस्थापनेवर प्राधिकरणाच्या क्रमांक एमएच/एपीटी १५८५/५००६२/दिनांक २४-७-१९८५ च्या आदेशानुसार कार्यकारी अभियंताचे एक अधिसंख्य पद दिनांक ७-८-१९८० पासून ते श्री. पोहुजा हे जागतिक बँक प्रकल्प विभागातील रिक्त पदावर रुजू होईपर्यंत निर्माण करण्यास प्रशासक/प्राधिकरण यांना मंजूरी दिली.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 30/Jul/1985

**Item No.** **Resolution No.** 1073

विषय : निवृत्त झालेले/राजीनामा दिलेले अभियंते यांना नोंदणी मंजूर करणेबाबत.

ठराव : उपरोक्त विषयाचे संदर्भात विचार करून ठराव क्रमांक : १०७३ निर्णय घेण्यात येतो की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्रमांक : सीएटी १०७९/१०५०/पार्ट ४/इ-२, दिनांक १० एप्रिल १९८४ व क्रमांक : सीएटी १०८४/(११)/इमारती २, दिनांक ३० जानेवारी १९८५ चे आदेश प्राधिकरणाच्या कार्यालयात लागू करण्यास या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** **Resolution No.** 1072

विषय : उपमुख्य अभियंता पदावर थेट भरतीद्वारे नेमणूक
श्री. भवानराव शिंदे

ठराव : निवड समितीने शिफारस केलेले श्री. भवानराव शिंदे सेवानिवृत्त मुख्य अभियंता, मध्यप्रदेश शासन यांची औरंगाबाद मंडळामध्ये मुख्य अधिकारी या पदावर शासनाची मंजूरी मिळण्याचे शर्तीवर नेमणूक केली जावी व त्यांचे वेतन वित्त नियंत्रकांच्या सल्ल्यानुसार, नियमांनुसार योग्य असे निश्चित केले जावे.

**Item No.** **Resolution No.** 1071

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या वर्तक नगर, ठाणे व चिलमशाहवली, अमरावती येथील नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण ३३.३८ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 31/Jul/1985

**Item No.** **Resolution No.** 1074

विषय : लोकमान्य नगर, दादर येथे 'स्त्री हितकारिणी' या संस्थेला दिलेला भूखंड ३० वर्षांच्या कराराने देण्याच्या विनंतीबाबत.

ठराव : बाब सूचीत नमूद केलेले मुद्दे प्रशासक यांनी लक्षात घेतले.
'स्त्री हितकारिणी' ही संस्था महिलांसाठी, मुलांसाठी तसेच प्रौढांसाठी सुद्धा वैद्यकीय शुश्रुषा, शैक्षणिक वर्ग, कुटुंब कल्याण, शिवणकामाचे वर्ग, मुलांसाठी बालवर्ग, व्यायाम शाळा इत्यादी समाजसेवेचे कार्य करते. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा आर्थिक फायदा करून हेतू नाही. मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने पूर्वी ठरविल्यानुसार जमिनीचे अधिमूल्य जमिनीची मूळ किंमत अधिक विकासावरील खर्च धरून आकारावी. भाडेपट्टा प्रचलित जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार आकारावा.
भाडेपट्ट्याची मुदत दोन वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या मुदतीच्या समाप्तीनंतर पुढील ३० वर्षांनी वाढवून द्यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 05/Aug/1985

**Item No.** **Resolution No.** 1075

विषय : मुंबई मंडळाच्या मिळकत व्यवस्थापन विभागाकरिता वरिष्ठ लिपिकांची पाच जादा पदे निर्माण करणे.

ठराव : मुंबई मंडळाच्या मिळकत व्यवस्थापन विभागाच्या आस्थापनेवर प्रत्येक एक याप्रमाणे वरिष्ठ लिपिकांची (रु. ३३५-६८०) पाच जादा पदे निर्माण करण्यात यावीत व सदर पदे अस्तित्वात असेपर्यंत प्रत्येकी एक याप्रमाणे कनिष्ठ लिपिकांची पाच पदे रिक्त ठेवण्यात यावीत. एक वर्षानंतर या व्यवस्थेचा आढावा घेऊन प्राधिकरणाकडे सादर करावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 07/Aug/1985

**Item No.** **Resolution No.** 1076

विषय : पंतनगर, घाटकोपर येथील ६७२ गाळे असलेल्या ९ इमारतींच्या सज्जाचे दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, मुंबई मंडळाला पंतनगर येथील ६७२ गाळे असलेल्या समुहातील ९ इमारतींच्या सज्जाचे दुरुस्तीसाठी रुपये ९ लाख खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. हा निधी प्राधिकरणाच्या निधीतून खर्च करावयाचा आहे व नंतर शासनाकडून परतफेड घ्यावयाची आहे. या निधी गुंतवणूकीवर १०.५ टक्के व्याज आकारले जाईल. ही खर्च झालेली रक्कम खर्च झालेल्या दिवसांपासून ५ वर्षांत सव्याज वसूल केली जाईर. ही वसूली इतर सर्व वसूलीवर प्राधान्यतः म्हणून समजण्यात येईल. तेव्हा हप्ते बांधणी करताना योग्य ती खबरदारी घेऊन ही रक्कम पूर्ण ५ वर्षांत सव्याज वसूल व्हावी अशी दक्षता घ्यावी, अशा सूचना मुंबई मंडळाला देण्यात याव्यात.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 09/Aug/1985

**Item No.** **Resolution No.** 1077

विषय : सुभाषनगर, तीन डोंगरी, गोरेगाव येथे
१) केशव गोरे ट्रस्ट
व
२) नवभूमी मित्र मंडळ या संस्थांना बालवाडी व इतर सांस्कृतिक कार्याकरिता जागा देणेबाबत.

ठराव : प्रशासक/प्राधिकरण यांनी बाब सूचीत नमूद केलेले मुद्दे लक्षात घेऊन असा निर्णय घेतला की, १) सुभाष नगर, तीन डोंगरी, गोरेगाव येथील सुमारे ६२३.५० चौ. मी. आकाराचा भूखंड 'केशव गोरे ट्रस्ट' या संस्थेला देण्यात यावा. २) प्राधिकरणाचा ठराव क्र. ९९२ नुसार केशव गोरे ट्रस्टला देण्यात आलेला २५० चौ. वार क्षेत्रफळाचा भूखंड वापर दोन्ही संस्थांनी प्राधान्याने त्या भागात राहणाऱ्या गलिच्छ वस्तीवासीयांच्या कल्याणासाठी करावा.
भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या जमिनीच्या प्रचलित किंमतीच्या धोरणानुसार आकारण्यात यावे. पूर्वीच्या इतर अटींचे पालन करण्यात यावे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **14/Aug/1985**

**Item No.** **Resolution No.** **1078**

विषय : अत्युत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रोत्साहनात्मक बक्षीस देणे.

ठराव : मुंबई मंडळामधील जुन्या-नव्या आवश्यक व महत्त्वाच्या दप्तराची वर्गवारी करून त्याची सुव्यवस्थित क्रमवारीने मांडणी करणे व अनावश्यक दप्तराची विल्हेवाट लावणे या प्रशासकीय सुधारणेच्या संदर्भात केलेल्या अत्युत्कृष्ट कामगिरीबद्दल व ते करण्याबाबत दाखविलेली निष्ठा याकरिता मुंबई मंडळातील श्री. रामाराम परशुराम शिर्के, दप्तरी (मिळकत व्यवस्थापन - ३) व श्री. जगन्नाथ आप्पाजी भोसले, दप्तरी (मिळकत व्यवस्थापन - ४) यांना प्रोत्साहनात्मक व उत्तेजनपर म्हणून प्रत्येकी शंभर रुपये रोख बक्षीस देण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 21/Aug/1985

**Item No.** **Resolution No.** 1081

विषय : श्री. व्ही. एस. मुंजे, उपमुख्य अधिकारी (जा. बँ. प्र.) यांच्या पुनर्नेमणूकीची मुदतवाढ वाढविण्याबाबत.

ठराव : जागतिक बँक प्रकल्पाच्या कामाची निकड लक्षात घेऊन, श्री. मुंजे, उपमुख्य अधिकारी/जा. बँ. प्र. यांना सध्याच्याच अटी व शर्तीवर १-१०-८५ पासून तीन महिनेपर्यंत कंत्राट पद्धतीने नेमणूक देण्यात येत आहे.

---

**Item No.** **Resolution No.** 1080

विषय : गृहनिर्माण भवनातील उपहारगृह चालविण्यासाठी ठेकेदार निश्चित करणे.

ठराव : निर्णय घेतला की,

गृहनिर्माण भवनातील उपहारगृह चालविण्याचा ठेका श्री. एस. के. शेट्टी यांना दिनांक १-९-१९८५ पासून प्रतिमास रु. १२,०००/- (रुपये बारा हजार फक्त) भाड्याच्या कराराने सलगपणे दोन वर्षांच्या कालावधीकरिता खालील अटींवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) उपहारगृहातील खाद्यपदार्थांचे दर प्राधिकरणाने १९८० साली प्रमाणित केलेल्या दरानुसार आकारण्यात यावेत व करारनाम्याच्या कालावधीत त्यात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येऊ नये.

२) उपहारगृहातील पदार्थांचे आकारमान, गुणवत्ता, पुरव□ा व सेवा प्राधिकरणास समाधानकारक न वाटल्यास, कोणत्याही भरपाईशिवाय तीन महिन्यांचे नोटीशीद्वारे ठेकेदाराबरोबर करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्यात येईल.

३) वरील अटी व्यतिरिक्त इतर अटी व शर्ती या पूर्वीच्याच राहतील.

तसेच,

*कर्मचारी वर्गाकडून उपहारगृहाबाबत येणाऱ्या तक्रारीचे निवारण करण्याकरिता वित्त नियंत्रक/प्राधिकरण, सचिव/प्राधिकरण तसेच कर्मचारी संघटनेचे वतीने एक प्रतिनिधी यांची दक्षता समिती नेमण्यास मान्यता देण्यात येते.*

---

**Item No.** **Resolution No.** 1079

विषय : भारतीय युनिट ट्रस्ट यांची ओशिवरा येथे भूखंड घेण्याची विनंती.

ठराव : महाराष्ट्र हाऊसिंग ॲंड एरिया डेव्हलपमेंट डिस्पोझल ऑफ लँड विनियम १९८२ परिच्छेद - ३(१) च्या अधिन राहून व प्राधिकरण ठरवील त्या किंमतीत व शर्तीनुसार भारतीय युनिट ट्रस्ट या केंद्र शासनाचे संस्थेला ओशिवरा येथील आठ भूखंडाचे वाटप करण्यास मान्यता दिली आहे. सदरहू भूखंडाचा वापर भारतीय युनिट ट्रस्टने त्यांचे कर्मचाऱ्यांच्या घर बांधणीसाठी करावयाचा असून लेआऊट वगैरे मुंबई महानगर पालिकेने पारित केल्यानंतर लेआऊट मधील भूखंडाचे प्रत्यक्ष वितरण नियमाप्रमाणे करण्यात येईल. परंतु भारतीय युनिट ट्रस्टने मागणी केलेलेच विशिष्ट भूखंड देण्याची विनंती मान्य करता येणार नाही. किंमतीत काहीही सूट देण्यात येऊ नये.

**Item No. 9 Resolution No. 1083**

विषय : मुंबई मंडळाच्या गोराई रोड, बोरिवली (पश्चिम) येथील वसाहतीतील ६० अनधिकृत स्टॉल नियमाधीन करणेबाबत.

ठराव :

१) ६० स्टॉलधारकांच्या भाडेपट्ट्याचा काळ दहा वर्षांचा व तोसुद्धा पूर्वी ४७ स्टॉलधारकांना देण्यात आलेल्या तारखेपासून धरण्यात यावा. म्हणजे सर्व १०७ स्टॉल्स धारकांचा भाडेपट्ट्याचा काळ एकाच वेळी संपुष्टात येईल.
२) जमिनीचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार आकारावे.
३) ज्येष्ठता क्रमानुसार निवड करावी व शिरगणती केल्याप्रमाणे अधिकृत व्यक्तीलाच वाटप करावे.
४) वितरीत करण्यात आलेला भूखंड कुटुंबातील एकाच व्यक्तीच्या नावे व त्याच व्यक्तींनी दुकान चालविले पाहिजे.
५) स्टॉल्स होल्डर्स हा तेथील अधिकृत भाडेकरूंच्या कुटुंबातील घटक असावा व तो इतरत्र कोठे नोकरी करीत नसावा.
६) नवीन जागी स्टॉल्स होल्डर्सने कोणता व्यवसाय करावा हे मुंबई मंडळाने महानगर पालिकेच्या नियमानुसार ठरवावे.
७) वसाहतीमधील रहिवाशांच्या व मुंबई मंडळाच्या हिताच्या दृष्टीने ज्या अटी योग्य वाटतील त्या अटींचा मुंबई मंडळाने अंतर्भाव करावा.

**Item No. 9 Resolution No. 1083**

विषय : मुंबई मंडळाच्या गोराई रोड, बोरिवली (पश्चिम) येथील वसाहतीतील ६० अनधिकृत स्टॉल नियमाधीन करणेबाबत.

ठराव :

१) ६० स्टॉलधारकांच्या भाडेपट्ट्याचा काळ दहा वर्षांचा व तोसुद्धा पूर्वी ४७ स्टॉलधारकांना देण्यात आलेल्या तारखेपासून धरण्यात यावा. म्हणजे सर्व १०७ स्टॉल्स धारकांचा भाडेपट्ट्याचा काळ एकाच वेळी संपुष्टात येईल.
२) जमिनीचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार आकारावे.
३) ज्येष्ठता क्रमानुसार निवड करावी व शिरगणती केल्याप्रमाणे अधिकृत व्यक्तीलाच वाटप करावे.
४) वितरीत करण्यात आलेला भूखंड कुटुंबातील एकाच व्यक्तीच्या नावे व त्याच व्यक्तींनी दुकान चालविले पाहिजे.
५) स्टॉल्स होल्डर्स हा तेथील अधिकृत भाडेकरूंच्या कुटुंबातील घटक असावा व तो इतरत्र कोठे नोकरी करीत नसावा.
६) नवीन जागी स्टॉल्स होल्डर्सने कोणता व्यवसाय करावा हे मुंबई मंडळाने महानगर पालिकेच्या नियमानुसार ठरवावे.
७) वसाहतीमधील रहिवाशांच्या व मुंबई मंडळाच्या हिताच्या दृष्टीने ज्या अटी योग्य वाटतील त्या अटींचा मुंबई मंडळाने अंतर्भाव करावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 23/Aug/1985

**Item No.** 10 **Resolution No.**

विषय : श्रीमती आनंदीबाई बळीराम मोहिते, मजदूर, मुंबई मंडळ यांना निःसमर्थता (विशेष) रजा मंजूर करण्याबाबत.

ठराव :

**Meeting No.** **Meeting Date** 24/Aug/1985

**Item No.** **Resolution No.** 1084

विषय :

ठराव : बाब टिप्पणीतील विशेष परिस्थितीची नोंद घेऊन, श्रीमती आनंदीबाई बळीराम मोहिते, मजदूर यांना दि. १६.७.८३ ते ५.१०.८३ पर्यंत ८२ दिवसांची निःसमर्थता (खास) रजा नियमावलीतील नियम क्र. ३ अ शिथिल करून खास बाब म्हणून मंजूर करण्यास प्राधिकरण परवानगी देत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 26/Aug/1985

**Item No.** 11 **Resolution No.** 1085

विषय : मुंबई मंडळाच्या मच्छिमार नगरामध्ये चक्कीसाठी जागा मिळण्याबाबतची श्रीमती वेणू बंडू पाटील यांची विनंती.

ठराव : माहीम मच्छिमार नगर येथील वसाहतीच्या नकाशात दाखविल्याप्रमाणे चार दुकानाच्या भूखंडापैकी १५' बाय १०' आकाराचा एक भूखंड श्रीमती वेणू बंडू पाटील यांना पिठाच्या गिरणीसाठी नेहमीच्या शर्ती व अटींवर देण्यात यावा व उरलेल्या तीन भूखंडाचे वाटप जाहिरातीद्वारे अर्ज मागवून नेहमीच्या पद्धतीप्रमाणे करावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 30/Aug/1985

**Item No.** 12 **Resolution No.** 1086

विषय : ६३/ई, फणसवाडी, मुलेश्वर, मुंबई येथील इमारतीच्या पुनर्रचनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्रशासक/प्राधिकरण यांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : सोबत जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या ६३/ई, फणसवाडी, मुलेश्वर, मुंबई येथील इमारतीच्या पुनर्रचनेसाठी हुडकोकडून रु. १७.१६ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते. मात्र शासनाची मान्यता मिळाल्यावरच काम हाती घेण्यात यावे.

. . . . . . . . . . . . .

तक्ता - अ

हुडकोने मंजूर केलेल्या योजनांचा तपशील

| अ. क्र. | योजनेचे नाव | अंदाजित किंमत रुपये | कर्जाची किंमत रुपये | हुडकोकडील कर्ज मंजूरीचे पत्र क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | हुडकोने अर्थसहाय्यित 'सी' वार्ड मधील ६३/ई, फणसवाडी, मुलेश्वर विभाग, मुंबई, महाराष्ट्र येथील इमारत क्र. 'बी' पुनर्रचना (योजना क्र. ३९२७-सी) | २५.६८ लक्ष | १७.१६ लक्ष | एमएच/म्हाडा/ मुलेश्वर डिव्हिजन/ ८५/९४०४ दिनांक १७.७.८५ |

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 02/Sep/1985

**Item No.** 1 **Resolution No.** 1087

विषय : महाराष्ट्र राज्य निवारा वित्तीय महामंडळ (नियोजित) डॉ. विनय डी. लाल, संचालक, सोसायटीज फॉर डेव्हलपमेंट स्टडीज, नवी दिल्ली, यांचे दिनांक १२-८-१९८५ चे पत्र.

ठराव : निर्णय घेतला की,
महाराष्ट्र राज्य निवारा वित्तीय महामंडळ स्थापनेपूर्वी लागणारा सर्वंकष सर्वेक्षण आधारभूत अहवाल तयार करण्यासाठी सोसायटी फॉर डेव्हलपमेंट स्टडीज या संस्थेला दिलेल्या कामापेक्षा वाढीव कामापोटी रुपये ४६,००० (रुपये सहेचाळीस हजार फक्त) वाढीव शुल्क रक्कम अदा करण्यात मान्यता दिली आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **05/Sep/1985**

**Item No.** 2 **Resolution No.** 1088

विषय : नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे (१) पेण, जिल्हा रायगड, (२) चांदिवली, पवई, (३) बजोरिया नगर, यवतमाळ व (४) देवळाली, नाशिक येथील नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण १९३.७६ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

तक्ता अ

हुडकोने मंजूर केलेल्या योजनांचा तपशील

| अ. क्र. | योजनेचे नाव | अंदाजित किंमत (लक्ष रु.) | कर्जाची रक्कम (लक्ष रु.) | हुडकोकडील कर्ज मंजूरीचे पत्र क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | हुडको अर्थसहाय्यित पेण, जिल्हा रायगड येथील संमिश्र विकसित भूखंड योजना (योजना क्र. ३९२४-सी)<br>१) अल्प उत्पन्न गट घटकांसाठी——३९६ भूखंड (प्रकार १)<br>२) मध्यम उत्पन्न गट (अ) गट———१५० भूखंड<br>३) मध्यम उत्पन्न गट (ब) गट————१० भूखंड | ५९.६९ | ४२.१४ | क्र. एमएच/म्हाडा/कम्पा रायगड/८५/८३४१ दिनांक ९.७.८५ |
| २) | हुडको अर्थसहाय्यित चांदिवली, पवई येथील संमिश्र विकसित भूखंड योजना (योजना क्र. ३९५९)<br>१) अल्प उत्पन्न गट घटकांसाठी——५७२ भूखंड (प्रकार १)<br>२) अल्प उत्पन्न गट (प्रकार २) ३०१ भूखंड | ८२.०८ | ५९.५२ | क्र. एमएच/म्हाडा/कम्पॉ. प्लॉटेड स्कीम/चांदिवली, पवई/८९७५ दिनांक १५-७-८५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३) मध्यम उत्पन्न गट<br>गट———९ भूखंड<br>४) उच्च उत्पन्न गट—४ भूखंड<br>(आंतरराष्ट्रीय बेघरांना<br>निवारा वर्ष १९८७ योजना) | | | |
| ३) | हुडको अर्थसहाय्यित<br>बजोरिया नगर, यवतमाळ<br>येथील संमिश्र गृहनिर्माण<br>योजना (योजना क्रमांक<br>४०५९-सी)<br>अल्प उत्पन्न गट घटकांसाठी<br>१) सोयीसह——९४ भूखंड<br>२) अल्प उत्पन्न गट<br>घटकांसाठी———८३ गाळे<br>३) मध्यम उत्पन्न गट - २<br>घटकांसाठी——१६० गाळे | ९३.३५ | ६३.२३ | क्र. एमएच/म्हाडा<br>/कम्पॉ. हाऊसिंग<br>स्कीम/बेजोरिया<br>नगर/यवतमाळ/<br>११९४९, दिनांक<br>१४.८.८५ |
| ४) | हुडको अर्थसहाय्यित<br>देवळाली, नाशिक<br>येथील उच्च उत्पन्न गट<br>गृहनिर्माण योजना (योजना<br>क्र. ४०७९-सी) ६० गाळे | ४५.७३ | २८.२७ | क्र. एमएच/म्हाडा/<br>एचओइ जी<br>हाऊसिंग स्कीम,<br>देवळाली/नाशिक/<br>१२३९९ दिनांक<br>१९.८.८५ |
| | एकूण | २८०.८५ | १९३.७६ | |

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 07/Sep/1985

**Item No.** 3 **Resolution No.** 1089

विषय : टागोर नगर, विक्रोळी येथील कार्यालयीन इमारत क्रमांक १ मधील जागा डॉ. पांडय यांचे नाव करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
टागोर नगर, विक्रोळी येथील कार्यालयीन इमारत क्र. १च्या भाडेपट्टा डॉ. एम. एस. पांडय यांच्या नावे इमारतीच्या किंमतीच्या दुप्पट दराने अधिमूल्य आकारुन करण्यात यावा. या इमारतीच्या भाड्यापोटी काही थकबाकी असल्यास ती भाडेपट्टा डॉ. पांडय यांच्या नावे करण्याअगोदर पूर्णपणे भरली गेली पाहिजे. अशाच प्रकारे कार्यालयीन निर्णय घ्यावा.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **09/Sep/1985** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **1092** |

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे कर्मचारी/अधिकारी यांना सेवानिवासस्थान वितरण करण्याकरिता ठरविलेल्या मार्गदर्शक तत्त्व क्रमांक १६ मध्ये सुधारणा.

ठराव : निर्णय घेतला की,
सेवानिवासस्थानांचे वाटप करण्यासाठी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात यावी.
१) मार्गदर्शक तत्त्वातील अनुक्रमांक १६ मध्ये सेवानिवासस्थानांचे वाटप प्राधान्याने करण्यासाठी जे प्रमाण निश्चित केलेले आहे ते १० टक्क्यावरून १५ टक्क्यापर्यंत वाढविण्यात यावे.
२) मार्गदर्शक तत्त्वातील अनुक्रमांक १६ नंतर खालील प्रमाणे १६(अ) जोडण्यात यावा.
३) १६(अ) प्राधिकरणाच्या विभिन्न योजनांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून तसेच अनुकंपेच्या कारणासाठी किंवा प्रतिनियुक्तीवर वगैरे इतर एखाद्या विशिष्ट कारणासाठी एखाद्या अधिकारी/कर्मचारी यांस प्राधान्य देऊन सेवानिवासस्थाने पुरविणे आवश्यक आहे असे प्राधिकरणाचे मत झाल्यास त्या अधिकारी/कर्मचाऱ्यास सर्व प्रथम प्राधान्य देऊन निवासस्थानाचे वाटप करण्याचा अधिकार उपाध्यक्ष किंवा प्रशासक/प्राधिकरण यांना राहील. अशा प्रत्येक प्रकरणी नेमक्या कोणत्या कारणासाठी प्राधान्य देण्यात येत आहे नमूद करण्यात यावे. याप्रमाणे जे सेवानिवासस्थान प्रथम उपलब्ध होईल ते असे अधिकारी/कर्मचारी यांस देण्याचे अधिकार उपाध्यक्ष किंवा प्रशासक/प्राधिकरण यास राहील. मात्र अशाप्रकारे वाटप करण्याच्या सेवानिवासस्थानाचे प्रमाण एकूण १५ टक्क्याच्या मर्यादित असेल. यात मार्गदर्शक तत्त्वातील अनुक्रमांक १६ मध्ये नमूद केलेले प्रमाण १० टक्के समाविष्ट असेल.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **10/Sep/1985**

**Item No.** 4 **Resolution No.** 1090

विषय : अनुकंपा कारणास्तव नेमणूका

ठराव : निर्णय घेतला की,

(अ) वर्ग - ३ अनुकंपा तत्त्वानुसार लिपिक संवर्गात निवड केलेले उमेदवार श्री. महाडीक यांची अस्थायी आस्थापनेवर लेहमीच्या अटी व शर्तीनुसार नेमणूका करण्यात यावी.

(ब) अनुकंपा तत्त्वानुसार वर्ग-४ करिता निवड सूचीवरील पहिल्या चौदा उमेदवारांच्या अस्थायी आस्थापनेवर प्रारंभी एक वर्षासाठी नेमणूका करण्यात याव्यात व एक वर्षानंतर आढावा घेऊन ही पदे चालू ठेवण्याबद्दल निर्णय घ्यावा.

सहपत्र 'अ'

अनुकंपा योजनेअंतर्गत नेमणूकांसाठी निवडसूची

| अ.क्र. | मृत/निवृत्त कर्मचाऱ्यांचे नाव, हुद्दा/मृत/निवृत्त दिनांक | वारसाचे नाव/कर्मचाऱ्यांशी नाते/ अर्ज सादर केल्याचा दिनांक |
|---|---|---|
| | **वर्ग - ३ पदाकरिता** | |
| १) | कै. श्री. लक्ष्मण सोमा महाडीक<br>पंप मजदूर/१३-१०-१९८४ | श्री. रमेश लक्ष्मण महाडीक<br>मुलगा/१५-११-८४ |
| | **वर्ग - ४ पदाकरिता** | |
| १) | श्री. पिंपळकर गणपत<br>सुतार/३-१०-१९८० (मुदतपूर्व) | श्री. जगन्नाथ गणपत पिंपळकर<br>मुलगा/२८-३-१९८३ |
| २) | कै. श्री. दिनंकर पुंजा रणशेवरे<br>मजदूर/४-४-१९८१ | श्रीमती किसाबाई दिनंकर रणशेवरे<br>पत्नी/३०-८-१९८३ |
| ३) | कै. श्री. जयसिंग के. कांबळे<br>मजदूर/४-१०-१९८१ | श्रीमती लिलाबाई जे. कांबळे<br>पत्नी/२७-१-१९८२ |
| ४) | कै. श्री. मधुकर बापू निकम<br>वायरमन/१८-११-१९८१ | श्रीमती अनुसूया म. निकम<br>पत्नी/४-१२-१९८१ |
| ५) | कै. श्री. मलय्या बकय्या<br>गवंडी/३०-३-१९८२ | श्रीमती सत्यमा मल्लया<br>पत्नी/२६-५-१९८५ |
| ६) | कै. श्री. सुखदेव मु. जगताप<br>मजदूर/२४-६-८२ | श्रीमती राणुबाई एस. जगताप<br>पत्नी |
| ७) | कै. श्री. महादेव डी. तोरणे<br>सफाई कामगार/९-७-१९८२ | श्रीमती छाया एम. तोरणे<br>पत्नी/१६-८-१९८२ |
| ८) | कै. श्री. बाबाजी बी. मोरे<br>नाईक/२०-७-१९८२ | श्री. चंद्रकांत बी. मोरे<br>मुलगा/३१-१२-१९८२ |

| | |
|---|---|
| ९) कै. श्री. सुधाकर एम. कळकुमे<br>अधिशासी अभियंता/१४-८-१९८२ | श्रीमती राजश्री एस. कळकुमे<br>पत्नी |
| १०) कै. श्री. गोवर्धन वि. मोहिते<br>सफाई कामगार/१७-११-१९८२ | श्रीमती द्रौपदी गो. मोहिते<br>पत्नी |
| ११) कै. श्री. बापू लक्ष्मण पवार<br>चौकीदार/१८-१२-१९८२ | श्री. गणपत बापू पवार<br>मुलगा |
| १२) कै. फ्रान्सिस जे. कुरेल<br>कारकून/८-१-१९८३ | श्रीमती कॅथरीन एफ. कुरेल<br>पत्नी/१५-२-१९८३ |
| १३) श्री. वामन एस. कांबळे<br>शिपाई/१९-१-१९८३(सेवानिवृत्त) | श्रीमती लक्ष्मीबाई वामन कांबळे<br>पत्नी/३१-३-१९८३ |
| १४) कै. श्री. दयाचंद बी. गागट<br>स्वीपर/२-२-१९८३ | श्री. रतेज दयाचंद गागट<br>मुलगा/एप्रिल १९८३ |

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 11/Sep/1985

**Item No.** 5 **Resolution No.** 1091

विषय : वांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स मधील सर्वे क्रं. ७ व ८ ("सी" ब्लॉक) मधील जमिन व्यापारी उपयोगासाठी भाडेपट्ट्याने वितरित करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने बृहन्मुंबईतील वांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स येथील ७ व ८ (सी ब्लॉक) मधील अंदाजे २१,००० चौ. मी. आकाराच्या जमिनीचा शासनाकडे विचारणा करून व्यापारी उपयोगासाठी भाडेपट्ट्याने देण्यासंबंधीची जाहिरात जुलै १९८५ मध्ये प्रमुख स्थानिक वृत्तपत्रात देऊन मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्या जाहिरातीला अनुलक्षून ज्या मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या, त्यापैकी श्री. शाह चित्तरंजन दामोदरदास यांची जास्तीत जास्त रक्कमेची म्हणजेच रू. २०,१२,१२,०००/- (रूपये वीस कोटी, बारा लाख, बारा हजार मात्र) रक्कमेची निविदा मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने उर्जासोबत दिलेल्या भूखंडाच्या माहिती पुस्तिके (ब्रोकर) मधील नमुद केलेल्या शर्ती व अटींना व इतर नेहमीच्या शर्ती व अटींना अधीन राहून स्विकारण्यात यावी. या भूखंडाच्या विक्री बाबत शासनाने दिनांक १०-८-१९८४ च्या पत्राने यापूर्वीच वर नमूद केल्या प्रमाणे प्राधिकरणाला अधिकार दिले आहेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 13/Sep/1985

**Item No.** 7 **Resolution No.** 1093

विषय : श्री. जी. डी. काटकर, सेवानिवृत्त उपसचिव यांचे पुनर्नेमणूकीबाबत.

ठराव : ठराव करण्यात येतो की, श्री. जी. डी. काटकर शासनाच्या विधी व न्याय विभागामध्ये सेवानिवृत्त, उपसचिव पुनर्नेमणूकीसाठी उपलब्ध झाल्यास व प्रशासक/प्राधिकरण यांचे पातळीवर छाननी करून अन्यथा पात्र असल्यास, प्राधिकरणामधील जागतिक बँक विभागाकरिता असलेल्या उपविधी सल्लागार या रिक्त पदावर त्यांची पुनर्नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येते.
श्री. काटकर यांची पुनर्नेमणूक होणाऱ्या दिनांकापासून उपविधी सल्लागार या पदाचे सध्या असलेले वेतनमान रु. ६८०-४०-१०००-५०-१५०० वाढवून रु. १७००-७५-२००० असे करण्यास व सदर पदाचे नामविधान ''सह विधी सल्लागार'' असे बदलण्यास मान्यता देण्यात येत आहे.
श्री. काटकर यांची पुनर्नेमणूक प्रारंभी नेमणूक झाल्यापासून एक वर्षाच्या कंत्राटी कालावधीकरिता महाराष्ट्र नागरी या नियमानुसार मिळू शकणाऱ्या वेतनावर करण्यात यावी. उपविधी सल्लगार या पदाचे वाढीव वेतनमान व बदललेले नामाभिधान श्री. काटकर त्या पदावर असेपर्यंतच राहील.

**Item No.** 8 **Resolution No.** 1094

विषय : श्री. म. वि. नाथवडकर, विधी सल्लागार यांना वाढीव वेतनश्रेणी देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेण्यात येतो की, प्राधिकरण आस्थापनेवरील विधी सल्लागार या पदाचे वेतनमान रु.१५००——१९२५ वरून दिनांक २-७-८१ च्या पूर्वलक्षी प्रभावाने रु. २२५०——२५०० असे सुधारण्यात यावे.
उपरोक्त सुधारित वेतनमानामुळे श्री. नाथवडकर यांची सुधारित वेतनश्रेणीमध्ये नियमांनुसार फेरवेतन निश्चिती केली जावी व त्या योगे मिळणारे लाभ त्यांना मंजूर करण्यात यावेत.
सदर सुधारित वेतनमान श्री. नाथवडकर सदर पद धारण करतील तोपर्यंतच राहील. व त्यानंतर सदर पदाचे वेतनमान आपोआपच रु. १५००——१९२५ असे होईल.

**Item No.** 9 **Resolution No.** 1095

विषय : गृहनिर्माण भवनाच्या आवारामधील बागेकरिता मुख्य माळीचे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेण्यात येतो की, मुंबई मंडळाचे आस्थापनेवर मुख्य माळी या दर्जाचे रुपये २०५-५-२५०-७-२८५-१०-३०५ विस्तार १०-३५५ या वेतनश्रेणीमध्ये एक पद निर्माण करण्यात यावे व त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून किंवा इतर शासकीय खात्याकडून प्रतिनियुक्तीवर योग्य अशी व्यक्ती मागवून त्याची नियुक्ती करून अशा व्यक्तीकडून बागेची शास्त्रशुध्द जोपासना करण्याबरोबर हाताखालील माळ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याचे कामही करवून घ्यावे.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **17/Sep/1985** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **10** | **Resolution No.** | **1096** |

विषय : पेट्रोल पंपाकरित वितरित करण्यात आलेल्या भूखंडांना आकारावयाच्या दराबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
बाब सूचीतील परिशिष्ट ८ मध्ये पेट्रोल कंपनीमार्फत, पेट्रोल पंपासाठी शिफारस केलेल्या खालील वसाहतीतील भूखंडाच्या अधिमुल्याच्या दरांना मान्यता दिली. नेहमीच्या शर्ती व अटीनुसार हे भूखंड केंद्र शासन पुरस्कृत पेट्रोल संस्थांना देण्यात यावेत.

१) जुहू-विलेपार्ले विकास योजना रू.१००० प्रति.चौ.मि.
२) ओशिवरा रू. ६५० प्रति चौ.मि.
३) कांदिवली रू. ७५० प्रति चौ. मि.
४) दहिसर रू. ५०० प्रति चौ. मि.

तसेच प्राधिकरणाच्या वसाहतीमधील आराखड्यात पेट्रोल पंपाच्या जागेसाठी आरक्षण न केल्याने वसाहतीतील रहिवाश्यांच्या दररोजच्या सुविधामध्ये जर काही बाधा होत नसेल तर वसाहतीच्या नकाशात यापुढे शक्यतो पेट्रोल पंपासाठी जागेचे आरक्षण ठेऊ नये.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **27/Sep/1985** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **1097** |

विषय : मुंबई मंडळाच्या आस्थापनेवरील टेलिफोन ऑपरेटरच्या पदाचे वेतनमान सुधारण्याबाबत.

ठराव : मुंबई मंडळाच्या आस्थापनेवरील टेलिफोन ऑपरेटरच्या दोन पदाचे वेतनमान दिनांक ५-१२-७७ पासून रूपये ३३५-१५-५००-२०-५८० विस्तार २०-६८० असे सुधारण्यात यावे. सदर सुधारित वेतनमान टेलिफोन ऑपरेटर या पदावर दिनांक ५-१२-७७ या दिवशी सेवेत असलेल्या दोन कर्मचाऱ्यांपुरते वैयक्तिक वेतनमान राहील. व असा कर्मचारी कोणत्याही कारणास्तव सदर पदावरून कार्यमुक्त होईल त्या दिवसापासून त्या पदाचे वेतनमान रूपये २९०-५४० असे पूर्ववत राहील.

| **Item No.** | **12** | **Resolution No.** | **1098** |
|---|---|---|---|

विषय : शशासकीय वाहनांचा विनामूल्य उपयोग.

ठराव : निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या सेवेतील रू. २२५०-१२५/२-२५०० या वेतनश्रेणीतील अथवा त्याहून जास्त वेतनश्रेणी मधील अधिकारी अथवा विभाग प्रमुख यांनी त्यांचे निवासस्थान ते कार्यालय हा प्रवास "कर्तव्य प्रवास" म्हणून समजून प्राधिकरणाच्या वाहनाने विनामूल्य करण्यास मान्यता देण्यात येते. मात्र सदर प्रवासाची नोंद नित्याप्रमाणे वाहनाचे रोजवहीत घेण्यात यावी.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **30/Sep/1985**

**Item No.** **13** **Resolution No.** **1099**

विषय : कांदिवली येथील उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखालील आगाऊ अंशदान योजने अंतर्गत बांधावयाच्या ११२ गाळ्यांच्या निविदा मंजूर करणसंबंधी (जोत्यावरील बांधकाम).

ठराव : निर्णय घेतला की,
कांदिवली उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली आगाऊ अंशदान योजनेअंतर्गत बांधकामाच्या ११२ गाळ्याच्या कामाची रू. ७८,६९,३९५.७१ ची (रू. ७६,६२,५०८/-) या अंदाजित किंमतीच्या २.७० टक्के जास्त) मे. के. जे. कन्स्ट्रक्शन यांची निम्नतम निविदा स्विकारावी तसेच विक्री खरेदी किंवा उलाढाल कर यावरील संभाव्य कर यांचा भार ठेकेदारावर लादू नये. कारण ४६ च्या घटनेच्या दुरूस्तीप्रमाणे सध्या हा भार अस्तित्वात नाही, आणि म्हणूनच तो मुंबई मंडळाने सोसावा ही ठेकेदाराची अट मान्य केली.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 07/Oct/1985

**Item No.** 8 **Resolution No.** 1107

विषय : गाळ्यांची/भूखंडाची विक्री-किंमत निश्चित करण्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचनामध्ये फेरबदल करणे.

ठराव : गाळ्यांची/भूखंडाची विक्री-किंमत निश्चित करण्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचनामध्ये फेरबदल करणे.

१) जमिनीची किंमत

जमिनीची किंमत बाजारभावाने न धरता ती भूसंपादनाचा व भूमि खर्च, आस्थापना खर्च, गाळे हस्तांतर होईपर्यंत त्यावरील व्याज व देखभालीचा खर्च अशा प्रत्यक्ष झालेल्या/होणाऱ्या खर्चावर आधारीत जमिनीची किंमत धरावी. भूसंपादनाच्या नुकसानभरपाईबद्दल न्यायालयातील निकालाद्वारे अथवा इतर कोणत्याही कारणास्तव वाढ झाल्यास अशी वाढीव रक्कम देण्याचे बंधन गाळेधारकावर असावे व त्यासंबंधी वाटप करारपत्रात तसा उल्लेख असावा.

२) आस्थापना खर्च

अंतिम विक्रीची किंमत ठरवीत असताना आस्थापना व कार्यव्यापी आस्थापना असा एकूण सरसकट १२ टक्के आस्थापना खर्च लावावा. तथापि, कार्यव्ययी आस्थापनेवरील खर्च ही भूखंडाच्या/गाळ्यांच्या किंमतीच्या २ टक्के रकमेला नसावा.

३) अकल्पित देणी (अन्फोरसीन लायेबिलिटी)

गाळ्यांची विक्री किंमत ठरविल्यानंतर व गाळे वाटपानंतर अकल्पित उद्‌भवणाऱ्या खर्चासाठी सध्या असलेली ५ टक्के तरतूद कमी करून ती २ टक्के करावी व या रकमेतून एक वेगळा निधी उभारावा व असा खर्च या निधीतून भागविण्यास यावा. पुढे जर ही तरतूद अपुरी वाटली तर, त्यात फेरबदल करण्यासंबंधी प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करावेत. या निधीच्या संबंधी तसेच विनियोगासंबंधी वेगळे आदेश वित्त नियंत्रक/प्राधिकरण याजकडून पारित होतील.

४) नफ्याचे प्रमाण

अ) निरनिराळ्या उत्पन्न गटातील भूखंड/गाळे यासाठी असलेले नफ्याचे प्रमाण कमी करून ते खालीलप्रमाणे आकारण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| १) | अल्प उत्पन्न गट<br>(विकसित भूखंड व गाळे) | काही नाही |
| २) | मध्यम उत्पन्न गट<br>(विकसित भूखंड व गाळे)<br>(दोन्ही गटाकरिता सरसकट) | १० टक्के |
| ३) | उच्च उत्पन्न गट<br>(रू. १,२५,००० पर्यंत किंवा भविष्यात हुडको ठरवील त्या सुधारित कमाल किंमतीच्या मर्यादेपर्यंत) | १५ टक्के |
| ४) | उच्च उत्पन्न गटाच्या गाळ्यांची | २५ टक्के |

| | | | |
|---|---|---|---|
| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **09/Oct/1985** |
| **Item No.** | **1** | **Resolution No.** | **1100** |

विषय : ॲबझॅक फाऊंडेशन याना माध्यमिक, औद्योगिक व तांत्रिक शाळा तसेच महाविद्यालये यासाठी जमाते-ऐ-जाम्बुरिया, वांद्रे (पश्चिम) लगतची जागा देण्याबाबत.

ठराव : वांद्रे पुनःप्रापण क्षेत्रातील जमाते-ए-जम्बोरिया या वसाहतीला लागून असलेल्या अंदाजे ६००० चौ. मी. चा भूखंड ॲबझॅक फाऊंडेशन या संस्थेला बहुउद्देशीय हेतुकरिता म्हणजेच प्राथमिक, माध्यमिक शाळा, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, समाज मंदिर इत्यादि प्रयोजनासाठी ठराव क्र. ७८४ अन्वये देण्यात आलेला भूखंड परत देण्याचा फेरविचार केला. भूखंडाचा ताबा देण्यापूर्वी, पूर्वी घालून दिलेल्या खालील अटी फाऊंडेशनने पालन करणे आवश्यक आहेत.

१) प्रकल्पासाठी पहिल्या टप्प्यामध्ये आवश्यक असलेल्या निधीच्या ५० टक्के निधी जमा करून त्याबद्दल बँकेचे प्रमाणपत्र एक महिन्यात सादर करणे.

२) मुंबई महापालिका तसेच मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांचेकडून नियोजित प्रकल्पास मान्यता मिळविणे.

३) प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची प्रकल्प संकल्प पुरा करण्याबाबत खात्री करून देणे, या व प्राधिकरणाच्या नेहमीच्या इतर अटींची पूर्तता केल्यास ॲबझॅक फाऊंडेशनला वरील भूखंड वितरीत करण्यात यावा.

४) दरम्यान भूखंडाचे संरक्षण करण्यास फाऊंडेशनला परवानगी द्यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10/Oct/1985

**Item No.** 2 **Resolution No.** 1101

विषय : सोलापूर येथील विशेष नियोजन प्राधिकरण-१ (जुळे सोलापूर) अधिसूचित क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा योजना (बाह्यसेवा) कार्यान्वित करण्याबाबत.

ठराव : प्राधिकरणाच्या ठराव क्रमांक ९९९ द्वारे झालेल्या ठरावाचा पुनर्विचार करून खालील निर्णय घेण्यात आला.
१) सोलापूर येथील विशेष नियोजन प्राधिकरण-१ (जुळे सोलापूर) अधिकार क्षेत्रामधील पाणी पुरवठा योजनेचे (बाह्यसेवा) काम पुणे मंडळाने स्वतः कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येते.
२) योजनेच्या छाननी आकार म्हणून जी रक्कम महाराष्ट्र पाणीपुरवठा व मलनिस्सारण मंडळाला द्यावी लागेल त्यासंबंधी योग्य ती बाजू मांडून आवश्यक तेवढी आकारणी देण्यात मान्यता देण्यात येते.

**Item No.** 3 **Resolution No.** 1102

विषय : मुंबई मंडळाने आस्थापनेवरील चक्रमुद्रण मंत्रचालक पदाची वेतनश्रेणी वाढविण्याबाबत.

ठराव : मुंबई मंडळाचे आस्थापनेवरील चक्रमुद्रण यंत्रचालकांच्या पाच पदांपैकी तीन पदांचे वेतनवाढ जे रू. २००-२८० वरून रूपये २०५-३५५ असे दिनांक २०-८-१९८२ पासून सुधारण्यात आले. परंतु त्यासाठी एका पदाचे वेतनमान दिनांक १-७-१९८३ पासून रू. २००-२८० असे करण्यात आले. त्या पदाचे वेतनमान पुन्हा रू. २०५-३५५ असे दिनांक १-७-१९८३ पासून पुढे चालू ठेवण्यास या ठरावाव्दये मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 1103

विषय : मुंबई मंडळामधील नियंत्रणकक्षामध्ये नियुक्त केलेल्या श्री. एस. ए. डांगे कनिष्ठ अभियंता यांना अतिरिक्त वेतन मंजूर करण्याबाबत.

ठराव : सन १९८४ च्या पावसाळ्यामध्ये नियंत्रण कक्षामध्ये दिनांक १५ जून १९८४ ते ३० सप्टेंबर १९८४ या कालावधीमध्ये स्वतःचे नेहमीचे काम सांभाळून कार्यालयीन वेळेनंतर केलेल्या जादा कामाकरिता श्री. एस. ए. डांगे, कनिष्ठ अभियंता यांना कार्यालयीन कामाचे दिवसांकरिता रोजी १० तासाचा व सुट्टीचे दिवसांकरिता रोजी १७ तासांचा अतिकालिक भत्ता मान्य दरानुसार नियमांनुसार दिला जावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 11/Oct/1985

**Item No.** 5 **Resolution No.** 1104

विषय : श्री. के. स्वामीनाथन, उपमुख्य अधिकारी (जा. बँ.) यांची कंत्राटी नेमणूकीची मुदत वाढविण्याबाबत.

ठराव : जागतिक बँकेतील कामाची निकड लक्षांत घेऊन श्री. स्वामीनाथन् यांना सध्याच्याच अटी व शर्तीवर दिनांक ७-९-१९८६ पर्यंत कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यांत येत आहे. जागतिक बँकेची कामाची आस्थापना तात्पुरती असल्याने, यामुळे कर्मचाऱ्यांच्या कायमच्या पदावर हक्कावर अनिष्ट परिणाम होणार नाही.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 15/Oct/1985 |
|---|---|---|---|
| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **1105** |

विषय : टिळकनगर, चेंबूर येथील मोकळा भूखंड शाळेसाठी देण्याची महाराष्ट्र ऐक्यवर्धक मंडळ यांची विनंती.

ठराव : टिळकनगर, चेंबूर येथील वसाहतीच्या नकाशांत माध्यमिक शाळेसाठी आरक्षित केलेला सुमारे ६००.५० चौ. मी. आकाराचा भूखंड व त्या भूखंडावर असलेली कार्यालयीन इमारतीच्या विक्रीच्या किंमतीसह व जमिनीच्या प्रचलित अधिमुल्यानुसार माध्यमिक शाळेकरिता "महाराष्ट्र ऐक्यवर्धक मंडळ" यांना नेहमीच्या प्रधिकरणाच्या शर्ती व अटी यांना अधिन राहून तसेच खालील अटीवर वितरीत करण्यांत यावा.

१. महाराष्ट्र ऐक्यवर्धक मंडळाने सदरहू भूखंडावर बांधलेल्या अनधिकृत शेडचे नियमन त्यांनी बांधलेल्या दिवसापासून करण्यांत यावे. (९५० चौ. फू.)

२. माध्यमिक शाळेच्या भूखंडाला लागूनच असलेल्या व विकास आराखड्यांत खेळाचे मैदान म्हणून राखून ठेवलेल्या सुमारे ७८१.५० चौ. मी. जमिनीचे हस्तांतरण मंडळास करू नये. सदरची बाबीचा विचार अर्जदार मंडळाने महानगरपालिकेकडून "ना हरकत" पत्र दाखल केल्यावर करण्यांत यावा.

३. खेळाचे मैदान म्हणून विकास आराखड्यांत आरक्षित असलेला भूखंड अर्जदार मंडळास देण्यासंबंधी महाराष्ट्र ऐक्यवर्धक मंडळाने महापालिकेचे "ना हरकत" पत्र आणावे.

४. अर्जदार मंडळ हे विकास आराखड्यांत खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडासंबधी महापालिकेचे "ना हरकत पत्र" घेऊन त्यानंतर प्रधिकरणाचा निर्णय होईपर्यंत ह्या भूखंडावर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगणार नाही असे मंडळाने बंधनपत्र द्यावे.

५. खेळाच्या मैदानाच्या भूखंडासंबंधी प्रधिकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत अर्जदार मंडळ हे ह्या भूखंडावर कोणत्याही प्रकारचे वाढीव बांधकाम करणार नाही असे मंडळाने बंधनपत्र द्यावे. वरील अटी व माध्यमिक शाळेसाठी भूखंड देण्याबाबतच्या इतर सर्व अटी महाराष्ट्र ऐक्यवर्धक मंडळ यांना बंधनकारक रहातील.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 16/Oct/1985

**Item No.** 7 **Resolution No.** 1106

विषय : वसाहतीत बैठ्या किंवा बहुमजली इमारतींची (ऑफीस बिल्डिंग) विक्री.

ठराव : असा निर्णय घेतला की, दि. ३१. ३. ८४ ठराव क्र. ७९३ मध्ये अंशतः सुधारणा करून कार्यालयीन इमारतींची विक्री प्रति चौरस फुटास रू. ३०/- याप्रमाणे दर आकारून करण्यात यावी. उपरोक्त ठराव क्रमांक ७९३ मध्ये नमूद केलेल्या अटीमधील ७ व्या क्रमांकाची अट याप्रमाणे सुधारण्यात यावी. त्या ठरावातील इतर अटींमध्ये कोणताही बदल करण्यात येऊ नये.

**Item No.** 9 **Resolution No.** 1108

विषय : श्री. एस. उचिल, दक्षता अधिकारी यांना दिनांक १-११-१९८५ पासून एक वर्षासाठी कंत्राटी नेमणूक देण्याबाबत.

ठराव : श्री. एस. उचिल यांची १-११-१९८५ पासून सहा महिने "कंत्राटी नेमणूक" नियमानुसार चालू ठेवण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **25/Oct/1985**

**Item No.** **10** **Resolution No.** **1109**

विषय : मुंबई नागरी विकास प्रकल्प - १

चारकोप कांदिवली (प.) येथील पुनःप्रापित जमिनीवर विविध समुच्चयात विविध प्रकारच्या मूळ घरांची (कोअर हाऊसेस) व समुच्चयांतर्गत पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पाहोच मार्ग, इत्यादी सुविधांचे बांधकाम.

संबंधी बांधकामासंबंधीच्या निविदांचा स्वीकार

ठराव : वरील कामासाठी एकूण १२ विभागास निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यातील विभाग क्रमांक ५ ते १२ अशा ८ गटांच्या निविदा पुढे दर्शविलेल्या रीतीने स्वीकारण्याचा निर्णय प्रशासक/प्राधिकरण घेत आहोत.

अ) विभाग क्रमांक ५, ६ व ७ या विभागांसाठी मे. रश्मीन कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे निविदेसाठी जाहीर केलेल्या दरांचे वर तेरा टक्के अधिक (अधिक १३ टक्के) हे वर टेकार स्वीकारण्यात येत आहेत.

ब) विभाग क्रमांक ८, ९ व १० या तीन विभागांसाठी मे. मतीन ब्रदर्स यांचे निविदेसाठी जाहीर केलेल्या दरांचेवर तेरा टक्के अधिक (अधिक १३ टक्के) हे टेकार स्वीकारण्यात येत असून त्यांना हे तीनही सलग गट देण्यात येत असल्याने त्यांनी अशा परिस्थितीत प्रत्येक विभागामध्ये देऊ केलेली रु. १५,०००/- ची सूट पण त्यांचेकडून त्यांस देण्याच्या विभागाच्या पहिल्या बिलातून वसूल करण्यात यावी असे ठरविण्यात येत आहे.

क) विभाग क्रमांक : ११ व १२ च्या दोन विभागांसाठी मे. विरल बिल्डर्स यांचे निविदेसाठी जाहीर केलेल्या दराचेवर तेरा टक्के अधिक (अधिक १३ टक्के) हे टेकार स्वीकारण्यात येत आहेत.

ड) मूळ घरांचे बांधकाम विविध उत्पन्न गटातील लोकांच्या प्रत्यक्ष मागणीनुसार मर्यादीत ठेवावे.

**Item No.** **11** **Resolution No.** **1110**

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजनेखालील मध्यम उत्पन्न गटातील म-५ टाईप २० गाळ्यांचे बांधकामावर कंत्राटदारांना दिलेले जादा रक्कम लेख्यांतून निर्लेखित करणे.

ठराव : जुहू-विलेपार्ले विकास योजनेखालील मध्यम उत्पन्न गटातील म-५ टाईप २० गाळ्यांचे बांधकामावर मेसर्स जय कन्स्ट्रक्शन या कंपनीला दिलेली रुपये ६,३९०/- ची जादा रक्कम निर्लेखित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 28/Oct/1985

**Item No.** 12 **Resolution No.** 1111

विषय : दादाभाई नौरोजीनगर, अंधेरी या वसाहतीमधील समाज मंदिराचा भूखंड महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाला वितरण करण्याबाबत.

ठराव : दादाभाई नौरोजीनगर, अंधेरी या वसाहतीच्या आराखड्यांत समाज मंदिराकरिता राखून ठेवलेला सुमारे २५०० चौ. वार आकाराचा भूखंड महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाला कामगार कल्याण केंद्राला इमारतीच्या बांधकामाकरिता वार्षिक नाममात्र रु. १/- आकारून ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने प्राधिकरणाच्या नेहमीच्या अटीनुसार देण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 29/Oct/1985

**Item No.** 13 **Resolution No.** 1112

विषय : श्रीमती मालती ग. क्षिरसागर यांचा सुभाषनगर, चेंबूर येथील अनधिकृत स्टॉल अधिकृत करण्याबाबत.

ठराव : सुभाषनगर, चेंबूर येथील वसाहतीमधील इ. क्र. ६ समोरील ५ फूट बाय ८ फूट आकाराच्या भूखंडावर अनधिकृत बांधलेल्या दुकानाचे नियमन महापालिकेच्या 'ना हरकत' दाखल्याच्या शर्तीस अधिन राहून करण्यात यावे. सदरचा ना हरकत दाखला महापालिकेकडून मिळविण्याची जबाबदारी श्रीमती क्षीरसागर यांचेवर राहील. तसेच ह्या भूखंडावर त्यांना कोणत्याही प्रकारचे पक्के बांधकाम करता येणार नाही. तसेच सध्या असलेल्या स्टॉल खालील क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र त्यांना व्यापता येणार नाही. भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्टा प्राधिकरणाच्या प्रचलित किंमतीविषयक धोरणानुसार सदरहू अनधिकृत दुकान ज्या दिवसापासून अस्तित्वात आले असेल त्या दिवसापासून आकारण्यात यावा. भाडेपट्ट्याच्या काळाची मर्यादा दहा वर्षांची घालण्यात यावी. प्राधिकरणाच्या भूखंडात वितरीत करण्याच्या शर्ती व अटी यांचे पालन करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 30/Oct/1985

**Item No.** 14 **Resolution No.** 1113

विषय : औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने औरंगाबाद येथे प्रिंट्रॅव्हल हॉटेल जवळ बांधलेल्या दोन इमारतींमधील कार्यालयीन जागेचे वाटप.

ठराव : निर्णय घेतला की,
औरंगाबाद येथे प्रिंट्रॅव्हल हॉटेलजवळ बांधलेल्या इमारत क्रमांक २ मधील पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयीन जागेचे वाटप अन्न व औषध प्रशासन (औरंगाबाद विभाग) यांना भाडे पद्धतीने करण्यात यावे. या जागेचे वाटप ज्या अटी व शर्ती नगर नियोजन विभागात लावण्यात आल्या आहेत त्या अटी व शर्तींवर जागेचे वाटप अन्न व औषध प्रशासनास करण्यात यावे. मात्र या जागेची कायमरित्या भाडे खरेदी पद्धती किंवा एकरकमी खरेदीने देण्याचे प्रयत्न चालू ठेवावेत.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 31/Oct/1985 |
|---|---|---|---|
| Item No. | 15 | Resolution No. | 1114 |

विषय : विद्यार्थी विकास मंडळाचे श्रमिक विद्यालय यांना मजासवाडी (जोगेश्वरी) येथे शाळेसाठी भूखंड देण्याबाबत.

ठराव : विद्यार्थी विकास मंडळ, मेघवाडी जोगेश्वरी या शैक्षणिक संस्थेला प्राथमिक व माध्यमिक शाळेसाठी, मसाजवाडी (मेघवाडी) जोगेश्वरी येथील वसाहतीमधील दुकानासाठी राखून ठेवण्यात आलेला सुमारे ५५० चौ. मीटर आकाराचा भूखंड प्राधिकरणाच्या नेहमीच्या शर्ती व अटी यांना अधिन राहून व खालील अटींवर वितरीत करावा.

१. विद्यार्थी विकास मंडळाने जमिनीचे अधिमूल्य व इतर सर्व अटींचे पालन दोन महिन्यांच्या अवधीत करावे.

२. शासनाच्या व महापालिकेच्या शिक्षण विभागाची शाळा चालविण्यासंबंधी योग्य ती परवानगी घ्यावी व तद्नंतरच भूखंडाचा ताबा द्यावा.

३. बांधकामाच्या खर्चाच्या ५० टक्के निधी त्वरीत उभारावा व त्यासंबंधी मुंबई मंडळाच्या अधिकाऱ्यांची खात्री करून घ्यावी.

४. इमारतीच्या बांधकामाचे नकाशे मुंबई मंडळ व महापालिका यांचेकडून मान्य करून मान्य करून घ्यावेत.

५. मराठी हे शिक्षणाचे माध्यम असावे.

६. ज्या उद्देशासाठी भूखंड देण्यात आला आहे त्या उद्देशांचे पालक होत आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी मुंबई मंडळांचे दोन प्रतिनिधी कार्यकारी मंडळावर घ्यावेत.

७. वसाहतीतील रहिवाश्यांच्या मुलांना शाळा प्रवेशांत प्राधान्य द्यावे.

८. देण्यात येणाऱ्या भूखंडावर शाळेची इमारत बांधून होताच मंडळाने सध्याचे अतिक्रमण त्वरीत हटवून अखंड रिकामा करून घ्यावा.

0

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 05/Nov/1985

**Item No.** 1 **Resolution No.** 1115

विषय : कोल्हापूर येथे गाळ्यांसाठी मागणी नोंदविण्याकरिता अर्ज केलेल्यांना अनामत रक्कमेत वाढ देणे.

ठराव : निर्णय घेतला की,
कोल्हापूर येथे मागणी नोंदविण्याकरिता मे १९८२ मध्ये ज्यांनी अर्ज केले होते त्यांना त्यांची अनामत रक्कम परत घेण्याची इच्छा असल्यास ती ६ टक्के दराने व्याजासह परत करावी.

---

**Item No.** 2 **Resolution No.** 1116

विषय : येरवडा, पुणे येथे बांधण्यात आलेल्या 'फ' प्रकारच्या इमारतीपैकी ३ इमारती (१२ गाळे) सेवानिवासस्थाने पुरविण्याकरिता राखून ठेवणे.

ठराव : निर्णय घेतला की,
येरवडा, पुणे येथे बांधण्यात आलेल्या 'फ' प्रकारच्या अल्प उत्पन्न गटाच्या शिल्लक गाळ्यांपैकी १२ गाळ्यांच्या तीन संपूर्ण इमारती कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने पुरविण्याकरिता वेगळ्या काढून ठेवाव्यात यात आगरकर नगर व हडपसर येथे बांधकाम करण्याच्या दृष्टीने ज्या दहा कर्मचाऱ्यांना हलविणे आवश्यक आहे त्यांना सेवानिवासस्थाने नेहमीच्या अटी व शर्तीवर पुरविण्यांत यावीत.

---

**Item No.** 3 **Resolution No.** 1117

विषय : वर्धा येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांत बांधलेल्या २४ गाळ्यांच्या वाटपाची नट शिथिल करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
वर्धा येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेल्या २४ गाळ्यांचे वाटप करण्याकरिता उत्पन्न मर्यादा रु. १०००/- एवढी ठरवावी. मात्र रु. ६००/- पर्यंत उत्पन्न असलेल्या अर्जदारांना प्राधान्य द्यावे व गाळे शिल्लक राहिल्यास रु. ६०१/- ते १०००/- या श्रेणीतील अर्जदारांना द्यावेत.

---

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **07/Nov/1985** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **4** | **Resolution No.** | **1118** |

विषय : आदर्शनगर, वरळी या वसाहतीमधील करमणूक उद्यानासाठी राखून ठेवलेला भूखंड एम. आय. जी. आदर्श नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांना हस्तांतर करण्याबाबत.

ठराव : मुंबई मंडळाने ठराव क्रमांक ९२/१२४८ अन्वये एम. आय. जी. आदर्शनगर सहकारी गृहनिर्माण संस्था यांना उद्यान/करमणूक यासाठी विकास आराखड्यातील दाखवलेल्या सुमारे २६२२ चौ. वार क्षेत्रफळाच्या भूखंडाची जी किंमत व भाडेपट्टा आकारला आहे. तो ग्राह्य धरण्यात येत आहे. भाडेपट्ट्याचा काळ संस्थेला हस्तांतरीत करण्यात आलेल्या इमारतीच्या भाडेपट्ट्याच्या काळाशी निगडीत असावा. परंतु तो प्रथम ३० वर्षांपर्यंत मर्यादीत करून त्यानंतर भाडेपट्ट्याच्या दरांत नूतनीकरण करण्याचे हक्क प्राधिकरणाकडे अबाधीत रहातील.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **08/Nov/1985** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **5** | **Resolution No.** | **1119** |

विषय : विभागीय मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
प्राधिकरण व विभागीय मंडळाची पुनर्रचना होईपर्यंत
१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास कायदा १९७६ चा भाग ८ मधील दुरुस्ती व पुनर्बांधणी संबंधीचे अधिकार, मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांना प्रदान करण्यात येत आहे. मात्र त्याकरिता मंडळाचे मुख्य अधिकारी, मुख्य अभियंता व मुख्य लेखाधिकारी यांची एक सल्लागार समिती स्थापन करण्यात यावी व या समितीने सदर बाबतच्या बाब टिप्पण्यांवर विचार विनिमय करून नंतरच निर्णय घ्यावा व त्या प्रशासक/प्राधिकरण यांचे अवलोकनाकरिता प्राधिकरणाचे कार्यालयास पाठविण्यात याव्यात.
२) गलिच्छ वस्ती सुधार योजनासंबंधी मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांना मंडळाने प्रदान केलेले अधिकारी वापरण्यास या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे. मात्र इतर विभागीय मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी या संदर्भात तपशीलवार बाब टिप्पण्या प्रशासक/प्राधिकरण यांचे आदेशार्थ सादर कराव्यात.
३) इतर वैधानिक निर्णयाकरिता विभागीय मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी सविस्तर बाब टिप्पण्या मुख्य अधिकाऱ्यांनी सविस्तर बाब टिप्पण्या तयार करून संदर्भाधीन कागदपत्रासह त्या प्रशासक/प्राधिकरण यांना सादर कराव्यात.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 11/Nov/1985

**Item No.** 6 **Resolution No.** 1120

विषय : बालविकास विद्यामंदिर, जोगेश्वरी, मेघवाडी येथे शाळेसाठी बांधलेल्या अनधिकृत इमारतीबाबत.

ठराव : प्राधिकरणाच्या मेघवाडी, जोगेश्वारी येथील वसाहतीमध्ये बालविकास विद्यामंदिराने व्यापलेल्या सुमारे २४७५ चौ. मी. भूखंडाचे नियमन खालील अटीनुसार करण्यात यावे. सुमारे २४७५ चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाचा अनधिकृत वापर केल्याबद्दल मंडळाकडून भूखंडाचा वापर करीत असलेल्या दिवसापासून भूईभाड्याच्या (ग्राऊंड रेंट) दुप्पटीने रक्कम वसूल करावी व त्यानंतरचे अधिमूल्य भाडेपट्टयाचा काळ नेहमीच्या अटींना अधिन राहून खालील अटींवर ठरविण्यात यावा.

१) बाल विकास विद्यामंदिराने जमिनीचे अधिमूल्य व इतर अटीचे पालण दोन महिन्यांच्या अवधीत पूर्ण करावे.

२) इमारतीच्या बांधकामाचे नकाशे मुंबई मंडळ व महापालिका यांचेकडून मान्य करून घेणे.

३) मराठी हे शिक्षणाचे माध्यम असावे.

४) ज्या उद्देशासाठी भूखंड देऊ केला आहे त्या उद्देशाचे पालन होत आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी मुंबई मंडळाचे दोन प्रतिनिधी कार्यकारी मंडळावर घ्यावेत.

५) वसाहतीतील रहिवाशांच्या मुलांना शाळा प्रवेशात प्राधान्य देण्यात यावे.

---

**Item No.** 7 **Resolution No.** 1121

विषय : तुषारबिंदू सहकारी गृहनिर्माण संस्था यांना वाटप केलेली जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे अल्प उत्पन्न गटाची इमारत क्रमांक ५ एकरकमी पद्धतीवरून भाडेखरेदी पद्धतीमध्ये परिवर्तीत करावे.

ठराव : निर्णय घेतला की,
जुहू विलेपार्ले विकास योजना येथील अल्प उत्पन्न गटाची इमारत क्रमांक ५ ही एकरकमी विक्री पद्धतीऐवजी भाडेखरेदी पद्धतीवर सुरुवातीपासून परिवर्तित करण्याची तुषारबिंदू को. ऑप. गृहनिर्माण संस्थेची विनंती मान्य करण्यात यावी. मात्र संस्थेने बाकी किंमत व इतर देय रकमा एकरकमी हा निर्णय कळविलेल्या तारखेपासून एक महिन्यात भरल्या पाहिजेत. याप्रमाणे संस्थेकडून सर्व गाळ्यांची किंमत व इतर देय रकमा वसूल करून इमारतीच्या मालकीचे हस्तांतरण सहकारी संस्थेकडे करण्यात यावे. मुदतील रक्कम न भरल्यास १२ १/२ टक्के व्याज आकारला जावा.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **21/Nov/1985**

**Item No.** **8** **Resolution No.** **1122**

विषय : *केदारनाथ विद्या प्रसारणी या शिक्षण संस्थेला नेहरूनगर, कुर्ला येथे शाळेसाठी भूखंड देण्याबाबत.*

ठराव : नेहरूनगर, कुर्ला येथील इमारत क्रमांक ३ व ४ मधील सुमारे ६१४.७७ चौ. मीटर आकाराचा एक भूखंड व इमारत क्रमांक ५ व ६ मधील सुमारे १२०० चौ. मी. आकाराचा एक भूखंड केदारनाथ विद्या प्रसारणी या संस्थेला शाळेची इमारत बांधण्यासाठी प्रथम तीन वर्षांच्या लायसन्स पद्धतीवर देण्यात यावेत. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर व संस्थेने त्यांच्या ताब्यात असलेले सर्व गाळे व दोन कार्यालयीन इमाती मधील जागा मुंबई मंडळाकडे परत केल्यानंतरच नेहमीची पद्धती अनुसरून भाडेपट्टा करारनामा करण्यात यावा. भाडेपट्ट्याचा काळ □लायसन्स□ काळाची वर्षे धरून ३० वर्षांचा असावा.

१) त्यांना देण्यात यावयाच्या एका भूखंडावर प्लॉट क्रमांक ४ वर जी कार्यालयीन इमारत आहे त्यामध्ये असलेल्या पिठाची गिरणी व मुंबई मंडळ परिरक्षा कार्यालय यांना संस्थेला देण्यात येणाऱ्या भूखंडाच्या जागेत समावून घ्यावे लागेल.

२) शिक्षणाचे माध्यम मराठी भाषेतूनसुद्धा चालू करणे व वसाहतीतील रहिवाशांच्या मुलांना प्रवेशात प्राधान्य देणे.

३) संस्थेला ज्या प्रयोजनासाठी देण्यात आला त्या प्रयोजनाचे संस्थेतर्फे पालन होते किंवा नाही याचीही दक्षता घेण्यासाठी मुंबई मंडळाचे दोन प्रतिनिधी संस्थेच्या कार्यकारी मंडळावर घेण्यात यावे.

वरील अटींचे व प्राधिकरणाच्या इतर अटींचे पालन करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 22/Nov/1985

| **Item No.** | 9 | **Resolution No.** | 1123 |
|---|---|---|---|

विषय : गलिच्छ वस्ती सुधार योजना

गोंदिया येथील गलिच्छ वस्ती सुधार कामाच्या एस्टिमेंटला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

ठराव : १९८५-८६ साली गोंदिया येथील गलिच्छ वस्ती सुधारणा योजनेकरिता उपलब्ध असलेली तरतूद खर्च होण्याच्या दृष्टीने गांधी वार्ड या वस्तीच्या गलिच्छ वस्ती सुधारणा योजनेच्या रु. २,२६,७०० रकमेच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | 10 | **Resolution No.** | 1124 |
|---|---|---|---|

विषय : श्री. चंद्रकांत पु. परब यांना चुनामट्टी, दहिसर येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेल्या गाळ्याकरिता केलेला अर्ज श्री. अर्जुन पु. परब यांच्या नावे करणे.

ठराव : चुनामट्टी-दहिसर येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता बांधलेल्या गाळ्यांसाठी श्री. चंद्रकांत पु. परब यांनी केलेला अर्ज त्यांचा भाऊ श्री. अर्जुन परब यांच्या नावे उत्पन्न मर्यादेची अट शिथिल करण्यास मान्यता दिली.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **30/Nov/1985**

**Item No.** **11** **Resolution No.** **1125**

विषय : नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या (१) गोधनी रोड, यवतमाळ व (२) मानेवाडा, नागपूर येथील नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण १०८.५६ लक्ष रु. कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

तक्ता - अ

हुडकोने मंजूर केलेल्या योजनांचा तपशील

| अ. क्र. | योजनेचे नाव | अंदाजित किंमत (रु.) | कर्जाची रक्कम (रु.) | हुडकोकडील कर्ज मंजूरीचे पत्र क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| (१) | हुडको अर्थसहाय्यित गोधनी रोड, यवतमाळ येथील संमिश्र गृहनिर्माण योजना व दुकाने (योजना क्रमांक ४१०२-सी)<br>१) मध्यम उत्पन्न गट - २ घटकासाठी——१५९ गाळे<br>२) -''- ३० गाळे<br>३) दुकाने १२ | ७८.३३ | ५२.८१ | महाराष्ट्र/म्हाडा/ कम्पो. हाऊसिंग स्कीम/गोधनी रोड/ यवतमाळ/१७४९३, दि. ८.१०.८५ |
| (२) | हुडको अर्थसहाय्यित मानेवाडा, नागपूर येथील संमिश्र गृहनिर्माण योजना (योजना क्र. ४११०-सी)<br>१) आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकासाठी सोयीसह भूखंड - ४६१ भूखंड<br>२) अल्प उत्पन्न गट घटकासाठी - २२४ गाळे | ६६.२० | ५५.७५ | एमएचए/म्हाडा/ एस ॲण्ड एस एण्ड एलआइजी/ मानेवाडा/नागपूर/ ८५/१७५३०, दि. ९.१०.८५ |
| | एकूण | १४४.५३ | १०८.५६ | |

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **02/Dec/1985**

**Item No.** **1** **Resolution No.** **1126**

विषय : नाचणे, रत्नागिरी येथील गाळ्यांचे वाटप करण्याचे बाबतीत अटी शिथिल करणे.

ठराव : निर्णय घेतला की, नाचणे, रत्नागिरी येथील उतरलेल्या गाळ्यांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे.

१) विविध गटांसाठी असलेली पात्रतेची उत्पन्न मर्यादा शिथिल करण्यात यावी. मात्र ज्या उत्पन्न गटातील अर्जदारास गाळा दिला असेल त्या उत्पन्न गटासाठी असलेल्या दराने व्याजाची आकारणी करून त्या गाळ्यांची किंमत आकारण्यात यावी.

२) विविध उत्पन्न गटांसाठी गाळ्यांच्या किंमतीचा प्रारंभिक हप्ता याप्रमाणे घ्यावा.

अ) नागरी अ-इ-१ रु. ३,०००/-
आ) नागरी अ-इ-२ रु. ४,५००/-
इ) नागरी ब-एल-२ रु. ७,५००/-
ई) नागरी ब-एल-२ रु. ९,०००/-
उ) मध्यम उत्पन्न गट रु. २५,०००/-

प्रारंभिक हप्त्याची बाकीची रक्कम १-२ वर्षांच्या कालावधीस हप्त्यांची किंवा संपूर्ण भाडेखरेदी कालावधीत मासिक समान हप्त्याबरोबर वसूल करावी. मात्र वसुलीतील विलंबाबद्दल व्याज आकारण्यात यावे.

३) वरील (१) प्रमाणे त्या त्या उत्पन्न गटासाठी असलेल्या दराने व्याज आकारल्याने जी जादा रक्कम येईल ती किंमतीच्या बाकी रकमेबरोबर भाडे खरेदी कालावधीत मासिक समान हप्त्याबरोबर घ्यावी.

४) एका अर्जदारास एकापेक्षा अधिक गाळे पाहिजे असल्यास द्यावेत मात्र व्यक्तिगत अर्जदारास तूर्त कमाल दोन गाळे द्यावेत व अर्जदार एखादी मान्यताप्राप्त संस्था असल्यास दोनापेक्षा अधिक गाळे द्यावेत.

**Item No.** **1** **Resolution No.** **1126**

विषय : नाचणे, रत्नागिरी येथील गाळ्यांचे वाटप करण्याचे बाबतीत अटी शिथिल करणे.

ठराव : निर्णय घेतला की, नाचणे, रत्नागिरी येथील उतरलेल्या गाळ्यांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे.

१) विविध गटांसाठी असलेली पात्रतेची उत्पन्न मर्यादा शिथिल करण्यात यावी. मात्र ज्या उत्पन्न गटातील अर्जदारास गाळा दिला असेल त्या उत्पन्न गटासाठी असलेल्या दराने व्याजाची आकारणी करून त्या गाळ्यांची किंमत आकारण्यात यावी.

२) विविध उत्पन्न गटांसाठी गाळ्यांच्या किंमतीचा प्रारंभिक हप्ता याप्रमाणे घ्यावा.

अ) नागरी अ-इ-१ रु. ३,०००/-
आ) नागरी अ-इ-२ रु. ४,५००/-
इ) नागरी ब-एल-२ रु. ७,५००/-
ई) नागरी ब-एल-२ रु. ९,०००/-
उ) मध्यम उत्पन्न गट रु. २५,०००/-

प्रारंभिक हप्त्याची बाकीची रक्कम १-२ वर्षांच्या कालावधीस हप्त्यांची किंवा संपूर्ण भाडेखरेदी कालावधीत मासिक समान हप्त्याबरोबर वसूल करावी. मात्र वसुलीतील विलंबाबदल व्याज आकारण्यात यावे.

३) वरील (१) प्रमाणे त्या त्या उत्पन्न गटासाठी असलेल्या दराने व्याज आकारल्याने जी जादा रक्कम येईल ती किंमतीच्या बाकी रकमेबरोबर भाडे खरेदी कालावधीत मासिक समान हप्त्याबरोबर घ्यावी.

४) एका अर्जदारास एकापेक्षा अधिक गाळे पाहिजे असल्यास द्यावेत मात्र व्यक्तिगत अर्जदारास तूर्त कमाल दोन गाळे द्यावेत व अर्जदार एखादी मान्यताप्राप्त संस्था असल्यास दोनापेक्षा अधिक गाळे द्यावेत.

| **Item No.** | **1** | **Resolution No.** | **1126** |
|---|---|---|---|

विषय : नाचणे, रत्नागिरी येथील गाळ्यांचे वाटप करण्याचे बाबतीत अटी शिथिल करणे.

ठराव : निर्णय घेतला की, नाचणे, रत्नागिरी येथील उतरलेल्या गाळ्यांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे.

१) विविध गटांसाठी असलेली पात्रतेची उत्पन्न मर्यादा शिथिल करण्यात यावी. मात्र ज्या उत्पन्न गटातील अर्जदारास गाळा दिला असेल त्या उत्पन्न गटासाठी असलेल्या दराने व्याजाची आकारणी करून त्या गाळ्यांची किंमत आकारण्यात यावी.

२) विविध उत्पन्न गटांसाठी गाळ्यांच्या किंमतीचा प्रारंभिक हप्ता याप्रमाणे घ्यावा.

| | |
|---|---|
| अ) नागरी अ-इ-१ | रु. ३,०००/- |
| आ) नागरी अ-इ-२ | रु. ४,५००/- |
| इ) नागरी ब-एल-२ | रु. ७,५००/- |
| ई) नागरी ब-एल-२ | रु. ९,०००/- |
| उ) मध्यम उत्पन्न गट | रु. २५,०००/- |

प्रारंभिक हप्त्याची बाकीची रक्कम १-२ वर्षांच्या कालावधीस हप्त्यांची किंवा संपूर्ण भाडेखरेदी कालावधीत मासिक समान हप्त्याबरोबर वसूल करावी. मात्र वसुलीतील विलंबाबद्दल व्याज आकारण्यात यावे.

३) वरील (१) प्रमाणे त्या त्या उत्पन्न गटासाठी असलेल्या दराने व्याज आकारल्याने जी जादा रक्कम येईल ती किंमतीच्या बाकी रकमेबरोबर भाडे खरेदी कालावधीत मासिक समान हप्त्याबरोबर घ्यावी.

४) एका अर्जदारास एकापेक्षा अधिक गाळे पाहिजे असल्यास द्यावेत मात्र व्यक्तिगत अर्जदारास तूर्त कमाल दोन गाळे द्यावेत व अर्जदार एखादी मान्यताप्राप्त संस्था असल्यास दोनापेक्षा अधिक गाळे द्यावेत.

| **Item No.** | **2** | **Resolution No.** | **1127** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम १९८१ मध्ये सुधारणा करणे
विनियम ९ मध्ये सुधारणा

ठराव : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळेविक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम १९८१ मधील विनियम ९ (१-ए) मध्ये सोबत जोडलेल्या अधिसूचनेच्या मसुद्याप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता दिली.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **03/Dec/1985**

**Item No.** **3** **Resolution No.** **1128**

विषय : नागपूर येथील निरनिराळ्या योजनांतील गाळ्यांचे वाटप करण्याचेबाबत अटी शिथिल करणे.

ठराव : निर्णय घेतला की, नागपूर येथील पाच योजनांतील गाळ्यांना पुरेशी मागणी नसल्याने उरलेल्या गाळ्यांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे.

१) पात्रतेची उत्पन्न मर्यादा पुढील उत्पन्न गटाएवढी वाढवावी. मात्र पुढील उत्पन्न गटासाठी असलेल्या दराने व्याज लावून किंमत आकारण्यात यावी.

२) एका अर्जदारास एकापेक्षा अधिक गाळे पाहिजे असल्यास द्यावेत. मात्र व्यक्तिगत अर्जदारास तूर्त दोनच गाळे द्यावेत व अर्जदार एखादी मान्यताप्राप्त संस्था असल्यास दोनापेक्षा अधिक गाळे द्यावेत.

३) किंमतीचा प्रारंभिक हप्ता सुरुवातीस ५० टक्के घेऊन बाकी ५० टक्के रक्कम दोन वर्षांच्या मुदतीत वसूलीतील विलंबाबद्दल योजनेतील दराने व्याज आकारून घ्यावा.

४) पुढील उत्पन्न गटासाठी असलेले व्याज लावल्याने किंमतीतील जी जादा रक्कम येईल ती भाडे खरेदीच्या कालावधीत मासिक समान हप्त्याबरोबर वसूल करावी.

**Item No.** **4** **Resolution No.** **1129**

विषय : श्री. एस. आर. वाडेकर, मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांना उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, श्री. वाडेकर यांना, त्यांनी मुख्याधिकारी/मुंबई मंडळ या पदाचा कार्यभार स्वीकारलेल्या दिनांकापासून वेतनश्रेणी रु. २२५०-१२५/२-२५०० ही लागू करण्यात यावी व त्यादृष्टीने आवश्यक ते फेरफार करण्यात यावेत. ही सुधारित वेतनश्रेणी श्री. वाडेकर यांना त्यांनी मुख्य अधिकारी या पदाचा कार्यभार घेतलेल्या दिनांकापासून त्वरित लागू करण्यात यावी. शासनाकडून प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाची मान्यता घेण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 04/Dec/1985

**Item No.** 5 **Resolution No.** 1130

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कर्मचारी कल्याण निधीची स्थापना व व्यवस्थापन.

ठराव : कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी स्थापन होणाऱ्या कल्याण निधीस महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कल्याणनिधी असे नाव देण्यास प्राधिकरण संमती देत असून या निधीच्या कार्यालयासाठी जागेच्या उपलब्धतेनुसार गृहनिर्माण भवनात एक कक्ष वितरित करण्यास मान्यता देत आहे.

कल्याणनिधीच्या कार्यकारी मंडळावर प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व वित्त नियंत्रक यांना अनुक्रमे पदसिद्ध अध्यक्ष व उपाध्यक्ष कार्य करण्यास अनुमतीही देत आहे. त्याचप्रमाणे कार्यकारी मंडळावर कल्याण निधी योजनेच्या नियमावलीनुसार प्राधिकरण चार सदस्य नियुक्त करील.

कल्याणनिधीची तिमाही वर्गणी सभासद कर्मचाऱ्यांच्या संमतीपत्रानुसार मासिक वेतनपत्रकातून कापून घेऊन कोषाध्यक्ष कल्याणनिधी यांचेकडे जमा करण्याच्या व्यवस्थेत प्रशासक मान्यत देत आहेत.

या कल्याणनिधीच्या नोंदणीसाठी आवश्यक असा अनुषांगिक खर्च करण्यास मान्यता देत असून 'कर्मचारी कल्याण योजना' शीर्षकाखाली मंजूर झालेल्या तरतूदीच्या अधीन राहून असा खर्च करण्याचे अधिकार वित्त नियंत्रक यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Item No.** 5 **Resolution No.** 1130

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कर्मचारी कल्याण निधीची स्थापना व व्यवस्थापन.

ठराव : कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी स्थापन होणाऱ्या कल्याण निधीस महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कल्याणनिधी असे नाव देण्यास प्राधिकरण संमती देत असून या निधीच्या कार्यालयासाठी जागेच्या उपलब्धतेनुसार गृहनिर्माण भवनात एक कक्ष वितरित करण्यास मान्यता देत आहे.

कल्याणनिधीच्या कार्यकारी मंडळावर प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व वित्त नियंत्रक यांना अनुक्रमे पदसिद्ध अध्यक्ष व उपाध्यक्ष कार्य करण्यास अनुमतीही देत आहे. त्याचप्रमाणे कार्यकारी मंडळावर कल्याण निधी योजनेच्या नियमावलीनुसार प्राधिकरण चार सदस्य नियुक्त करील.

कल्याणनिधीची तिमाही वर्गणी सभासद कर्मचाऱ्यांच्या संमतीपत्रानुसार मासिक वेतनपत्रकातून कापून घेऊन कोषाध्यक्ष कल्याणनिधी यांचेकडे जमा करण्याच्या व्यवस्थेत प्रशासक मान्यत देत आहेत.

या कल्याणनिधीच्या नोंदणीसाठी आवश्यक असा अनुषांगिक खर्च करण्यास मान्यता देत असून 'कर्मचारी कल्याण योजना' शीर्षकाखाली मंजूर झालेल्या तरतूदीच्या अधीन राहून असा खर्च करण्याचे अधिकार वित्त नियंत्रक यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 06/Dec/1985

| **Item No.** | 6 | **Resolution No.** | 1131 |
|---|---|---|---|

विषय : श्री. आर. जी. प्रेमिया यांना संत तुकाराम नगर, पुणे येथे मध्यम उत्पन्न गटाचा गाळा देणे.

ठराव : निर्णय घेतला की, श्री. आर. जी. प्रेमिया यांनी मे १९७९ मध्ये जाहिरातीस अनुसरून केलेला अर्ज अपात्र ठरविण्याविरुद्ध त्यांनी केलेले अपील मंजूर करण्यात यावे व त्याप्रमाणे संत तुकाराम नगर, पिंपरी येथे बांधण्यात आलेल्या मध्यम उत्पन्न गटाच्या गाळ्यामधून मध्यम उत्पन्न गट - २ प्रकारच्या गाळ्याचे त्यांनी केलेल्या अर्जावर त्यांना रीतसर वाटप करण्यात यावे.

| **Item No.** | 7 | **Resolution No.** | 1132 |
|---|---|---|---|

विषय : दक्षता अधिकारी/प्राधिकरण यांच्याकडील बैठकीकरिता येणाऱ्या खर्चाबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
दक्षता अधिकारी/प्राधिकरण यांना बैठकीकरिता दरमहा ५०/- (रुपये पन्नास मात्र) खर्च करण्यास खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.
१) प्रत्येक बैठकीकरिता दरडोई एक रुपया पर्यंत खर्चाची मर्यादा असावी.
२) बैठकीकरिता आलेला खर्च दक्षता अधिकारी यांनी स्वतः प्रमाणित करावा.
३) खर्चाची मर्यादा ओलांडली जाऊ नये याकरिता दक्ष राहण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **10/Dec/1985**

**Item No.** **8** **Resolution No.** **1133**

विषय : चिकणघर, कल्याण येथील अल्प उत्पन्न गटाकरिता बांधलेल्या ८०० गाळ्यांपैकी उरलेल्या गाळ्यांचे वाटप करणे.

ठराव : निर्णय घेतला की, चिकणघर, कल्याण येथील अल्प उत्पन्न गटाच्या गाळ्यांना पुरेशी मागणी नसल्याने उरलेल्या गाळ्यांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात यावेत.

१) पात्रतेची उत्पन्न मर्यादा शिथिल करण्यात यावी. मात्र ज्या उत्पन्न गटातील अर्जदारास गाळा दिला असेल त्या गटासाठी असलेल्या दराने व्याज आकारून गाळ्यांची किंमत आकारण्यात यावी.

२) गाळ्यांच्या किंमतीचा प्रारंभीचा हप्ता रु. १२,०००/- घ्यावा व प्रारंभीच्या हप्त्याची बाकीची रक्कम एक किंवा दोन वर्षांत हप्त्यांनी किंवा भाडे खरेदीच्या कालावधीत मासिक समान हप्त्याबरोबर विलंबाबदल योजनेतील दराने व्याज आकारून वसूल करण्यात यावी.

३) वरील (१) प्रमाणे त्या त्या उत्पन्न गटासाठी असलेल्या दराने व्याज आकारण्यापोटी जी जादा रक्कम येईल ती किंमतीच्या बाकी रकमेबरोबर भाडे खरेदीच्या मासिक समान हप्त्यांबरोबर वसूल करावी.

४) एका व्यक्तिगत अर्जदारास कमाल दोन गाळे द्यावेत. मात्र अर्जदार मान्यताप्राप्त संस्था असल्यास दोनापेक्षा जास्त गाळे देण्याचा विचार करावा.

**Item No.** 10 **Resolution No.** 1135

विषय : ठेकेदारांनी बांधकामाच्या जागेवर आणलेल्या बांधकाम साहित्यावर सुरक्षित अग्रिम रक्कम मंजूर करणे.

ठराव : १) बांधकाम साहित्यावरील सुरक्षित अग्रिम रक्कम ही कार्यकारी अभियंत्याने निर्धारित केलेल्या किंमतीच्या ९० टक्क्यांवरून कमी करून ती जास्तीत जास्त ७५ टक्क्यांपर्यंत मंजूर करावी.

२) सुरक्षित अग्रिम रकमेसाठी ठेकेदाराने अर्ज केल्यावर अगदी योग्य त्या बाबीवरच अशी रक्कम मंजूर करावी. स्वतःहून अधिकाऱ्याकडून अग्रिम रक्कम देऊ करण्यात येऊ नये.

३) काम सुरू करते वेळी अशी अग्रिम रक्कम मंजूर करू नये.

४) जे बांधकाम साहित्य पुढील तीन महिन्यांत वापरले जाईल अशा साहित्यावरच सुरक्षित अग्रिम रक्कम द्यावी व शक्यतो ती रक्कम पुढील तीन महिन्यांत वसूल करावी. अपवादात्मक बाबतीत अग्रिम वसूली शिल्लक राहिल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी समर्थनीय व स्वीकारार्ह कारणांची नोंद ठेवावी व उपमुख्य अभियंता/मुख्य अधिकारी यांच्या नजरेस ही बाब आणून द्यावी.

५) ज्या साहित्यावर सुरक्षित अग्रिम रक्कम द्यावयाची आहे त्या साहित्याची "मोजमाप पुस्तकात" (मेजरमेंट बुक) नोंदणी करावी व त्यासाठी स्वतंत्र व वेगळे पुस्तक ठेवावे. अशी नोंदणी केल्याशिवाय अग्रिम रक्कम मंजूर करू नये.

५) सुरक्षित अग्रिम रक्कम ज्या ज्या वेळी ५०,०००/- रु.पेक्षा अधिक बाकी असेल तेव्हा त्यावर कार्यकारी अभियंत्याने ५ टक्केपर्यंत चाचणी तपासणी करावी. याशिवाय सर्वप्रकारचे साहित्य कामाचे जागेवर प्रत्यक्ष आणलेले आहे किंवा नाही याचीही खात्री करून घ्यावी. असा अग्रिम दिल्याची माहिती मुख्य अभियंता यांना द्यावी.

७) या सुधारित बदलाव्यतिरिक्त प्राधिकरण परिपत्रक दिनांक १३.४.८३ मध्ये निर्देशिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन संबंधितांनी करावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 12/Dec/1985

**Item No.** 9 **Resolution No.** 1134

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८२ मधील विनियम १० मध्ये सुधारणा करणे.

ठराव : निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८२ मधील विनियम १० मध्ये सोबत जोडलेल्या अधिसूचनांच्या मसुद्यानुसार सुधारणा करण्यात यावी व या सुधारणेला शासनाची मान्यता घेण्यात यावी.

**Item No.** 11 **Resolution No.** 1136

विषय : सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्राधिकरणाच्या सेवेत कंत्राटी नेमणुका.

ठराव : प्रशासक/प्राधिकरण यांनी प्रस्तावाचा विचार केला व प्रशासक/प्राधिकरण यांचे मंजूरीने स्थापन केलेल्या निवड उपसमितीच्या निर्णयानुसार खालील उमेदवारांच्या कंत्राटी नेमणुकीस प्राधिकरणाने कार्योत्तर मंजूरी दिली.
१. श्री. एम.एच. रानडे
२. श्री. आर.डी नाईक
३. श्री. आर.के गायधनी
४. श्री. निहालुदीन शेख

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 14/Dec/1985

**Item No.** 12 **Resolution No.** 1137

विषय : औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री योजना.

ठराव : प्रशासकांनी या प्रस्तावाचा विचार करून निर्णय घेतला की.
औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची बाकी किंमत किंवा पूर्ण किंमत तसेच संपूर्ण थकबाकी एक रकमी भरल्यास किंमतीतील अतिरिक्त १० टक्के सूटीचा लाभ ज्या इमारतीतील गाळेधारकांना उपलब्ध आहे त्यांना तो देण्यासाठी फेब्रुवारी १९८६ अखेर मुदतवाढ देण्यात यावी. तसेच गाळ्यांची बाकी किंमत किंवा पूर्ण किंमत व संपूर्ण थकबाकी एक रकमी भरल्यास अशा रकमेवर देण्यात येणारी ५ टक्के सूट (डिस्काउंट) देण्यासाठी देखील फेब्रुवारी १९८६ अखेर मुदतवाढ देण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 17/Dec/1985

**Item No.** 13 **Resolution No.** 1138

विषय : प्राधिकरणातील आणि शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना कंत्राटी नेमणूक.

ठराव : बाब टिप्पणीतील प्रस्तावाचा प्रशासक/प्राधिकरण यांनी विचार केला व निवड उपसमितीने शिफारस केलेल्या खालील उमेदवारांच्या प्रारंभीसह महिन्यासाठी अथवा न्यायालयीन स्थगिती आदेश उठेपर्यंत जो कालावधी आधी संपेल तोपर्यंत 'कंत्राटी नेमणुका' करण्यास प्रशासक प्राधिकरण यांनी मंजूरी दिली.

१. श्री. पी.पी. देशमुख
२. श्री. पी. उपाध्याय
३. श्री. के.एस. गोंधळेकर
४. श्री. पी.व्ही. खोत
५. श्री. एल.एस. आंबे

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 18/Dec/1985

**Item No.** 14 **Resolution No.** 1139

विषय : चिकणघर कल्याण येथील उच्च उत्पन्न गटाचे दोन गाळे जागतिक बँक प्रकल्प यांना कार्यालयाकरिता देण्याबाबत.

ठराव : बाब टिप्पणीतील प्रस्तावाचा विचार करून प्रशासकांनी निर्णय घेतला की, चिकणघर, कल्याण येथे उच्च उत्पन्न गटाकरिता बांधलेल्या गाळ्यापैकी २ गाळे जागतिक बँक प्रकल्पाच्या अंतर्गत कामांची असंलबजावणी करण्याच्या संबंधात कार्यालयीन उपयोगासाठी संचालक, जागतिक बँक प्रकल्प यांना विक्री तत्त्वावर विहित किंमतीत देण्यात यावेत.

**Item No.** 16 **Resolution No.** 1141

विषय : वांद्रे पुन:प्रापण क्षेत्रात उच्च उत्पन्न गटांतर्गत १४० गाळे बांधण्याच्या कामासाठी मेसर्स बी. जी. शिर्के आणि कं. यांनी शिर्के सिपोरेक्स उद्योगसमूह यांच्या वतीने दिलेला ठोस रक्कम (लम्पसम) निविदा स्विकारणेबाबत विचार करणे.

ठराव : वरील बाबींचा विचार करून व प्रशासनाचा आदेश लक्षात घेऊन असा निर्णय घेतला की,
वांद्रे पुन:प्रापण क्षेत्रातील उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखालील आगाऊ अंशदान योजने अंतर्गत बांधावयाच्या नवीन १४० गाळ्यांचे एकूण १,२७,७५१.८५ चौ. फूट क्षेत्रफळाचे बांधकाम दर चौ. फुटास रू. १५०/- या दराने रू. १,९१,६२,७७७/- एवढ्या किंमतीचे काम बी. जी. शिर्के आणि कंपनी यांना देण्याचा प्रस्ताव सदरहू कंपनीने पत्र क्र. बीजीएस/एमएचडीए/८५/१०३१२, दिनांक २-१२-१९८५ अन्वये केलेली विनंती लक्षात घेऊन मान्य करण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 20/Dec/1985

**Item No.** 15 **Resolution No.** 1140

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील गाळे इंडियन नॅशनल कॉंग्रेस यांना कॉंग्रेस शताब्दी समारोहासाठी तात्पुरत्या वापरासाठी भाड्याने देणे.

ठराव : प्रशासकांनी या प्रस्तावाचा विचार करून, निर्णय घेतला की, शासनाच्या सूचना लक्षात घेऊन मुंबई मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील एकूण ७४६ गाळे इंडियन नॅशनल कॉंग्रेस या संस्थेस दि.२४-१२-१९८५ ते १-१-१९८६ या कालावधीसाठी भाडेतत्त्वावर देण्यात यावेत. उक्त संस्थेस हे गाळे देण्याकरिता शासनाच्या पत्रात निर्देशित केलेल्या अटी लावण्यात याव्यात. या आदेशाचा पाठपुरावा करून पूर्तता अहवाल सादर करणेसंबधी मुंबई मंडळाला आदेश देण्यात यावेत.

---

**Item No.** 17 **Resolution No.** 1142

विषय : स्वयंस्फूर्तीने कष्ट घेऊन कार्यवाही केल्याबद्दल श्री. जोगळेकर उपअभियंता/पुणे मंडळ यांना प्रतिकात्मक अधिदान मंजूर करण्याबाबत.

ठराव : बाब टिप्पणीतील विषयावर विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी निर्णय घेतला की, श्री. एस. वाय. जोगळेकर उपअभियंता/पुणे मंडळ यांना त्यांनी केलेल्या स्तुत्य कामाबद्दल प्रतिकात्मक अधिदान म्हणून रू. १००/- (रूपये शंभर फक्त) मंजूर करण्यात येत आहेत. याशिवाय त्यांना सदर कामगिरीबाबत प्रशस्तिपत्रकही देण्यात यावे.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 24/Dec/1985

**Item No.** 20 **Resolution No.** 1145

विषय : सर्वश्री आर. एन. भाऊसकर व एम. के. गांधी यांचे ज्येष्ठतासूची प्रकरणी उच्च न्यायालयाचे निवासाचे संदर्भातील कार्यवाही.

ठराव : बाब टिप्पणीमध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीचा विचार करून व न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करणे शक्य व्हावे म्हणून, प्रशासक/प्राधिकरण यांनी निर्णय घेतला की, बाब टिप्पणीमध्ये परिच्छेद चारमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे सर्वश्री आर. एन. भाऊसकर व एम. के. गांधी यांना न्यायालयाचे निकालाने अंमलबजावणीचे संदर्भात विविध पदावर पदोन्नती देण्याकरिता तसेच प्रस्तावित अधिसंख्य पदे निर्माण करण्याकरिता व पदांचे वेतन वाढविण्याकरिता या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 26/Dec/1985

**Item No.** 18 **Resolution No.** 1143

विषय : कंत्राटी नेमणुका, मुदतवाढ.

ठराव : १) श्री. व्ही. एस. मुंडे उपसंचालक यांचा कंत्राटी नेमणुकीचा कालावधी ३१-१२-१९८५ नंतर आणखी तीन महिनेपर्यंत वाढवावा.
२) श्री.एस. बी. हळदणकर, श्रीमती एस.आर.गुप्ते, आणि श्री. आर.टी. सोमण यांचा वरिष्ठ सहाय्यक पदांवरील कंत्राटी नेमणूकीचा कालावधी ३०-४-१९८६ पर्यंत वाढविण्यात यावा.
३) श्री. ए. आर. शिंदे, लेखाधिकारी, मुंबई मंडळ योना ३१-१-१९८६ नंतर तीन महिने मुदतवाढ मंजूर करावी.

**Item No.** 19 **Resolution No.** 1144

विषय : पंतनगर, घाटकोपर येथे दादासाहेब गायकवाड कन्झ्युमर्स को.ऑ. सोसायटीला वितरीत केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
१) श्री. दादासाहेब गायकवाड कन्झ्युमर्स को.ऑ. सोसायटी, पंतनगर, घाटकोपर येथील वसाहतीतील देण्यात आलेल्या ९७०.२० चौ.मि.भूखंडाऐवजी १०८० चौ.मि. क्षेत्रफळाचा भूखंड द्यावा. व भूखंडाच्या अधिमूल्याच्या तफावतीची रक्कम पूर्वीच्याच दराने वसूल करण्यात यावे.
२) वरील भूखंडाच्या आकारात महापालिकेच्या रस्तारुंदी करण्यासाठी जागेची समावेश असल्यामुळे महापालिकेला रस्तारुंदीकरण्यासाठी जागेची आवश्यकता लागेल त्यावेळी तेवढ्या जागेचे हस्तांतरण महापालिकेकडे करण्याचे बंधन सोसायटीवर राहिल. इतर अटी पूर्वी करण्यास नमूद केल्या प्रमाणेच रहातील.

**Item No.** 21 **Resolution No.** 1146

विषय : सावेडी, अहमदनगर येथे मध्यम उत्पन्न गटांतर्गत बांधण्यात येणाऱ्या १९२ गाळ्यांच्या निविदा स्विकारण्याचा विचार करण्याबाबत.

ठराव : वरील बाबींचा विचार करून प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, सावेडी, अहमदनगर येथील मध्यम उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखालील हुडको अर्थसहाय्यित योजनेच्या बांधकामाच्या १९२ गाळ्यांच्या कामाची रू. ५०,११,३०२/- ची (रू. ४९,५१,५८५/-) या अंदाजित किंमतीच्या १० टक्के जास्त) मे. सी.पी. मेहरा यांची निम्नतम निविदा स्विकारण्यात येत आहे.

| Item No. | 22 | Resolution No. | 1147 |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे कंत्राटदाराचे नोंदणी करावयाबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे विचार विनियम करून प्रशासक/प्राधिकरण यांनी निर्णय घेतला की, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारितील कामे प्रदान करण्यासाठी तयार केलेल्या कंत्राटदार नोंदणी यादीमध्ये 'मे. परेश इलेक्ट्रिक स्टोअर्स' यांचे नाव, वर्ग 'ब' मध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देत आहेत.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 27/Dec/1985 |
|---|---|---|---|

| Item No. | 23 | Resolution No. | 1148 |
|---|---|---|---|

विषय : नागपूर मंडळासाठी स्थायी वकिलांची नेमणूक चालू ठेवण्याबाबत.

ठराव : या विषयासंबंधी विचार करून, प्रशासक/प्राधिकरण यांनी, निर्णय घेतला की, श्री. डे यांची स्थायी वकिल म्हणून केलेली नेमणूक, दरमहा रूपये १०००/- या स्थायी वेतनावर पुढील एक वर्षासाठी चालू ठेवावी. मंडळाचे सर्व कायदेविषयक प्रश्न व हायकोर्टाव्यतिरिक्त इतर सर्व कोर्टातील प्रकरणे त्यांनी हाताळावयाची आहेत. त्याबद्दल त्यांना वेगळी फी दिली जाणार नाही. नागपूर बाहेरील कामे चालविण्यासाठी श्री. डे यांना वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांना मिळणारा प्रवास व दैनिक भत्ता दिला जाईल. मंडळाची नागपूर येथील हायकोर्टातील कायदेविषयक प्रकरण सुध्दा श्री. डे यांनी चालावायचे आहेत व या कामासाठी जी डे यांना सरकारने तत्संबंधी केलेल्या नियमात सहाय्यक सरकारी वकिलांना ठरवून दिलेली फी देण्यात येईल.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 01/Jan/1986 |
|---|---|---|---|

| Item No. | 1 | Resolution No. | 1149 |
|---|---|---|---|

विषय : गलिच्छवस्ती सुधार योजना - नागपूर येथील गलिच्छवस्ती सुधार कामाच्या सुधारित एस्टिमेट्सना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत नागपूर महानगरपालिकेचे प्रस्ताव.

ठराव : प्रशासक/प्राधिकरण यांनी बाब टिप्पणीतील विषयावर विचार करून निर्णय घेतला की, १९८५-८६ साली नागपूर येथील गलिच्छवस्ती सुधारणा योजनेकरिता उपलब्ध असलेली तरतूद खर्च होण्याच्या दृष्टीने आणि त्याचा लाभ गलिच्छ वस्तीतील रहिवाशांना मिळण्याच्या दृष्टीने नागपूर शहरातील वरील ७ गलिच्छ वस्त्यांच्या सुधारणा कामाच्या एकूण रू. ६०,०७,२५० च्या सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 03/Jan/1986

**Item No.** 2 **Resolution No.** 1150

विषय : प्राधिकरणाच्या प्रशिक्षण व विकास कार्यक्रमाच्या कार्यास "निकमार" (निकमार) या संस्थेचे सहकार्य घेणे.

ठराव : प्रशासक/प्राधिकरण यांनी विषयावरील टिप्पणीचा विचार करून निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकरिता प्रशिक्षण व विकास कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्याचे काम "निकमार" (निकमार) या संस्थेस देण्यास व त्याप्रित्यर्थ १९८५-८६ सालात रू. २८,७५०/- इतका खर्च करण्यास अनुमती देण्यात येत आहे. पहिल्या टप्प्याचा आढावा घेऊन प्राधिकरणापुढे ठेवण्यात यावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 07/Jan/1986

**Item No.** 3 **Resolution No.** 1151

विषय : भूसंपादन कार्यवाही विनाविलंब पूर्ण होण्याकरिता संपर्क अधिकाऱ्यांची नेमणूक करणे बाबत.

ठराव : बाब टिप्पणीमध्ये खुलासा केल्याप्रमाणे शासनाच्या सूचनेप्रमाणे भूसंपादनाची प्रकरणे त्वरीत निकाली काढण्याची गरज लक्षात घेऊन ठराव करण्यात येतो की,
पुणे, औरंगाबाद, नागपूर, कोंकण मंडळाची भूसंपादनाची प्रकरणे हाताळण्याकरिता व त्याकरिता विविध शासकीय खात्यांशी संपर्क साधून आवश्यक त्या बाबींची त्वरीत पूर्तता करून घेण्याकरिता प्राधिकरणाच्या आस्थापनेवर एक तहसिलदार श्रेणीचे रू. ६००-३०-७५० द. रो. ४०-११५० या वेतनश्रेणीमधील "भूसंपर्क अधिकारी" या दर्जाचे एक पद सुरुवातीला एक वर्षाचे कालावधी करिता निर्माण करण्यात यावे व त्यावर शासनाकडून तहसिलदार श्रेणीचे अधिकारी प्रतिनियुक्तीवर मागवून त्वरित नेमणूक केली जावी.

**Item No.** 4 **Resolution No.** 1152

विषय : श्री. मोहम्मद उमर, यांनी स. गो. बर्वे मार्ग, येथील दुकान क्र. १९ समोवार अनधिकृतपणे व्यापलेली जागा नियमित करणेबाबत.

ठराव : प्रशासक/प्राधिकरण यांनी बाबसूचीत नमूद केलेल्या बाबी लक्षात घेऊन असा निर्णय घेतला की,
श्री. मोहमद उमर यांनी अनधिकृतपणे व्यापलेला सुमारे १२४ चौ. फुटाचा भूखंड एक खास बाब म्हणून नियमाधीन करण्यात यावा. भूखंड नियमाधीन करतांना त्यांना वितरीत करण्यात आलेल्या भूखंड क्र. १९ "ई विभाग" च्या बदलची थकबाकी असल्यास ती वसूल करण्यात यावी. तसेच नियमाधीन करण्यात यावयाच्या भूखंडाचे भाडेपट्टयाची मुदत क्र. १९ च्या करारपत्रा बरोबर संपणारी असावी. पूर्वी वितरीत करण्यात आलेल्या भूखंडाबाबतच्या नियम, अटी व शर्ती या अतिरिक्त जागेलासुध्दा लागू कराव्यात. नियमित करण्यात येणाऱ्या भूखंडाचे अधिमूल्य प्रचलित बाजार भाव लक्षात घेऊन आकारण्यात यावे.

**Meeting No. 62 A Meeting Date 09/Jan/1986**

**Item No. 5 Resolution No. 1153**

विषय : गाळ्यांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर करावयाची कार्यवाही.
गाळ्यांच्या वाटपाच्या अटींचा भंग करण्याऱ्याविरुद्ध करावयाची कारवाई.

ठराव : प्रशासकानी या संबंधीच्या प्रस्तावाचा विचार करून, निर्णय घेतला की, गाळ्यांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर गाळ्यांच्या अधिकृत तसेच अनधिकृत वापराच्या संबंधात सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी. यासंबंधी घेतलेला निर्णय शासनाला माहितीसाठी कळविण्यात यावा.

गाळ्यांची तपासणी झाल्यानंतर करावयाची कार्यवाही :

(अ) निवासी :

१. अधिकृत रहिवाशी असलेले गाळे :

१) या गाळ्यांच्या बाबतीत कोणतीही कार्यवाही करावयाची नाही. मात्र ज्याला गाळा दिला आहे तो गाळ्यात रहात नसून त्याचा वारस किंवा त्यांच्या कुटुंबाचा घटक रहात असल्यास गाळा त्यांचे नावे करून घेण्याबद्दल त्याला सूचित करण्यात यावे व विनियमांतील तरतूदीनुसार तसेच प्राधिकरणाने वेळोवेळी काढलेल्या आदेशांनुसार अधिमुल्य घेऊन अशा प्रकरणी निर्णय घेण्यात यावा. गाळा नांवे करण्यासाठी अगोदरच अर्ज केला गेला असल्यास तो लवकर निकाली काढावा.

२) भाडेतत्त्वावरील किंवा भाडेखरेदी तत्त्वावरील ज्या गाळ्यात अधिकृत गाळाधारक किंवा त्याचा वारस रहातो परंतु गाळ्याचा काही भाग पोटभाड्याने दिला आहे अशा प्रकरणी सध्या काही कारवाई करण्यात येऊ नये. मात्र गाळ्यात पोटभाडेकरू रहात असल्याकरणाने शेजारील गाळेधारकांना उपद्रव पोहचत असेल किंवा अन्य कारणासाठी पोटभाडेकरू रहात असल्याच्या कारणावरून कोणतीही तक्रार संबंधील सहकारी संस्था किंवा इतरांकडून करण्यात आली असेल तर तक्रारीची योग्य ती दखल घेऊन तपासणीअंती अधिकृत गाळाधारक व पोटभाडेकरू यांना गाळ्यातून काढून टाकण्याची कारवाई सुरू करण्याची कार्यवाही करावी.

२. अनधिकृतरित्या व्यापलेले गाळे :

१) औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या गाळ्यांची विक्री योजना आणि गलिच्छवस्ती निर्मूलन योजनेखाली गाळ्यांची विक्री योजना. या दोन योजनांच्या अंतर्गत येणाऱ्या भाडेतत्त्वावरील गाळ्यांच्या बाबतीत संबंधित विक्री योजनेतील तरतुदीनुसार व प्राधिकरणाने दिलेल्या सुचनांनुसार गाळे नियमित करण्याची कार्यवाही करावी.

२) वरील दोन्ही विक्री योजनांच्या अंतर्गत न येणाऱ्या भाडेतत्त्वावरील तसेच भाडेखरेदी तत्त्वावरील गाळ्यांच्या बाबतीत अनधिकृत गाळेधारकांस नियमित करण्याची कार्यवाही प्राधिकरणाने वेळोवेळी काढलेल्या सूचनांनुसार अधिमुल्य आकारून करण्यात यावी. अशा सर्व प्रकरणी गाळेधारकांस प्रथम पत्रे लिहून गाळा त्यांचे नावे नियमित करून घेण्याबद्दल सूचित करण्यात यावे व त्यासाठी अर्ज करण्याकरिता त्यांना एक महिन्याची मुदत देण्यात यावी. असा अर्ज केल्याने गाळा नियमित करण्याचा कोणताही हक्क प्रस्थापित होत नाही तर प्रकरण रीतसर तपासून पाहिल्यानंतर गाळाधारकांस नियमित करता येईल असे आढळून आले तरच त्यास नियमित केले जाईल हे पत्रात स्पष्ट करावे. अर्ज करताना त्याने त्या त्या योजनेखालील गाळे नियमित करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या अधिमुल्याच्या १० टक्के रक्कम प्राधिकरणाकडे अनामत म्हणून ठेवावी असेही त्यास कळविण्यात यावे. त्याचप्रमाणे त्यासोबत काय कागदपत्रे/पुरावे

सादर केले पाहिजेत तेही स्पष्टपणे कळवावे. मुख्यतः ज्या ठिकाणी सहकारी संस्था स्थापन झालेली आहे तेथे त्या संस्थेस 'ना हरकत प्रमाणपत्र' दाखल करावे लागेल. अशी सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात यावीत. यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात यावा. प्रकरणे पडून रहाणार नाहीत यावर लक्ष देण्यात यावे. जे गाळेधारक पत्र पोहोचल्यापासून एक महिन्यात अर्ज दाखल करणार नाहीत त्यांच्याविरुद्ध अधिनियमांतील तरतुदींनुसार गाळ्यातून काढून टाकण्याची कारवाई तात्काळ सुरू करण्यात यावी. तसेच ज्या प्रकरणी तपासणी अंती गाळाधारकास नियमित करता येणार नसल्याचे आढळून येईल त्याप्रकरणीही अशीच कारवाई तात्काळ सुरू करण्यात यावी. अशा सर्व प्रकरणी सुरू केलेल्या कारवाईचा लक्षपूर्वक पाठपुरावा करण्यात यावा व त्यात कोणत्याही प्रकारची ढिलाई येणार नाही याची दक्षता घ्यावी. गाळाधारकास नियमित करण्याचे आदेश काढण्यापूर्वी गाळाधारक बदलल्याचे आढळून आल्यास नवीन अनधिकृत गाळाधारकास नियमित करून संधी देऊ नये तर अधिनियमांतील तरतुदींनुसार गाळ्यातून काढून टाकण्याची कारवाई सुरू करण्यात यावी. गाळा नियमित करण्याचे आदेश काढल्यानंतर यासंबंधीच्या आवश्यक त्या बाबी गाळाधारकाने ठराविक मुदतीत पूर्ण न केल्यास त्याने भरलेली अनामत प्राधिकरणाकडे जमा करण्यात यावी व गाळाधारकास गाळ्यातून काढून टाकण्याची कारवाई सुरू करण्यात यावी.

३) अल्प व मध्यम उत्पन्न गटाचे तसेच औद्योगिक कामगार व बहुमजली गलिच्छवस्ती निर्मूलनाचे जे गाळे अजूनही भाडेपद्धतीवर आहेत त्यातील अनधिकृत गाळेधारकांना नियमित करताना गाळा विकत घेण्याची अट घालण्यात यावी. मात्र मुंबई व पुणे येथील बैठ्या गाळ्यांना हे लागू नाही.

ब) बांधकाम विषयक :

१. अंतर्गत बांधकाम :

गाळ्यांच्या मूळ रचनेत केलेले अंतर्गत बदल किंवा नवीन बांधकाम गाळ्याच्या सुरक्षिततेस कोणत्याही प्रकारे धोका पोहोचवणारे नसल्यास किंवा शेजारील गाळेधारकांना त्यामुळे कोणताही उपद्रव पोहोचणार नसल्यास स्थानिक प्राधिकरणाच्या संजूरीच्या आधीन राहून वरील २ (२) प्रमाणे अधिमूल्य आकारून बदलाकडे दुर्लक्ष करण्यास हरकत नाही. अशा प्रकारणी किती अधिमूल्य आकारावयाचे ते बदलाचे स्वरुप व इतर गोष्टी लक्षात घेऊन मुंबई मंडळाच्या बाबतीत या मार्गदर्शक सूचनात अधिकार दिलेल्या समितीने व इतर मंडळाच्या बाबतीत मुख्य अधिकारी यांनी ठरवावे. हे ठरविताना निरनिराळ्या प्रकरणी भेदभाव होणार नाही याची दक्षता घ्यावी. मात्र अशा बदलामुळे इमारतीच्या सुरक्षिततेस धोका पोहोचणार असल्यास किंवा शेजारील गाळेधारकांना उपद्रव पोहोचत असल्याच्या सहकारी संस्था किंवा इतरांच्या तक्रारी आल्यास गाळाधारकाविरुद्ध अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई सुरू करण्यात यावी. कारवाई सुरू केल्यानंतर गाळाधारकाने दुरुस्ती करून गाळा मूळ स्थितीत आणल्यास कारवाई मागे घेण्यास हरकत नाही.

२. गाळ्याच्या बाहेरील बांधकाम :

१) गाळ्याच्या बाहेरील रचनेत गाळाधारकांच्या स्वतःच्या सोयीसाठी लहानलहान बदल केले असल्यास उदाः वेदरशेडस् बसविणे, कोर्टयार्डवरील छप्पर, त्याविरुद्ध अधिमूल्य वसूल केल्यावर कारवाई करण्यात येऊ नये. मात्र याला स्थानिक प्राधिकरणाची हरकत असल्यास त्याबद्दल गाळाधारक जबाबदार राहील.

२) गाळ्याच्या बाहेर स्वतःच्या उपयोगासाठी बांधकाम केले असल्यास ते स्थानिक

प्राधिकरणाच्या नियमांच्या आधीन राहून व त्या इमारतीतील गाळेधारकांना सहकारी संस्था असल्यास त्या संस्थेचे 'ना हरकत प्रमाणपत्र' दाखल करण्याच्या अटीवर व प्राधिकरणास देणे असलेली सर्व थकबाकी भरण्याच्या अटीवर नियमित करण्यात यावे. त्यासाठी गाळेधारकाने अतिरिक्त बांधकामाच्या क्षेत्रफळाच्या प्रमाणात दर चौ. मी. मागे ठरविलेल्या दराने अधिमूल्य भरावे लागेल. त्यासाठी मुंबईत रू. १००/- महानगरपालिका असलेल्या इतर शहरात रू. ७५/- व इतरत्र रू. २५/- प्रति चौ. मि. याप्रमाणे अधिमूल्य आकारावे. अनिवासी बांधकामासाठी याच्या तिप्पट दराने आकारावे. मात्र बांधकामाविरहित मोकळ्या असलेल्या वापरासाठी उदा. बगीचे, बसण्याकरिता ओटा, वरीलप्रमाणे नियमित केल्यावर कोणताही आकार लावू नये. भाडेपद्धतीवर असलेल्या गाळ्यांच्या बाबतीत नंतर सहकारी संस्थेने आक्षेप घेतल्यास बांधकाम पाडून टाकावे लागेल अशी अट घालण्यात यावी. तसेच विक्री योजनेत सामील होण्याची अटही त्या योजनेत सामील न झालेल्या गाळाधारकावर घालावी. वरीलप्रमाणे संबंधित गाळधारकास एक महिन्याच्या आत नियमित करून घेण्याबद्दल पत्र पाठवावे. तसे न केल्यास निष्कासनाची कार्यवाही सुरू करावी.

३) गाळ्याच्या बाहेरील बांधकाम गाळधारकाच्या स्वतःच्या उपयोगासाठी वापरले जात नसेल परंतु निवासी उपयोगासाठी वापरले जात नसेल परंतु निवासी उपयोगासाठीच दुसऱ्यास वापरण्याकरिता दिले असेल तर वरील (२) मधील तत्त्वावर व सहकारी संस्थेचे 'ना हरकत प्रमाणपत्र' मागवून ते नियमित करण्यात यावे. मात्र अधिमूल्य वरील (२) मधील दर दुप्पट आकारून घ्यावे.

४) वरील कोणत्याही प्रकारात न मोडणारी निवासी व अनिवासी बांधकामे पाडून टाकण्याची कारवाई तात्काळ करावी. अशी सर्वात वाईट असलेली प्रत्येक वसाहतीतील तीन-चार प्रकरणे निवडून त्याप्रकरणी प्रथम कारवाई करण्यात यावी व त्यात कोणतीही ढिलाई न होऊ देता कारवाई पूर्ण करण्यात यावी.

५) ज्या बांधकामामुळे पाणीपुरवठा, सांडपाण्याच्या निचरा होणारी व्यवस्था अशा सामाईक सेवा पुरविण्यात व्यत्यय येते ती बांधकामे पाडून टाकण्यात यावीत.

३. गाळ्याच्या रचनेतील बदल व अतिरिक्त बांधकाम करण्यास परवानगी देण्याच्या प्रकरणी निर्णय घेण्यासाठी मुंबई मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील गाळ्यांच्या बाबतीत वसाहतीचे संबंधित उपमुख्य अभियंता, उपमुख्य अभियंता (धोरण, नियोजन, विकास) आणि उपमुख्य अधिकारी (मिळकत व्यवस्थापन) यांच्या समितीस अधिकार देण्यात यावेत. इतर मंडळाच्या बाबतीत याप्रमाणे निर्णय घेण्याचे अधिकार मुख्य अधिकारी यांना देण्यात यावेत.

(क) इतर :

१. निवासी गाळ्याचा अनिवासी वापर :

गाळ्यात परंपरागत व्यवसाय उदा: शिंपीकाम, सोनारकाम, किंवा शिकवण्या करणे असे व्यवसाय अधिकृत गाळाधारक स्वतः करीत असल्यास व शेजाऱ्यांची किंवा सहकारी संस्थेची तक्रार नसल्यास त्याकडे दुर्लक्ष करण्यात यावे. अशा व्यवसायासाठी कोणताही आकार लावण्यात येऊ नये. मात्र गाळ्याचा निवासी वापर न करता तो संपूर्णपणे व्यवसायासाठी वापरला जात असल्यास गाळधारकास गाळ्यातून काढून टाकण्याची कारवाई करावी.

गाळ्याचा अंशतः किंवा पूर्णतः वापर अवजड यंत्रसामुग्री बसवून किंवा मंजूर लावून उत्पादनाचे काम करण्यासाठी केला जात असल्यास किंवा विनानोफत दवाखाना देवस्थान, पोल्ट्री, दुकान किंवा दुसरे अशा स्वरुपाचे व्यवसाय चालविले जात

असल्यास गाळाधारकास गाळ्यातून काढून टाकण्याची कारवाई करावी. कारवाई सुरू केल्यानंतर व्यवसाय चालविणे बंद केल्यास कारवाई मागे घेण्यात यावी. मात्र एखाद्या गाळ्यात डॉक्टर, वकील, चार्टर्ड अकाउंन्टंट किंवा तत्सम व्यवसाय स्वतः करीत असल्यास त्यास ठराविक फी आकारून परवानगी देण्यात यावी. यासाठी शेजारील गाळेधारकांच्या तक्रारी असता कामा नयेत तसेच इमारतीची सहकारी संस्था स्थापन झालेली असल्यास त्यांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' दाखल करावे लागेल. या दोन अटी घालण्यात याव्यात. शिवाय स्थानिक प्राधिकरण व शासनाचे इतर विभाग यांची आवश्यक ती परवानगीही गाळाधारकाने घेतली पाहिजे व अशा आशयाचे पत्र तात्काळ पाठवावे. अशा प्रकारची परवानगी देण्यासाठी मुंबईतील गाळ्यांच्या बाबतीत रूपये ५,०००/- इतर महानगरपालिकांच्या क्षेत्रातील गाळ्यांच्या बाबतीत रू. ३,०००/- व इतर ठिकाणच्या गाळ्याच्या बाबतीत रूपये १,०००/- याप्रमाणे फी आकारण्यात यावी. गाळाधारक हा अनधिकृत असल्यास गाळा त्यांच्या नावे करण्यासाठी जे अधिमूल्य आकारण्यात येते त्याशिवाय याप्रमाणे फी आकारण्यात यावी.

ड) बंद गाळे :

तपासणीत जे गाळे बंद असल्याचे आढळून आले त्यांची तपासणी लवकरात लवकर करून घेण्यात यावी. ज्या गाळ्यांची तपासणी करण्यास हरकत घेण्यात आली त्या गाळ्यांची तपासणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते प्रयत्न करण्यात यावे.

---

**Item No. 6 Resolution No. 1154**

विषय : प्राधिकरण व विभागीय मंडळातील कर्मचाऱ्यांचा क्रीडा महोत्सव.

ठराव : प्रशासक/प्राधिकरण यांनी बाब सूचित नमूद केलेले मुद्दे लक्षांत घेऊन खालील प्रमाणे निर्णय घेतला.

(३) दि. ५ फेब्रुवारी १९८६ व ७ फेब्रुवारी १९८६ या कालावधीत आंतर विभागीय क्रीडा महोत्सवामध्ये प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या स्पर्धक व चार संघटकांकरिता दोन दिवसांच्या विशेष नैमित्तिक रजेची सवलत देण्यात मान्यता देण्यात येत आहे.

(ब) प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या पुणे येथे होणाऱ्या आंतर क्रीडा महोत्सवासाठी प्राधिकरणाचे गृहनिर्माण कर्मचारी सांस्कृतिक व क्रीडा मंडळाला रू. १५,०००/- (रूपये पंधरा हजार फक्त) मानधन बाब टिप्पणी प्रमाणे देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरहू मानधनाची योग्यरितीने वापर झाल्याची सदरकू मंडळाकडून अहवाल व हिशेब घेऊन वित्त नियंत्रक यांनी खात्री करून घ्यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10/Jan/1986

**Item No.** 5 **Resolution No.** 1168

विषय : श्री. पी. के. रामचंद्रन्. सीनीयर डेप्युटी अकाऊन्टन्ट जनरल ऑडीट यांच्या नेमणूकीबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
श्री. पी. के. रामचंद्रन्. सीनीयर डेप्युटी अकाऊन्टन्ट जनरल ऑडीट हे महालेखापालाचे कार्यालयातून दि.१-४-१९८६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे अनुभवाचा व शिक्षणाचा विचार करता, त्यांना रु. १५००-१९२५ या वेतनश्रेणीत एकॉनॉमिस्ट या पदावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

**Item No.** 7 **Resolution No.** 1155

विषय : श्री. बी. जी. कांबळी, सेवानिवृत्त लेखापरिक्षाधिकारी, (वर्ग-२) यांना प्राधिकरणाच्या सेवेत कंत्राटी नेमणुक.

ठराव : श्री. बी. जी. कांबळी यांची औरंगाबाद मंडळातील लेखापाल या रिक्त पदावर कंत्राटी नेमणुकीने प्रारंभी सहा महिन्यासाठी नेमणुक करण्यास संजूरी देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 14/Jan/1986

**Item No.** 8 **Resolution No.** 1156

विषय : रंगशारदा प्रतिष्ठान या संस्थेला वांद्रे रिक्लेमेशन येथील देण्यात आलेल्या मूखंडाबाबत.

ठराव : प्रशासक/महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी बाब टिप्पणीत सादर केलेले मुद्दे लक्षात घेऊन निर्णय घेतला की, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स मधील "अ" क्षेत्रातील भूखंडाच्या आरक्षणात शासनाच्या पातळीवर दिनांक १२-११-८० ठराव क्रमांक बीकेआर/१०८३/२०१२/युडी-५ अन्वये काही फेरबदल केले आहे. ते फेरबदल लक्षात घेऊन ड्रामा थिएटर साठी आरक्षित केलेल्या भूखंडाच्या दक्षिणेकडील व स्पास्टिक सोसायटीला द्यावयाच्या भूखंडाच्या उत्तरेकडील जी जमिनीची पट्टी शिल्लक रहाते ती ड्रामा थिएटर साठी आरक्षित करण्यात आलेल्या भूखंडात जमा करण्यात यावी. त्या जमिनीचा आकार सुमारे ४५० चौ. मि. (किंवा प्रत्यक्ष जो आकार भरेल तो सब्जेक्ट टू ॲक्च्यूल मेजरमेंट) एवढा आहे.
२) "ड्रामा थिएटर"साठी राखून ठेवण्यात आलेला सुमारे ३००० चौ. मिटर आकाराचा भूखंड प्राधिकरणाने दिनांक १६-५-१९८० च्या ठराव क्रमांक २६२ अन्वये "रंगशारदा प्रतिष्ठान" या संस्थेस ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता ड्रामा थिएटरच्या भूखंडात जमा करावयाचा सुमारे ४५० चौ. मि. आकाराचा भूखंड सुध्दा "रंगशारदा प्रतिष्ठान" या संस्थेला देण्यात यावा.
३) सदरहू भूखंडाचे अधिमूल्य पूर्वीच्याच अधिमूल्यानुसार व्याजासह आकारावे. तसेच पूर्वी लावण्यात आलेल्या शर्ती व अटी बंधनकारक धरण्यात याव्यात.
४) भाडेपट्ट्याचा काळ पूर्वी देण्यात आलेल्या भूखंडाच्या तारखेपासून ३० वर्षाचा धरण्यात यावा म्हणजे भाडेपट्ट्याच्या काळात व इतर अटीमध्ये एकवाक्यता राहील.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 17/Jan/1986

**Item No.** 9 **Resolution No.** 1157

विषय : प्राधिकरणाच्या सभागृहाच्या वापराबद्दल घ्यावयाचा आकार.

ठराव : निर्णय घेतला की,
प्राधिकरण व त्यांच्या इतर विभागीय मंडळाव्यतिरिक्त गृहनिर्माण भवनातील इतर शासकीय कार्यालयाकडून सभागृहाचा वापर केला गेल्यास त्याकरिता प्रतिदिनी अथवा त्यापेक्षा कमी कालावधीकरिता रु. १०/- (अक्षरी रुपये दहा फक्त) आकारासंबधित कार्यालयाकडून वसूल करण्यात यावेत. अशासकीय कार्यालयाकडून सभागृहाचा वापर होऊ देऊ नये.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 27/Jan/1986

**Item No.** 12 **Resolution No.** 1159

विषय : मुख्य अधिकारी/कोकण मंडळ यांना अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की कोकण मंडळाची पुनर्रचना होईपर्यंतच्या कालावधीत मुख्य अधिकारी/कोकण मंडळ यांनी गलिच्छ वस्ती सुधार योजना संबंधीच्या तपशीलवार बाब टिप्पण्या प्रशासक/प्राधिकरण यांना सादर कराव्यात. त्याचप्रमाणे इतर वैधानिक निर्णयाकरिता सविस्तर बाब टिप्पण्या तयार करून संदर्भाधीन कागदपत्रासह त्या प्रशासक/प्राधिकरण यांना सादर करण्यात याव्यात.

**Item No.** 15 **Resolution No.** 1163

विषय : मौजे वडगांव शेरी येथे पुणे मंडळाच्या ताब्यात असलेली जमीन डाक व तार खात्याला देण्याबाबत.

ठराव : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या मौजे वडगाव शेरी येथील वसाहतीतील जमिनीपैकी सुमारे ९०० चौ. मीटर क्षेत्रफळाची जमीन डाक व तार खात्याला कार्यालयीन इमारतीसाठी प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमती विषयक धोरणानुसार ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावर वितरीत करण्यात यावी. पुणे मंडळाने सादर केलेल्या मूल्य निर्धारणा सहवालास मान्यता देण्यात येत आहे.
या बाबतची कार्यवाही पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने सत्वर करावी.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 28/Jan/1986 |
|---|---|---|---|
| Item No. | 10 | Resolution No. | 1158 |

विषय : जे. व्ही. पी. डी. योजनेतील भूखंड क्रमांक ५६ ते ५७ ला लागून असलेला त्रिकोणी आकाराचा छोटा अतिरिक्त भूखंड देण्याबाबत.

ठराव : सर्वश्री एम. नसिम सिद्दीकी व त्यांचा मुलगा एम. नसिर सिद्दीकी यांना निवासी कारणासाठी जुहू विलेपार्ले विकास योजनेतील भूखंड क्रमांक ५६ ते ५७ हे संयुक्तरित्या भूतपूर्व मंडळाने १९६२ मध्ये वितरीत केले होते. त्याच्या भूखंडाला लागून असलेला सुमारे ३७६ चौ. मीटर अतिरिक्त भूखंड त्यांना निवासी कारणाकरिता देण्याचा निर्णय मुंबई मंडळाने निर्णय क्रमांक ५४/७०१ अन्वये घेतला आहे. परंतु प्रत्यक्षात त्यांना २३४ चौ. मीटर एवढ्या आकाराच्या भूखंडाचा ताबा देण्यात आला.
शिल्लक राहिलेल्या १४२ चौ. मी. आकारच्या भूखंडाचे वितरण करण्याची बाब प्राधिकरणाच्या दि. ३१-५-१९८५ रोजी झालेल्या बैठकीत पुन्हा सादर करण्यात आली. त्यावेळी त्यांना शिल्लक राहिलेल्या १४२ चौ. मी. आकाराचा भूखंड वितरण करण्याचा निर्णय ठराव क्रमांक १०५० अन्वये देण्यात आला. परंतु अधिमूल्याचा दर मात्र रु. १५००/- एवढा आकारला हा दर पूर्वी आकारण्यात आलेल्या दरापेक्षा (रु. ५००/- चौ. मी.) तिप्पटीने अधिक होता. प्राधिकरणाच्या निर्णयावर श्री. सिद्दीकी मुंबई मंडळाकडे त्यांना आकारण्यात आलेल्या दराविषयी फेर विचार करण्याची विनंती केली आहे. बाब टिप्पणी सादर केलेले मुद्दे व मुख्य अधिकारी मुंबई मंडळ यांचे अभिप्राय तसेच या प्रकरणाची गुणवत्ता (मेरीट) लक्षात घेऊन श्री. सिद्दीकी यांना रु. ५००/- चौ. मी. आकाराचा भूखंड वितरीत करण्यात यावा. वार्षिक भाडे पट्ट्याचा दर या भूखंडाच्या अधिमूल्यांच्या एक टक्का आकारावा. तसेच भाडेपट्ट्याची मुदत ३० वर्षे प्रथम देण्यात आलेल्या भूखंडाच्या तारखेपासून (१९६२ सालच्या करारनाम्याच्या तारखेपासून) धरण्यात यावी. ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याकराराच्या समाप्तीनंतर अधिमूल्य तसेच भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण करण्याचे अधिकार प्राधिकरणाकडे रहातील.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 30/Jan/1986 |
|---|---|---|---|
| Item No. | 12 | Resolution No. | 1160 |

विषय : सौ. सुनंदा सुरेश प्रभू यांना नेहरूनगर कुर्ला येथील पुस्तकाच्या अनधिकृत दुकानाबाबत.

ठराव : बाब टिप्पणीत उल्लेख केलेली गोष्ट लक्षात घेतला नेहरूनगर, कुर्ला येथील इमारत क्रमांक ८७ जवळील १० बाय १२ फूट आकाराच्या भूखंडावरील अनधिकृतपणे व्यापलेल्या सौ. सुनंदा सुरेश प्रभू यांचा नियमित पुस्तकांच्या स्टॉल अधिकृत करण्यात यावा. परंतु सदर स्टॉल रस्त्यापासून १५ फुटाच्या आत असल्याने महापालिकेची पूर्व परवानगी मिळविण्याची जबाबदारी श्रीमती प्रभू यांची राहील. भूखंडाचे अधिमूल्य जमिनीची मूळ किंमत व त्यावरील विकासाच्या खर्चासह आकारण्यात यावी. अनधिकृत भूखंडाचे नियमन करण्याच्या कार्यवाहीसाठी दंड म्हणून जमिनीची मूळ किंमत अधिक त्या किंमतीच्या २५ टक्के अधिक अधिमूल्य आकारण्या यावे. भाडेपट्ट्यांची मुदत भूखंड अनधिकृतपणे व्यापलेल्या भूखंडाच्या काळापासून दहा वर्षापर्यंत ठेवण्यात यावी. प्राधिकरणाच्या भूखंड वितरणाच्या नेहमीच्या शर्ती व अटी बंधनकारक धरण्यात याव्यात.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 31/Jan/1986

**Item No.** 13 **Resolution No.** 1161

विषय : नागपूर मंडळाचे आस्थापनेवर रोखपालाचे पद निर्माण करणेबाबत.

ठराव : नागपूर मंडळाचे आस्थापनेवर रुपये २६०-१०-३१०-१५-४२० विस्ताय १५-४९५ या कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये रोखपालाचे एक पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदावरील व्यक्तीला, नियमानुसार रोकड हाताळण्याचा भत्ता अनुज्ञेय राहील. दरम्यान एक कनिष्ठ लिपीकाचे पद रिकामे ठेवावे.

**Item No.** 14 **Resolution No.** 1162

विषय : जागतिक बँक प्रकल्प विभागाचे आस्थापनेवर जादा पदे निर्माण करण्याबाबत.

ठराव : जागतिक बँक प्रकल्प विभागाकरिता प्राधिकरणाच्या आस्थापनेवर खालील जादा पदे मंजूर करण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| समाज विकास अधिकारी | ३ पदे |
| रु. ६००-३०-७५० द. रो. ४०-११५० | |
| उपसमाज विकास अधिकारी | ८ पदे |
| रु. ५००-२०-७००-२५-९०० | |

वरील पदे भरलेली असताना त्यांच्यावरील खर्चाएवढी कनिष्ठ लिपीकांची पदे रिकामी ठेवावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 04/Feb/1986

**Item No.** 4 **Resolution No.** 1167

विषय : प्राधिकरण कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम व अशा कार्यक्रमासाठी नियुक्त व्याख्यात्यांना द्यावयाचे मानधन निश्चित करणे.

ठराव : प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नियुक्त व्याख्यात्यांना द्यावयाचे मानधन प्रतिव्याख्यानास रु. ४०/- (रुपये चाळीस मात्र) या दराने देण्यात यावे. हा निर्णय दिनांक ९ मे १९८५ पासून अंमलात येईल.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 07/Feb/1986

**Item No.** 1 **Resolution No.** 1164

विषय : औद्योगिक कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री-घाटकोपर येथील पंतनगर वसाहतीतील विक्री केलेल्या इमारतींच्या मालकीचे हस्तांतरण.

ठराव : निर्णय घेतला की,
घाटकोपर येथील पंतनगर वसाहतीतील औद्योगिक कामगारांना देण्यात आलेल्या १०८ इमारतीतील ३२६८ गाळेधारकांपैकी ४४२ गाळेधारकांकडून भाड्यापोटी येणे असलेल्या एकूण रुपये ८,०१,०००/- या रकमेपैकी गाळेधारक भरणार असलेली रुपये ३,२६,८००/- ही रक्कम वजा जाता उरलेल्या रक्कम रुपये ४,७४,२००/- च्या वसुलीची त्यांच्याकडून मागणी न करता इमारतींच्या मालकीचे हस्तांतरण गाळेधारकांच्या सहकारी संस्थांकडे करण्यात यावे. शिल्लक रक्कम योजनेच्या शिल्लक रकमेतून भागवावी. याबाबतील आवश्यक ती पुढील कार्यवाही मुंबई मंडळाने तातडीने करावी व पूर्ण तपशील पाठवावा.

**Item No.** 2 **Resolution No.** 1165

विषय : गलिच्छ वस्ती सुधार योजना - नागपूर महानगरपालिकेने पाठविलेल्या नागपूर येथील गलिच्छ वस्ती सुधार कामांच्या नवीन व सुधारीत एस्टिमेटस्ना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
१९८५-८६ साली नागपूर येथील गलिच्छ वस्ती सुधारणा योजनेकरिता उपलब्ध असलेली तरतूद खर्च होण्याच्या दृष्टीने आणि त्याचा लाभ गलिच्छ वस्तीतील रहिवाशांना मिळण्याच्या दृष्टीने नागपूर शहरांतील वरील ५ गलिच्छ वस्त्यांच्या सुधारणा नवीन कामाच्या एकूण रु. १०,१२,५०० च्या (एस्टिमट व २ गलिच्छ वस्त्यांच्या एकूण रु. २१,१२,४०० च्या) सुधारित एस्टिमेटस्ना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. प्रत्यक्ष कामे हाती घेण्याआधी खाजगी मालकीच्या जमिनीवरील गलिच्छ वस्त्या १९७१ चे अधिनियमाखाली सक्षम प्राधिकाऱ्याद्वारा विधिवत घोषित केल्या जाव्या.

**Item No.** 3 **Resolution No.** 1166

विषय : औरंगाबाद येथील प्रिनट्रॅव्हल हॉटेल शेजारील उच्च उत्पन्न गट योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या ९६ गाळ्यांच्या निविदा स्वीकारण्याचा विचार करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
अ) औरंगाबाद येथील प्रिन ट्रॅव्हल हॉटेलशेजारील उच्च उत्पन्न गट योजना अंतर्गत ९६ गाळ्यांच्या (१२८ गाळ्यांपैकी) कामाची विभागणी प्रत्येक विभागात ३२ गाळे याप्रमाणे ३ विभाग करून रु. १९,९१,०८४/- (रुपये एकोणीस लाख एक्क्याण्णव हजार चौऱ्याऐंशी फक्त) एवढ्या अंदाजित किंमतीच्या निविदा मागविण्यांच्या औरंगाबाद मंडळाच्या प्रस्तावास प्रशासक/प्राधिकरण कार्योत्तर मान्यता देत आहेत.
ब) वरील कामासाठी एकूण तीन विभागात निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यातील विभाग क्रमांक १, २ व ३ अश्या तीन विभागाच्या निविदा पुढे दर्शविल्याप्रमाणे व औरंगाबाद मंडळ व वित्त नियंत्रकाच्या मतानुसार स्वीकारण्याचा निर्णय प्रशासक/प्राधिकरण घेत आहेत.
विभाग क्रमांक १, २ व ३ या तीन विभागांसाठी मे. भंडारी यांच्या निविदा निविदेसाठी जाहीर केलेल्या दरांचे दर वीस पूर्णांक सत्तावीस शतांश टक्के अधिक (अधिक २०.२७ टक्के) दरासह स्वीकारण्यात येत आहेत.

**Item No.** 7 **Resolution No.** 1170

विषय : निवड समितीची पुनर्रचना करण्याबाबत.

ठराव : प्राधिकरण व प्रादेशिक मंडळमधील वर्ग १, २, ३ व ४ मधील पदांवर सेवाप्रवेश व पदोन्नतीने करावयाच्या नेमणूकीकरीता पुनर्रचित निवड समित्या खालीलप्रमाणे रहातील.

अ) वर्ग-१ व २ मधील पदांवर सेवाप्रवेश व पदोन्नतीने करावयाच्या नेमणूकीकरिता प्राधिकरण पातळीवरील निवड समिती.

तांत्रिक पदांकरिता

| | |
|---|---|
| १) प्रशासक/प्राधिकरण अथवा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण. | सभापती |
| २) संचालक (जागतिक बँक प्रकल्प) तथा सहमुख्य कार्यकारी अधिकारी | सभासद |
| ३) मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ | सभासद |
| ४) मुख्य अभियंता/प्राधिकरण | सभासद |
| ५) मुख्य अभियंता (जागतिक बँक प्रकल्प)/प्राधिकरण | सभासद |
| ५) सचिव/प्राधिकरण | सचिव |

अतांत्रिक पदांकरिता

| | |
|---|---|
| १) प्रशासक/प्राधिकरण अथवा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण | सभापती |
| २) संचालक (जागतिक बँक प्रकल्प) प्राधिकरण | सभासद |
| ३) मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ | सभासद |
| ४) वित्त नियंत्रक/प्राधिकरण | सभासद |
| ५) सचिव/प्राधिकरण | सभासद |

ब) वर्ग-३ व ४ मधील पदांवर सेवाप्रवेश व पदोन्नतीने करावयाच्या नेमणूकांकरिता प्रादेशिक पातळीवरील निवड समिती.

| | |
|---|---|
| १) मुख्य अधिकारी/प्रादेशिक मंडळ | सभापती |
| २) मुख्य लेखाधिकारी/प्रादेशिक मंडळ | सभासद |
| ३) सचिव/प्राधिकरण | सभासद |
| ४) संचालक (जागतिक बँक प्रकल्प) /प्राधिकरण यांनी मुंबई प्रादेशिक समितीवर नियुक्तीसाठी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी | सभासद |

प्रादेशिक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी अथवा प्रशासनाचे काम पहाणारे अधिकारी प्रादेशिक पातळीवरील समितीचे सचिव म्हणून काम पहातील.

क) १) निवड समितीच्या सभापतींना तांत्रिक, विधी, वित्त, समाजविकास संघटना इत्यादी विभागामधील विशेष पदांच्या निवडीकरीता विशेषज्ञांची स्वीकृतीने नियुक्ती करण्याचे अधिकार रहातील.
२) प्रादेशिक पातळीवरील निवड समित्या मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर या विभागापुरत्या रहातील. मुंबई विभागामध्ये प्राधिकरण, जा. बँ. प्र. मुंबई मंडळ व कोकण मंडळ यांचा समावेश असेल.
३) प्रशासक/प्राधिकरण अथवा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना निवड समितीच्या रचनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अथवा उपसमित्या नेमण्याचे अधिकार रहातील.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10/Feb/1986

**Item No.** 6 **Resolution No.** 1169

विषय : प्राधिकरणाच्या नागूपर, पुणे, औरंगाबाद मंडळात टेलेक्स सिस्टिम बसविण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
कार्यालयीन क्षमतेमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने व त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चाच्या बचतीचा विचार करून नागपूर विभागीय मंडळासाठी मुंबई व नागपूर या शहरादरम्यान टेलेक्स यंत्र बसविण्यात मान्यता देण्यात येत आहे.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 12/Feb/1986

**Item No.** 8 **Resolution No.** 1171

विषय : मूलपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळातील कार्यव्ययी आस्थापनेवरील 'कारकून' पदावरून नियत आस्थापनेवर 'कनिष्ठ लिपीक' या समवेतन श्रेणीस नेमणूका केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन संरक्षित करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
मूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळांतील खालील कर्मचाऱ्यांची नियत आस्थापनेवर कनिष्ठ लिपीक पदांवर नेमणूक केलेल्या दिनांकापूर्वीची समानवेतन श्रेणीतील कार्यव्ययी आस्थापनेवरील 'कारकून' पदावरील सेवा ही वेतन निश्चितीसाठी अखंडीत सेवा गणण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली. मात्र या सेवेचा कालावधी रजा अथवा जेष्ठतासूची आदी अन्य फायद्यासाठी धरला जाऊ नये.

१. श्री. एस. आय. वाघमारे
२. श्री. नारायण वा. आपटे
३. श्री. व्ही. आर. दिवाकर
४. श्री. डी. टी. धोंडेकर
५. श्री. गंगाधर के. कुलकर्णी
६. श्रीमती एस्. जी. कीर
७. श्रीमती एस. एम. गायतोंडे

२/- अशाच प्रकारची अन्य काही मुंबई प्रकरणे मंडळांत आढळून आल्यास त्याबाबत अशीच परिस्थिती असल्याची तपासणी व खात्री मुख्य लेखाधिकारी/मुंबई मंडळ यांचेकडून करून घेऊन वेतन संरक्षणाचा निर्णय घेण्याचे अधिकार, मुंबई मंडळातील वर्ग-३ व ४ पदांवरील कर्मचाऱ्यांच्या संदर्भात, मुख्याधिकारी, मुंबई मंडळ यांना प्रदान करण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली. मुंबई मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळात अशी प्रकरणे असल्यास त्यावरील निर्णय घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना प्रदान करावेत, असा ठराव करण्यात येत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.** 1172

विषय : कारकून पदावरील कर्मचाऱ्यांना मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीतून सूट देणे..

ठराव : प्राधिकरणात 'कारकून' यापदावर असणाऱ्या अर्हतारहित सहपत्र 'अ' मध्ये नमूद केलेले अ-मराठी भाषिक कर्मचाऱ्यांना मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अटीतून दिनांक १-७-८१ पासून भूतलक्षी प्रभावाने सूट देण्यात यावी. आणि त्यांच्या या कारणामुळे रोखण्यात आलेल्या सर्व वेतनवाढी भूतलक्षी प्रभावाने मंजूर करण्यात याव्यात.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 13/Feb/1986 |
|---|---|---|---|
| **Item No.** | **10** | **Resolution No.** | **1173** |

विषय : गलिच्छ वस्ती सुधार योजना

ठराव : निर्णय घेतला की,
गलिच्छ वस्ती सुधार योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्याचे १९८५-८६ चे आर्थिक उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने तसेच १९८६-८७ साली नवीन कामे करण्याच्या दृष्टीने नागपूर शहारातील गलिच्छ वस्ती सुधार कामाच्या (बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे) एकूण २१.४४ लक्ष रुपयाच्या वरील ६ एस्टिमेट्सना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. प्रत्यक्ष कामे हाती घेण्याआधी खाजगी मालकीच्या जमिनीवरील गलिच्छ वस्त्या १९७१ अधिनियमाखाली सक्षम प्राधिकाऱ्याद्वारा विधिवत घोषित केल्या जाव्यात. असेच अंदाजपत्रकात मान्य झालेल्या आर्थिक तरतूदीचे अधिन राहून खर्च केला जाईल हे पहावे.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 17/Feb/1986 |
|---|---|---|---|
| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **1174** |

विषय : सातपूर, नाशिक येथील वसाहतीमध्ये सुमारे १५९५ चौ. मीटर क्षेत्रफळाची जागा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाला देण्याबाबत.

ठराव : शासनाचे यासंबंधीचे आदेश लक्षात घेऊन व पूर्वीच्या प्राधिकरणाच्या धोरणानुसार महराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सातपूर वसाहतीतील सुमारे २५९५ चौ. मीटर आकाराचा मोकळा भूखंड महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाला नाममात्र वार्षिक रुपया १/- च्या भाडेपट्ट्याने ३० वर्षांच्या कालावधीसाठी प्राधिकरणाच्या नेहमीच्या इतर शर्ती व अटींना अधिन राहून वितरीत करण्यात यावा.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 20/Feb/1986 |
|---|---|---|---|
| **Item No.** | **14** | **Resolution No.** | **1177** |

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९८६-८७ चा अर्थसंकल्प व सन १९८५-८६ सुधारलेले अंदाज.

ठराव : निर्णय घेतला की,
१९८५-८६ च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच १९८५-८६ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **21/Feb/1986**

**Item No.** **12** **Resolution No.** **1175**

विषय : सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांत, कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग व केंद्र शासनाची त्या संदर्भातील योजना प्राधिकरणात कार्यान्वित करणे.

ठराव : सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांत कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग या संदर्भातील केंद्रशासनाच्या योजनेवर आधारित प्राधिकरणात प्रादेशिक मंडळे व प्राधिकरण या दोन स्तरावर व्यवस्थापन व कामगार प्रतिनिधींच्या टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे स्थापन कराव्यात आणि त्या समित्यांचे कामकाज, आदी टिप्पणीतील प्रस्तावानुसार नियमितपणे चालू ठेवावे. या समित्याचे कामकाज पूर्णपणे सल्लागार स्वरूपाचे राहील.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **24/Feb/1986**

**Item No.** **13** **Resolution No.** **1176**

विषय : गलिच्छ वस्ती सुधार योजना, जालना नगरपरिषदेने पाठविलेल्या जालना येथील गलिच्छ वस्ती सुधार योजनेच्या कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याविषयी.

ठराव : निर्णय घेतला की,
गलिच्छ वस्ती सुधार योजने अंतर्गत जालना जिल्ह्याचे १९८५-८६ चे वार्षिक उद्दीष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने तसेच १९८६-८७ या आर्थिक वर्षात नवीन कामे, हाती घेण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे जालना शहरातील गलिच्छ वस्ती सुधार कामाच्या एकूण रु. ६.८१ लक्ष एवढ्या अंदाजित रकमेच्या अंदाजपत्रकात प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. प्रत्यक्ष कामे हाती घेण्यापूर्वी खाजगी मालकीच्या जमिनीवरील गलिच्छ वस्त्या १९७१ अधिनियमाखाली सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारा विधीवत घोषित केल्या जाव्यात तसेच अंदाजपत्रकांत मान्य झालेल्या आर्थिक तरतूदीचे अधीन राहून खर्च केला जाईल हे पहावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 25/Feb/1986

**Item No.** 15 **Resolution No.** 1178

विषय : श्री. एस्. एन. गटणे, लघुवाद न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश आणि श्री. व्ही. पी. भट सक्षम प्राधिकरी यांना कंत्राटी नेमणूक देण्याबाबत.

ठराव : श्री. गटणे आणि श्री. भट यांना कंत्राटी नेमणूक देण्याबाबत प्राधिकरणापुढे ठेवलेल्या प्रस्तावास प्रशासक/प्राधिकरण यांनी खालीलप्रमाणे मंजूरी दिली.

१. श्री. एस्. एन. गटणे, लघुवाद न्यायलयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश यांना सक्षम प्राधिकारी पदावर नेमणूकीचे दिनांकापासून प्रारंभी सहा महिन्याच्या कालावधीसाठी अथवा अन्य पर्यायी व्यवस्था होईपर्यंत कंत्राटी नेमणूक देण्यात येत आहे.

२. श्री. व्ही. पी. भट, उपजिल्हाधिकारी यांना दिनांक ३-२-८६ पासून मुख्य प्रशासकीय अधिकारी/मुंबई मंडळ या रिक्त पदावर 'सक्षम प्राधिकारी' म्हणून प्रारंभी सहा महिन्याच्या कालावधीसाठी अथवा पर्यायी व्यवस्था होईपर्यंत नेमणूक देण्यात येत आहे.

३. कंत्राटी नेमणूकीच्या अटी व शर्ती नियमानुसार अनुज्ञेय रहातील.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 26/Feb/1986

**Item No.** 19 **Resolution No.** 1182

विषय : मालेगाव जिल्हा नाशिक येथील ५ गलिच्छ वस्तीसुधार योजनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याविषयी.

ठराव : गलिच्छवस्ती सुधार योजनेअंतर्गत नाशिक जिल्ह्याचे १९८५-८६ चे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी तसेच १९८६-८७ वर्षाला नवीन कामे हाती घेण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे मालेगाव (जि. नाशिक) या शहरातील ५ गलिच्छ वस्त्या सुधार कामाच्या अंदाजे ७,०३,०७५ रु. खर्चाच्या प्रस्तावास तात्पुरती (प्रोव्हिजनल) प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. या वस्त्यांची पुन्हा पाहणी करून कमी प्रस्तावित केलेल्या सुविधा पूर्ण देण्यासाठी तसेच नळ, दिवे या सुविधा अजिबात नसल्यामुळे, त्या देण्याचा विचार करून मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी सुधारीत प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीस सादर करावा.

या मान्यता दिलेल्या कामांच्या बाबतीत अर्थिक तरतूदींनुसारच कामे हाती घेण्यात यावी. तसेच या वस्त्या सक्षम अधिकाऱ्याने विधीवत घोषित केल्या आहेत याची खात्री करून घ्यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 28/Feb/1986

**Item No.** 16 **Resolution No.** 1179

विषय : गलिच्छ वस्ती सुधार योजना
सुधार कामांच्या एस्टिमेट्सना प्रश्शासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
गलिच्छ वस्ती सुधार योजनेअंतर्गत नागपूर व भंडारा जिल्हयाचे १९८५-८६ चे आर्थिक उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने व १९८६-८७ साली कामे करण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे नागपूर शहरातील गलिच्छ सुधार कामांच्या एकूण रु. २७,८६,४६६/- (५) च्या नवीन व रुपये ३,५७,०७०/- च्या एका सुधारीत एस्टिमेट्सला तसेच भंडारा जिल्हयांतर्गत गोंदिया येथील गलिच्छ वस्ती सुधार कामांच्या एकूण रुपये ८,६८,५४९/- च्या १२ नवीन एस्टिमेट्स व भंडारा येथील एकूण रुपये ५,४७,७५०/- च्या २ नवीन एस्टिमेट्सना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 16 **Resolution No.** 1179

विषय : गलिच्छ वस्ती सुधार योजना
सुधार कामांच्या एस्टिमेट्सना प्रश्शासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
गलिच्छ वस्ती सुधार योजनेअंतर्गत नागपूर व भंडारा जिल्हयाचे १९८५-८६ चे आर्थिक उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने व १९८६-८७ साली कामे करण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे नागपूर शहरातील गलिच्छ सुधार कामांच्या एकूण रु. २७,८६,४६६/- (५) च्या नवीन व रुपये ३,५७,०७०/- च्या एका सुधारीत एस्टिमेट्सला तसेच भंडारा जिल्हयांतर्गत गोंदिया येथील गलिच्छ वस्ती सुधार कामांच्या एकूण रुपये ८,६८,५४९/- च्या १२ नवीन एस्टिमेट्स व भंडारा येथील एकूण रुपये ५,४७,७५०/- च्या २ नवीन एस्टिमेट्सना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 16 **Resolution No.** 1179

विषय : गलिच्छ वस्ती सुधार योजना
सुधार कामांच्या एस्टिमेट्सना प्रश्शासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
गलिच्छ वस्ती सुधार योजनेअंतर्गत नागपूर व भंडारा जिल्हयाचे १९८५-८६ चे आर्थिक उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने व १९८६-८७ साली कामे करण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे नागपूर शहरातील गलिच्छ सुधार कामांच्या एकूण रु. २७,८६,४६६/- (५) च्या नवीन व रुपये ३,५७,०७०/- च्या एका सुधारीत एस्टिमेट्सला तसेच भंडारा जिल्हयांतर्गत गोंदिया येथील गलिच्छ वस्ती सुधार कामांच्या एकूण रुपये ८,६८,५४९/- च्या १२ नवीन एस्टिमेट्स व भंडारा येथील एकूण रुपये ५,४७,७५०/- च्या २ नवीन एस्टिमेट्सना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 17 **Resolution No.** 1180

विषय : गलिच्छवस्ती सुधार योजना, परभणी नगरपरिषदेने पाठविलेल्या परभणी येथील गलिच्छ वस्ती सुधार कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याविषयी.

ठराव : निर्णय घेतला की,
गलिच्छवस्ती सुधार योजनेअंतर्गत परभणी जिल्ह्याचे १९८५-८६ या वर्षाचे उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने तसेच १९८६-८७ या आर्थिक वर्षात नवीन गलिच्छ वस्ती सुधार कामे हाती घेण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे परभणी जिल्ह्यातील परभणी मराठवाडा प्लॉट या २६३५ लोकसंख्येच्या गलिच्छवस्ती सुधार कामाच्या एकूण रु. ६,१७,०४० लक्ष एवढ्या अंदाजित रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रत्यक्ष कामे हाती घेण्यापूर्वी खाजगी मालकीच्या जमिनीवरील गलिच्छ वस्त्या १९७१ अधिनियमाखाली सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारा विधीवत घोषित केल्या जाव्यात. तसेच अंदाजपत्रकांत मान्य झालेल्या आर्थिक तरतूदींचे अधिन राहून खर्च केला जाईल, हे पहावे.
वरील प्रस्तावात विजेच्या दिव्यांची तरतूद नाही त्यासाठी रु. २५० प्रमाणे देण्यात यावयाच्या रु. ६.५८ लाखांपैकी मानकाप्रमाणे रक्कम बाजूला काढण्यात आली आहे. (सुमारे ४०,०००/-) त्यासाठी पहाणी करून दिवे देण्याबद्दल प्रस्ताव सादर करावा, असे मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांना सूचना आहेत.

---

**Item No.** 18 **Resolution No.** 1181

विषय : गलिच्छवस्ती सुधार योजना, नांदेड येथील गलिच्छवस्ती सुधार योजनेच्या अंदाजपत्रकात प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याविषयी.

ठराव : गलिच्छ वस्ती सुधार योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्याचे १९८५-८६ चे वार्षिक उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने तसेच १९८६-८७ या वर्षात नवीन कामे हाती घेण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील गलिच्छ वस्ती सुधार योजनेच्या रु. ३,२५,८९०/- एवढ्या अंदाजित रकमेच्या अंदाजपत्रकास तात्पुरती (प्रोव्हीजनल) प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. व त्याप्रमाणे कामे चालू करण्यात यावीत. अंदाजपत्रकात मान्य केलेल्या आर्थिक तरतूदींचे अधिन राहून खर्च केला जाईल हे पहावे. तसेच संडास व पाण्याचे नळ या सुविधा मानकाप्रमाणे पुरविण्यासाठी सुधारीत अंदाजपत्रक बनवावे व मान्यतेसाठी लवकर सादर करावे.

| **Item No.** | **20** | **Resolution No.** | **1183** |
|---|---|---|---|

विषय : गलिच्छवस्ती सुधार योजना - नंदूरबार नगरपरिषदेने पाठविलेल्या गलिच्छ वस्ती सुधार योजनांच्या अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता देण्याविषयी.

ठराव : निर्णय घेतला की,
गलिच्छवस्ती सुधार योजनेअंतर्गत धुळे जिल्ह्याचे १९८५-८६ या वर्षाचे उद्दिष्ट साध्य होण्याचे दृष्टीने तसेच १९८६-८७ या आर्थिक वर्षात गलिच्छवस्ती सुधार कामे हाती घेण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे धुळे जिल्ह्यातील नंदूरबार शहरामधील तीन गलिच्छवस्ती सुधार योजनांच्या कामाच्या एकूण ३.९३ लक्षाएवढ्या अंदाजित रकमेच्या अंदाजपत्रकास तात्पुरती (प्रोव्हिजनल) प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. प्रत्यक्ष कामे हाती घेण्यापूर्वी खाजगी मालकीच्या जमिनीवरील गलिच्छवस्त्या १९७१ अधिनियमांखाली सक्षम प्राधिकऱ्यांद्वारा विधीवत घोषित केल्या जाव्यात तसेच मानकाप्रमाणे सर्व सुविधा पुरविणेचे दृष्टीने मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी याबाबत परत पाहणी करून सुधारित मान्यतेसाठी लवकर सादर करावा.

| **Item No.** | **21** | **Resolution No.** | **1184** |
|---|---|---|---|

विषय : गलिच्छवस्ती सुधार योजना - बीड शहरातील गलिच्छवस्ती सुधार योजनेच्या अंदाजपत्रकात प्रशासकीय मंजूर देण्याविषयी.

ठराव : निर्णय घेतला की,
गलिच्छवस्ती सुधार योजनेअंतर्गत बीड जिल्ह्याचे १९८५-८६ सालचे आर्थिक उद्दिष्ट साध्य होण्याचे दृष्टीने तसेच १९८६-८७ या वर्षात नवीन गलिच्छवस्ती सुधार कामे हाती घेण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे बीड जिल्ह्यातील गलिच्छवस्ती सुधार योजनेच्या माळी गल्ली, माळी वस्ती, स्नेहनगर या एका वस्तीच्या एकूण रु. ५.९७७ लक्ष एवढ्या अंदाजित रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. योजना राबविताना अंदाजपत्रकात मान्य झालेल्या आर्थिक तरतूदीचे अधीन राहून खर्च केला जाईल व उद्दिष्ट वेळीच पूर्ण केले जातील. याबाबत योग्य ती काळजी घेण्यात यावी.

| **Item No.** | **22** | **Resolution No.** | **1185** |
|---|---|---|---|

विषय : भविष्य निर्वाह निधी संलग्न किंवा योजना भविष्य निर्वाह निधी धारकांकरिता.

ठराव : निर्णय घेतला की,
भविष्य निर्वाह निधी संलग्न विमा योजनाद्वारे नियमानुसार देय असलेली रक्कम मृतकर्मचाऱ्यांचे वारसास मुंबई मंडळाने त्वरित अदा करावी. सदर रक्कम तात्पुरती प्राधिकरण निधीतून देण्यात यावी. सदर रकमेची प्रतिपूर्ती शासनाकडून व्हावी म्हणून प्राधिकरण प्रशासनाने त्याचा पाठपुरावा करावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 01/Mar/1986

**Item No.** 1 **Resolution No.** 1187

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहतीत पेट्रोल पंपासाठी आरक्षित करण्यात आलेल्या भूखंडाचे अधिमूल्य आकारण्याबाबत.

ठराव : प्रशासक/प्राधिकरण यांनी वरील बाब टिप्पणीत सादर केलेले मुद्दे व शासनाच्या पत्रातील आदेश तसेच पेट्रोल पंपाच्या 'लोकोपयोगी सेवा' लक्षात घेऊन खालील वसाहतीमधील पेट्रोल पंपाच्या भूखंडासाठी केंद्र शासकीय पेट्रोल कंपन्यांना शासनाने कळविलेल्या दरानुसार वाटपास मान्यता देत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जेव्हीपीडी | रु. ६२५ | प्र. चौ. मीटर |
| २. | ओशिवरा | रु. ४११.२५ | प्र. चौ. मीटर |
| ३. | कांदिवली | रु. २८५.०० | प्र. चौ. मीटर |
| ४. | दहिसर | रु. ५६८.७५ | प्र. चौ. मीटर |

भाडेपट्ट्याचा काळ प्रथम ३० वर्षांचा असावा व अधिमूल्याच्या रकमेवर एक टक्का भाडेपट्टा आकारावा. वार्षिक एक टक्का भाडेपट्ट्याच्या दराचा तीन वर्षांनी पुन्हा तेल कंपन्याचा नफा-तोटा लक्षात घेऊन फेरविचार करण्यात यावा.

भूखंड वितरणाबाबतच्या नेहमीच्या शर्तींचा व अटींचा अंतर्भाव करावा. मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने या बाबतची पुढील कार्यवाही करावी.

**Item No.** 3 **Resolution No.** 1189

विषय : नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्रशासकांचे अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ'मध्ये दर्शविलेल्या (१) कळमेश्वर, नागपूर (२) करवीर, कोल्हापूर (३) कुळगाव, बदलापूर, जिल्हा ठाणे (४) व्ही. एम. व्ही. रोड, अमरावती (५) प्रताप मिल्सजवळ, धुळे व (५) कसबा-करवीर, कोल्हापूर येथील नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण १८३.९३ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 4 **Resolution No.** 1190

विषय : येवले येथे नागरी 'अ' व नागरी 'ब' आणि मध्यम उत्पन्न गटांसाठी बांधलेल्या गाळ्यांचे वाटप.

ठराव : ंय घेतला की, येवले येथे बांधण्यात आलेल्या नागरी 'अ' व नागरी 'ब' आणि यम उत्पन्न गटांच्या गाळ्यांचे वाटप करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

नागरी 'अ' आणि नागरी 'ब'

१) नागरी 'अ' गटाच्या गाळ्यांसाठी किंमतीपोटी सुरुवातीचा हप्ता रु. ४,६१५/- ऐवजी रु. २,३०८/- घेण्यात यावा. गाळे जास्त नसल्यामुळे होणाऱ्या नुकसानीच्या तुलनेत ही रक्कम कमीच समजावी लागेल.

२) नागरी 'ब' गटाच्या गाळ्यांसाठी किंमती पोटी सुरुवातीचा हप्ता रु. ६,३३७/- ऐवजी ३,१७०/- घेण्यात यावा.

३) या दोन्ही गटांच्या गाळ्यांसाठी सुरुवातीच्या हप्त्याची बाकीची रक्कम भाडेखरेदी कालावधीत मासिक समान हप्त्यांबरोबर योजनेतील दराने व्याज आकारून वसूल करण्यात यावी.

४) या दोन्ही गटांसाठी भाडेखरेदी कालावधी मूळत जो ठरविण्यात आला आहे तो वाढविण्यात येऊ नये.

५) एका अर्जदाराने मागणी केल्यास एकापेक्षा जास्त गाळे द्यावेत. महाराष्ट्रातील १५ वर्षे वास्तव्याची अट शिथिल करू नये.

मध्यम उत्पन्न गट

५) गाळ्यांच्या (चौथ्यांपर्यंत) किंमतीपोटी रु. ११,५००/- पैकी हप्ता रु. ३,१४३/- घ्यावा व बाकीची किंमत मासिक समान हप्त्यांनी योजनेतील दराने व्याजासह १५ वर्षांच्या कालावधीत घेण्यात यावी.

एका अर्जदाराने मागणी केल्यास एकापेक्षा जास्त गाळे द्यावेत.

**Item No.** 5 **Resolution No.** 1191

विषय : गोराई रोड, बोरिवली, ओशिवरा, अंधेरी व वर्सोवा, मालाड येथील भूभागावर झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यासाठी विकसित भूखंड तयार करणे.

ठराव : निर्णय घेतला की,
१) बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे :
१) गोराई रोड - बोरिवली
२) ओशिवरा - अंधेरी व
३) वर्सोवा मालाड (अंधेरी)
येथील भूभागांवर मुंबई शहरातील गलिच्छवस्ती वासियांचे पुनर्वसन करण्यासाठी विकसित भूखंड तयार करण्यात मान्यता देण्यात येत आहे. शासनाकडून खर्चाची परतफेड होण्याच्या लेखी आश्वासन लक्षात घेऊन तूर्त या कामावर प्राधिकरणाच्या फंडातून खर्च करावा.
२) योजना हाती घेण्यापूर्वी मुंबई महानगरपालिकेकडून भूखंडावरील आरक्षण रद्द करून घ्यावे.
३) प्रत्येक योजनेचे नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी प्राधिकरणास सादर करावी. प्रत्येक कामाचा वेगळा हिशेब ठेवून वेळेवर शासनाकडून परतफेड मागवावी.
४) बाब टिप्पणीतील परिच्छेद (क) मधील १ ते ११ मुद्द्यांची पूर्तता करावी.

---

**Item No.** 8 **Resolution No.** 1194

विषय : नेहरूनगर, कुर्ला येथील (११६० गाळे) अल्प उत्पन्न गट योजनेखाली बांधलेल्या इमारत क्र. ७० हिच्या सज्ज्यांना मजबूती आणणे व इतर दुरुस्तीची कामे करण्याच्या प्रस्तावाबाबत विचार करणे.

ठराव : निर्णय घेतला की, इमारत क्र. ७०, नेहरूनगर, कुर्ला (अल्प उत्पन्न गट) हिच्या बाल्कनीच्या दुरुस्तीकरिता लागणाऱ्या रु. २,०९,०००/-च्या खर्चात व प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे. याबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.
१) या इमारतीतील गाळेधारकांनी रु. १,७५,०००/-चा भरणा केल्यामुळे उरलेली रक्कम म्हणजे रु. ३४,०००/- मंडळाने खर्च करून दुरुस्तीची कामे पूर्ण करावी व त्यानंतर दुरुस्तीपोटी खर्च केलेली रक्कम व्याजासह मासिक हप्त्यात गाळेधारकांकडून वसूल करावी.
२) जर सोसायटीची स्थापना झाली नसेल तर ती त्यांनी इमारत दुरुस्ती करण्याच्या काळामध्येच सांगण्यास सांगावे.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **03/Mar/1986** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **2** | **Resolution No.** | **1188** |

विषय : महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई यांना मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहतीतील दूध व दुधापासून बनविलेले पदार्थ विक्रीसाठी बुथसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत.

ठराव : प्रशासक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी बाब सूचीत नमूद केलेल्या वसाहतीतील ८ बाय ६ फूट आकाराचे मोकळे भूखंड महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित मुंबई त्यांना खालील अटींवर वितरित करण्यात यावेत.

१. भूखंडाचे अधिमूल्य जमिनीची मूळ किंमत अधिक जमिनीच्या विकासावरील खर्चासह दुप्पट आकारण्यात यावे. भाडेपट्ट्याचा दर वार्षिक अधिमूल्याच्या रकमेच्या १ टक्का आकारण्यात यावा.

२. भाडेपट्ट्याचा काल प्रथम दहा वर्षांचा असावा.

३. दूध व दुधापासून बनविलेल्या खाद्य पदार्थांची विक्री करण्यासाठी महासंघाने शक्य तो वसाहतीतील अपंग, तसेच निराधार स्त्रिया याची वितरक म्हणून नेमणूक करावी.

४. मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या अन्य वसाहतीमधील भूखंड महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ त्यांना यापुढे वरील कारणासाठी वरील शर्थीवर वितरित करण्याचे अधिकार मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 05/Mar/1986

**Item No.** 6 **Resolution No.** 1192

विषय : धुळे शहरातील चार गलिच्छवस्ती सुधार कामांना प्रश्शासकीय मान्यता देण्याबद्दल

ठराव : औरंगाबाद मंडळाकडून आलेल्या धुळे शहरातील चार गलिच्छ वस्त्यांना म्हणजे :

| | | |
|---|---|---|
| १) भंगी कॉलनी (फायनल प्लॉट ५७) | रु. | ४३,५७०/- |
| २) भंगी कॉलनी, देवपूर, धुळे | रु. | ५६,०६०/- |
| ३) मांग गारुडी वस्ती | रु. | ७८,२९५/- |
| ४) शेलारवाडी | रु. | ३८,७०८/- |
| एकूण | रु. | २,१६,६३३/- |

तात्पुरती (प्रोव्हिजनल) प्रशासकीय मान्यता एकूण रु. २,१६,६३३/- एवढ्या रकमेला देण्यात येत आहेत. वरील प्रस्तावात मानकाप्रमाणे व सर्व सुविधांची तरतूद नसल्यामुळे मुख्य अधिकारी यांनी या वस्त्यांची पुन्हा पाहणी करून सुधारित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. वरील तात्पुरत्या प्रशासकीय मान्यतेनुसार कामे चालू करून ठरविलेली तरतूद व उद्दिष्ट पूर्ण करावेत. कामे चालू करण्यापूर्वी गलिच्छ वस्त्या विधीवत घोषित झाल्या आहेत याची खात्री करून घ्यावी.

**Item No.** 6 **Resolution No.** 1192

विषय : धुळे शहरातील चार गलिच्छवस्ती सुधार कामांना प्रश्शासकीय मान्यता देण्याबद्दल

ठराव : औरंगाबाद मंडळाकडून आलेल्या धुळे शहरातील चार गलिच्छ वस्त्यांना म्हणजे :

| | | |
|---|---|---|
| १) भंगी कॉलनी (फायनल प्लॉट ५७) | रु. | ४३,५७०/- |
| २) भंगी कॉलनी, देवपूर, धुळे | रु. | ५६,०६०/- |
| ३) मांग गारुडी वस्ती | रु. | ७८,२९५/- |
| ४) शेलारवाडी | रु. | ३८,७०८/- |
| एकूण | रु. | २,१६,६३३/- |

तात्पुरती (प्रोव्हिजनल) प्रशासकीय मान्यता एकूण रु. २,१६,६३३/- एवढ्या रकमेला देण्यात येत आहेत. वरील प्रस्तावात मानकाप्रमाणे व सर्व सुविधांची तरतूद नसल्यामुळे मुख्य अधिकारी यांनी या वस्त्यांची पुन्हा पाहणी करून सुधारित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. वरील तात्पुरत्या प्रशासकीय मान्यतेनुसार कामे चालू करून ठरविलेली तरतूद व उद्दिष्ट पूर्ण करावेत. कामे चालू करण्यापूर्वी गलिच्छ वस्त्या विधीवत घोषित झाल्या आहेत याची खात्री करून घ्यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 07/Mar/1986

**Item No.** 7 **Resolution No.** 1193

विषय : दादासाहेब गायकवाडनगर, मालवणी येथे शिधावाटप केंद्राकरता जागा मिळणेबाबत श्री. दत्तात्रय शंकर पिंगळे यांची विनंती.

ठराव : निर्णय घेतला की, सदरहू गाळा अनिवासी वापर करताच ठेवलेला असल्यामुळे त्या गाळ्याचे सहकारी संस्थेस सरकार मान्य शिधावाटप केंद्र चालविण्यास देण्यात अडचण नाही. वितरण खालील अटींवर करता येईल.

१) दरमहा वाजवी भाड्याच्या तिप्पट भाडे अधिक सेवाआकार भरावा लागेल.

२) या रकमेच्या तिप्पट 'भाडेपट्टा अनामत' रक्कम म्हणून सुरुवातीस भरावी लागेल.

३) संस्थेला शिधावाटप दुकानाचा अधिकृत परवाना मिळाल्यानंतरच गाळ्याचा ताबा देण्यात येईल.

४) गाळ्याचा वापर फक्त सरकारमान्य शिधावाटप दुकानाकरताच करता येईल.

५) जर मंडळाने सदरहू वसाहतीतील गाळे विक्रीस काढले तर संस्थेला या गाळ्यांची मंडळ ठरवील ती किंमत भरावी लागेल.

६) कोणतेही कारण न देता वितरण रद्द करण्याचे अधिकार मंडळ राखून ठेवील.

७) संस्थेने श्री. दत्तात्रय शं. पिंगळे व तत्सम इतर अपंग व्यक्तींना आपल्या कार्यात सामावून घ्यावे.

८) संस्थेचे सभासदत्व मंडळाच्या मालवणी वसाहतीमधील सर्व रहिवाशांना सर्वदा खुले ठेवलेच पाहिजे.

---

**Item No.** 9 **Resolution No.** 1195

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील निवासी भूखंडधारकांनी भाडेपट्टा करारनाम्यातील कलमांचे केलेले भंग अतिरिक्त अधिमूल्य व सुधारित वार्षिक भाडेपट्टी आकारून क्षमापित करणेबाबत.

ठराव : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे ज्या व्यक्तींना स्वतः निवासस्थान बांधण्यासाठी भूखंड देण्यात आले होते अशा भूखंड धारकांनी काही अंशी बांधकाम केलेले आहे. परंतु मुदतीत पूर्ण केले नाही. अशा भूखंडधारकांना आकारावयाची अतिरिक्त मूल्याची रक्कम कमी करून त्यांना आकारण्यात येणाऱ्या नेहमीच्या दरापेक्षा निम्म्या दराने (रु. ७५० दर चौ. मीटर) आकारण्यात यावी व ज्यांचे बांधकाम अपूर्ण आहे त्यांना जरूर ती मुदतवाढ देण्यात यावी.

| **Item No.** | **10** | **Resolution No.** | **1196** |
|---|---|---|---|

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील प्लॉट क्रमांक ३८ या निवासी भूखंडाचे हस्तांतरण करण्याबाबत.

ठराव : प्रशासक/प्राधिकरण यांनी जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील प्लॉट क्रमांक ३६ संबंधी भाडेपट्टा दुसऱ्या व्यक्तीच्या नावे बदलून देण्यासंबंधी जे मुद्दे नमूद केले आहेत ते लक्षात घेऊन अशा प्रकरणी भूखंड धारकाला पूर्वीच्या भूखंडाची किंमतीच्या तुलनेत अनर्जित रकमेचा फायदा (अनअर्नड् इन्कम) होईल त्याचा ५० टक्के फायद्याची रक्कम मुंबई मंडळाने वसूल करावी.
अशाच प्रकारची इतर प्रकरणे मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी यांचेमार्फत तपासून त्वरित सादर करण्यात यावीत.

| **Item No.** | **11** | **Resolution No.** | **1197** |
|---|---|---|---|

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील गाळे इंडियन नॅशनल काँग्रेस यांना काँग्रेस शताब्दी समारोहासाठी तात्पुरत्या वापरासाठी भाड्याने देणे.

ठराव : इंडियन नॅशनल काँग्रेस या संस्थेस काँग्रेस शताब्दी समारोहासाठी मुंबई मंडळातील गाळे तात्पुरत्या स्वरुपात भाड्याने देण्यासंबंधी मंजूर केलेल्या ठराव क्रमांक ११४० मध्ये सुधारणा करून खालीलप्रमाणे करण्यात आलेल्या कार्यवाहीत मान्यता देण्याचा सुधारित निर्णय घेतला.
१) वांद्रे पुनःप्रापण योजनेतील उच्च उत्पन्न गटाच्या तीन इमारतींतील ८४ गाळ्यांऐवजी २२ गाळे इंडियन नॅशनल काँग्रेस या संस्थेस देण्यात आले.
२) या ८४ गाळ्यांपैकी उरलेले ६२ गाळे शासनाच्या सामान्य प्रशासन विभागास काँग्रेस शताब्दी समारोहासाठी मुंबईत येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची रहाण्याची व्यवस्था करण्यासाठी देण्यात आले.
३) इंडियन नॅशनल काँग्रेस या संस्थेने काळाचौकी येथे संक्रमण शिबिरासाठी बांधलेले गाळे घेतलेले नाहीत.
४) ६ पैकी ५ पुनर्रचित इमारतींतील गाळे इंडियन नॅशनल काँग्रेस या संस्थेने घेतले.
५) इंडियन नॅशनल काँग्रेस या संस्थेने वर निर्देशित केलेले सर्व गाळे दिनांक २७.१२.८५ ते १०.१२.८५ या कालावधीसाठी घेतले. या कालावधीचे या गाळ्यांचे भाडे व सेवाआकार त्या संस्थेस आकारण्यात आले आहेत.
६) सामान्य प्रशासन विभागास देण्यात आलेल्या ६२ गाळ्यांचा ताबा त्या विभागातर्फे सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक २४.१२.८५ रोजी घेतला. त्या दिवसापासून दिनांक ३०.१२.८५ पर्यंत या गाळ्यांचा ताबा त्या विभागाकडे होता. या कालावधीचे (सात दिवस) भाडे तसेच नुकसान भरपाई सामान्य प्रशासन विभागात आकारण्यात आले आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **25/Mar/1986**

**Item No.** **18** **Resolution No.** **1204**

विषय : सासवड येथे बांधण्यात आलेल्या गाळ्यांचे वाटप

ठराव : निर्णय घेतला की,

१) गाळ्यांचे वाटप करताना पात्रतेचे उत्पन्न मर्यादा लावू नये मात्र अर्जदार ज्या उत्पन्न गटातील असेल त्या उत्पन्न गटासाठी हुडकोने ठरविलेल्या दराने व्याज आकारण्यात यावे.

२) मागासवर्गीयांचे राखीव गाळे शासनाच्या पूर्वसंमतीने वळते करण्यास हरकत नाही.

३) किंमतीपोटी घ्यावयाची सुरुवातीची रक्कम ५० टक्के घेऊन बाकी रक्कम सहा महिन्यांच्या मुदतीत योजनेच्या दराने व्याजासहित घ्यावी व त्यासाठी क्षतीपूर्ती बंधपत्र घ्यावे.

४) भाडेखरेदी कालावधी वाढविण्यात येऊ नये.

५) ज्या गाळेधारकांना भविष्य निर्वाह निधीतून रक्कम मिळाल्यास कालावधी होण्याची शक्यता आहे, त्यांचेकडचे सुरुवातीची रक्कम भविष्य निर्वाह निधीमधून कर्ज मिळाल्यावर दरम्यानच्या काळासाठी व्याज आकारून स्वीकारायला हरकत नाही. तसेच क्षतीपूर्ती बचतपत्र सिक्युरिटी बॉंड घेऊन गाळ्यांचा ताबा देण्यास मंडळाने गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा.

---

**Item No.** **19** **Resolution No.** **1205**

विषय : अभ्युदय नगर काळाचौकी येथे अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेखाली बांधलेल्या काही इमारतींना टेकू लावण्यासाठी करावयाच्या खर्चास मंजूरी देणे.

ठराव : अभ्युदय नगर काळाचौकी येथील इमारत क्र. ४, १०, २०, २४, ३१ (१/२ बाजू) ११ अ व ३४ या धोकादायक स्थितीत असलेल्या इमारतींना टेकू लावण्याच्या अंदाजे ३९,५००/- रुपये खर्चाच्या कामास मंजूरी देण्याच्या प्रशासक/प्राधिकरण या ठरावाद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे.

सदर खर्च हा सध्या प्राधिकरण निधीतून खर्च करून 'संकीर्ण अग्रिम' या निलंबन लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व भविष्यात संबंधित गाळ्यांच्या विक्री किंमतीत योग्य वाढ करून वसूल करावा असाही निर्णय प्राधिकरणाने घेतला.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 03/Apr/1986 |
|---|---|---|---|

**Item No.** 1 **Resolution No.** 1206

विषय : इचलकरंजी (कोल्हापूर) येथील वसाहतीत भाडेकरूंच्या सहकारी संस्थेला कार्यालयाच्या इमारतीसाठी देण्यात आलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
इचलकरंजी येथील अत्यल्प उत्पन्न गट (५० गाळे) इमारत क्रमांक १६ व १९ च्या २० रुंद रस्त्याला लागून असलेला सुमारे ७३२० चौ. फूट आकाराचा भूखंड येथील अत्यल्प उत्पन्न गट भाडेकरू सहकारी गृह मालकी संस्था लिमिटेड यांना भूखंड वाटपाच्या नेहमीच्या अटी व शर्थींना अधीन राहून फक्त यांच्या कार्यालयीन इमारतीसाठी देण्यात यावा. इतर कारणासाठी भूखंडाचा वापर होऊ न देण्याची काळजी घ्यावी.
तसेच गाळ्याच्या किंमतीतच भूखंडाची किंमत वसूल झाल्याचे लक्षात घेऊन संबंधित उत्पन्न गटाला फक्त लागू असलेले वार्षिक भुईभाडे आकारावे. भाडेपट्ट्याचा काळ ३० वर्षे ठेवण्यात यावा.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 08/Apr/1986 |
|---|---|---|---|

**Item No.** 2 **Resolution No.** 1207

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील ६/६२ क्रमांकाचा गाळा काळजीवाहू तत्त्वावर देण्याकरिता आकारण्यात आलेली फी कमी करण्याबदल - श्री. श. ना. माने यांची विनंती.

ठराव : निर्णय घेतला की, प्राधिकरणाने दिनांक ३१.५.८५ रोजी मंजूर केलेल्या ठराव क्रमांक १०५४ मध्ये सुधारणा करून श्री. माने यांना गाळा काळजीवाहू तत्त्वावर देण्याची परवानगी देण्यासाठी प्रतिवर्षी रु. १०००/- याप्रमाणे फी आकारण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 1210

विषय : अर्हताप्राप्त वाहनचालकांना कनिष्ठ लिपीक पदावर सामावून घेण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, अर्हताप्राप्त वाहनचालकांनी 'कनिष्ठ लिपीक' पदावर बदली मागितल्यास एक वर्षाचे अवधीत इंग्रजी/मराठी टंकलेखन अर्हता प्राप्त करण्याच्या अटीवर या कर्मचाऱ्यांना कनिष्ठ लिपीक पदावर सामावून घेण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 09/Apr/1986

**Item No.** 3 **Resolution No.** 1208

विषय : संचालक, जागतिक बँक प्रकल्प यांना गलिच्छ वस्ती दर्जा सुधार योजनेच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करणेबद्दल.

ठराव : निर्णय घेतला की,
संचालक, जागतिक बँक प्रकल्प यांना मुंबई महानगरपालिकामधील गलिच्छ वस्ती दर्जा सुधार (स्लम अपग्रेडेशन) कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करण्याला मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 4 **Resolution No.** 1209

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचारी वर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला प्राजक्ता सहकारी गृहनिर्माण संस्था सुंदर नगर, कोलेकल्याण येथे देण्यात आलेला भूखंड बदलून देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
श्री. एस. के. पाटील, मुख्य प्रवर्तक, प्राजक्ता सहकारी गृहनिर्माण संस्था त्यांच्या समासदांच्या निवासासाठी सुंदर नगर, कोलेकल्याण येथे सुमारे ६६४ चौ. मी. आकाराचा भूखंड देण्यात आला होता. बाब टिप्पणीत नमूद केलेल्या समासदांच्या अडचणी लक्षात घेऊन लोकेकल्याण येथील भूखंडाऐवजी जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील सुमारे ६८८ चौ.मी. आकाराचा भूखंड वितरित करण्यात यावा. तसेच पूर्वीच्या कळविण्यात आलेल्या सर्व अटी संस्थेवर बंधनकारक समजण्यात याव्यात.

**Item No.** 7 **Resolution No.** 1212

विषय : मुंबई नागरी विकास प्रकल्प १

गोराई मार्ग, बोरिवली (प.) येथील जमिनीचे पुन:प्रापण

संबंधित कामासंबंधीच्या निविदांचा स्वीकार.

ठराव : वरील कामासाठी एकूण दोन विभागात निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यातील निविदा पुढे दर्शविलेल्या रीतीने स्वीकारण्याचा निर्णय प्रशासक/प्राधिकरण घेत आहेत :
अ) विभाग क्र. १ : या विभागासाठी मे. प्रकाश कन्स्ट्रक्शन आणि इंजिनिअरींग कंपनी यांचे निविदेसाठी जाहीर केलेल्या दराचे वर एकवीस टक्के अधिक (अधिक २१ टक्के) त्यांनी नमूद केलेल्या अधिक २१ टक्केच्या दरावर एक टक्का सूट दिलेली आहे. म्हणजेच अधिक एकोणीस पूर्णांक एकोणऐंशी दशांश टक्के (अधिक १९.७९)
ब) विभाग क्र. २ : या विभागासाठी मे. आर. पी. शहा यांचे निविदेसाठी जाहीर केलेल्या दराचे वर अधिक चोवीस पूर्णांक तीस दशांश टक्के (अधिक २४.३० टक्के) वरील देकार स्वीकारण्यात येत आहेत.
क) मूळ घरांचे बांधकाम विविध उत्पन्न गटातील लोकांच्या प्रत्यक्ष मागणीनुसार मर्यादित ठेवावे.

**Item No.** 8 **Resolution No.** 1213

विषय : अर्थसहाय्यित औद्योगिक योजनेखाली व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधण्यात आलेल्या गाळ्यांची विक्री.

ठराव : निर्णय घेतला की,
वरील माहितीच्या अनुषंगाने व संरचनात्मक दुरुस्तीसाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांना तात्पुरता ब्रिजिंग फायनान्स उपलब्ध करून देण्यासाठी रु. ५३ लाखापर्यंत सन १९८६-८७ साली खर्च करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. हा खर्च शासनाच्या प्राधिकरणाकडे एस. आय. एच. एस. योजनेच्या ३० टक्के जमा रकमेतून प्रथम करावा. त्याची वसूली सव्याज बँक दराने करावा. शासनादेश आल्यानंतर त्याचे अंतिम समायोजन करावे. या रकमेचे हिशेब स्वतंत्र ठेवावेत व लेखा पद्धतीबद्दल वित्त नियंत्रकानी त्वरित सूचना मुंबई मंडळाला निर्गमीत कराव्यात.
हा खर्च संबंधित बँकाकडून शीघ्रताशीघ्र वळता होईल याची दक्षता मुंबई मंडळाने घ्यावी.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 11/Apr/1986

**Item No.** 6 **Resolution No.** 1211

विषय : लोकमान्यनगर, दादर हिंद मिल कंपाऊंड ही मालमत्ता भाडेकरूंच्या सोसायटीला पुनर्बांधणीसाठी मालकी हक्काने देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीस सादर करण्यात आलेल्या बाबींना मान्यता दिली. मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी यांना या बाबतची संपूर्ण कार्यवाही करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.
मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांनी करारनाम्यातील शर्ती व अटी विधी सल्लागार/प्राधिकरण यांच्याकडून मंजूर करून घ्याव्यात. तसेच दर तीन महिन्याला प्राधिकरणास प्रगती अहवाल पाठवावा.

---

**Item No.** 9 **Resolution No.** 1214

विषय : खराडी, पुणे येथे विडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना हाती घेणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
पुणे नागरी समूहात खराडी या गावात कमाल मुधारणा कायदान्वये प्राधिकरणास मिळालेल्या ५ हेक्टर एवढ्या जागेवर किंवा इतर नियोजित ठिकाणी पुणे येथील विडी कामगार संघटनेने विनंती केल्याप्रमाणे विडी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्यात यावी. या प्रकल्पासाठी अधिकृत संस्था म्हणून नेमणूक होण्यासाठी शासनाच्या श्रम विभागाकडे विनंती करण्यात यावी. तसेच कल्याण व उपकर आयुक्त यांची या योजनेस प्रारंभिक मान्यता पण मिळवावी. सदर योजना केंद्र शासनाच्या विडी कामगार घरकुल योजनेबाबतच्या सर्व अटींचे पालन करून तयार करण्यात यावी. सदर प्रकल्पात विडी कामगारांची मागणी पुरेशी न आल्यास सर्वसाधारण जनतेकडून पण अर्ज मागवण्यास हरकत नाही.

---

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 29/Apr/1986 |
|---|---|---|---|
| **Item No.** | **10** | **Resolution No.** | **1215** |

विषय : मुंबई उपनगर वीज पुरवठा कंपनीला (बीएसइएस) पोईसर, कांदिवली येथील वसाहतीत ट्रान्सफॉर्मर उभारण्यासाठी भूखंड देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या पोईसर, कांदिवली येथील वसाहतीत सध्या कार्यरत असलेल्या मुंबई उपनगर वीज पुरवठा कंपनीच्या उपकेंद्राजवळील सुमारे ३१९ चौ. वार आकाराचा भूखंड त्याच कारणासाठी मुंबई उपनगर वीज पुरवठा कंपनीला ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यात यावा. भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीविषयक धोरणानुसार पब्लिक युटिलिटी अँड सर्विसेससाठी अधीन राहून जे अधिमूल्य आकारले जाते ते अधिमूल्य नेहमीच्या शर्ती व अटींना आकारण्यात यावे.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 02/May/1986 |
|---|---|---|---|
| **Item No.** | **1** | **Resolution No.** | **1216** |

विषय : हुडको अर्थसहाय्याने ग्रामीण भागात भूमिहीन व बेघर कामगारांसाठी घरकुले बांधण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या १९८५-८६ मधील योजनेस, शासनाचे वतीने म्हाडाने हुडकोकडून अर्थसहाय्य मिळवून देण्यास मान्यता देण्याबाबत.

ठराव : ग्रामीण भागातील भूमिहीन व बेघर कामगारांसाठी घरकुले बांधण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या १९८५-८६ मधील योजनेस म्हाडाद्वारे महाराष्ट्र शासनास हुडकोकडून अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीस अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 06/May/1986

**Item No.** 2 **Resolution No.** 1217

विषय : नागपूर येथील भामटी, परसोडी व बिनाकी येथील गाळ्यांचे वाटप करण्याच्या बाबतीत अटी शिथिल करणे.

ठराव : निर्णय घेतला की, नागपूर येथील भामटी-परसोडी व बिनाकी येथील अल्प उत्पन्न गटाच्या सोबतच्या वितरणपत्रात दर्शविलेल्या दोन योजनांतील उरलेल्या गाळ्यांचे वाटप खालीलप्रमाणे अटी शिथिल करून करण्यात यावे.
१) पात्रतेची उत्पन्न मर्यादा पुढील उत्पन्न गटातील मर्यादेपर्यंत म्हणजे मासिक उत्पन्न रु. १५००/- पर्यंत वाढवावी. मात्र पुढील उत्पन्न गटांसाठी असलेल्या दराने व्याज लावून किंमत आकारण्यात यावी.
२) एका अर्जदारास एकापेक्षा अधिक गाळे पाहिजे असल्यास द्यावेत. मात्र व्यक्तिगत अर्जदारास तूर्त दोनच गाळे द्यावेत. अर्जदार एखादी मान्यताप्राप्त संस्था असल्यास दोनापेक्षा अधिक गाळे द्यावेत.
३) किंमतीच्या प्रारंभित हप्ता सुरुवातीस ५० टक्के घेऊन बाकी ५० टक्के रक्कम दोन वर्षांच्या मुदतीत विलंबापोटी योजनेतील दराने व्याज आकारून त्यासह वसूल करावी.
४) पुढील उत्पन्न गटासाठी असलेले व्याज लावल्याने किंमतीतील जी वाढ होईल ती भाडेखरेदी कालावधीत मासिक समान हप्त्यांबरोबर वसूल करावी.

**Item No.** 3 **Resolution No.** 1218

विषय : १ मे 'महाराष्ट्र राज्य स्थापना दिनी' गृहनिर्माण वृत्त विशेष पत्र प्रसिद्ध करण्याविषयी व त्या प्रित्यर्थ येणाऱ्या खर्चाला प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
'गृहनिर्माण वृत्त विशेष पत्र' १ मे १९८६ रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या दिनी, प्रसिद्ध करण्यास व वृत्त विशेष पत्राच्या १००० प्रती छापून घेण्यास मान्यता देण्यात येत असून, त्या प्रित्यर्थ येणाऱ्या रु. ४,०००/- (अक्षरी रुपये चार हजार फक्त) खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 14/May/1986

**Item No.** 5 **Resolution No.** 1220

विषय : कंत्राटी नेमणुका/मुदतवाढ

ठराव : निर्णय घेतला की, ज्यांच्या कंत्राटी नेमणुका ३०.४.८६ रोजी संपत आहेत त्यांना पुढील आदेश मिळेपर्यंत अतांत्रिक पदांवरील बढत्यांची प्रकरणे निकाली निघेपर्यंत मुदतवाढ देण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली आहे. मात्र त्यांच्या नेमणुका दहा दिवसांचे नोटीसने केव्हाही संपुष्टात येईल.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 16/May/1986

**Item No.** 6 **Resolution No.** 1221

विषय : ॲबझॅक फाऊंडेशन यांना नियोजित माध्यमिक, महाविद्यालयीन अशा शैक्षणिक कार्यासाठी वांद्रे रिक्लेमेशन येथे मूखंड देण्याबाबत.

ठराव : वांद्रे पुर्नप्रापण येथे ॲबझॅक फाऊंडेशन या संस्थेला शैक्षणिक कार्यासाठी सुमारे ६००० चौ. मीटर आकाराचा मूखंड देण्याचा निर्णय मूखंडाबाबतच्या अटींची पूर्तता न केल्यामुळे रद्द करण्यात येत आहे.
मूखंडावर अतिक्रमण होऊ नये या उद्देशाने ॲबझॅक फाऊंडेशनने मूखंडासभोवती कंपाऊंड वॉल व तारेचे कुंपण घालण्यासाठी काही खर्च केला असल्यास त्यापोटी देय रक्कम खात्री केल्यावर त्यांना अदा करण्यात यावी.
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने सदरहू मूखंडाचा योग्य प्रकारे उपयोग त्वरीत करावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 19/May/1986

**Item No.** 7 **Resolution No.** 1222

विषय : येरवडा येथील 'बी' प्रकारच्या गाळ्यांचे बांधकाम अपूर्ण काम पूर्ण करणे.

ठराव : निर्णय घेतला की,
येरवडा येथील 'ब' प्रकारच्या गाळ्यांचे उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्यासाठी मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांनी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तरतूदीनुसार निविदा न मागविता परंतु सीलबंद परपत्रके मागवून फुटकळ ठेकेदारांकडून जलदगतीने काम पूर्ण करण्यासाठी घेतलेल्या कारवाईस प्राधिकरण एक विशेष बाब म्हणून संमती देत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 21/May/1986

**Item No.** 8 **Resolution No.** 1223

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या सोलापूर (भाग-१ व भाग-२) येथील नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण रु. ४७५.०४ लक्ष कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 26/May/1986

**Item No.** 9 **Resolution No.** 1224

विषय : मोईवाडा, भुसावळ, जि. जळगांव येथील गलिच्छवस्ती सुधार योजना ——— भुसावळ नगरपरिषदेने सादर केलेल्या गलिच्छवस्ती सुधार योजनेच्या कामांच्या अंदाजपत्रकात प्रशासकीय मान्यता देण्याविषयी.

ठराव : निर्णय घेतला की,
गलिच्छवस्ती सुधार योजनेअंतर्गत जळगांव जिल्हयात १९८६-८७ या वर्षात नवीन कामे हाती घेण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत दर्शविल्याप्रमाणे भुसावळ शहरातील (जिल्हा - जळगांव) माईवाडा या ८०० लोकसंख्येच्या गलिच्छवस्ती सुधार योजनेच्या रु. १,७२,०००/- (रु. एक लाख बहात्तर हजार फक्त) एवढ्या अंदाजित रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. व त्याप्रमाणे कामे चालू करण्यात यावी. अंदाजपत्रकात मान्य केलेल्या आर्थिक तरतूदींचे अधिन राहून खर्च करण्यात यावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 28/May/1986

**Item No.** 10 **Resolution No.** 1225

विषय : नागपूर मंडळासाठी दिनांक ४-८-८५ ते २६-१२-८५ या कालावधीसाठी स्थायी वकिलाची नेमणूक करण्याबाबत.

ठराव : असा निर्णय घेतला की,
श्री. डे यांची नागपूर मंडळासाठी दिनांक ४-८-८५ ते २६-१२-८५ या कालावधीसाठी दरमहा रुपये ६००/- मासिक वेतनावर नेमणूक करणेस प्रशासकांनी अनुमती दिली व मुख्य अधिकारी, नागपूर मंडळ यांनी श्री. डे यांना स्थायी वकील म्हणून वरील कालावधीत केलेल्या कामासाठी दरमहा रुपये ६००/- प्रमाणे दिलेल्या मासिक वेतनास मान्यता दिली.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 03/Jun/1986

**Item No.** 1 **Resolution No.** 1226

विषय : श्री. एम. जी. प्रधान, कार्यकारी अभियंता यांना कंत्राटी नेमणूक देण्याबाबत.

ठराव : श्री. एस्. जी. प्रधान कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना प्राधिकरणाच्या सेवेत हजर झालेल्या तारखेपासून प्रारंभी तीन महिन्यासाठी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अन्य कार्यकारी अभियंता प्रतिनिधीयुक्तीवर येईपर्यंत यापैकी जो कालावधी आधी संपेल तोपर्यंत कंत्राटी नेमणूक देण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी प्राप्त परिस्थितीचा विचार करून मान्यता दिली.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 06/Jun/1986

**Item No.** 2 **Resolution No.** 1227

विषय : मुंबईतील जुन्या इमारतीच्या दुरुस्ती पुनर्रचना कार्यक्रमाच्या अंतर्गत (१) जागा रिकामी करून देण्याचा निर्णय काढणे, (व्हेकेशन नोटीस) (२) नोटीसीमधील नावात बदल करणे आणि (३) पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांच्या हस्तांतरणास परवानगी देणे यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती.

ठराव : निर्णय घेतला की,
दिनांक १३/३/१९८६ रोजी प्रशासकांनी बोलाविलेल्या अधिकाऱ्यांच्या बैठकीचे कार्यवृत्त स्वीकृत करण्यात येत आहे. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी. व शासनालाही कळविण्यात यावे.

**Item No.** 4 **Resolution No.** 1229

विषय : वांद्रे पुनःप्रापण क्षेत्रात उच्च उत्पन्न गटातील ५६ अतिरिक्त गाळ्यांच्या बांधकामाचे काम, सध्या त्याच ठिकाणी १४० गाळ्यांचे बांधकाम करीत असलेले मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांना देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
वरील बाबींचा विचार करून व शासनाचा आदेश लक्षात घेऊन प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, वांद्रे पुनःप्रापण क्षेत्रात उच्च उत्पन्न गटातील २ इमारतीत ५६ अतिरिक्त गाळ्यांचे बांधकाम सध्या त्याच ठिकाणी १४० गाळ्यांचे बांधकाम करीत असलेल्या मे. बी. जी. शिर्के आणि कंपनी यांना सध्याच दर चौ. फुटास रु. १५०/- या दराने रु. ७६,६५,१११/- एवढ्या किंमतीचे काम देण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 09/Jun/1986

**Item No.** 3 **Resolution No.** 1228

विषय : श्री. एस. व्ही. ताथवडकर, विधी सल्लागार यांच्या पुनर्नेमणूकीची मुदत एक वर्ष वाढविण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
श्री. एम्. व्ही. ताथवडकर, विधी सल्लागार यांनी १ जुलै १९८६ नंतर आणखी एक वर्ष सध्याच्या अटी व शर्तीवर मुदतवाढ मंजूर करण्यात येत आहे. ही शेवटची मुदतवाढ असल्याने शासनाकडून किंवा इतर संस्थांकडून या पदासाठी योग्य व्यक्ती निवडण्याची सत्वर कार्यवाही करावी.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **12/Jun/1986**

**Item No.** **5** **Resolution No.** **1230**

विषय : औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने औरंगाबाद येथे प्रिंट्रॅव्हल हॉटेलजवळ बांधलेल्या दोन इमारतीमधील कार्यालयीन जागेचे वाटप.

ठराव : निर्णय घेतला की,
औरंगाबाद येथे प्रिंट्रॅव्हल हॉटेलजवळ बांधलेल्या इमारत क्रमांक २ मधील पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयीत जागेचे वाटप अन्न व औषध प्रशासन यांना भाडेपद्धतीवर करण्यासाठी ठराव क्र. १११३ अनुसार घेतलेला निर्णय रद्द करण्यात येत आहे. त्याऐवजी या जागेचे वाटप भाडेपद्धतीने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना देण्याच्या मुख्य अधिकारी, औरंगाबाद मंडळ यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. मात्र ही जागा विक्री पद्धतीवर देण्याचे प्रयत्न चालू ठेवावे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **16/Jun/1986**

**Item No.** **6** **Resolution No.** **1231**

विषय : बर्माशेल ऑईल कंपनी यांच्या गाळ्यांमध्ये रहाणाऱ्या कर्मचाऱ्यांना कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
बाब टिप्पणीतील माहितीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 17/Jun/1986

**Item No.** 7 **Resolution No.** 1232

विषय : नागपूर येथे हातमाग विणकरांसाठी गृहनिर्माण योजना - २२४ अल्प उत्पन्न गटांतर्गत हातमाग विणकरांसाठी खसरा नं. ४८/१ के, ४८/१ के एच मानेवाडा, नागपूर येथील गृहनिर्माण योजना.

ठराव : निर्णय घेतला की,
मानेवाडा, नागपूर येथे कमाल जमीन मूधारणा अधिनियमांतर्गत अतिरिक्त घोषीत केलेल्या व प्राधिकरणास वाटप करण्यात आलेल्या १४.७७ हेक्टर जमिनीवरील ४६१ सोयीसह भूखंड व २२४ अल्प उत्पन्न गटासाठी बांधण्यात येणारे गाळे नागपूरमधील हातमाग विणकरांसाठी वाटप करण्यात यावेत यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.
केंद्र शासनाने पुरस्कृत केलेल्या हातमाग विणकरांसाठी कार्यशाळा व गृहनिर्माण योजनेतंर्गत मानेवाडी, नागपूर येथे बांधण्यात येणाऱ्या २२४ अल्प उत्पन्न गटाच्या गाळ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाचे अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी प्रस्ताव राज्य शासनाच्या सहकार विभागास पाठविण्यात यावा. कार्यशाळेचे बांधकाम अनुदान प्राप्त झाल्यानंतरच हाती घेण्यात यावे. गाळ्यांचे बांधकाम मात्र, हुडकोने मंजूर केलेल्या सुधारीत नकाशानुरूप हाती घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 8 **Resolution No.** 1233

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या खराडी, पुणे येथील नागरी गृहनिर्माण योजनेसाठी रु. ११.३६ लक्ष कर्ज हुडकोकडून घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 9 **Resolution No.** 1234

विषय : ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यासाठी प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या १) यवतमाळ २) जालना ३) चंद्रपूर ४) बुलढाणा ५) गडचिरोली ६) परभणी ७) अकोला ८) नांदेड ९) बीड १०) नाशिक ११) जळगाव १२) कोल्हापूर १३) औरंगाबाद १४) सोलापूर १५) अहमदनगर १६) धुळे १७) सोलापूर व १८) वर्धा जिल्हा येथील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण १७५.०८ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **20/Jun/1986**

**Item No.** **12 (A)** **Resolution No.** **1237 (**

विषय : मे. टाटा समाज विज्ञान संस्था यांना आधार संरचना (इन्फ्रास्ट्रक्टर) च्या प्रतिसादाकरिता अभ्यास आणि अर्जांची कमतरता याची कारणे आणि त्यासाठी करावयाचा खर्च याची पहाणी करण्याचे काम देण्याचा विचार करण्याबाबत.

ठराव : मे. टाटा समाज विज्ञान संस्था यांना आधार संरचना (इन्फ्रास्ट्रक्टर) च्या प्रतिसादचा अभ्यास आणि चारकोप येथील 'ब' गटातील भूखंड वाटपासाठी कमी प्रमाणात मिळालेल्या अर्जाच्या विशेष संदर्भाने तसेच बाब टिप्पणीत स्पष्ट केल्याप्रमाणे हे पहाणी काम सोपविण्याच्या आणि अंदाजित रक्कम रु. ७३०२०.०० पर्यंतच्या खर्च करावयाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 23/Jun/1986

**Item No.** 11 **Resolution No.** 1236

विषय : ओशिवरा येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत ३०८ गाळे बांधण्याच्या कामासाठी मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांनी शिर्के सिपोरेक्स उद्योगसमुह यांच्या वतीने दिलेली ठोस रक्कम (लम्पसम) निविदा स्वीकारण्याबाबत विचार करणे.

ठराव : वरील बाबींचा विचार करून व शासनाचा या संबंधीचा आदेश लक्षात घेऊन असा निर्णय घेतला की ओशिवरा येथे उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली आगाऊ अंशदान योजनेअंतर्गत बांधवयाच्या ३०८ गाळ्यांचे एकूण २,७५,१४३ चौ. फूट क्षेत्रफळाचे बांधकाम दर. चौ. फूटास १८२ या दराने रु. ५,००,७७६,०२६/- एवढ्या किंमतीचे काम मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांना देण्याचा प्रस्ताव सदरहू कंपनीने पत्र क्र. बीजीएस/बीएडी/८६/०९४ दिनांक १२-६-८६ अन्वये केलेली विनंती लक्षात घेऊन मान्य करण्यात येत आहे. या दरावर ४ टक्के सुरुवातीची कसर देण्याचे मे. बी. जी. शिर्के यांनी कबूल केलेले आहे. त्यानुसार रु. १७४.७२ प्रति चौ. फूट दराने रु. ४,८०,७२,९८४/- किंमतीची ठोस व एकरकमी दराने निविदा स्वीकृती करण्यास मंजूरी देण्यात येते.
वरील रक्कमेशिवाय शासन निर्णयानुसार इतर कसर (रिबेट) प्राधिकरणास उपलब्ध होईल याची काळजी घेण्यास यावी.

**Item No.** 12 **Resolution No.** 1237

विषय : इमारतीच्या मालकीचे सहकारी संस्थेकडे हस्तांतरण.
भाडेखरेदी पद्धतीवरील गाळेधारकांकडून बाकी किंमत घेताना गाळ्यास अधिकृत गाळेधारक रहातो काय याची तपासणी करणे.

ठराव : निर्णय घेतला की,
इमारतीच्या मालकीचे हस्तांतरण करण्याच्या संदर्भात एखाद्या विशिष्ट इमारतीतील उरलेल्या सर्व गाळ्यांची पूर्ण किंमत/बाकी किंमत व प्राधिकरणाची इतर देणी एकरकमी किंवा व्यक्तिगत गाळेधारक एकाच वेळी भरण्यास सहकारी संस्था तयार असल्यास व सोसायटीची हरकत नसल्यास गाळ्यांची तपासणी न करता व गाळ्यातील अनधिकृत रहिवासी किंवा बांधकाम विचारात न घेता बाकी किंमत स्वीकारण्यात यावी. मात्र अनधिकृत बांधकामाबद्दल नगरपालिकेकडून होणाऱ्या कार्यवाहीस अधिन राहून ही कार्यवाही केली जाईल. इतर परिस्थितीत मात्र गाळ्यांची रितसर तपासणी करून अधिकृत गाळेधारक रहात असला तरच बाकी किंमत स्वीकारावी किंवा त्या गाळ्यातील अनधिकृत रहिवाश्यास प्राधिकरणाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार नियमित करता येत असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर बाकी किंमत स्वीकारावी. अनधिकृत गाळेधारकास नियमित करता येत नसल्यास किंवा सोसायटीची हरकत असल्यास त्याला गाळ्यातून काढून टाकण्याची कारवाई करण्यात यावी.
हा निर्णय शासनाला माहितीसाठी कळविण्यात यावा. मात्र याला प्रसिद्धी देऊ नये.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **30/Jun/1986**

**Item No.** **13** **Resolution No.** **1238**

विषय : जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या समाजविकास कक्षाच्या प्रमुख पदी तज्ज्ञ व्यक्तीची नेमणूक करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
'प्रमुख, समाजविकास कक्ष' या अधिकाऱ्यांसाठी स्वीकृत करावयाचे वेतनश्रेणीचे तत्त्व मान्य करण्यात आले.
श्रीमती पानवलकर यांना त्यांनी इच्छा दर्शविल्यास रु. १२००-१९०० या वेतनश्रेणीत दि. १०/३/१९८६ पासून या टिप्पणीमध्ये निर्देशिलेल्या अटींवर नेमणूक देण्यास मान्यता देण्यात हरकत नाही.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **05/Jul/1986**

**Item No.** **1** **Resolution No.** **1239**

विषय : गृहनिर्माण भवनाच्या आवारामधील बागेकरिता पर्यवक्षकाचे पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, मुंबई मंडळाचे आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंताचे एक पद दिनांक २-७-८६ पासून प्रारंभी एक वर्षाच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात रु.५००-२०-७००-२५-९०० या वेतनश्रेणीत "पर्यवेक्षक" या नामाभिधानाने प्रत्यावर्तीत करण्यात प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10/Jul/1986

**Item No.** 2 **Resolution No.** 1240

विषय : नागपूर मंडळातील गलिच्छ वस्ती सुधार योजना.
सुधार कामंच्या एस्टिमेट्सना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, गलिच्छ वस्ती सुधार योजने अंतर्गत नागपूर, हिंगणघाट, चंद्रपूर व अचलपूर या शहराचे १९८६-८७ चे आर्थिक उदीष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे खालील गलिच्छ वस्ती सुधार कामांच्या एस्टिमेट्सला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शहराचे नाव | एस्टिमेट्सची संख्या | एकूण अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| (अ) | नागपूर | | |
| | १. नवीन अंदाजपत्रके | ११ | ३५,५१,२३९ |
| | २. सुधारित अंदाजपत्रके | १ | २,०७,००० |
| (ब) | हिंगणघाट | | |
| | नवीन अंदाजपत्रके | १ | १,६२,६४३ |
| (क) | चंद्रपूर | | |
| | नवीन अंदाजपत्रके | १ | ३,८९,९८७ |
| (ड) | अचलपूर | | |
| | नवीन अंदाजपत्रके | २ | ७,२२,२०६ |

प्रत्यक्ष कामे हाती घेण्यासाठी खाजगी मालकीच्या जमिनीवरील गलिच्छ वस्त्या १९७१ अधिनियमाच्चये सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारे विधिवत घोषित केल्या याव्यात, तसेच अंदाजपत्रकात मान्य झालेल्या आर्थिक तरतुदींचे अधिन राहून खर्च केला जाईल हे पहावे.

**Item No.** 2 **Resolution No.** 1240

विषय : नागपूर मंडळातील गलिच्छ वस्ती सुधार योजना.
सुधार कामंच्या एस्टिमेट्सना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, गलिच्छ वस्ती सुधार योजने अंतर्गत नागपूर, हिंगणघाट, चंद्रपूर व अचलपूर या शहराचे १९८६-८७ चे आर्थिक उदीष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे खालील गलिच्छ वस्ती सुधार कामांच्या एस्टिमेट्सला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शहराचे नाव | एस्टिमेट्सची संख्या | एकुण अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| (अ) | नागपूर | | |
| | १. नवीन अंदाजपत्रके | ११ | ३५,५१,२३९ |
| | २. सुधारित अंदाजपत्रके | १ | २,०७,००० |
| (ब) | हिंगणघाट | | |
| | नवीन अंदाजपत्रके | १ | १,६२,६४३ |
| (क) | चंद्रपूर | | |
| | नवीन अंदाजपत्रके | १ | ३,८९,९८७ |
| (ड) | अचलपूर | | |
| | नवीन अंदाजपत्रके | २ | ७,२२,२०६ |

प्रत्यक्ष कामे हाती घेण्यासाठी खाजगी मालकीच्या जमिनीवरील गलिच्छ वस्त्या १९७१ अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारे विधिवत घोषित केल्या याव्यात, तसेच अंदाजपत्रकात मान्य झालेल्या आर्थिक तरतुदींचे अधिन राहून खर्च केला जाईल हे पहावे.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **14/Jul/1986** |
|---|---|---|---|

| **Item No.** | **3** | **Resolution No.** | **1241** |
|---|---|---|---|

विषय : जे.व्ही.पी.डी. योजनेतील भूखंड क्रमांक ५६ व ५७ ला लागून असलेला त्रिकोणी आकाराचा छोटा अतिरिक्त भूखंड देण्याबाबत.

ठराव : १. प्राधिकरणाने ठराव क्रमांक ११५८ दि. २८-१-१९८६ अन्वये जुहू विलेपार्ले विकास योजना येथील भूखंड क्रमांक ५६ व ५७ ला लागून असलेला सुमारे १४२ चौ.वार क्षेत्रफळाचा भूखंड वितरित केला आहे. सदर भूखंडाच्या भाडेपट्ट्याची मुदत ३० वर्षे प्रथम देण्यात आलेल्या भूखंडाच्या तारखेपासून धरण्यास यावी असा निर्णय आहे. त्याऐवजी सदरहू भूखंड ७७ वर्षे मुदतीच्या भाडेपट्ट्याने वितरित करावा जेणेकरून पूर्वी देण्यात आलेल्या मूळ भूखंडाच्या भाडेपट्ट्याची समाप्ती मुदत व आता वितरित करावयाच्या अतिरिक्त भूखंडाची मुदत एकाच तारखेला म्हणजे दि. ६.५.२०६३ रोजी संपेल.

२. तसेच भाडेपट्ट्याच्या वार्षिक दर अधिमूल्याच्या एक टक्का आकाराचा असा निर्णय आहे त्याऐवजी वार्षिक भाडेपट्ट्याचा दर अधिमूल्याच्या २.५ आकारण्यात यावा.

३. भूखंडाचे अधिमूल्य वरील ठराव क्रमांक ११५८ मध्ये ठरविलेल्याप्रमाणेच (रू.५००/- चौ.मि.) एवढे राहिल.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **16/Jul/1986** |
|---|---|---|---|

| **Item No.** | **4** | **Resolution No.** | **1242** |
|---|---|---|---|

विषय : कार्यकारी अभियंता दर्जाच्या मुख्य अधिकाऱ्यांना विशेष वेतन देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
पुणे, औरंगाबाद, नागपूर व कोंकण या मंडळाच्या मुख्य अधिकारी पदाचा कार्यभार प्रशासकीय हितास्तव एखाद्या कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यावर सोपविण्यात आल्यास त्यांना प्रतिमास रू.१५०/- "विशेष वेतन" मंजूर करण्यात येत आहे. सदर विशेष वेतन १.१.८४ पासून लागू करण्यात येत आहे.

| **Item No.** | **5** | **Resolution No.** | **1243** |
|---|---|---|---|

विषय : श्री. आर.के. गाय़धनी, सेवानिवृत्त केंद्रीय लेखापाल यांना कंत्राटी नेमणुकीस मुदत वाढ.

ठराव : निर्णय घेतला की, श्री. आर.के. गायधनी यांच्या औरंगाबाद मंडळातील नाशिक विभागासाठी केलेल्या कंत्राटी नेमणुकीस दिनांक ९.६.८६ रोजी सहा महिने पूर्ण होत असून त्यांना दिनांक १०.६.८६ पासून आणखी सहा महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली. योग्य व्यक्ती उपलब्ध झाल्यास श्री. गायधनी यांची नेमणुक त्वरीत संपुष्टात आणण्यात येईल.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 17/Jul/1986

**Item No.** 6 **Resolution No.** 1244

विषय : प्रकल्प सहकारी गृहनिर्माण संस्था बोरिवली या संस्थेला कार्यालयास जागा मिळण्याबाबत.

ठराव : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या गोराईरोड वसाहतीतील इमारत क्रमांक १ मधील रहिवाश्यांच्या "प्रकल्प सहकारी गृहनिर्माण संस्था" मर्यादित या संस्थेच्या कार्यालयीन इमारतीसाठी संस्थेच्या इमारतीला लागून असलेला सुमारे १० बाय १६ फूट आकाराचा भूखंड खालील अटीवर वितरित करण्यात यावा.

१. भूखंडाचे अधिमूल्य मूळ किंमत व विकासावरील खर्चासह आकारण्यात यावी.
२. अधिमूल्याच्या एक टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारावा.
३. भाडेपट्टयाचा काळ ३० वर्षाचा धरण्यात यावा.
४. इमारतीच्या बांधकामास मुंबई महापालिकेची पूर्व संमती घेण्यात यावी.
५. भूखंड वितरणाच्या इतर प्रचलित अटी बंधनकारक धरण्यात याव्यात.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 22/Jul/1986

**Item No.** 7 **Resolution No.** 1245

विषय : नियोजित अरुणोदय सहकारी गृहनिर्माण संस्था यांना टिळकनगर, चेंबूर येथील उच्च उत्पन्न गटाच्या कोड क्रमांक ०४७ च्या अंतर्गत ४८० गाळ्यांपैकी २० गाळ्यांची इमारत देणे.

ठराव : निर्णय घेतला की, अरुणोदय सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांना टिळकनगर, चेंबूर येथे बांधण्यात आलेल्या उच्च उत्पन्न गटाच्या कोड नंबर ०४७ च्या अंतर्गत ४८० गाळ्यांपैकी २० गाळ्यांची एक इमारत एक रकमी विक्रीपद्धतीवर व नेहमीच्या इतर अटी व शर्तीवर वाटप करण्यात यावी. इमारतीचे वाटप संस्थेच्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जाती या चार गटांतील सभासदांनाच गाळे मिळण्याची पात्रता ठरवून करण्यात यावे. या गाळ्यांचे वाटप मागासवर्गीयांच्या २० टक्के राखीव कोट्याच्या अंतर्गत करण्यात यावे.

**Item No.** 9 **Resolution No.** 1247

विषय : जागतिक बँक प्रकल्प विभागाकरिता जादा पदे मंजूर करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या कामाचे स्वरुप व निकड लक्षात घेता, खालील जादा पदे नेमणूकीचे तारखेपासून मंजूर करण्यास या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

उपसंचालक — रू. ५८० — १५०० — १ पद
तहसिलदार — रू. ५०० — ११५० — १ पद

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **25/Jul/1986**

***Item No.*** ***10*** ***Resolution No.*** ***1248***

विषय : श्री. सनम गोरखपुरी व श्रीमती शोभा सनम गोरखपुरी यांना डी.एन. नगर व आझाद नगर अंधेरी येथे वितरित केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव :

१) डी.एन.नगर, अंधेरी येथील वसाहतीत शासनाने यापूर्वी भूखंड देण्याच्या आदेशाचा उद्देश लक्षात घेऊन श्री.सनम गोरखपुरी यांना सुमारे ३५ बाय ४० (१४०० चौ.फूट) पिकाच्या गिरणीसाठी देण्यात आलेल्या भूखंडाच्या भाडेपट्ट्याचा काळ त्याना प्रथम देण्यात आलेल्या तारखेपासून पुढे ३० वर्षे पर्यंत वाढवून देण्यात यावा.

२) भूखंडाचे अधिमूल्य व वार्षिक भाडेपट्टा प्राधिकरणाच्या जमिनी विषयक किंमती नुसार आकारण्यात यावा.

३) डी.एन. नगर, अंधेरी येथील भूखंडाच्या भाडेपट्ट्याचे नुतनीकरण श्री.सनम गोरखपुरी यांचा मुलगा श्री.अशोक सनम गोरखपुरी यांच्या नावे करण्यात यावे. त्याकरिता हस्तांतरण फी म्हणून सध्या कायदेशीर वारस म्हणून रुपये एक हजार अतिरिक्त मूल्य आकारण्यात यावे.

४) श्रीमती शोभा सनम गोरखपुरी यांना आझाद नगर, अंधेरी येथील वसाहतीत सुमारे १५ बाय २० (३०० चौ.सि.) भूखंडाच्या काळ त्यांना प्रथम देण्यात आलेल्या भूखंडाच्या तारखेपासून पुढे २० वर्षे पर्यंत वाढविण्यात यावा.

५) भूखंडाचे अधिमूल्य वार्षिक भाडेपट्टा प्राधिकरणाच्या किंमती विषयक धोरणानुसार आकारण्यात यावा.

६) दोन्ही भूखंडावरील अतिरिक्त बांधकामास महापालिकेची रितसर परवानगी घ्यावी.

---

**Item No.** **11** **Resolution No.** **1249**

विषय : श्री. एस. सांबमूर्ती, मुख्य लखाधिकारी, जागतिक बँक प्रकल्प यांनी सेवानिवृत्तीनंतर दिनांक १/८/१९८६ पासून कंत्राटी नेमणूक देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,

श्री.सांबमूर्ती, लेखाधिकारी/जागतिक बँक प्रकल्प यांची दिनांक १/८/१९८६ पासून प्रारंभी एक वर्षासाठी कंत्राटी नेमणूक नेहमीच्या अटी व शर्तीवर करण्यास प्रशासन/प्राधिकरण यांनी मान्यता दिली. एक महिन्याची नोटीस देऊन ही नेमणूक बंद करता येऊ शकेल.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **04/Aug/1986** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **1** | **Resolution No.** | **1250** |

विषय : ओशिवरा येथे उच्च उत्पन्न गटांतर्गत १६८ गाळे बांधण्याच्या कामासाठी मे. स्ट्रेस क्रीट इंडिया प्रा.लि. यांनी दिलेली ठोस रक्कम (लम्पसम) निविदा स्विकारण्याबाबत विचार करणे.

ठराव : निर्णय घेतला की, आशिवरा येथे उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली आगाऊ अंशदान योजनेअंतर्गत बांधावयाच्या १६८ गाळ्यांचे एकूण १०५८८२ चौ.फूट क्षेत्रफळाचे बांधकाम दर चौ.फूटास १९०/- या दराने रु. २०११७५८०/- एवढ्या किंमतीचे काम मे. स्ट्रेस क्रिट इंडिया प्रा. लि. यांना देण्याचा प्रस्ताव सदरहू कंपनीने पत्र क्र.टी.एन.डी./बी.एचअॅन्ड ए.डी.बी./एचआयजी/३७२२, व ३८०९ दिनांक १.७.८६ आणि १.८.८६ अन्वये केलेली विनंती लक्षात घेऊन मान्य करण्यात येत आहे. या निर्णयासंबंधी शासनास माहिती देण्यात यावी.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **05/Aug/1986** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **2** | **Resolution No.** | **1251** |

विषय : औद्योगिक कामगार आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री योजना.

ठराव : निर्णय घेतला की, औद्योगिक कामगार व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची बाकी किंमत किंवा पूर्ण किंमत तसेच संपूर्ण थकबाकी एकरकमी भरल्यास किंमतीतील अतिरिक्त १० टक्के (एकूण ३० टक्के) सूटीचा लाभ ज्या इमारतीतील गाळेधारकांना उपलब्ध आहे त्यांना तो देण्यासाठी ३१.१०.१९८६ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी तसेच गाळ्यांची बाकी किंमत किंवा पूर्ण किंमत आणि थकबाकी एकरकमी भरल्यास अशा रकमेवर ५ टक्के सूट (डिस्काउन्ट) देण्यासाठी देखील ३१.१०.१९८६ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी याबद्दलचे शासनास कळविण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 06/Aug/1986

**Item No.** 3 **Resolution No.** 1252

विषय : प्राधिकरण व विभागीय मंडळाच्या आस्थापनेवर "नाईक" ची पदे निर्माण करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
बाब टिप्पणी मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे व प्रत्यक्ष जादा खर्च अल्प होणार हे लक्षात घेऊन प्राधिकरण व विभागीय मंडळाच्या आस्थापनेवर "नाईक" ची खालील प्रमाणे जादा पदे मंजूर करण्यात या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| जागतिक बँक प्रकल्प विभाग | - | ५ | पदे |
| मुंबई मंडळ | - | ८ | पदे |
| कोकण मंडळ | - | १ | पद |
| नागपूर मंडळ | - | १ | पद |
| | | १५ | पदे |

पदाची वेतनश्रेणी रूपये २०५-५-२५०-७-२८५-१०-३०५ विस्तार १०-३५५ अशी राहील. तसेच सदर जादा पदे तेवढीच शिपाईची पदे परावर्तीत करून मंजूर करण्यात येत आहेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 11/Aug/1986

**Item No.** 4 **Resolution No.** 1253

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम, १९८१ मधील विनियम १३ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : निर्णय घेतला की, सोबत जोडलेल्या मसुद्यानुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळे विक्री, गाळ्यांचे हस्तांतरण आणि अदलाबदल) विनियम, १९८१ मधील विनियम १३ मध्ये सुधारणा करण्यात यावी.

**Item No.** 7 **Resolution No.** 1256

विषय : अनुकंपा योजनेखाली नेमणुकीसाठी निवड करण्याकरिता उपसमिती नेमण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, बाब टिप्पणीमध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे अनुकंपा योजनेखाली नेमणुकीसाठी निवड करण्याकरिता खालील प्रमाणे निवड उपसमिती नेमण्यास या ठरावान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| संचालक, जागतिक बँक प्रकल्प | - | सभापती |
| उपमुख्य अधिकारी (प्रशासन)/मुंबई मंडळ | - | सभासद |
| सचिव/प्राधिकरण | - | सभासद सचिव |

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 12/Aug/1986

**Item No.** 5 **Resolution No.** 1254

विषय : भारताचे माजी सरसेनानी श्री. अरूणकुमार वैद्य यांना श्रद्धांजली वहाण्याबाबत.

ठराव : भारताचे माजी सरसेनानी श्री.अरूणकुमार वैद्य यांची दिनांक १०/०८/१९८६ रोजी पुणे येथे झालेल्या निघृण हत्येमुळे देश भारतमातेच्या एका सुपुत्राला मुकला असून, देशाचे पर्यायाने भारतीय समाजाची अपरिमित हानी झाली आहे. श्री.अरूणकुमार वैद्य यांनी भारतीय सैन्यामधील आपल्या सेवेद्वारा देशाचे स्वातंत्र्य रक्षणाची महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. त्यांच्या हत्येमुळे भारतीय समाजाचे कधीही भरून न देणारे असे नुकसान झाले आहे.

प्राधिकरण तसेच प्राधिकरणाचे संलग्न घटक व कर्मचारी त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहेत ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो.

**Item No.** 6 **Resolution No.** 1255

विषय : कन्नमवारनगर, विक्रोळी येथील व्यापारी संकुलातील गाळा क्र. ३/१५ चे वाटप.

ठराव : निर्णय घेतला की, कन्नमवारनगर येथील व्यापारी संकुलातील गाळा क्र. ३ बाय १५ हा श्री.राजेंद्र रहाटे यांच्याबरोबर या गाळ्याकरिता दुसरे अर्ज आले असल्यास सर्व अर्जामधून सोडत काढून सोडतीत यशस्वी होणाऱ्या अर्जदारांस गाळा वाटप करण्यात यावा. गाळ्यांचे वाटप एकरकमी विक्रीपध्दतीवर करण्यात यावे. त्यासाठी वाटपापर्यंतच्या कालावधीचे व्याज आकारून येणारी सुधारित किंमत आकारण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 15/Aug/1986

**Item No.** 8 **Resolution No.** 1257

विषय : "गृहनिर्माण वृत्त" या त्रैमासिकाकरिता कर्मचारीवर्ग मंजूर करणे.

ठराव : निर्णय घेतला की, "गृहनिर्माण वृत्त" या प्राधिकरणाच्या प्रकाशनाकरिता निर्माण करण्यात येणाऱ्या कक्षाकरिता, मुंबई मंडळाच्या आस्थापनेवर खालीलप्रमाणे जादा पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. ही पदे तूर्त एक वर्षासाठी राहतील.

| | | |
|---|---|---|
| १) उपसंपादक | - १ पद | (रू.५०० - ९००) |
| २) कनिष्ठ लिपिक व टंकलेखक | - १ पद | (रू.२६० - ४९५) |
| एकूण | २ पदे | |

उपरोक्त कर्मचारीवर्ग जनसंपर्क अधिकारी/मुंबई मंडळ यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखली व मार्गदर्शनानुसार काम करील.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 18/Aug/1986 |
|---|---|---|---|
| Item No. | 9 | Resolution No. | 1258 |

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ मध्ये सुधारणा करणे.

ठराव : निर्णय घेतला की,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम १९८२ मध्ये ठराव क्र. ११३४ प्रमाणे केलेली सुधारणा रद्द करून सोबत जोडलेल्या अधिसूचनेच्या मसुद्याप्रमाणे उक्त विनियमांत सुधारणा करण्यास मान्यता देण्यात यावी, याला शासनाची मान्यता देण्यात यावी.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 19/Aug/1986 |
|---|---|---|---|
| Item No. | 10 | Resolution No. | 1259 |

विषय : प्राधिकरणातील विविध स्तरावरील अधिकाऱ्यांना विविध विषयावरील प्रकरणी निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, बाब टिप्पणीसोबत जोडण्यात आलेल्या सहपत्रातील अधिकार संबंधिताना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या निर्णयाद्वारे यापूर्वी, या संदर्भात वेळोवेळी घेण्यात आलेले निर्णय व त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश या निर्णयाद्वारे निष्प्रभावित करण्यात येत आहेत.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 23/Aug/1986 |
|---|---|---|---|
| Item No. | 11 | Resolution No. | 1260 |

विषय : ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यासाठी प्रशासकांची अनुमती व अधिकृती मिळणे बाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता "अ" मध्ये दर्शविलेल्या (१) रायगड (२) पुणे (३) अमरावती (४) भंडारा (५) लातूर (६) ठाणे जिल्हा येथील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण ४९.०२ लक्ष रूपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 27/Aug/1986 |
|---|---|---|---|
| Item No. | 12 | Resolution No. | 1261 |

विषय : प्राधिकरणाच्या मालकीच्या जागे मधून जाण्या-येण्यासाठी प्रवेशाधिकार देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, प्रशासक/प्राधिकरण यांनी बाब सूचित जमिनी मधून प्रवेशाधिकार अथवा प्रवेश देण्यासंबंधी बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या तक्त्यात जे पर्याय व त्यासाठी जे आकार (मोबदले) सुचविण्यात आले आहेत त्यांना बाब सूचीतील अटींसह व नेहमीच्या इतर अटींसह मान्यता दिली. अशा प्रकारांची प्रवेशाधिकार अथवा मुख्य अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **28/Aug/1986**

**Item No.** **13** **Resolution No.** **1262**

विषय : १) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कर्मचारी (ज्येष्ठतासूची) विनियम
२) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (सेवा वर्गीकरण व संवर्ग) विनियम.

ठराव : बाब टिप्पणी सोबत जोडण्यात आलेल्या कर्मचारी ज्येष्ठतासूची विनियम व सेवा वर्गीकरण व संवर्ग विनियम यांना या ठरावान्वये मान्यता देण्यात येत असून सदर विनियमांचा मसुदा शासनाकडे अंतीम मंजूरीसाठी त्वरित पाठविण्यात यावा.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **01/Sep/1986**

**Item No.** **1** **Resolution No.** **1263**

विषय : चिकणघर कल्याण येथील विविध योजनांतर्गत इसाऱ्याची रक्कम अर्जदारांना परत करण्यासंबंधात.

ठराव : निर्णय घेतला की, चिकणघर कल्याण येथील विविध योजनांतर्गत गाळ्यासाठी जानेवारी १९७९ मध्ये दिलेल्या जाहिरातीस अनुसरून ज्यांनी अर्ज केले होते त्यांनी अर्जासोबत भरलेल्या इसारा रकमेपैकी जप्त केलेली रक्कम रू. ४२,२४०/- त्यांना परत करण्यात यावी. ज्यांना इसारा रक्कम अद्याप परत करण्यात आलेली नाही त्यांना ती पूर्णपणे परत करावी. मात्र जानेवारी १९७९ नंतर या गाळ्यांसाठी दिलेल्या कोणत्याही जाहिरातीस अनुसरून अर्ज केलेल्यांना या निर्णयाचा लाभ देण्यात येऊ नये. त्यांच्या बाबतीत विनियमांनुसार कार्यवाही करावी.

**Item No.** **2** **Resolution No.** **1264**

विषय : श्री. बी. जी. कांबळी, लेखापाल यांना सहा महिने मुदतवाढ.

ठराव : श्री. बी. जी. कांबळी यांना औरंगाबाद मंडळांस लेखापाल या रिक्त पदावर कंत्राटी नेमणूकीस दिनांक २३.७.८६ पासून आणखी सहा महिने अथवा अन्य पर्यायी व्यवस्था होईपर्यंत मुदतवाढ देण्यास प्रशासक/प्राधिकरण यांनी मंजूरी दिली.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **02/Sep/1986** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **3** | **Resolution No.** | **1265** |

विषय : गलिच्छ वस्ती सुधार योजना
सुधार कामांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, गलिच्छ वस्ती सुधार योजनेअंतर्गत नागपूर शहरातील ३ गलिच्छ वस्तीच्या सुधार कामांच्या एकुण रू. १३,११,१९२/- रक्कमेच्या एस्टिमेटस्ला नागपूर महानगरपालिकेने स्वतःचे निधीमधून खर्च करण्याच्या अटींवर व चंद्रपूर जिल्ह्याचे १९८६-८७ चे आर्थिक उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे चंद्रपूर शहरातील २ गलिच्छ वस्ती सुधार कामांच्या एकुण रू. १४,९६,८८० रक्कमेच्या एस्टिमेटस्ला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| **Item No.** | **4** | **Resolution No.** | **1266** |
|---|---|---|---|

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची कर्मचारी/अधिकारी यांना सेवानिवासस्थानांचे वितरण करण्याकरिता मार्गदर्शक तत्त्वे - मार्गदर्शक तत्त्व क्र. ७ मध्ये बदल करणे.

ठराव : निर्णय घेतला की, सेवानिवासस्थानांचे वाटप करण्यासाठी ठराव क्र. ८१५ अनुसार ठरविण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वातील मार्गदर्शक तत्त्व क्रमांक ७ पूर्णपणे गाळण्यात यावे. त्याऐवजी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्व समाविष्ट करण्यात यावे.

> "(७) सेवानिवासस्थानांचे वाटप मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी मार्गदर्शक तत्त्वे अनुसरून करावे. तसे करताना प्रशासन व कर्मचारी यांच्या ज्या संयुक्त प्लान्ट समित्या नेमण्यात आल्या आहेत त्यात याबाबतीत मांडण्यात येणारी सूचना विचारात घेण्यात याव्यात. मात्र वाटप काटेकोरपणे मार्गदर्शक तत्त्वे अनुसरून करावे व एखाद्या विशिष्ट बाबतीत आवश्यक असल्यास प्राधिकरणाची मान्यता घ्यावी."

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **03/Sep/1986** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **6** | **Resolution No.** | **1268** |

विषय : जागतिक बँक प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या मुंबई नागरी विकास प्रकल्पावर अनुबोधपट काढण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
नागरी विकास प्रकल्प योजनेवर २००० फूटाची रंगीत चित्रफित करण्याची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयावर सोपवून या कामासाठी त्या संचालनालयाकडे पूर्णतः किंवा टप्प्याटप्प्याने रू. १,४८,००० सोपविण्यास मंजूरी देण्यात येत आहे. माहिती संचालनालयाने दर्शविलेल्या संमतीनुसार ज्ञानेश्वरी चित्रचे श्री. वि. रा. देवरे यांनी हा अनुबोधपट त्यांचे मार्गदर्शक व नियंत्रणाखाली तयार करावा.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **08/Sep/1986** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **5** | **Resolution No.** | **1267** |

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील त्रिकोणी भूखंड बगिचा निर्माण करून त्याची देखभाल करणे व गाड्या उभ्या करण्यासाठी प्रदान करण्याबाबत. जुहू त्रिशूळ सहकारी गृहनिर्माण संस्थेची विनंती.

ठराव : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील इमारत क्रमांक ११-ए, बी, सी मधिल रहिवाश्यांच्या जुहू त्रिशूळ सहकारी गृहनिर्माण संस्थेस वसाहतीच्या आराखड्यांत बगिच्यासाठी राखून ठेवण्यात आलेला सुमारे ५०० चौ. वार आकाराचा मोकळा भूखंड बगिच्याचे विकासासाठी खालील अटींवर भाडेपट्ट्याने देण्यात यावा.
भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या किंमतीच्या धोरणानुसार आकारण्यात यावे.

१) संबंधित भूखंड मोकळा ठेवून त्यावर कोणत्याही प्रकाराचे बांधकाम करूनये. यात प्रेक्षकगृहाचाही समावेश होतो. बगिच्याच्याच वापरासाठी उपयोग करण्यात यावा.
२) भूखंड वसाहतीमधील सर्व रहिवाश्यांसाठी वापरण्यास मुक्त राहील आणि या भूखंडाबाबत संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांची मक्तेदारी असणार नाही.
३) भूखंडाची व त्यावरील उद्यानाच्या देखभालीची संपूर्ण जबाबदारी त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेची राहील.
४) भूखंडासाठी अधिमूल्य व वार्षिक भाडेपट्टी प्राधिकरणाच्या प्रचलित किंमत विषयक धोरणाप्रमाणे आकारण्यात यावे.
५) जर भूखंडाच्या आजूबाजूच्या लगतच्या परिसरांत गाळे धारकांच्या दुसऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्था कार्यरत असतील तर त्या संस्थांची संमती घेण्यात यावी.
६) भूखंडासाठी भाडेपट्ट्याची मुदत प्रथमतः ३० वर्षे असावी किंवा संस्थेला हस्तांतरीत करण्यात आलेल्या भाडेपट्ट्याची मुदत जेव्हा संपुष्टात येते त्याचवेळी बगिच्यासाठी देण्यात येणाऱ्या भूखंडाची मुदत संपुष्टात येईल अशा पद्धतीने भाडेपट्टा करारनामा करण्यात यावा.
७) तसेच अन्य सहकारी गृहनिर्माण संस्था वसाहतीत कार्यरत असल्यास त्यांच्या शिफारसीनुसार सहकारी गृहनिर्माण संस्थाचा एक प्रतिनिधी असणारी एक "बगिचा समिती" भूखंडाच्या विकासासाठी स्थापन करण्यात यावी. जेणेकरून इतर सहकारी गृहनिर्माण संस्थांना विरोध रहाणार नाही.

**Item No. 7 Resolution No. 1269**

विषय : मुंबई शहर दिवाणी न्यायालयामधील प्राधिकरणाशी संबंधित कब्जे-खटले हाताळण्याकरिता स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबत.

ठराव : १) सिटी सिव्हील कोर्टामधील प्राधिकरणाच्या कामकाजाशी संबंधित अशा प्रकरणांकरिता सध्याची शासकीय वकिलांकडे प्रकरणे सोपविण्याची कार्यपद्धती रद्द करून प्राधिकरणाने वकील वर्गाचे मंडळ नियुक्त करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

२) श्री. एस. डी. बलसारा. मुंबई हायकोर्टाचे वकील यांची मुंबई शहर दिवाणी न्यायालयामधिल प्राधिकरणाशी संबंधित कब्जे-खटले हाताळण्याकरिता शासनाच्या आदेशानुसार प्राधिकरणामार्फत करण्यात आलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे तसेच श्री. बलसारा यांच्या नियुक्तीकरिता होणाऱ्या विविध तद्नुषंगिक अन्य खर्चाकरिता बाब टिप्पणीमध्ये परिच्छेद २ च्या ३ ते १० मधील प्रस्तावासही या ठरावान्वये कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 16/Sep/1986

**Item No.** 8 **Resolution No.** 1270

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या निवासी व इतर सुविधांबाबत द्यावयाच्या जमिनीच्या किंमतीबाबत.

ठराव : माध्यमिक शाळा, शैक्षणिक संस्था व जोडपत्रात सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व धार्मिक या प्रकाराखाली (कॅटॅगिरीज) दाखविण्यात आलेल्या भूखंडाचे अधिमूल्य तसेच भाडेपट्ट्याचा बाब टिप्पणीत गणित करण्याच्या पद्धतीच्या सूचनेनुसार आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच,
२) प्राधिकरणाच्या गाळेधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना द्यावयाच्या त्यांच्या इमारतींच्या आसपासच्या जमिनींचे अधिमूल्य जोडपत्रात नमूद केलेल्या पद्धतीने आकारून त्यावर प्रचलित टक्केवारी वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात मान्यता देण्यात येत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.** 1271

विषय : प्राधिकरणाच्या कर्मचारी वर्गाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थाना भूखंड देण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, प्रशासक महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी वरील बाब टिप्पणीत सादर करण्यात आलेला आशय लक्षात घेऊन "वर्षा सहकारी गृहनिर्माण संस्थेला" सिद्धार्थ नगर, येथील इमारत क्रमांक १४ जवळील सुमारे ८२१.५१ चौ.मिटर आकाराचा भूखंड देण्याचा निर्णय रद्द करून त्या भूखंडाऐवजी उन्नत नगर-२ गोरेगाव येथील इमारत क्रमांक ४४ समोरिल सुमारे ६८९.१२ चौ. मि. आकाराचा भूखंड देण्याचा निर्णय घेतला.
२) भूखंडाचे अधिमूल्य व इतर शर्ती व अटी पूर्वीच्या निर्णयाप्रमाणे बंधनकारक ठेवण्यास याव्यात.

**Item No.** 10 **Resolution No.** 1272

विषय : इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. कंपनीला पेट्रोल पंपाकरिता दहिसर येथे देण्यात आलेल्या भूखंडाऐवजी सिध्दार्थनगर, गोरेगांव या वसाहतीत भूखंड देण्याबाबत.

ठराव : इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. कंपनीला पूर्वी दहिसर येथील वसाहतीत देण्यात आलेल्या सुमारे १२०० चौ. मि. आकाराच्या भूखंडाऐवजी सिध्दार्थनगर, गोरेगांव (प) येथील वसाहतीत तेवढ्याच आकाराचा (१२००, चौ. मि.) पर्यायी भूखंड वितरित करण्याच्या मुंबई मंडळाच्या ठराव क्रमांक ९३/१२६२ ला मान्यता देण्यात येत आहे. सदरहू भूखंडाचे अधिमूल्य प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीच्या प्रचलित धोरणानुसार आकारण्यात यावे. भाडेपट्ट्याची मुदत प्रचलित नियमानुसार ३० वर्षाची व भाडेपट्ट्याचा दर अधिमूल्य किंमतीच्या रकमेच्या एक टक्का एवढे आकारण्यात यावे. प्राधिकरणाच्या नेहमीच्या इतर शर्ती व अटींचा अंतर्भाव करण्यात यावा.

**Item No.** 11 **Resolution No.** 1273

विषय : सी. टी. सर्वे नं. ४९७ भूखंड क्रमांक १७ गांव-कुर्ला मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या ताब्यातील जमिनीवर अतिक्रमण

ठराव : सी. टी. सर्वे नं. ४९७ भूखंड क्रमांक १७ कुर्ला व्हिलेज येथील सुमारे ६७८.५ चौ. मिटर क्षेत्रफळाचा भूखंड श्री. शमुलखान दरियाला यांना फक्त निवासी कारणासाठी खालील अटी व शर्तीवर वितरीत करण्यात यावा.

१) प्राधिकरणाच्या जमिनीच्या किंमतीच्या धोरणांनुसार अधिमूल्य आकारण्यात यावे.
२) अधिमूल्याच्या रकमेवर एक टक्का वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा. भाडेपट्ट्याचा काळ ३० वर्षाचा धरण्यात यावा.
३) भूखंडाचा उपयोग फक्त निवासी कारणासाठी करण्यात यावा.
४) भूखंडाचा विकास अथवा बांधकाम करण्यापूर्वी बांधकामाचे नकाशे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ व मुंबई महानगरपालिका यांचेकडून मंजूर करून घेण्यात यावेत.
५) सदरचा भूखंड हा श्री.दरियाला यांना जमिनीचे अधिमूल्य आकारून भाडेपट्ट्याने देण्यात आल्याचे अप्पर जिल्हा अधिकारी मुंबई उपनगर यांना कळविण्यात यावे.
६) भूखंडाबाबतच्या प्राधिकरणाच्या नेहमीच्या इतर शर्ती व अटींचे बंधन घालण्यात यावे.

---

**Item No.** 12 **Resolution No.** 1274

विषय : प्राधिकरणाच्या कार्यालयात झेरॉक्स मशीनसाठी वापरावयाच्या वस्तूंच्या खरेदीसाठी अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
प्राधिकरणाच्या कार्यालयात झेरॉक्स मशीनसंदर्भात वारंवार लागणारे टोनर अथवा अन्य क्रय होणाऱ्या वस्तू खरेदी करण्यासाठी प्राधिकरणाच्या अंदाजपत्रकात रू. ३०,०००/- ची तरतूद करण्यात यावी आणि या रकमेतून वेळोवेळी अग्रिम घेऊन खर्च करण्याचे अधिकार वास्तूशास्त्रज्ञ/प्राधिकरण आणि कार्यकारी अभियंता (हुडको शाखा)/प्राधिकरण यांनी देण्यात यावेत. अशा खर्चाबाबतचे योग्य ते सर्व लेखे या त्या अधिकाऱ्यांनी अग्रिम घेतल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखा विभागात सादर करावेत. पहिला अग्रिम खर्च केल्याचे लेखे सादर केल्याशिवाय दुसरा अग्रिम खर्च केल्याचे लेखे सादर केल्याशिवाय दुसरा अग्रिम देण्यात येऊ नये, वत्त नियंत्रक २/प्राधिकरण यांनी वरील प्रकारच्या खर्चाची तपासणी प्रत्येक तिमाहिला घ्यावी. तसेच याबाबतीत अंदाजपत्रकात योग्य ती तरतूद करावी.

---

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **20/Sep/1986**

**Item No.** **13** **Resolution No.** **1275**

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण अधिसूचित क्षेत्र-२, सोलापूर येथे विडी कामगारासाठी अल्प उत्पन्न गट योजने अंतर्गत २०६० गाळे बांधणे योजनेची ३४४/३४४/३४४/३४४/३४४/३४० गाळे अशा सहा गटांत विभागणी करून निविदा मागविणे.

ठराव : निर्णय घेतला की,
विशेष नियोजन प्राधिकरण अधिसूचित क्षेत्र-२ सोलापूर येथे विडी कामगारांसाठी अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजने अंतर्गत २०६० गाळ्यांच्या गृहनिर्माण योजनेची प्रत्येक गटात ३४४ गाळे प्रमाणे पाच आणि ३४० गाळे प्रमाण एक अशा सहा गटात विभागणी करून निविदा मागविण्याच्या मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांच्या प्रस्तावास प्रशासक/प्राधिकरण मान्यता देत आहेत.

**Item No.** **14** **Resolution No.** **1276**

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण अधिसूचित क्षेत्र-२, सोलापूर येथे विडी कामगारांसाठी अल्प उत्पन्न गट योजने अंतर्गत ७८५ गाळे बांधणे योजनेची २६०/२६०/२६४ गाळे अशा तीन गटात विभागणी करून निविदा मागविणे.

ठराव : निर्णय घेतला की,
विशेष नियोजन प्राधिकरण अधिसूचित क्षेत्र-२, सोलापूर येथे विडी कामगारांसाठी अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजने अंतर्गत ७८५ गाळ्यांच्या गृहनिर्माण योजनेची प्रत्येक गटात २६० गाळे प्रमाणे दोन आणि २६४ गाळे प्रमाणे एक अशा तीन गटात विभागणी करून निविदा मागविण्याच्या मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांच्या प्रस्तावास प्रशासक/प्राधिकरण मान्यता देत आहेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 22/Sep/1986

**Item No.** 15 **Resolution No.** 1277

विषय : श्री. एस. ए. करनानी, लॅन्ड ओनर ऑफ सी. टी. एस.नं. २००/२०२, अंधेरी यांच्या जागेला लागून असलेल्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सी. एस. टी.नं. १९५ येथील लंबाकृती आकाराच्या भूखंडाच्या मागणी बाबत.

ठराव : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सी. टी. एस. नं. १९५ ला लागून असलेला व नकाशांत अ, ब, क, ड या अक्षरांनी दर्शविलेल्या भूखंडाचे मोजमाप करून वितरण मूळ भूखंडाचे मालक सर्वश्री पेद्रीक डॉम्निक डिसूझा फॅमेली व जुकर फॅमिली यांचे तर्फे श्री. के. एस. ए. करनानी, (सी. टी. एस. नं. २००, २०२ व २०३ जमीन मालकांचे न्याय प्रतिनिधी) यांना प्रचलित जमिनीच्या बाजारभावाने ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने खालील अटींवर वितरित करण्यात यावे. जमिनीच्या अधिमूल्यांच्या १ टक्के वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.

विकास आराखड्यात बगिच्यासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचे वितरण श्री. करनानी यांना करण्यात येऊ नये. सदरहू भूखंड मुंबई महानगरपालिकडे हस्तांतरित नेहमीच्या अटींवर करण्याची कार्यवाही मुंबई मंडळाकडून त्वरित करण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 24/Sep/1986

**Item No.** 16 **Resolution No.** 1278

विषय : कोकण मंडळातील मोकळ्या ठेवल्या जाणाऱ्या जागेवर रस्त्यालगत जाहिरात फलक लावून मंडळाचे उत्पन्न वाढविणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, कोकण मंडळातील मोकळ्या ठेवल्या जाणाऱ्या जागेवर रस्त्यालगत जाहिरात लावण्यात प्राधिकरण तत्वतः मान्यता देत आहे. अशी योजना मुंबई मंडळाने या पूर्वीच राबविलेली असून त्याच धर्तीवर जाहिर नोटीस देऊन कोकण मंडळाने ही योजना राबवावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 30/Sep/1986

**Item No.** 17 **Resolution No.** 1279

विषय : प्राधिकरणाच्या अभियंत्यांना सुधारित वेतनश्रेणी व अधिकारी वर्ग दर्जा देण्याबाबत.

ठराव : शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या दिनांक १६.४.८४ च्या शासन निर्णयामधिल आदेश शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २३.९.८६ च्या शासन निर्णयाद्वारे मंजूरी मिळाल्यानुसार, प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंत्यांना तत्संबंधीच्या अटी व निबंधाच्या आधीन राहून भूतलक्षी प्रभावाने दिनांक १.४.८१ पासून लागू करण्यात यावेत. व्यक्तिगत प्रकरणी काढावयाचे आदेश योग्य त्या तपासणीनंतर काढण्यात यावेत.

**Item No.** 18 **Resolution No.** 1280

विषय : विभागीय मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांना गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमाच्या योजनेत प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान करणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोकण या विभागीय मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये येणाऱ्या निरनिराळ्या शहरातील गलिच्छ वस्ती सुधार कामांच्या प्रस्तावांना प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करण्यात देत आहेत. प्राधिकरणांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार उपलब्ध तरतुदींच्या अधिन राहून मान्यता द्यावी.
प्रत्येक महिन्यात संकलित स्वरुपात मुख्य अधिकाऱ्यांनी प्रस्तावित केलेल्या कामांची यादी प्रशासकांना माहितीस्तव पाठवावी.

**Item No.** 19 **Resolution No.** 1281

विषय : पंतनगर, घाटकोपर या वसाहतीत बालविकास, व्यायाम मंदिर या संस्थेने व्यायाम शाळेकरिता अनधिकृतपणे व्यापलेली जागा नियमाधिन करुन अतिरिक्त भूखंड वितरित करण्याच्या मागणीबाबत.

ठराव : १) बालविकास व्यायाम मंदिर या संस्थेकडे ९८.३१ चौ. मि. एवढा भूखंड ज्या दिवसापासून पुढे ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने प्राधिकरणाच्या जमिनीविषयक धोरणानुसार वितरित करण्यात यावा. अतिक्रमण करण्यात आलेल्या भूखंडाचे नियमन करण्यासाठी अधिमूल्याच्या रकमेच्या २५ टक्के अतिरिक्त मूल्य आकारण्यात यावे. तसेच त्यांनी अनधिकृतपणे व्यापलेला भूखंड समोरील मोकळ्या भूखंडावर घातलेल्या तारेच्या कंपाऊंडपासून म्हणजेच बी. सी. आय. एम. या आद्याक्षरांनी दर्शविलेला भूखंड त्यांना खेळाचे मैदान म्हणून वितरित करण्यात यावा. या भूखंडावर कोणतेही बांधकाम करण्यास परवानगी देण्यात येऊ नये. मोकळ्या भूखंडाचे प्रथम मोजमाप घेण्यात यावे. सदर भूखंडाचे अधिमूल्य व भाडेपट्टा प्राधिकरणाच्या प्रचलित जमिनीच्या धोरणानुसार आकारण्यात यावा. दोन्ही भूखंडाचा भाडेपट्ट्याचा काळ एकाच दिवशी संपुष्टात येईल. (को. टर्मिनस) अशा प्रकारे धरण्यात यावा.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **06/Oct/1986**

**Item No.** **1** **Resolution No.** **1282**

विषय : मुंबई मंडळाच्या दुरुस्ती व पुनर्रचना विभागाच्या मिळकत व्यवस्थापन शाखेकरिता जादा कर्मचारी मंजूर करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, मुंबई मंडळाच्या दुरुस्ती व पुनर्रचना विभागाच्या मिळकत व्यवस्थापन शाखेकरिता खालील प्रमाणे जादा कर्मचारी प्रथम सहा महिन्याचे कालावधीकरिता मंजूर करण्यात येत आहेत.

सहाय्यक मिळकत व्यवस्थापक - १ पद
रू. ५०० - ९००
रोख पाल - १ पद
बेलिफ - ४ पदे
रू. २५० - ४३५
जप्तीदार - १ पद
रू.२०५ - ३५५

सहा महिन्यांचा कालावधी पदे भरल्या गेलेल्या दिनांकापासून अस्तित्वांत येईल. उपरोक्त पदे पुढे चालू ठवणेबाबत वसुलीमध्ये लक्षणीय वाढ झाल्यास विचार केला जाईल. प्रतीमाह या वसुलीचा आढावा घेताना ही बाब विचारात घेतली जाईल.

**Item No.** **1** **Resolution No.** **1282**

विषय : मुंबई मंडळाच्या दुरुस्ती व पुनर्रचना विभागाच्या मिळकत व्यवस्थापन शाखेकरिता जादा कर्मचारी मंजूर करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, मुंबई मंडळाच्या दुरुस्ती व पुनर्रचना विभागाच्या मिळकत व्यवस्थापन शाखेकरिता खालील प्रमाणे जादा कर्मचारी प्रथम सहा महिन्याचे कालावधीकरिता मंजूर करण्यात येत आहेत.

सहाय्यक मिळकत व्यवस्थापक - १ पद
रू. ५०० - ९००
रोख पाल - १ पद
बेलिफ - ४ पदे
रू. २५० - ४३५
जप्तीदार - १ पद
रू.२०५ - ३५५

सहा महिन्यांचा कालावधी पदे भरल्या गेलेल्या दिनांकापासून अस्तित्वांत येईल. उपरोक्त पदे पुढे चालू ठवणेबाबत वसुलीमध्ये लक्षणीय वाढ झाल्यास विचार केला जाईल. प्रतीमाह या वसुलीचा आढावा घेताना ही बाब विचारात घेतली जाईल.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 07/Oct/1986

**Item No.** 2 **Resolution No.** 1283

विषय : हुडकोकडून बिनव्याजी तांत्रिक सहाय्य कर्ज घेण्यात प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, ''गृहनिर्माण मार्गदर्शिका-नि-नियमपुस्तिका तयार करणे व कार्यकारी प्रशिक्षण देणे'' व ''प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन'' या दोन प्रस्तावासाठी अनुक्रमे क्रमांक एसईसीटीटी/एमएएच/म्हाडा/८६/१३३५५ दि. ८.७.८६ व क्र. एसईसीटीटी/एमएएच/म्हाडा/८६/१३४४५ दि.८.७.८५ या कर्जमंजूरी पत्रान्वये हुडकोने मंजूर केलेले अनुक्रमे रू. ५०,०००/- व रू. १२६,०००/- बिनव्याजी तांत्रिक सहाय्य कर्ज हुडकोकडून घेण्यात अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 17/Oct/1986

**Item No.** 3 **Resolution No.** 1284

विषय : ना. म. जोशी मार्गावरील इमारत क्र. २६३ अबकड व २५९-२६९ जुनी कुंभारवाडी जी दक्षिण वार्डची पुन:बांधणी करणे संबंधीच्या निविदा स्विकृत करणे बाबत.

ठराव : मुंबई मंडळाच्या टेंडर कमिटीने शिफारस केल्याप्रमाणे ना. म. जोशी मार्गावरील इमारत क्र. २६३ - ए, बी, सी, डी, व २५९-२६९ च्या पुर्नबांधणी संबंधीच्या मेसर्स अजंठा बिल्डर्स यांचे रू. ९०,१०,१२४/- ची निम्नतम निविदा (जी रू. ८९,३३,००७/- अंदाजित किंमतीपेक्षा ०.८७ टक्क्यांनी जास्त आहे.) ती स्विकृत करण्यात येत आहे.

**Item No.** 5 **Resolution No.** 1286

विषय : चारकोप-कांदिवली (प) येथील जमिनीवर सर्वसाधारण सोयी पुरविणे, रस्ते व जलनि:स्सारण सोयीसाठीच्या निविदा गट-१.

ठराव : निर्णय घेतला की, चारकोप-कांदिवली (प) येथील जमिनीवर सर्वसाधारण सोयी पुरविण, रस्ते व जलनि:स्सारणाच्या सोयीसाठीच्या कामाची रूपये ५५,४३,१५०.५३ ची (रूपये ६४,८३,२७०/- या अंदाजित किंमतीच्या १४.५० टक्के कमी) मे. कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 18/Oct/1986

**Item No.** 4 **Resolution No.** 1285

विषय : चारकोप कांदिवली येथील मे. मोतीराम बुधरमल व मे. जे. पी. एन्टरप्रायजेस या कंत्राटदाराकडे सूपूर्द केलेल्या जमिनीच्या पुनःप्रापणाचे काम पूर्ण करण्याबाबत आलेल्या निविदांचा स्विकार.

ठराव : निर्णय घेतला की, वरील कामासाठी एकूण ५ विभागात निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यातलि विभाग क्र. १अ, १ब, १क आणि २अ अशा चार गटांच्या निविदा पुढे दर्शविलेल्या रितीने स्वीकारण्याचा निर्णय प्रशासक/प्राधिकरण घेत आहेत.

विभाग क. १अ : या कामाची रूपये ८,९१,२५०/- ची (रूपये ६,२३,८७५/- या अंदाजित किंमतीच्या ४२.८५ टक्के जास्त) मे. ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निम्नतमर निविदा स्वीकारण्यात येत आहे.

विभाग क. १ब : या कामाची रूपये ५४,२८,६००/- ची (रूपये ३७,७६,८२० या अंदाजित किंमतीच्या ४३.७३ टक्के जास्त) मे.ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात येत आहे.

विभाग क. १क : या कामाची रूपये ५,००,५५०/- ची (३,५०,३८५ या अंदाजित किंमतीच्या ४२.८६ टक्के जास्त) मे.ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात येत आहे.

विभाग क. २अ : या कामाची रू. ६,९७,१००/- ची (रूपये ४,८७,९७०/- या अंदाजित किंमतीचा ४२.८६ टक्के जास्त) मे. ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.** 1290

विषय : बांधकामासाठी निवडक कंत्राटदाराकडून निविदा बोलाविण्याबाबत.

ठराव : १) कामाचा दर्जा तसेच चांगली व समाधानकारक गती ठेवण्याचे दृष्टीने, मुख्य अभियंता/मुंबई मंडळ यांनी खालील चार कामासाठी बाब टिप्पणीत त्या त्या कामासमोर दिलेल्या निवडक कंत्राटदारांकडून निविदा मागविलेल्या प्रकरणास कार्योत्तर मान्यता द्यावी.

अ) सर्वे नं. ४१ ओशिवरा येथे रस्ते व पावसासाठी गटारे बांधणे.
ब) २५९-२६३ ना. म. जोशी मार्ग कुंभारचाळ, मुंबई येथे इमारत बांधणे.
क) गांधीनगर, वांद्रे, मुंबई येथे व्यापारी व निवासी गाळ्यांची इमारत बांधणे.
ड) क्र. १-१७ परमानंद वाडी, जी.डी.आंबेकर मार्ग, मुंबई येथे इमारत बांधणे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **21/Oct/1986**

**Item No.** **10** **Resolution No.** **1287**

विषय : वर्धा येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता बांधलेल्या २४ गाळ्यांच्या वाटपाच्या अटी शिथिल करणे.

ठराव : निर्णय घेतला की, वर्धा येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधलेल्या २४ गाळ्यापैकी उरलेल्या गाळ्यांचे वाटप करण्यासाठी पात्रतेची उत्पन्न मर्यादा रू. १५००/- एवढी वाढवावी. मात्र गाळ्यांचे बांधकाम हुडकोच्या निधीतून केले असल्यास अल्प उत्पन्न गटासाठी असलेल्या हुडकोच्या दराने व्याज आकारून लाभार्थीस किंमत लावण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 22/Oct/1986

**Item No.** 7 **Resolution No.** 1288

विषय : वर्सोवा येथील सर्वेक्षण क्र. १२० मधील जमिनीवरील पुन:प्रापणचे काम दुसरा हप्ता गट क्र १ व २ बाबत आलेल्या निविदांचा स्वीकार.

ठराव : निर्णय घेतला की, वरील कामासाठी एकूण दोन विभागात निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यातील विभाग क्र. १ आणि २ अशा दोन गटांच्या निविदा पुढे दर्शविलेल्या रीतीने स्वीकारण्याचा निर्णय प्रशासक/प्राधिकरण घेत आहेत.

विभाग क्र. १ : या कामाची रु.१,६१,४८,८८३/- ची (रुपये १,३६,०९,९८९/-

या अंदाजित किंमतीच्या १८.६६ टक्के जास्त) मे. एस. एन. ठक्कर असोशिएटस् यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात येत आहे.

विभाग क्र. २ : या कामाची रु. १,३९,८४,८१५/- ची (रुपये १,१६,६४,८७४/-

या अंदाजित किंमतीच्या १९.८९ टक्के जास्त) मे.एस.एन.ठक्कर असोशिएटस् यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Item No.** 7 **Resolution No.** 1288

विषय : वर्सोवा येथील सर्वेक्षण क्र. १२० मधील जमिनीवरील पुन:प्रापणचे काम दुसरा हप्ता गट क्र १ व २ बाबत आलेल्या निविदांचा स्वीकार.

ठराव : निर्णय घेतला की, वरील कामासाठी एकूण दोन विभागात निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यातील विभाग क्र. १ आणि २ अशा दोन गटांच्या निविदा पुढे दर्शविलेल्या रीतीने स्वीकारण्याचा निर्णय प्रशासक/प्राधिकरण घेत आहेत.

विभाग क्र. १ : या कामाची रु.१,६१,४८,८८३/- ची (रुपये १,३६,०९,९८९/-

या अंदाजित किंमतीच्या १८.६६ टक्के जास्त) मे. एस. एन. ठक्कर असोशिएटस् यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात येत आहे.

विभाग क्र. २ : या कामाची रु. १,३९,८४,८१५/- ची (रुपये १,१६,६४,८७४/-

या अंदाजित किंमतीच्या १९.८९ टक्के जास्त) मे.एस.एन.ठक्कर असोशिएटस् यांची निम्नतम निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **23/Oct/1986**

**Item No.** **8** **Resolution No.** **1289**

विषय : ना. म. जोशी मार्गावरील इमारत क्र. ५२७-५३५-५३७ ए ते एल (एच वगळता) जी-साऊथ वार्डची पुन:बांधणी करणे संबंधीच्या निविदा स्वीकृत करणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, ना. म. जोशी मार्गावरील इमारत क्रमांक ५२७-५३५-५३७ ए ते एल (एच वगळता) च्या पुन:बांधणी संबंधीची मे. डिव्हाईन कन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटी करून ठरविलेली रू. ५३,०२,२४४.५०/- ची निम्नतम निविदा (जी रू. ३७,३३,९७५/- या अंदाजित किंमतीपेक्षा ४२ टक्यांनी जास्त आहे) ती स्वीकृत करण्यात येत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **24/Oct/1986**

**Item No.** **10** **Resolution No.** **1291**

विषय : कुर्ला पश्चिम येथे संक्रमण शिबिरासाठी ७९२ गाळे बांधण्याच्या कामासाठी मे. एक्सकॉन डेव्हलपर्स प्रा. लि. यांनी दिलेली ठोस रक्कम (लम्पसम) निविदा स्वीकारण्याबाबत विचार करणे.

ठराव : निर्णय घेतला की,
विनोबा भावे नगर, कुर्ला (पश्चिम), मुंबई येथील संक्रमण शिबीर योजना अंतर्गत ७९२ गाळ्यांचे एकूण २,०७,९२३.७६/ चौ. फूट क्षेत्रफळाचे बांधकाम दर चौ. फूटास १३०/- या दराने रुपये रु. २,७०,३०,८८/- एवढ्या किंमतीचे काम मे. एक्सकोन बिल्डिंग मटेरीयल्स मॅन्यु. कंपनी प्रा. लि. यांना देण्याचा प्रस्ताव सदरहू कंपनीने पत्र क्र. ई. बी. एम/एफ/१४०९ दिनांक २४-७-८६, १-८-८६, ५-८-८६ व २५-८-८६ अन्वये केलेली विनंती लक्षात घेऊन मान्य करण्यात येत आहे. या निर्णयासंबंधी शासनास माहिती देण्यात यावी.

**Item No.** **11** **Resolution No.** **1292**

विषय : मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडे कंत्राटदारांचे नोंदणी करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारीतील कामे प्रदान करण्यासाठी तयार केलेल्या कंत्राटदार नोंदणी यादीमध्ये मे. एक्सकॉन बिल्डींग मटेरियल्स कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांचे नाव वर्ग-१ मध्ये समाविष्ट करण्यास प्रशासक/प्राधिकरण मान्यता देत आहेत.

**Item No.** **12** **Resolution No.** **1293**

विषय : अभ्युदयनगर, काळाचौकी येथील स्टॉल्सधारकांना वितरीत करण्यात आलेल्या भूखंडाच्या भाडेपट्ट्याचे मुदत वाढविण्याबाबत.

ठराव : १) गाळेधारकांना वितरीत करण्यात आलेल्या भूखंडाच्या भाडेपट्ट्याची मुदत वाढवून देण्यापूर्वी प्रथम मूळ भूखंड धारकाऐवजी अन्य व्यक्ती स्वतःच्या मर्जीनुसार व्यवसाय करीत असतील त्यांनी मूळ भूखंडधारकाची लेखी किंवा ॲफेडेव्हीटवर सध्याच्या भूधारकांच्या नावे भूखंड नियमित करण्यास हरकत नसल्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' घेणे आवश्यक आहे.

२) कायदेशीर वारसाच्या नावे भूखंड करण्यासाठी छोट्या सुविधांसाठी (म्हणजे भाजीपाल्याचे स्टॉल, पिठाची गिरणी, मसाला दुकान, इस्त्री इत्यादी) कारणांसाठी देण्यात आलेल्या भूखंडाचे नियमन खालील प्रमाणे करण्यात यावे.

| कायदेशीर वारसाचे नावे करण्यासाठी | अनधिकृत भूखंड धारकाच्या नावे करण्यासाठी |
|---|---|
| रुपये १,०००/- | रुपये ३,०००/- |

३) व्यापारी कारणासाठी देण्यात आलेल्या मोठ्या आकाराचे (१५ बाय १५ पेक्षा जास्त) उदा. गॅस सिलींडर, पेट्रोल पंप सिनेमा, ड्रामा, डिपार्टमेंटल स्टोअर्स इत्यादी बाबतीत खालीलप्रमाणे नियमन करण्यात यावे.

| कायदेशीर वारसाचे नावे करण्यासाठी | अनधिकृत भूखंड धारकाच्या नावे करण्यासाठी |
|---|---|
| रुपये ५,०००/- | रुपये १०,०००/- |

४) अभ्युदय सार्वजनिक व्यापारी मंडळास सर्व २८ सभासद स्टॉल्स धारकासाठी नकाशात तांबड्या रंगाने दाखविल्याप्रमाणे ६ बाय ४ चा भूखंड इलेक्ट्रिक केबीनसाठी व्यापारी अधिमूल्य आकारून वितरीत करण्यात यावा. परंतु व्यापारी मंडळाचे ताब्यात देण्यापूर्वी मंडळ रजिस्टर करून घेणेबाबत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात.
५) मीटर कॅबीन (६ बाय ४) व पाण्याच्या टाकीमध्ये योग्य अंतर ठेवावे. कार्यकारी अभियंता ह्यांनी प्रत्यक्ष जमीन आखून देताना ही काळजी घ्यावी.
६) ज्या स्टॉलचा १९६५-६६ मध्ये ११ महिन्याचे मुदतीचा भाडेपट्टा केलेला आहे, त्या स्टॉलधारकांना प्राधिकरणाच्या धोरणानुसार व्यापारी अधिमूल्य व किंमतीच्या एक टक्का भाडेपट्टी आकारून प्रथम भूखंड ज्या तारखेपासून वितरीत करण्यात आला आहे, त्या तारखेपासून पुढे ३० वर्षे वाढवावा. केबिनसाठी देण्यात यावयाच्या भूखंडाच्या भाडेपट्ट्याचा काळ दुकानाच्या भाडेपट्ट्याच्या काळाशी समांतर असावा.
७) अभ्युदयनगर येथील दुकाने सध्या पूर्णमध्ये पक्क्या स्वरूपाची नाहीत. रस्त्यांची रुंदी ही वेळोवेळी महापालिका ठरवित असते. तेव्हा परवानगी देताना दुकाने 'जसे आहे तसे' (ॲज इज व्हेअर इज) या तत्वावर द्यावी व मुंबई महानगरपालिका व मुंबई गृहनिर्माण मंडळ यांच्याकडून प्रस्ताव मंजूर करण्याची अट घालावी.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **20/Nov/1986** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **1** | **Resolution No.** | **1294** |

विषय : सर्व्हे नं. ३४१, गांधीनगर, वांद्रे येथील उच्च उत्पन्न योजनेखालील आगाऊ अंशदान अंतर्गत बांधावयाच्या ४८ गाळे व २० दुकानाच्या निविदा मंजूर करणे संबंधी.

ठराव : निर्णय घेतला की, सर्व्हे क्र. ३४१, गांधीनगर, वांद्रे येथील उच्च उत्पन्न योजनेखालील आगाऊ अंशदान अंतर्गत बांधावयाच्या ४८ गाळे व २० दुकानाच्या कामाची, वाटाघाटीनुसार कमी केलेली रूपये ५६,२०,९०९.५० ची (४९,९६,३६४ या अंदाजित किंमतीच्या १२.५ टक्के जास्त) मे. बी. बी. बिल्डर्स यांची निम्नतम निविदा स्वीकारावी.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **24/Nov/1986** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **2** | **Resolution No.** | **1295** |

विषय : वांद्रे रेक्लेमेशन क्षेत्रातील सुमारे २०० फूट बाय १२०० फूट मोकळी जागा तात्पुरत्या कार्यालयीन शेड भांडारासाठी मुंबई रोड डेव्हलपमेंट अँड डिझाईन यांना भाडेपट्ट्याने देण्याबाबत.

ठराव : वांद्रे ते वरळी, मुंबई "वेस्ट आयलंड फ्री वे" प्रकल्पाच्या कामासाठी शासनाच्या, बांधकामाच्या बॉम्बे रोड डेव्हलपमेंट अॅन्ड डिझाईन सर्कल विभागाला बांधकामाचे साहित्य, तात्पुरते कार्यालय इत्यादी प्रयोगासाठी नकाशांत दाखविल्याप्रमाणे सुमारे ३,३०० चौ. मि. आकाराची जागा प्रथम पाच वर्षाच्या भुईभाड्याने देण्याचा निर्णय खालील अटी व प्राधिकरणाच्या इतर प्रचलित अटींवर घेण्यात येत आहे.

१) प्राधिकरणाच्या प्रचलीत नियमानुसार वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा.
२) भाडेपट्ट्याचे नूतनीकरण पाच वर्षानंतर प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीनुसार करण्यात यावे.
३) प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर जागेवरील सर्व बांधकाम मोडून जागा जशी आहे त्या स्थितीत मुंबई मंडळाच्या ताब्यात द्यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 25/Nov/1986

**Item No.** 4 A **Resolution No.** 1297

विषय : १-१७ जी. डी. आंबेकर मार्गावरील इमारत क्र. १, परमानंदवाडी, एफ. एस. वार्डच्या पुनःबांधणी करणे संबंधीच्या निविदा स्वीकृत करणे बाबत.

ठराव : निर्णय घेतला की, मुंबई मंडळाच्या ''निविदा समितीने'' शिफारस केल्याप्रमाणे, जी. डी. आंबेकर मार्गावरील इमारत क्र १-१७ (इमारत क्रमांक-१) च्या पुनःबांधणी संबंधीची मेसर्स अश्विना कन्स्ट्रक्शन ह्यांचे रूपये ६०,९६,६७५/- ची वाटाघाटीत कमी केलेली निविदा (जी रूपये ५५,१७,३५३/- अंदाजित किंमतीपेक्षा १०.५० टक्क्यांनी जास्त आहे). ती स्वीकृत करण्यात येत आहे.

**Item No.** 3 **Resolution No.** 1296

विषय : आदर्शनगर, वरळी या वसाहतीतील करमणूक व उद्यानासाठी राखून ठेवलेला भूखंड एमआयजी, आदर्शनगर, सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांना हस्तांतरण करण्याबाबत.

ठराव :

१) एमआयजी, आदर्शनगर सहकारी संस्था मर्यादित यांना भूखंडाच्या अधिमूल्याच्या किंमतीवरील व्याज मुंबई मंडळाच्या ज्यावेळी निर्णय झाला त्यावेळीपर्यंतच म्हणजे मे १९८५ पर्यंतच आकारण्यात यावे.

२) भूखंडाच्या अधिमूल्याच्या किंमतीवर म्हणजेच रूपये ७९,४९२.०६ यावर अडीच टक्के वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावा, व त्यामध्ये व्याजाच्या रकमेचा अंतर्भाव करू नये.

३) आदर्शनगर, वरळी, येथील जमीन मुंबई महानगरपालिकेने भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाला जरी ९९ वर्षांच्या लिजवर दिली असली तरी, प्राधिकरणाच्या सर्वसाधारण धोरणाप्रमाणे सदरहू संस्थेला मुंबई मंडळाने इमारती व इमारतीच्या आसपासचा भूखंड ज्या काळासाठी भाडेपट्ट्याने दिला असेल, तेवढ्याच काळापर्यंत करमणूक व उद्यानासाठी देण्यात यावयाच्या भूखंडाच्या वितरण करण्यात यावे.

**Item No.** 4 **Resolution No.** 1297

विषय : चारकोप-कांदिवली (प.) येथील जमिनीवर सर्वसाधारण सोयी पुरविणे, रस्ते व जलनिःस्सारणाच्या सोयीसाठी निविदा-गट-२.

ठराव : असा निर्णय घेतला की, चारकोप-कांदिवली (प.) येथील जमिनीवर सर्वसाधारण सोयी पुरविणे रस्ते व जलनिःस्सारणाच्या सोयींसाठीच्या कामाची रूपये ३८,१५,३०९.८९ ची (रूपये ४१,२२,४३१/- या अंदाजित किंमतीच्या ७.४५ टक्के कमी) मे. गुप्ता अँड कंपनी यांची निविदा स्वीकारण्यात येत आहे.

**Item No.** **1** **Resolution No.** **1301**

विषय : विशेष नियोजन प्राधिकरण अधिसूचित क्षेत्र-२ सोलापूर येथे विडी कामगारांसाठी अल्प उत्पन्न गट योजनेअंतर्गत ७८५ टप्पा-१ व २०६० गाळे टप्पा-२ या योजनांच्या निविदा स्वीकारण्याचा विचार करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,

(अ) विशेष नियोजन प्राधिकरण भाग-२ सोलापूर येथे विडी कामगारांसाठी घरे बांधण्यासंबंधी मुख्यअधिकारी/पुणे मंडळ यांनी १० गटामध्ये विभागणी करून कार्येत्तर मान्यता देण्यात येत आहे. कामाची वेगवेगळ्या गटातील विभागणी अभिन्यासातील सोय व ठेकेदारांना प्रत्यक्ष कामे वितरीत केलेली परिस्थिती लक्षांत घेवून सुधारित करण्यास हरकत नाही.

(ब) सदर कामाच्या खालीलप्रमाणे 'अ' प्रकाराच्या ब-१ प्रपत्राप्रमाणेच्या मंडळाचे एस्टिमेटवर आधारित निविदा मंजूर करण्यात येत आहेत.

| गट | घरे | ठेकेदाराचे नांव | ठेकेदारांच्या मंजूर निविदा | शेरा |
|---|---|---|---|---|
| अ) | ३०२ | मे.विजय कन्स्ट्रक्शन | ४२,३०,९४७.५० | प्रत्येक घरांची एस्टिमेट किंमत रू. १२,९७२/- ८ टक्के जास्त दराच्या निविदा मान्य |
| ब) | ३०२ | -''- | ४२,३०,९४७.५० | -''- |
| क) | १८१ | -''- | २५,३५,७६६.५० | -''- |
| ड) | ३४७ | मे.गणेश बिल्डर्स | ४८,६१,३८६.७० | -''- |
| इ) | २९२ | मे.सतीश कन्स्ट्रक्शन | ४०,९०,८४९.९० | -''- |
| फ) | २९३ | मे. गणेश बिल्डर्स | ४१,०४,८४९.९० | -''- |
| ग) | ३२० | -''- | ४४,८३,१२३.२० | -''- |
| ह) | ३२६ | मे.लक्ष्मी कन्स्ट्रक्शन | ४५,६७,१८१.७० | -''- |
| आय) | २८८ | आय.एस.पटेल | ४०,३४,८१०.८० | -''- |
| ज) | १९४ | -''- | २७,१७,८९३.४० | -''- |

१) सदर कामासाठी लागणारे संपूर्ण सिमेंट ठेकेदारानीच आणावयाचे आहे.

२) वीट बांधकामाचेऐवजी एम-३० ताकतीच्या सॉलीड सिमेंट कॉंक्रीट ब्लॉकचे बांधकाम करावे त्याचा दर ४४२ प्रति घ. मी. याप्रमाणे राहील.

३) आंब्याच्या फळीचा दरवाजाचा आयटम काढून टाकावा. व त्याबद्दल एमएस दरवाजा बसवावा. (दर ३४७.१० प्रति चौ. मी.)

४) मे. गणेश बिल्डर्स यांचेकडून १३५ लाखाचे वीस टक्के एवढी सॉलव्हन्सी घेणेत यावी.

५) ठेकेदारांच्या इतर कुठल्याही अटी लागू होणार नाही.

**Item No.** 2 **Resolution No.** 1302

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण/नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविलेल्या (१) नागपूर व (२) बुलढाणा जिल्हा येथील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण ३०.१५ लक्ष रूपये कर्ज घण्यास अनुमती व अधिकृती येते.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 05/Dec/1986

**Item No.** 3 **Resolution No.** 1303

विषय : दिनांक ५.१२.१९७७ पूर्वी बांधण्यात आलेल्या व वितरण केलेले गाळे कालांतराने मोकळे झाल्यानंतर सेवानिवासस्थाने म्हणून वाटप केलेल्या गाळ्यांना राखीव गट समजून त्यांना आर्थिक भाडे आकारणे व घरभाडे भत्ता देणे.

ठराव : निर्णय घेतला की, प्राधिकरणाने दिनांक २८.१.१९८३ च्या ठराव क्रमांक ६३३ अनुसार घेतलेल्या निर्णयाप्रमाणे दिनांक ५.१२.१९७७ पूर्वी ज्या गाळ्यांचे वाटप करण्यात आले होते अशा गाळ्यात कर्मचाऱ्यांना त्या गाळ्याचे आर्थिकभाडे आकारून घरभाडेभत्ता त्यांना द्यावा काय यावर वैयक्तिक प्रकरणी निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या दिनांक २.४.१९८३ च्या सभेत घेतलेल्या निर्णयानुसार उपाध्यक्षांना देण्यात आले होते. ते अधिकार आता प्रादेशिक मंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.

**Item No.** 4 **Resolution No.** 1304

विषय : गलिच्छवस्ती वसाहतीतील गाळे (तळमजल्याचे वगळून) विक्रीसंबंधी.

ठराव : निर्णय घेतला की, शासनाच्या क.एस.सी.एस. १९७७/सीआर/२९५/सात अ दिनांक ११.९.८५ च्या निर्णयानुसार गलिच्छवस्ती वसाहतीतील गाळे तळमजल्याचे गाळे वगळून भाडेकरूंना विक्री करण्यासंबंधीची बाब प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी ठेवण्यात आला होता.

सदर योजनेखाली गाळ्यांची विक्री किंमत शासनाने संमत केलेल्या. अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेखालील गाळे विक्री योजनेच्याच तत्त्वावर करावी. तथापि इमारतीची संरचनात्मक दुरुती करण्यासाठी सदर योजना अंमलात आणण्याची कबूली दिल्यानंतर जो संरचनात्मक दुरुस्ती करण्यासाठी सदर योजना अंमलात आणण्याची कबूली दिल्यानंतर जो संरचनात्मक दुरुस्तीचा खर्च येईल तो खर्च सुध्दा ह्या विक्री किंमतीत अंतर्भूत करावा. मुख्यलेखाधिकारी/मुंबई मंडळ व इतर ह्यांनी अशा खर्चाची पूर्ण तपासणी करून त्याप्रमाणे विक्री किंमत ठरवावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10/Dec/1986

**Item No.** 6 **Resolution No.** 1306

विषय : सर्व्हे नं. ४१, ओशिवरा येथे रस्ते व गटाराचे बांधकामाचे निविदा मंजूर करणेसंबंधी.

ठराव : निर्णय घेतला की, सर्व्हे नं. ४१, ओशिवरा येथील रस्ते व गटाराचे बांधकामाची रुपये ८८,१५,२३६/- ची (१,१३,७४,४९८ या अंदाजित किंमतीच्या २२.५० टक्के कमी) मे. रिलायन्स कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निम्नतम निविदा स्वीकारावी.

**Item No.** 7 **Resolution No.** 1307

विषय : श्री. आर. के. गायधनी लेखापाल औरंगाबाद मंडळ, मुदतवाढ.

ठराव : निर्णय घेतला की, बाब टिप्पणीमध्ये प्रस्तुत केल्याप्रमाणे अपवादात्मक बाब म्हणून श्री. आर. के. गायधनी, लेखापाल/औरंगाबाद मंडळ (नाशिक विभाग) यांना दिनांक १०/१२/१९८६ पासून आणखी सहा महिने अथवा अन्य पर्यायी व्यवस्था होईपर्यंत यापैकी जो कालावधी आधी संपेल तोपर्यंत कंत्राटी नेमणूकीत मुदतवाढ देण्यास प्रशासक/प्राधिकरण यांना मंजूरी दिली. योग्य व्यक्ती उपलब्ध झाल्यास श्री. गायधनी यांची नेमणूक त्वरीत संपुष्टात येईल.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 12/Dec/1986

**Item No.** 8 **Resolution No.** 1308

विषय : मूलपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या व प्राधिकरणाच्या लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांची जेष्ठतासूची.

ठराव : खातेनिहाय परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे जे कर्मचारी जे कर्मचारी, त्यांना जेष्ठ असलेल्या परंतु परिक्षा उत्तीर्ण न झालेल्या तसेच परीक्षेतून सूट मिळालेली नव्हती अशा कर्मचाऱ्यांच्या अगोदर पदोन्नत झाले होते. त्यांची मूळ जेष्ठता पुन:स्थापित करण्यात यावी. तसेच गुणवत्तेच्या निकषानुसार जे कर्मचारी त्यांना जेष्ठ असलेल्या काही कर्मचाऱ्यांना निष्प्रम (सुपरसीड) करून वरिष्ट संवर्गामध्ये पदोन्नत झाले होते, त्यांची जेष्ठताही त्यांनी निष्प्रम केलेल्या कर्मचाऱ्यांवर पुन:स्थापित करण्यात यावी. प्राधिकरणाच्या क्रमांक/एमएच/एसईएन११६६/१११२१ प्र. १ दिनांक १५ जून १९८५ च्या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या जष्ठतासूचीमध्ये त्यानुसार सुधारणा करण्यात याव्यात.
दिनांक १६ जून १९८६ च्या आदेशाच्या परिच्छेद ४ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे नवीन निर्णयामुळे केली जाणारी दुरूस्ती या सुधारणा दिनांक १६ जून १९८६ पासून करण्यात आली व अंमलात आली. असे समजण्यात येईल.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 17/Dec/1986

**Item No.** 5 **Resolution No.** 1305

विषय : खराडी, पुणे येथे विडी कामगारांसाठी अल्प उत्पन्न गट-१ अंतर्गत ५५५ गाळे बांधणे योजनेची २७६/२७९ गाळे दोन गटात विभागणी करून निविदा मागविणे.

ठराव : निर्णय घेतला की, खराडी, पुणे, येथे विडी कामगारांसाठी अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेअंतर्गत ५५५ गाळ्यांच्या गृहनिर्माण योजनेची २७६/२७९ गाळे अशा दोन गटात विभागणी करून निविदा मागविण्याच्या मुख्याधिकारी/पुणे मंडळ यांच्या प्रस्तावास प्रशासक/प्राधिकरण मान्यता देत आहे.

**Item No.** 9 **Resolution No.** 1309

विषय : कन्नमवारनगर, विभाग-२ विक्रोळी या वसाहतीतील अल्प उत्पन्न गटाची इमारत क्रमांक १४४ च्या मालकीचे सहकारी संस्थेकडे हस्तांतरण.

ठराव : निर्णय घेतला की, कन्नमवारनगर, विक्रोळी येथील अल्प उत्पन्न गटाच्या इमारत क्र. १४४ मधिल ४३२४ क्रमांकाच्या गाळ्यात श्री. आर. बी. कपाडिया, कनिष्ठ अभियंता, यांना वाटप केलेले सेवानिवासस्थान किंमत १० वर्षे सेवा झाली असली पाहिजे ही अट शिथिल करून त्यांना विकी करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 22/Dec/1986

**Item No.** 16 **Resolution No.** 1316

विषय : हुडकोने दस्तऐवज आकारात केलेली वाढ आणि लागू केलेला सेवा आकार.

ठराव : निर्णय घेतला की, हुडकोकडील पत्र क्र. एसईसीटीटी/सर्क्युलर/२/८६/२९९२८ दिनांक ४ डिसेंबर १९८६- अन्वये सध्या हुडकोकडे कर्जमंजूरीसाठी योजना पाठवताना भरावा लागणारा रूपये ५,०००/- दस्तऐवज आकार हुडकोने दिनांक १ जानेवारी १९८७ पासून, ग्रामीण आणि नागरी भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या स्वतंत्र योजना सोडून रू. १०,०००/- केला आहे. त्याचप्रमाणे तो परत न करण्याजोगा (नॉन रिफंडेबल) केला आहे. त्याशिवाय प्राथमिकता क्षेत्रातील (प्रायोरिटी सेक्शन) योजना सोडून इतर सर्व मध्यम/उच्च उत्पन्न गट योजना आणि वाणिज्यिक (कमर्शियल) योजनांसाठी दिनांक १ जानेवारी १९८७ पासून कर्जरकमेच्या एक टक्का एककालीन (वन टाईम सर्व्हिस चार्ज) सेवाआकार आकारण्यात येणार आहे व तो कर्जाच्या पहिल्या हप्त्यामधून वळता करून घेतला जाईल. मात्र ज्या योजनांसाठी हुडको मान्यताप्राप्त सल्लागार (कन्सल्टंटस्) नेमले जातील ह्या योजनांना हा सेवाआकार लावण्यात येणार नाही.

हुडकोच्या सुधारीत दस्तऐवज आकार आणि नव्याने लागू करण्यात झालेला सेवाआकार यांची प्राधिकरणाने नोंद घेतली असून त्यांची प्राधिकरणाने आपल्या हुडको अर्थसहाय्यीत योजनांच्या बाबतीत नाईलाजाने अंमलबजावणी करावी. मात्र ही वाढ जाचक व असमर्थनीय असल्याचे दाखवून या वाढीचा फेरविचार करण्याबद्दल हुडको व केन्द्रशासनाला विनंती करण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 23/Dec/1986

**Item No.** 10 **Resolution No.** 1310

विषय : पुणे महानगरपालिकेने हाती घेतलेल्या गलिच्छवस्ती निर्मूलन योजनेसंबंधी प्रबंधात्मक अहवाल व चित्रपट तयार करण्याकरिता हुडको या संस्थेकडून बिनव्याजी कर्ज घेण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, पुणे महानगरपालिकेने हाती घेतलेल्या गलिच्छवस्ती निर्मूलन योजनेसंबंधी प्रबंधात्मक अहवाल तसेच २० मिनिटाच्या १६ एमएमचा रंगीत अनुबोधपट तयार करण्याकरिताच्या रूपये ३ लाख खर्चाच्या योजनेला मान्यता देण्यात आली. याकरिता हुडको या संस्थेकडून बिनव्याजी कर्ज घेण्यास अनुमती देण्यात आली आहे.

**Item No.** 11 **Resolution No.** 1311

विषय : बाबासाहेब आंबेडकर रोड वरील इमारत क्र. १०८, १२०, ११४ अ ब क पाटणवाला कंपाऊंड ई वॉर्डच्या पुनःबांधणी करणेबाबत.

ठराव : प्रशासक/प्राधिकरण यांनी असा निर्णय घेतला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड वरील इमारत क्र. १०८, १२०, ११४, अ, ब, क, पाटणवाला कंपाऊंड ई वॉर्ड येथील इमारत पुनःबांधणी संबंधीची मेसर्स सोलंकी ब्रदर्सची रूपये ७३,६०,४३८.६० ची (६९,४३,८१० या अंदाजित किंमतीच्या ६ टक्के जास्त) निम्नतम निविदा स्वीकारावी.

**Item No.** 12 **Resolution No.** 1312

विषय : भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या प्राधिकरणाच्या लिपिक संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या जेष्ठतासूची संदर्भात परिणामस्वरूप लाभ.

ठराव : दिनांक १६ जून १९८६ च्या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या जेष्ठतासूचीमधिल जो कर्मचारी दर्शविण्यात आलेल्या तारखेला, पदोन्नतीस पात्र असूनही प्रत्यक्षात त्या तारखेनंतर पदोन्नत झाला आहे, त्याचे वेतन संबधित कर्मचारी ज्या तारखेला पदोन्नतीस पात्र होतो. त्या तारखेला जर जेष्ठतासूची अंतिम झाली असली तर त्या तारखेला तो पदोन्नत झाला होता असे मानून, निश्चित केले जावे. मात्र, प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या तारखेपूर्वीच्या कालावधीकरीता त्याला वेतनाची थकबाकी दिली जाऊ नये.

| Item No. | 13 | Resolution No. | 1313 |
|---|---|---|---|

विषय : श्री. एच. एल. मिस्त्री, उपअभियंता. यांनी दाखल केलेल्या याचिकेमधिल मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल.

ठराव : श्री. एच. एल. मिस्त्री, यांना कनिष्ठ अभियंता संवर्गामधिल त्यांचे मूळ जेष्ठतेनुसार त्यांना दिनांक २५.४.८० च्या आदेशान्वये उपअभियंता या पदावर दिनांक १.५.८० च्या मानीव तारखेनुसार पदोन्नती दिली जावी.

दिनांक १.५.८० या मानीव तारखेपासून प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या तारखेच्या कालावधीकरिता श्री. मिस्त्री यांना वेतननिश्चिती व त्यानुसार मिळाव्या वेतन थकबाकीचा लाभ देण्यात यावा.

दिनांक १.५.८० च्या मागील तारखेपासून प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या कालावधीकरिता मुंबई मंडळाचे आस्थापनेवर उपअभियंताचे एक अधिसख्य पद निर्माण करण्यात यावे.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 26/Dec/1986 |
|---|---|---|---|

| Item No. | 14 | Resolution No. | 1314 |
|---|---|---|---|

विषय : औद्योगिक कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची विक्री योजना.

ठराव : निर्णय घेतला की, औद्योगिक कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्यासाठी बांधलेल्या इमारतीतील गाळ्यांची बाकी किंमत किंवा पूर्ण किंमत तसेच पूर्ण थकबाकी एकरकमी भरून किंमतीतील अतिरिक्त १० टक्के सूटीचा (एकूण ३० टक्के) लाभ ज्या इमारतीतील गाळेधारकांना उपलब्ध आहे त्यांना तो लाभ देण्यासाठी दि. ३१.३.८७ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. तसेच गाळ्यांची बाकी किंमत किंवा पूर्ण किंमत आणि पूर्ण थकबाकी एकरकमी भरल्यास त्या रकमेवर ५ टक्के सूट (डिस्काऊंट) देण्यासाठीही दिनांक ३१.३.८७ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. याबद्दल शासनाची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी.

| Item No. | 15 | Resolution No. | 1315 |
|---|---|---|---|

विषय : नागपूर मंडळाच्या वर्धा व रीजरोड येथील गाळ्यांचे वाटप करण्याच्या बाबतीत अटी शिथिल करणे.

ठराव : निर्णय घेतला की, रीजरोड, नागपूर व वर्धा येथील सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेल्या दोन योजनांतील अनुक्रमे अल्प उत्पन्न गट आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या उरलेल्या गाळ्याचे वाटप खालीलप्रमाणे अटी शिथिल करून करण्यात यावे.

१) एका अर्जदारास एकापेक्षा अधिक गाळे पाहिजे असल्यास द्यावेत. मात्र व्यक्तिगत अर्जदारास दोनच गाळे द्यावेत. अर्जदार एखादी मान्यताप्राप्त संस्था असल्यास दोनापेक्षा अधिक गाळे द्यावेत.

२) किंमतीचा प्रारंभिक हप्ता सुरुवातीस ५० टक्के घेवून बाकी ५० टक्के रक्कम दोन वर्षाच्या मुदतीत वसुलीतील विलंबापोटी योजनेतील दराने व्याज आकारून त्यासह वसूल करावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 29/Dec/1986

**Item No.** 17 **Resolution No.** 1317

विषय : कार्यकारी अभियंत्यांना कंत्राटावर सही करण्याचे व मुद्रांकन करण्याचे अधिकार प्रदान करणे.

ठराव : बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे मंडळातील कार्यकारी अभियंत्यांना कंत्राटे व इतर करारपत्रावर सही करण्याचे व ती पूर्ण करून त्यावर मुद्रांकित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात यावेत.

**Item No.** 18 **Resolution No.** 1318

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे घरे बांधण्यासाठी देण्यात आलेल्या भूखंडाबाबत.

ठराव : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे पूर्वी देण्यात आलेल्या निवासी भूखंडाची वेगवेगळ्या प्रकारे अटींचा प्राधिकरणाने दिनांक ३१.५.८६ च्या ६२ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयात बदल करून भंग करण्यात आलेली प्रकरणे नियमित करण्यासाठी बाब सूचीत प्रकार १ ते ५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अधिमूल्याच्या दरांना व अटींना प्रशासक/प्राधिकरण यांनी मान्यता दिली.

२. भाडेपट्ट्याच्या करारनाम्यात वरील प्रकरणाच्या योग्यप्रकारे अंतर्भाव करण्यात यावा.

३. जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील निवासी भूखंडाचे नियमन करण्यासाठी दिनांक ३१.५.१९८५ रोजी भरलेल्या ६२ व्या बैठकीत विषयसूची क्रमांक ६२/१२ अन्वये निर्णय घेतला होता. त्या निर्णयानुसार ज्या भूखंड धारकांना निवासी व अनिवासी भूखंडाचे सुधारित अधिमूल्य कळविण्यात आले होते त्या सर्वांचा फेरविचार बाब टिप्पणीत वरील प्रकरणांच्या सूत्रानुसार करण्यात यावा.

४. जुहू-विलेपार्ले विकास योजनेखाली निवासी कारणासाठी देण्यात आलेल्या भूखंडाची प्रलंबित प्रकरणे नियमीत करण्यासाठी प्रत्येक प्रकरणाचे स्वतंत्र स्वयंपूर्ण प्रस्ताव प्रशासक/प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यात यावेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 06/Jan/1987

**Item No.** 1 **Resolution No.** 1319

विषय : केंद्र शासनाने देऊ केलेल्या रुपये १०० कोटींच्या अनुदानामधून धारावी गलिच्छवस्ती सुधार व अन्य तत्सम प्रकल्पांची अंमलबजावणी.

ठराव : केंद्र शासनाने देऊ केलेल्या रुपये १०० कोटींच्या अनुदानामधून धारावी गलिच्छवस्ती सुधार प्रकल्प व अन्य तत्सम प्रकल्पांचे अंमलबजावणीकरिता तत्संबंधीचा आराखडा शासनाकडून अंतिमरित्या मान्य होईपर्यंत प्राथमिक पूर्व तयारी म्हणून प्राधिकरणाच्या आस्थापनेवर खालील पदे निर्माण केली जावीत. याला या ठरावान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

१) सहमुख्यकार्यकारी अधिकारी - एक पद.

रुपये २०००-१२५-८२-२२५०

(मुंबई मंडळाच्या आस्थापनेवरील उपमुख्यअधिकारी (दु.पु.) हे पद प्राधिकरणाकडे परिवर्तित करून व त्यांचे वेतनश्रेणी उर्ध्वमूल्यांकित करून)

२) लघुलेखक (वरिष्ठ श्रेणी - इंग्रजी) - एक पद

रुपये ६००-३०-७५०-४०-९५०

३) कनिष्ठलिपिक - तथा टंकलेखक - एक पद

रुपये २६०-१०-३९०-१५-४२० विस्तार १५-४९५

४) शिपाई - एक पद

रुपये २००-३-२३०-५-२५५ विस्तार ५-२८०

उपरोक्त पद निर्मितीस शासनाची कार्योत्तर मंजूरी मिळवावी.

**Item No.** 2 **Resolution No.** 1320

विषय : जुहू-विलेपार्ले येथील व्यापारी संकुलातील गाळा क्र. ४६, ५७ व ६८ चे वाटप.

ठराव : निर्णय घेतला की, जुहू-विलेपार्ले येथील व्यापारी संकुलातील क्र. ४६, ५७ व ६८ क्रमांकांच्या गाळ्यांचे वाटप अनुक्रमे खालील संस्थांना करण्याची जी कार्यवाही मुंबई मंडळाने केली त्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.

१) एच. पी. इन्वेस्टमेंट
२) मेसर्स इम्स्ट्रीट इंडिया
३) श्री. बावडेकर व श्री. डिसोझा

| **Item No.** | **3** | **Resolution No.** | **1321** |
|---|---|---|---|

विषय : पंतनगर, घाटकोपर येथील पत्राचाळीवरील जमिनीचे मुईभाडे आकारण्याबाबत.

ठराव :

१) पंतनगर, घाटकोपर येथील पत्राचाळ ज्या स्थितीत आहे त्याच स्थितीत ठेवण्यात यावी.
२) तेथे सध्या राहणाऱ्या प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांस जानेवारी १९७५ पासून मासिकभाडे रु. १४७.५० अधिक पाण्यासाठी प्रत्येक खोलीत दरमहा रुपये ८.२५ मूल्य आकारावे.
३) जमिनीचा कोणत्याही प्रकारे भाडेपट्ट्याचा करार करून त्यांना मालकी हक्क देऊ नये.
४) त्यांच्याकडून योग्य ते हमीपत्र लिहून घेण्यात यावे.
५) गाळ्यांचे हस्तांतरण फी आकारून फक्त त्यांचे वारस किंवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना करण्यास परवानगी द्यावी.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **14/Jan/1987** |
|---|---|---|---|

| **Item No.** | **4** | **Resolution No.** | **1322** |
|---|---|---|---|

विषय : पिंपरी, पुणे येथे उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेअंतर्गत १८० गाळे बांधणे योजनेची ६०/६०/६० गाळे अशा तीन गटांत विभागणी करून निविदा मागविणे.

ठराव : निर्णय घेतला की,
पिंपरी, पुणे येथे उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेअंतर्गत १८० गाळ्यांच्या गृहनिर्माण योजनेची प्रत्येक गटात ६० गाळेप्रमाणे तीन गटांत विभागणी करून निविदा मागविण्याचा मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांच्या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत आहे.

| **Item No.** | **5** | **Resolution No.** | **1323** |
|---|---|---|---|

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे पिंपरी, पुणे येथील उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून १२९.१५ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **24/Jan/1987**

**Item No.** **6** **Resolution No.** **1324**

विषय : पाचपाखडी येथील भूखंड विकास, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, पादचारी रस्ते गाभाघरे बांधलणे, गाभाघरे समूहातील सुविधा वगैरेंची गट - १ व गट २ च्या निविदा.

ठराव : पाचपाखडी, ठाणे येथील भूखंड विकास, पाणीपुरवठा जलनिस्सारण, पादचारी रस्ते, गाभाघरे समूहातील सुविधा वगैरेच्या कामांची खाली दिल्याप्रमाणे निम्नतम निविदा स्वीकारण्यात येत आहे.

| अ.क्र. | निविदा स्वीकारण्यात आलेल्या कंत्राटदाराचे नाव | निविदातील अंदाजित रक्कम | निविदा रक्कम | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| गट क्र. १ | मे. अमृतलाल सुखवाणी | ७६,२३,२२४.०० | ७८,२८,५८९.०० | २.६९ टक्के वर |
| गट क्र. २ | मे. विरल बिल्डर्स | ७२,४१,७८३.०० | ७१,०६,६०९.५० | १.८६ टक्के कमी |

**Item No.** **7** **Resolution No.** **1325**

विषय : १-१७ जी. डी. आंबेकर मार्ग येथील परमानंदवाडी या नावाने ओळखलेल्या जाणाऱ्या इमारतींची पुनर्रचना - इमारत क्रमांक - ३

ठराव : निर्णय घेतला की,
वरील इमारतीचे राहिलेले काम रुपये १३,१२,०७२ चे (२६.७५ टक्के जादा) मे. एम. एस. के. कंस्ट्रक्शन कंपनी यांना पूर्वीच्या निविदांतर्गत दरानुसार चालू करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या कामावर त्यांना ४ टक्के (चार टक्के) टर्न ओव्हर टॅक्स अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **27/Jan/1987**

**Item No.** **8** **Resolution No.** **1326**

विषय : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने पार पाडावयाचे प्रकल्प
कार्यपद्धती व्यवस्थापन व वित्तीय पद्धती यामध्ये सुधारणा करण्यासाठी संमंत्रकाची नियुक्ती.

ठराव : या टिप्पणीत सुचविलेल्या बाबींसाठी त्यानुसार करारपत्र करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना अधिकार देण्यात आले आहेत. हा अतिरिक्त खर्च जागतिक बँक प्रकल्पाचे लेखा शीर्षात खर्ची घालावा.

| **Meeting No.** | **62 A** | **Meeting Date** | **28/Jan/1987** |
|---|---|---|---|
| **Item No.** | **13** | **Resolution No.** | **1331** |

विषय : केंद्र शासनाच्या रुपये १०० कोटी अनुदानामधून हाती घेण्यात यावयाचे प्रकल्पांकरिता कर्मचारी वृंद.

ठराव : बाब टिप्पणीसोबत जोडण्यात आलेल्या यादीनुसार व शासनाच्या आदेशाला अनुसरुन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर 'धारावी विकास प्रकल्प' या प्राधिकरणांतर्गत विभागाकरिता विविध प्रकारची एकूण १०१ पदे मंजूर करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर प्रकल्प विभाग हा प्राधिकरणांतर्गत असला तरी प्राधिकरणाच्या नियमित विभागाकडून स्वतंत्र राहील. त्या विभागामध्ये केल्या जावयाच्या नेमणूका निवड स्वरुपात कंत्राटी पद्धतीच्या व योजनेच्या काळाएवढे मर्यादित तात्पुरत्या राहतील. या पदावरील खर्च राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून मागविला जावा.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 29/Jan/1987 |
|---|---|---|---|
| Item No. | 9 | Resolution No. | 1327 |

विषय : बालवाडी व सकस आहार केंद्र चालविण्यास इ. क्र. ५१, सुभाषनगर, चेंबूर संक्रमण शिबिर जवळील मोकळी जागा मिळण्याबाबतचा श्रीमती हेमा भाऊ गोंधळेकर, यांचा दि. २१.२.८६ चा विनंती अर्ज.

ठराव : बालविकास केंद्र, चेंबूर, मुंबई (नोंदणी ७०१) या संस्थेस संक्रमण शिबिर इमारत क्र. ५१, सुभाषनगर, चेंबूर जवळील ८.६ बाय १८ फूट आकाराची मोकळी जागा बालवाडी व सकस आहार केंद्र चालविण्यासाठी एक वर्षाच्या भाडेपट्टीकरिता खालील अटींवर देण्यात येत आहे.

१) बाल विकास केंद्र या संस्थेने बांधकामाबाबत मुंबई महानगरपालिकेची संमती देण्यात यावी.

२) प्राधिकरणाला आवश्यक भासेल तेव्हा वितरित केलेली जागा स्वखर्चाने स्वतःच्या जबाबदारीवर कोणतीही भरपाई न मागता जागा पूर्वी होती तशी व त्या स्थितीत प्राधिकरणाच्या ताब्यात द्यावी.

३) सदर जागेचा वापर दुसऱ्या अन्य कारणांसाठी करता येणार नाही.

४) सदर भूखंड बालवाडीसाठी तसेच सकस आहार हा बालवाडीतील लहान मुलांना चांगले खाद्य देण्याचा एक भाग असल्यामुळे शाळेसाठी देण्यात येणाऱ्या भूखंडाचे जे अधिमूल्य प्राधिकरण आकारले त्याच अधिमूल्याचे अवलंबन करावे.

**Item No.** **10** **Resolution No.** **1328**

विषय : टाटा हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनीला ओव्हरहेड ट्रान्समिशन लाईन्स टाकण्यासाठी सर्व्हे क्र. ४१ (भाग) ओशिवरा येथे देण्यात आलेल्या जमिनीबाबत.

ठराव : टाटा हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनीला ओव्हरहेड पॉवर लाईन्स टाकण्यासाठी सर्व्हे क्रमांक ४१ (भाग) ओशिवरा येथे देण्यात आलेल्या भूखंडाच्या अधिमूल्याचे खालीलप्रमाणे जे दर सुचविले आहेत त्यास मान्यता देण्यात येते.

प्रकार : (१) :- ज्या वसाहतीमध्ये ट्रान्समिशन लाईनमुळे गृहनिर्माण योजनेला कोणतीही बाधा येत नाही किंवा त्यावरील चटईक्षेत्राचे नुकसान होत नाही अशा वेळी प्रत्येक टॉवरमागे रुपये ५,०००/- इतकी आकारणी करावी व ट्रान्समिशन खाली असलेल्या जमिनीचा संपूर्ण विकास बगीच्यासाठी टाटा कंपनीने त्यांच्या खर्चाने करावा त्याचप्रमाणे जमिनीच्या संरक्षणासाठी योग्य प्रकारे कुंपणही घालावे. यामुळे ट्रान्समिशन लाईनखाली अनधिकृत बांधकाम होणार नाही. ट्रान्समिशन लाईनखालील जमिनीचा खर्च हा तेथील गृहनिर्माण योजनेद्वारा करावा व शक्यते ट्रान्समिशन लाईनखाली १५ टक्के बगीच्यासाठी आरक्षण करावे.

प्रकार : (२) :- ओव्हरहेड ट्रान्समिशन लाईनमुळे जर प्राधिकरणाच्या जमिनीवरील गृहबांधणी योजनेस नुकसान होत असेल, जसे चटईक्षेत्रामध्ये नुकसान होत असेल तर ज्या प्रमाणात ट्रान्समिशन लाईनखाली जमीन जाणार आहे अशा जमिनीची संपूर्ण किंमत आकारण्यात यावी. एकूण सर्व जमिनीवर वरील दोन प्रकारच्या आकारणीच्या रकमेवर वार्षिक एक टक्का भाडेपट्टा आकारण्यात यावा.

ओशिवरा, सर्व्हे नंबर ४१ (भाग) येथील जमिनीच्या आरक्षणाखाली परिस्थिती वेगळी असल्या कारणाने उपरोक्त निर्णय हा फक्त ओशिवरा येथील जमिनीपुरताच मर्यादित असेल.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 30/Jan/1987

**Item No.** 11 **Resolution No.** 1329

विषय : दि अहमदनगर सहकारी बँक यांना अभ्युदय नगर, काळाचौकी येथे बँक शाखा उघडण्याबद्दल जागा मिळणेबाबत.

ठराव :

१) महिला जीवन संवर्धक मंडळ यांना देण्यात आलेल्या भूखंडावर अहमदनगर सहकारी बँक बांधकाम होणार आहे. बांधकामाचा निम्मा भाग महिला जीवन संवर्धक मंडळ यांना त्यांच्या कार्यक्रमांसाठी वापरण्यास देणार आहे. इमारतीच्या तळमजल्यावर बँक आपली शाखा चालविणार आहे. एकूण अंदाजित बांधकाम २४ लाखाचे करणार असल्याचे सांगण्यात आले. म्हणजे महिला जीवन संवर्धक मंडळाला प्राप्त होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या २५ टक्के रक्कम संस्थेने मुंबई मंडळाकडे आगाऊ भरावी. निम्मा बांधकामाचा खर्च १३ लाख पासून त्याच्या २५ टक्के भरावा. अंदाजित बांधकामाचा निम्मा खर्च १२ लाखापेक्षा जादा असल्यास तेवढा जादा खर्चाच्या २५ टक्के भरावा.

२) वरील बांधकामापेक्षा कोणतेही अधिक बांधकाम केल्यास महिला मंडळाला जो काही मोबदला मिळेल त्याच्या २५ टक्के रक्कम महिला जीवन संवर्धक मंडळाने मुंबई मंडळाकडे अदा करावीत व तसा व्यवहार करण्यापूर्वी प्राधिकरणाची परवानगी घ्यावी.

३) बांधकामाचे नकाशे मुंबई मंडळ/मुंबई महानगरपालिका यांच्याकडून मंजूर करून घेण्यात यावेत.

४) महिला जीवन संवर्धक मंडळाचे कार्य व अहमदनगर सहकारी बँकेची शाखा या व्यतिरिक्त अन्य योजनांसाठी बांधकामाचा उपयोग करण्यात येऊ नये. तसे आढळून आल्यास हा परवाना रद्द करण्यात येईल.

**Item No.** 12 **Resolution No.** 1330

विषय : जुहू-विलेपार्ले विकास योजना येथे ५५ क्रमांकाच्या भूखंडावर मंडळाच्या परवानगीशिवाय बांधकामास सुरुवात केल्यामुळे आकारण्यात यावयाच्या अतिरिक्त अधिमूल्यांबाबत.

ठराव :

१) श्री. अर्जुन जयरामदास यांना जे.व्ही.पी.डी. येथील भूखंड क्र. ५५ सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२) श्री. अर्जुन जयरामदास यांच्या प्रकरणात सोसायटींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने बाजारभावाच्या २५ टक्के आकारणी करावी.

३) अशा प्रकारे इतर सोसायटीला हस्तांतर करावयाचे प्रकल्प हाताळावे.

**Meeting No.** **62 A** **Meeting Date** **16/Feb/1987**

**Item No.** **1** **Resolution No.** **1332**

विषय : भूखंडाच्या भाडेपट्ट्याची मुदत वाढविण्याबाबत श्रीमती मंगला तुकाराम जाधव यांना पिठाच्या गिरणीसाठी गोराई रोड, बोरीवली येथे वितरित केलेल्या भूखंडाबाबत.

ठराव :

१) श्रीमती मंगला तु. जाधव यांना गोराई रोड, बोरीवली येथे ४० बाय ३२ फूट आकारमानाच्या पिठाच्या गिरणीसाठी वितरित केलेल्या भूखंडाच्या भाडेपट्ट्याची मुदत जानेवारी १९७७ पासून पुढे ३० वर्षांनी भूखंडाचे अधिमूल्य रु. १२००/- प्रति चौ. मी. व नियमानुसार वार्षिक भुईभाडे आकारून वाढवून देण्यास हरकत नाही.

२) श्रीमती जाधव यांचेकडून पूर्वीचे भाडे वसूल झाल्याशिवाय वाटप पत्र पाठवू नये.

**Item No.** **2** **Resolution No.** **1333**

विषय : पिंपरी येथे सहकारी दूध केंद्रास जागा मिळणेबाबत.

ठराव : पुणे मंडळाच्या अखत्यारीत असलेल्या पिंपरी येथील व इतर वसाहतीत सहकारी दूध केंद्रासाठी लागणारे भूखंडाचे वाटप बाब टिप्पणीत दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात यावे. तसेच या भूखंडाचे वाटप करण्याचे अधिकार मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांस प्रदान करण्यात येत आहेत.

इतर मंडळांना सुद्धा (मुंबई सोडून) या प्रकारचे दूध केंद्रासाठी लागणारे भूखंडाचे वाटप करण्याचे अधिकार त्या त्या मंडळाच्या मुख्य अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येत आहेत.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 17/Feb/1987

**Item No.** 3 **Resolution No.** 1334

विषय : अरमान ट्रेडर्स यांना अनधिकृतपणे व्यापलेली इमारत क्र. १५ औद्योगिक वसाहत सी. टी. एस. क्र. ६, गोरेगाव जवळील मोकळी जागा नियमित करण्याबाबत.

ठराव : मे. अरमान ट्रेडर्स यांना औद्योगिक वसाहत सी. टी. एस. क्र. ६ जवळील सुमारे ६.५ बाय २५ मी. एवढा मोकळा भूखंड, प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार, एक वर्षाचे मुदतीसाठी भूखंडाचे भाडे, व्यापारी तत्त्वावर ठरवून खालील अटींवर देण्यात यावा.
१) भूखंडाचा वापर फक्त दुकानात न मावणाऱ्या इमारतीचा माल ठेवण्यासाठीच करण्यात यावा.
२) भूखंडावर कोणतेही कच्चे अगर पक्के बांधकाम करू नये अथवा शेड बांधण्यात येऊ नये.
३) शेजारील भाडेकरूंना त्रास होणार नाही याची हमी देण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 1336

विषय : महानगर टेलिफोन निगम, मर्यादित मुंबई यांना पोईसर, कांदिवली येथे भूखंड मिळणेबाबत.

ठराव : महानगर टेलिफोन निगम मर्यादित, मुंबई यांना समता नगर, पोईसर या वसाहतीत बँकेसाठी राखीव असलेला १२०५ चौ. वार क्षेत्रफळाचा भूखंड क्र. ४, टेलिफोन एक्स्चेंजसाठी प्राधिकरणाच्या प्रचलित किंमतीच्या धोरणानुसार नेहमीच्या अटी व शर्तीनुसार वितरित करण्यात यावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 18/Feb/1987

**Item No.** 4 **Resolution No.** 1335

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे यवतमाळ/अहमदनगर/औरंगाबाद/नाशिक/जालना/बीड व अकोला जिल्हा येथील ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून एकूण १४७.९३ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते.

**Item No.** 6 **Resolution No.** 1337

विषय : कार्यालयीन इमारतीतील कर्मचाऱ्यांना दिलेल्या गाळ्यांची विक्री करताना आकारावयाची किंमत.

ठराव : निर्णय घेतला की,
सेवानिवासस्थाने म्हणून दिलेल्या गाळ्यांची विक्री प्राधिकरण कर्मचाऱ्यांना करण्याच्या ठराव क्रमांक १०३८ मधील निर्णयात सुधारणा करून कार्यालयीन इमारतीतील सेवानिवासस्थानांची विक्री करताना रु. ३०/- प्रति चौ. फूट या दराने किंमत आकारण्यात यावी.

**Item No.** 7 **Resolution No.** 1338

विषय : सन १९८७-८८ चे प्राधिकरणाचे अंदाजपत्रक.
तथा सन १९८६-८७ चे सुधारित अंदाजपत्रक.

ठराव : प्राधिकरणाच्या १९८६-८७ च्या सुधारित अंदाजपत्रक व १९८७-८८ चे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकावर विचार करून वरील प्रमाणे १९८६-८७च्या सुधारित व १९८७-८८ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येत आहे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 20/Feb/1987

**Item No.** 8 **Resolution No.** 1339

विषय : कार्यव्ययी आस्थापनेवर पाच वर्षे पूर्ण झालेल्या कामगारांना हंगामी नियत आस्थापनेवर घेणे.

ठराव : निर्णय घेतला की, मुंबई व नागपूर मंडळातील ज्या कार्यव्ययी आस्थापनेवरील कामगारांना अनुक्रमे दिनांक १.१०.८४ व १.१०.८६ रोजी पाच वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा ८० कामगारांना बाब टिप्पणीत सुचविल्याप्रमाणे हंगामी नियत आस्थापनेवर घेण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 23/Feb/1987

**Item No.** 9 **Resolution No.** 1340

विषय : मौजे कुर्ला येथील स. नं. १७१ (भाग), १७२ (भाग) मधील जागेत बांधकामाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ठराव : कोकण निवास को. ऑ. हौसिंग सोसायटी, कुर्ला यांना बाब टिप्पणीत सादर केलेला पर्याय नं. २ प्रमाणे सदर सोसायटीला त्यांच्या जागेएवढीच पर्यायी जागा खालील अटींवर देण्यात यावी.

१) कोकण निवास को. ऑ. हौसिंग सोसायटी, कुर्ला हे त्यांच्या सोसायटीच्या जागेएवढीच पर्यायी जागा घेण्यास तयार आहेत किंवा नाही याबाबत सोसायटीकडून प्रथम हमीपत्र लिहून घेण्यात यावे.

२) जागेची मोजणी संयुक्तरित्या करण्यात यावी.

३) प्राधिकरणाने जमिनीचे विकासावर केलेला संपूर्ण खर्च संस्थेकडून वसूल करून संस्थेस ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे.

४) सोसायटीस बांधकामास अयोग्य असलेल्या जागेबदली, बांधकामास योग्य अशी जागा देण्यात येत असल्यामुळे जमिनीच्या किंमतीमधील फरकाची रक्कम सोसायटीकडून घेण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 25/Feb/1987

**Item No.** 10 **Resolution No.** 1341

विषय : वांद्रे (पूर्व) येथील निर्मलनगर या वसाहतीतील रिकामा भूखंड पोलीस स्टेशनकरिता वितरित करण्याबाबत.

ठराव : वांद्रे (पूर्व) येथील निर्मलनगर वसाहतीतील इमारत क्र. १५ व १९ या मधील सुमारे ९५९ चौ. मी. क्षेत्रफळाचा रिकामा भूखंड प्राधिकरणाचे प्रचलित धोरणानुसार भूखंडाची आगाऊ संपूर्ण किंमत वसूल करून पोलीस खात्यास करण्यात यावा.

**Item No.** 11 **Resolution No.** 1342

विषय : मुंबई मंडळाचे आस्थापनेवर कार्यकारी अभियंताचे एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत.

ठराव : मुंबई मंडळाचे आस्थापनेवर दिनांक ५ सप्टेंबर १९७८ ते ३० एप्रिल १९८५ या कालावधीकरिता कार्यकारी अभियंता या दर्जाचे रुपये १०००-५०-१५०० या वेतनश्रेणीमध्ये एक अधिसंख्य पद निर्माण करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**Item No.** 12 **Resolution No.** 1343

विषय : खेरनगर, वांद्रे येथील इमारत क्र. ८ या औद्योगिक कामगारांसाठी बांधलेल्या इमारतीत कर्मचाऱ्यांना दिलेले २५ गाळे विक्री करण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की, खेरनगर, वांद्रे येथील इमारत क्र. ८ मध्ये कर्मचाऱ्यांना खास बाब म्हणून दिलेल्या गाळ्यांची विक्री भूतपूर्व किंवा विद्यमान कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्या वारसांना गाळ्यांची पूर्ण विक्री किंमत आकारून व थकबाकी असल्यास ती पूर्णपणे वसूल करून करण्यात यावी.

**Item No.** 13 **Resolution No.** 1344

विषय : माध्यमिक शाळेच्या भूखंडाच्या वाटपासाठी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने फेब्रुवारी ८६ मध्ये वर्तमानपत्रात दिलेली जाहिरात.

ठराव : प्राधिकरणाच्या जाहिरातीमधील शर्तीस अधीन राहून, उपसंचालक (शिक्षण) यांनी शिफारस केलेल्या खालील शैक्षणिक संस्थांना माध्यमिक शाळेसाठी भूखंड वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| शैक्षणिक संस्थेचे नाव | वसाहतीचे नाव | भूखंडाचे क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १) सुविधा विद्या प्रसारक मंडळ | मागठाणे, बोरीवली | १७४३ चौ. मी. |
| २) नागरिक शिक्षण संस्था | टिळकनगर, चेंबूर | १८५२ चौ. मी. |
| ३) विद्या प्रसारक मंडळ | कन्नमवारनगर, विक्रोळी | ३०१० चौ. मी. |

अ) शैक्षणिक संस्थांना प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार अधिमूल्याच्या दरांचे अवलंबन करण्यात यावे.

ब) भाडेपट्ट्याचा काळ प्रथम ३० वर्षांचा असावा.

क) ज्या प्रयोजनासाठी भूखंड वितरित करण्यात आला त्या प्रयोजनासाठीच भूखंडाचा उपयोग होत आहे याची खात्री करण्यासाठी, तसेच वसाहतीतील रहिवाशांच्या मुलांना प्रवेश प्राधान्य देण्याच्या कार्यवाहीसाठी प्राधिकरणाच्या प्रतिनिधी संस्थेच्या कार्यकारी मंडळावर नामनिर्देशित करण्यात यावा.

ड) प्राधिकरणाच्या इतर नियम व अटी यांचे पालन करण्यात यावे.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 26/Feb/1987

**Item No.** 15 **Resolution No.** 1346

विषय : श्रीयुत पी. के. रामचंद्रन्, अर्थतज्ज्ञ यांची कंत्राटी नेमणूक एक वर्षाकरिता वाढविण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
जागतिक बँक प्रकल्प आणि प्राधिकरण यांची कार्ये फर्ग्यूसन तज्ज्ञांच्या शिफारशीनुसार कार्ये कार्यान्वित करण्याचे कामकाज आणि इतर निरनिराळी कार्ये संगणकावर राबविण्याच्या कामाची जबाबदारी श्रीयुत पी. के. रामचंद्रन्, अर्थतज्ज्ञ यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. आजपर्यंत श्री. रामचंद्रन् यांच्यावर सोपविलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडली आहे. याबाबतीत बरीचशी कामे प्रगतीच्या टप्प्यावर आहेत. तेव्हा अशा खडतर (कुशल) परिस्थितीत श्री. पी. के. रामचंद्रन् यांच्या सेवेची अत्यंत आवश्यकता आहे.
फर्ग्यूसन शिफारशीनुसार आणि संगणकावर इतर निरनिराळी कार्ये पार पाडण्यासाठी श्री. पी. के. रामचंद्रन्, अर्थतज्ज्ञ जागतिक बँक प्रकल्प यांना कंत्राटी पद्धतीनुसार नेहमीच्या शर्ती अटींवर दिनांक ३.४.८७ पासून आणखी एक वर्षाची मुदत वाढ देण्यात येत आहेत.

**Meeting No. 62 A Meeting Date 27/Feb/1987**

**Item No. 14 Resolution No. 1345**

विषय : संचालक (पीएमजीपी) व सहमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना शक्तीप्रदान करण्याबाबत.

ठराव : संचालक (पीएमजीपी) व सहमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी प्रशासकीय, वित्तीय व तांत्रिक बाबींकरिता उपभोगीत असलेले सर्व अधिकार, प्रदान करण्यास या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**Meeting No. 62 A Meeting Date 04/Mar/1987**

**Item No. 4 Resolution No. 1350**

विषय : चारकोप, कांदिवली (पश्चिम) बंड मागील जमिनीचा विकास करण्याकरिता बोलविलेल्या निविदा स्वीकारण्याबाबत.

ठराव : मे. कमल कन्स्ट्रक्शन कंपनी यांची बंड मागील चारकोप, कांदिवली (पश्चिम) येथील भरावाच्या कामाकरिता दिलेली निविदा रक्कम रुपये १,१२,१८,८१२.०० जी निविदामध्ये दर्शविलेल्या अंदाजित रकमेपेक्षा सुमारे ४१.५७ टक्के (म्हणजे रुपये ७९,२४,४०२,००) अधिक असून ती स्वीकारण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**Meeting No. 62 A Meeting Date 09/Mar/1987**

**Item No. 1 Resolution No. 1347**

विषय : स्टॉफिंग पॅटर्न
प्राधिकरण व विभागीय मंडळांकरिता कर्मचारी वर्ग अनुसूची १९८७-८८

ठराव : निर्णय घेतला की,
बाब टिप्पणी सोबत जोडण्यात आलेल्या सन १९८७-८८ या वित्तीय वर्षाकरिता प्रस्तावित करण्यात आलेल्या कर्मचारी वर्ग अनुसूचीला या ठरावाद्वारे मंजूरी देण्यात आली आहे.

**Item No. 3 Resolution No. 1349**

विषय : श्री. एम. एस. देठे, शिपाई यांना खास भत्ता मंजूर करणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
जागतिक बँक प्रकल्प आस्थापनेवर लोहमुद्रकाचे पद मंजूर नसल्यामुळे लोहमुद्रक कामाचा अनुभव असलेले श्री. देठे, शिपाई यांना ते पद मंजूर होईपर्यंत द. म. रुपये ५/- खास भत्ता व दूध अंडे देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. हा खास भत्ता त्यांनी लोहमुद्रकाचे काम स्वीकारलेल्या दिनांकापासून देय राहील.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 10/Mar/1987

**Item No.** 2 **Resolution No.** 1348

विषय : मजासवाडी, जोगेश्वरी येथील सर्व्हिस इंडस्ट्रिजकरिता राखून ठेवलेल्या भूखंडावरील झोपडपट्टी हलविण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
भूखंड वाटप नियमावलीतील तरतुदीनुसार, मजासवाडी, जोगेश्वरी येथे सर्व्हिस इंडस्ट्रिजसाठी राखून ठेवलेला भूखंड त्यावरील झोपडीवासियांना पूर्ण किंमत वसूल करून पर्यायी जागा देऊन मोकळा करून घेण्यात यावा. त्यासाठी तेथेच विकसित केलेल्या निवासी भूखंडाचा उपयोग झोपडीवासियांना पर्यायी जागा देण्याकरिता करण्यात यावा. उपजिल्हाधिकारी आणि कार्यकारी अभियंता, गोरेगाव विभाग यांनी तयार केलेल्या याद्या अनुसरून झोपडीवासियांना पर्यायी जागा देण्यात याव्यात. असलेल्या पर्यायी जागांचे वाटप रीतसर जागेची किंमत एकरकमी वसूल करून तसेच करारपत्र करणे इत्यादी गोष्टी पूर्ण झाल्यावर करण्यात यावे. पर्यायी जागा झोपडीवासियांना भाडेपट्ट्यावर जमीन वाटपविषयक विनियमांत अनुसरून देण्यात याव्यात.

**Item No.** 2 **Resolution No.** 1348

विषय : मजासवाडी, जोगेश्वरी येथील सर्व्हिस इंडस्ट्रिजकरिता राखून ठेवलेल्या भूखंडावरील झोपडपट्टी हलविण्याबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
भूखंड वाटप नियमावलीतील तरतुदीनुसार, मजासवाडी, जोगेश्वरी येथे सर्व्हिस इंडस्ट्रिजसाठी राखून ठेवलेला भूखंड त्यावरील झोपडीवासियांना पूर्ण किंमत वसूल करून पर्यायी जागा देऊन मोकळा करून घेण्यात यावा. त्यासाठी तेथेच विकसित केलेल्या निवासी भूखंडाचा उपयोग झोपडीवासियांना पर्यायी जागा देण्याकरिता करण्यात यावा. उपजिल्हाधिकारी आणि कार्यकारी अभियंता, गोरेगाव विभाग यांनी तयार केलेल्या याद्या अनुसरून झोपडीवासियांना पर्यायी जागा देण्यात याव्यात. असलेल्या पर्यायी जागांचे वाटप रीतसर जागेची किंमत एकरकमी वसूल करून तसेच करारपत्र करणे इत्यादी गोष्टी पूर्ण झाल्यावर करण्यात यावे. पर्यायी जागा झोपडीवासियांना भाडेपट्ट्यावर जमीन वाटपविषयक विनियमांत अनुसरून देण्यात याव्यात.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 13/Mar/1987

**Item No.** 5 A **Resolution No.** 1351

विषय : हुडको अर्थसहाय्याने ग्रामीण भागात भूमिहीन व बेघर कामगारांसाठी घरकुले बांधण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या १९८६-८७ मधील योजनेस, शासनाचे वतीने म्हाडाने हुडकोकडून अर्थसहाय्य मिळवून देण्यास मान्यता देणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
ग्रामीण भागातील भूमिहीन व बेघर कामगारांसाठी घरकुले बांधण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या १९८६-८७ मधील योजनेस प्राधिकरणाकडून महाराष्ट्र शासनास हुडकोकडून अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीस अनुमती व अधिकृती देण्यात येते. या संबंधीची कार्यपद्धती शासनाबरोबर चर्चा करून ठरविण्यात यावी.

**Item No.** 5 **Resolution No.** 1351

विषय : जे.व्ही.पी.डी. स्कीम येथील भूखंड
क्र. १५ श्री. आर. एस. बिडीकर, यांचे नावे करण्याबाबत.

ठराव : जे.व्ही.पी.डी. स्कीम येथील भूखंड क्र. १५ स्वर्गवासी श्री. एस. आर. बिडीकर यांचे पुत्र श्री. आर. एस. बिडीकर यांच्याकडून रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार) ही गाळ्यांबाबतची हस्तांतरण फी आकारून सदर भूखंडाचा भाडेपट्टा, करारनामा श्री. आर. एस. बिडीकर यांच्या एकट्याच्या नावे बदलून देण्यात यावा.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 18/Mar/1987

**Item No.** 6 **Resolution No.** 1352

विषय : हुडकोने मंजूर केलेल्या नागरी गृहनिर्माण योजनांसाठी हुडकोकडून कर्ज घेण्यास प्राधिकरणाची अनुमती व अधिकृती मिळणेबाबत.

ठराव : विषय टिप्पणीस जोडलेल्या तक्ता 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे मालवणी, मालाड, मुंबई येथील संक्रमण शिबिर गृहनिर्माण योजनेसाठी हुडकोकडून ६१.३१ लक्ष रुपये कर्ज घेण्यास अनुमती व अधिकृती देण्यात येते. त्याचप्रमाणे या योजनेखाली करावी लागणारी प्राधिकरणाची गुंतवणूक तसेच हुडकोच्या कर्जाची परतफेड राज्य शासनाच्या अनुदानातून (ग्रँटमधून) करण्यात येईल.

**Item No.** 7 **Resolution No.** 1353

विषय : संगणक कक्षामध्ये काम करणाऱ्या चालक (ऑपरेटर) व प्रक्रिया योजनाकार (प्रोग्रामर्स) यांना विशेष भत्ता मंजूरीबाबत.

ठराव : संगणक कक्षामध्ये सध्या पदस्थापना केलेल्या प्रक्रिया योजनाकारांना दरमहा रुपये ७५/- व संगणकचालकांना दरमहा रुपये ३०/- खास भत्ता देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. हा खास भत्ता त्यांनी कार्यभार स्वीकारलेल्या दिनांकापासून देय राहील.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 19/Mar/1987

**Item No.** 7 A **Resolution No.** 1353

विषय : श्री. ना. ल. कासले, जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख यांची पुनर्नेमणूक करणेबाबत.

ठराव : निर्णय घेतला की,
जागतिक बँक प्रकल्प विभागात मूव्यवस्थापक येथे जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख या पदावर श्री. कासले यांची दिनांक १.८.८७ पासून १ वर्षासाठी पुनर्नेमणूक करण्यात येत आहे.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 24/Mar/1987

**Item No.** 8 **Resolution No.** 1354

विषय : हुडकोने मंजूरी केलेल्या कुळगाव, बदलापूर येथील १६२ अल्प उत्पन्न गट व ५६ मध्यम उत्पन्न गट भूखंडाची संमिश्र भूखंड विकास योजना (योजना क्र. ४२७६ सी) हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्याबाबत.

ठराव : विषय टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे हुडकोने दिनांक ३१.१२.८५ रोजी मंजूर केलेली कुळगाव, बदलापूर येथील संमिश्र भूखंड विकास योजना (योजना क्र. ४२७६ सी) - १६२ अल्प उत्पन्न गट भूखंड व ५६ मध्यम उत्पन्न गट भूखंड ही योजना जमिनीवर अतिक्रमण झालेले असल्यामुळे कार्यान्वित करता येत नाही म्हणून हुडको अर्थसहाय्यामधून वगळण्यास मान्यता देण्यात येते. तसेच या योजनेसाठी मंजूर झालेल्या रु. ११.१८ लक्ष कर्जापैकी हुडकोकडून मिळालेला रुपये ३,९१,०००/- चा पहिला कर्जहप्ता देय व्याजासह हुडकोस परत करण्यात यावा व या योजनेवर झालेला खर्च याच जमिनीवर पुढे अतिक्रमण हटविण्यात आल्यानंतर हाती घेण्यात यावयाच्या योजनांवरील खर्चे समाविष्ट करण्यात यावा.

---

**Item No.** 9 **Resolution No.** 1355

विषय : कर्जत येथील विकसित भूखंडाचे वाटप.

ठराव : निर्णय घेतला की, कर्जत येथील गृहनिर्माण योजनांसाठी शासनाकडून हस्तांतरित करताना जी अट घालण्यात आली आहे त्यानुसार मध्यम वर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ६९ सभासदांपैकी ५७ सभासदांना कर्जत येथे विकसित केलेल्या १३५ भूखंडापैकी अल्प उत्पन्न गटाचे ४० व मध्यम उत्पन्न गटाचे १७ असे एकूण ५७ भूखंड सोडत काढून नेहमीच्या अटींवर वाटप करावेत व उरलेले ७८ भूखंड मंडळाकडे मागणी नोंदविलेल्या अर्जदारांना सोडत काढून वाटप करावेत.

---

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 27/Mar/1987

**Item No.** 10 **Resolution No.** 1356

विषय : प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेमधून जाण्यायेण्यासाठी प्रवेशाधिकार देण्याबाबत.

ठराव : प्रशासक/प्राधिकरण यांनी ठराव क्रमांक १२६१ दिनांक २७.९.१९८६ मध्ये फेरबदल करून प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीमधून द्यावयाच्या प्रवेशाधिकार अथवा प्रवेश देण्यासाठी बाब टिप्पणी सोबत जोडलेल्या तक्त्यांमध्ये जे पर्याय व त्यासाठी जे आकार (मोबदल्याचे दर) सुचविण्यात आले आहेत त्यांना नेहमीच्या इतर शर्ती व अटींसह मान्यता देण्यात येत आहेत.
अशा प्रकारची प्रवेशाधिकार/प्रवेश देण्याची कार्यवाही करण्याचे अधिकार विभागीय मंडळाचे मुख्य अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. मात्र आवश्यक प्रकरण प्राधिकरणाकडे सादर करावीत.

**Item No.** 11 **Resolution No.** 1357

विषय : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे जमिनीच्या किंमतीविषयक धोरणाबाबत.

ठराव : एल.पी.जी. गॅस सिलेंडरच्या गोडाऊनसाठी देण्यात यावयाच्या भूखंडाचे अधिमूल्य सार्वजनिक सुविधा या सदराखाली जमिनीची मूळ किंमत व त्या वरील विकासाच्या एकूण खर्चाच्या दुप्पट आकारण्यात यावी.
वार्षिक भाडेपट्ट्याचा दर अधिमूल्याच्या किंमतीच्या रकमेच्या एक टक्का आकारण्यात यावे.
वरील अधिमूल्याच्या दराचे अवलंबन याच उद्देशासाठी जे भूखंड या आधी देण्यात आले आहेत व त्या भूखंडाचे अधिमूल्य भरून ज्यांचे करारनामे अंतिम करण्यात आले आहेत अशा भूखंडाबाबत करण्यात येऊ नयेत.
प्राधिकरणाच्या जमिनीविषयक अधिमूल्याच्या तक्त्यांत वरीलप्रमाणे समावेश करण्यात यावा.

**Item No.** **18** **Resolution No.** **1364**

विषय : दिंडोशी गाव मालाड (पूर्व) येथे गोरेगाव मुलुंड जोड रस्त्याच्या उत्तर बाजूला उच्च उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गट या योजनेअंतर्गत बहुमजली इमारतीत एकूण २४८ गाळे बांधण्याच्या कामासाठी मे.व्ही.एस.कन्स्ट्रक्शन लि. यांनी दिलेल्या ठोस रक्कम (लम्पसम) निविदा स्वीकारण्याबाबत विचार करणे.

ठराव : दिंडोशी मालाड(पूर्व) येथे उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली आगाऊ अंशदान योजनेअंतर्गत बांधावयाच्या २४८ गाळ्याची एकूण १,६०,४१४ चौ.फूट क्षेत्रफळाची जोते बांधकाम (एकूण १० इमारतीत) दर चौ.फूटास रुपये १८०/- या दराने रुपये २,८८,७४,५२०/- खर्च अधिक ६ इमारतीत योग्य त्या स्पेशिफिकेशनची उद्वाहीन पुरविणे व बसविणे (लिफ्ट) यासाठी प्रत्येक उद्वाहनाला रुपये २,३३,५००/- याप्रमाणे रुपये १४,०१,०००/- अधिक शासनाच्या विक्रीकर कायद्याप्रमाणे १.१०.१९८६ पासून देय असलेला नस्व्हर्शन टॅक्स (टर्न ओव्हर टॅक्स) ठेकेदार जो शासनाला अदा करतील तो त्यांना मंडळ मारीत करून देईल. (सध्याचा दर टॅक्सचा दर ४ टक्के आहे). या किंमतीचे काम मे.व्ही.एम.जी.कन्स्ट्रक्शन लि.पुणे यांना देण्याचा प्रस्ताव सदरहू कंपनीचे पत्र क्र.८७/एमव्हीजे/तांत्रिक/१०३९/दि. २७.२.८७ आणि २०.३.८७ अन्वये केलेली विनंती लक्षात घेऊन मान्य करण्यात येत आहे. या निर्णयासंबंधी शासनास माहिती देण्यात यावी.

**Meeting No.** 62 A **Meeting Date** 31/Mar/1987

**Item No.** 12 **Resolution No.** 1358

विषय : संचालक जागतिक बँक प्रकल्प व संचालक पीएमजीपी प्राधिकरण यांना अधिकार प्रदान करण्याबाबत.

ठराव : संचालक जागतिक बँक प्रकल्प व संचालक पंतप्रधान अनुदान प्रकल्प यांना बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे परिशिष्ट 'अ' व 'ब' मध्ये नमूद केलेले विविध विषयांवरील अधिकार प्रदान करण्यासही या ठरावाच्दये मान्यता देण्यात येत आहे. तसेच संचालक पंतप्रधान अनुदान प्रकल्प यांना गलिच्छवस्ती सुधार योजनांच्या आराखड्यात प्रशासकांस मंजूरी देण्याचे अधिकार प्रदान करण्यासही या ठरावाद्वारे मान्यता देत आहे.

**Item No.** 13 **Resolution No.** 1359

विषय : ज्ञानेश्वरनगर, शिवडी-वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालय या संस्थेस खेळाचे मैदान वापरण्यास मिळण्याबाबतची विनंती.

ठराव : ज्ञानेश्वरनगर विद्यालय, शिवडी-वडाळा या शैक्षणिक संस्थेच्या इमारतीला लागून असलेला मोकळा मूखंड खेळाचे मैदान म्हणून वापरण्याची परवानगी संस्थेला प्रथम पाच वर्षांच्या लीव्ह अँड लायसन्स बेसीसवर देण्यात यावी. मूखंडाचा वापर करण्याबाबत वार्षिक नाममात्र रुपये १००/- भाडे आकारण्यात यावे. लीव्ह अँड लायसन्समध्ये खालील अटींचा प्रामुख्याने अंतर्भाव करण्यात यावा.

१) मूखंडावर शाळेचा कोणताही मालकी हक्क राहणार नाही.

२) मुंबई मंडळाच्या योजनेसाठी मूखंडाची आवश्यकता भासल्यास कोणत्याही वेळी लीव्ह अँड लायसन्स रद्दबादल ठरविण्याचे अधिकार मुंबई मंडळाकडे राखून ठेवण्यास येतील व मूखंडाचा ताबा मूखंड जसा आहे तसा घेण्यात येईल.

३) मैदानाची देखभाल व संपूर्ण काळजी संस्थेने घ्यावी.

४) मैदानाच्या जागेवर कोणतेही बांधकाम अथवा अतिक्रमणे होऊ दिली जाऊ नयेत.

**Item No.** 14 **Resolution No.** 1360

विषय : कालिना को. ऑप. हौसिंग सोसायटी यांना जमिनीचे हस्तांतरण करण्याबाबत.

ठराव : कालिना को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., सुंदरनगर, सांताक्रुझ यांना जमिनीचे अभिहस्तांतरण करण्याबाबत विक्री करारनाम्यात निर्देशित केल्याप्रमाणे अंदाजे ३३८८४.०० चौ. वार जमीन सर्वाधिकारांनी (फ्रिहोल्ड) द्यावी.
वसाहतीमधील इमारतीखालील व लगतची जागा सोडून जी जागा उरते ती, फूटकळ मूखंड आरक्षित क्षेत्र इत्यादीबाबत स्वतंत्रपणे विचार करण्यात यावा.

**Item No.** 15 **Resolution No.** 1361

विषय : सिद्धार्थ नगर, गोरेगाव या वसाहतीतील 'विवेक एज्युकेशन' या संस्थेस भूखंड देण्याबाबत.

ठराव : विवेक एज्युकेशन सोसायटी या संस्थेला ३० बाय २२५ क्षेत्रफळाचा अतिरिक्त भूखंड सध्याच्या प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार अधिमूल्य आकारून मोकळा भूखंड खालील अटींवर वितरित करण्यात यावा.
१) पूर्वी १९५३ मध्ये देण्यात आलेल्या भूखंडाच्या भाडेपट्टीचा काळ व आता देण्यात येणाऱ्या भाडेपट्ट्याचा काळ एकाच वेळी अंतिम (को-टर्मिनल) धरण्यात यावा.
२) शाळेत शिकविले जाणाऱ्या विषयांपैकी मराठी हा एक ऐच्छिक विषय ठेवण्याची हमी.
३) वसाहतीतील रहिवाशांच्या मुलांना प्रवेशाबाबत प्राधान्य देण्याची हमी.
४) ज्या कारणासाठी भूखंड देण्यात आला त्याच कारणासाठी वापरला जाईल किंवा नाही यासाठी मुंबई मंडळाचा एक प्रतिनिधी मंडळास घेणेस मान्यता.

**Item No.** 16 **Resolution No.** 1362

विषय : घरबांधणीसाठी दिलेले कर्ज (हौस लोन) आणि भाडेखरेदी हप्ते यांच्या वसूलीचा अभ्यास करण्याचे काम सोसायटी फॉर डेव्हलपमेंट स्टडीज या संस्थेकडे सोपविणे.

ठराव : निर्णय घेतला की, घरबांधणीसाठी दिलेले कर्ज आणि भाडेखरेदी हप्ते यांच्या वसूलीचा कार्यपद्धती आणि तद्नुषंगिक गोष्टींचा अभ्यास करण्याचे काम सोसायटी फॉर डेव्हलपमेंट स्टडीज, नवी दिल्ली या संस्थेकडे सोपविण्यास प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी. यासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च हुडको बिनव्याज कर्जातून प्रतिपूर्ती करून घ्यावा.

**Item No.** 17 **Resolution No.** 1363

विषय : संत तुकाराम नगर, पिंपरी येथील पुणे मंडळाच्या वसाहतीतील सार्वजनिक कारणासाठी निर्देशित केलेले भूखंड महानगरपालिकेस देणेबाबत.

ठराव : पुणे मंडळाच्या अखत्यारित असलेल्या पिंपरी-चिंचवड येथील पुणे मंडळाच्या वसाहतीतील सार्वजनिक कारणासाठी बाब टिप्पणीत निर्देशित केलेले १ ते ४ म्हणजे १) रुग्णालय, २) शाळा, ३) बस स्थानक, ४) अग्निशामक दल - हे भूखंड सुविधा प्लॉटसाठी प्रत्यक्ष किंमत किंवा यू. एल. सी. ची किंमत म्हणजे रुपये ३/- प्रति चौ. मी. यापैकी जी जास्त असेल ती आकारून हस्तांतरित करण्यात यावेत. मात्र क्र. ५ चा भूखंड म्हणजे मार्केटचा ४०३२ चौ. मीटरचा भूखंड हस्तांतरित करताना नेहमीच्या नियमानुसार अधिमूल्य आकारून (म्हणजे निवासी बाजारभावाच्या दुप्पट इतके अधिमूल्य आकारून) हस्तांतरित करावा.

**Item No.** 19 **Resolution No.** 1365

विषय : जुहू विलेपार्ले विकास योजना येथील तेल आणि प्राकृतिक वायू आयोगाला प्रदान करण्यात आलेल्या इमारती शेजारील श्री.अबुबकर हाजी अब्दुल्ला यांचे बांधकाम हटवून पर्यायी जागा देण्याबाबत.

ठराव : १) भूखंड क्रमांक ४७ जुहू-विलेपार्ले विकास योजना येथील झोपडपट्ट्या व्यतिरिक्त शिल्लक ५२२.५० चौ.मि. क्षेत्रापैकी झोपडपट्टीतील रहिवाश्यांसाठी जाण्यायेण्यासाठी योग्य आकाराची जागा वगळून त्याचप्रमाणे श्री. अबुबकर यांचे सध्या ताब्यात असलेले (१०५.३५) चौ. मि.) वगळून इतर सुमारे ३४५ चौ.मि. भूखंड श्री. अबुबकर यांना प्राधिकरणाचे प्रचलित धोरणानुसार अधिमूल्य व वार्षिक भाडेपट्टा आकारून वितरित करण्यात यावा.

२) वरील पर्यायी जागा देण्याच्या कार्यवाहीची माहिती अप्पर जिल्हाधिकारी आणि गलिच्छवस्ती नियंत्रक मुंबई व उपनगरे यांना देण्यात यावी व त्यांची रीतसर परवानगी घेतल्यावर झोपडे हलविण्याची कार्यवाही करावी.

३) पर्यायी भूखंडाचा उपयोग निवासी तसेच हॉटेल व्यवसायासाठी करण्यात यावा. दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी उपयोग करता येणार नाही.

४) बांधकामाचे नकाशे मुंबई मंडळ/महानगरपालिकेकडून मंजूर करून घेण्यात यावेत.

५) भाडेपट्टा काळ ३० वर्षांचा धरण्यात यावा व भूखंडाच्या अधिमूल्याच्या रकमेच्या १ टक्के वार्षिक भाडेपट्टा आकारण्यात यावे.

६) अतिक्रमण हटविल्यानंतर मोकळी जागा 'तेल एवं प्राकृतिक गॅस आयोगा'च्या ताब्यात सत्वर देण्यात यावी.

७) कार्यवाहीची माहिती वेळोवेळी प्राधिकरणाला देण्यात यावी.

**Item No.** 20 **Resolution No.** 1366

विषय : मौजे वोळींज, ता. वसई येथे स. नं. ३९२ येथील जमिनीपासून पाण्याचे नळ व विजेचे खांब टाकण्यासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' देणेबाबत.

ठराव : श्री. एम. जी. एम. शेख, यास त्यांच्या सर्वे नं. ३९२ मौजे वोळींज, ता. वसई येथील जमिनीमधून पाण्याचे नळ व विजेचे खांब टाकण्यासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यात यावे.

पाण्याचे नळ टाकण्यासाठी वार्षिक भुईभाडे रुपये ३८००/- आकारण्यात यावे व विजेचे खांबास रुपये ०.२५ या दराने (एकूण ८ खांबास रु. २/-) वार्षिक भाडे आकारणी करण्यात यावे. तसेच नेहमीच्या अटी व शर्तीस अधीन राहून प्रथम ३० वर्षांच्या मुदतीचे लीज ॲग्रीमेंट करावे.

| Item No. | 21 | Resolution No. | 1367 |
|---|---|---|---|

विषय : ओशिवरा, जोगेश्वरी येथील उच्च उत्पन्न गटाचा गाळा मिळण्यासाठी कोड क्रमांक ०६५ च्या अंतर्गत श्रीमती लता अशोक डोलके यांनी केलेला अर्ज.

ठराव : निर्णय घेतला की, श्रीमती लता अशोक डोलके यांनी ओशिवरा, जोगेश्वरी येथील उच्च उत्पन्न गटाचा गाळा मिळण्याकरिता कोड क्र. ०६५ च्या अंतर्गत केलेला अर्ज प्राधिकृत अधिकारी यांनी अर्जदार महाराष्ट्रातील १५ वर्षे वास्तव्याची अट पूर्ण करीत नसल्याच्या कारणावरून अपात्र ठरविला आहे. प्राधिकृत अधिकाऱ्याचा हा निर्णय अपिल अधिकाऱ्याने कायम केला आहे. अर्जदाराने यासंबंधात दिलेले स्पष्टीकरण स्वीकारून, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अधिकाऱ्यांनी घेतलेल्या या निर्णयाचा पुनर्विचार करून, अर्जदारास महाराष्ट्रातील १५ वर्षे वास्तव्याच्या अटीच्या संबंधात पात्र ठरविण्याचे निर्देश मंडळास, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियमातील कलम १६(२) अनुसार देण्यात यावेत.

| Meeting No. | 62 A | Meeting Date | 04/Apr/1987 |
|---|---|---|---|

| Item No. | 1 | Resolution No. | 1368 |
|---|---|---|---|

विषय : माध्यमिक शाळांच्या भूखंडाच्या वाटपासाठी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने फेब्रुवारी, १९८६ मध्ये वृत्तपत्रात भूखंडाच्या वाटपाकरिता दिलेल्या जाहिराती बाबत.

ठराव : मुंबई मंडळाने माध्यमिक शाळांच्या केलेल्या जाहिरातीमधील शर्तींना अधीन राहून व उपसंचालक (शिक्षण) यांचे अभिप्राय लक्षात घेऊन शैलेंद्रनगर, दहिसर येथील माध्यमिक शाळांसाठी आरक्षित केलेल्या सुमारे ८०० चौ. मी. क्षेत्रफळाचा भूखंड पटेल एज्युकेशन ट्रस्टला खालील अटी व शर्तीवर वितरित करण्यात येत आहे :

अ) प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार भूखंडाच्या अधिमूल्याच्या दराचे अवलंबन करण्यात यावे.

ब) भाडेपट्ट्याचा काळ प्रथम ३० वर्षांचा धरण्यात यावा.

क) शिक्षण मराठी माध्यमातून देण्यात यावे.

ड) ज्या प्रयोजनासाठी भूखंड वितरित करण्यात आला आहे त्या प्रयोजनासाठीच भूखंडाचा उपयोग होत आहे याची खात्री करण्याकरिता तसेच वसाहतीतील रहिवाशांच्या मुलांना प्रवेश प्राधान्य देण्याच्या कार्यवाहीसाठी प्राधिकरणाचा प्रतिनिधी संस्थेच्या कार्यकारी मंडळावर नामनिर्देशित करण्यात यावा.

इ) प्राधिकरणाच्या इतर नियम व अटींचे पालन करण्यात यावे.